
# सांगली आणि सांगलीकर

अविनाश टिळक



# सांगली आणि सांगलीकर

■ लेखक ■

श्री. अविनाश टिळक

# जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी

कै. सौ. इंदूमती रामकृष्ण टिळक ही माझी जननी.
कै. रामकृष्ण वासुदेव टिळक हे माझे जनक.
हे मातापिता मला पूजनीय आहेतच
पण ज्या कृष्णाकाठच्या रम्य सांगलीत
माझा जन्म झाला
ती सांगली नगरी एखाद्या
तीर्थक्षेत्रासारखी मला पूज्य आहे
सांगली माझी जन्मभूमि आहे.
याचा मला अभिमान आहे.
असे म्हणतात की,
'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी.'
जननी आणि जन्मभूमिच्या
ऋणातून मुक्त होण्याचा अल्पसा प्रयत्न
म्हणून सांगली नगरीविषयी लिहिलेले हे पुस्तक
कृतज्ञतापूर्वक त्या सर्वांना अर्पण!



# सांगली आणि सांगलीकर


❖ लेखक

**श्री. अविनाश टिळक**

१/८, राजवाडा, सांगली ४१६ ४१६.

फोन : ३२३१३८

❖ प्रकाशक

**सांगली (जिल्हा) नगरवाचनालय, सांगली.**

राजवाडा चौक, म.गांधी रोड, सांगली ४१६ ४१६

फोन : ३७७७३६

❖ हक्क

**सौ. सुमन टिळक**

१/८, राजवाडा, सांगली ४१६ ४१६. फोन : ३२३१३८

❖ **प्रथम आवृत्ती :** रविवार दि. २५ मार्च २००१

❖ मुद्रक :

**श्री. प्रभाकर द. खाडिलकर**

**सुबोध मुद्रण**

७०९ ब, गांवभाग, खाडिलकर गल्ली,

सांगली ४१६ ४१६. फोन : ३३१४८३

❖ अक्षरजुळणी

**स्वरुप उद्योग**

७०९ ब, गांवभाग, खाडिलकर गल्ली,

सांगली ४१६ ४१६. फोन : ३३१४८३

❖ किंमत : रु. १५०/- मात्र.


❖ **टीप :** लेखकाच्या मताशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# स्वागत

श्री. अविनाश टिळक हे मूळचे सांगलीचे. मध्यंतरी ते नोकरीच्या निमित्ताने अनेक वर्षे मुंबईत होते. निवृत्तीनंतर कांही वर्षापूर्वी ते सांगलीत येऊन स्थायिक झाले आहेत. त्यानंतर त्यांनी आपल्या साहित्यिक व सांस्कृतिक कामाची सुरवात नव्या जोमाने सुरु केली आहे. त्यांचे वडील कै. रा. वा. टिळक, 'टिळक मास्तर' म्हणून ओळखले जात. त्यांना वाचनाचा अतोनात हव्यास होता, वेडच होते. ते नगरवाचनालयाचे अविभाज्य सदस्य वाचक होते. किंबहुना वाचन हाच त्यांचा व्यवसाय होता. पेशाने ते शिक्षक होते इतकेच. आपले हे वेड त्यांनी दुसऱ्या पिढीत संक्रांत केले आहे. श्री. अविनाश टिळक हे त्याचे ठळक प्रतीक आहेत. म्हणूनच तेही वाचनालयाचे सक्रिय कार्यकर्ते व वाचन लेखनात रस घेणारे निर्मितीक्षम रसिक म्हणून सांगलीत ओळखले जातात. त्यांच्या नावावर 'आधारवड' नावाचा एक अतिशय निष्ठापूर्ण चरित्र ग्रंथ आहे. तो त्यांच्या वाङ्‌मयीन प्रवृत्तीची व क्षमतेची साक्ष देण्यास पुरेसा आहे. त्यांची लेखन शैली जुन्या नव्या पद्धतीचे रोचक दर्शन घडविणारी आहे. सांगलीबद्दलच्या त्यांच्या प्रेमाने 'सांगली व सांगलीकर' हा परिचय ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा त्यांना मिळाली व तो ग्रंथ त्यांनी प्रेमाने व परिश्रमाने सिद्ध केला आहे. पुस्तकामागील मनोभूमिकेत ते लिहितात ''३५ वर्षांच्या दीर्घकालीन विरहात सांगलीची आठवण माझ्या मनात एकाद्या प्रेयसीच्या आठवणीसारखी ताजी होती'' मुंबईच्या वैभवात लोळताना देखील त्याना हरिपूरच्या जत्रेची, तात्यासाहेबाच्या मळ्यातील हिरव्या पाण्यात मारलेल्या उड्यांची, वडावर रंगलेल्या सूरपारंब्याची, नगरवाचनालयातील ऐतिहासिक कादंबऱ्यात हरवलेल्या ध्यानाची, विवेक हजारे, विजय भोसले या क्रिकेटपटूंची आठवण येत असे. नंतर अन्यक्षेत्रांतील नामवंत, सांगलीचे सुपुत्र आहेत याचा त्याना अभिमान वाटत असे. आद्य नाटककार विष्णुदास भावे, देवल, खाडिलकर, साधुदास, वि.स. खांडेकर, वैद्य आबासाहेब सांभारे,उद्योगरत्न दादासाहेब वेलणकर, बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर, वसंतदादा पाटील ही मंडळी तेंव्हा त्यांच्या नजरेसमोर येत. सांगलीकर कोणास म्हणावे याचा निर्णय त्यांनी स्वतः घेतला. ज्या व्यक्तीमुळे सांगलीचे नाव उज्ज्वल झाले तो सांगलीकर. अशा बावीस सांगलीकरांची निवड त्यानी केली. आणखी काही सांगलीकरांची नावे त्यांच्या दृष्टीसमोर आहेत.

पुस्तकाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात सांगली नगरीची पूर्व पीठिका व विकासाचा इतिहास सांगितला आहे. तर उत्तरार्धात बावीस नामवंत सांगलीकरांचा परिचय करुन दिलेला आहे. शेवटी परिशिष्टात आणखी काही सांगलीकर, सांगली मधील कांही प्रेक्षणीय स्थळे, नामवंत संस्था, गेल्या दोनशे वर्षांमधील महत्त्वाच्या घटना, सांगलीचा दुर्मिळ नकाशा, दुर्मिळ फोटो इत्यादी बाबींची माहिती देण्यात आलेली आहे. याप्रकारे हा सांगली परिचय परिपूर्ण करण्याचा साक्षेपी प्रयत्न टिळकांनी केलेला आहे. ही रचना विचारपूर्वक व आस्थेने केली आहे.

'सांगली-एके काळची रम्या नगरी' हे पहिले प्रकरण. प्रथम सांगलीच्या परिसराची भावार्त आठवण दिली आहे आणि नंतर नगरीचा इतिहास आठवला आहे, इ.स. १०२४ पासूनचे उल्लेख नोंदविले आहेत. सांगलीचा स्पष्ट उल्लेख इ.स. १६५९ साली लिहिलेल्या 'शिवभारत' या संस्कृत काव्यात आलेला आहे. सांगली या नावाविषयी अनेक समजुती आहेत. कृष्णा नदीच्या एका उंचवट्यावरचे सहा गल्ली असलेले गाव म्हणजे सांगली, कर्नाटकी पद्धतीचे नाव संगलकी, संगमावरचे म्हणून संगमी, त्यांचा अपभ्रंश होऊन सांगली. सांगलीचा इतिहास म्हणजे पटवर्धन राजघराण्याचाच इतिहास. १८०१ साली पहिले चिंतामणराव पटवर्धन यांनी सांगलीचे वेगळे संस्थान बनविले. नंतर वसंतदादा पाटील यांच्या काळापर्यंतची हकिगत आली आहे. या ठिकाणी विकसित झालेले उद्योगधंदे हळदीची प्रसिद्ध बाजारपेठ, इथे निर्माण झालेली नाट्यपरंपरा, शिक्षण व क्रीडा या क्षेत्रांतील नावलौकिक याबद्दलचा आढावा गौरवाने घेतला आहे.

दुसरे प्रकरण सांगलीचे राजेसाहेब चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांच्या संबंधीचे आहे. त्यांच्या घराण्याचा पूर्वेतिहास, राजपदाची योगायोगाने झालेली प्राप्ती, त्याना दिले गेलेले विचारपूर्वक शिक्षण, कॅप्टन बर्कसारख्या कर्तबगार प्रशासकाचे मार्गदर्शन, नंतर त्यानी प्रत्यक्ष राज्यकारभार करताना ब्रिटिश सरकार व संस्थानी प्रजेच्या अपेक्षा यामध्ये राखलेला समतोल, विवाहाच्या संदर्भात त्यानी दाखविलेल्या ठामपणा, त्यानी राज्यकारभारात आणलेला एकजिनसीपणा, दर्जा राखण्यासाठी सेवानिवृत्त आय.सी.एस अधिकाऱ्यांची नियुक्ती, इत्यादी बाबींचे दर्शन घडवते. संस्थानच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजेसाहेबांनी अथक प्रयत्न केले. जमिनीची सुधारणा केली. उद्योगधंदे सुरु केले. दांडेकर, भिडे, वेलणकर, शिरगावकर यांचे कारखाने उभे राहण्यास प्रेरणा दिली. बँका उभ्या केल्या. संस्थानात लोकशाहीचे रोपटे रुजवले. शिक्षणविषयक पुरोगामी

दृष्टिकोन ठेवला. सर्वप्रकारचे शिक्षण आपल्या संस्थानात पाहिजे असे त्याना वाटत असे. त्यानी चाळीस वर्षे राज्य केले पण राजेपणाचा विलास केला नाही. राजे म्हणून सचोटीने जगले. संस्थान खालसा झाल्यावर ते सांगलीतच स्थायिक झाले. १९६५ साली ते काळाच्या पडद्याआड झाले.

नटवर्य केशवराव दाते यानी सांगलीचे वर्णन नाट्यपंढरी असे केले. या पंढरीतले आद्य नाटककार श्री विष्णुदास भावे यांचा नंतर परिचय येतो. त्याना महाराष्ट्राचा भरतमुनी असे गौरवले आहे. भरतमुनीची थोरवी वेगळ्या क्षेत्रातील. विष्णुदास भावे पंडित वगैरे काही नव्हते. ते सामान्य गृहस्थ असले तरी हरहुन्नरी होते. चित्रकार, मूर्तिकार, बांधकाम तज्ज्ञ, शेतकरी वगैरे. भावे मंडळी मूळ कोकणातली. विष्णुदासांचा पहिल्यापासून गाण्या-बजावण्याकडे ओढा होता. मध्यंतरी एका मांत्रिकाबरोबर ते पळून गेले होते. ते परत आल्यानंतर त्यांच्या कलागुणांकडे पाहून राजेसाहेबांनी त्याना खाजगीकडे ठेवून घेतले. १८४२ साली दशावतारी खेळ करणारी एक कर्नाटकातील कंपनी सांगलीस आली. तिचे रासवट उद्योग श्रीमंतांना ठीक वाटले नाहीत. त्यानी भाव्याना यापेक्षा चांगल्या नाट्यकृती तयार करण्यास प्रोत्साहन दिले. फार मोठ्या प्रयत्नाने मराठीतले पहिले नाटक 'सीता-स्वयंवर' प्रसिद्ध झाले. त्यानंतर रामायणातील प्रसंगांवर त्यानी ८ / १० नाटके रचली. त्यानंतर त्यांच्या व्यावसायिक आयुष्यात अनेक चढउतार आले पण ते हरहुन्नरी असल्याने त्यानी ते सर्व पार केले आणि बाहुल्यांचा खेळ निर्माण केला. तो त्यानी स्वतः सर्वतोपरी सिद्ध केलेला होता. विष्णुदास भावे सर्वार्थाने आद्य नाटककार होते.

तिसरे प्रकरण गोविंद बल्लाळ देवलांवरचे आहे. देवलांनी नाट्यलेखन व नाटयशिक्षण यातच आपले उभे आयुष्य घालविले. नोकरी व्यवसाय केला नाही. त्यांचा जन्म १८५५ मध्ये सांगलीजवळच्या हरिपूर येथे झाला. तेथे संगमेश्वराचे प्रसिद्ध देवालय आहे. गोविंदरावांचे मोठे बंधू कृष्णाजीपंत हे संगीतशास्त्राचे जाणकार होते. मधले बंधू हे नावाजलेले नट होते. सांगलीत नाटकाचे जोरदार वातावरण होते. बेळगावात शिक्षणासाठी गेले असताना देवलांना आण्णासाहेब किर्लोस्करांचा सहवास लाभला. त्यांच्या 'शाकुंतल' नाटकावरून देवलाना नाट्यनिर्मितीची स्फूर्ती मिळाली. मृच्छकटिक आणि विक्रमोर्वशीय लिहिले गेले. 'झुंझारराव' 'संशयकल्लोळ' आणि मराठीतील अजरामर नाटक 'शारदा' निर्माण झाले. नंतरच्या आयुष्यातील चढउतार, नाटक कंपनीत मास्तर म्हणून झालेली त्यांची नियुक्ती, गंधर्व मंडळीतला प्रवेश, बडोद्याचे अधिपती

सयाजीराव गायकवाड यांच्या सूचनेवरुन लिहिले गेलेले 'संशयकल्लोळ आणि ते रंगभूमीवर येण्यापूर्वीच देवलांचा घडलेला मृत्यू यांचा प्रत्ययकारी आलेख लेखकाने काढला आहे.

त्यांचप्रमाणे कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या बहुविध साहित्यसेवेचा, स्वाभिमानी वृत्तीचा, मान्यवरांशी घडलेल्या त्यांच्या सहवासाचा, 'केसरी' मधली त्यांची संस्मरणीय कारकीर्द, त्यांच्या प्रक्षोभक लेखामुळे लोकमान्य टिळकाना घडलेला तुरुंगवास, टिळकांच्या लेखनाची त्यानी आत्मसात केलेली शैली, क्रांतिकारी चळवळीतली त्यांची कामगिरी, नेपाळमध्ये घालवलेले दिवस, गंधर्व नाटक मंडळीसाठी त्यानी लिहिलेली नाटके, टिळकांचा मंडालेतील कारावास, केसरीशी संबंध संपणे, लोकमान्यांच्या सुटकेनंतर त्यानी पुन्हा केसरीत रुजू होणे, टिळकांचा १८२० साली झालेला मृत्यू, खाडिलकरांचे ट्रस्टीचे पद जाणे, लोकमान्य, नवाकाळ या वृत्तपत्रांची  सुरवात, गांधीजीच्या राजकारणास पाठिंबा, १९२९ साली 'राजद्रोहाचा खटला, तुरुंगवास, प्रकृती खालावणे, त्यांची अखेरची नाटके न चालणे, हा सर्व प्रवास श्री अविनाश टिळकांनी ठळकपणे उलगडला आहे. ज्या स्वातंत्र्याप्राप्तीसाठी कै. खाडिलकरांनी आपली लेखणी झिजवली ते त्याना पाहता आले. १९४८ साली त्यांचे देहावसान झाले.

संत कोटणीस महाराजांच्यामुळे सांगलीला कीर्तनपंढरी म्हणून ओळखले जाऊ लागले. गुरुदेव रानडे त्याना आधुनिक एकनाथ म्हणत. त्यांच्या जीवनाची रूपरेषा लेखकाने मांडली आहे. त्यांच्या परमार्थसाधनेतील आणि व्यवसायातील चढउतार नमूद केले आहेत. त्यांच्या कीर्तनाची वैशिष्ट्ये सांगितली आहेत. फार आस्थेवाईकपणे व सविस्तर अशी ही हकीगत आली आहे.

आबासाहेब सांबारे हे लोकविलक्षण धन्वंतरी. कोल्हापूरच्या महाराजांना प्रतीक्षा करायला लावणारे आणि त्यांच्या पैलवानाला मरणाच्या दारातून परत आणणारे. त्या काळात आबासाहेब एक वैद्यकीय दंतकथा बनले होते. त्यांच्या गणपती उत्सवाचे महात्म्यही लेखकाने वर्णन केले आहे. आपल्या औषधोपचारांनी अल्लादिया खॉसाहेबांचा आवाज कसा पूर्ववत करुन दिला याची विस्मयकारक घटना लेखकाने रोचकपद्धतीने वर्णन केली आहे. लोकमान्यांपर्यंत त्यांची कीर्ती पोहचली होती. दुसरे असले विलक्षण व्यक्तिमत्व कवी साधुदासांचे. शीघ्रकवित्वाचे देणे लाभलेले ते संस्थानचे राजकवी होते, बुद्धिबळपटू होते. उत्तर पेशवाईच्या काळावर त्यानी उत्तम ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. संस्कृतवर त्यांचे प्रभुत्व होते. राजवैद्य आबासाहेब सांबारे व कोटणीस महाराज हे त्यांचे जवळचे स्नेही

होते. साधुदासांच्या शीघ्रकवित्वाचे कांही नमुने पुस्तकात सादर केले आहेत. 'काव्यविहारी' हे रविकिरण मंडळापूर्वीचे सांगलीतले प्रसिद्धी पावलेले कवी. ते केशवसुतांच्या प्रणालीतील समाजसुधारणाविषयक कविता करत. आचार्य अत्रे यांचा काव्यविहारींवर विशेष लोभ होता. राष्ट्रीय भावनेला आवाहन आणि सुबोध, ओघवती रचना हे त्यांच्या काव्याचे विशेष होते. बुधगावकर सरकारनी त्याना शिक्षणासाठी मदत केली आणि नंतर ते त्या संस्थानात न्यायदानाचे काम करीत राहिले. आपल्या काव्यशक्तीची जोपासनाही ते निष्ठेने करीत राहिले. त्यांची 'कलिका' ही कविता मनोरंजनच्या पहिल्या पानावर छापून आली तेव्हा ते हर्षभरित झाले. 'काव्यविहार' व स्फूर्तिलहरी' हे त्यांचे काव्यसंग्रह रसिकमान्य झाले. त्या संग्रहांचा एम्. ए. च्या मराठी अभ्यासक्रमात समावेश झाला. नाटककार देवलांचे चरित्र आणि स्वतःचे आत्मचरित्र अशी त्यांची दोन गद्यसाहित्यातील पुस्तके. १९७५ साली काव्यविहारी निवर्तले.

ज्ञानपीठ विजेते साहित्यिक विष्णु सखाराम खांडेकर हे देखील सांगलीचे सुपुत्र. सांगली येथे त्यांचा जन्म १८९८ साली झाला. त्यांचे घर गणपतीमंदिराजवळ होते आणि त्यांच्या जन्मदिवशी संकष्टी होती म्हणून त्यांचे नाव गणेश ठेवण्यात आले. ते दत्तक गेल्यावर त्यांचे नाव विष्णु सखाराम खांडेकर असे झाले. हे घराणे मूळचे कोकणातले. खांडेकरांचे शिक्षण सांगली हायस्कूलमध्ये झाले. तेथे त्यांनी उत्तम अभ्यास केला. त्याना स्कॉलरशिप मिळाली. पुढच्या शिक्षणासाठी ते पुण्यास फर्गसनला गेले. १९१४ साली त्यानी सांगली सोडली. ते कादंबरीकार, समीक्षक, चित्रपट कथालेखक झाले. अनेक मानसन्मान त्यांच्या वाट्याला आले. 'ज्ञानपीठ' पारितोषिकाने त्यावर कळस चढविला.

धनी वेलणकर हे सांगलीचे स्वतंत्र बाण्याचे, कल्पक उद्योगपती. त्यांनी प्रसिद्ध गजानन मिलची स्थापना करुन सांगलीत उद्योगांची मुहूर्तमेढ उभी केली. त्यांचे आयुष्य विविध कसोट्या देण्यात खर्च झाले. मेहनतीने उभी केलेली गजानन मिल गांधीहत्येनंतर आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. वेलणकरानी धीर सोडला नाही. एका वर्षापूर्वीच त्यांची सुवर्णतुला थाटामाटात साजरी झालेली होती. त्यानी मिलची पुन्हा उभारणी केली. वेलणकरांनी आयुष्याची सुरवात चार आणे मजुरीवर केली होती. लहानपणी व्यायाम करुन त्यानी कुस्त्या मारल्या होत्या. त्यानी नेहमीचे शिक्षण सोडून बडोद्यात विणकामाचे शिक्षण घेतले. ते टिळकभक्त होते. टिळकानी महाराष्ट्रीयन तरुणानी उद्योगधंदे उभारावेत असा संदेश दिलेला होता. त्याला अनुसरुन वेलणकरांनी स्वतंत्र उद्योग सुरु

केला. विणकामाच्या शिक्षणाचा पाठपुरावा त्यानी सोलापुरात सर्वतऱ्हेची कामे करुन केला. १९१२ साली ३ मागांवर त्यानी कारखाना सुरु केला आणि त्याचा प्रचंड विकास केला. एकसष्टाव्या वर्षी त्यांची जी सुवर्णतुला झाली त्यातून एक ट्रस्ट निर्माण केला. त्यातून समाजातील विधायक कामाला मदत देण्याची योजना तयार केली. अखेरच्या पर्वात त्यानी ग्रंथ निर्मिती केली. 'कारखानदार कसा झालो' हे त्यांचे पुस्तक लोकप्रिय ठरले. वयाच्या ९१ व्या वर्षी १९७८ साली त्यांचे निधन झाले.

संगीताचे गाढे व्यासंगी ग.ह. रानडे हे सांगलीचे सुपुत्र. त्यांचे शिक्षण सांगली येथे व पुण्यात फर्गसन कॉलेजमध्ये झाले. नंतर ते विलिंग्डनला फिजिक्स विषयाचे प्रोफेसर म्हणून आले. संगीतावर मराठी-इंग्रजीत त्यानी भरपूर लेखन केले. सुशिक्षतांचे संगीत, Hindustan Music, its Physics and Aesthetics व Music of Maharashtra ही त्यांची प्रमुख पुस्तके. संगीत नाटक अकादमीचे सल्लागार म्हणून त्यांची नेमणूक झाली. पुढे त्यानी Encyclopaedia of Music हा ग्रंथ सिद्ध केला. त्यांची संगीतावरची भक्ती आणि व्यासंग अनन्यसाधारण होता.

नटवर्य मामा पेंडसे यांच्यावरील लेख रसिकतेने संपन्न आणि सविस्तर झाला आहे. त्यांची रंगभूमीवरील निष्ठा, त्यापायी उपसलेले कष्ट, केलेली हलकीसलकी कामे, नंतरचा रंगभूमीवरील प्रवेश आणि अभिनयाचे प्रात्यक्षिक, निरनिराळ्या भूमिकांतील अभिनयाला मिळालेले यश, केशवराव दात्यांचा लोभ, नंतर अनेक लहानसहान व्यवसाय करण्याची पाळी, मुंबईत सुरु केलेला दुधाचा धंदा आणि त्याचवेळी नाटक कंपन्याची येणारी आमंत्रणे, 'भाऊबंदकी'त नाना फडणीसांची गाजलेली भूमिका, या सर्व गोष्टींचे तपशीलवार वर्णन लेखकाने केले आहे. नाना फडणीसांच्या भूमिकेने मामाना मुंबईत विशेष स्थान प्राप्त करुन दिले. मध्यंतरीच्या काळात पोटदुखीच्या विकारासाठी त्यांची तीन ऑपरेशन्स् करावी लागली. नंतरही त्यांच्या अनेक भूमिका संस्मरणीय ठरल्या. त्यांचे 'केशराचे शेत' हे आत्मचरित्र वाचनीय ठरले.

दुसरे अभिनेते गणपतराव मोहिते उर्फ मा. अविनाश. लता मंगेशकर यांच्या घराण्याशी त्यांचा अनेक दशकांचा घनिष्ट संबंध त्यांच्या नव्वदीत आजही तो टिकून आहे. 'कुलवधु' या नाटकाशी आणि 'पायाची दासी' या चित्रपटाशी त्यांचे नाव कायमचे निगडीत आहे. गेली ८५ वर्षे त्यांचा मराठी रंगभूमीशी निकटचा संबंध आहे. मा. अविनाश म्हणजे मराठी नाट्यकलेचा या काळातला

चालता बोलता इतिहास आहे. नाट्यनिकेतनची त्यानी ३३ वर्षे सेवा केली. ते निवृत्त झाले तेव्हा त्यांची लोकप्रियता अबाधित होती. आजही ते ताठ मानेने आठवणींच्या विश्वात जगत आहेत.

सांगलीचे सर्वात मोठे कर्तेकरविते म्हणजे वसंतराव पाटील. त्यांच्याशिवाय सांगलीकर सुपुत्रांचा इतिहास पूर्ण होणार नाही. त्यांचे सारे कर्तृत्व महाराष्ट्राला सुपरिचित आहे. त्याचा समर्थ आढावा श्री. टिळकानी घेतलेला आहे. कै. वसंतदादा हे सांगली भागातले राष्ट्रविख्यात व्यक्तिमत्व होय. सांगलीचे भाग्यविधाते. वसंतदादा यांच्या आयुष्यातील नाटयपूर्ण घटना लेखकाने अनुरुप शैलीत मांडल्या आहेत. त्यांच्या राजकीय जीवनातील कर्तृत्व आणि यशाची चढती कमान यांचाही आलेख चित्रित केला आहे. त्यानी केलेल्या कामाचा पसारा तपशीलाने दिग्दर्शित केला आहे. दानचिंतामणी राजमतीअक्का, क्रीडाक्षेत्रातील जागतिक कीर्तीचे क्रिकेटपटू विजय हजारे आणि बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर, बुद्धिबळपटू भालचंद्र म्हैसकर, मल्लविद्येचे द्रोणाचार्य हरि नाना पवार, समर्थ कथाकार श्री. दा. पानवलकर या सर्वांच्या जीवनाचे आणि कर्तृत्वाचे ठसठशीत दर्शन श्री. अविनाश टिळकांनी घडविले आहे. त्याचप्रमाणे सय्यद अमीन या सांगलीतील साहित्यिकाचाही समावेश या मालिकेत केला आहे. ते एक सालस आणि संत प्रवृत्तीचे गृहस्थ होते. हिंदू-मुस्लीम ऐक्याचा पुरस्कार श्री. अमीन यानी आपल्या लेखणीने आणि वाणीने आयुष्यभर केला. संस्कृतचे नामवंत शिक्षक श्रीपादशास्त्री देवधर यांचे ते आवडते विद्यार्थी होते. ते सांगली नगरपालिकेचे नियुक्त सभासद होते. पुणे विद्यापीठाच्या कोर्टाचे सदस्य होते. 'पी.ई.एन' या आंतरराष्ट्रीय लेखकसंघाचे ते सभासद होते. त्यानी स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला होता. ते अत्यंत साधेपणाने राहत असत. त्यानी एकूण १६ ग्रंथ लिहिले. त्यात संशोधनात्मक चरित्रे आणि धार्मिक साहित्य होते. इस्लाम, इस्लाम आणि नीतिशास्त्र, इस्लाम आणि संस्कृती हे त्यांचे प्रमुख ग्रंथ. हिंदू-मुस्लिमांचा सांस्कृतिक मिलाफ हा त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ. अकबर, पैगंबर यांची चरित्रे त्यानी लिहिली. तसेच छत्रपती शिवाजींचे चरित्रही लिहिले. ही सर्व पुस्तके त्यानी स्वखर्चाने प्रसिद्ध केली. ६८ व्या वर्षी सिटी बसच्या धक्का लागून त्यांचे अपघाती निधन झाले.

सांगलीचा जन्मदाता चिंतामणराव पटवर्धन यांच्या जीवनदर्शनाखेरीज ही सांगलीकरांची मालिका पूर्ण झाली नसती. चिंतामणरावानी सांगलीला नवा चेहरा मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्याची पूर्वपीठिका लेखकाने आस्थेवाईकपणे व साद्यंत सादर केली आहे. गणेशदुर्ग, गणपतीमंदिर यांची

उभारणी, त्यानी इंग्रज सरकारशी केलेले स्वाभिमानाचे वर्तन, पुढे इंग्रज सरकारने त्यांचा केलेला अभूतपूर्व सन्मान आणि त्यानंतर त्यांनी सांगलीची केलेली सर्वांगीण सुधारणा, याचे सरस निवेदन लेखकाने केले आहे. शेवटी सांगलीकर व्यक्तिंचे गुणगान संपवताना लेखकाने भैरवी म्हणून मंगेशकर सुरांना अभिवादन केले आहे.

पुस्तकाच्या अखेरीस काही परिशिष्टे आणि पुरके जोडली आहेत. त्यांतून सांगलीतील महत्त्वाच्या संस्थांची माहिती आणि कालपट जोडले आहेत. ही माहिती उपयुक्त आणि पूरक आहे.

श्री. अविनाश टिळक यानी अत्यंत परिश्रमाने सर्वप्रकारची माहिती एकत्र करुन हा एक ग्रंथ सर्वस्पर्शी केला आहे. नगर, वास्तू आणि नामवंत व्यक्ती यांची परस्परसंवादी आणि पूरक अशी रचना विचारपूर्वक आणि जातिवंत रसिकतेने केली आहे ती 'सांगली बहु चांगली' या प्रशस्तीची सार्थकता पटवून देणारी आहे. नगरीपेक्षा नामवंत व्यक्तींवर अधिक भर दिला आहे तो एक प्रकारे योग्यच म्हणावा लागेल. त्यात काही प्रमुख साहित्यिक, कार्यकर्ते, उद्योगपती, राजकीय नेते, क्रीडापटू आहेत आणि अन्य सांगलीकरही आहेत.

सांगली नगरवाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे मान्य करून वाचनालयाच्या परंपरागत व्यवहारात एक नवी वाट पाडली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. सुबुद्ध, रसिक सांगलीकर आणि सांगलीप्रेमी वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील आणि ग्रंथकारास धन्यवाद देतील असा विश्वास वाटतो.

'निर्वेद', विश्रामबाग; सांगली. **प्रा. म. द. हातकणंगलेकर**
१ फेब्रुवारी २००१

# लेखनामागील भूमिका

१९६१ मध्ये मी सांगली सोडली आणि १९९६ मध्ये मी पुन्हा कायम वास्तव्यासाठी सांगलीत आलो. दरम्यानच्या काळात मी मुंबईला रिझर्व्ह बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या, बँकांची बँक असणाऱ्या संस्थेत नोकरी केली. रिझर्व्ह बँक आणि तिथं लाभलेला अफाट स्नेहपरिवार यांचे माझ्यावर अनंत अुपकार आहेत. ऑफिसातील अनेक गुणीजनांमुळेच मला बॅडमिंटन, क्रिकेट, ब्रिज, कॅरम, ट्रेकिंग आदि क्रीडाविषयांपासून साहित्य, संगीत, नाट्य, अशा विविध विषयांकडे डोळसपणे पाहून त्यातील सौंदर्य समजावून घेण्याची, आनंद लुटण्याची दृष्टी लाभली. सांगलीतील विविध क्षेत्रांमधील, मानदंडांच्या कर्तृत्वाकडे पाहताना, मला या दृष्टीचा अुपयोग झाला.

या ३५ वर्षांच्या दीर्घकालीन विरहातसुध्दा 'सांगली' या रम्या नगरीची आठवण एखाद्या प्रेयसीच्या आठवणीसारखी, माझ्या मनात सदैव ताजी होती! परगावात राहिलं की आपल्या जन्मगावाचं प्रेम आणि परदेशात राहिलं की आपल्या देशाचं प्रेम वाढीस लागतं! हा अनुभव सर्वांचाच असेल पण मोगल बादशहा बाबराने आपल्या आत्मचरित्रात लिहिलंय तशी माझी गत व्हायची. दिल्लीत येऊन त्याने मोगल पातशाही स्थापली, वैभवात लोळू लागला तरी त्याला त्याच्या काबूल, कंदाहारच्या आठवणी, लालचुटुक रसरशीत कलिंगडाच्या फोडींच्या आठवणी, अस्वस्थ करुन टाकत. मुंबईच्या अलिशान बिल्डिंगज्, अुंची हॉटेल्स, विश्वविख्यात ब्रेबॉर्न स्टेडियम, वानखेडे स्टेडियम, तिथल्या क्रिकेट-मॅचेसच्या चित्तथरारक लढती, जहाँगीर आर्ट गॅलरीमधली प्रदर्शने, शिवाजी मंदिर, गडकरी रंगायतनची नाटकं, अखिल भारतीय कीर्तीच्या गायकांच्या, षण्मुखानंद हॉल, एन.सी.पी.ए., रंगमंदिर या ठिकाणी होणाऱ्या मैफली, अशा 'वैभवात' असतानासुद्धा मला आठवायची ती श्रावणी सोमवारची हरिपूरची जत्रा, आयर्विन ब्रिजच्या गॅलरीमधून दिसणारा कृष्णेचा महापूर, सांगली हायस्कूल ग्राअुंडवरील (आताचं छत्रपती शिवाजी स्टेडियम ) संभू चाबूकस्वार, विवेक हजारे, विजय भोसले यांनी गाजवलेल्या आरवाडे शील्डच्या, चिंचेच्या झाडांवरुन (तो आमचा 'अीस्ट स्टँड'!) पाहिलेल्या क्रिकेट मॅचेस,

तात्यासाहेबांच्या मळ्यातील हिरव्यागार पाण्याच्या प्रशस्त विहिरीत मारलेल्या अुड्या, माळबंगल्याच्या अुजाड माळावरच्या वडाच्या झाडांवरील सूरपारंब्या, सांगली नगरवाचनालयात धुंडाळलेल्या हरिभाऊ, नाथमाधवांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, अशा बालपणीच्या अनेक आठवणी व्याकूळ करुन टाकत असत.

पण हे होतं गावाचं प्रेम. निखळ प्रेम.

जसजसं वय वाढत गेलं, जाणिवा रुंदावत गेल्या, तसतसं आपलं गाव कसं अभिमान बाळगण्याजोगं आहे याची सुखद जाणीव होऊ लागली. मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर चंदू बोर्डेचा बॅकफूट कव्हर ड्राईव्ह बघताना, विजय हजारेंच्या लाजवाब कव्हर ड्राईव्हची आठवण निघायची. मग कुणी विचारायचा " अरे, हा हजारे तुमच्या सांगलीचा ना? " सी.सी.आय, माटुंगा जिमखाना येथे बॅडमिंटन मॅचेस बघताना नंदू नाटेकरांच्या आठवणी निघायच्या आणि मग हा जगप्रसिद्ध बॅडमिंटनपटू आपल्या सांगलीचा आहे याचा अभिमान वाटायचा.

साहित्यसंमेलनातून, नाट्यसंमेलनातून वावरताना, आज फोफावलेल्या नाट्यसृष्टीचे जनक (विष्णुदास भावे) सांगलीचे आहेत. गोविंद बल्लाळ देवल, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या दोन नाट्याचार्य सांगलीकरांनीच आपल्या अजरामर नाटकांमुळे सांगलीची कीर्तिध्वजा फडकत ठेवली, या वस्तुस्थितीचा अभिमान वाटायचा. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या शिल्पकारांमध्ये अग्रस्थानी असणारे, मराठीतील पहिले ज्ञानपीठ पारितोषिक विजेते, वि.स.खांडेकर हे सांगलीचे आहेत या जाणीवेने अूर भरुन यायचा. संगीताच्या मैफलीतून वावरताना आबासाहेब सांबारे, या सांगलीच्या धन्वंतरीच्या आठवणी निघायच्या, तेव्हा आश्चर्याने थक्क व्हायला व्हायचं. गानमहर्षी अल्लादियाखाँसाहेबांचा आवाज कसा त्याना 'सोडून' गेला होता आणि सांबारे वैद्यानी कसा या संगीत-सम्राटाला 'पुनर्जन्म' मिळवून दिला, मोगुबाई कुर्डीकरांसारख्या गान-तपस्विनी, नाथमाधवांसारखे कादंबरीकार, सांगलीत या वैद्यबुवाचं औषध मिळावं, देखरेख लाभावी, म्हणून कसे सांगलीत येऊन रहात असत, यांच्या आठवणी निघत. खुद्द लोकमान्य टिळक, आबासाहेबांना किती मानत असत याच्या साक्षी निघत. वसंतदादा पाटील यांच्या राजकीय कर्तृत्वामुळं सांगलीचं नाव, महाराष्ट्रातच काय पण संपूर्ण देशात दुमदुमत होतंच!

हळूहळू सांगलीबद्दल नुसतं प्रेमच नव्हे तर सार्थ अभिमानही मनात नांदू लागला!

तेव्हा या सांगली नगरीला भूषणभूत असणाऱ्या व्यक्तींविषयी एकत्रितपणे काही तरी लिहिलं जाणं आवश्यक आहे याची जाणीव सदैव टोचू लागली.

सांगलीत आल्यावर तर हे काम किती कठिण आहे आणि त्याची व्याप्ती किती मोठी आहे याची कल्पना आली. ज्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, हरिभाऊंच्या तोडीच्या आहेत आणि ज्यांचं शीघ्रकवित्व, रेंदाळकरांसारख्या अनेक मान्यवर कवींना संभ्रमात पाडे, असे कवी साधुदास, ज्यानी प्रपंच नेटका करुन, वकिलीचा व्यवसाय चरितार्थासाठी करुन, भक्तिमार्गाची कास धरली, आपल्या अमोघ कीर्तनाने हजारो श्रोत्यांना आनंद दिला, समाजप्रबोधन करुन सन्मार्गाला लावले, ते संतश्रेष्ठ कोटणीसमहाराज, चार आणे मजुरीवर काम करत करत, सचोटी, हातोटी आणि चिकाटी या त्रिसूत्रीच्या आधारावर, स्वतःची सुवर्णतुला करुन घेण्याइतकी स्वतःची अुन्नती करुन घेतली, ते सर्व सोने समाजाला दानरुपाने परत करुन विलक्षण दातृत्व दाखविले, स्वतःचा कारखाना, समाजकंटकांच्या कारवायांमुळे, डोळ्यासमोर आगीच्या भक्ष्यस्थानी पडला असता, फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा भरारी मारून, सांगलीकर जनतेस अुद्यमशीलतेचा वस्तुपाठ घालून दिला ते श्रीगजानन मिल्सचे धनी दादासाहेब वेलणकर, पैलवान म्हणजे जाता-येता गुरगुरणारा शक्तिशाली पुरुष, या कल्पनेला छेद देणारे, आपल्या सात्त्विक आचरणाने जनमानसात स्वतःसाठी आदराचे स्थान निर्माण करणारे, कुस्तीचे शास्त्रशुद्ध शिक्षण नवशिक्या पैलवानांना मिळावं म्हणून धडपडणारे हरि नाना पवार, असे किती तरी सांगलीकर डोळ्यासमोर चमकून गेले.

अशा अनेक सांगलीकरांविषयी लिहायला हवं होतं!

त्यातून डोळ्यासमोर एक तांत्रिक प्रश्न होता. तो म्हणजे मुळात आधी 'सांगलीकर' म्हणून कोणास संबोधायचं? नुसता जन्म सांगलीचा आणि कर्तृत्व सांगलीबाहेर असणाऱ्याला 'सांगलीकर' समजायचे की जन्म बाहेरगावचा असूनहि सांगलीत कर्तृत्व गाजवून समाजात मान्यता पावलेल्या व्यक्तीला 'सांगलीकर' म्हणायचे?

या प्रश्नाची मी अनेक मान्यवरांबरोबर चर्चा केली. पण

समाधानकारक तोडगा सापडला नाही.

मग मी माझ्यापुरता सुवर्णमध्य साधला. ज्या कोणा व्यक्तीमुळे सांगलीचे नाव अुज्ज्वल झाले तो 'सांगलीकर'.

मी निवडलेले बावीस मानकरी या स्वनिर्मित व्याख्येत बसतात; निदान 'सांगलीकर' म्हणून सर्वमान्य असावेत ही अपेक्षा !

साहित्य, नाट्य, संगीत, अुद्योग, वैद्यक, क्रीडा, राजकारण अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश या पुस्तकात केला आहे. अजून अनेक मान्यवर सांगलीकर आहेत. पण आर्थिक मर्यादांचा विचार करता, मला या बावीस सांगलीकरांपर्यंतच स्वतःला थांबवावं लागलं; अन्यथा अजून किती तरी वर्षे मला थांबायला लागले असते! पण या पुस्तकाचे चांगले स्वागत झाल्यास 'आणखी काही सांगलीकर' समाजासमोर आणायची मनात अिच्छा आहे.

"सांगली बहु चांगली," तेव्हा सांगलीविषयी काहीतरी हवंच, खरं म्हणजे सांगली नगरीच्या अतीव प्रेमापोटी, माझ्या या पुस्तकात 'सांगली' एवढ्याच विषयाचा मजकूर निम्म्यापेक्षा अधिक पुस्तक व्यापू लागला, तेव्हा नाईलाजाने मला 'सांगली-नियमन' करावं लागलं. धावता आढावा घेत घेत 'मोठी' सांगली 'छोटी' करावी लागली!

अगदी मूळच्या सहा गल्लयांअितकी ती छोटी होणार नाही याची मात्र काळजी घेतली!

आपल्या कर्तृत्वाचा ठसा विविध क्षेत्रांमध्ये अुमटवणाऱ्या पूर्वसूरींचे आणि विद्यमान व्यक्तिंचे ऋण फेडण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे. भावी पिढ्यांना तो स्फूर्तिदायक ठरेल, प्रेरणादायी ठरेल अशी अपेक्षा आहे.

अशी एकूण ही 'सांगली आणि सांगलीकर' या पुस्तकाची पूर्वपीठिका.

# प्रकाशकांचे मनोगत

'सांगली आणि सांगलीकर' हा श्री. अविनाश टिळक यांनी लिहिलेला मौलिक ग्रंथ, वाचकांच्या हाती सोपविताना आम्हाला अनेक कारणांनी विशेष आनंद होत आहे.

सांगली (जिल्हा) नगरवाचनालय ही संस्था एक प्रकारे भूतपूर्व सांगली संस्थानचे अपत्य आहे. सांगली नगरीच्या स्थापनेला या वर्षी म्हणजेच २००१ सालात दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने श्री. टिळक यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात औचित्य तर आहेच पण त्याशिवाय भूतपूर्व संस्थानच्या ऋणातून अंशतः अुतराई होण्याची संधी या पुस्तकामुळे संस्थेला मिळाली आहे.

या पुस्तकात सांगलीच्या गेल्या दोनशे वर्षांच्या इतिहासाचा आढावा घेण्यात आला असून सांगलीसंबंधीची मौलिक माहिती एकत्र करण्यात आली आहे. तसेच विविध क्षेत्रात स्पृहणिय कामगिरी बजावून सांगलीचे नांव उज्वल केलेल्या बावीस सांगलीकरांच्या व्यक्तिमत्वाचा आणि कर्तृत्वाचा सुयोग्य परिचय श्री. अविनाश टिळक यानी करुन दिला आहे. त्यामधून सांगलीच्या इतिहासाचे मनोज्ञ दर्शन घडते. सर्वांनीच आणि विशेषतः सांगलीकर जनतेने आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे. ''जनतेत चांगल्या ग्रंथाची वाचन अभिरुची उत्पन्न करुन तिच्यामध्ये बौद्धिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे'' या वाचनालयाच्या ध्येयधोरणाला पूरक होणारे कार्य अशा दृष्टिकोनातून सदर पुस्तकाचे प्रकाशन संस्था करत आहे.

या पुस्तकाचे लेखक श्री. अविनाश टिळक हे आमच्या कार्यकारिणीचे गेली दोन वर्षे तज्ञ सभासद आहेत. त्यानी अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेले पुस्तक सर्वार्थाने परिपूर्ण आहे असा संस्थेचा दावा नाही; किंवा लेखकाचीही तशी धारणा नाही. तथापि स्थानिक इतिहास लेखनाला आधारभूत ठरेल असेच हे पुस्तक आहे हे निश्चित. विस्मृतीत जात असलेल्या सांगलीकर व्यक्तींचे कर्तृत्व भावी पिढ्यांना स्फूर्तिदायक ठरेल आणि त्यांच्या कार्यापासून अनेक सांगलीकर युवक प्रेरणा घेतील अशी आशा आहे.

एकशे बत्तीस वर्षे पूर्ण करीत असलेले सांगली (जिल्हा) नगरवाचनालय ही आज एक सुप्रतिष्ठित संस्था आहे. सांगलीच्या सांस्कृतिक जीवनात या संस्थेला महत्वाचे स्थान आहे. नेहमीच्या पारंपारिक कार्यापासून एक वेगळा उपक्रम, संस्था या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या रुपाने हाती घेत आहे. या कल्पनेचे स्वागत झाल्यास अशाच तऱ्हेचे उपक्रम राबवण्यास संस्थेला हुरुप येईल.

दोनशे वर्षे पूर्ण करुनही तरुण दिसणाऱ्या आणि सातत्याने नवे बदल स्वीकारीत शिक्षणाचे आणि संस्कृतीचे पश्चिम महाराष्ट्रातील केंद्र बनलेल्या सांगली नगरीस या ग्रंथाच्या प्रकाशनाद्वारे आम्ही मानाचा मुजरा करीत आहोत.

**ॲड. भा. य. डोंगरे**
(कार्यवाह)

**श्री. ज. भा. लिमये**
(अध्यक्ष)

सांगली (जिल्हा) नगरवाचनालय, सांगली.

# ऋणनिर्देश

गेली तीन वर्षे मी या पुस्तक लेखनाच्या खटाटोपात आहे. या काळात मी असंख्य लोकांना भेटलो. अनेक वाचनालये धुंडाळली. या सर्वांचा नामोल्लेख करता येणार नाही पण कांहीचा केल्याशिवाय मनाला स्वस्थताही वाटणार नाही. अशा वेळी सर्वप्रथम डोळ्यासमोर नाव येते ते प्रि. क. श्री. काळे यांचे. काही पूर्वपरिचय नसताना त्यानी मला लेखनकामात बहुमोल मार्गदर्शन केले. सातत्याने प्रोत्साहन दिले. इतकेच काय पण वेळप्रसंगी पुस्तकाची प्रुफेही तपासून दिली. असेच सदैव माझ्या पाठीशी सातत्याने राहिले ते माझे मित्र प्रा. काशिनाथ वाडेकर. त्यानी आणि श्री. न.वा. सहस्त्रबुद्धे यानी प्रुफे तपासण्याचे किचकट काम मनापासून केले. माहिती संकलनासाठी डॉ. मधु आपटे, प्रा. सुधाकर रानडे, हिंदुराव पाटील, डॉ. श्रीनिवास नाटेकर, डॉ. सांबारे, प्रा. रोहिणी तुकदेव, श्री. शिवाजीराव पवार, संजय कोटणीस, मधुकर खरे, अशोक तेलंग, पंडित पानवलकर, सदानंद कदम, सिकंदर अमीन या सर्वांची मला मदत झाली. तसेच छायाचित्रे मिळविण्यासाठी सर्वश्री अशोकराव घारपुरे, प्रभाकर वेलणकर, सुरेश पाटील (माजी नगराध्यक्ष) यांची मदत झाली. या सर्वाचा मी ऋणी आहे.

प्रा. हातकणंगलेकर सरांचे औपचारिकपणे आभार मानणेही चुकीचे ठरेल इतकी आस्था त्यांनी या पुस्तकाच्या कामी दाखविली. अनेक कामांच्या आणि दौऱ्यांच्या गर्दीतून त्यांनी प्रस्तावना लिहिण्यासाठी वेळ दिला हे माझे भाग्यच. सांगली (जिल्हा) नगरवाचनालयाने पुस्तक प्रकाशनाचे काम करुन एक प्रकारे पुस्तकाला प्रतिष्ठाच मिळवून दिली त्याबद्दल कार्यकारी मंडळाचा मी आभारी आहे.

पुस्तकासाठी चाललेली माझी धडपड पाहून श्री. भास्करराव भिडे (माधवनगर) आणि श्री. प्रभाकरराव गद्रे (प्रसाद व्हरायटी स्टोअर्स) यानी आपणहून प्रत्येकी रु.१०००/-ची देणगी देऊन शुभारंभ केला. 'श्रीमती राजमती नेमगौंडा पाटील ट्रस्ट'ने मला रु.५०००/-ची घसघशीत देणगी दिली. याशिवाय पुढील व्यक्ती व संस्थानी आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांचा मी ऋणी आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालीका,

सांगली चेंबर ऑफ कॉमर्स

भारती विद्यापीठ

सांगली अर्बन को.ऑप. बॅक लि.

मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ-सराफ पेढी

मे. गोविंदराम शोभाराम आणि कंपनी

# अनुक्रम

## पूर्वार्ध


१) सांगली - एके काळची रम्य नगरी १


## उत्तरार्ध


२) सांगलीचे लोकोत्तर राजेसाहेब - चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन ११
३) महाराष्ट्राचा आद्य नाटककार - विष्णुदास भावे २२
४) नाट्यसेवेला सर्वस्व मानणारे - नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल ३१
५) प्रखर देशभक्त नाट्याचार्य - कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ४३
६) 'आधुनिक अेकनाथ' पारमार्थिक कीर्तनकार- संत कोटणीस महाराज ५५
७) सांगलीचे लोकविलक्षण धन्वंतरी - आबासाहेब सांबारे ६७
८) योगभ्रष्ट प्रतिभावान कवी - साधुदास ७७
९) अुद्योगरत्न - कै. दादासाहेब वेलणकर ८७
१०) शास्त्रीय संगीताचे गाढे व्यासंगी - प्रो. ग. ह. रानडे ९९
११) केशवसुतसंप्रदायाचे अध्वर्यू - कवी काव्यविहारी १०७
१२) बुद्धिबळपटू - भालचंद्र म्हैसकर ११७
१३) मल्लविद्येचे द्रोणाचार्य - कै. हरि नाना पवार १२५
१४) ज्ञानपीठ पारितोषिक विजेते - वि.स. खांडेकर आणि सांगली १३२
१५) नटवर्य - मामा पेंडसे १४०
१६) मा. अविनाश (श्री. गणपतराव मोहिते) १५२
१७) दान चिंतामणी - राजमतीबाई पाटील १३७
१८) कथाकार - श्री. दा. पानवलकर १७३
१९) सय्यद अमीन - एक सालस व्यक्तिमत्व १८०
२०) क्रिकेटपटू- विजय हजारे १८३
२१) बॅडमिंटन युग निर्मिणारे - नंदू नाटेकर १९३
२२) थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन-सांगलीचे जन्मदाते २०३
२३) सांगलीचे भाग्यविधाते - वसंतदादा पाटील २०९
२४) भैरवी......., मंगेशकरी सुरांना अभिवादन २२२


## परिशिष्ट


आणखी काही सांगलीकर, सांगलीतील काही नामवंत संस्था, प्रेक्षणीय स्थळे, कालपट, सांगली भूषण इत्यादि माहिती. २२८ ते २७०

# महिमा सांगलीचा

वरदहस्त या नगरीवरती सदा गणेशाचा
शब्दामधुनी कसा वर्णु मी महिमा सांगलीचा ।। धृ ।।

अनेक शतकांपूर्वी वसली
कृष्णाकाठी रम्य सांगली
सहा गल्लीनी सुखात न्हाली
रंग सुखाला होता पण त्या शुभकर हळदीचा ।। १ ।।

हरभट कोणी पूर्वज पहिले
वंशज त्यांचे येथे वसले
वैभवात पटवर्धन झाले
चिंतामणि ना राजा येथील, पालक रयतेचा ।। २ ।।

सांगलीच्या या असंख्य लीला
जुन्या जाणणाऱ्यानी कथिल्या
इतिहासाच्या साक्षी झाल्या
अभिमानाने जपला ठेवा त्या गत काळाचा ।। ३ ।।

कलागुणांची नाट्यपंढरी
साधुदास ते काव्यविहारी
दिनानाथ, गंधर्व मंडळी
विष्णुदाससह देवल याना मुजरा मानाचा ।। ४ ।।


चिंतामणीने पाया रचला
'वसंत'हस्ते कळस चढविला
नव्या युगावर ठसा उमटला
महानगरीच्या भविष्यातल्या उज्वल कालाचा ।। ५ ।।

समाजसेवक राजकारणी
शिक्षण क्रीडा ज्ञानप्रसारणी
इथे चमकले अनेक अग्रणि
वैद्यक, शेती अनेक क्षेत्री ओघ निर्मिताचा ।। ६ ।।


अशी सांगली सदा चांगली
पुसत उणीवा सतत बहरली
पितृनगरी जी मनी कोरली
अविनाशी तो टिळक राहु दे मानस हा प्रभूचा ।। ७ ।।

- प्रभाकर द. खाडिलकर

## सांगलीचे आराध्य दैवत




वन्दे वन्दारुमन्दारमिन्दुभूषणनन्दनम् ।
अमन्दानन्दसन्दोहबन्धुरं सिन्दुराननम् ।।




सांगलीचे गणपती मंदिर




सांगलीचे एकेकाळचे वैभव, झुकझुकगाडी




सांगलीचा देखणा आयर्विन पूल



सांगलीचा सुंदर गजराज




पुलाच्या मच्छातून पुराचे पाणी पाहताना राजेसाहेब



गणेशदुर्ग (जुन्या काळातील)


# सांगली रम्य नगरी




दरबार हॉल – दर्शनी भाग




दरबार हॉल – आतील भाग (भोजनाची तयारी)



सांगली–मिरज एके काळचा शांत रस्ता



सांगलीनगरीचे जुन्या काळचे एक दृष्य – वाचनालय, शाळा नं. १



सांगलीनगरीचे जुन्या काळचे एक दृष्य – गवळी गल्ली, गणपतीचे देऊळ

# सांगली - एके काळची रम्य नगरी

"कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही" असं कविश्रेष्ठ गोविंदाग्रज तथा राम गणेश गडकरी म्हणून गेलेत. निसर्ग-नियमानुसार सृष्टीत परिवर्तनं ही होतच राहणार. लहानपणी गुटगुटीत, गुबुगुबीत गालाच्या गोंडस बाळाला, सदासर्वकाळ आपण त्या मनोहर रुपात पाहू शकत नाही. त्याला कोणाचाच इलाज नाही. तरीपण गोविंदाग्रजांसारखी " कृष्णाकाठी सांगली, नाही उरली चांगली " असं म्हणण्याची वेळ सांगलीकरांवर कधी न येवो !

सुदैवाने जुन्या-नव्या मंडळींबरोबर थोडी बातचीत केली तर सांगली पार बदलून गेली आहे असं वाटत नाही. आपला मूळचा सतेज चेहरा, या गावानं बराचसा शाबूत ठेवलाय! निदान महाराष्ट्रातील अनेक गावांची पडझड बघितल्यावर असं वाटतं खरं!

एखाद्या साठी-सत्तरीच्या सांगलीकराशी गप्पा मारल्या की जुन्या सांगलीच्या कौतुकात आपण हरवून जातो. कृष्णाकाठचा घोटीव घाट, बाजूची रम्य वनश्री, संथ वाहणारी कृष्णामाई. असंच काठाकाठानं गेलं की सांगली-हरीपूर रस्त्याच्या मध्यावर दिसणारा तो बागेतील गणपती, ती घनदाट चिंचेची बनं, पेरुच्या बागा, आणि थोडं चालल्यावर हरिपूरची वेस ओलांडल्यावर दिसणारा, कृष्णा वारणेचा सुरेख संगम. शेजारी पवित्र आणि गंभीर वातावरण निर्माण करणारं श्रीसंगमेश्वराचं ऐतिहासिक मंदिर. नुसतं त्या संगमाच्या काठावर उभं राहिलं, नदीकाठाला बिलगलेली हिरवीगार झाडं बघितली, उभ्या पिकांची वाऱ्यानं होणारी सळसळ ऐकली आणि नदीवरुन येणारा गार गार वारा नाकातोंडात भरुन घेतला की पैशा-अडक्याच्या व्यावहारिक जगात अडकलेलं आपलं मन नकळत काव्यमय होतं. मग मुळातच प्रतिभेचं लेणं घेऊन सांगली परिसरातच जन्मलेल्या गोविंद बल्लाळ देवलाना "जय कृष्णा तटवासाऽ" का म्हणावसं वाटणार नाही?

आज ती चिंचेची घनदाट बनं नाहीत, पेरुच्या बागा नाहीत, जागोजागी पाणी अडविल्यामुळे कृष्णेला येणारे महापूर नाहीत, संकष्टीला "धुडडुम" आवाज करुन सगळ्या गावाला चंद्रोदय झाल्याचं सांगणाऱ्या तोफा नाहीत, गणपतीच्या दिवसातले छबिने नाहीत की नगारखाने नाहीत. गतवैभव काळाच्या ओघात नष्ट होणारच. पण

आजहि सांगली, चांगली देखणी दिसते ती प्रसन्न गणपतीमंदिरामुळे; भक्कम बांधणीच्या आयर्विन ब्रिजमुळे, ' गणेशदुर्ग' सारख्या भुईकोट किल्ल्यामुळे, वैशिष्ट्यपूर्ण वस्तुसंग्रहालयामुळे, घनदाट आमराईमुळे. हे ठसठशीत ''अलंकार'' सांगली नगरीच्या अंगावर कुणी घातले? आधुनिक, वैभवशाली सांगलीचा पाया कुणी घातला?

त्यासाठी सांगलीच्या इतिहासाचा मागोवा घ्यायला हवा.

प्रत्येक गावाला स्वतःचा असा काही चेहरा-मोहरा असतो. स्वतःची अशी काही ओळख असते. खरं तर १८०१ सालापूर्वी 'सांगली' ला स्वतःचा असा काही चेहरा नव्हताच. मात्र गावच अस्तित्वात नव्हतं असं नाही. पूर्वीचे संदर्भ बघितले तर इ.स. १०२४ पासून अुल्लेख आहेत. 'गोंक' या शिलाहार राजाच्या ताब्यात 'मिरिंच' म्हणजे मिरज आणि 'करहाटक' म्हणजे कराड प्रांत होता. त्यात ही सांगली होती. या भागावर देवगिरीकर यादव, नंतर मुसलमानी राजे यांची सत्ता होती. सांगलीचा ठसठशीत अुल्लेख 'शिवभारत' या संस्कृत काव्यात आढळतो. इ.स. १६५९ मध्ये शिवछत्रपतींचा पराक्रमी सरनौबत नेताजी पालकर याने सांगली, मिरज, ब्रम्हनाळ ही गावे आदिलशहाकडून जिंकल्याचे अुल्लेख आहेत. पेशव्यांच्या काळात इंद्रोजी कदम आणि नंतर पटवर्धन सरदारांकडे या भागाची जहागीर होती. मिरज जहागिरीच्या २२ कर्यातीपैकी सांगली ही एक कर्यात होती. जवळजवळ असलेल्या तीन-चार गावांना मिळून 'कर्यात' म्हणत.

सांगली गावाच्या नावाविषयी अनेक समजुती आहेत. कृष्णा नदीच्या काठी एका अुंचवट्यावरील सहा गल्ली असलेलं गाव म्हणजे 'सांगली' ही त्यातल्या त्यात सर्वमान्य समजूत. काहींच्या मते या गावाचं मूळ नाव 'संगळकी' असं कर्नाटकी पध्दतीचं होतं, तर दुसरी समजूत अशी की कृष्णा आणि वारणा या नद्यांचा संगम गावाला जवळ असल्यानं, मूळ गाव 'संगमी' होतं. मग अपभ्रंश होऊन गावाचं नाव सांगली झालं.

सांगली गावाचा अितिहास म्हणजे तो एक प्रकारे पटवर्धनी पराक्रमाचाच अितिहास. मूळचा ओबडधोबड असलेला सांगली गावाचा चेहरा राजबिंडा आणि वैशिष्ट्यपूर्ण बनला तो या पटवर्धनांमुळेच. १८०१ साली मूळ मिरज जहागिरीतून फुटून पहिल्या चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यानी आपलं वेगळं राज्य बनविलं, त्याची राजधानी सांगली बनवली, तेव्हापासून या गावाचा, खऱ्या अर्थाने अितिहास सुरु झाला. आज कुणाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल, पण १७६८ च्या सुमारास हरिपूर सांगलीच्या दुप्पट मोठं गाव होतं. त्यावेळी सांगलीची वस्ती एक हजार तर हरिपूरची दोन हजार होती !

सांगली राजधानीचं ठिकाण बनवल्यावर चिंतामणरावानी १८०४-५ च्या सुमारास 'गणेशदुर्ग' या भुईकोट किल्लयाच्या बांधकामास सुरुवात केली. पटवर्धन घराणं गणपतीचे अुपासक. या घराण्याचे मूळ पुरुष, कोकणातल्या कोतवडे गावचे हरभट्ट पटवर्धन. त्यानी तर १२ वर्षे दुर्वांचा रस प्राशन करुन श्रीगणपतीपुळे या क्षेत्रस्थानी श्री गणेशाची निस्सीम अुपासना केली होती. तेव्हा राहायला राजवाडा झाला मग पूजेसाठी गणपतीमंदिर हवंच ना ? आज सांगलीचे भूषण समजल्या जाणाऱ्या या श्रीगणपतीमंदिराच्या बांधकामाला इ.स. १८११ साली सुरुवात झाली आणि तब्बल तीस वर्षे ते काम चालू होतं. श्रीगणपतीपंचायतन म्हणजे शिव, सूर्य, चिंतामणेश्वरी, लक्ष्मी-नारायण आणि गणपती. असं पाच मूर्ती असलेलं गणपतीमंदिर अभावानेच आढळते. पाचहि मूर्ती संगमरवराच्या आहेत. हा संगमरवर श्रीक्षेत्र महाबळेश्वराहून, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी आणलेल्या संगमरवरापैकी आहे.

अिकडं गणतीमंदिराचं काम चालू होतं तेव्हा राजकीय क्षितिजावर फार मोठ्या घडामोडी घडत होत्या. १८१८ मध्ये पेशवाईचा पाडाव झाला. तेव्हा ब्रिटीशानी, पेशव्यांच्या सर्व सरदारानी आपल्या चाकरीत यावं असं फर्मान काढलं. चिंतामणराव आप्पासाहेब मोठे मानी पुरुष होते. त्यांनी नोकरी करण्यास नकार दिला. इंग्रजांबरोबर सरळ सरळ भांडण काढले. झालं. इंग्रजांच्या फौजा जनरल प्रिट्झलरच्या नेतृत्वाखाली सांगलीवर चाल करुन आल्या! सांगलीच्या इतिहासात एकमेव असा लढाईचा प्रसंग अुभा ठाकला. अर्थात हा अगदीच असमान सामना होता. आप्तमंडळीनी आणि दरबारी लोकानी चिंतामणरावांची समजूत काढली, तेव्हा कुठं इंग्रजांबरोबरीतील तहास ते तयार झाले. मात्र चाकरी न करण्याचा त्यांचा हट्ट कायम होताच. तडजोड म्हणून त्याना सांगली संस्थानचा हुबळी,तडस, बरडोल (हा सर्व भाग कर्नाटकातील. संस्थानचा काही प्रदेश कर्नाटकात होता) असा एक लाख, अडतीस हजाराचा मुलुख, कायमचा ब्रिटीशांच्या घशात घालावा लागला! अत्यंत स्वाभिमानी असणारे चिंतामणराव नंतरच्या काळातहि या ना त्या कारणांवरुन नेहमी ब्रिटीशांशी संघर्षाच्या भूमिकेतच असत. एरवी मात्र ते कमालीचे प्रजाहितदक्ष होते. सांगलीच्या भरभराटीसाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. पध्दतशीर पेठा रचून सांगलीत व्यापारास त्यानी अुत्तेजन दिले. व्यापाऱ्यांना अनेक सवलती दिल्या. अनेक शास्त्री-पंडित, कलावंत सांगलीत बोलावून घेतले. परंपरेचे अभिमानी असले तरी इंग्रजांमुळे आलेल्या आधुनिकतेचेहि त्याना आकर्षण होते. त्यामुळेच १८२१ मध्ये त्यानी सांगलीत शिळा-प्रेस छापखान्याची स्थापना केली. टांकसाळ सुरु करुन नाणी पाडण्यास सुरुवात केली. त्यांच्यामुळेच मराठी रंगभूमीवर पहिले मराठी नाटक 'सीतास्वयंवर' अुभे राहिले. विष्णुदास भावे यांना, त्यानीच पाठीमागे लागून, हे नाटक लिहायला लावले. सुंदर सांगलीचे नारे

सगळेच लावतात. पण सुंदर सांगलीचा पहिला ध्यास त्यांनीच घेतला होता! त्यासाठी त्यांनी सांगलीत जागोजागी बागांची, आमरायांची रचना केली. त्यांच्यानंतर गादीवर आलेल्या तात्यासाहेबांच्या कारकीर्दीत, सांगली म्युनिसिपालिटीची १८७६ मध्ये स्थापना झाली. आधुनिक सांगलीचा खरा पाया घातला गेला, तो मात्र १९०३ साली गादीवर आलेल्या प्रागतिक आणि अुदारमतवादी दुसऱ्या चिंतामणराव आप्पासाहेब यांच्या कारकीर्दीत. सुरुवातीच्या काळात कॅप्टन बर्कसारखा कुशल ॲडमिनिस्ट्रेटर मिळाल्याने सांगली-मिरज रेल्वे १९०७ साली सुरु झाली. १९०८ साली वखारभागाची स्थापना झाली. या दोन्ही गोष्टींमुळे सांगलीतील व्यापाराची आणि अुद्योगधंद्याची वाढ झाली. दांडेकर,भिडे,वेलणकर,लड्डा वगैरे मंडळीमुळे आणि राजेसाहेबांच्या सक्रिय प्रोत्साहनामुळे सांगलीत प्रथमच यंत्रोद्योग-वस्त्रोद्योगाचा पाया घातला गेला. विठ्ठलदास शेडजी, नारायणदास शेडजी, अथणीकर, आरवाडे मंडळींमुळे तेल गाळण्याच्या, हळद पॉलिश करण्याच्या गिरण्या अुभ्या राहिल्या. १९१२ नंतर सांगलीत लोकांना पहिल्यांदा घरातल्या घरात बसून पिण्याचे पाणी मिळू लागले. पाण्यासाठी विहीर जवळ करायची हा शिरस्ता बदलला! १९१४ साली कृष्णा नदीला महापूर आला होता. गावात होड्या चालल्या. तेव्हा पुराच्या पाण्यापासून सुरक्षित अंतरावर वस्ती न्यायचे प्रयत्न सुरु झाले. त्यातूनच शिवाजीनगर (एक्स्टेंशन) भागाकडे वस्ती वाढू लागली. राजेसाहेबांनी स्वस्त किमतीत प्लॉटस् पाडून लोकांना त्या बाजूला घरं बांधण्यास मदत केली. सांगलीची वस्ती वाढू लागली. महाविद्यालयीन शिक्षणासाठी सांगलीच्या विद्यार्थ्याला पुण्या-मुंबईकडे धाव घ्यावी लागायची. १९१९ मध्ये राजेसाहेबानी स्वतः पुढाकार घेऊन विलिंग्डन कॉलेजच्या स्थापनेस हातभार लावला. १९२० साल हे वर्ष सांगलीच्या इतिहासात, अशा अर्थानं भाग्याचं की लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी अशा दोन्ही महापुरुषांचे पाय त्या वर्षी सांगलीला लागले. त्या दोघांच्या स्वातंत्र्य चळवळीचे पडसाद सांगलीत अुमटू लागले. कॉलेज शिक्षणामुळे सुशिक्षितांमध्ये स्वातंत्र्याचं वारं खेळू लागलं. परिणामी, दक्षिणी संस्थान प्रजा परिषदेची चळवळ १९२२ पासून सांगलीत जोमाने सुरु झाली. मुळात बर्कसाहेबानी सुरु केलेल्या, रयतसभेला १९३० मध्ये राजेसाहेबानी नियमबध्द स्वरुप दिलं. राजा विरुध्द प्रजा असा संघर्ष सुरु झाला. ब्रिटीश राजवटीमुळे, आणि त्यांच्या दडपणामुळं, वरकरणी विरोध दिसला, तरी आतून प्रजेच्या चळवळीला राजेसाहेबांची सहानुभूतीच होती. त्यामुळेच सांगलीत गुप्तपणे राहून वसंतदादा पाटील यांची स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भूमिगत चळवळ जोमाने सुरु होती. अनेक अखिल भारतीय कीर्तीचे पुढारी, आश्रयासाठी ब्रिटीश सरकारची नजर चुकवून सांगलीत आश्रय घेत असत. अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली अशा १९४२ च्या विख्यात क्रांतिवीरांचे पाय त्यामुळे सांगलीला लागले.

१९२९ साली कृष्णा नदीवर आयर्विन ब्रिज बांधला गेला. त्यामुळे पुण्या-मुंबईच्या बाजूला थेट दळणवळण (मोटाररस्त्याने) चालू झाले. वारंवार येणाऱ्या कृष्णेच्या पुराने होणारे हाल, या पुलामुळे तर वाचलेच; खेरीज व्यापार-अुद्योगाच्या वाढीसही ह्या पुलाची रचना अुपकारक झाली. १९३७ साली ज्युबिली इलेक्ट्रिक वर्क्सची स्थापना होऊन सांगलीत प्रथमच वीज खेळू लागली; पहिले वीज कनेक्शन अर्थातच श्रीगणपतीमंदिरास देण्यात आले.

२४ जुलै १९४३ चा दिवस सांगलीच्या इतिहासातील एक गौरवास्पद दिवस. भूमिगत राहून ब्रिटीश सरकारविरुध्द सशस्त्र लढा देणारे वसंतदादा, सांगलीच्या गणेशदुर्ग येथे असणाऱ्या तुरुगांत कैदी होते. त्याच दिवशी त्यानी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तुरुंगाभोवतीच्या तटावरुन अुड्या मारुन पलायन केले होते. राजकीय संघर्ष तीव्र होत होता. राजेसाहेबानी प्रजेला हळूहळू अधिकार देत देत १९४६ मध्ये राज्यसभेस पूर्ण जबाबदार राज्यपध्दतीचे अधिकार दिले. संपूर्ण देशात चालू असलेल्या संघर्षाला यश येऊन अखेरीस १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. बदलत्या काळाची पावले ओळखून सांगलीच्या राजेसाहेबानी आपणहून विलिनीकरणास मान्यता दिली. ८ मार्च १९४८ रोजी सांगली संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले. पटवर्धन राजघराण्याची जवळजवळ १५० वर्षांची सत्ता संपुष्टात आली.

तत्कालीन मुंबई राज्यात जे अनेक जिल्हे अस्तित्वात आले, त्यातील दक्षिण सातारा जिल्ह्याची सांगली राजधानी झाली. सांगली जिल्हा नंतर अस्तित्वात आला. हातात बंदूक घेऊन ब्रिटीश सत्तेबरोबर लढणारे वसंतदादा आता नवराष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत गुंग झाले. त्यांच्या नेतृत्वाने राजकीय क्षितिजावर सांगलीचे नाव सर्वत्र दुमदुमू लागलं. व्यापारास प्रोत्साहन मिळून नवीन मार्केट यार्ड निर्माण झाले. शेतकरी सहकारी साखर कारखाना अुभा राहिला. १९६३ मध्ये सांगलीला आकाशवाणी केंद्र सुरु झालं. सांगलीचे वसंतदादा नव्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले; एकदा नव्हे तर चारदा! सांगलीचा सर्वांगीण विकास सुरु झाला. वसंतदादाच्या नेतृत्वामुळे सांगलीच्या पूर्वीच्या पटवर्धन घराण्यातील तीन अधिपतींनंतर, ते सांगलीचे चौथे अनभिषिक्त राजेच गणले जाऊ लागले!

म्हणून तर सांगलीसंबंधात बोलताना सर्वजण कौतुकाने म्हणत,

**'' चिंतामणराये वसविली**
**वसंतराये विकसविली ।''**

सहा गल्लयांच्या छोट्या झऱ्यानं सुरु झालेला सांगलीचा अितिहास आता महापालिकेच्या महासागरात प्रवेश करता झाला आहे!

x-x-x

आज जे सांगलीचं आधुनिक आणि प्रगत असं स्वरुप दिसत आहे त्याची अुभारणी निःसंशय स्वातंत्र्योत्तर काळात झाली. हे जितकं खरं, तितकंच, त्याची मुहूर्तमेढ संस्थानी काळात पटवर्धन राजकुटुंबाच्या दूरदृष्टीने झाली हेहि खरं. १९०८ च्या सुमारास धनी वेलणकरांची 'श्री गजानन वीव्हिंग मिल' सुरु झाली. पाठोपाठ लड्डांची बालाजी मिल सुरु झाली. दांडेकर-भिडे मंडळींनी लोखंडी सामानाचे कारखाने सुरु केले. आरवाडे, अथणीकर मंडळीमुळे तेल गिरण्या अुभ्या राहिल्या. सांगलीचे खऱ्या अर्थाने औद्योगीकरण सुरु करण्यात या मंडळींचा सिंहाचा वाटा होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विधायक कार्यात स्वतःला झोकून दिलेल्या वसंतदादानी, औद्योगिक विकासाला जोराची चालना दिली. त्यानी पुढाकार घेऊन सांगली-माधवनगर रस्त्यावर औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. त्यात २५० च्यावर विविध अुद्योगधंदे अुभे आहेत. पुढे शासनाने एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून निव्वळ अुद्योगधंद्यासाठी ५०० प्लॉटस् राखून ठेवले. त्यापैकी दोनेकशे प्लॉटस्वर कारखाने कार्यरत झाले आहेत. फूड प्रॉडक्टस्, कन्फेवशनरी, औषधे, टेक्स्टाईल्स्, स्टील कंटेनर्स, साबण, बॅटरी सेल्स, सर्जिकल बँडेज असे विविध प्रकारचे अुत्पादन तेथे सुरु आहे. या छोट्या अुद्योगांशिवाय टाटा मेटल इंडस्ट्रीज, स्वीट कन्फेक्शनरी, अजय केमिकल्स, दारम फॉर्मास्युटिकल्स, तुंगा आर्मडाईज, नव महाराष्ट्र चाकण ऑईल मिल्स, जयराज टेक्स्टाईल अशा मोठ्या स्वरुपाचे अुद्योगधंदेहि आहेत. वसंतदादांसारख्या सहकार-महर्षीमुळे सांगली गाव आणि प्रामुख्याने सांगली जिल्ह्यात सहकारी संस्थांचे जाळेच तयार झाले. त्यामुळे साखर कारखाने, सूतगिरण्या, तेलबिया गाळणाऱ्या गिरण्यांची रेलचेल झाली.

पण सांगलीच्या अुद्योगांविषयी एकच एक वैशिष्ट्य सांगायची वेळ आली तर फक्त हळद-अुद्योगाविषयीच सांगायला लागेल. सांगलीचा हळद वायदे बाजार हा संपूर्ण देशात एकमेव आहे. या वायदेबाजारामुळे भारताच्या औद्योगिक नकाशावर सांगलीला एक अढळ स्थान प्राप्त झाले आहे. सांगलीच्या परिसरात पिकविली जाणारी 'राजापुरी' हळद ही एक अुत्तम प्रकारची हळद आहे. हळदीची साठवण करण्याची अुत्तम सोय सांगली परिसरात असणे ही या वायदे बाजारामागची मुख्य जमेची बाब आहे. हळद पावसाच्या पूर्वी साठवावी लागते आणि कीड लागू नये म्हणून जमिनीखालीच ठेवावी लागते. सुदैवाने अशी अनुकूलता सांगली परिसरातील सांगलीवाडी व हरिपूर येथील नदीकाठच्या जमिनींमध्ये आहे. जमिनीखाली करण्यात आलेल्या साठ्याला 'पेव' म्हणतात. अशी नैसर्गिक पेवे हरिपूर व सांगलीवाडीच्या कृष्णाकाठांवर, दोन हजाराचे वर आहेत. एका पेवात अदमासे २०० पोती हळद साठवता येते. आंध्र प्रदेश, कर्नाटक,

तामीळनाडू भागातूनसुद्धा सांगलीत हळदीची आवक होते.

सांगलीच्या या हळद वायदे बाजाराला १९०५ पासूनचा दीर्घ इतिहास आहे. १९४० पर्यंत हा वायदेबाजार, चेंबर ऑफ कॉमर्स, सांगलीतर्फे चालवला जात असे. त्यानंतर तो दि स्पायसेस ॲण्ड ऑईलसीडस् एक्श्चेंज लि. सांगली या वायदे व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या संस्थेमार्फत चालवला जातो. रोज लाखो रुपयांचा व्यवहार करणारा हा वायदेबाजार शेअर बाजाराच्या धर्तीवर चालतो. सामान्य लोकाना तो एक प्रकारचा सट्टा वाटला तरी सरकारची मान्यता असलेला तो देशातील एकमेव मान्यताप्राप्त आणि प्रतिष्ठित वायदेबाजार आहे.

या हळदीनं, सांगलीचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेलंय.

x-x-x

व्यावहारिक जगतात सांगलीचं नाव अनेकविध अुद्योगांनी मोठं केलं असलं, तरी 'सांस्कृतिक सांगली' हा खरा सांगलीचा आत्मा आहे. महाराष्ट्राच्या एकूण सांस्कृतिक जगतात सांगलीच्या नावाला जी प्रतिष्ठा आहे, आदर आहे तो सांगलीच्या सांस्कृतिक समृध्दीमुळेच, हे निर्विवाद सत्य आहे.

सांस्कृतिक दालनांपैकी सर्वप्रथम मनःपटलावर अुमटते ती सांगलीची नाट्यपरंपरा. सांगलीचे विष्णुदास भावे हे मराठी नाटकांचे आद्य जनक. १८४३ साली त्यानी 'सीतास्वयंवर' हे नाटक रंगभूमीवर आणलं. पुढील दीडशे वर्षात मराठी नाट्यसृष्टी चांगली फोफावली. म्हणून मराठी नाटकांची गंगोत्री असलेल्या सांगलीचं माहात्म्य आगळंच. या विष्णुदास भावे यानी ५२ नाटके मराठी रंगभूमीवर आणण्याचा पराक्रम केला. यापेक्षाहि मौजेची गोष्ट म्हणजे त्यानी १८५४ च्या सुमारास 'राजा गोपीचंद' या हिंदी नाटकाचा प्रथम प्रयोग रंगभूमीवर केला. त्यामुळे हिंदी रंगभूमीचे जनक म्हणूनहि त्यानी सांगलीचे नाव अखिल हिंदुस्थानात गाजवलं. त्यानंतर गोविंद बल्लाळ देवल या दुसऱ्या सांगलीपुत्राने 'शारदा', 'संशयकल्लोळ' सारख्या नाटकांनी मराठी रंगभूमी गाजवली. त्यावर कळस चढवला तो सांगलीच्याच आणखी एका सुपुत्राने. त्याचं नाव नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर. प्रखर देशाभिमानी, ज्वलंत पत्रकार असलेल्या या लोकमान्य टिळकांच्या पट्टशिष्याने आपल्या संगीत आणि गद्य नाटकांनी मराठी नाट्यरसिकांना मंत्रमुग्ध करुन टाकले. म्हणून तर खाडिलकरांच्या कालखंडास मराठी रंगभूमीचे 'सुवर्णयुग' म्हणतात. यापाठोपाठ राम गणेश गडकरी यांचे शिष्य म्हणून गाजलेले न.ग. कमतनूकर हे पण सांगलीचेच नाटककार. केशवराव दाते यांच्या प्रेरणेने प्रतिवर्षी ५ नोव्हेंबर हा 'रंगभूमी दिन' सांगलीला थाटामाटात साजरा केला जातो. गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर,

चित्तरंजन कोल्हटकर, मामा भट, मामा पेंडसे, गणपतराव मोहिते (अविनाश) याजपासून तो अलीकडच्या यशवंत केळकर, गिरीश ओक यांजपर्यंत अनेक नाट्यकलाकारांचा सांगलीशी घनिष्ट संबंध आला. दीनानाथ मंगेशकर, विश्राम बेडेकर यासारख्या दिग्गजांचे सांगलीत वास्तव्य होते. लता, आशा, हृदयनाथ या मंगेशकर भावंडाचं बालपण सांगलीतच गेलं. या सर्व बाबींमुळे सांगलीला ''नाट्यपंढरी'' म्हणून कौतुकाने गौरवले जाते. अनेक नाट्यव्यवसायी, वारकऱ्याच्या श्रद्धेने सांगलीत येऊन आपली नाट्यसेवा या 'पंढरी'त सादर करतात.

सांगलीला 'नाट्यपंढरी' म्हणून गौरवले जाते तसेच अनेक भाविक भक्तांना सांगली ही ''कीर्तनपंढरी'' वाटते. खुद्द सांगलीकर पटवर्धन मंडळी गजानन भक्त, कीर्तन-प्रवचनाला मुक्तपणे प्रोत्साहन देणारी. आजुबाजूच्या परिसरात नरसोबावाडी, औदुंबर, ब्रम्हनाळ यासारखी तीर्थक्षेत्रे. ह्या साऱ्या अनुकूल गोष्टी असल्या तरी सांगली आणि कीर्तन हा 'द्वंद्वसमास' रुढ झाला तो संतश्रेष्ठ तात्यासाहेब कोटणीस महाराजांच्या ३८ वर्षांच्या अखंड कीर्तनाने. कोणतीही बिदागी न घेता कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम त्यानी केले. मामामहाराज केळकर आणि दासराममहाराज केळकर यानी हा वारसा अखंडपणे जपला. रामानंदमहाराज खटावकर, त्यांचे परात्पर गुरु श्री सदाशिवमहाराज, बाबासाहेब मुजुमदार, सत्यव्रततीर्थ, मौनीबाबा, श्रीआनंदमूर्ती, कृष्णा परीट, अप्पाराव पोवार, अण्णाबुवा, धोडींराममहाराज, श्रीनारायणमहाराज मळणगावकर, बुधगांवचे गुंडुबुवा, म्हादबा महाराज पाटील अशा अनेक थोर मंडळींनी सांगलीत कीर्तन जागवले. त्यामुळे भाविक मंडळी ''सांगली भूमी कीर्तनाची । मस्तके लवती साऱ्यांची'' असे श्रद्धेने म्हणतात.

कोल्हापूरअितकी नसली तरी सांगलीचीसुद्धा खास अशी कुस्तीपरंपरा आहे. व्यंकप्पा बुरुड आणि हरीनाना पवार यानी या कुस्ती क्षेत्रात सांगलीला नाव मिळवून दिले. हरीनानांनी तर मल्लोपासनेचे विद्यापीठच अुघडले. बलोपासनेइतकेच सद्वर्तणुक आणि सच्चारित्र्य याना ते महत्त्व देत; आणि त्यादृष्टीने कुस्तीगीर तयार करीत. हिंदकेसरी मारुती माने, ज्योतिराम दादा सावर्डे, विष्णु सावर्डे यांनी कुस्तीपरंपरेचे जतन केले. आजहि सांगलीत कुस्त्यांचा फड अुभा राहिला की एकेक लाख लोक गर्दी करतात. बदलत्या काळानुसार मॅटवरच्या कुस्तीला महत्त्व आले असले तरी !

खेळांच्या परंपरांचा विषय निघाला की आजच्या क्रिकेट या जबरदस्त लोकप्रिय खेळाची आठवण होते. सांगलीने या खेळाला एक विश्वमान्य असा खेळाडू दिला. त्याचे नाव विजय हजारे. नामांकित बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर आणि विजय हजारे या दोघांच्याहि खेळाची जडणघडण सांगलीतच झाली. या मैदानी खेळांबरोबरच बुद्धीबळासारख्या बैठ्या पण विलक्षण कौशल्याच्या खेळामध्येसुद्धा सांगलीचे नाव

भालचंद्र म्हैसकरांसारख्या सांगलीकराने विश्वपटलावर नेऊन ठेवले आहे. बाबासाहेब बोडस, मोरभट मेहेंदळे, विनायकराव खाडिलकर, गोपाळराव मुजुमदार, तमण्णा पडसलगीकर या 'कालच्या' बुद्धीबळपटूंपासून तो आजच्या भाऊराव पडसलगीकर, भाग्यश्री साठे (ठिपसे), स्वाती घाटे, या सर्वांनी बुद्धीबळाच्या खेळात सांगलीचे नाव दुमदुमत ठेवलं आहे.

शैक्षणिक क्षेत्रात सांगलीचा दबदबा तर पहिल्यापासूनच होता. याचं बरंचसं श्रेय पटवर्धन संस्थानिकांकडे जाते. १८६१ मध्ये सांगलीत सार्वजनिक शिक्षणाला सुरुवात झाली. लागलीच दोन वर्षांनी मराठी शाळा निघाली. १८६५ मध्ये शास्त्रशुद्ध वेदशास्त्र शिकवले जावे म्हणून वेदशास्त्र शाळेची स्थापना झाली. त्यामध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, न्याय, व्याकरण, ज्योतिष अशी शास्त्रे शिकवणाऱ्या पाच वेदशाळा काढण्यात आल्या. १९१० मध्ये प्राथमिक शिक्षण सांगलीत आणि संपूर्ण सांगली संस्थानात मोफत तर झालेच पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे ते सक्तीचे करण्यात आले. त्यामुळे सांगली हे सुशिक्षिताचं गांव म्हणून पुण्याखालोखाल ओळखले जाऊ लागले. या वेदशास्त्राच्या प्रभावामुळे संस्कृत विद्येचा प्रसार सांगलीत मोठ्या प्रमाणावर झाला. देवधरशास्त्री, पाटीलशास्त्री, के. जि. दीक्षित अशा नामवंत संस्कृत-तज्ज्ञांनी तत्कालीन मुंबई विश्वविद्यालयाच्या परीक्षांमध्ये, जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती विजेत्यांची गौरवशाली परंपराच सांगलीत निर्माण केली. धारवाड ते पुणे अशा विस्तृत पट्टयात कॉलेज शिक्षणाची सोय नव्हती, तेव्हा स्वतः पुढाकार घेऊन श्रीमंत राजेसाहेबानी सांगलीत १९१९ मध्ये विलिंग्डन कॉलेजची स्थापना करवली. १९३३ मध्ये निव्वळ मुलींच्या शिक्षणासाठी म्हणून राणी सरस्वतीदेवी कन्याशाळा या हायस्कूलची स्थापना झाली. १९४७ मध्ये वालचंद इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना झाली. १९६१ साली या भागातील (कोल्हापूर, बेळगांव वगळता) पहिले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगली शिक्षण संस्थेने सुरु केले. तसेच १९९८ मध्ये याच संस्थेने सांगली व सोलापूर जिल्ह्यासाठी पहिलीच ''सैनिक शाळा'' सुरु केली. आज तासगांव या पहिले परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या ऐतिहासिक नगरीत दत्तमाळावर सर्वसोयीनी सुसज्ज अशी ही सैनिकशाळा पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात अशा शैक्षणिक घडामोडींचे अप्रूप होतं. स्वातंत्र्योत्तर काळात तर शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र प्रगती झाली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी संपूर्ण जिल्ह्यात फक्त ३ महाविद्यालये होती, ती आता पन्नासच्या वर गेली आहेत. ''अुदंड झाले शिक्षण'' अशी सध्याची अवस्था आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्व क्षेत्रात, विशेषतः शेती, अुद्योग, व्यापार आदी

क्षेत्रात भरघोस प्रगती झाली ही अत्यंत अभिमानास्पद बाब खरीच पण सांस्कृतिक मूल्यांचा ऱ्हास झपाट्याने होऊ लागला ही मोठी चिंतादायक गोष्ट आहे. जुन्या काळात, सांगलीची हवा आणि सांगलीचं पाणी यांची कीर्ती अितकी होती, की बाहेरगांवचे अनेक लोक या शांत आणि रम्य नगरीत मुद्दाम घरे बांधून रहायला येत. आता शहराची झालेली बेसुमार वाढ, नियम धाब्यावर बसवून झालेली अनधिकृत बांधकामे, खाचखळग्यांचे रस्ते, सांडपाण्याची दुरवस्था यामुळे हवा प्रदूषित झाली; शेरीनाल्यामुळे पाणी खराब झालं आणि औद्योगिक अशांतता, बेकारी, काळाबाजारवाले, मटका, दारु, एकतर्फी प्रेमापोटी झालेल्या निर्घृण हत्या, अशा अनेक कारणांनी, सरोवरासारख्या शांत असलेल्या सांगलीची विलोभनीय शांतता धोक्यात आली! दिवसाढवळ्या झालेले खून, दरवडे, बलात्कार, मारामाऱ्या, यांमुळे "मुंबई आऽलीऽरे अंगणी" अशी सांगलीची अवस्था झाली आहे. " स्वच्छ सांगली, सुंदर सांगली" असे घोषणांचे कितीहि ढोल वाजवले गेले तरी प्रत्येकाच्या 'मनात' आधी 'सुंदर सांगली' अवतरली पाहिजे. तर प्रत्यक्षात अवतरणार!

" कृष्णाकाठी सांगली, नाही अुरली चांगली" असं म्हणायची दुर्दैवी वेळ यायला नको असेल, तर प्रत्येक अभिमानी सांगलीकरानेच कंबर कसायला हवी.

सांगलीचं नाव अुज्ज्वल करणाऱ्या भूतकाळातील थोर सांगलीकरांना तीच खरी आदरांजली ठरेल!

(शेवटी एक परिशिष्ट जोडून त्यामध्ये सांगलीतील काही अग्रगण्य संस्था आणि नामवंत सांगलीकर यांचेविषयीची माहिती देण्यात आली आहे.)

●●●

## सांगलीचे लोकोत्तर राजेसाहेब

# कै. चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन

७ मार्च १९४८ चा दिवस.

दुसऱ्या दिवशी सांगली संस्थान भारतीय संघराज्यात विलीन व्हायचे होते. १८०१पासून जवळजवळ दीडशे वर्षे पटवर्धन राजघराण्याची सांगली संस्थानावर सत्ता चालू होती. सांगली संस्थानचा शेवटचा राजा राजवैभवाचा त्याग करून चारचौघांसारखा सामान्य नागरिक होणार होता. राजेसाहेबांच्या, सांगली -माधवनगर रस्त्यावरील, माळबंगल्यावरच्या निवासस्थानी अनेक प्रजाजन जमले होते. श्रीमंत राजेसाहेबांचे आगमन होताच त्यांना पाहून अनेक उपस्थितांच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. ते अश्रू कृतज्ञतेचे होते. पित्याच्या वत्सलतेने पालनपोषण करणाऱ्या राजाला निरोप देताना उत्स्फूर्तपणे आलेले मायेचे ते कढ होते. त्यांचे डोळ्यातील न खळणारे ते पाणी पाहून राजेसाहेब मनोमन गहिवरले. पण क्षणात स्वत:ला सावरून म्हणाले, "अशा मंगल प्रसंगी अश्रू काय म्हणून? अद्यापासून स्वतंत्र भारताचा नागरिक होण्याचे भाग्य मला मिळत आहे. याबद्दल आपणा सर्वांना आनंदच वाटला पाहिजे" त्यांचे हे सहजोद्गार ऐकताच सर्वांची मने हेलावली. एक अस्फुट हुंदका बाहेर आला.

हा थोर मनाचा राजा म्हणजे सांगली संस्थानचे भूतपूर्व अधिपती कै. चिंतामणराव अुर्फ आप्पासाहेब पटवर्धन. जिथं अमर्याद सत्ता होती तिथंच सामान्य नागरिक म्हणून राहायचं, ही पचनी पडायला अवघड अशी वस्तुस्थिती होती. पण सांगलीच्या राजेसाहेबानी "इदम् न मम" म्हणत, अंगावरचे वस्त्र बदलावे इतक्या सहजतेने आपले राज्य प्रजाजनांच्या झोळीत टाकले. हे त्याना जमले याचे एक कारण म्हणजे त्यांची पराकोटीची पारमार्थिक वृत्ती. आयुष्यभर ते अध्यात्मच जगले.

श्रीमंत राजेसाहेबांचा जन्म १४ फेब्रुवारी १८९० सालचा. त्यांचे मूळ नाव विनायकराव चिंतामणराव अुर्फ भाऊसाहेब पटवर्धन. पटवर्धन घराण्याचे मूळ पुरूष हरभट पटवर्धनानी दहा वर्षे दुर्वांचा रस प्राशन करून श्रीगजाननाची अखंड सेवा केली होती. या भक्तीचा वारसा समस्त पटवर्धनांत झिरपत आला होताच. त्यात राजेसाहेबांच्या मातोश्री माईसाहेब यानी आळंदीच्या श्रीनृसिंहसरस्वती यांचा अनुग्रह घेतला होता. त्यामुळे धार्मिक वातावरणाचा ठसा, बालवयातच राजेसाहेबांच्या मनावर

उमटला. पुढे १९३२ मध्ये त्यानी श्रीनारायणराव केडगावकर याजकडून नाममंत्र घेतला. १९३३ साली परमसंत श्रीसद्गुरू बाबा सावनसिंगजी महाराज, बियास यांचा गुरूपदेश त्याना मिळाला. पुढे गुरूदेव रानडे यांचा अनेक वर्षे सहवास त्याना मिळाला. त्यामुळे "सुखदु:खे समेकृत्वा, लाभालाभौ जयाजयौ "अशाप्रकारची स्थितप्रज्ञ वृत्ती त्यांच्या अंगी स्वाभाविकपणे बाणली होती. ३६ वर्षे सांगली संस्थानचे राजपद भोगूनहि त्यांची वृत्ती विश्वस्ताची होती, म्हणूनच राजसंन्यास घेताना त्यांच्या मनाला कणभराचेही क्लेश झाले नाहीत.

त्याना राजपद मिळणे हा एक योगायोगाचा आणि पूर्वजांच्या पुण्याईचा भाग होता. त्यांचे आजोबा सांगली संस्थानच्या पहिल्या अधिपतीना, श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब याना दत्तक गेले होते, पण दत्तक घेतल्या घेतल्या राजेसाहेबाना औरस संततीचा लाभ झाला! मग रद्दबातल झालेल्या दत्तकपुत्राला एकप्रकारची भरपायी म्हणून रु.२५०००।- ची जहागीर देण्यात आली आणि अशी नोंद करण्यात आली की भविष्यकाळात कधी 'गरज' पडली तर या रद्दबातल झालेल्या पटवर्धन घरातील सर्वात मोठ्या मुलाला दत्तक घ्यायचे. गमतीची गोष्ट म्हणजे पुढे खरोखरच अशी वेळ आली! सांगलीचे नंतरचे अधिपती श्रीमंत धुंडीराजसाहेब ऊर्फ तात्यासाहेब निपुत्रिक म्हणून १९०१ मध्ये निधन पावले. तेव्हा वर उल्लेखलेले विनायकराव म्हणजेच प्रस्तुत लेखविषय असलेले चिंतामणराव पटवर्धन दत्तक घेतले गेले. पूर्वीच्या करारानुसार. एकूण काय, तर आजोबांचा हुकलेला राजयोग नातवाच्या नशीबी होता! १५ जून १९०३ रोजी ब्रिटीश राज्यकर्त्यांकडून सांगलीचे तृतीय अधिपती म्हणून या श्रीमंत राजेसाहेबांची अधिकृत नियुक्ती झाली, अर्थात ब्रिटीशांच्या शिरस्त्याप्रमाणे, कॅ. बर्क या सांगली संस्थानात असलेल्या अॅडमिनिस्ट्रेटरकडून प्रश्नोत्तररूपी कठोर चाचपणी झाल्यानंतरच! दिवंगत राजेसाहेब कै. तात्यासाहेब पटवर्धन यांच्या पत्नीच्या, श्रीमंत बुध्दीमतीबाईसाहेब पटवर्धन यांच्या मांडीवर, राजेसाहेबाना समारंभपूर्वक दत्तक देण्यात आले. त्यावेळी चिंतामणराव पटवर्धन तथा आप्पासाहेबांचे वय अवघे तेरा वर्षाचे होते.

तत्कालीन पध्दतीप्रमाणे राजेसाहेबाना राज्यकारभाराच्या दृष्टीने सुयोग्य शिक्षण मिळावे म्हणून जून १९०३ पासून ते एप्रिल १९०९ पर्यंत राजकुमार कॉलेज, राजकोट येथे ठेवण्यात आले. राजेसाहेबांच्या सुदैवाने तेथे त्याना नानासाहेब परांजपे हे ट्यूटर म्हणून लाभले. तरूण राजपुत्रांना त्यांच्या कलाने घेऊन चांगल्या सवयी कशा लावाव्यात याची त्याना चांगली जाण होती. नेमलेला अभ्यासक्रम पूर्ण करतानाच त्यानी राजेसाहेबांकडून जेम्स अॅलन या इंग्रज ग्रंथकाराची काही चांगली पुस्तके

वाचून घेतली. त्या गोष्टीचा राजेसाहेबांच्या त्या वयातील संस्कारक्षम मनावर एवढा परिणाम झाला की त्यानी त्या पुस्तकाची पारायणे केली. त्यातील उतारेच्या उतारे ते पाठ म्हणून दाखवत. भावी जीवनात त्याना त्याचा अुपयोग झालाच, पण नकळत इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवायला ते पाठांतर कारणीभूत झाले. इंग्रजी विषयात प्रथम क्रमांक मिळून त्याना राजकुमार कॉलेजात सुवर्णपदकहि मिळाले. शिक्षण पूर्ण करुन संस्थानात आल्यावर त्याना कॅप्टन बर्कसारख्या अत्यंत कर्तबगार अशा प्रशासकाचा सहवास आणि मार्गदर्शन लाभले. त्यानीच राजेसाहेबांना राज्यकारभाराचे प्राथमिक धडे दिले. संस्थानच्या सर्व तालुक्यातून हिंडवून त्यांच्या प्रजाजनांबरोबर भेटी घडवून कितपत बोलावे, स्वत:चे टपाल स्वत:च फोडून कसे वाचावे, मग त्याविषयींचा प्राथमिक निर्णय कसा घ्यावा याचे अनेक धडे दिले. राजेसाहेबांच्या आज्ञाधारक वृत्तीमुळे कॅप्टनसाहेबांचे राजेसाहेबांवर पुत्रवत् प्रेम होते. सज्ञान झाल्यावर राजेसाहेबांच्या हाती कारभार सोपवून ते निघाले तेव्हा श्रीमंतानी, बर्कसाहेबाना आणखी काही काळ रहावे अशी विनंती केली. पण राजेसाहेबांचा हा आग्रह त्यानी थोड्याशा कठोरपणानेच मोडून काढला. मुलाचा पांगुळगाडा वेळीच सोडवावा असाच बर्कसाहेबांच्या त्या कृतीचा अर्थ होता. पण त्यामुळेच राजेसाहेबांचे कर्तृत्व भविष्यकाळात स्वतंत्रपणे फुलून आले! या बर्कसाहेबांबद्दल राजेसाहेब नेहमी कृतज्ञतापूर्वक बोलत.

अितकी तयारी झाली खरी, तरीपण २०-२१व्या वर्षी एकदम संस्थानचा राज्यकारभार चालवायचा म्हणजे थोडे भांबावल्यासारखे होणे स्वाभाविकच. या भावनेतूनच राजेसाहेबानी राज्यसूत्रे हाती घेतल्यावर सुप्रसिध्द थिऑसॉफिस्ट डॉ. ॲनी बेझेंट याना मार्गदर्शन करा म्हणून पत्र लिहिले होते. त्यात ते लिहतात,"मुंबईत एखादा नवखा खेडवळ इसम पहिल्या प्रथम गेला म्हणजे जसा भांबावून जातो तशी माझी अवस्था झाली आहे. माझे शिक्षण बेताचेच व अनुभव तर मुळीच नाही, तेव्हा आपण मार्गदर्शन करून स्फूर्ती द्यावी."

डॉ. ॲनी बेझेंट राजकीय पुढारी असल्याने, त्यांच्या हालचालीवर ब्रिटीश सरकारची करडी नजर असे, म्हणून त्यानी राजेसाहेबाना पत्राचे अुत्तर पाठविले नाही. तथापि त्यांच्या सर्व शंकांचे समाधान होईल व कर्तव्याचा मार्ग सापडेल असे पुस्तकच त्यानी लिहून प्रसिध्द केले. त्यांच्या Letters to a young Indian Prince या पुस्तकाची जन्मकथा अशी आहे. आणि हा तरूण संस्थानिक म्हणजे सांगलीचे राजेसाहेब हे फारच थोड्या लोकाना माहीत असेल.

राजेसाहेबानी राज्यसूत्रे हातात घेतली तेव्हा ब्रिटीश मुलुखात स्वातंत्र्याची चळवळ जोरात चालू होती. त्या चळवळीचे लोण संस्थानांत येऊ देऊ नये, ब्रिटीश

मुलुखातील पुढाऱ्यांचे संस्थानातील लोकांशी संबंध येऊ नयेत म्हणून राजेसाहेबांवर ब्रिटीश सरकारचे राजकीय दडपण असे. अितकेच काय पण त्याना एका स्वदेशी कंपनीच्या शेअर्समध्ये पैसे न गुंतवण्याबद्दल पण सांगण्यात आले होते. त्यामुळे एका बाजूला ब्रिटीश सरकार व दुसऱ्या बाजूला आपल्याच संस्थानची प्रजा, यामधील समतोल सांभाळताना राजेसाहेबाना अखेरपर्यंत तारेवरची कसरत करावी लागली. आणि अशी कसरत त्यानी यशस्वीपणे केली हे विशेष. तरीपण एका वैयक्तिक प्रसंगात अतिरेक झाला तेव्हा त्याना आपली नैसर्गिक स्वाभिमानी वृत्ती प्रकट करावी लागली. तो प्रसंग असा:

श्रीमंत राजेसाहेबाना पूर्ण अधिकार १९१० मध्ये मिळाल्यानंतर त्यांच्या विवाहाचा प्रस्ताव आला. राजेसाहेबानी वऱ्हाडातील वजनदार पुढारी सर मोरोपंत जोशी यांची कन्या कमलाबाई याना रीतसर बघून आपली वधू म्हणून पसंत केली. पण हा विवाह ब्रिटीश राज्यकर्त्यांना मान्य नव्हता. कारण उघड होते. सर मोरोपंत पुढारी होते आणि काँग्रेसला जवळचे होते. काँग्रेस ब्रिटीशांच्या विरोधात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लढत होती. म्हणून तत्कालीन मुंबई सरकारकडून राजेसाहेबांवर हा विवाह रद्द व्हावा म्हणून दडपण येत होते. पण त्या विशीच्या वयात, नुकतेच राज्यावर बसलेले असतानासुद्धा, राजेसाहेबानी स्वत:च्या निर्णयाशी ठामपणे चिकटून राहण्याचे धैर्य दाखविले. त्या पारतंत्र्याच्या काळात ही गोष्ट नक्कीच अवघड होती. त्यानी स्पष्ट कळविले की "मी पाहून पसंत केलेल्या मुलीशीच लग्न करीन, त्यास सरकारची हरकत असेल तर आजन्म अविवाहित राहीन." शेवटी मोरोपंत जोशी यांचे स्नेही आणि नेमस्त पक्षाचे प्रख्यात पुढारी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यानी मध्यस्थी केली. मग विवाह सुरळीत पार पडला.(२९ जून १९१०)

या एकाच घटनेवरून प्रत्येक बाबतीत संस्थानिकांची किती कुचंबणा होत असेल याची कल्पना यावी. इंग्रजी अमदानीत संस्थानिकाना राजकीय दास्यतेमुळे लष्करी पराक्रम दाखविण्यास वाव नव्हता, संधी नव्हती. हाती जी काही राजसत्ता होती त्यावर मर्यादा पडल्या होत्या. ब्रिटीश सरकारची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी नेहमी संशयाची असे. परिणामी, बहुतेक सर्व संस्थानिकांची जीवनदृष्टी प्रजेविषयीचे कर्तव्यपालन करण्यापेक्षा, खावे, प्यावे, मौजमजा करावी इतकीच राहिली. या प्रवृत्तीस अपवाद ठरलेले जे काही मोजके संस्थानिक होते, त्यात सांगलीचे राजेसाहेब एक होते.

२जून १९१० रोजी राजेसाहेबानी अधिकृतपणे राज्यसूत्रे हाती घेतली. तत्कालीन सांगली संस्थानचे क्षेत्रफळ ११३६ चौ. मैल इतके होते. पण सगळा मुलूख एकसंध

नव्हता. महाराष्ट्र-कर्नाटकातील सोलापूर, सातारा, बेळगाव अशा जिल्ह्यातून पसरलेला होता. सांगली संस्थानची काही गावे(शहापूर,शिरहट्टी वगैरे) तर सांगलीपासून दीडशे-दोनशे मैल अशा अंतरावर होती. पण सुदैवाने राजेसाहेबांच्या अज्ञानकालात कॅप्टन बर्क यानी राज्यकारभाराची अुत्तम शिस्त बसवून दिली होती. १९०५ ते १९१० या त्यांच्या कारभारवर्षांत त्यानी रयतसभा सुरू केली. याचीच पुढे राजेसाहेबानी पद्धतशीर जोपासना केली. राजेसाहेबानी संस्थानचा कारभार हाकताना ब्रिटीशांच्या राज्यव्यवस्थेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला होता. "उत्कृष्ट राज्यकारभार हा राज्याचा कणा असतो" हे वचन प्रत्यक्षात आणण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. राजा हा जसा प्रजेचा मालक आहे तसा तो त्याचा सर्वात मोठा नोकर आहे, ही भावना त्यांच्या मनात खोलवर रुजली होती. आपला राज्यकारभार अुत्तम दर्जाचा रहावा या इच्छेपोटी राजेसाहेबानी ब्रिटीश मुलुखातून सेवानिवृत्त आय. सी. एस. अधिकारी, हायकोर्ट जजेस याना संस्थानात मोठ्या हुद्यांच्या जागांवर नेमले. सर पॅट्रिक कॅडेल, सर वाडिया, दिवाणबहाद्दुर ब्रह्म, बी. एन. डे, ढवळे यांसारख्या कर्तबगार अधिकाऱ्यांच्या बुद्धिमत्तेचा त्यामुळे सांगली संस्थानला लाभ झाला. अर्थात त्यांच्यावर कारभार सोपवून राजेसाहेब स्वस्थ बसत नसत. प्रत्येक खात्याकडे त्यांची चिकित्सक नजर असे. त्यामुळे संस्थानात कुठे खुट्ट झालं तरी त्याना त्याची जाणीव होई. संस्थानच्या प्रगतीसाठी त्यानी केलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात असा आढावा घेता येईल.

अनेक भूभागात पसरलेल्या सांगली संस्थानचे एकंदर सहा तालुके: १)मिरज प्रांत २) कुची ३) शहापूर ४) मंगळवेढे ५) तेरदाळ महाल ६) शिरहट्टी. राजेसाहेबानी संस्थानातील निसर्गसाधनसंपत्तीची शास्त्रशुध्द पध्दतीने पाहणी करुन त्या आधारे शेतीसुधारणा करण्याचे ठरविले. या सर्व तालुक्यातील जमिनीच्या सुधारणा करणेचे कामास अग्रहक्क देण्यात आला. ताली बांधण्याच्या कामाचे महत्त्व त्याना पटले. त्यामुळे जमिनीची धूप थांबून, पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीत मुरून, त्याचा पिकास अुपयोग होण्याकरता समपातळीवर ताली घालणे हा जमीन सुधारण्याचा मुख्य पाया आहे, ही शेतकी अधिकाऱ्यांनी, त्यांची खात्री करून दिली व राजेसाहेबाना एवढी पटली, की आपल्या अधिकाऱ्यांसमवेत राजेसाहेब स्वत: संस्थानात सर्वत्र हिंडून ताली बांधण्याच्या कामाला त्यानी चालना दिली. प्रसंगी राजेसाहेबानी स्वत: बैलगाडीतून कष्टाचा प्रवास केला. बागायती शेती वाढविण्यासाठी मिरज प्रांत, कुची, शहापूर व तेरदाळ या तालुक्यातील नद्या-ओढे यावर धरणे बंधारे घालून घेतले, गाळाने भरलेले तलाव दुरूस्त केले. शेतीचे शिक्षण, पशुवैद्यकखात्याची मदत, ठिकठिकाणी शेतीच्या खताच्या योग्य साठवणीची पध्दत, फळझाडांची कलमे यासाठी संस्थानतर्फे खास योजना राबवल्या जाऊ लागल्या. सांगली संस्थानातील दूध उत्पादनाचे

प्रमाण पाहून, सर्व अद्ययावत साहित्याने युक्त अशी एक मोठी डेअरी काढण्यास राजेसाहेबानी प्रोत्साहन दिले. त्याकाळात सुध्दा ग्रामीण भागाकडे विशेष लक्ष पुरविले जावे म्हणून 'ग्रामोद्योग योजना' राजेसाहेबानी सुरु ठेवली होती. एकूण करप्राप्तीचा विशिष्ट भाग यासाठी वापरला जात असे. संस्थानतर्फे दोन लाखांचे शेअर कॅपिटल घेऊन मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात आली होती.

आज महाराष्ट्रात औद्योगिक प्रगतीचा एवढा मोठा डोंगर अुभा राहिलेला दिसतोय. पण त्याचा उगम दक्षिणेतील सांगली, औंधसारख्या संस्थानातून झाला आहे, याची कल्पना अनेकाना नसेल. पारतंत्र्याच्या कालात, जसजशी राजकीय जागृती होऊ लागली, तसतशी स्वदेशीची चळवळ मूळ धरू लागली. स्वदेशी चळवळ म्हणजे एकप्रकारे ब्रिटीश सत्तेवरचा हल्लाच. तेव्हा सरकारचा रोष पत्करून स्वदेशी अुत्पादनव्यवसायाला प्रोत्साहन देणे संस्थानिकाना अवघडच. १९०७ साली सुरू झालेल्या रेल्वेमुळे व्यापाराची मोठीच सोय झाली. दांडेकर, भिडे मंडळींच्या प्रयत्नातून लोखंडी मोटा,पिठाच्या चक्क्या, शेंगा फोडण्याची यंत्रे अशी अुत्पादने सुरु झाली. राजेसाहेबांच्या आधाराने विष्णुपंत तथा दादासाहेब वेलणकरानी वस्त्रोद्योगात पाऊल टाकून श्री गजानन मिल नावारूपाला आणली. सांगलीच्या आसपास साखर कारखाना नव्हता. त्यांच्या प्रोत्साहनामुळे शिरगावकर बंधूंचा साखर कारखाना सांगली संस्थानातील उगारला अुभा राहिला.या सर्वांच्या प्रयत्नामुळे सांगली संस्थानात अुद्योगाची वाढ झाली. सांगली हळदीची पेठ म्हणून वर्षानुवर्षे सुविख्यात आहे. खेरीज गूळ, मिरची, शेंगा वगैरे सर्व प्रमुख मालाचा व्यापार सांगलीतून होतो.

व्यापार अुद्योगधंदा म्हटला की हरघडीच्या व्यवहाराला बँकेची आवश्यकता आहे हे दिसून येताच राजेसाहेबानी स्वत:चे भांडवल घालून सांगली बँकेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. सांगलीच्या अुद्योगधंद्याच्या वाढीला या बँकेच्या स्थापनेमुळे मोठीच चालना मिळाली.

या सर्व प्रयत्नांबरोबरच सांगलीची औद्योगिक,व्यापारी भरभराट होण्यास एक महत्वाचे कारण लक्षात घेणे आवश्यक आहे, ते म्हणजे राजेसाहेबानी निर्माण केलेली आणि जपलेली सुरक्षिततेची भावना. सांगलीत जीवित आणि वित्त सुरक्षित असल्याची भावना राजेसाहेबांच्या चोख राज्यकारभारामुळे, नि:पक्षपाती न्यायव्यवस्थेमुळे वाढीस लागली. वेळप्रसंगी त्यांच्या कारभारविरोधात केलेली टीका सुध्दा सहनशीलतेने ऐकून घेण्याची राजेसाहेबांची प्रवृत्ती होती. इतर संस्थानांतून आढळणारा लहरीपणा, कायदा पायदळी तुडवून, 'हम करेसो कायदा' असा प्रकार येथे नव्हता. या सर्व गोष्टींचा सम्यक् परिणाम होऊन व्यापारी, अुद्योजक, सराफ, अडत्ये, सांगली संस्थानकडे आकर्षित झाले.

प्रत्येकाने संस्थानच्या उत्कर्षासाठी छोटे-मोठे काम करावे, अशी रास्त अपेक्षा ठेवणारे राजेसाहेब, स्वत: तसा विचार अहर्निश करीत. त्यामुळेच त्यानी नामवंत अर्थतज्ञ धनंजयराव गाडगीळ आणि प्रा. डी. जी. कर्वे यांची कमिटी स्थापन केली. सांगली संस्थानच्या भौतिक संपत्तीचा अंदाज घेऊन तिचा विकास शेती व लहानमोठे अुद्योगधंदे या क्षेत्रात घडवून आणण्याच्या दृष्टीने या कमिटीला शिफारस करण्यास सांगण्यात आले होते. अुभ्या भारतवर्षात आदर्शभूत गणल्या गेलेल्या या कमिटीच्या शिफारसी कार्यान्वित करण्यासाठी प्रख्यात अर्थतज्ञ आणि विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. पी. एम. लिमये या खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. या विचारमंथनातूनच पुढे राजेसाहेबानी मुंबईचे सुप्रसिध्द अुद्योगपती श्री. वामन श्रीधर आपटे यांचेबरोबर दोन कोटी भांडवलाचे कारखाने काढण्याचा करार केला. यातून साखर कारखाना, वनस्पती कारखाना, सूतगिरणी, कापडगिरणी असे अनेक अुद्योगधंदे अुभे राहायचे होते. दहा लाखाची मशिनरी आली. दुर्दैवाने या साऱ्या योजनेवर पाणी पडले! गांधीहत्येनंतर झालेल्या दंगलीत सगळ्या योजनेची राखरांगोळी झाली. राजेसाहेबानी संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी एक पंचवार्षिक योजना आखली होती. विलिनीकरणामुळे ती फलद्रूप झाली नाही ही गोष्ट वेगळी. पण अशी योज़ना आखणारे हे पहिलेच संस्थान असावे.

आज आम्ही लोकशाहीचे डांगोरे पिटतो पण लोकशाहीचे रोपटे रुजवण्याचा प्रयत्न राजेसाहेबानी किती पूर्वी केला होता, हे बघितल्यावर कुणाहि लोकशाहीप्रेमी माणसाचा अूर भरून येईल. बर्कसाहेबानी स्थापन केलेल्या रयतसभेला हळूहळू अधिकाधिक अधिकार देण्यास राजेसाहेबानी जाणीवपूर्वक सुरवात केली.१९३० साली रयतसभेला नियमबध्द स्वरूप दिले.तिच्या सरकारी-निमसरकारी सभासदांची संख्या वाढवली. अनेक प्रकारची मोकळीक दिली. त्याचा अनुकूल परिणाम पाहून १९३८ मध्ये संस्थानच्या कार्यकारी मंत्रिमंडळात दोन मंत्री, निवडून आलेल्या सभासदांमधून घेतले. पुढे १९४६ साली तर राज्यसभेस पूर्ण जबाबदार राज्यपद्धतीचे अधिकार दिले.

वास्तविक राजा आणि लोकशाही या परस्पर-विरोधी संज्ञा. पण राजा असूनहि लोकशाही नांदू शकते ही वस्तुस्थिती इंग्लडची, तर राजा नसुनही लोकशाही नाही ही स्थिती रशियाची. या दोन्ही गोष्टी राजेसाहेबानी बघितल्या होत्या. नरेंद्रमंडळाचे प्रतिनिधित्व करताना ते इंग्लंडमधे राहिले होते. तेथील लोकशाही पाहून प्रभावित झाल्यामुळेच,त्यानी संस्थानात लोकशाही रूजवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. राजसिंहासनावर असतानाच आपला 'राजसंन्यास' पूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न पाहून, त्यांच्या मनाच्या प्रगल्भतेची कल्पना येते. लोकांमधील राजकीय हक्कांची

जाणीव आपल्याला भयभीत तर करत नाहीच, अुलट राज्याच्या (म्हणजे संस्थानच्या) अंतिम हितासाठी ही गोष्ट अत्यावश्यक आहे हे सांगताना त्यानी म्हटलंय,

" It will be now for you,people of Sangli state, to rise to the stature of citizenship demanded by the democratic form of Government.................I am thankful to the Providence for enabling me to realize the dream of my life, in the opportunity vouchsafed to me to crown the constitutional reforms by the grant of responsible Govt." पूर्ण लोकनियुक्त राज्यपध्दतीचे अधिकार जनतेला प्रदान केल्यानंतर इंग्लंडच्या राजाप्रमाणे राजेसाहेबानी 'घटनात्मक राजाची'(Constitutional Head) भूमिका शब्दाच्या खऱ्या अर्थाने बजावली. लोकशाही प्रक्रिया, आपल्या छोट्या राज्यापुरती का होईना, पण यशस्वीपणे राबवली.

अशा या सुसंस्कृत राजाचा शिक्षणविषयक दृष्टिकोन प्रागतिक असणार हे सांगायला नकोच. प्राचीन वेदविद्येपासून तो अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंत सर्व प्रकारचे शिक्षण आपल्या संस्थानात असावे ही त्यांची धारणा होती. सांगलीच्या वेदशाळेत व शास्त्रशाळेत ऋग्वेद, यजुर्वेद, न्याय, व्याकरण, ज्योतिष अशा विविध प्रकारच्या शाखांच्या शिक्षणाची सोय होती. सर्व विद्यार्थ्यांना दोन वेळचे भोजन व विनामूल्य वास्तव्य अशा सोयी देऊन शिक्षणाची व्यवस्था केली जात असे. सुप्रसिद्ध विद्वान पंडित आणि लेखक पं.महादेवशास्त्री जोशीनी या कामी राजेसाहेबानी दाखवलेल्या औदार्याचा फार आवर्जून अुल्लेख केला आहे. संस्थान खालसा झाल्यावर हळूहळू हे वेदविद्येचे व्यासपीठ काळाच्या ओघात नाहीसे झाले ही फार दुर्दैवी आणि चुटपूट लावणारी बाब आहे. सांगली संस्थानात प्राथमिक शिक्षण तर मोफत होतेच पण सक्तीचेही होते. सांगलीतील सुप्रसिध्द, विलिंग्डन आणि वालचंद इंजिनियरींग कॉलेजच्या अुभारणीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. शहापूरसारख्या दूरच्या ठिकाणीसुध्दा १९२० सालीच हायस्कूल सुरू झाले. शैक्षणिक व सामाजिक कार्यात राजेसाहेबांसह, फार मोठा सहभाग राणीसाहेब सौ. सरस्वतीदेवी यांचा होता. प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाची सोय, निव्वळ मुलींसाठी हायस्कूल अशा विविध सोयी करण्यात त्यांचा सहभाग होता. राणी सरस्वतीदेवी कन्याशाळा, पुण्याची हुजूरपागा, सेवासदन, फर्ग्युसन कॉलेज अशा अनेक संस्थांना राजेसाहेबानी भरघोस देणग्या दिल्या. सांगलीत इतर संस्थानांसारखे भव्य वाडे, अुत्तुंग प्रासाद नाहीत, पण आर्ट्स, सायन्स, कॉमर्स, इंजिनियरींग कॉलेजे म्हणजे राजेसाहेबांची केवढी हृद्य स्मारके आहेत.

राजेसाहेबानी ३७-३८ वर्षे राज्य केले पण रूढ अर्थाने राजेपण भोगले नाही. त्यांच्या जीवनात विलासी जीवनाचा, आत्यंतिक भोगवादाचा मागमूसही आढळत

नाही, याचे प्रमुख कारण म्हणजे बालपणापासून अंगी रुजलेली आणि वाढत्या वयाबरोबर विकसित झालेली आध्यात्मिक वृत्ती. आपल्याभोवती संतप्रवृत्तीच्या माणसांना जमवून, त्यांची कदर करणारा त्यांच्यासारखा गुणग्राही राजा विरळा. याच भावनेतून श्रीमळणगावकर महाराज, श्रीनारायणमहाराज केडगावकर, सोनोपंत दांडेकर यांच्याशी त्यांचा संबंध आला. पंजाबमधील सुप्रसिद्ध संत सावनसिंग यांचा अनुग्रह त्यानी घेतला होता. गुरूदेव रानडे यांजसारखे एकान्तप्रिय संत, आपल्या निंबाळच्या आश्रमातून केवळ राजेसाहेबांमुळेच सांगलीत येऊन रहात. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांजसारखे थोर तत्त्वज्ञ आवर्जून सांगलीस येत. तथापि राजेसाहेबांचे एक वैशिष्ट्य असे की त्यानी आपल्या अध्यात्मप्रेमाचा, राज्यकारभार वा अितर विहित कर्तव्ये यात बाधा येईल इतका अतिरेक कधी केला नाही.

सौजन्य, सहिष्णुता, दीर्घोद्योग, दातृत्व, परंपरेचा अभिमान असे अनेक गुणविशेष त्यांच्या ठिकाणी होतेच; पण यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे 'वाणीचे पावित्र्य' त्यानी कसे काय संभाळले हे एक कोडेच होते.राज्यकारभाराच्या ओघात मनाची अवस्था प्रक्षुब्ध होण्याचे प्रसंग अनेकदा येत असतील पण त्यांच्याबरोबर काम करणारे सांगतात की, मुखावाटे अभद्र भाषा क्वचितच बाहेर पडे! चेहेऱ्यावरील प्रसन्न वृत्ती आणि गोड हास्य सहसा लोप पावत नसे. इंग्रजीमधील 'जंट्‌लमन' शब्दात अुत्कृष्टतेच्या आदर्शाची कल्पना सामावलेली आहे. कनिष्ठ, थोर, यांजबरोबरच्या संभाषणात, व्यवहारात त्यांची अभिजात सभ्यता दिसत असे. म्हणूनच पट्टाभिसितारामय्यासारखे राजकारणी असोत वा सी. व्ही. रमणसारखे नोबेल पारितोषिकविजेते शास्त्रज्ञ असोत,सर्वचजण त्यांच्या जातिवंत सभ्यतेने भारावून जात. A Gentleman is a gentleman at all points असं म्हणतात ते त्यांच्याबाबतीत सर्वार्थाने खरं होतं.

याचा अर्थ असा नाही की राजेसाहेब संपूर्णपणे निर्दोष होते. हट्टीपणा, दुराग्रहीपणा, तापटपणा, प्रसंगोपात्त जरूर उफाळून येत असे, पण त्याचा अतिरेक कधी होत नसे. प्रजेला हक्क मिळवण्यासाठी झगडावे लागे, भांडावे लागे मग सभाबंदी, लाठीमार, तुरुंगवास असे प्रकार जरूर होत, पण हे सर्व म्हणजे खेळाचाच एक भाग होता. राजेसाहेबांच्या विरोधात लोकलढा चालवणारे प्रजापरिषदेचे पुढारी गणपतराव अभ्यंकर कठोर वाक्‌प्रहार करत. पण त्यानी सुध्दा एकदा जाहीरपणे सांगितले की "सांगलीत म्हणूनच मी अशी संस्थानी अंमलाविरूध्द चळवळ करू शकलो, इतरत्र हे अशक्य होते." १९४२च्या आंदोलनात अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन यासारखे क्रांतिवीर सांगलीत येऊन आश्रय घेऊ शकत असत. वसंतदादांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे भूमिगत काळातील अड्डे सांगलीत अनेक

ठिकाणी असत, हे आता सर्वश्रुत झाले आहे.

एखादा समंजस आणि शहाणा गृहस्थाश्रमी ज्याप्रमाणे सचोटीने वागून ठराविक अुत्पन्नात नेकीने संसार करतो, तसा राजेसाहेबानी सांगली संस्थानचा संसार केला. त्यानी राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा संस्थानचे उत्पन्न रु.१०,०७०००।-इतके होते, ते राजवटीच्या अखेरीस तिपटीचे वर म्हणजे रु.३३,४४०००।- इतके होते. संस्थानची शिल्लक, नगद रक्कम, सरकारी कर्जरोखे, बाहेरच्या ठेवी वगैरे जमेस धरून संस्थानची मालमत्ता, एक कोटी रूपयांपेक्षा थोडी अधिकच होती. सांगली संस्थानचा छोटा पसारा आणि पन्नास वर्षांपूर्वीची रूपयाची किंमत लक्षात घेतली, तरच या शिलकीचे महत्त्व उमजेल. या संपन्नतेचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक बाबीवर उधळपट्टी न करता, शहाणपणाने केलेला खर्च, असेच द्यावे लागेल. हातात निरंकुश सत्ता असतानासुध्दा इतर अनेक संस्थानिकांप्रमाणे, राजेसाहेबानी कधीच डामडौल, अुधळपट्टी केली नाही. आपला स्वत:चा खाजगीचा खर्च १९३० पासूनच वेगळा ठेवला. अगदी जाणीवपूर्वक. अगदी विलीनीकरणापर्यंत म्हणजे १९४८ सालपर्यंतसुद्धा खाजगी व दौलत (म्हणजे स्वत:चा कौटुंबिक खर्च आणि सर्व संस्थानी खर्च) यांची रीतसर विभागणी अनेक संस्थानातून झालेली नव्हती. ही वस्तुस्थिती इथे आवर्जून लक्षात घेण्यासारखी आहे. १९३० मध्ये खाजगी नेमणूक, संस्थानी अुत्पन्नाच्या वीस टक्के होती तर तीच रक्कम १९४६-४७ च्या सुमारास १० टक्के इतकी खाली उतरली होती ! वैयक्तिक डामडौलाचा मोह, राजेसाहेब संस्थानी हिताच्या बाबींचा विचार करून कसा टाळत, याचे एक आदर्श आणि बोलके अुदाहरण आहे. राजेसाहेब आणि त्यांचे कुटुंबीय सांगली गावाबाहेर माळबंगल्यावर राहात. हा भाग तसा ओसाड आणि निवासस्थानातील खोल्या जुन्या पध्दतीच्या होत्या. तेव्हा राजेसाहेबांसाठी एक भव्य 'राजप्रासाद' बांधण्यासाठी ६-७ लाखाची रक्कम वेगळी काढण्यात आली होती. त्याच सुमारास कृष्णा नदीच्या वारंवार येणाऱ्या पुराच्या पाण्याचा प्रजाजनाना त्रास होतो, वाहतूक अडते म्हणून कृष्णानदीवर मोठा पूल (सध्याचा आयर्विन ब्रिज) बांधण्याची निकड अुत्पन्न झाली. यासाठी संस्थानला पैसा कमी पडू लागला तेव्हा राजेसाहेबानी क्षणाचाही विचार न करता 'राजप्रासादाचा'विचार बाजूला ठेवला आणि ती सारी रक्कम पुलाच्या कामासाठी वापरली ! या पुलाने सांगलीकरांना पुण्या-मुंबईकडील विशाल जगताची कवाडे अुघडून दिली. आयर्विन ब्रिजवरून मौजेने फेरफटका मारणाऱ्या सांगलीकरांनी या वस्तुस्थितीचे कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवायला हवे! अशा अनेक हकीगती केवळ विस्तारभयास्तव सांगता येत नाहीत.

सांगलीच्या राजेसाहेबांचे सर्वगुणसंकीर्तन करताना असे म्हणावेसे वाटते की

त्यांची लोकप्रियता राजसिंहासनावरून पायउतार झाल्यावरसुध्दा सांगलीकरांच्या मनात अढळपणे टिकून राहण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संस्थान खालसा झाल्यावर सांगलीतच स्थायिक होण्याचा त्यांचा निर्णय. वास्तविक जेथे राज्य केले तेथेच सामान्य प्रजाजन म्हणून राहायचं ही बाब दिसते तितकी आचरणास सोपी नाही. दरबार, पालखी, सलामी, जागोजागचे मानमरातब, संस्थानी नरेंद्रमंडळाच्या बैठका,परदेश वाऱ्या, दिल्लीच्या फेऱ्या, गर्व्हनर, व्हॉइसरायच्या गाठीभेटी सर्व काही बंद. पण जिथं प्राजक्ताची फुलं वेचली तिथं शेणकुटं कशी गोळा करू असा दळभद्री विचार राजेसाहेबांच्या मनाला कधी शिवलापण नाही. इतर ठिकाणचे संस्थानिक आपापला पैसा-अडका, जडजवाहर गोळा करुन पुण्या-मुंबईकडे जाऊन राहिले. पण राजेसाहेब, रंगमंच गाजवणाऱ्या नायकाने, सहजपणे सामान्य प्रेक्षकात येऊन बसावे अितक्या सहजतेने सामान्य प्रजानन बनले, लोकात मिसळून गेले. सांगलीच्या उत्कर्षाच्या योजनांमध्ये त्यानी पूर्वीच्याच आत्मीयतेने त्यांनी रस घेतला. उलट ते कांही आपले राजे नाहीत तेंव्हा त्यांचा आपला काय संबंध, असे म्हणून अुपरणे झटकण्याची वृत्ती सांगली संस्थानच्या प्रजाजनानी चुकून कधी दाखवली नाही. सांगली संस्थान खालसा झाल्यावर दहा-बारा वर्षानी संस्थानच्या जुन्या कर्नाटकी भागात, शिरहट्टी भागात, राजेसाहेब गेले असतां, त्यांचे जे काही अभूतपूर्व स्वागत, मिरवणुका मानपत्रे अशा स्वरूपात झाले, तेव्हा हा स्थितप्रज्ञ राजा गहिवरून म्हणाला, ''तुम्हा लोकांचे प्रेम बघून आम्ही खरोखर भारावून गेलो आहोत. हे प्रेम निरपेक्ष आहे. आता आमच्याकडून काहीही मिळण्याची परिस्थिती नाही, तशी तुमची अपेक्षाहि असण्याचे कारण नाही. तरीहि प्रेमाचा अुत्साह अनुपमेय आहे. त्यात कृत्रिमपणाचा अंशहि नाही.''

१९६० साली सांगलीच्या जनतेने राजेसाहेबांचा ७० वा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला. भारत सरकारने पण त्याना 'पद्मभूषण' पदवी देऊन सन्मानित केले.

२३ फेब्रुवारी १९६५ रोजी शांतपणे हा लोकांचा राजा काळाच्या पडद्याआड गेला. तेव्हा प्रजाजन ढसढसा रडले तर नवल नाही पण त्यांच्या लाडक्या हत्तीने सुध्दा त्यांच्या पार्थिवावर मूकपणाने अश्रू ढाळले!

कृष्णामाईच्या काठावर हा राजा आता चिरनिद्रा घेत आहे. शेजारी वाहणारी कृष्णामाई पावसाळ्यात समाधीपाशी 'वर' येऊन तिच्यावर अभिषेक करते. या राजाच्या असीम त्यागापोटी, 'जनता-जनार्दनाच्या सेवेसाठी आपण अुभे आहोत' या जाणिवेने आयर्विन ब्रिज 'खडा' पहारा देत आहे.

जोवर कृष्णेचा प्रवाह अखंड वाहात राहील तोवर सच्चा सांगलीकर या आपल्या पित्यासमान राजाला कधीच विसरणार नाही, नव्हे विसरूच शकणार नाही!

●●●

## महाराष्ट्राचा आद्य नाटककार

# विष्णुदास भावे

सांगलीला 'नाट्यपंढरी' म्हणून अत्यंत श्रध्देने आणि भाविकतेने प्रथम गौरवले ते नटवर्य कै. केशवराव दाते यानी.

आणि हा गौरव प्राप्त करुन दिला सांगलीच्या सुपुत्राने. त्याचे नांव विष्णुदास भावे. मराठीतील पहिले नाटक 'सीतास्वयंवर' याचा प्रथम प्रयोग १८४३ साली त्यानी सांगलीत केला.दीडशेहून अधिक वर्षांपूर्वी सुरु झालेला मराठी नाटकाचा हा अक्षय झरा, आता एखाद्या विशालकाय महासागराचे स्वरूप प्राप्त करुन बसला आहे., म्हणून विष्णुदास भावे याना सार्थपणे मराठी नाटकांचे 'जनक' म्हटले जाते. मात्र त्याना श्रेय देताना एका वस्तुस्थितीचा विसर पडतो. तो म्हणजे ज्यांच्या कल्पनेतून, प्रेरणेतून आणि भक्कम आश्रयातून हा पहिला वहिला नाट्यप्रयोग साकारला त्या चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन या सांगली संस्थानच्या पहिल्या अधिपतीचे कळत नकळत विस्मरण होते. विष्णुदास भावे यांच्या बरोबरीने मराठी नाट्यसृष्टी जन्मास घालण्याचे श्रेय त्याना आहे.

या ऐतिहासिक घटनेला १९४३ साली शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून समस्त नाट्यप्रेमी जनतेने सांगलीला नाट्यशताब्दी अुत्सव थाटामाटात साजरा केला. त्याच प्रसंगी सांगलीचे 'नाट्यपंढरी' हे कौतुकाचे बारसे केशवराव दाते यानी केले.

पण हे विष्णुदास भावे होते तरी कोण?

मराठी नाटकाला जन्म देणारा माणूस म्हणजे कुणी तरी विद्वान, पंडित असावा अशीच कोणाचीहि प्रथम कल्पना होईल. पण प्रत्यक्षात विष्णुदास भावे हे तसे अगदी सर्वसामान्य गृहस्थ होते. निदान 'सीतास्वयंवर' नाटकाच्या प्रथम प्रयोगाच्या वेळी तरी. त्यांचा ज्ञात असलेला जीवनपट अुलगडून बघितला तर काय आढळेल? तर विष्णुदास कधी चित्रकार, कधी मूर्तिकार, कधी बांधकामतज्ज्ञ, तर कधी चिनी मातीच्या बरण्या बनवू पहाणारा कारखानदार अशा विविध रूपात ते भेटतील. क्वचित् प्रसंगी शेती कसणाऱ्या चक्क शेतकऱ्याच्या भूमिकेत दिसतील. एकूण कृष्णाकाठचा हा ब्राह्मण अठरा पगड जातीच्या कलाकुसरीत रमलेला दिसेल! अर्थात या सर्वच कलांचे ज्ञान

त्यांच्या ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात एकवटलेले होते ही वस्तुस्थिती आहे.

अशा या विष्णुदासांचा जन्म १८१९/२०सालचा असावा! त्यांचे अधिकृत चरित्र लिहिणाऱ्या चरित्रकाराने म्हणजे प्रत्यक्षात त्यांचे नातू असणाऱ्या रावसाहेब भावे यानी सुध्दा नक्की तारीख दिलेली नाही. भावेमंडळी मूळची कोकणातली. नशीब काढायला इतर अनेक घराणी देशावर आली तसे हे भावेघराणे देशावर आले. विष्णुपंत भावे यांचे वडील अमृतरावभाऊ सांगली संस्थानच्या लष्करात होते.लहानपणापासून विष्णुपंत जात्या व्रात्यच होते. त्यांचे बालपण आजोळी म्हणजे सावळगीस गेले. कानडी मुलुखातील या गावातील वास्तव्यामुळे त्याना कन्नड भाषा अवगत झाली. झाडावर चढणे,पतंग अुडवणे अशा अुनाडक्या करण्याकडे त्यांचा कल असे. तत्कालीन रिवाजाप्रमाणे संध्या,पूजाअर्चा, वैश्वदेव, रुद्र त्याना शिकवला गेला होता. वयाच्या ११-१२व्या वर्षी सांगलीत आल्यावर, त्रिंबकपंतगुरुजी नावाचे एक शिक्षक होते, त्यांजकडे मराठी अक्षर,थोडाफार हिशोब,जमाखर्च वगैरे शिक्षण झाले. १८३०-३१च्या काळात शिक्षण असे ते काय असणार? वर्ष दीड वर्ष शिकले, पण अधिक ओढा गाण्या-बजावण्याकडे होता. त्यावेळी सांगली संस्थान दरबारात, सखारामबुवा काशीकर नावाचे गायक होते. त्या काळातील नावाजलेले गायक अब्दुल्लखान यांचे ते शिष्य होते. या सखारामबुवांकडे विष्णुपंत गाणे शिकण्यास जात. बरंचसं गाणं आणि तालाच्या बारकाव्याचं शिक्षण त्याना बुवांकडे मिळालं. पेशवाईचा अंत होऊन ब्रिटीश अंमल स्थिरावलेला होता. मर्दुमकी गाजवण्याला वावच नव्हता म्हणून लोक गाण्याबजावण्यात, लावण्या गुणगुणण्यात मशगूल होते. अशा लोकांमध्ये विष्णुपंताचा वावर जास्ती असे. मात्र त्यामुळे त्याना काही मिश्र रागातील लावण्यांच्या चाली अवगत झाल्या. नंतर विष्णुपंतांची, मंत्र-तंत्र करणाऱ्या एका मांत्रिकबुवांशी ओळख झाली.ती ओळख एवढी घट्ट झाली की त्या बुवाबरोबर ते पळून गेले.घरच्या लोकानी शोधाशोध करुन पाठलाग केला.विष्णुपंतांची समजूत घातली. बुवांची समजावणी केली. शेवटी बुवानीच विष्णुपंताना सांगितले की "तू आता परत जाऊन पंचमुखी मारुतीची आराधना कर म्हणजे तुला संपत्ती, संतती आणि कीर्ती यांचा लाभ होईल." तेव्हा कुठे स्वारी परत आली. पंचमुखी मारुतीची आराधना चालू असतानाच त्याना चित्रकलेची आणि शिल्पकलेची आवड लागली. शाडू तयार करुन मातीची चित्रे बनवण्याचा त्याना छंद लागला. सांगली गावाचा देखावा,बाजार,श्रीमंत सरकारांची चित्रे त्यानी तयार केली.

एकदा श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब (पहिले) फिरत फिरत विष्णुपंताचे वडील भाऊसाहेब याजकडे आले होते. घरातील सर्वांचे क्षेमकुशल विचारले.मुलांची विचारपूस केली.सर्वांची माहिती देता देता विष्णुपंतांचे वडील, विष्णुपंतांविषयी मात्र

नाराजीने''हा मुलगा नुसता अुनाडक्या करतो,शाडू बनवून मातीची चित्रे करत बसतो''वगैरे सांगितले.श्रीमंतानी चित्रे पहाण्याची अिच्छा व्यक्त केल्यावर विष्णुपंतानी सगळी चित्रे मांडली. इतक्या लहान वयातील मुलाचे हे कर्तृत्व पाहून तो गुणग्राही राजा आश्चर्यचकित झाला.असा गुणी मुलगा आपल्याजवळ असायला हवा अशा हेतूने त्यानी त्याला आपल्या खाजगीकडे घेतला.

अशा तऱ्हेने राजवाड्यात विष्णुपंतांचा शिरकाव झाला. त्या मंत्रतंत्रवाल्या बुवाने सांगितलेलं भविष्य खरं व्हायचं होतं तर!

श्रीमंतानी पूजा-अर्चा,जप-जाप्य या सर्व कामात विष्णुपंत त्यांच्या दिमतीस असत. याच काळात श्रीमंतानी त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल वेगवेगळ्या कसोट्या घेऊन त्यांची परीक्षा पाहिली होती. श्रीमंताना रात्री लौकर झोप येत नसे, तेव्हा ते विष्णुपंतांकडून रामविजय, हरिविजय, शिवलीलामृत, कथासारामृत, भक्तिलीलामृत वाचून घेत असत. मग वाचून झाल्यावर श्रीमंत, विष्णुपंताना मुद्दाम प्रश्न करीत. ''बघ किती छान गोष्टी आहेत. अशा आजच्या काळात लिहिता तरी येतील का?'' मग डिवचलेल्या विष्णुपंताना आवेश चढे. आव्हान स्वीकारल्यासारखे करुन ते म्हणत ''त्यात काय? सहज लिहता येईल.'' मग एक दिवस श्रीमंतानी त्याना एका कथेतील, ''जगात सत्यवर्तनाचे फळ'' या तात्पर्यावर गोष्ट लिही बघू.'' असे म्हटले. मग विष्णुपंतानी चिंतन करुन कल्पकतेने ''सत्यदास'' नावाची रसभरीत गोष्ट लिहून दाखवली.गोष्ट ऐकून श्रीमंत खूश झाले. मग काय? अुभयतांमधील एक न्यारा खेळच सुरु झाला. अशाप्रकारे लिहिलेल्या पाच-पंचवीस गोष्टींचे सहज एखादे पुस्तक झाले असते.

पण सहजी घडलेल्या या खेळातून श्रीमंताना विष्णुपंतांच्या सुप्त गुणांची यथार्थ कल्पना आली असेल आणि विष्णुपंतानाही आपल्या ठायी काही वेगळी प्रतिभा आहे याची जाणीव झाली असेल.

नियतीच त्यांच्याकडून हा खेळ खेळवून घेत असावी. त्यातूनच एक इतिहास घडणार होता.

श्रीमंत आप्पासाहेब हे गुणग्राही होतेच. त्यांच्या रसिकतेमुळे दूरदूरचे शास्त्री, पंडित, गवई, चित्रकारापासून, पहिलवान, अश्वरोहणतज्ञ, निरनिराळी अुमदी जनावरे घेऊन हिंडणारे सौदागर अशा सर्व प्रकारचे लोक सांगलीत येत असत आणि राजेसाहेब त्यांची परीक्षा घेऊन प्रत्येकाचा यथायोग्य परामर्श घेत असत. याच काळात केव्हातरी शाहीर अनंत फंदी सांगलीस राजेसाहेबांकडे येऊन राहिले होते. त्यांच्याबरोबर विष्णुपंतांचा काळ फार आनंदात जाई. त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांतून विष्णुपंताना खूप काही गवसले, जे त्याना भावी काळात अुपयोगी पडले. त्यामुळे

विष्णुपंताना त्या सुमारास ब्रिटीश फौजेत नोकरी मिळण्याची संधी आली होती तरी श्रीमंतानी त्याना सोडले नाही.

ती वेळ जवळ आली होती. मराठी नाटक जन्माला येण्याची.

१८४२साली अशीच कर्नाटकातील भागवत नावाची दशावतारी खेळ करणारी मंडळी सांगलीस आपले खेळ घेऊन आली. राजेसाहेबानी त्यांच्या परिपाठाप्रमाणे त्या मंडळींचे दोन-दोन प्रयोग श्री गणपती मंदिरात केले. त्या खेळात विचित्र वेष घेऊन सर्व मंडळी अपस्वरात गात व नाचत. त्यातील सर्व पात्रे वयाने थोराड. स्त्री भूमिका करणारी ४०-४२ वर्षांची मंडळी होती. त्यांची सोंगे विद्रूप दिसत, भाषणे नुसती धांगडधिंगा स्वरूपाची, कलाहीन, त्यामुळे श्रीमंताना किळस आली. ते स्वत: रसिक आणि गुणग्राही होते. तेव्हा त्यांच्या मनात ठिणगी पडली. जुन्या पौराणिक कथांवर आधारित, सर्व स्त्री-पुरूषाना एकत्र बसून पाहण्याजोगी एखादी कलाकृती तयार करता आली तर? जवळ बसलेल्या विष्णुपंताना ते म्हणाले. "तुम्ही मनावर घ्याल तर यापेक्षा चांगल्या नाट्यकृती लोकांपुढे आणू शकाल. आम्ही सर्वप्रकारे तुम्हाला साहाय्य करु."

विष्णुपंतांच्या ठिकाणी असलेली कल्पकता व रचनाचातुर्य श्रीमंत जाणून होते. आणि विष्णुपंत काय? सदैव अुत्साहाने रसरसलेले. नवीन काही करायचे म्हटले की त्याना स्फुरण चढे. श्रीमंताचे बोलणे ऐकून ते आव्हान त्यानी ताबडतोब स्वीकारले.

पण थोड्याच दिवसात त्याना कळून चुकले की आपले स्वीकारलेले आणि ते सुध्दा आव्हान म्हणून, काम खरंच कठीण आहे. काम करायला नटवर्गच मिळेना. नटवेष घेणे म्हणजे हलक्या दर्जाचे काम म्हणून कोणी पुढे येईना. शेवटी श्रीमंतांच्या कानावर ही वस्तुस्थिती घालून, अशी दवंडी पिटण्यात आली की नाटकात काम करणाऱ्या मंडळीना श्रीमंत वंशपरंपरेच्या जमिनी देणार आहेत व सरकारी नोकरीत ठेवणार आहेत! याचा अपेक्षित परिणाम झाला. माणसं जमू लागली. स्त्रीभूमिकेकरिता कोकणातून सुस्वरूप, चुणचुणीत मुलं आणली गेली.नंतर आपल्या चित्रकलेचे, शिल्पकलेचे ज्ञान पणाला लावून विष्णुपंतांनी पात्राला लागणारी किरिट कुंडले, बाहुभूषणे, कमरेच्या मेखला वगैरे स्वहस्ते बनविल्या ऋषीवेषांकरिता लागणाऱ्या दाढ्या, मिशा, जटा, स्त्रीवेषाकरता लागणारे टोप, अलंकार, स्वत: विणून तयार केले. देव, दैत्य, स्त्रीपार्टी, ऋषिपार्टी इत्यादी पात्रांकरता योग्य अशा सोंगांच्या नकला स्वत: लिहून काढल्या. सर्व पात्रांनी त्या पाठ केल्यावर, शृंगार, वीर, करूण रसाला अनुकूल असे हावभाव कसे करावेत याचे शिक्षण दिले. स्वत: हावभाव करून भाषणे म्हणून दाखविली. यापुढचे अवघड काम म्हणजे नाटकातील गाणी. नाटकाला योग्य अशी काव्ये कुठून मिळणार? मग सर्वांस

समजतील अशी नाटकाची पदे त्यानी स्वत: लिहून काढली! गाण्या-बजावण्याचा पूर्वीचा छंद त्यांच्या अुपयोगी पडला. रागदारी- मिश्र कविता करुन सूत्रधाराची कामे करणाऱ्याना चांगली स्वरतालावर म्हणण्यास शिकविली.

थोडक्यात आजच्या भाषेत म्हणजे विष्णुपंत या नाटकाचे 'सबकुछ' होते!

श्रीमंत राजेसाहेबानी या नाटकाच्या कामाकरिता एक वेगळीच इमारत बांधून दिली होती. तिथंच ह्या नाटकाची अुभारणी व तयारी झाली.

याप्रमाणे सर्व सिद्धता झाल्यावर १८४३ साली श्रीमंत राजेसाहेब व त्यांच्याबरोबरची निवडक मंडळी यांच्यासमोर मराठी रंगभूमीवरच्या पहिल्या नाटकाचा प्रयोग झाला. या ऐतिहासिक घटनेच्या मागे विष्णुपंतांचे जे परिश्रम होते त्याला खरोखर तोड नव्हती.

या पहिल्या नाटकाचे नाव होते 'सीतास्वयंवर'. पात्रांची सजावट, निवड व सुरस कथाभाग यामुळे प्रयोग चांगला वठला. श्रीमंत खूष झाले. त्यानी विष्णुपंतांची खूप वाहवा केली. भागवत मंडळींच्या बीभत्स धांगडधिंग्याच्या पार्श्वभूमीवर हे नाटक सर्वांना आवडले.

या यशानंतर एक गंमत झाली. थोड्याशा धार्मिक कारणाने म्हणा वा मत्सरापोटी म्हणा, विष्णुपंतावर व इतर नटवर्गावर बहिष्कार पडला! ही मंडळी आली की सर्वजण अुठून जात. "नटवेष घेणे ही गोष्ट धर्मबाह्य आहे, सबब त्यांजशी कोणी पंगती व्यवहार करु नये" असा प्रचार सुरु झाला. शेवटी श्रीमंत राजेसाहेबानी विद्वान, शास्त्री-पंडित, सभ्य प्रतिष्ठित अशा लोकांची सभा बोलावली. सभेत वे.शा. आप्पाशास्त्री साठे, आगाशे अशा मंडळीनी जुन्या ग्रंथांचे आधार दाखवून नटवेष घेणे कसे दोषास्पद नाही याचे पूर्ण विवरण केले. सर्व नाटकमंडळींबरोबर सर्वांनी मिळून भोजन केले.

या 'सीतास्वयंवर' नाटकाचे जसजसे प्रयोग होऊ लागले तसतशी नाटकात सुधारणा होऊ लागली. प्रारंभी सूत्रधार सरस्वती-आवाहनांची पदे म्हणत असे. मग तो सर्व देवतांच्या स्तवनपर गीतानी वातावरण भारून टाकी. "पात्रांच्या अंगी अुत्तम वक्तृत्वशक्ती व धीटपणा यावा" असा वर मागून घेई. सूत्रधार नाटकाचे कथानक, प्रसंग वगैरेची प्रस्तावना करी. मग पात्रे आपापली भाषणे कथानकाच्या अनुषंगाने म्हणत असत व प्रसंगानुसार सूत्रधार व त्याचे गायकमंडळ प्रथमपासून अखेरपर्यंत सर्व पदे म्हणत!

श्रीमंतांच्या प्रोत्साहनामुळे 'सीतास्वयंवर' प्रमाणे विष्णुपंतानी, रामायणातील प्रसंगांवर ८-१० नाटके रचली. श्रीमंताना स्वत:ला हा नवीन करमणुकीचा प्रकार

एवढा आवडला की संस्थानला भेट द्यायला मोठा पाहुणा आला की लागलीच विष्णुपंतांच्या नाटकाचे प्रयोग होत. सुरुवातीला नाटक हा शब्द लोकांमध्ये फारसा रुढ झाला नव्हता. सगळा रामायणाचा कथाभाग म्हणून लोक 'राम अवतारी खेळ' असे म्हणत!

श्रीमंताच्या सूचनेनुसार विष्णुपंतानी इतर कथानकांवर'कृष्णजन्म' 'अुत्तर-गोग्रहण' अशी नाटके रचली. विष्णुपंतांची एकूण बुद्धिमत्ता, त्यांच्या कर्तबगारीचा आवाका बघून श्रीमंत, त्यांच्या नाटकमंडळींकरता कायमस्वरूपी इनाम जमिनी देण्याच्या विचारात होते.

पण खुद्द श्रीमंतच आजारी पडले व त्यातच त्यांचा अंत झाला. (१८५१)

आता मात्र विष्णुपंतांचे (आता ते विष्णुदास झाले होते.नाटकातील पद्यात त्यानी आपला निर्देश 'विष्णुदास' या नावाने करायला प्रारंभ केला होता.) दिवस फिरले. श्रीमंत आप्पासाहेबांच्या निधनानंतर, गादीवर बसलेले श्रीमंत तात्यासाहेब अल्पवयीन असल्याने, सर्व कारभार पोलिटिकल एजंटाच्या हातात होता!बाकी कुणाची सहानुभूती नव्हती. डोक्यावर नाटकाच्या खर्चाचा बोजा मात्र हकनाक बसला. सरकारातून कर्जफेडीस मदत होईना. या घालमेलीतून बाहेरगावी दौरे करायचा विष्णुदासानी विचार केला.

आज जसे आपण नाटकमंडळी दौऱ्यावर निघाली म्हणतो तसे त्या काळी 'स्वारीवर' निघाली असे म्हणत.

प्रवासास लागणारी भांडीकुंडी, अंथरूणे-पांघरुणे, नाटकाचे साहित्य (प्रॉपर्टी) वगैरे घेऊन १८५२ मध्ये विष्णुदास 'पहिली स्वारी' करण्याकरता सांगलीबाहेर पडले.

तासगाव, मिरज, कागवाड, जमखंडी, मुधोळ, कोल्हापूर अशा अनेक गावांतून प्रयोग झाले. बरेच प्रयोग होऊन खर्च वजा जाता विष्णुदास नाटक मंडळीला बऱ्यापैकी पैसा, कपडालत्ता मिळाला. या अुत्पन्नामधून मंडळींजवळ नाटकी संच, स्वतःचे अुंची कपडे झाले.

पहिल्या स्वारीतून स्फूर्ती घेऊन विष्णुदासानी १८५३मध्ये दुसरी स्वारी (दौरा) आरंभली. कऱ्हाड, सातारा, फलटण, बारामती करुन मंडळी पुण्यात आली. पुण्यात बुधवार चौकात, आंबेकराच्या बोळातील, सांगलीकरांच्या वाड्यात मांडव घालून नाटकांचे प्रयोग होऊ लागले. पुण्यात प्रो.केरोपंत छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, वगैरे मंडळीनी वाहवा केल्याने बऱ्यापैकी पैसा मिळाला. पुण्यास नाटकवाली मंडळी अशी प्रथमच आली होती.

पुण्याहून पुढे ही नाटकमंडळी मुंबईस गेली. तेथेहि नाटकगृहे नव्हती. इंग्रजी नाटके होत त्या ग्रँटरोड थिअेटरला पाचपाचशे रु.भाडे असे. त्यामुळे विष्णुदास फणसवाडी, ठाकुरद्वार येथे मांडव घालून नाटके करीत. मराठी नाटक हा करमणुकीचा अभिनव प्रयोग असल्याने मुंबईकराना खूप अप्रूप वाटले. मग तेथील पारशी, गुजराथी, युरोपियन लोकाना मराठी नाटक समजणार नाही म्हणून मुंबईच्या मुक्कामातच 'गोपीचंद' नाटक हिंदी भाषेत लिहून ताबडतोब त्याचा प्रयोग सादर केला. म्हणजे हिंदी नाट्यसृष्टीचे जनक म्हणून विष्णुदासांचेच नाव घ्यावे लागते. त्या नाटकाला अभूतपूर्व गर्दी होऊन त्या काळात १८००रुपयांची विक्रमी तिकिटविक्री झाली. मुंबईच्या धनिक गुजराथी लोकानी पैशाची भरपूर अुधळण केली. डॉ.भाऊ दाजी लाड यांच्या मध्यस्थीने, गव्हर्नरसाहेबांच्या सेक्रेटरीने विलायतेस नाटक कंपनी नेण्याचे सुचवले. पण धर्माज्ञेचे अुल्लंघन होईल म्हणून विष्णुपंतानी ही सूचना नाकारली.

१८६२ पर्यंत विष्णुपंतानी अशा तीन स्वाऱ्या केल्या. यशस्वी केल्या. स्वत:ला आणि अितरांना आर्थिक सुबत्ता मिळवून दिली. श्रीमंत आप्पासाहेबांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या नाटक मंडळींची जी दैना झाली त्यातून सर्वजण सावरले. चार पैसे सर्वांच्या खिशात खुळखुळू लागले. विष्णुदासानी नाटकाचा एक धन व कीर्ती मिळवणेचा धंदा महाराष्ट्राला नव्याने मिळवून दिला.

आणि मग मात्र महाराष्ट्रात जे नेहमी होते तेच झाले.

त्यांच्या नाटकमंडळीतील अनेक नटानी वेगळ्या कंपन्या स्थापन केल्या. राहिलेल्या मंडळींत भांडणे सुरू झाली. त्यामुळे नवीन काही नाटके लिहावीत, खटाटोप करुन बसवावीत अितकी मनाची अुमेद, वैतागून गेलेल्या विष्णुदासाना राहिली नाही. कंटाळून विष्णुदासानी नाटक धंद्यास रामराम ठोकला.

महाराष्ट्राचे आद्य नाटककार म्हणून त्यांची कारकीर्द संपली. पण विष्णुदासांचे अुर्वरित जीवन खरोखर ते विलक्षण अद्भुतरीत्या जगले, म्हणून मुद्दाम अुद्घृत करावेसे वाटते.

यानंतरच्या काळात विष्णुदासानी जमखंडी, कोल्हापूर, हैदराबाद अशा विविध ठिकाणी विविध कामे केली. नंतर त्यांची अुडी अुत्तर हिंदुस्थानात ग्वाल्हेरपर्यंत गेली! एवढ्या काळात या नाटककाराने काय काय अुद्योग केले पहा.

सांगलीकर राजेमंडळींबरोबर आप्पासाहेबांच्या निधनानंतर कायम तैनात मिळण्याच्या दृष्टीने विष्णुदासांचे फारसे जमले नाही. दरबारी राजकारणे आणि त्यांचा स्वत:चा फटकळ स्वभाव, स्पष्टवक्तेपणा यांचे फारसे सूत जमले नाही. पण

वेळोवेळी काही संस्थानी कामे त्यानी केली. आजच्या गणपतीमंदिराच्या मागील बाजूस श्रीमंत स्वारीसाठी म्हणून जी निवासस्थाने बांधण्यात आली त्याचे 'बिल्डिंग सुपरवायझर' विष्णुपंत होते. सांगलीकरांकडे जो लग्नसोहळा झाला त्यावेळी लग्नाचा मंडप अुभारणीपासूनची सर्व देखरेख त्यांची होती.

जमखंडी संस्थानातील बंगले, देवीचे देऊळ,शाळा,दवाखाना व इतर अलिशान इमारतींचे काम विष्णुदासांच्या देखरेखीखाली झाले. जमखंडीच्या वास्तव्यात चिनी मातीचे खुजे व बरण्या बनविण्यास योग्य अशी माती त्याना आजूबाजूला आढळली. मग विष्णुदासानी काय करावे? तसे खुजे व बरण्या त्यानी चक्क बनविल्या. त्यावर ग्लेझिंग केले. तेव्हा असा एक कारखाना घालण्याचीच तयारी त्यानी चालविली. पण जमखंडीकरानी अनुकूलता दाखवली नाही म्हणून त्यांचा हा बेत बारगळला!

नंतर कोल्हापूरला कळंबा तलावाच्या कामावर काही काळ त्यानी काम केले. पुढे डिसुझा नावाच्या ख्रिश्चन माणसाच्या नादाने विष्णुदास हैदराबादला गेले. तेथे कौले, विटा बनविण्याच्या कारखान्यात त्यानी काही दिवस काम केले.

श्री. गणेश नारायण कर्वे या गृहस्थाच्या निमंत्रणावरुन विष्णुदासानी वयाची सत्तरी पार केल्यावरच्या वृध्दापकाळात, ग्वाल्हेरकडे कूच केले. तिथे या कर्व्यांना नाटककंपनी काढायची होती म्हणून त्याना मदत केली. त्यावेळी श्री. कर्वे याजकडे कसला तरी अुत्सव होता म्हणून विष्णुदासानी त्याना एक देवतेची मूर्ती बनवून दिली. ही मूर्ती एवढी देखणी बनली की अक्षरश: अख्खं ग्वाल्हेर ती मूर्ती पहाण्यासाठी लोटलं. ही करामत आणि नाट्यक्षेत्रातील त्यांची अद्भुत कामगिरी ग्वाल्हेरच्या महाराजांच्या कानावर गेली. मग जयाजीराव शिंदे सरकारनी त्याना मानाने बोलावून त्यांचा सन्मान केला. शिंदे सरकाराना पाहिजे तसली मूर्ती विष्णुदासानी बनवून तर दिलीच पण त्यांच्या बागेसाठी एक रहाटगाडगेहि बनवून दिले!

या हकीगती वाचून या माणसाच्या विलक्षण बुध्दीमत्तेची कल्पना येते की नाही? हे अुद्योग कमी पडले म्हणून की काय शेवटच्या अुतारवयात घरच्या घरी झाडांची पाने अणि फुले यांपासून रंग अुत्पन्न करण्याचे त्यांचे प्रयोग चालू होते. तरुण वयात शेती करुन बघितली होतीच. म्हातारपणी आपल्या अंगणातील 'प्रयोगशाळेत' 'इनक्लाइंड प्लेन' वर केवळ वजनाच्या योगाने दोन मोटा चालणारे यंत्र तयार करण्याचा त्यांचा खटाटोप चालू होताच!

खरोखर हरहुन्नरी विष्णुदासांच्या अंगी किती कला होत्या याची झलक पाहूनच आश्चर्याने तोंडात बोट जाते!

पण या माणसाला 'विश्वकर्मा' म्हणायचा मोह व्हावा अशी आणखी एक विलक्षण गोष्ट त्यानी केली होती. ती म्हणजे कळसूत्री बाहुल्यांचा खेळ.

नाटकांचे प्रयोग चालू असताना शिकवून तयार केलेले नट अचानक सोडून जात. त्याचा विष्णुदासांना त्रास होई. अशी जिवंत माणसं त्रास देणारी आहेत तर आपण 'निर्जीव' वस्तूंपासून काही करुन घेऊ शकतो का? असं काही करुन पाहण्याची अूर्मी त्यांच्या मनात निर्माण झाली.किती विलक्षण जिद्द! त्यांच्या नेहमीच्या अुद्योगी स्वभावानुसार ते या कल्पनेच्या पाठपुराव्यास लागले. यातूनच जिवंत हाडामासांच्या नटांवर अवलंबून न राहता, आपण काष्ठांकडून नाट्यसेवा घडवून घेऊ अशी हिंमत धरून त्यानी कळसूत्री बाहुल्या तयार केल्या. या खेळासाठी ज्या बाहुल्या त्यानी तयार केल्या त्याचे हातपाय, तोंड, मान, डोळे, ओठ, अितकेच काय पण बोटांची पेरी वगैरे अवयवसुध्दा नैसर्गिकरीत्या हालविण्याची अपूर्व कल्पकता त्यानी दाखविली. सूत्रे हालविणारा एकच माणूस सर्व पात्रांची भाषणे, वेगवेगळ्या आवाजात (स्त्री-पुरुष पात्रानुसार) करी. त्यामुळे अनेक पात्रे बोलत असावीत असा मोठा शब्द चमत्कार किंवा शब्दभ्रम विष्णुदासानी निर्माण केला.

आजच्या काळात बाहुल्यांचा खेळ करून अत्यंत लोकप्रिय झालेल्या श्री.रामदास पाध्ये यानी विष्णुदास भावे यांचे ऋण मान्य केले आहे. ३१ऑक्टोबर १९९२ च्या रविवारच्या 'लोकसत्ते' त विष्णुदासांच्या या क्षेत्रातील कामगिरीचा त्यानी मोठा गौरव केला आहे. त्यानी विुष्णदासांच्या बाहुल्यांची अनेक वैशिष्ट्ये सांगताना म्हटलं आहे की त्यांच्या प्रत्येक बाहुलीला स्वतंत्र व्यक्तिमत्व होतं. रंगभूमीवर जी भूमिका असेल त्याला अनुरूप अशीच बाहुलीची बांधणी असे. या बाहुल्या संपूर्णपणे लाकडाच्या बनवलेल्या असत. त्यासाठी वजनाला हलके असे अुंबराचे लाकूड ते वापरत. या सर्व बाहुल्या विष्णुदासानी स्वत: हाताने बनवलेल्या होत्या. दुर्दैवाने १९४८ मध्ये जाळपोळ झाली त्यामध्ये बऱ्याचशा बाहुल्या आगीमध्ये भस्मसात झाल्या. अलीकडेच, जुलै २००० मध्ये यापैकी कांही बाहुल्याना रंगरंगोटी, वेषभूषा करून मुंबईचे सुप्रसिद्ध शब्दविभ्रमकार, श्री रामदास पाध्ये यांनी विष्णुदासांचे "द्रौपदी-स्वयंवर" हे नाटक सादर केले.

आजच्या जमान्यात दूरदर्शनवरील बोलक्या बाहुल्यांचा शब्दभ्रम ऐकूनही स्तिमित होणारी आम्ही माणसं! मग शंभर, सव्वाशे वर्षापूर्वीच्या काळात अशी 'करामत' करता येत असेल तर त्या विलक्षण पुरुषाला 'विश्वकर्मा' म्हणायचे का आणखी काही?

असा हा 'मुलुखावेगळा माणूस' सांगलीत वारंवार अुद्भवणाऱ्या प्लेगच्या साथीला बळी पडून ९ ऑगस्ट १९०१ रोजी मृत्युमुखी पडला.

एखाद्या सर्वसामान्य हरहुन्नरी माणसाचे एरवी एवढं कौतुक वाटलं नसतं पण हा माणूस 'महाराष्ट्राचा आद्य नाटककार' म्हणून ते कौतुक अधिकच गहिरं बनतं.

आणि असा हा 'महाराष्ट्राचा भरतमुनी' सांगलीचा होता म्हणून प्रत्येक नाट्यप्रेमी सांगलीकराच्या भावना अुचंबळून येतील यात शंका नाही! ●●●

## नाट्यसेवेला सर्वस्व मानणारे

# नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल

महाराष्ट्राच्या नाट्य-अितिहासातील पहिल्या पाच प्रमुख मराठी नाटककारांपैकी तीन नाटककार सांगली गावातील असावेत ही किती अभिमानाची बाब आहे! मराठी नाट्यसृष्टीचे जनक विष्णुदास भावे,खऱ्या अर्थाने ज्याना नाट्याचार्य म्हणता येईल असे गोविंद बल्लाळ देवल व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ही तीन दैवते म्हणजे सांगलीकरांसाठी नाट्यक्षेत्रातील ब्रह्मा विष्णू महेशच! विष्णुदासानी मराठी रंगभूमीची स्थापना केली पण त्याचबरोबर नाट्यक्षेत्राहून भिन्न असे अनेक व्यवसाय त्यानी केले.खाडिलकरानी नाट्यव्यवसायाच्या बरोबरीने किंबहुना अधिकच असा पत्रकारितेचा व्यवसाय केला. याउलट देवलानी केवळ नाटक हेच आपले जीवितकार्य मानले. चरितार्थासाठी म्हणून नोकरी केली पण ती सुध्दा अल्पकाळ. एरवी नाट्यलेखन आणि नाट्यशिक्षण यामध्येच आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत केले.

नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म, सांगली गावाच्या नैऋत्येस असलेल्या अडीच मैलांवरील हरिपूर गावात १३ नोव्हेंबर १८५५ रोजी झाला. हरिपूर गाव कृष्णा नदी व वारणा नदी यांच्या संगमावर आहे. शेजारीच संगमेश्वराचे मंदिर असल्याने या गावास तीर्थक्षेत्राचे महत्त्व आहे. पटवर्धन संस्थानापैकी मिरजमळा (बुधगाव) संस्थानच्या हद्दीत हे गाव होते. गोविंदरावांचे वडील बाळाजीपंत हे बुधगावकर राजेसाहेबांच्या नोकरीत होते. सरकारी कुरणांवर देखरेख करण्याचे त्यांचे काम असे. त्याबद्दल त्याना दरमहा रु.३/-एवढा पगार होता! गोविंदराव देवलाना कृष्णाजीपंत व रामभाऊ असे दोन थोरले बंधू होते. तत्कालीन सांगलीकरांप्रमाणे पोहण्याची खास आवड गोविंदरावाना होतीच. थोरले बंधू कृष्णाजीपंत हे मोठे कर्तबगार गृहस्थ होते. रेव्हेन्यू खात्यात कारकुनी करता करता अखेर कृष्णाजीपंत हुजूर डेप्युटी कलेक्टर म्हणून निवृत्त झाले. ते संगीतशात्राचे जाणकार होते. त्यानी 'फिलहार्मानिक सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली व शास्त्रोक्त बावीस श्रुतींच्या वाद्यांचा प्रसार केला. मधले बंधु रामभाऊ, 'इचलकरंजीकर' नाटक मंडळीत नावाजलेले नट होते. कदाचित या पार्श्वभूमीमुळेच संगीत आणि नाट्य या दोहोंचे गोविंदरावांवर कळत नकळत संस्कार झाले असावेत.

याहुन महत्त्वाचे म्हणजे जवळच्याच सांगलीत विष्णुदास भावे यांच्यामुळे

नाटकाची परंपरा निर्माण झाली होती, तिने गोविंदरावांच्या मनाचा वेध घेतला असावा. तिचे आकर्षण त्याना वाटले असावे. त्याचमुळे नाट्यलेखनाची ऊर्मी त्यांच्या मनात अंकुरली असावी. विष्णुदासांची पौराणिक नाटके ऐन बहरात होती. त्याकाळात 'सांगलीकर' या नावाच्या दोन नाटकमंडळया होत्या. एक धोंडोपंत मराठे यांची तर दुसरी श्रीपादपंत लेले यांची. या मंडळींचे नाटकाचे प्रयोग सांगलीत धुमधडाक्याने होत असत. त्यातच हरिपूरच्याच बळवंत भास्कर मराठे या तरूणाने स्वत:चीच एक नाटकमंडळी स्थापन केली होती. या साऱ्या गोष्टींचा परिणाम गोविंदराव देवलांची नाट्यअभिरूची वाढण्यात झाला असावा. या काळात हरिपुरात ते स्वस्थ बसून असावेत असे त्यांच्या चरित्रकारांच्या कथनावरून वाटते. देवलांचे प्राथमिक शिक्षण हरिपुरातीलच बंडोपंत लेले या पंतोजींकडे झाले. त्यानंतर त्यांचे बंधू कृष्णाजीपंत याना नोकरी लागून त्यांचे बेळगावी बिऱ्हाड झाले तेव्हा देवलांचे इंग्रजी शालेय शिक्षण तेथे सुरु झाले. पण दरम्यानच्या काळात नाटक या विषयाचा त्यानी सर्वांगाने अभ्यास केला असावा. त्यांच्या त्या बालवयातील या नाट्यअुद्योगाला अभ्यास म्हणणे योग्य नाही पण नाट्यवस्तु, अभिनय, संगीत, प्रवेश (त्याकाळात 'कचेरी' म्हणत) मग रंगत जाणारे अंक, या सर्व गोष्टींचे त्यानी जे अवलोकन केले, त्याचा भावी काळात त्याना फार अुपयोग झाला. एकूण नाट्यकलेचा अंकूर या बालवयातच त्यांचे ठायी रुजला.

बेळगावमध्ये सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय (हायस्कूल) शिक्षण झाले. मध्यंतरी कदाचित वडील बंधूंच्या बदलीमुळे ते पुन्हा कोल्हापुरात राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षणासाठी दाखल झाले. बेळगावच्या सरदार्स हायस्कूलमधून १८७८-७९ मध्ये ते मॅट्रिक झाले. सरदार्स हायस्कूलमधील मोठी कमाई म्हणजे त्याना झालेला कै.अण्णासाहेब किर्लोस्करांच्या सहवासाचा लाभ. अण्णासाहेब त्याना सरदार्स हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून लाभले. मूळची नाटकाची आवड, नाटककारच शिक्षक म्हणून लाभल्याने आपोआपच परिपक्व झाली. पण अण्णासाहेबांच्या मार्गदर्शनाचा खरा परिणाम देवलांच्या काव्यलेखनावर झाला. मुळात त्याना काव्याची आवड होतीच पण अण्णांच्यामुळे त्यांच्या काव्यरचनेस नक्कीच प्रोत्साहन मिळाले. मंगळागौरी, हरतालिका, व्रतबंधन अशा कार्यक्रमांस ते कविता करून देत. त्यांच्या संवेदनाक्षम मनाला सामाजिक दुष्ट रुढींमुळे स्त्रियांचे होणारे हाल याच काळात जाणवावयास लागले असावेत. कारण सामाजिक विषयावरील 'सासुरवाशीण' ही त्यांची कविता खूप गाजली होती. म्हाताऱ्या नवऱ्याशी लग्न झालेल्या तरूण सासुरवाशिणीच्या छळाचे वर्णन त्यात अगदी प्रत्ययकारी झाले आहे. त्यातील काही शेवटची कडवी अशी:

*''इतके होता जाते माध्यान्ह अुलटून  किती दु:ख सोसू किती रडू यमुताई ।*
*नाही झोप, पडते तशीच जाऊन  कर्म पाठिशी लागलं खरं बाई*
*घरिं तरि सदा दुखण्यानं हैराण  देवा गोविंदा झडकरि येईबा धावून*
*मात्रा घाशिता झिजले हात सहाण  धेनू वरती काढावी पंकातून।। ''*

''धेनु वरती काढावी पंकातून''या शेवटच्या ओळीवरून ती दु:खी सासुरवाशीण अुद्धाराची अपेक्षा करते असे दाखवले आहे.

'शारदा' नाटकाचे बीज बालवयातच त्यांच्या अंतर्मनात केव्हातरी रुजले असावे!

देवलाना गरीबीचे चटके फार लहानपणापासूनच बसलेले असावेत. त्यामुळेच त्यांचे शिक्षण खंडित होत होत वयाच्या २३-२४ व्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. याच गरीबीच्या चटक्यामुळे अुत्तर आयुष्यात देवल आपल्या नाटकांचे अधिकार, मानधन अशा विषयात कठोरपणे वागत.

मॅट्रिक झाल्यानंतर कॉलेजशिक्षण परवडण्यासारखे नव्हते. म्हणून चरितार्थाची सोय होईल या हेतूने कदाचित त्यानी शेतकी शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा केला असावा. त्यानी पुण्याच्या 'पूना कॉलेज ऑफ सायन्स' मधून दोन वर्षाचा अभ्यासक्रम पुरा केला. त्यानंतर त्यानी थोडा काळ सरदार हायस्कूल बेळगाव, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे नोकऱ्या केल्या असे दिसते. पण वरिष्ठांशी न पटल्याने सोडल्या. बेळगावच्या शेती खात्यातील नोकरी तर त्यानी निव्वळ नाटकाच्या प्रेमापोटी सोडली असे सांगतात. ते बेळगावला नोकरी करत असताना त्यांच्या मित्रमंडळीनी एका नाटकाचा प्रयोग पुण्यात शनिवारी लावला. त्याचे पत्र देवलाना दोन दिवस आधी म्हणजे गुरुवारी मिळाले. त्या नाटकात देवलांची महत्त्वाची भूमिका होती. हूगवर्फ या त्यांच्या वरिष्ठ साहेबाला हा माणूस नाटकासाठी रजा मागतो या गोष्टीचा फार राग आला. त्याने रजा नाकारली. नाट्यवेड्या देवलाना हे कसं सहन होणार? त्यानी साहेबांच्या तोंडावर राजिनामा फेकला आणि ताबडतोब टांगा पुण्याच्या दिशेने हाकारला! या दंतकथेत सत्याचा अंश किती हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे ते देवलांचे नाट्यप्रेम. आपल्या या वेडापोटी आणि तापट स्वभावापोटी नोकरीत आपले एकूण जमणे कठीण, ही खूणगाठ त्यानी मनाशी बांधली आणि यापुढे आयुष्यात नोकरी करायची नाही हे पक्के ठरविले. अर्थात हा निश्चय आयुष्यभर पाळला.

पुण्यातील वास्तव्याच्या सुरूवातीच्या काळात त्यानी आपले एक मित्र श्रीनिवास भिकाजी देसाई यांच्या साहाय्याने 'कादंबरी-कलाप' या नावाचे मासिक सुरू केले. त्यात रेनॉल्डसच्या 'मिस्टरीज ऑफ लंडन' या कादंबरीचे भाषांतर छापण्यास

सुरूवात केली. पण हा व्याप काही देवलाना झेपला नाही. मासिक लौकरच बंद पडले. मग काही काळ वर्तमानपत्रात लिहून बघितले. 'पुणे वैभव' या पत्रात काही प्रचलित विषयांवर त्यानी लेखन केले. त्या काळी गाजलेल्या 'क्रॉफर्ड' प्रकरणावर 'गरीब रयतेचे काळ' या त्यांच्या लेखाबद्दल संपादकाना माफी मागावी लागली. मग मात्र देवलानी ठरविले की आता नोकरी नाही की अन्य अुद्योग नाही.

आता फक्त नाट्यव्यवसाय!

त्यांच्या सुदैवाने एक संधी त्यावेळी चालत आली.

त्यावेळचे राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल कँडी यानी त्याच त्याच नाटकांचा पुन्हा पुन्हा प्रयोग होतो, तेव्हा नवीन नाटक लिहिले जावे म्हणून एक नाट्यलेखनस्पर्धा आयोजित केली. पहिल्या नाटकास रु.१५१/-चे बक्षिस ठेवले. तेव्हा देवलानी आपले पहिले नाटक 'दुर्गा' लिहिले आणि स्पर्धेसाठी पाठवले. हे नाटक म्हणजे टॉमस सदर्नच्या The Fatal Marriage or The Innocent Adultery या नाटकाचे रूपांतर आहे. 'दुर्गा' हे ६४ पानी शोकान्त नाटक आहे.दुर्गा नावाच्या स्त्रीचा नवरा मारला गेल्यावर (म्हणजे तशी बातमी प्रसृत झाल्यावर) ती स्त्री, तिच्यावर निस्सीम प्रेम करणाऱ्या पुरूषाशी लग्न करते आणि दुर्दैवाने त्याचवेळी तिचा पहिला नवरा परत येतो. या नाटकात एकप्रकारे पुनर्विवाह दाखवला असताना, १८८५-८६ च्या सनातनी काळात हे नाटक रंगभूमीसाठी देवलानी लिहावे, हे थोडे आश्चर्याचे आहे. या शोकान्तकारी नाटकाच्या बक्षिसाची पण थोडी शोकान्तिकाच झाली. देवलांच्या 'दुर्गा' नाटकाचे बक्षिस जवळजवळ निश्चित झाले होते. पण एकूण ३५ हस्तलिखितांपैकी कै.वासुदेवशास्त्री खरे यांचे 'गुणोत्कर्ष' नाटक वाचायचेच राहून गेले असे शेवटच्या क्षणी परीक्षकांच्या लक्षात आले! आणि ते नाटक वाचल्यावर 'गुणोत्कर्षला' पहिले बक्षिस देण्यात आले! मात्र 'दुर्गा' नाटकाची पण परीक्षकानी वाखाणणी केल्यामुळे प्रिन्सिपॉल कँडीनी त्या नाटकास रू.७५/- चे खास बक्षिस दिले.

यासंबंधीच्या अुलट-सुलट बातम्या 'केसरी' च्या स्फुटात येत होत्या. पुस्तकरूपाने हे नाटक १८८६ मध्ये प्रसिद्ध झाले. देवलानी स्वत: हे नाटक बसवले आणि रंगभूमीवर त्याला बऱ्यापैकी यश मिळाले. नाट्यव्यवसायात स्थिर होण्यास 'दुर्गा' नाटक अुपकारक ठरले.

यानंतर देवल, अण्णासाहेब किर्लोस्करांच्या किर्लोस्कर नाटक मंडळींबरोबर काम करू लागले. म्हणजे अण्णासाहेबानी त्याना बोलावूनच घेतले. बेळगावच्या शाळेत विद्यार्थीदशेतील देवलांचे काव्यप्रेम, काव्यक्षमता, नाट्यवेड, नाटकाच्या बारीक-सारीक अंगांचे सूक्ष्म ज्ञान यांचा अण्णांना जवळून परिचय होता किंबहुना त्यानीच

या साऱ्या गोष्टींना खतपाणी घातले होते. त्यामुळे गुरू-शिष्याची जोडी एकत्रितपणे काम करू लागली. अण्णांच्या संगीत 'शाकुंतल' नाटकात मूळात शकुंतलेच्या तोंडी पदे नव्हती. कारण शकुंतलेचे काम करणाऱ्या शंकरराव मुजुमदाराना गाण्याचे अंग नव्हते. पुढे भाऊराव कोल्हटकर कंपनीत आले. त्याना गाण्याचे अंग असल्याने शकुंतलेसाठी पदे घालण्याचे ठरले. अण्णासाहेबानी हे काम देवलांकडे सोपवले. आणि अण्णांच्या पदरचनेबरहुकुम पदे तयार करुन, देवलानी सर्वांची वाहवा मिळविली. शकुंतला व सुभद्रा या दोन्ही भूमिकांचे अभिनयशिक्षण देऊन, ही दोन्ही कामे भाऊरावांकडून चोख वठवून घेण्याची मोठी जबाबदारी देवलानी समर्थपणे पार पाडली. पुढे अण्णासाहेबांच्या 'रामराज्यवियोग' नाटकात भाऊरावांकडून मंथरेची व भास्करबुवा बखले याजकडून कैकयीची भूमिका त्यानीच बसवून घेतली.

मात्र अण्णासाहेबांच्या मृत्यूनंतर किर्लोस्कर संगीत मंडळींबरोबरचे देवलांचे संबंध संपुष्टात आले. अण्णासाहेबाना असलेले स्थान आपल्याला मिळावे अशी त्या नाटकमंडळींकडून देवलांची रास्त अपेक्षा होती असा प्रवाद आहे. देवलांच्या अंगी असलेले नाट्याविषयक ज्ञान आणि काव्यप्रतिभा यामुळे तसे स्थान त्याना मिळायला हरकत नव्हती. तसे घडले नाही हे मात्र खरे. देवलांचा स्वत:चा तापटपणा आणि मानी स्वभावही आडवा आला असेल!

ते काही असो. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या सहवासाचा, मार्गदर्शनाचा फार मोठा प्रभाव देवलांवर पडलेला होता. १८८५मध्ये अण्णासाहेबांचा मृत्यू झाल्यावर देवलानी अुत्स्फूर्त आर्या रचली. ती अशी:-

बलवत्-कवि -कविता-मधुमधुपासम रसिक रसिक जे प्याले ।
वदतील माधुरी ती ससित पयाचे न देति शत प्याले ।।१।।
बलवत् कवि ही भरत मुनीचीच मूर्ति अवतरली ।
जिच्या अनुमान कृतिने नाट्यकला अज्ञ ताप ती तरली ।।२।।

अनेक ठिकाणी देवलानी अण्णासाहेबांविषयीचा आपला प्रेमभाव व्यक्त केला आहे. 'शापसंभ्रम' नाटकाच्या नांदीमध्ये त्यानी आपल्या गुरुला वंदन केले आहे ते असे.....

''श्रीनटनायक चिंतुनी आधी, बलवंता नमितो ।।
दुष्कर कामी प्रसाद गुरुचा धैर्य मना देतो ।।''

आण्णांच्या शाकुंतलचे यश बघून संस्कृत वाङमयातील कथानकांवरून नाटके रचण्याची वा रूपांतरित करण्याची प्रेरणा देवलाना मिळाली आणि याच अुर्मीतून १८८६-८७ नंतर म्हणजे अण्णासाहेबांच्या मृत्युनंतर देवलानी 'मृच्छकटिक' आणि 'विक्रमोर्वशीय'

ही नाटके लिहावयास घेतली. त्यांपैकी मृच्छकटिक १८८७ मध्ये तर विक्रमोर्वशीय १८८९ मध्ये रंगभूमीवर आले.

'मृच्छकटिक' नाटकाला मोठेच यश मिळाले. या यशाचे कारण म्हणजे शूद्रकाच्या या मूळ नाटकात कथानकाचे धागे प्रेक्षकांची आतुरता वाढवणारे आहेत. अितर संस्कृत नाटकांच्या तुलनेत पाल्हाळ कमी आहे. चारूदत्ताचे औदार्य, वसंतसेनेची गुणप्रियता, मैत्रेयाची स्वामिभक्ति, मित्रप्रेम, शकाराचा शहाणपणाचा वास असलेला दुष्टपणा, तर शर्विलक व रदनिका यांची प्रेमकथा, या अनेक गोष्टींमुळे कथानक रंगत जाते. मूळ नाटकातून काटछाट करत देवलानी नाटक सुटसुटीत (त्या काळाच्या मानाने) बनवले. अुत्तम चाली, अभिनयसंपन्न नटवर्ग अणि खुद्द देवलानी मेहनतपूर्वक घेतलेल्या तालमी यामुळे या नाटकाचा बोलबाला खूप झाला. पुढे पुढे गंधर्वमंडळीनी थाटामाटाची सीनसिनरी करुन आणखी गंमत आणली. बालगंधर्वानी वसंतसेना आणि गणपतराव बोडसानी शकाराची भूमिका अजरामर करून टाकली.

त्या तुलनेत देवलांचे 'विक्रमोर्वशीय' नाटक अजिबात यश मिळवू शकले नाही. त्याचे अतिमानुष कथानक प्रेक्षकांच्या मनाला भावण्यासारखे नव्हतेच.

देवलांचे एव्हाना पुण्यात बस्तान चांगले बसले. वृत्तीने नेमस्त असल्याने हरिभाऊ आपटे यांचेबरोबर त्यांचे चांगले मेतकूट जमले होते. न्यायमूर्ती रानडे यांच्या शिष्यपरिवारात जरी मोठ्या आस्थेने ते सामील झाले होते तरी एकूण सार्वजनिक जीवनातील धकाधकी त्याना मानवण्यासारखी नव्हती. पुण्यातील मित्रमंडळातील प्रो. वासुदेव बाळकृष्ण केळकर यांची मैत्री त्याना विशेष अुपकारक झाली. ते इंग्रजीचे प्रोफेसर आणि शेक्सपीयरच्या नाटकांचे मर्मज्ञ होते. त्यांच्यामुळे इंग्रजी नाटकातील बारकावे देवलांना नीटपणे समजून घेता आले. याच मंथनातून देवलांच्या 'झुंजारराव' नाटकाचा जन्म झाला.

'झुंजारराव' नाटक १८९० मध्ये प्रसिद्ध झाले. शेक्सपीयरच्या 'ऑथेल्लो' या जगप्रसिध्द शोकांतिकेचे रुपांतर म्हणजे देवलांचा झुंजारराव. हे भाषांतर नाही तर रूपांतर असल्याने एतद्देशीय परिस्थितीला अनुसरून जुळणी देवलानी केली. ऑथेल्लो आणि इयागोचे झुंझारराव आणि जाधवराव झाले. डेस्डिमोनाची कमळजा झाली. ज्या कुणा महाभागाला शेक्सपीयरची मूळ कलाकृती माहीत नसेल त्याला हे नाटक म्हणजे स्वतंत्र कलाकृतीच वाटेल! मुळात कथानक, व्यक्तिरेखा या दृष्टीने शेक्सपीयरची ही कलाकृती अमर असल्याने आणि नाटक रूपांतराच्या साऱ्या मखख्या देवलाना अुत्तम प्रकारे अवगत असल्याने हे नाटक रंगभूमीवर बरीच वर्षे गाजले. गणपतराव जोशी यानी झुंझाररावाची भूमिका आणि बाळाभाऊ जोग यानी इयागोची भूमिका

चांगलीच गाजवली.

याच सुमारास देवलांच्या रुपांतर-प्रतिभेला ललकावणारी संधी आली.

१८९०-९१ च्या वर्षात इंदूरच्या संस्कृतप्रेमी अधिपतीनी बाणभट्टाच्या 'कादंबरी' वरून मराठीत संगीत नाटक लिहिण्याची स्पर्धा जाहीर केली होती. बाणभट्टाच्या लांबलचक समासांची ज्याना ओळख आहे, त्याना हे काम किती कटकटीचे, नाट्यकौशल्याची कसोटी पाहणारे होते याची कल्पना येईल. बक्षिसाची रक्कम एक हजार रूपयाची होती, हे मुख्य आकर्षण असले तरी त्यातील आव्हानाचे आकर्षणच देवलाना अधिक लोभावून गेलेले असणार! या कादंबरीवरून 'शापसंभ्रम' हे नाटक देवलानी लिहिले. अुपमा-अुत्प्रेक्षानी खचाखच भरलेल्या प्रदीर्घ वर्णनातून आणि काव्यमय कथेतून देवलानी अप्रतिम अशा नाटकाची निर्मिती केली. देवलांची बाकीची नाटके मूळ नाटकांवरून रूपांतरित झाली असल्याने त्यांच्या प्रतिभेला फारसा वाव नव्हता. पण अिथे कथेवरून नाटकाची निर्मिती असल्याने, नाटकाची पदे, प्रवेश, पात्रांची भाषणे, याबाबतीत देवलाना मुक्त स्वातंत्र्य मिळाले आणि त्यामुळे निर्माण झालेले नाटक परीक्षकांच्या कसोटीला अुतरलेच पण रंगभूमीवरील यशस्वितेच्या कसोटीलाहि पुरेपूर अुतरले. 'शापसंभ्रम' ला अर्थात्‌च पहिले बक्षिस मिळाले. यात आणखी एक गंमत अशी होती. नाटकाचे हस्तलिखित पाठवताना लेखकाने आपले नाव प्रकट करावयाचे नव्हते तर खुणेचे वाक्य पाठवायचे होते. देवलानी खुणेचे वाक्य म्हणून पाठवलेली आर्या तितकीच प्रभावी आहे. ती आर्या अशी:

''असती चतुर परीक्षक, राय रसिक, जा सभेत जय मिळवी
वळवी गुणे गुणज्ञा,गुरूजनकाचीहि योग्यता कळवी.''

इंदूरच्या अधिपतीनी मुद्दाम देवलाना बोलावून घेतले.ते स्वत: संस्कृतचे जाणकार असल्याने त्याना 'शापसंभ्रम' नाटकाचे फार अप्रूप वाटले. त्यानी देवलाना पारितोषिक तर दिलेच; याखेरीज अस्मानी रंगाचा रेशमी झगा, घड्याळ, चांदीच्या मुठीची काठी व पगडी देऊन देवलाना गौरविण्यात आले.

'शापसंभ्रम' नाटकाचा प्रयोग सुरूवातीला आठ आठ तासांचा व्हायचा! आधी सात अंकांचा, मग पाच अंकांचा होत असे. १८९३ पासून असा प्रकार होत होता. अखेर देवलानी १९०८ साली बरीचशी पदे गाळून, नवीनच रंगावृत्ति तयार केली. नेहमी स्त्रीभूमिका करणारे भाऊराव कोल्हटकर या नाटकात पुरूष-भूमिकेत वावरले. पुंडरिकाची त्यांची भूमिका चांगली गाजली. याशिवाय चिंतोबा गुरव, कृष्णराव गोरे आदी नटांच्या भूमिकानी हे नाटक गाजले.

१८९३ च्या सुमारासच देवलानी अेका परकीय नाटकाच्या आधारे 'फाल्गुनराव

अथवा तसबिरीचा घोटाळा' या नावाचे एक गद्य नाटक रंगभूमीवर आणले. १८९४ मध्ये, शाहूनगरवासी नाटकमंडळीनी रंगभूमीवर आणलेल्या या नाटकात, गणपतराव जोशी अश्विनशेठची व बाळाभाऊ जोग रेवतीची भूमिका करत. पण हे नाटक फारसे चालले नाही.

१८९४ मध्ये पुण्यात वास्तव्य करून राहात असलेल्या देवलानी, हरिपूर-सांगलीतच स्थायिक व्हायचे ठरविले. १८९७च्या सुमारास विलिंग्डन कॉलेजच्या (त्यावेळी कॉलेज नव्हते) बाजूच्या माळरानावर जमीन घेऊन एक मळा करवून घेतला आणि मळ्यातच राहण्यासाठी घर बांधून घेतले. आयुष्यभर मळ्यात घर बांधून राहण्याचे त्यांचे फार दिवसांचे स्वप्न होते. पण याच दरम्यान त्यांच्या आयुष्यातील एक दुर्दैवी घटना घडली. ती म्हणजे त्यांच्या प्रेमळ पत्नी राधाबाई यांचे दुर्दैवी निधन झाले. दुर्दैवी अशा अर्थाने की बाळंतपणाच्या वेळी, एका नर्सने चुकून त्याना औषधाऐवजी कॉरबॉलिक ॲसिड दिले. लक्षात आल्यावर मिरजेच्या हॉस्पिटलमधील डॉक्टरानी, विशेषत: डॉ.वॉनलेस सारख्या निष्णात डॉक्टरानी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण ते धनुर्वात झालेल्या राधाबाईना वाचवू शकले नाहीत. (७ डिसेंबर १८९७)

प्रिय पत्नीचा मृत्यू देवलाना मोठा चटका लावून गेला. इतका की जसा त्यांचा संसार तिच्या निधनाने संपुष्टात आला. तसाच त्यांचा नाट्यलेखन संसारहि संपुष्टात आला.त्यानंतर त्यांच्या हातून फक्त एक अर्धवट लिहून तयार असलेले नाटक पुरे झाले आणि जवळजवळ वीस वर्षानंतर त्यांच्याच एका गद्य नाटकाचे संगीत नाटकात रूपांतर झाले.

आपल्या हरिपुरात राहात असताना देवल संगमेश्वराच्या देवळाबाहेर कृष्णा-वारणेच्या संगमाजवळ जो एक पिंपळाचा पार आहे त्या पाराशी बसून चिंतनमग्न होत असत. त्याच सुमारास सांगलीचे अधिपती कै. तात्यासाहेब पटवर्धन यानी आपल्या वृध्दापकाळात एका लहान वयाच्या मुलीशी विवाह केला. असे विवाह समाजात बरेचदा होत असत. पण प्रत्यक्ष राजाने, प्रजेच्या पालनकर्त्यानेच, असा विवाह करण्याने, त्या घटनेचे पडसाद उमटले. कविमनाच्या देवलांच्या कानी त्या कुमारीचा आक्रोश किंकाळ्या फोडत गेला असावा. कारण अशा चिंतनमग्नतेतूनच ती निष्पाप कुमारिका जख्ख म्हाताऱ्याशी लग्न ठरल्यावर, आपल्या जन्मदात्या आईला काय म्हणाली असेल, याचा विचार देवलांच्या मनात चमकून, त्या अुद्रेकासरशी त्यांच्या तोंडून "तू टाक चिरून ही मान! नको अनमान!" ही ओळ बाहेर पडली.!

आणि मराठीमधील एका अमर नाटकाचा जन्म झाला!

ते नाटक म्हणजे 'शारदा'. बायकोच्या मृत्यूआधीच या नाटकाचे काही प्रवेश

आणि पदे देवलानी लिहिली होती. पत्नीच्या दु:खाने व्यथित झालेल्या देवलांची लेखणी काही काळ स्तब्ध झाली. पण मनाच्या तळागाळात रूतून बसलेली शारदेची वेदना त्याना स्वस्थ बसू देईना. आणि अखेर दोन वर्षानंतर म्हणजे १८९८ साली, देवलानी 'शारदा' नाटकाचे लेखन पूर्ण केले.

देवलांच्या एकूण सात नाटकांमध्ये त्यांच्या 'शारदा' या नाटकाला अतिशय महत्त्व आहे. समीक्षकांच्या मते त्यांची सहा नाटके एका पारड्यात आणि शारदा नाटक दुसऱ्या पारड्यात टाकले तर शारदेचे पारडे जड राहील! याचे प्रमुख कारण म्हणजे देवलांचे ते संपूर्णपणे स्वतंत्र नाटक आहे. त्यांच्या स्वत:च्या संवेदनाक्षम चिंतनशीलतेतून, स्फूर्तीच्या आवेगासरशी स्फुरलेले ते नाटक आहे. त्या नाटकावर त्यांचाच संपूर्ण अधिकार आहे. अितर नाटकांच्या बाबतीत अुलट परिस्थिती आहे. ती नाटकं संस्कृत वा इंग्रजी साहित्यावर आधारित, रूपांतरित, भाषांतरित अशी नाटकं आहेत. त्यामुळे नाही म्हटले तरी त्या कलाकृतीना थोडेसे गौणत्व प्राप्त होतेच. त्याहून महत्त्वाचे म्हणजे 'शारदा' हे सामाजिक नाटक आहे. यापूर्वीच्या नाटकातून ऐतिहासिक, पौराणिक, काल्पनिक कथानके असायची. त्या तुलनेत, आपल्या नेहमीच्या पाहण्यातील, अनुभवातील माणसं नाटकात पात्ररूपाने भेटल्याने, प्रेक्षकांना अनपेक्षित सुखद आनंद मिळाला. वास्तविक 'शारदा' नाटकापूर्वी सामाजिक नाटके रंगभूमीवर अजिबात आली नव्हती असा प्रकार नव्हता. पण याच नाटकाला एवढे प्रचंड यश मिळाले की सामाजिक विषयावरील 'शारदा' हेच पहिले नाटक असं म्हणण्याचा प्रघात पडला! जरठकुमारी विवाहाचे आजमितीला महत्त्व नसले तरी १८९८-९९ च्या काळात, तो खळबळजनक वाटावा असाच विषय होता. एक श्रीमंत वृध्द गृहस्थ आपल्या श्रीमंतीच्या जोरावर, एका गरीब कन्येबरोबर विवाह लावू पाहतो आणि एक तरूण, बाणेदार तेजस्वी तरूण, हा बेत हर प्रयत्नाने हाणून पाडतो ह्या सूत्राभोवती नाटकाचे कथानक रचले आहे. या नाटकातील भुजंगनाथासारखा लंपट श्रीमंत, तोंडाने देवाचे नाव घेऊन कसाबाची करणी करणारा भद्रेश्वर, पैशाकरता पोटच्या पोरीचा गळा कापणारा कांचनभट, गरीब गायीसारखी श्रीमंताच्या दावणीला बांधली जाणारी शारदा, तिची अगतिक आई इंदिराकाकू आणि लोककल्याणाची तळमळ बाळगणारा तेजस्वी तरूण कोदंड अशी रोजच्या समाज-जीवनातील पात्रे नाटकात दिसली म्हणून त्या पात्रांशी प्रेक्षकांची एक प्रकारे भावनिक जवळीक निर्माण झाली. सरळसाधे संवाद, सुभाषितवजा वाक्ये, रोजच्या बोलण्यातील म्हणी, वाक्प्रचार आणि अनलंकृत भाषा, नाटकाच्या विषयाला अनुरूप असल्याने प्रेक्षकांच्या अंत:करणाला थेट जाऊन भिडते. 'श्रीमंत पतीची राणी,' 'जय कृष्णतटवासा,' 'मूर्तिमंत भीती उभी,' 'तू टाक चिरून ही मान' यासारखी कथेचा परिपोष करणारी

सुंदर चालींची पदे यामुळे हे नाटक अल्पावधीतच लोकांनी डोक्यावर घेतले. सांगलीचे एक प्रसिद्ध नाटककार कै.न.ग. कमतनूरकर यानी देवलांची रुपांतरित नाटके आणि एकमेव स्वतंत्र नाटक 'शारदा', यासंबधात टिप्पणी करताना गंमतीनं म्हटलयं की 'शारदा' देवलांची औरस संतती असल्याने तिलाच देवलांचे नाव सांगण्याचा हक्क आहे. बाकीची नाटके हौसेने पाळावयास आणलेल्या 'परदेशी' मुलाप्रमाणे आहेत. त्यांच्या पालकानी कितीहि हौसेने, कितीहि ममतेने त्यांचे पालनपोषण केले, तरी ती अधूनमधून आपल्या मूळ 'घराण्याची' ओझरती पाझरती ओळख दाखविल्याशिवाय रहात नाहीत.''

'शारदा' नाटकाने आर्थिक दृष्ट्या देवलाना फारच फायदा करून दिला. देवल मित्रमंडळीत म्हणत असत की 'शारदा' नाटकाने, त्याच्या नावातल्या प्रत्येक अक्षराचे तीन हजार रूपये मला दिले आहेत.'' या नाटकाने प्रयोगापोटी म्हणजे हक्कापोटी व पुस्तकांच्या आवृत्तीवर असे मिळून देवलाना पंचवीस हजार रूपये मिळवून दिले असे गणपतराव बोडस यानी लिहून ठेवले आहे. ९०-९५ वर्षापूर्वीचा काळ आणि त्याकाळची रुपयाची किंमत लक्षात घेता ही रक्कम नक्कीच अभिमानास्पद होती. देवल आपल्या नाटकांच्या हक्काबाबत कमालीची जागरूकता दाखवत. आपल्या गुणांचा आणि श्रमांचा यथायोग्य मोबदला पदरात पाडून घेताना, ते यत्किंचितहि दयामाया दाखवत नसत. मालकी हक्कांच्या संबंधात असा विशेष पायंडा पाडण्याचे श्रेय देवलाना दिले पाहिजे. आपल्या परवानगीवाचून प्रयोग केल्याबद्दल काही नाटकमंडळ्यांवर दावे लावून त्यानी कोर्टातून ते जिंकल्याचीही अुदाहरणे आहेत. ही व्यवहारदक्षता अनेकांच्या टीकेस पात्र झाली हे खरे असले, तरी बालपणी व तरूणपणाच्या सुरूवातीच्या काळात, त्यानी दारिद्र्याचे जे चटके भोगले ते पाहता त्यांचे वर्तन दोषास्पद निश्चितच वाटत नाही, शिवाय नाट्यव्यवसाय हाच त्यांचा पूर्ण वेळेचा व्यवसाय होता हे लक्षात घेतले पाहिजे.

पत्नीचे दु:खद निधन झाले तेव्हा देवल ४२ वर्षांचे होते. नामदार गोखले, हरिभाऊ आपटे यासारख्या सुधारणावादी मित्रमंडळीत त्यांची अुठबस असे. तरीपण पुनर्विवाहाचा विचार करण्याइतके त्यांचे मन तयार झाले नसावे. कदाचित 'शारदा' नाटकाच्या लेखकाला तसं करणं शोभणार नाही असेहि त्याना वाटून गेले असेल. सांगलीच्या मळ्यात निवांत रहावे, चिंतन करावे असा त्यांच्या मनाचा कल झाला असावा. सांगली गावातील वडील बंधू कृष्णाजीपंत यांजकडे ते जेवायला जात. डॉ. देव यांच्याकडे मित्रमंडळीत गप्पा मारत. पण स्वभावत:ते आत्मकेंद्रित वृत्तीचे, मानी व तापट होते. कुटुंबियात वावरताना ते फार मनमोकळेपणाने वागत नसत. हळूहळू तत्वचिंतनाकडे व परमार्थाकडे त्यांचे मन लागू लागले होते. १९१० साली त्यानी

थिऑसफीची दीक्षा घेतली होती. सांगली-हरिपुरात वास्तव्य असले तरी त्यांचा बराचसा वेळ नाटक-कंपन्यातून नाटके बसवून देण्यात जाई. मात्र ते फक्त स्वत:ची व आपले गुरू अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नाटकांखेरीज अन्य कोणाची नाटके बसवून देत नसत. सांगलीत १९०१ मध्ये रामभाऊ गोखले, कानिटकर, गोरे वगैरे मंडळींनी जी 'सामाजिक नाटक मंडळी' काढली होती, त्यांची नाटके देवल बसवून देत असत. भाऊराव कोल्हटकर असेपर्यंत किर्लोस्कर नाटकमंडळीत त्याना मोठा मान होता. मात्र १९०१ साली भाऊरावांच्या मृत्यूनंतर शंकरराव मुजुमदार यांजकडे नाटकमंडळींचे सर्वाधिकार आल्यावर, त्यांच्याशी देवलांचे खटके अुडू लागले. आपला पूर्वीसारखा मुलाहिजा ठेवला जात नाही हे पाहून "आपण किर्लोस्कर कंपनीत पुन्हा पाऊल टाकणार नाही" अशी प्रतिज्ञा करूनच ते बाहेर पडले.

पुढे किर्लोस्कर नाटकमंडळीमधून बालगंधर्व, गणपतराव बोडस, गोविंदराव टेंबे आदी मंडळी बाहेर पडली आणि त्यांनी १९१३ च्या सुमारास 'गंधर्व नाटक मंडळींची' स्थापना केली. त्या सर्वांना देवलांची नाट्यक्षेत्रातील योग्यता माहीत असल्याने त्यानी देवलाना नाट्यगुरू म्हणून आपल्या कंपनीत मानाने नेले. अर्थात तिथेही 'मानापमानाचा' प्रश्न होताच. कारण गंधर्व नाटकमंडळीत बालगंधर्वांचे लाडके नाटककार आणि देवलांचे गाववाले, नाट्याचार्य खाडिलकर आधीच सुप्रतिष्ठित होते. खाडिलकरांचे थोरले बंधू त्याना पित्यासमान होते. आणि अशा पितृतुल्य-बंधूंचे देवल मित्र आहेत आणि ज्येष्ठ नाटककार आहेत अशा आदराच्या भावनेतून खाडिलकर देवलांशी अदबीने वागत. बैठकीत बसले तरी स्वत:कडे कनिष्ठपणा घेऊन जरा दूर बसत. त्यामुळे या दोघा सांगलीकर नाटककारांत कधी बेबनाव झाला नाही. देवल फक्त स्वत:ची व अण्णासाहेब किर्लोस्कर यांची नाटके बसवत तर खाडिलकर आपल्या नाटकांच्या तालमी स्वत: घेत.

गंधर्व नाटकमंडळी १९१६ च्या आरंभी बडोद्याच्या मुक्कामात असताना तेथील अधिपती सयाजीराव गायकवाड यानी, एखादी विनोदप्रचुर कॉमेडी रंगभूमीवर आणावी असे सुचवले. त्यावेळी देवल कंपनीत होते. त्यांना नवीन नाटक लिहिण्यासंबंधात विचारण्यात आले. देवलांची प्रकृती ठीक नसल्याने आणि त्यातच त्यांचा मधुमेह त्रास देत असल्याने, नवीन नाटक लिहणे शक्य नव्हते. मग गणपतराव बोडस यानी देवलांच्याच जुन्या 'फाल्गुनराव' नाटकाला संगीताची जोड देऊन ते रंगभूमीवर आणावे असे देवलाना सुचवले. ती कल्पना देवलाना आवडली. लागलीच ते सांगलीला आले. आणि यातून जन्माला आले ते सदाबहार नाटक 'संशयकल्लोळ'.

मराठी रंगभूमीवरील रूपांतरित नाटकांची छाननी केली तर 'संशयकल्लोळ' नाटक, त्या सर्व नाटकांचा मुकुटमणी शोभेल. देवलानी स्वत: एका विलायती

नाटकावरून म्हटलेले 'संशयकल्लोळ', ऑर्थर मर्फीच्या ( All in the Wrong ) आणि फ्रेंच नाटककार मोलिअरच्या 'गानारेल' या नाटकांशी जवळीक साधणारे आहे. एका प्रियकराने प्रेयसीला दिलेली तसबीर परपुरूषाकडे सापडून त्या प्रियकराने आणि ज्या परपुरुषाला सापडते त्याच्या बायकोने संशयग्रस्त होऊन घातलेले थैमान, ही या नाटकाची मध्यवर्ती कल्पना. पुरूष पात्राना फाल्गुनराव, अश्विनशेठ, वैशाखशेठ अशी मराठी महिन्यांची नावे आणि स्त्री पात्राना कृत्तिका, रेवती, रोहिणी अशी नक्षत्रांची नावे देवलानी बहाल केली आहेत. कृत्तिकेच्या तोंडी "घाईत घाई आणि विंचू डसला ग बाई," "नवी नवलाची आणि वापरली की कवडीमोलाची" अशासारख्या रोजच्या बोलण्यातील अस्सल मराठमोळी म्हणी वापरल्यामुळे हे नाटक रूपांतरित आहे, असे चुकूनही वाटत नाही. भिक्षा मागणारा रामदासी, मोरावळा, गालावरचा तीळ, शालू, दागिने अशा अुल्लेखांमुळे नाटकात परकीय अंश औषधांपुरताही शिल्लक राहात नाही! सात्विक करमणूक करणारे आणि अकारण संशयाचे दुष्परिणाम दाखविणारे 'संशयकल्लोळ' हे एक बहारदार नाटक आहे. देवलांच्या काव्यातील प्रासादिकपणा जसा 'शारदे' तील पदांत अुतरला आहे तसाच या नाटकातील पदांमध्ये अुतरला आहे. *'सुकांत चंद्रानना,' 'कर हा करी धरिला शुभांगी,' 'संशय का मनि आला'* अशासारखी साधी, सुंदर पदे आणि त्यांच्या अप्रतिम, सोप्या वळणाच्या सतत गुणगुणाव्या वाटणाऱ्या चालीमुळे 'संशयकल्लोळ' च्या व्यावसायिक यशाची बाजू अधिकच बळकट झाली. बालगंधर्वानी आपल्या अभिनयाने आणि स्वर्गीय गाण्याने अजरामर केलेली 'रेवती' आणि गणपतराव बोडस यांचा 'फाल्गुनराव' यामुळे या नाटकाला दिगंत कीर्ती लाभली. नवरा-बायकोमधील संशय हा कालातीत विषय असल्याने हे नाटक सदाबहार राहिले आहे. काळाच्या ओघात देवलांची बाकी नाटके विसरून गेली तरी या नाटकाचा टवटवीतपणा कधीच कमी होणार नाही.

पण काय दैवदुर्विलास पाहा? जे 'संशयकल्लोळ' नाटक, रसिकानी दहा दहा, वीस वीस वेळा बघितलं, ते नाटक रंगभूमीवर आलेलं देवलाना काही बघायला मिळालं नाही. मधुमेह त्यांच्या शरीरात घर करून त्याना पोखरत होताच. बुटाला खडा लागल्याचे निमित्त होऊन त्यांच्या डाव्या पायाला जखम झाली. ती काही केल्या भरून येईना. साखरेचे प्रमाण बेसुमार वाढलं होतं. मिशन हॉस्पिटलच्या प्रख्यात डॉ.वानलेसनी शर्थ केली. पण काही उपयोग झाला नाही.

१३-१४ जून १९१६ च्या मध्यरात्री त्यांच्यावर मृत्यूने झडप घातली. त्यांच्या जीवननाट्यावर नियतीने अखेरचा पडदा टाकला!

आणि चारच महिन्यानंतर, रंगभूमीवर, २०ऑक्टोबर १९१६ रोजी 'संशयकल्लोळ' चा पडदा अुघडला!

●●●

## प्रखर देशभक्त नाट्याचार्य

# कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

सांगलीला 'नाट्यपंढरी' म्हणून ज्यांच्यामुळे गौरविले जाते ते कै. विष्णुदास भावे सांगलीचे. त्यानी लावलेले नाटकाचे रोपटे जोपासून त्याची वाढ केली ते कै. देवल सांगलीचे. आणि पाठोपाठ ही 'हॅटट्रिक' पुरी करणारे कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर पण सांगलीचेच. ह्या विलक्षण योगायोगाचे नाट्यप्रेमी सांगलीकरास केवढे अप्रूप वाटावे? कसल्या का आवाजात असेना, पण खाडिलकरांचे नाट्यपद गुणगुणणारा असा नाट्यवेडा सांगलीकर घराघरात आढळेल.

अशा या खाडिलकरांचा जन्म २३ नोव्हेंबर १८७२ रोजी सांगलीत झाला. दुर्दैवाने त्यांच्या वडिलांचा, प्रभाकरपंतांचा मृत्यू कृष्णाजीपंतांच्या जन्माच्या आधीच चार महिने झाला होता. बापाच्या मुळावर आलेला मुलगा म्हणून सर्वांनी राग धरला, पण प्रत्यक्ष जन्मदात्या आईने तर एवढा दुस्वास केला की त्या तान्ह्या मुलाला अंगावर पाजायला पण ती तयार नव्हती! शेजारच्या पटवर्धनांच्या बिऱ्हाडातील मनुकाकू नावाच्या बाई नुकत्याच बाळंत झाल्या होत्या. त्यानी दया येऊन कृष्णाजीपंताना आपल्या नवजात मुलाचा भाऊ समजून अंगावर पाजले व त्याचे संगोपन केले. अर्थात् जन्मदात्या आईचा राग किती काळ टिकणार? पतिवियोगाने दुःखी झाल्यापोटीचा राग कालांतराने मावळून तिने आपल्या मुलाला मांडीवर घेतला. एकंदरीत महाभारतकालीन कृष्णाप्रमाणेच या कृष्णाच्या नशीबी पण "देवकीने वाहिला! यशोदेने पाळिला" असा प्रकार होताच!

कृष्णाजीपंतांचं प्राथमिक शिक्षण सांगलीच्या विष्णुघाटावरील दादा छापखाने यांच्या शाळेत झालं. या शाळेमुळे त्यांचं हस्ताक्षर चांगलं झालं. वर्गात अभ्यासात हुषार असले तरी अंगात हूडपणा फार. नदीकडेच्या वाळवंटात खेळणं, तासन् तास नदीत डुंबणं यात बराच वेळ जाई. इंग्रजी शाळेत गेल्यावर तेथील बापू सरदेसाई नावाच्या शिक्षकाची त्यांच्यावर फार छाप पडली. त्यांच्या अफाट वाचनाचा व वक्तृत्वाचा परिणाम म्हणून कृष्णाजीपंताना त्या दोन्ही गोष्टींची आवड लागली. भावी आयुष्यात लेखक व वक्ता म्हणून त्याना जी दिगंत कीर्ती लाभली तिची पायाभरणी

या सरदेसाईंमुळे झाली हे ऋण खाडिलकरानी फार मानलं.

नाटकं पहाण्याचा नाद सांगलीकराला जणू अुपजतच असतो. कृष्णाजीपंतांच्या बालपणीच त्याना हा नाद एवढा लागला की विद्यार्थीदशेतच त्यानी एक छोटं नाटक लिहून बघितलं! १८८९ साली ते मॅट्रिकची परिक्षा अुत्तम तऱ्हेने पास झाले. थोरले बंधू हरितात्यांची आपल्या धाकट्या भावावर पुत्रवत् माया होती, त्यांच्या हुशारीचे त्याना कौतुक होते, म्हणून त्यानी फारशी सुस्थिती नसतानाही कृष्णाजीला कॉलेजशिक्षणासाठी पुण्याला पाठवले. बरोबर काही सांगलीचे मित्र होतेच. या सर्वांचे आश्रयस्थान म्हणजे सांगलीकरांचा पुण्यातील वाडा. सर्व मित्र तिथे एकत्र रहात. पुण्याच्या अुच्च वातावरणात कृष्णाजीपंतांची खरीखुरी मानसिक जडणघडण झाली. तो काळ चिपळूणकर-आगरकर व टिळक यांच्या कर्तृत्वाचा होता. त्यांच्यामुळे पुण्यात एक वेगळेच असे चैतन्याचे वारे वहात होते. देशभक्तीची प्रखर भावना प्रत्येकाच्या मनात जागृत झाली होती. फर्गसनमध्ये एक वर्ष काढल्यावर कृष्णाजीपंतानी डेक्कन कॉलेजमधे नाव घातले; कारण त्यांच्या आवडीच्या तत्त्वज्ञान विषयाचे नामांकित प्रोफेसर सेल्बी तेथे होते म्हणून. अभ्यास करतानाच दुसरीकडे त्यांच्या नाट्यविषयक आवडीस खतपाणी घातलं जात होतंच. 'हॅम्लेट' नाटकाचे प्रयोग बघून त्याना शेक्सपीयरचे आकर्षण याच काळात निर्माण झाले.

बी.ए. झाल्यावर ते सांगलीला आले. सांगली हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरीला लागले. घरसंसाराचा गाडा ओढायला मदत व्हावी हा हेतू होताच. दोन वर्षे शिक्षकाचे काम त्यानी आस्थेवाईकपणे केले. याच काळात त्यांनी त्यांचे पहिले नाटक (अगदी बालपणीचे लुटुपुटूचे सोडून) 'सवाई माधवरावाचा मृत्यू' हे लिहून काढले. पुण्यातील वास्तव्यात शेक्सपीयरच्या आकर्षणापोटी ''हॅम्लेट आणि ऑथेल्लो'' बघितल्यापासूनच त्या दोन्ही नाटकानी ते फार प्रभावित झाले होते. पेशवाईतील विचारी पण विकारी अशा सवाई माधवरावांवर हॅम्लेटचा आणि मंत्रतंत्राच्या कामात वाकबगार अशा केशवशास्त्री या पात्रावर ऑथेल्लोमधील आयागोचा बेमालूम पोशाख चढवून त्यानी मराठी साहित्यातील एका अजरामर नाटकाला जन्म दिला. नाट्यक्षेत्रातील त्यांची पहिलीच अुडी, पराक्रमी हनुमंताच्या जन्मत:च घेतलेल्या अुडीसारखी देदीप्यमान् ठरली!

सांगलीतील त्यांचा जीवनक्रम तसा मजेत चालला होता. जुन्या काळाप्रमाणे लग्न होऊन सौ. गौरबाईंना पहिले अपत्य झाले होते. सांगली नगरवाचनालयात चांगली पुस्तके मिळत. शिक्षकी पेशा चांगला चालला होता. मित्रमंडळ होतेच.

तरीपण कृष्णाजीपंतासारख्या गरूडवृत्तीच्या तरुणास या परिस्थितीत समाधान

नव्हते. कृष्णेच्या पाण्यात पोहणारा जीव अथांग समुद्रातील अुंच अुंच लाटांवर आरूढ व्हायला बघत होता.

निबंधकार चिपळूणकर, पुण्यात जवळून पाहिलेले टिळक, यांच्या व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने, स्वातंत्र्य-संपादनाच्या खडतर राजकारणात स्वत:ला झोकून द्यावे, अशी अनिवार ऊर्मी त्याना गप्प बसू देईना. बाह्यात्कारी, कुटुंबाची आर्थिक दुरवस्था दूर करण्याच्या हेतूने, वकिलीचे शिक्षण घ्यावे म्हणून त्यानी एल.एल.बी. करण्यासाठी सांगली सोडली व ते मुंबईला आले.

एकीकडे अभ्यास चालू होता पण मनातील खळबळ कशी काय शांत करावी हे त्याना समजेना.

अशा चिंतेत असताना अचानक त्याना हवा तो रस्ता मिळाला. त्याची मौज अशी झाली.

''ब्राह्मण आणि त्याची विद्या'' या नावाचा एक ग्रंथ नुकताच प्राचार्य गोळे यानी लिहिला होता. त्याचे परीक्षण करणारा लेख कृष्णाजीपंतानी ''विविधज्ञानविस्तार'' या मासिकात लिहिला. या लेखात त्यांच्या स्वत:च्या उत्कट देशभक्तीच्या विचारांचे, मानसिक आंदोलनांचे जणु प्रतिबिंबच पडले होते. या लेखाकडे अनेक विचारवंतांचे लक्ष गेले, तसे लो. टिळकांचे पण गेले. या लेखातल्यासारखे बाणेदार राष्ट्रीय विचाराचे स्वाभिमानी तरूण ''केसरीला'' मिळतील तर बरे होईल असे उद्गार त्यानी नारायणराव कानिटकरांकडे काढले. हे गृहस्थही नाटके लिहणारे होते. त्यामुळे त्यांची व खाडिलकरांची ओळख होती. मग ते खाडिलकरांना घेऊन टिळकांकडे गेले. प्रथम भेटीतच टिळकानी त्याना ''केसरी'' साठी लेख लिहायला सांगितला. विषय सुचवला, ''राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता.'' तो दिवस रविवारचा होता. सर्व माहिती गोळा करून अुत्साहाने खाडिलकरानी लेख लिहिला.. मित्राना दाखवून, जरूर त्या सुधारणा करून, टिळकांकडे दिला. मनात धाकधुक होती. टिळकाना लेख आवडेल का? का नापसंत म्हणून परत करतील?

त्याकाळी ''केसरी'' मंगळवारी प्रसिध्द होत असे.

सोमवारचा दिवस बेचैनीत गेला.

मंगळवारी पाहतात तो काय! त्यांचा लेख प्रसिध्द झाला होता. नुसता लेख म्हणून नव्हे तर चक्क अग्रलेख म्हणून छापला होता!

सगळं कसं स्वप्नवत् घडलं होतं. अनिश्चिततेच्या भोवऱ्यात डगमगताना त्यातून मार्ग सापडावा म्हणून जी नाव ते शोधत होते ती नावच अचानक त्यांच्या हाती आली होती!

हा कृष्णाजीपंतांच्या, नव्हे तर काकासाहेबांच्या, आयुष्याला दिशा देणारा मोठा टप्पा होता. (आता त्याना काकासाहेब म्हटले जात असे.)

काकासाहेबाना आता त्यांच्या आवडीचे क्षेत्र मिळाले होते. लोकजागृती करण्यासाठी म्यानाबाहेर पडायला अुत्सुक असणाऱ्या तलवारीला रणभूमी मिळाली होती. ब्रिटीश सरकारवर टीकेची झोड अुठवणे, लोकाना निर्भयतेची शिकवण देणे, नव्या नव्या राजकीय, सामाजिक, औद्योगिक प्रश्नांवर जागृती करणे, या कामात त्यांच्या धारदार लेखनशैलीची आणि संपादनकौशल्याची कसोटी लागली. त्याच सुमारास सर्वत्र दुष्काळ पडला. सोलापूर-विजापूर भागातील स्वरूप तर फारच भयंकर होते. 'केसरी' त माहितीपर लेख लिहिण्याच्या दृष्टिकोनातून काकासाहेब त्या भागात दौऱ्यावर गेले. ते काम चालू असताना मनातील नाटककार सजग होताच. विजापूरचा उध्वस्त किल्ला बघितला तेव्हा मनात जी काही स्पंदने झाली, त्यातून त्यांच्या "कांचनगडची मोहना" या नाटकाची निर्मिती झाली. प्लेगच्या साथीच्या वेळी ते सांगलीला राहायला आले, तेव्हा त्यानी नाटकाचे प्रत्यक्ष लिखाण केले. पुढे हे नाटक प्रसिध्द झाले आणि २४ डिसेंबर १८९८ रोजी त्याचा पहिला प्रयोग पुण्यात झाला.

१८९७ च्या वर्षात पुण्यात प्लेगची साथ आली. पण ती परवडली असं म्हणण्याची वेळ लोकांवर आली. कारण प्लेगचा रोगी शोधण्याच्या निमित्ताने गोऱ्या इंग्रज सोजिरानी लोकांची जी ससेहोलपट केली, जुलूमजबरदस्ती केली, त्यामुळे सामान्य लोकांचे जिणे मुष्किल झाले. 'केसरी' ने जुलुमी अधिकाऱ्यांवर आणि सरकारवर टीकेची झोड उठविली. लोकांचा क्षोभ वाढत गेला, त्याचे पर्यवसान पुण्यातील जुलुमी अधिकारी रँडच्या खुनात झाले. हा सारा प्रक्षोभ केसरीतील लिखाणाने झाला, अशी सरकारची भावना झाली. त्यामुळे या ना त्या कारणाने सरकार टिळकाना अडकवण्यासाठी संधी शोधत होते. ती त्याना केसरीतील लेखावरून मिळाली. गंमत म्हणजे ज्या लेखावरून टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला गेला तो मुळात त्यांच्या हातचा नव्हता तर तो लेख काकासाहेबानी लिहिला होता. मात्र संपादक म्हणून त्याची संपूर्ण जबाबदारी टिळकानी स्वीकारली. आपल्यामुळे टिळकांवर तुरुंगवासाची पाळी आली याचं काकासाहेबाना किती दु:ख झालं असेल! टिळक मात्र तो खेळाचाच एक भाग असे समजून चालले. हा त्यांचा केवढा मोठेपणा!

लो. टिळकाना १४ सप्टेंबर १८९७ रोजी १८ महिन्याची शिक्षा झाली. या काळात 'केसरी' ची संपूर्ण जबाबदारी काकासाहेबांकडे होती. टिळकांची 'केसरी' मधील ठाम भूमिका तशीच पुढे चालू ठेवायची पण निमित्त शोधत असणाऱ्या सरकारचे गंडांतर तर येऊ द्यायचे नाही, अशी दुहेरी कसरत या काळात काकासाहेबाना

करावी लागली. ही करामत त्यानी एवढ्या कौशल्याने केली, की प्रो. मॅक्समुल्लर प्रभृती विद्वानांच्या प्रयत्नाने, सहा महिने आधीच तुरुंगातून सुटका झालेल्या टिळकानी, काकासाहेबांची मनापासून पाठ थोपटली. इतकेच काय, पण ६ सप्टेंबर १८९८ रोजी मुक्तता झाल्यावरसुद्धा, ४ जुलै १८९९ रोजी केसरीचे संपादकपद घेऊन 'पुनश्च हरिः ओम' करेपर्यंतच्या दहा महिन्यांच्या काळात, निर्धास्तपणे केसरीची सूत्रे काकासाहेबांकडेच टिळकानी राहू दिली. इतका त्यानी लोकमान्यांचा विश्वास संपादन केला होता. खुद्द टिळकानी आपल्या अग्रलेखात म्हटलंय की ''सांधा जेव्हा बेमालूम जडेल, किंबहुना सांधा केला आहे की नाही याचीच पाहणाऱ्याला भ्रांत पडेल, तेव्हाच सांधा लावणाऱ्याचे कसब दृष्टीस येते. अशा प्रकारचा बेमालूम सांधा खाडिलकरांनी जडविला होता, हे केसरीच्या वाचकाना कळून आलेच आहे.''

किती लाखमोलाची शाबासकी!

साहित्यसम्राट न. चिं.केळकर आणि नाट्याचार्य खाडिलकर म्हणजे लो.टिळकांचे डावे-उजवे हात. (दोन्हा 'नाटक्ये' निघाले हे त्यांच्याविषयीचे टिळकांचे गमतीचे मत). केळकर आणि खाडिलकर यांची तुलना अप्रस्तुत असली, तरी खाडिलकरांनी टिळकांच्या लिखाणाची धाटणी एवढी आत्मसात केली होती की दोघांचे अग्रलेख वेगवेगळे ओळखणे कठीण व्हावे. टिळकांचे विचार व भिन्नभिन्न विषयांवरील मते काकासाहेबानी एवढी अभ्यासली होती, की अेखाद्या विषयावर टिळकाना कशा प्रकारचा लेख अपेक्षित आहे, याचे आपसूक ज्ञान काकासाहेबाना असे. प्रतिपक्षावर जोरदार आघात करताना, हातचे काही राखायचे नाही, त्याला पुरा लोळवायचा, अशी त्यांची वृत्ती असे. (न.चिं. केळकर यालाच अगदी ' शेणखतात लोळवणे ' असे म्हणत.)

लो. टिळकानी संपादनाची धुरा घेतल्यावर, काकासाहेबानी काही काळ सांगलीत विश्रांती घेतली आणि लोकमान्यांच्या सल्ल्यानुसार एल.एल. बी. पूर्ण करण्यासाठी ते मुंबईला गेले. (कायद्याचं ज्ञान संपादकाला आवश्यक आहे असं टिळकाना वाटे.) त्याच सुमारास द.आफ्रिकेतील बोअर-युध्द सुरू झाले. मूठभर बोअर लोकानी शस्त्रसज्ज इंग्रज फौजेशी जो यशस्वी सामना केला, त्याने प्रभावित होऊन काकासाहेबानी 'गनिमी काव्याचे युद्ध' ही रम्य युद्धकथा-लेखमाला केसरीत लिहिली. अर्थात् त्यामुळे एल.एल.बी ची पुस्तके बाजूलाच पडली!

याच कालावधीच्या सुमारास, टिळकांच्या मनात सशस्त्र क्रांतीसंबंधात काही विचार घोळत असावेत. (क्रांतिवीर वासुदेव बळवंताच्या गुप्त बैठकांना तरुणपणी ते जात होतेच) क्रांतिकारकांच्या वैयक्तिक प्रयत्नांना सहानुभूती असली, तरी केसरीमधून त्यांचे समर्थन कधी होत नसे. अशा एकट्या-दुकट्याच्या प्रयत्नानी परिणाम साधला

जाणार नाही, याची त्याना जाणीव होती. मात्र सशस्त्र क्रांतीची शक्यता कितपत आहे, याची चाचपणी ते नक्कीच करत होते. आणि या मंथनातूनच खाडिलकरांचे नेपाळ प्रकरण उद्भवले.

नेपाळमध्ये जर्मनीतील शस्त्रास्त्रे बनवणाऱ्या 'क्रप्स' नावाच्या कारखानदाराचे साहाय्य घेऊन, रायफलींचा कारखाना काढावयाचा आणि त्यायोगे सैन्याची अुभारणी करुन, सशस्त्र अुठाव करायचा, असं या गुप्त योजनचं स्वरूप होतं.

आता अशा कामगिरीसाठी अत्यंत विश्वासू माणसाची योजना करणे आवश्यक होते, हे तर उघडच आहे. काकासाहेब खाडिलकरांसारखा दुसरा माणूस कोण मिळणार? आता काकासाहेबाना गुप्तपणे पाठवायचे म्हणजे कुठले तरी सोंग वठवायला हवे. त्यानी कोणते सोंग वठवावे? चक्क मंगलोरी कौले बनविणाऱ्या कारखानदाराचे. 'कृष्णराव' हे नाव धारण करून नेपाळमध्ये त्यानी वास्तव्य केले. आयुष्यात ज्यानी मातीची खेळणी बनविण्यासाठीसुद्धा चिखलात हात माखून घेतले नसतील, अशा काकासाहेबानी कौले बनविणाऱ्या शास्त्राची कष्टपूर्वक माहिती करून घेतली, नव्हे चक्क कौले बनविली! देशाच्या स्वातंत्र्यासाठी, आपल्या नेत्याच्या आदेशानुसार, काहीही करण्याची तयारी असणारी, अशी प्रखर देशभक्त माणसं बघितली, की आजच्या परिस्थितीत शरमेने मान खाली घातली जाते! त्यापुढची कमाल म्हणजे बंदुकीचा कारखाना उभारण्यात या ना त्या कारणाने विलंब होऊ लागला, कौलाचे काम संपले होते. नेपाळात वास्तव्य कायम ठेवण्याच्या दृष्टीने कोणता तरी उद्योग करणे आवश्यक होते, तेव्हा या काकासाहेबानी काडीपेटी तयार करणेचा कारखाना अुभारण्याची तयारी सुरू केली! त्यातला 'गंध' सुध्दा माहीत नसताना! दुर्दैवाने नेपाळात लपत-छपत राहून, सर्व प्रकारची संकटे सोसून (भाषा, हवामान, अन्न सर्व भिन्न!) बंदुकीचा कारखाना अुभारण्याची शक्यता दिसेना, स्वकियांच्या फंदफितुरीने या गुप्त बेताचा सुगावा ब्रिटीशाना लागला आहे याची शंका येताच 'कृष्णरावानी' आपला नेपाळातील गाशा गुंडाळला! ब्रिटीश सत्तेने जंगजंग पछाडले तरी नेपाळमधील 'जंग' मंडळीनी थांगपत्ता लागू दिला नाही, म्हणून काकासाहेबांचे निभावले. एरवी फासावर मान लटकणे अशक्य नव्हते. दुर्दैवाने या प्रकारात १९०१ ते १९०४ अशी अुमेदीतील तीन वर्षे खर्ची पडली.

नेपाळ प्रकरणाच्या अयशस्वी समाप्तीनंतर, काकासाहेब विश्रांतीसाठी सांगलीत येऊन राहिले. नेपाळच्या हवेत त्याना मलेरियाचा खूप त्रास झाला. पाच-सहा महिन्यांच्या सांगलीतील विश्रांतीनंतर, त्यानी पुण्यातच बिऱ्हाड मांडायचे ठरविले.. त्यानुसार आई, पत्नी आणि दोन मुलीना घेऊन ते पुण्यात आले. १९०५ पासून पुन्हा

अुत्साहाने केसरीच्या कामास लागले. पण आता फक्त केसरीचे लेखन एवढंच काम नव्हतं. आता त्याना लेखणीबरोबर वाणीपण देशकार्याला जुंपायची होती. कारण लोकमान्य टिळक आता केवळ महाराष्ट्राचे पुढारी नव्हते तर अवघ्या हिंदुस्थानचे पुढारीपण त्यांच्याकडे चालत आले होते. गव्हर्नरजनरल लॉर्ड कर्झनच्या जुलुमी, घमेंडखोर राजवटीमुळे, त्याने केलेल्या बंगालच्या फाळणीमुळे, वंगभंग चळवळ जोरात पेटली होती. फाळणीमुळे बंगाल चेतला, त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात लो. टिळकानी केसरीतील लिखाणातून, देशभर दौरे काढून, व्याख्यानाद्वारा पुरा हिंदुस्थान पेटवून दिला. 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून ब्रिटीश सरकार त्यांच्याकडे दात ओठ खाऊन बघत होते. लोकमान्यांचे बिनीचे वीर या नात्याने 'केसरीतून' काकासाहेबानी जळजळीत लेखांची सरबत्ती केली. अनेक परिषदा, सभा, मेळावे, यातून अत्यंत प्रक्षोभक भाषणे करून, त्यानी सर्वत्र एकच दंगल अुडवून दिली...................

आणि त्यातूनच पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती झाली!

केसरीतील प्रक्षोभक लेखांनी सरकार हवालदिल झाले. पुन्हा टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला गेला आणि १९०८ मध्ये त्याना मंडाले येथे सहा वर्षांच्या शिक्षेवर पाठवले गेले. काकासाहेबांच्या मनाला आत्यंतिक क्लेश देणारी बाब म्हणजे, ज्या लेखामुळे लोकमान्यांना शिक्षा झाली, तो पुन्हा एकदा त्यांच्याच स्वत:च्या (काकासाहेबांच्या) हातचा होता! त्यामुळे काकासाहेबाना किती यातना झाल्या असतील, ते त्यांचे त्यानाच माहीत! पण धीरोदात्त टिळकांच्या तोंडून त्यासंबंधी ब्र निघाला नाही!

अेकीकडे कर्झनशाहीच्या विरोधात काकासाहेबांचे लिखाण चालू होतेच, पण त्यांच्या मनातील नाटककार अस्वस्थ होता. कर्झनविषयीची चीड लोकांच्या मनात निर्माण करायची, तर नाटकाच्या मनोरंजक माध्यमाची आवश्यकता होती. या विचारमंथनातूनच 'कीचकवध' या मराठी रंगभूमीवरील अजरामर नाटकाचा जन्म झाला. महाभारतातील मदांध, अुर्मट, मस्तवाल कीचकाच्या माध्यमातून, त्यानी कर्झन यथार्थपणे अुभा केला. गांजलेली द्रौपदी (सैरंध्री) म्हणजे विवश भारतमाता अणि कीचकाच्या छातीवर बसून वज्रप्रहार करणारा भीम म्हणजे साक्षात् लोकमान्य, ही प्रमुख साम्यस्थळे लोकाना एवढी भावली, इतकी पटली, की ते नाटक महाराष्ट्रातील लोकानी अक्षरश: डोक्यावर घेतले. १९०७ ते १९१० पर्यंत हजारो लोकानी नाटकाचे प्रयोग बघितले. जनप्रक्षोभ वाढू लागला. काकासाहेबाना अभिप्रेत असलेली पारतंत्र्याची चीड लोकांमध्ये प्रकर्षाने वाढू लागली........

या साऱ्याचा परिणाम अटळ होता. ब्रिटीश सरकारने १९१० सालच्या फेब्रुवारीत

या नाटकावर बंदी घातली!

नाट्यक्षेत्रात काकासाहेबांची कीर्ती अशी दुमदुमत असताना, लोकमान्य तुरूंगावासात गेल्यावर, केसरीच्या कामात मात्र कटकटी सुरू झाल्या. आजवर खाडिलकर आणि केळकर, लोकमान्यांचे डावे-उजवे हात म्हणून वावरत होते. दोन्ही माणसे मातब्बर. लोकमान्यांसारखे लोकोत्तर नेतेच त्या दोघांना अेकत्रपणे सांभाळू शकत होते. पण तेच तुरूंगवासात अडकल्यावर, जुने मतभेद उफाळून आले. वास्तविक केसरीत खाडिलकरानी लिहावे आणि मराठ्याचं काम केळकरानी पहावं, अशी व्यवस्था झाली असताना, कोणतीहि पूर्वसूचना न देता दोन्ही पत्रांचं (डिक्लरेशन) प्रगटन केळकरानी आपल्या एकट्याच्या नावे करून टाकले!

शेवटची काडी पडली. आपल्या स्वाभिमानाचा अनादर होत आहे, असे वाटून, खाडिलकरानी मुकाटपणे 'केसरी' सोडला.

ही घटना दुर्दैवी खरीच, पण दुहीचा शाप असलेल्या महाराष्ट्राला नवीन नक्कीच नव्हती.

अर्थात् 'केसरी' सुटला तरी जनजागृतीचे काम करणारे दुसरे माध्यम काकासाहेबांच्या हातात होतेच.

कीचकवधानंतर लिहिलेल्या 'भाऊबंदकी' नाटकाने (१९०९) त्याना चांगलाच हात दिला होता. त्या नाटकाने पण प्रचंड लोकप्रियता मिळविली. नाटक हे अुपजीविकेचे साधन होऊ शकते याचा त्याना नव्यानेच स्वतः पुरता शोध लागला.

यातूनच अुभ्या महाराष्ट्राला वेडं लावणारं, गुंगवून टाकणारं द्वैत जन्माला आलं. ते म्हणजे बालगंधर्व-काकासाहेबांचा संयोग.

बालगंधर्वांच्या स्वर्गीय गाण्याने काकासाहेबाना संगीत नाटके लिहिण्याची प्रेरणा मिळाली. वास्तविक आजवरची त्यांची नाटके गद्य होती. पण आता गंधर्वासाठी संगीत नाटके लिहायची, म्हणून त्यानी गाण्याचा अभ्यास सुरू केला. अनेक गवयांच्या नामवंत चिजा ऐकल्या. आणि यातून जन्माला आले ते रंगभूमीवरील सदाबहार नाटक 'मानापमान'. दि. १२ मार्च १९११ रोजी त्याचा पहिला प्रयोग किर्लोस्कर संगीत मंडळीने मुंबईत केला. नानासाहेब जोगळेकरांचा 'धैर्यधर, गणपतराव बोडस यांचा 'लक्ष्मीधर' आणि खुद्द बालगंधर्वांची 'भामिनी'. सुंदर सुंदर नाट्यपदांनी नटलेले हे नाटक अशा काही चढत्या श्रेणीने रंगत गेले की पहिल्या प्रयोगापासूनच प्रेक्षकानी या नाटकाला डोक्यावर घेतले.

या नाटकाच्या यशाने काकासाहेबाना मोठाच हात दिला.

त्यापाठोपाठ १९१३ साली त्यांचे 'विद्याहरण' रंगभूमीवर आले. त्याचेही प्रयोग धुमधडाक्यात सुरू झाले.

'केसरी' तून सुटका ही एकप्रकारे अिष्टापत्तीच ठरली!

यानंतरच्या काळात नाटककार म्हणून ते प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईतच झाले. नाटकांचे 'हाऊसफुल्ल' प्रयोग धुमधडाक्याने चालू लागले. आर्थिक सुबत्तेमुळे त्यांच्या पत्नीला, गौरबाईना, आता सढळ हाताने खर्च करता येऊ लागला. १९०६ साली 'यशवंत' अुर्फ आप्पा (पुढील काळातील 'नवाकाळ' चे संपादक) आणि १९०८ साली 'विनायक' या मुलांचा जन्म झाला. पुढे १९१५ मध्ये दोन्ही मुलांच्या थाटात मुंजी झाल्या. हा काळ म्हणजे त्यांच्या आयुष्यातील सर्वात सुखाचा कालखंड म्हणता येईल.

अशी सुखाने मार्गक्रमणा चालू असताना, अचानक एक दिवस, आनंदाची बातमी आली. लोकमान्यांची सुटका झाली. १९१४ मध्ये ते गायकवाडवाड्यात आल्याचे कळल्यावर, दोन्ही मुलाना घेऊन, काकासाहेब त्याना भेटायला गेले. मंडालेसारख्या विजनवासातील तुरूंगवास भोगून परतलेल्या आपल्या गुरूचे दर्शन घेताना त्यांचे आनंदाश्रू थांबत नव्हते.

मग त्या दोघांमध्ये काय संवाद झाला माहीत नाही, पण दुसऱ्याच दिवसापासून काकासाहेब 'केसरी' मध्ये रूजू झाले. अशा सहजतेने की जसं काही मध्यंतरीच्या काळात काही घडलचं नव्हतं! टिळक आल्यावर थंडावलेले राजकारण पुन्हा तापू लागले. सुरत काँग्रेसपासून राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पडलेले जहाल-मवाळ गट, मुस्लीम व अितर जमाती, या सर्वांनाच स्वराज्यप्राप्तीच्या कामी एकत्र आणावे, असा विचार लोकमान्यानी लखनौच्या अधिवेशनप्रसंगी मांडला होता. त्याला अनुसरून जातीय ऐक्याची अभंग फळी निर्माण करण्याच्या दृष्टीने काकासाहेब नव्या जोमाने, नव्या अुत्साहात 'केसरी' त लिहू लागले.

काही दिवस चांगले गेले आणि एक दिवस अचानक त्यांच्या अुत्साहावर पाणी पडले. १ ऑगस्ट १९२० रोजी लो. टिळकांचे दु:खद निधन झाले.

पुन्हा १९१०च्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली. कुठं माशी शिंकली कुणास ठाऊक? पण केसरीचे ट्रस्टी म्हणून असलेले काकासाहेबांचे नाव काटले गेले.

जड अंत:करणाने काकासाहेबाना 'केसरी' चा निरोप घेतला. पण पारतंत्र्याविषयी चीड निर्माण करण्याचा वसा पुढे कसा चालवायचा, याचा त्याना प्रश्न पडलाच नाही. अचानकपणे तो प्रश्न सोडवला गेला.

टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जहाल राजकारणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी,

काही टिळकपंथीयानी मुंबईत एक मराठी दैनिक सुरू करायचं ठरविलं होतं. आता अशा दैनिकासाठी खाडिलकरांपेक्षा योग्य संपादक कोण मिळणार? खाडिलकरांनी आनंदाने होकार दिला.

९ मार्च १९२१ पासून त्यानी मुंबईतील नव्या दैनिकाची, 'लोकमान्य' ची संपादकपदाची जबाबदारी स्वीकारली. 'केसरी' पर्वानंतर काकासाहेबांच आता 'लोकमान्य' पर्व सुरू झालं. काही काळ, म्हणजे एक दोन वर्षे बरी गेली. मग मात्र व्यवस्थापनाशी त्यांचे मतभेद होऊ लागले, म्हणून वैतागून त्यानी 'लोकमान्य' सोडला.

दुसरीकडे त्यांच्या नाटकातील घोडदौडीला पण अचानक ब्रेक लागला! त्यांचे नवीन नाटक 'द्रौपदी' साफ पडलें. अव्वाच्यासव्वा खर्च केल्यामुळे आणि बालगंर्धवांच्या गलथान आर्थिक व्यवहारामुळे नाटकास मोठा फटका बसला, लेखक म्हणून त्यांचेकडेहि अपयशाबद्दल अंगुलीनिर्देश केला गेला, याचे त्याना मनस्वी दु:ख झाले. लोकमान्यांसारखा गुरू गेला. त्याच सुमारास हरितात्यांसारखा वडिलांचे ठिकाणी असणारा ज्येष्ठ बंधू गेला म्हणून 'द्रौपदीच्या' अपयशाने त्यांचे ठायी थोडे नैराश्य आले. त्यामुळे मन नाट्यलेखनापासून किंचित् दूरच गेले.

'लोकमान्य' पत्र सोडल्यावर पुढे काय? हा प्रश्न अुभा राहिला. वृत्तपत्रीय लिखाणाची अूर्मी त्याना गप्प बसू देईना. लोकजागृतीसाठी वृत्तपत्रलेखन करायची तर अिच्छा होती. पण कुणाची ताबेदारी त्याना नको होती, तसेच मत्सर करणारे सहकारी पण नको होते. अशा परिस्थितीत पर्याय एकच होता. तो म्हणजे स्वत:चेच वृत्तपत्र सुरू करणे. समाजात त्यांची स्वत:ची अशी काही पुण्याई होतीच. पाठीशी चाहते आपणहून गोळा झाले.

'लोकमान्य' सोडल्यावर अवघ्या महिनाभरातच, ७ मार्च १९२३ रोजी त्यानी स्वत:चे वर्तमानपत्र सुरू केले.

त्याचे नाव 'नवाकाळ' (आजहि हे पत्र जोरात चालू आहे.) 'नवाकाळ' हे आता तिसरे पर्व सुरू झाले. पूर्वीचा अनुभव कामी आला. पहाता पहाता 'नवाकाळ' लोकप्रिय झाला. खप दिवसेंदिवस वाढू लागला. नवी कल्पना म्हणून 'साप्ताहिक "नवाकाळ" सुरू करण्यात आला. गांधीजी, टिळकांचेच धोरण राबवून स्वातंत्र्यलढा पुढे नेत आहोत अशीच काकासाहेबांची धारणा असल्याने त्यानी गांधीजींच्या नेतृत्वाची भलावण केली. त्यामुळे 'नवाकाळ' ने चांगलेच बाळसे धरले. अर्थात यात गांधीजींच्या लोकप्रियतेचाही भाग होता.

मन आता थोडे स्थिरचित्त झाले. ५-६ वर्षांच्या नाट्यलेखनसंन्यासानंतर

काकासाहेबानी 'मेनका' नाटक लिहिले. १९२६ साली रंगभूमीवर आलेलें हे नाटक प्रेक्षकांच्या विशेष पसंतीला आले नाही. गांधीजींच्या मताचा प्रचार करता करता नाटकाची कलात्मकतेची बाजू लंगडी पडली होती!

'नवाकाळ' भरभराटीस येत असता मध्येच एकदम ठेच लागली! एखादं वृत्तपत्र जनमानसात लोकप्रिय होणे याचा दुसरा अर्थ होता सरकारी रोषास बळी पडणे.

१५ मार्च १९२९ रोजी काकासाहेबांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. एक वर्षाच्या तुरूंगवासाची त्याना शिक्षा झाली. या काळात त्यांची प्रकृती जी ढासळली ती कायमचीच. शारीरिक दृष्ट्या खचलीच पण आश्चर्य म्हणजे मानसिक दृष्ट्या जास्ती खचली. लो. टिळकानी बंदिवासाच्या जीवघेण्या एकांतवासाच्या काळात मनाचा कणखरपणा कणभरसुध्दा ढळू दिला नव्हता, याचे अप्रूप काकासाहेबाना आता फार जाणवले.

अिथं आणखी एक योगायोग आवर्जून सांगण्यासारखा आहे. काकासाहेबांच्या लेखांमुळे टिळकाना शिक्षा झाली होती. काकासाहेबाना ज्या लेखाबद्दल राजद्रोहाची शिक्षा झाली तो लेख त्यानी लिहला नव्हता. तो लिहिला होता दुसऱ्याच सहसंपादकाने. बहुधा न.र.फाटक यानी तो लिहिला होता अशी वदंता होती. इतिहासाची पुनरावृत्ती होते ती अशी!

तुरुंगवासातून आल्यानंतर काकासाहेबानी 'नवाकाळ' ची संपादकीय सूत्रेपण हाती घेतली नाहीत. आप्पा सगळं व्यवस्थित संभाळतोय हे पाहून सगळा कारभार त्यालाच सांभाळायला सांगितला. वास्तविक स्वातंत्र्याची चळवळ जोरात सुरु होती. मिठाचा सत्याग्रह जनतेने अपूर्व उत्साहाने अुचलून धरला होता. सरकारी दडपशाही चालूच होती. अहिंसक प्रतिकार विलक्षण संयमाने चालू होता. अशावेळी काकासाहेबांची लेखणी एखाद्या तरवारीसारखी परजायला हवी होती. पण तसं का होत नव्हतं याचं सर्वानाच कोडं पडलं होतं. पुन्हा म्हणून त्यानी संपादकीय लेखणी हाती धरली नाही त्यांच्या आजवरच्या पत्रकारी जीवनातील ही न समजणारी शोकांतिका होती.

नाही म्हणायला त्यानी आपलं नाट्यलेखन चालू ठेवलं होतं, पण मेनका, सावित्री, सवतीमत्सर या सर्व नाटकांतून गांधीजींच्या तत्वज्ञानाचा प्रचार केल्यामुळे की काय ती नाटकं निष्प्रभ ठरली होती. टिळकयुगातील त्यांची एकूण तडफ, त्वेष, गांधीयुगात नाटकातूनही मावळला होता. त्यांच्या लाडक्या बालगंधर्वाच्या नाटकमंडळींची वाताहात झाली होती. एकूणच नाट्यव्यवसाय सिनेमाच्या आगमनाने ओहोटीस लागला होता.

आता काकासाहेबांचा ओढा अध्यात्माकडे लागला होता. सांगलीस ते अधूनमधून विश्रांतीसाठी येत. कृष्णानदीच्या काठावरील आपल्या मळीमध्ये त्यानी एक छोटसं

टुमदार दत्तमंदिर बांधून घेतलं. त्यामध्ये ते प्रवचन करू लागले. दत्तमंदिर बांधले त्यावर्षी सतत आठ महिने त्यानी प्रवचने दिली. १९३८ साली दरवर्षीप्रमाणे प्रवचने देण्यासाठी सांगलीस आले असताना, दत्तमंदिरातच फेऱ्या घालताना कोसळले. त्याना पक्षाघाताचा झटका आला होता. त्याचा परिणाम त्यांच्या वाचाशक्तीवर झाला, बोलणे अस्पष्ट होऊ लागले. अितकेच नव्हे तर मेंदूवर थोडा परिणाम होऊन शब्द आठवेनासे झाले.

दुर्दैवाचे भाले चारी बाजूनी रोखले जात होते. त्याना अर्धांगाचा झटका आला त्याच्या आदल्याच वर्षी त्यांची लाडकी सून, सौ. कमल (आप्पासाहेबांची पत्नी) गेली. नंतर नेहमी रुग्णाईत असलेला मुलगा विनायक गेला. जिने सर्व अडी-अडचणीतून दिवस काढले, नवाकाळ संकटात असताना आपले सर्व दागिने दिले, त्या सौ. गौरबाई अर्धांगाने खिळल्या. त्यांचा एक पाय कापावा लागला आणि अखेर १९४५ साली त्यांचे देहावसान झाले. हा आघात फार मोठा होता. त्या गेल्याचे कळल्यावर गांधीजी स्वत: काकासाहेबाना भेटायला आले.. नुकत्याच कस्तुरबा वारल्या होत्या. गांधींजींचे मौन असल्याने काकासाहेबांचे सांत्वन करताना त्यानी लिहिलं, "आपण दोघे आता समदु:खी झालो."

१९४३ साली त्यांच्या लाडक्या सांगली गावात भरलेल्या विष्णुदास भावे या सांगलीच्याच आद्य नाटककाराच्या शतसांवत्सरिक अुत्सवातही काकासाहेब आपल्या विकलांग अवस्थेमुळे जाऊ शकले नाहीत. या प्रसंगी त्यांचा मोठा सत्कार करण्याची सांगलीकर नाट्यप्रेमींची अिच्छा अपुरीच राहिली याचे मानसिक क्लेश त्याना स्वत:ला किती झाले असतील!

अखेरीस २६ ऑगस्ट १९४८ रोजी काकासाहेब शांतपणे अनंतात विलीन झाले.

दु:खात सुख एवढेच की जी स्वातंत्र्याची सकाळ पाहण्यासाठी त्यानी आपली लेखणी-वाणी आयुष्यभर झिजवली, त्या स्वातंत्र्याची पहाटच नव्हे, तर सूर्योदयहि त्यानी पाहिला. आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता झाल्याचे मानसिक समाधान त्याना लाभले.

तिसरी घंटा झाली. आणि त्या झुंझार पत्रकाराच्या आणि प्रतिभावंत नाटककाराच्या जीवननाट्यावर अखेरचा पडदा पडला!

सांगलीच्या, त्यांच्या कृष्णाकाठच्या मळीतील दत्तमंदिरात, संध्याकाळी फिरत फिरत एखादा सांगलीकर नाट्यप्रेमी जातो तेव्हा त्याला सांगलीच्या या महान नाटककाराची आठवण येऊन, नक्कीच गहिवरून येत असेल!

●●●

## 'आधुनिक अेकनाथ' पारमार्थिक कीर्तनकार

# संत कोटणीस महाराज

१८४३ साली कै.विष्णुदास भावे यानी 'सीतास्वयंवर' हे नाटक प्रथमतः रंगभूमीवर आणलं. त्यामुळे सांगली ही 'नाट्यपंढरी' म्हणून ख्यातकीर्त झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभानंतर काही वर्षातच, आणखी एका थोर सांगलीकरामुळे सांगली 'कीर्तनपंढरी' म्हणूनही ओळखली जाऊ लागली.

हा श्रेष्ठ सांगलीकर म्हणजे ज्या गुरूदेव रानडे यानी त्यांचे वर्णन 'आधुनिक एकनाथ' असे केले आहे, ते संतश्रेष्ठ श्री तात्यासाहेब कोटणीसमहाराज!

वास्तविक प्रपंच आणि परमार्थ या दोहोंचे नाते छत्तीसच्या आकड्याप्रमाणे असते. प्रपंच करणारे अनेक असतात. परमार्थ करणारे तुलनेने थोडे असतात. पण प्रपंच साधून परमार्थ साधणारे महाभाग जवळजवळ नसतातच. जुन्या काळात जसे या दोहोची सांगड घालणारी एकच एक थोर व्यक्ती म्हणून, फक्त संत एकनाथमहाराजांकडेच बोट दाखवता येते, तसे आधुनिक काळात असे सर्वमान्य व्यक्तिमत्व, म्हणजे संतश्रेष्ठ श्री तात्यासाहेब कोटणीसमहाराज!

तशी सांगली ही भाविकांची भूमीच आहे. सांगलीच्या पटवर्धन राजघराण्याचे जे मूळ पुरूष हरभट, त्यांची अनन्यसाधारण भक्ती पाहून श्रीगजाननाने सांगलीत कायमस्वरूपी निवास केला आहे, असं सर्वसामान्य भाविकाला वाटतं. श्री रामानंदमहाराज खटावकर, त्यांचे परात्पर गुरु श्री सदाशिवमहाराज, बाबासाहेब मुजुमदार, सत्यव्रततीर्थ मौनीबाबा, श्री आनंदमूर्ती, कृष्णा परीट, अप्पाराव पोवार, अण्णाबुवा, धोंडिराममहाराज, श्रीनारायणमहाराज मळणगावकर, अवधूत संप्रदायी श्री ताम्हनकर महाराज ही सारी सांगली परिसरातील संतमंडळी. या सर्वानी जी भक्तिमंदिराची वास्तू अुभी केली, तिला कळसावर नेले ते तात्यासाहेबानी. सतत दोन तपे म्हणजे २४ वर्षे अखंड कीर्तन करणे हाच एक चमत्कार आहे. महिनाभर कीर्तन करायचं म्हटलं की किती त्रास होतो ते त्या कीर्तनकारालाच ठाऊक. तेव्हा अशी कीर्तने अखंडपणे, तेहि ठराविक वेळी, प्रकृतीची तमा न बाळगता करणे, ही किती अवघड गोष्ट! पण अशी ही साधना वर्षानुवर्षे, श्रीएकनाथांप्रमाणे स्वतःच प्रसादाचा, तेलबत्तीचा खर्च करून

कोटणीसमहाराजानी केली. सामान्य संसारी जनांना भक्तिमार्ग विशद करून आत्मिक समाधानाच्या पदपथावर नेले.

अशा या हणमंत पांडुरंग तथा तात्यासाहेब कोटणीस यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८६४ रोजी सांगली संस्थानातील तेरदळ या त्यांच्या आजोळच्या गावी झाला. कोटणीस घराणे हे पुरातन काळात 'नाईक-वडेर' या अुपनावाने कर्नाटकातील केरूर गावात सुप्रतिष्ठित होते. विजापूर बादशहाच्या मूळ चाकरीत असलेले त्यांचे पूर्वज १७४६ च्या सुमारास विजापूर सोडून मुधोळ येथे स्थायिक झाले. मुधोळकर संस्थानिकानी या पूर्वजांना वाड्यातील 'कोटणिशी' (कोठीवरचे अधिकारी) दिली. मूळ हुद्दा कोठीनवीस किंवा कोठीनीस असा आहे. पण दोन्ही शब्द अुच्चार करण्यास कठीण म्हणून लोक कोटणीस म्हणत. अशा तऱ्हेने ही मूळची नाईक-वडेर मंडळी 'कोटणीस' म्हणूनच ओळखली जाऊ लागली.

तात्यांचे प्राथमिक शिक्षण मुधोळ येथे झाले. त्यांचे वडील पांडुतात्या यांचं निधन, तात्या १३ वर्षाचे असतानाच झाले. तेव्हा त्यांचे संगोपन त्यांचे पित्यासमान असलेले चुलते वामनकाका यानी मोठ्या ममतेने केले. पितृछत्र हरपल्याची बिलकूल जाणीव होऊ दिली नाही. चुलत्या-पुतण्याचे संबंध विलक्षण प्रेमाचे होते. अध्यात्मक्षेत्रात या जोडीचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. तात्यांच्या शालेय जीवनात दोन-तीन शिक्षक त्याना चांगले लाभले. पंडित दादाचार्य राघवाचार्य कट्टीशास्त्री यांजकडे त्यांचे संस्कृत अध्ययन झाले. नंतर वेदान्तावर 'ब्रह्मसिध्दांतमाला' नामक पुस्तक लिहणारे अद्वैतपंडित बाबा गर्दे त्याना शिक्षक म्हणून लाभले. त्यामुळे अनेक संतकवींच्या रचना तात्यांना विद्यार्थीदशेतच तोंडपाठ झाल्या होत्या. इंग्रजी विषयाची त्याना गोडी लागली, म्हणून त्यानी इंग्रजीचे मनापासून अध्ययन केले. इतके की त्यांचे इंग्रजी बघून पुढे मिरज हायस्कूलमधील त्यांचे संस्कृत शिक्षक, तात्यांचे, इंग्रजीचे विद्यार्थी बनले! बरे, हे संस्कृत शिक्षक कोणी सामान्य पुरूष नव्हते. ते होते प्रख्यात इतिहास-संशोधक, नाटककार म्हणून अुभ्या महाराष्ट्राला परिचित असलेले वासुदेवशाश्त्री खरे! मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी तात्यांना मुधोळ संस्थानची दरमहा आठ रूपयांची शिष्यवृत्ती मिळत असे. १८८२ मध्ये ते मिरज हायस्कूलमधून मॅट्रिक झाले. पुढे शिकण्याची अुत्कट अिच्छा होती. पण पितृछत्र हरपलेले. एकत्र कुटुंब-पध्दतीमुळे कोटणीस कुटुंबियांचा बारदाना मोठा. घरावर कर्जाचा भार. त्यातच त्या काळच्या रीतीनुसार १७ व्या वर्षीच त्यांचे लग्न झालेले. तेव्हा आपल्या आदरणीय वामनकाकांच्या खांद्यावरचा भार हलका करण्याच्या दृष्टीने, तात्याना नोकरी करणे क्रमप्राप्त होते. संस्थानची शिष्यवृत्ती घेतली असल्याने, मुधोळ संस्थानची नोकरी

करणे बंधनकारक होते. तेव्हा २० रू. पगारावर त्यांची नोकरी सुरु झाली. लवकरच त्यांची हुशारी, निर्लोभी वृत्ती आणि तरतरीतपणा पाहून, श्रीमंत व्यंकटराव घोरपडे यानी त्याना आपल्या खाजगीकडे घेतले. तथापि संस्थानी राजकारण म्हणजे हेवेदावे, मत्सर, एकमेकांचे पाय ओढणे या गोष्टींचा वाईट अनुभव तात्याना यायचा होता.

आणि थोडीशी गमतीची गोष्ट म्हणजे ज्या सत्संगाचा सदोदित लाभ व्हावा म्हणून तात्या आयुष्यभर धडपडले, *त्या सत्संगाची सुरवात होतानाच त्याना त्रास* झाला. किंवा थोडक्यात तशी त्यांची परीक्षाच झाली. झालं ते असं.

मुधोळ संस्थानातील मॅजिस्ट्रेटच्या हुद्यावर असलेले श्री. बाबासाहेब मुजुमदार (तात्यासाहेबांचं रसाळ चरित्र लिहणाऱ्या साधुदास तथा गोपाळराव मुजुमदार यांचे चुलते) आपल्या पाच-सहा सहकाऱ्यांसमवेत मुधोळजवळ असलेल्या चिमड मठात जात आणि सोमवारी नोकरीवर हजर होत. मच्छिंद्रगोरक्षादी नवनाथापैकी श्रीरेवणनाथ हे ज्या गुरूपरंपरेचे आद्य पुरुष मानले जातात, अशा ज्ञानशाखेचे एक पीठ चिमड येथे होते. तेथे त्यावेळी श्रीमत् रामचंद्रमहाराज यरगट्टीकर मठाधिपती होते. तसेच तात्याना पुढील आयुष्यात ज्या अत्यंत आदरणीय आणि मार्गदर्शक ठरल्या, त्या लक्ष्मीअक्कामहाराज या महाराजांच्या गुरुभगिनी पण तेथेच होत्या. अध्यात्मिक मनोवृत्तीच्या तात्याना ही पर्वणीच होती. या महाराजांचा आपल्यालाही गुरूपदेश मिळावा, ही आस त्याना लागली. म्हणून ते बाबासाहेबांबरोबर चिमडला जाऊ लागले. अवघ्या २२ व्या वर्षीच त्याना गुरुपदेश मिळाला. अशी एका बाजूने त्यांची अध्यात्मिक प्रगती होत होती. त्याचवेळी मुधोळ दरबारात "आता हणमंतरावजी कोटणीस भलत्याच(?) मार्गाला लागलेत. कामाकडे त्यांचे लक्ष नाही. गुरुबाजीला बळी पडले आहेत. वगैरे वगैरे." अशा तऱ्हेच्या कागाळ्यांमुळे त्याना नोकरीत अपमान आणि मन:स्ताप सोसावा लागला. मुन्सफ असलेले तात्या, शिरस्तेदार म्हणून खाली घसरले. त्याहून मानभंग म्हणजे तो चार्ज घेत असतानाच अमुक एका कारकुनास शिरस्तेदार पद देऊन, आपण स्वत: त्याचेकडील कारकून म्हणून काम करावे असा हुकुम झाला! अखेर नोकरी कायम सोडण्याचा मनोमन निश्चय करुन, तात्यांनी एक वर्षाच्या बिनपगारी रजेचा अर्ज पाठवून दिला.

एका दृष्टीने ही अिष्टापत्ती ठरली. कारण ज्या वकिली व्यवसायाने त्याना आयुष्यात स्थैर्य दिले, अनेक गोष्टी मनासारख्या करायला मिळाल्या, त्या वकिलीच्या परीक्षेसाठी त्यानी कंबर कसली.

मात्र दरम्यानचा काळ फार हलाखीचा होता. सर्व चुलते मंडळी वयस्क झालेली. धाकटी सख्खी चुलत भावंडे शिक्षणाची, घरात वीस-पंचवीस मंडळींचा

कुटुंब-कबिला. यामुळे संसाराचा गाडा ओढता ओढता तात्यांची दमछाक होऊ लागली. आपल्या अल्प वेतनात निर्वाह होत नाही. कर्जाचा बोजा वाढत चाललेला. या गोष्टी त्याना क्लेशकारक होत. आपली प्राप्ती वाढवावी या हेतूने त्यानी हायकोर्ट-प्लीडरच्या परीक्षेला बसण्याचे प्रयत्न केले. पण अभ्यासाला आवश्यक पुस्तके, बिकट आर्थिक परिस्थितीने घेता येत नाहीत, मन:स्वास्थ्य नाही, अशा कारणाने त्याना मुंबईत जाऊन परीक्षा पदरात पाडून घेण्याचे काही जमेना. त्या काळी सांगली संस्थानात स्टेट प्लीडरच्या परीक्षा होत. त्याला बसायचे तात्यानी ठरवले. सुदैवाने त्याना यश मिळाले. तेव्हा तात्यानी सांगलीत वकिली सुरू केली. कर्मधर्मसंयोगाने त्याचवेळी, त्यांचे परिचित आणि चिमडच्या महाराजांचा अनुग्रह मिळवून देण्यास कारणीभूत असलेले, महाराजांच्या सांप्रदायिकापैकी, वर अुल्लेख आलेले बाबासाहेब मुजुमदार सांगलीतच वकिली करत होते. त्यांच्यामुळे तात्याना कामे मिळू लागली. आणि यापेक्षा मोठा फायदा म्हणजे कायद्याची पुस्तके आणि मोलाचे मार्गदर्शन त्याना बाबासाहेबांकडून मिळू लागले. तात्यांची अुमेद वाढली. त्यानी फिरून एकवार डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या परीक्षेसाठी मुंबईला जायचे ठरविले. या खेपेस मात्र त्याना यश लाभलं. आत्मविश्वास दुणावला. सांगलीपेक्षा बेळगावसारख्या मोठ्या ठिकाणी जाऊन वकिली करावी, असे त्यांच्या मनाने घेतले. त्याप्रमाणे १८९३ ते १८९७ या काळात त्यानी बेळगावला बिऱ्हाड केले. स्वतंत्र वकिली व्यवसाय करावा. त्यात प्रयत्नपूर्वक प्रगती करत अुत्कर्ष साधावा. द्रव्य संपादन करावे ते घराण्याचे कर्ज निवारून, साऱ्या कुटुंबाची अुर्जितावस्था साधण्यासाठी. हे हेतू पूर्ण होत असल्याने, बेळगाव हीच त्यांची पुढील आयुष्यात कर्मभूमी झाली असती. पण नियतीची तशी अिच्छा नसावी. त्यांच्या पत्नीला, बेळगावच्या हवेचा त्रास होऊ लागला. हवापालट म्हणून तेरदाळला राहून बघितले. तरी काही फरक पडेना. प्रख्यात धन्वंतरी आबासाहेब सांबारे यांच्या नजरेसमोर औषधोपचार करायचे, तर सांगलीतच राहायला हवे. म्हणून १९०० सालच्या एप्रिलमध्ये त्यानी सांगलीतच बिऱ्हाड थाटलं.

मध्यंतरीच्या काळात खुद्द तात्यांवरच एक जिवावरचे दुखणे ओढवले. अचानक भूक मंद मंद होऊ लागली. अंगास जडपणा येऊन चेहऱ्यावर फिकट छटा दिसू लागली. सांगलीचे स्नेही आबासाहेब सांबारेना दाखवून औषधोपचार चालू होता. पण वैद्यराज सांगलीत आणि रुग्ण बेळगावात. मग गुण कसा यावा? बरं, आबासाहेबानी निक्षून सांगितले होते की खडखडीत बरे व्हायचे असल्यास, सांगलीत येऊन राहणे आवश्यक आहे. हेळसांड झाल्यास अवघड आहे. कारण रोगाचे स्वरूप गंभीर आहे. या दुखण्याने तात्या एवढ्या जेरीस आले की या आजारातून आपण काही अुठत नाही, असेच त्यांच्या मनाने घेतले. मग एवीतेवी देहत्याग करायचा तर मग तो

आपल्या प्राणप्रिय चिमडला जाऊन का करू नये? म्हणून ते चिमडला मोठ्या कष्टाने प्रवास करत आले. मठाचे प्रवेशद्वारीच, साध्वी लक्ष्मीआक्का त्याना अुतरवून घेण्यास आल्या होत्या. नगाऱ्यासारखे झालेले पोट, तटाटलेल्या शिरा-धमन्या, हातापायास सूज येऊन सर्वांगावर पसरलेली पिवळसर छटा, अशी एकूण तात्यांची करुणास्पद स्थिती बनली होती. तेव्हा लक्ष्मीआक्कानी "भिऊ नको. साधुमहाराज तुला बरं करतील" असं म्हणून धीर दिला. त्या देतील तो तीर्थप्रसाद हाच रोगोपचार समजून ते एकेक दिवस ढकलत राहिले. एकवीस दिवस एकान्तवासात काढल्यावर संडासमार्गे दोन हात लांबीचा सर्प बाहेर पडला आणि व्याधिमुक्ती झाली. अुदरव्याधीतील हा प्रकार म्हणजे सर्पोदर होता. महाराजांच्या कृपाप्रसादामुळे आणि लक्ष्मीअक्कांच्या शुश्रुषेनेच प्राणसंकट टळले, अशीच सर्वांची भावना झाली. चिमडच्या मठाबद्दल तात्यांच्या मनात एवढे ममत्व आणि श्रध्दा होती की पुढील आयुष्यात जे जे शक्य होते ते सर्व त्यानी चिमडच्या मठासाठी केले. सद्गुरू रामचंद्रमहाराजांवर त्यांची नितांत श्रद्दा होती. ते एकदा मुधोळला आले होते तेव्हा सर्व भक्तांसमक्ष तात्यानी आपला सगळा पगार गुरूमहाराजांपुढे दक्षिणा म्हणून ठेवला! त्यांच्या आर्थिक दुःस्थितीची महाराजांना जाणीव होती. म्हणून ते म्हणाले. "बाबा रे, सारा पगार दिल्यावर तुम्ही मंडळी काय खाणार?" मग महाराजांनी साधुबुवांचा प्रसाद म्हणून दोन रूपये तात्यांच्या हातावर ठेवले. आणि म्हणाले. "हा प्रसाद म्हणून जतन करून ठेव म्हणजे तुला काही कमी पडणार नाही." पराकोटीची श्रध्दा कशी असते ते पाहा. ते दोन रूपये आजहि कोटणीस घराण्यात जपून ठेवलेले आहेत!

श्रीगुरूंच्या आणि लक्ष्मीअक्कांच्या हाताच्या अमृतस्पर्शाने पावन झालेली प्रत्येक वस्तू तात्यांना परमपवित्र असे. अेकदा वाहन वेळेवर न मिळाल्याने तात्या चिमडच्या मठात अवेळी पोचले. रात्रीची स्वयपांकघरातील सामसूम बघून आणि आपल्या एकूण भिडस्त स्वभावानुसार "भोजन झाले आहे" असे बळेच त्यानी सांगितले. एकूण 'प्रकार' लक्षात आल्यामुळे लक्ष्मीअक्कानी झाकून ठेवलेली कोरभर भाकरी शोधून तात्याना दिली. प्रेमाने दिलेला तो भाकरीचा तुकडा अद्यापहि कोटणीसांच्या वास्तूत सुरक्षित आहे!

अनुग्रह झाल्यावर गुरूमहाराज आणि तात्या मठाच्या अंगणात अुभे होते. तेव्हा आपल्या जीर्ण झालेल्या सोप्याकडे बोट दाखवून महाराजानी अकस्मात विचारले "हणमंतराव, तू ही इमारत आम्हाला चांगली बांधून देशील काय?" तेव्हा तात्या म्हणाले, "महाराज, माझी विपन्नावस्था आपणास ठाऊक आहेच. तथापि आपली कृपा होईल तर नक्कीच ही अिमारत बांधून काढेन." त्यावर महाराज मंद हसले. पण

त्यांच्याच कृपेने संपन्नता आल्यावर खरोखरीच तात्यानी आपला शब्द खरा केला!

चिमड मठाच्या सोयी-गैरसोयी, रथोत्सवासारखे अुत्सव या सर्व प्रसंगी अत्यंत पवित्र भावनेने तात्यानी चिमड-मठाची निरपेक्ष सेवा केली. आयुष्याच्या अखेरीस देहत्यागसुध्दा चिमडलाच करावा अशी त्यांची अिच्छा होती. पण तसा योग नव्हता! असो.

बेळगाव-तेरदाळ सोडून तात्या सांगलीत आले. त्यानंतर सर्व चित्रच पालटले. सांगलीत आल्यापासून त्यांच्या अुत्कर्षाची कमान अखेरपर्यंत चढतीच राहिली. आजवरचे त्यांचे जीवन हे एखाद्या गृहस्थाश्रमी सज्जनाचं असावं तसं होतं. आजमितीला तात्यांची जी 'प्रतिमा' सर्वज्ञात आहे, त्याची जडणघडण सांगलीच्या या वास्तव्यात झाली. यापुढील काळात तात्यासाहेब कोटणीस यांचे घर, त्यांची वकिली, व्यवसायातील मिळकत, त्यांची कीर्तन-प्रवचने हा रंजल्या-गांजल्या माणसांसाठी मोठाच निवारा ठरला.

एक अत्यंत सदाचरणी, हुषार आणि यशस्वी वकील म्हणून सांगलीत स्थायिक झाल्यानंतर, थोड्याच काळात त्यांचा बोलबाला झाला. कोर्टात अकराच्या ठोक्याला ते बिनचूक हजर असत. मग जज्साहेब येवोत न येवोत! प्लेगच्या अुपद्रवामुळे सांगली सोडून कवलापूर, बुधगावच्या माळावर वस्तीला जावं लागलं, तरी त्यांच्या नियमितपणाला बाधा येत नसे. कायद्याचा सखोल अभ्यास आणि स्तिमित करणारी स्मरणशक्ती, ही त्यांची वैशिष्ट्ये होती. आपल्या पक्षकाराची बाजू ते पूर्णपणे समजावून घेत त्याचवेळी विरूद्ध पक्षाचे म्हणणे काय आहे हे पण ते ऐकून घेत. त्यानुसार कैफियत तयार करत. वस्तुस्थिती आणि कायदा यांचा मोठ्या कुशलतेने ते मेळ घालीत. लॉ रिपोर्टसचे सतत वाचन, जुन्या निवाड्यांची चपखल माहिती, हजरजबाबीपणामुळे प्रतिपक्षास सहज निरूत्तर करण्याची हातोटी, यामुळे ते यशस्वी वकील झाले. हळूहळू त्यांची कीर्ती एवढी पसरत चालली की सांगलीखेरीज बुधगाव, इचलकरंजी, कुरूंदवाड, जत, जमखंडी इतक्या ठिकाणी त्यानी सनद काढली होती. वेळप्रसंगी सांगलीच्या संस्थानिकांविरूद्ध एखाद्या अशिलाचे वकिलपत्र घेण्यास ते कचरत नसत., मात्र अशिलावर खरोखरीच अन्याय झाला आहे, अशी खातरजमा झाली तरच!

त्यांची परमार्थाची आवड वाढली, साधना वाढली, तसतसा त्याना आपला 'वकिली पेशा' अडचणीचा वाटू लागला. वकिलीचा धंदा हा सचोटीचा म्हणून कधीच समाजमान्य नव्हता. तेव्हा हा व्यवसाय सोडावा आणि दुसरा एखादा सचोटीचा, सात्त्विक स्वरूपाचा अुद्योग करावा की काय, अशी चलबिचल त्यांच्या मनात सुरू

झाली. अशा संभ्रमित अवस्थेत असताना नेहेमीप्रमाणे त्यांना लक्ष्मीअक्कांचा मार्गदर्शक सल्ला मिळाला. त्या म्हणाल्या, "बाबारे, हा विचार सुध्दा तू मनांत आणू नको. तुझ्या छायेखाली पाच-पंचवीस माणसं जगत आहेत आणि त्यांची संख्या अुत्तरोत्तर वाढणार आहे. तुला वाडवडिलांच ऋण पण फेडायचं आहे...हाच धंदा नेकीने कर. थोडा अप्रशस्त मार्गाचा अवलंब करावा लागतो तर त्यावर उपाय म्हणजे रुपयातील एक आणा तू साधुमहाराजांपुढे कापूर जाळण्याप्रीत्यर्थ खर्च करीत जा, म्हणजे त्यांच्या कृपेने तुझे सर्व काही ठीक होईल."

असा कापूर किती खर्च झाला त्याचा हिशोबच नाही! मात्र अक्कांचा सल्ला बिनतोड ठरला. पुढे त्यांच्या आशिर्वादाप्रमाणे घराण्यावरचे सर्व कर्ज फिटले. दोन्ही वेळच्या पंक्तीला पाच-पन्नास माणसं जेवू लागली.

तात्यासाहेब कोटणीस म्हटलं की कीर्तन असा एक द्वंद्व समासच डोळ्यासमोर येतो. एक अद्‌भुत वाटावी अशी विलक्षण कीर्तनपरंपरा त्यानी सुरू केली. १८८६मध्ये त्याना गुरूपदेश मिळाला. तेव्हापासून वर्षातून किमान दोन वेळा, आराधना आणि रथोत्सवासाठी ते गुरूक्षेत्र चिमड येथे जाऊ लागले. तेथे त्यांनी प्रासंगिक स्वरूपाची छोटी कीर्तने केली होती. तेवढ्यावरून त्यांच्या कीर्तनगुणांची परीक्षा महाराजाना झाली होती "तुझी कीर्तने इत्युत्तर रसभरित होत जातील आणि ती ऐकावयास राजे लोकही येतील." असा त्यानी तात्याना आशीर्वाद दिला. त्यावेळी तात्यांचे वय केवळ सव्वीस वर्षाचे होते. तरीसुध्दा 'नेटका प्रपंच' करण्याच्या कामामध्ये, वाढता प्रपंच आणि वाढते कर्ज अशा कात्रीत सापडल्यामुळे, पुढील सात-आठ वर्षे तरी त्याना 'कीर्तन प्रपंच' मांडण्यास सवड झाली नाही. मात्र १८९८ मध्ये तेरदाळला बिऱ्हाड मांडलेले असताना, घरमालक शंकरराव फडणीस यांच्या आग्रहाने आठवड्यातून सोमवार, गुरूवार या वारी आणि एकादशीला त्यांची कीर्तने सुरू झाली. १८९९ मध्ये अखेरीस एक चांगला योग आला. सांगलीच्या प्लेगच्या भीषण साथीमुळे आबासाहेब सांबारे तेरदाळला राहावयास आले होते. ते स्वत: हार्मोनियम वाजवत आणि तालाला फार पक्के असत. स्वत: तात्या आणि त्यांचे साथीदार तालाला थोडे कच्चे आहेत, हे लक्षात आल्यावर, आबासाहेबानी स्वत: मेहनत घेऊन, तात्यांचे कीर्तनातील हे तालाचे अंग पूर्णपणे अव्यंग केले! अुत्तर आयुष्यात तात्यासाहेबाना त्याचा फार फायदा झाला.

सांगलीत पुन्हा स्थायिक झाल्यावर मात्र त्यांची कीर्तने नियमितपणे होऊ लागली. याचं मुख्य कारण म्हणजे वकिली धंद्यात त्यांचा चांगला जम बसला. पत्नीच्या आजाराची तक्रार नष्ट झाली.

प्रथम थोडेसे मंगलाचरण, नंतर सदगुरुंस नमन, तदनंतर निरूपणाचे पद्य अशा पद्धतीने तात्यासाहेब कीर्तनास प्रारंभ करीत. पद्य म्हणून झाल्यावर फार पाल्हाळ न लावता ते निरूपण करण्यास सुरूवात करीत. निरूपणास निवडलेल्या पद्याच्या विवरणास रंग भरायला लागे. साधुसंतांच्या वचनांचे आधार देत देत पूर्वरंग पूर्ण होई. त्यापुढे एखादे आख्यान, शेवटी संतांची गोष्ट,''हेचि दान देगा देवा,''आरती खिरापत असं त्यांच्या दैनंदिन कीर्तनाचे सामान्यत: स्वरूप होते.

सांगलीच्या भाविक मंडळीना एरवी पहावयास, ऐकावयास मिळणार नाही असे संतवाङमय त्यानी आपल्या कीर्तनातून वैपुल्याने ऐकविले. वेदांचे, अुपनिषदांचे, भगवद्गीतेचे आणि साधु-संतांचे तत्त्वज्ञान एकच आहे, हे त्यानी पुन:पुन्हा श्रोत्याना पटवले. हरिभक्तीचा आणि गुरूभक्तीचा नमुनेदार आदर्श स्वत:च्या अुदाहरणाने लोकांसमोर ठेवला.

आणि मुख्य म्हणजे हे सगळे संत एकनाथांप्रमाणे संसारात 'राहून' त्यानी केले.

त्यांच्या श्रोतेमंडळीमध्ये सामान्य कुणबी, नोकरवर्ग,सामान्य भाविक बायकांपासून तो अुच्चविद्याविभूषित डॉक्टर्स, विद्वान हे सुध्दा असत. सुरवातीला वकीलमंडळींमध्ये 'टाळकुट्या कथेकरी' म्हणून त्यांची हेटाळणी होई. पण अनुभवांती हे पाणी काही 'वेगळेच' आहे ह्याची यथार्थ जाणीव त्या सर्वांना होऊ लागली. त्यांच्या अंगी संतपणाचे अतींद्रिय स्वरूप परिपक्व झाले आहे हे जाणकारांच्या हळू हळू लक्षात येऊ लागले.

कीर्तनकारास अत्यंत आवश्यक गुण म्हणजे वेगवेगळे चपखल दाखले देणे. तेव्हा वेगवेगळ्या संतांची, कवींची काव्ये मुखोद्गत हवीत. तात्यासाहेबांचे पाठांतर विलक्षण होते. त्यांच्या स्वत:च्या संग्रहात १२२५ ग्रंथ होते. त्यात काही इंग्रजी होते. ते सर्व ग्रंथ त्यानी नुसतेच नजरेखालून घातले होते असे नाही तर त्या ग्रंथांचा त्यांचा अभ्यास होता. काही ग्रंथ तर त्यांच्या नित्यपाठात होते. ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपानदेव, गोरा कुंभार, सावता माळी यांच्या अुपलब्ध असलेल्या सर्व रचना त्याना तोंडपाठ होत्या. तुकारामाची गाथा, एकनाथांची भजने-भारूडे त्याना मुखोद्गत होती. समर्थांचे सगळे ग्रंथ त्यांच्या नित्यपाठात होते. त्यातील शेकडो अवतरणे नेहेमीच्या कीर्तनात येत. याखेरीज नरसी मेहता, आनंदमूर्ती, दासोपंत, इत्यादिकांची पदे त्याना पाठ होती. कबीर, सूरदास, मीराबाई यांच्या रचनांचा त्यांच्या कीर्तनात सढळपणे वापर असे. इतकेच काय, पण कनकदास, पुरंदर विठ्ठल अशा कानडी कवीना पण त्यांच्या

कीर्तनात जागा असे. संस्कृत वाङमयातील योगवासिष्ठ, शंकराचार्यांचे ग्रंथ, यातील अनेक अवतरणे ते सहजी अुधृत करीतच, तर कधी भर्तृहरी, जगन्नाथपंडित हे सुध्दा त्यांच्या कथनात येत. नित्य कीर्तनात सहसा कविता येत नसत तरीसुध्दा मोरोपंत, वामनपंडित, मुक्तेश्वर त्यांच्या संग्रही होते. या छापील पुस्तकांखेरीज एकूण ८० हस्तलिखित चोपड्या त्यांच्याकडे होत्या. त्यांची मधुकरवृत्ती विलक्षण सजग होती. एखादा गोसावी दारावरून एखादे पद म्हणत गेला, ते पद त्याना आवडले, आणि आपल्या संग्रही ते पद नाही असा नुसता संशय वाटला तरी त्याला तात्यासाहेब बोलावून घेत. योग्य दक्षिणा देत आणि स्वहस्ते पदाची नक्कल करून घेत.

अशी जबरदस्त साधना असल्यामुळे त्यांच्या कीर्तनात नेहमीच नाविन्य भासे. ताजेपणा असे.

तात्यासाहेबांच्या कीर्तनाचा आवाका जसा मोठा तसा त्यांच्या कीर्तनाचा थाटहि विलक्षण असे. कीर्तनसाथ फारच मोठी आणि विविधतेने नटलेली असे. तबलजी, पेटीवाला, झांज, पखवाज आणि प्रत्यक्ष गाण्याची साथ करणारे असे सर्व मिळून बारापासून, वीसपर्यंत साथीदारांची संख्या असे. क्वचित यापेक्षा अधिकच. (आजच्या भाषेत म्हणजे ऑर्केस्ट्राच म्हणायला हवा!) तात्यासाहेबांचे चरित्रकार, कवि साधुदास स्वत: या साथीदारांमध्ये अुभे राहून पदे म्हणत असत. त्यानी ह्या सर्व साथीदार मंडळींची नावे मोठ्या मजेदाररीतीने एका श्लोकात गुंफली आहेत. तो श्लोक असा:-

'काका 'झांज' धरी, 'जनू' सूर-करी, साथीस 'नाना' करी
'आप्पांचा' पखवाज, 'दीक्षित' बसे सानंद पेटीवरी।
'अंतोबा' करताल देति, 'पंता' मुखी मूर्छना
गातो गायन 'साधुदास;' करिती 'तात्या' यदा कीर्तना ।।''

त्या त्या साथीदारांच्या प्रचारातील नावांवरून ही गुंफण होती. गंमत म्हणजे या साथीदार मंडळीत प्रतिष्ठित डॉक्टर, संगीतज्ञ, मामलेदार तर होतेच पण सांगलीजवळच्या कर्नाळचा न्हावी, शिरोळचा शिंपी, कोकेवाला अशी विविध थरातील मंडळी या ताफ्यात होती. वाकबगार पेटीवाला आणि अुत्तम गाणारी मंडळी असतील तर तात्यासाहेब त्यांजकडून रागदारीची पदे म्हणवून घेत असत.

तात्यासाहेबांचे कीर्तनाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यानी कीर्तनाचा कधीहि 'व्यवसाय' केला नाही. अुभ्या हयातीत एक नवा पैसा सुध्दा त्यानी कीर्तन केल्यावर घेतला नाही. अखंड २४-२५ वर्षे नित्यश: किमान दोन तास तरी कीर्तन केले.

समर्थांच्या वचनाप्रमाणे "आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा । हरिकथेविण सर्वथा राहोचि नये।।" त्यानी आयुष्यात नऊ हजारांहून अधिक कीर्तने हरिसेवा म्हणून सहज केली असतील. परगावी कीर्तनासाठी साथीदार-मंडळी घेऊन जायची वेळ आली तरीहि कोणाची कपर्दिकहि घेतली नाही. याबाबत बोलताना ते स्वत:च तुकाराममहाराजांचा दृष्टांत देत. तुकोबारायानी स्पष्टपणे सांगितलंय "जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।। तट्टावृषभासी दाणा । घेऊ नये कधी जाणा ।। बुक्का लावू नये भाळा । हार घालू नये गळा ।।' असा इशारा देत पुढे तुकोबानी असं बजावलंय की, हरिदासाला देणारा आणि तो ते घेणारा असे दोघेहि नरकाला जातात-"तुका म्हणे देती । घेती तेहि नरका जाती"।

आजकाल ही गोष्ट कुणाच्या ध्यानातही येत नाही अितक्या सवंगपणाने कीर्तनाचा धंदा झाला आहे. तात्यासाहेबानी कीर्तन हे एक व्रत म्हणून चालवलेले होते. आवडीने स्वीकारलेले व सेवाभावाने चालवलेले ते एक "पवित्रतम व्रत" होते. कीर्तनकार म्हणून त्यांच्या बाबतीत सहज लक्षात न येणारी गोष्ट म्हणजे ते एक आत्मानुभवी साधुपुरूष व पराकाष्ठेचे क्रियाशील गुरुभक्त होते. त्यांच्या कीर्तनाची अुंची आणि लोकप्रियता केवळ पाठांतर, वक्तृत्व, गायनवादन या गुणांवर अधिष्ठित नव्हती तर ती त्यांच्या आत्मानुभवाच्या जिव्हाळ्यावर होती.

तात्यासाहेबांच्या अशा लोकविलक्षण कीर्तननिष्ठेमुळे, त्यांचे निरूपण ऐकण्यासाठी मोठमोठी मंडळी सांगलीत येत असत. संत वाङ्मयाचे महान अभ्यासक श्री. ल. रा. पांगारकर, श्रीमत् दीक्षितस्वामी, डॉ.कूर्तकोटी, समर्थभक्त श्री. शंकरराव देव, निंबाळचे गुरूदेव रानडे अशी मोठमोठी मंडळी त्यांच्या कीर्तनास आवर्जून अुपस्थित राहिलेली आहेत. सांगलीत तर रोजची हजार-पाचशे भक्तमंडळी, रात्री नेमाने कीर्तनास येत. राजकुटुंबातील मंडळींना किंवा अुच्चपदस्थांना सामान्य लोकांप्रमाणे श्रवणभक्ती करता येत नसे. म्हणून सांगलीकर, इचलकरंजीकर, कुरूंदवाडकर अशा संस्थानिकांनी आपापल्या राजवाड्यांतून तात्यासाहेबांची खास कीर्तने आयोजित केली होती.

तात्यासाहेबांची समाजातील प्रतिमा एका रसाळ कीर्तनकाराची होती. पण थोर संतांच्या मालिकेत शोभण्यासारखी त्यांची गौरवास्पद योग्यता आहे, म्हणजेच सिद्धावस्थेस पोचलेले ते साधुपुरूष आहेत, ही जाणीव त्यांच्या सर्वसामान्य भक्तजनांस नव्हती. फारच थोड्या निकटवर्तियांस ही गोष्ट ज्ञात होती. त्यांचे रसाळ चरित्र लिहिणारे साधुदास यानी दोन तीन अनुभव दिले आहेत. ते मोठे बोलके आहेत. एकदा १९०१ च्या प्लेगच्या साथीच्या दिवसात, सांगलीवासी मंडळी गावाबाहेर राहायला जात, तेव्हा तात्यासाहेब साधुदासांच्या मळ्यात राहायला आले होते. साधुदासांच्या

चुलत्यांचा म्हणजे बाबासाहेब मुजुमदारांचा आणि तात्यासाहेबांचा चांगला स्नेह होता याचा आधी अुल्लेख आला आहेच. साधुदास त्यावेळी विद्यार्थीदशेत होते. त्यामुळे रात्री-बेरात्री अभ्यासाला अुठत असत. तसे ते एकदा अभ्यासासाठी अुठले. तात्यांना त्रास होऊ नये म्हणून रात्री अुठून दिवा पेटवावा (त्यावेळी अिलेक्ट्रिसिटी नव्हती) आणि वाचत बसावे असा त्यांचा विचार होता.पाहतात तर तात्यासाहेब आपल्या अंथरूणावर मांडी घालून नामस्मरण करत बसलेले दिसले. ते मध्यरात्रीनंतर झोपतील म्हणून बघितले तरी तोच प्रकार! असे वेगवेगळ्या रात्री बघितले तरी तेच दृश्या! हा प्रकार त्यांच्या लक्षात आला तेव्हा ते साधुदासाना (म्हणजेच गोपाळराव मुजुमदाराना) म्हणाले, "गोपाळ, मी जागा आहे म्हणून तू अभ्यास करायचं चुकवू नकोस." साधुदासानी म्हटलय की तात्यासाहेबानी निद्रा संपूर्णपणे जिंकली होती. "साधकाची दशा अुदास असावी" या तुकोबांच्या सांगीप्रमाणे त्यानी आपली वृत्ती अुदास ठेवली होती. साधुदासानी म्हटलय की ही साधनसिद्धता केव्हा पुरी झाली, याची नक्की खातरजमा देता येत नसली, तरी एका अनुभवावरून त्यानी तर्क बांधला होता की १८८६ साली सद्गुरूंचा मंत्रानुग्रह मिळाल्यावर, सुमारे १६ वर्षांच्या खडतर साधनेनंतर ते सिद्धाच्या अवस्थेस पोचले असावेत. त्यासंबंधातील स्वत:चा आणखी एक अनुभव सांगताना साधुदासानी लिहिलय की १९०५च्या सुमारास तात्यासाहेबांच्या घरी शिकण्यासाठी म्हणून एक मुलगा राहात असे. थोडीशी साधना जमू लागल्यावर तात्यासाहेबानी आपल्याला मंत्रानुग्रह द्यावा म्हणून त्याची सारखी धडपड चालू होती. काही यश येईना म्हणून त्याने साधुदासांचा सल्ला घेतला. तेव्हा साधुदास म्हणाले "तू त्याना अजिबात त्रास देऊ नकोस. रोज पहाटे अुठून त्यांचे घटकाभर मनोभावे चिंतन करीत जा." असा प्रकार काही दिवस झाल्यावर तात्यासाहेब अचानक त्या विद्यार्थ्यापाशी आले, आणि म्हणाले "अहो ढवळीकर, माझे स्मरण करावे असा मी काही 'देव' नाही. गोपाळराव सांगणारे एक शहाणे आणि तुम्ही ऐकणारे सात शहाणे." ह्या प्रसंगावरून तात्यासाहेबाना सिद्धावस्था प्राप्त झाली होती असा साधुदासांचा कयास होता.

आणखी एका प्रसंगाची हकीगत अधिकच बोलकी आहे. सांगलीजवळील डिग्रज. येथे हुसेनबाळा तांबोळी नावाचा सात्त्विक मुसलमान राहात असे. एकदा त्याने पूर्ण श्रद्धेने "रामविजय" ग्रंथाचे पारायण सुरू केले. ग्रंथसमाप्ती तात्यासाहेबांच्या हस्ते व्हावी आणि त्यांच्या कीर्तनाने सांगता व्हावी अशी त्याची अतीव अिच्छा होती. पण "आपण मुसलमान, मग कसचे कोटणीसमहाराज येतात?" असे विचार मनात येऊन तो खिन्न होत असे. अचानक एके रात्री त्याला स्वप्न पडले. स्वप्नात कोटणीस

महाराज आले. त्यानी त्याला सांगितले "तू कीर्तनाची सिध्दता कर. मी अवश्य येईन." आनंदित झालेला हुसेनबाळा नंतर सांगलीत आला. स्वप्नदृष्टांतामुळे त्याला धीर आला होता. तरीपण त्याने भीतभीत कोटणीस महाराजाना आपली मनातील अिच्छा सांगितली. तेव्हा तात्यासाहेब म्हणाले "मी तुला येतो म्हणून एकदा सांगितलय ना?" ते ऐकून हुसेनबाळा चाट पडला. मग दहा-बारा साथीदार घेऊन तात्यासाहेब डिग्रजला गेले. तेथील कीर्तनात इस्लामची मूळ तत्त्वे कशी अुदात्त आहेत, ते त्यानी स्पष्ट करुन सांगितले. "कबीर कमालांच्या" दोह्यांची बरसात केली. (सर्वधर्मसमभावाच्या कल्पनेचा बेगडी अवतार अजून व्हावयाचा होता!)

असा हा 'आधुनिक एकनाथ' म्हणजे तात्यासाहेब कोटणीस, यांचे २७ जानेवारी १९२४ रोजी दुःखद निधन झाले. आयुष्यभर त्यानी देवापुढे अुभे राहूनच कीर्तन केले. प्रकृती ढासळली तरी हा क्रम चुकला नाही. शेवटीशेवटी प्रकृतीची स्थिती गंभीर झाल्यावर, अनुयायांच्या तळमळीच्या आग्रहाखातर, शेवटचे सहा महिनेच त्यानी व्यासपीठावर बसून कीर्तन केले. त्यानी आयुष्यभर जोडलेली पुण्याई एवढी जबरदस्त की त्यांची अध्यात्म-परंपरा त्यांच्या पुत्रपौत्रानी आज ७५ वर्षानंतरही अबाधितपणे चालू ठेवली आहे.

जून १९०० मध्ये त्यानी कीर्तनास, अखंडित कीर्तनास, सांगलीत सुरुवात केली. त्या घटनेस आता, २१ व्या शतकात पदार्पण केल्यावर, शंभर वर्षे पूर्ण झाली. सांगलीची कीर्तनप्रेमी मंडळी त्या कीर्तन-तपस्व्याच्या महानतेचा मोठ्या प्रमाणावर जाहीरपणे अुद्घोष करतील यात काय शंका?

●●●

## सांगलीचे लोकविलक्षण धन्वंतरी

# आबासाहेब सांबारे

७०-८० वर्षापूर्वीची गोष्ट.

एक नामांकित वैद्य, आपल्या वाड्याच्या ऐसपैस ओसरीवर बसून, नेहमीप्रमाणे आपले रूग्ण तपासत होते. त्याना औषध देत होते. एवढ्यात बाहेरच्या दिंडी दरवाजापाशी मोठा गलका सुरू झाला. दोन-तीन हुजरे आले. ''महाराज आले, महाराज आले,'' असा पुकारा चालू होता. मग कळलं की महाराज म्हणजे कोणी साधासुधा राजा नव्हता. तो होता मोठा राजर्षी. प्रत्यक्ष कोल्हापूरचे शाहू महाराजच स्वत: वैद्यराजांच्या ओसरीवर आले होते. हे मोठं आक्रितच होतं. एवढा मोठा पैलवानी थाटाचा, सहा फुटी मर्द. त्याला काय कारण अिथं यायचं? पदरी डॉक्टरांची फौज असताना? हुजऱ्या वैद्यराजांच्या कानाशी जाऊन सांगू लागला. ''महाराज आल्याती. महाराज आल्याती.'' त्याच्या कृतीचा अर्थ स्पष्ट होता. तो असा की वैद्यराजानी आता आपल्या नेहमीच्या रूग्णांना रजा द्यावी आणि फक्त महाराजांकडे लक्ष पुरवावं. पण वैद्यराज एकदम अुखडले. त्याच्यावर डाफरले,''अरे,आले असतील तुझे महाराज, मला काय त्याचं? हे आधीपासून ताटकळत बसलेले रोगी तपासतो., मग तुझ्या महाराजाना बघतो.''

हुजऱ्या चाट पडला. खरं म्हणजे घाबरलाच. बाहेर महाराजांची बग्गी अुभी होती.त्याना सांगायचं कसं? त्यांचा असा अपमान? पण सांगणं तर भागच होतं. घाबरत घाबरत त्यानं सांगितलं. महाराज हसले. म्हणाले'' हात्तिच्या, अेवढंच ना? थांबू आपण.''

गोष्ट अशी होती की महाराज आपल्या पदरच्या गुलामअुद्दीन नावाच्या पैलवानाला घेऊन आले होते. तो अगदी मरणोन्मुख अवस्थेत होता. त्याच्या फुप्फुसात पू झाला होता. कफ आणि खोकल्यातून पू येत असे. असं बरेच दिवस चाललं होतं. डॉक्टरांचे सर्व अुपाय थकले. मिरजेच्या डॉ.वानलेसनंतर, त्यांच्याच तोलामोलाच्या आलेल्या प्रख्यात डॉ.व्हेलनी तपासून सांगितलं, की पैलवानाची तब्बेत अगदीच खालावलेली आहे. जास्तीत जास्त आठ ते दहा दिवस जगेल. आमचे अुपाय आता

संपल्यासारखे आहेत. तथापि सांगलीच्या एका वैद्याला दाखवून मगच कोल्हापूरला परत जा.

हा पैलवान महाराजांचा अत्यंत आवडता पैलवान होता. त्याच्यावर त्यानी खूप मेहनत घेतली होती. कुस्त्या मारून त्याने कोल्हापूरचा नावलौकिक वाढवावा, म्हणून त्याला अुत्तम प्रतीचा खुराक चालू होता. त्याची अशी अवस्था झालेली बघून महाराज कष्टी झाले होते. शेवटचा अुपाय म्हणून या वैद्याकडे आले होते. थोड्याच वेळात वैद्यराजानी महाराजाना आत बोलावले. दहा-पंधरा मिनिटे त्यानी पैलवानाची कसून तपासणी केली. मग ते महाराजांकडे वळून म्हणाले, "तुमचा पैलवान महिनाभरात अगदी खडखडीत बरा होईल." सर्वांना आश्चर्य वाटले. महाराजांचा तर विश्वासच बसेना. डॉ.व्हेलसारखा निष्णात डॉक्टर काय सांगतोय आणि हे वैद्यराज काय भाकित करत आहेत!अशीच त्यांच्या आणि अितरांच्याहि मनातील भावना होती.

काही असो. एक महिन्याचे औषध घेऊन मंडळी कोल्हापूरला परतली. ज्याचे आयुष्य आठ-दहा दिवसाचे त्याच्यासाठी संपूर्ण महिन्याचे औषध कशाला? असाच भाव सर्वांच्या चेहऱ्यावर होता.

झाले. आठ दिवस झाले. दहा दिवस झाले. पैलवान काही मेला नाही! पंधरा दिवसानी महाराजांचा पी.ए, गाडी घेऊन घाबऱ्याघुबऱ्या कोल्हापूरहून सांगलीला वैद्यराजांकडे आला. त्याना सांगू लागला. तुम्हाला ताबडतोब येण्याची विनंती महाराजानी केली आहे. वैद्यबुवा म्हणाले, "अरे पण काय होतय ते तरी सांगशील किनई?" मग पी. ए. आणि बरोबर आलेली मंडळी सांगू लागली की पैलवानाला एकसारख्या रक्ताच्या अुलट्या होत आहेत. फार घाबरा झालाय तो. म्हणून महाराजानी आपल्याला यायची विनंती केलीय. वैद्यबुवा हसले. म्हणाले, "सांगा तुमच्या महाराजाना, म्हणावं, आता तुमचा पैलवान चांगला बरा होण्याच्या मार्गावर आहे." ती दरबारी मंडळी बुचकळ्यात पडली. पण त्यानी गयावया करून वैद्यबुवाना स्वत:च कोल्हापूरला चलण्याची विनंती केली. मग ते कोल्हापूरला गेले. रूग्ण तपासला. शाहू महाराज आणि त्यांचे डॉक्टर्स तिथं होतेच. वैद्यानी खुलासा केला "ज्याअर्थी आता नुसत्या रक्ताच्या अुलट्या होत आहेत त्याअर्थी पू होण्याची क्रिया बंद झाली आहे. फुप्फुसातील विष आता पूर्णपणे पडून गेलंय. आता शुध्द रक्त होण्याची प्रक्रिया सुरू झालीय. आता तुमचा पैलवान खडखडीत बरा होणार!"

आणि खरोखरीच महिनाभरात तो पैलवान चांगला बरा झाला.यमराजाच्या बगलेतच असलेल्या मृतवत् माणसाला, पुन्हा भूतलावरील माणसांमध्ये आणण्याची, किमया करणाऱ्या त्या धन्वंतरीचे नाव होते आबासाहेब सांबारे!

आबासाहेब म्हणजे त्यांच्याच काळात एक 'दंतकथा' बनून गेले होते! अनेक आयुर्वेदाचार्य, नुसता 'आबासाहेब सांबारे' या नावाच्या उच्चारानेच कानाच्या पाळीला हात लावून मनोमन नमस्कार करतात. जुने सांगलीकर त्यांच्याविषयी बोलायला लागले की त्यांच्या रसवंतीला आवर घालणे कठीणच.

शाहू महाराजानी पैलवान बरा झाल्यावर बिदागी म्हणून चार चांदीची तबके भरून नाणी पाठविली. पण आबासाहेबानी बिदागी घेतली नाही. ''मला पोटाला देणारा श्रीगजानन माझ्या घरातच आहे'' असे नम्रतापूर्वक सांगून आबासाहेब महाराजाना म्हणाले, ''फार तर तुमचा पैलवान पुन्हा कुस्त्या करायला लागल्यावर आमच्या गणपती अुत्सवात येऊन कुस्त्या करू दे.'' त्याप्रमाणे तो गुलामउद्दीन, आबासाहेबांकडील गणपतीच्या अुत्सवात कुस्त्या करत असे. आबासाहेबानी कोल्हापूरात यावं अशी शाहूमहाराजांची खूप इच्छा होती. तेथे मोठे रूग्णालय बांधून द्यायची तयारी होती असं म्हणतात. पण एकदा सांगलीच्या राजेसाहेबांकडे, राजवैद्य म्हणून निष्ठा वाहिल्यावर त्यात आबासाहेब बदल करणे कदापि शक्य नव्हते.

अशा या आबासाहेबांचं मूळ नाव कृष्णाजी विष्णु सांबारे. सांबारे हे काही त्यांच्या पूर्वजांचं मूळ नाव नव्हे. मूळचं आडनाव जोशी. तासगांव तालुक्यातील चिंचणी हे मूळ गाव. तिथं ही जोशी मंडळी पिढीजात भिक्षुकी आणि वैद्यकी हे दोन व्यवसाय अुपजीविकेसाठी करत असत. सांगली संस्थानची स्थापना केल्यावर पहिले अधिपती श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यानी सांगलीचा नावलौकिक वाढावा या दृष्टिकोनातून अनेक शास्त्री, पंडित, गवई, पैलवान, व्यापारी मंडळी आदी विविध व्यवसायातील लोकांना सांगलीत वास्तव्यासाठी पाचारण केले. त्याना अनेक सवलती दिल्या. नोकऱ्या दिल्या. अुपजीविकेची साधने दिली. या चिंचणीकर जोशी मंडळीना, सांगलीतील गणपतीच्या देवळात असणाऱ्या, चिंतामणेश्वराची म्हणजेच सांबाची पूजा, अुदरनिर्वाहाचे साधन म्हणून दिली. सांबाची पूजा करणारे म्हणून त्यांचं आडनाव 'सांबारे' झालं. आजमितिलाही ही पूजा-व्यवस्था सांबारे मंडळींकडेच चालू आहे.

आबासाहेबाना दामोदरपंत आणि रामचंद्रपंत असे आणखी दोन भाऊ होते. तिघेही बंधू निष्णात वैद्य होते. आबासाहेबांच्या शिक्षणाविषयी फारशी माहिती अुपलब्ध नाही. तथापि त्यांचे काही वैद्यकीय शिक्षण, पुण्याचे मेहेंदळे वैद्य, याजकडे झाले आणि बरेचसे शिक्षण त्यानी पिढीजात परंपरेवरून आणि जुन्या आयुर्वेदातील ग्रंथांवरून केले. त्यांची स्वत:ची चिकित्सक वृत्ती आणि संशोधनाने प्राप्त झालेले ज्ञान यामुळेच त्यांचे वैद्यकी ज्ञान पूर्णत्वास गेले. सुश्रुत, चरक, वाग्भट अशा जुन्या

ग्रंथाचे परिशीलन ते करतच.पण समोर येणाऱ्या नवीन नवीन रोग्यांचा आणि त्यांच्या विविध व्याधींचा ते सतत अभ्यास करत. रोगाच्या लक्षणानुसार ते औषध तयार करत. आणि रोगाचेच नाव औषधाला देत. त्यानी दिलेल्या काही औषधांची नावे आधुनिक आयुर्वेदातील औषधांस तंतोतंत जुळतात. मात्र त्यानी स्वत: तयार केलेली काही औषधे, चूर्णे, आयुर्वेदात सापडत नाहीत. त्यांची औषधयोजना करण्याची पद्धती आधुनिक वैद्यकाप्रमाणे होती. पातळ औषधे ते स्वत: तयार करीत. अर्क पद्धतीस त्यानीच प्रथम सुरूवात केली होती. तुळस, गुलाब, धमासा, वाळा यांचे ते अर्क काढून ठेवत. रानतुळस ही फार औषधी म्हणून तिचा अर्क नेहेमी काढून ठेवत. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये ज्या ज्या ओल्या हिरव्या वनस्पती मिळत, त्यांचे अर्क आबासाहेब काढून ठेवत. आबासाहेबांच्या ओसरीवर अनेक खेडूत मंडळी येत. त्यांच्याबरोबर आबासाहेब स्वतः रानावनात जाऊन, वेगवेगळ्या वनस्पतींची पाहणी करून ठेवत. ही श्रध्दाळू खेडूत मंडळी आबासाहेब सांगतील, त्या त्या वनस्पतींचे भारेच्या भारे, त्यांच्या ओसरीवर आणून टाकत. निरनिराळी द्रव्ये आणून, त्यांचे काढे करून, त्यांचे व्यवस्थित, शास्त्रशुध्द जतन करण्यावर आबासाहेबांचा विशेष कटाक्ष असे.

आबासाहेबांचं मोठं वैशिष्टय म्हणजे त्यानी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा कधीही दुरूपयोग केला नाही. सवंग व्यवसाय होऊ दिला नाही. एरवी त्यांच्या वाड्याच्या प्रशस्त ओसरीवर, सांगलीच्या शनिवारच्या बाजारासारखी गर्दी जमत असे. मग त्यात मोठमोठ्या सरकारी अंमलदारापासून अगदी अडाणी शेतकऱ्यांपर्यंत सर्वांचा समावेश असे. अितकेच काय चोर, रामोशीसुध्दा त्यांच्याकडून औषधे घेऊन जात. एकदा गंमतीची गोष्ट घडली. आबासाहेब एकदा सांगलीजवळील डिग्रज या गावी एका आजारी रूग्णाला पहायला गेले होते. येताना रात्र झाली. बंद सारवटगाडीतून ते सांगलीला परतीच्या वाटेवर होते. अचानक आजुबाजूच्या अुसाच्या फडातून, तीन-चार रामोशी आले. व्यापारी समजून लुटालूट करण्याच्या अुद्देशाने त्यानी गाडी थांबविली. पहातात तो आबासाहेब. तत्काळ त्यानी त्यांचे पाय धरले. माफी मागितली. सांगलीपर्यंत पोचवले. अितकेच काय, पण जवळ असलेले गुळाचे रवे दिले. अर्थात तो चोरीचा माल. मग आबासाहेब कसे घेतील?

असे पण असायचे आबासाहेबांचे रूग्ण!

आबासाहेब औषधाचे पैसे घेत नसत. प्रत्येक रूग्ण म्हणजे परमेश्वराने शिकण्यासाठी पाठवलेला नवीन 'धडा' आहे अशीच त्यांची समजूत असावी. रोग्याच्या आणि त्याच्या व्याधीचा ते सतत विचार करीत. आयुर्वेदाचे ग्रंथ अुघडून संदर्भ शोधत.सतत चिंतन करीत. या अव्याहत अभ्यासानेच त्याना रोगाची अचूक

परीक्षा होई. त्यांच्या या अभ्यासाची यथार्थ कल्पना नसणारे लोक मात्र त्याना हातगुण आहे असे समजत. आबासाहेब औषधाची फी घेत नसत. मात्र त्यांच्या असंख्य रूग्णांना, आबासाहेबांच्या गणेशोत्सवात, आपली सगळी फी हक्काने परत करण्याची संधी मिळे. अुत्सवात ज्वारी, तांदूळ, गूळ, शेंगदाणे, हरभराडाळ, तूरडाळ यांच्या थप्प्या लागत.

आबासाहेब सांबारे यांचेकडील गणपती-अुत्सव हे एक मोठेच प्रकरण होते.

आबासांहेब हे स्वत: मोठे गणेशभक्त होते. त्यांचा मित्र परिवार अफाट. सर्वजण मिळून उत्साहाने गणेशोत्सव साजरा करीत. एकदा गप्पांच्या ओघात, गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात आणि सार्वजनिकपणे साजरा करावा, अशी टूम निघाली. ही गोष्ट आहे १८९८-९९ सालातील. कदाचित् लो.टिळकानी पुण्यात सुरू केलेल्या शिवजयंती आणि गणेशोत्सव चळवळीचे लोण सांगलीत पोचले असेल. अुत्सव मोठा करायचा तर गणपतीची मूर्तीपण मोठी हवी. मग सात फूट अुंचीचा शाडूचा गणपती करण्यात आला. दुर्दैवाने गणेशोत्सवाच्या आदल्या दिवशी चाचणी घेण्यासाठी बाहेर काढताना मूर्ती भंगली. सर्वजण निराश झाले. आता गणपतीची मूर्ती बनवायची केव्हा आणि प्रतिष्ठापना करायची तरी ती कधी? मग सर्वानुमते शक्कल काढण्यात आली. चार पाच दिवसात गजाननाची मूर्ती बनवून, दशमीच्या दिवशी प्राणप्रतिष्ठा करायची आणि अनंतचर्तुदशीला विसर्जन करायचे.

तेव्हापासून आजतागायत हीच प्रथा चालू आहे.

पाच-सहा वर्षे झाल्यावर, पूर्वी करत असत त्याप्रमाणे बुरूडाच्या कांब्या, तट्ट्या यांचा वापर करून कायमस्वरूपी एक लाकडी गणपती बनवावा असे ठरले. मूर्तीची अुंची केवढी असावी अशी चर्चा झाली, तेव्हा जमलेल्या मित्रमंडळीमध्ये जो सर्वात अुंच होता, त्याने आपले दोन्ही हात अुंचावले. तेव्हा त्या अुंचीइतकी मूर्ती बनवायची योजना ठरली. त्याप्रमाणे तीन भागात मूर्ती करण्यात आली. पोटाचा भाग, हलकी पिंपे वापरून करण्यात आला. मांडी आणि पाय हा भाग लाकूड आणि कागद यांचा लगदा मिळून करण्यात आला. असं करता करता दोन पुरूषभर, म्हणजे जवळजवळ १३ फुटांची मूर्ती बनली.

आणि त्यानंतर थाटामाटाचा, अुत्सवी गणेशोत्सव सुरु झाला.

दरवर्षी पहिले दिवशी  सकाळी आणि शेवटच्या दिवशी रात्री श्री गणेशाच्या मूर्तीची मिरवणूक निघे. सुरुवातीला बैलगाडीतून, तर नंतर ट्रकवर, मूर्ती चढवून मिरवणूक निघे. सकाळी ९ वाजता मिरवणूक सुरू होई, ती मारूती रोड, कापडपेठ,

पोलिस स्टेशनवरून राजवाडा चौक, पटेल चौक, गणपती मंदिर, पाटील गल्लीतून सांबारे वाड्यात परत येई. रात्रीची मिरवणूक तर रात्री ९ वाजता सुरू होई ती पहाटे तीनपर्यंत चालत असे. गणपतीपेठेत हलवाई मंडळी, मिठाईची ताटेच्या ताटे, गणपतीवर अुधळीत असत. रात्रीच्या मिरवणुकीनंतर शोभेचे दारूकाम हे फार मोठे आकर्षण असे. या कामात अग्रेसर असलेली कवठे एकंद गावची मंडळी, दोन दोन महिने आधी सांबारेवाड्यात येऊन भुसनळे, चक्रे, झाडे, औट अशी सर्वप्रकारची शोभेची दारू बनवीत. शिवाय वाजणारे फटाके तर अनेक प्रकारचे असत.

या अुत्सवातील एक मोठं वैशिष्ट्य म्हणजे आबासाहेबानी करवून घेतलेले दोन हत्ती. असं सांगतात की, एका वर्षी सांगलीकर अधिपतीनी, मिरवणुकीसाठी हत्ती देण्याचं नाकारलं, म्हणून आबासाहेबानी और्ष्येने, कायमस्वरूपी दोन मोठे निर्जीव हत्ती बनविण्याचं मनावर घेतलं. कोल्हापूरातून मोठ्यात मोठ्या हत्तींची मापे आणवली. तरटे, कांबळी, अँगल्सचा वापर करून त्या हत्तींच्या मापाचे दोन मोठे हत्ती तयार केले. अुत्तम तऱ्हेने रंगवले. सर्व प्रकारचे दागिने वगैरे घालून, सुशोभित झूल घालून त्या हत्तीना जेव्हा मिरवणुकीने नेले, तेव्हा मिरवणूक गणपती मंदिराजवळ आल्यावर, पूर्वी तिथे हत्तीठाण्याजवळ बांधत असलेला खरा हत्तीसुध्दा या 'हत्तीना' पाहून बावरला. घाबरून साखळदंड तोडायला लागला.

आबासाहेबांचा गणेशोत्सव पूर्ण पाच दिवस चाले. मात्र आधी अुल्लेख आल्याप्रमाणे दशमीपासून अनंतचर्तुदशीपर्यंत. पाच दिवस सतत गायन, भजन, जादूचे प्रयोग, कुस्त्या अशा अनेकविध कार्यक्रमांचा धूमधडाका असे. सांगलीवाडी, कवलापूर, कर्नाळ डिग्रज अशा जवळपासच्या गावातून भजनीदिंड्या येत. त्यांची भजने होत. बिदागीचा सवालच नसे. आबासाहेब आपल्याकडून औषधापोटी काही घेत नाहीत, तर त्यांच्या गणपती अुत्सवात आपली जास्तीत जास्त सेवा रूजू व्हावी अशीच प्रत्येकाची अिच्छा असे. प्रत्येकाला मानाचा नारळ मिळे. रात्रभर कार्यक्रम आणि जोडीला सांगलीचे सुप्रसिद्ध कुरकुरीत भडंग आणि चहा. भडंगाची प्रसिद्धी आणि प्रथा तेव्हापासूनची आहे. 'भडंग' हे नामकरण आबासाहेबांचे चाहते सांगलीचे सुप्रसिद्ध कवी, साधुदास यानी केलं आहे, असं म्हणतात. या अुत्सवात हजारो लोक जेवून जात. मग त्यात पंक्तिप्रपंच नसे.

संस्थानच्या गणपतीउत्सवापेक्षाही हा अुत्सव मोठ्या प्रमाणावर होई. आणि खऱ्या अर्थाने हा सर्व समाजाचा अुत्सव असे. समाजाच्या सर्व थरातील माणसे 'आपल्या' घरचा अुत्सव आहे अशा भावनेने सामील होत. स्पृश्यास्पृश्य भेद नावापुरतासुद्धा नसे. कोणी खालच्या समाजातील माणूस संकोचाने बाजूला राहू पाही तेव्हा आबासाहेब

त्याला हाताला धरून जवळ आणत. लोकमान्य टिळकांचा खरा 'संदेश' आबासाहेबानी पुरापुरा जाणला होता.

पुढे पुढे आबासाहेबांच्या वैद्यकीचा आणि गणेशोत्सवाचा लौकिक महाराष्ट्रभर पसरला. त्यांच्या वैद्यकी ज्ञानाची प्रचीती मोठमोठ्या गवयाना, पुढाऱ्याना येऊ लागली. त्यांच्या विषयींच्या कथा-दंतकथा सर्वत्र चवीने सांगितल्या जाऊ लागल्या, तेव्हापासून आबासाहेबांच्या प्रेमाखातर, मोठमोठे नामांकित गवई, त्यांच्या गणपती-अुत्सवात येऊन आवर्जून गाऊ लागले. कोणकोण गाऊन गेले, मैफली गाजवून गेले त्याची मोजदाद करणेच कठीण. अुस्ताद अल्लादियाखाँ, त्यांचे सुपुत्र मंजीखाँ आणि भूर्जीखाँ, कागलकरबुवा, कडलासकरबुवा, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, शंकरराव सरनाईक यांपासून तो साक्षात् बालगंधर्व, गंगूबाई हनगल, मोगूबाई कुर्डीकर यांचेपर्यंत अनेक बुजुर्ग, सांगलीत आबासाहेबांमुळे येऊन गाऊन गेले. त्या मंडळींचे स्वर्गीय गायन ऐकून सांगलीकर मंडळी धन्य झाली. राजेमहाराजांच्या राजवाड्यातून, मोठमोठ्या मैफलीतून, गाणारी मंडळी, आबासाहेबांमुळे सर्वसामान्य लोकाना ऐकायला मिळाली.

हा एक मोठा चमत्कार होता. आणि तो घडायला एक प्रसंग कारणीभूत झाला. त्याचं असं झालं:

गानमहर्षी अल्लादियाखाँसाहेबाना अचानक आजार जडला. एकसारखी धाप लागायला लागली. तरूणपणी त्याना कुस्तीचा नाद होता. एका अटीतटीच्या कुस्तीप्रसंगी काही बाचाबाची झाली. आणि प्रतिस्पर्ध्याने खाँसाहेबांच्या छातीवर एक जोरदार गुद्दा लगावला. काही काळ ते बेशुद्ध झाले. तरूण वय असल्याने त्यावेळी खाँसाहेब त्या गंडांतरातून बचावले. पण पुढे त्या प्रसंगाचा त्रास जाणवू लागला. एकसारखी धाप लागू लागली. थोडा वेळ सुद्धा गाता येईना. किंबहुना थोडा वेळसुद्धा गाता उपयोगी नाही असाच डॉक्टरी सल्ला पडला. पालपिटेशन्स वाढली. एक असाध्य रोग असंच त्यांच्या आजाराचे स्वरूप (निदान त्या काळात तरी) बनले.

त्याच सुमारास किंवा काही काळ आधी, वर अुल्लेखलेल्या गुलामअुद्दीनचा किस्सा,-आबासाहेबानी मरणाच्या दाढेतून त्याला कसा ओढून काढला, याची कथा कोल्हापुरात सर्वत्र बोलली जात होती. खाँसाहेबांच्या निकटवर्तियाना साहजिकच शेवटचा अुपाय म्हणून आबासाहेबाना दाखवावं असं वाटू लागलं. पण "शहाण्या डॉक्टरकडून आलेलं मरण परवडलं पण वैद्यबिद्य काही नको" असं काही त्यांच्या चाहत्यांचं मत पडलं. पण अखेरीस डॉक्टरी अुपचारांचा काहीही अुपयोग नाही, त्यानीहि आशा सोडल्यासारखे झाले तेव्हा मात्र त्यांचेच एक डॉक्टर चाहते, सर भालचंद्र भडकमकरसारख्या डॉक्टरानी "सांबारे वैद्यांकडे अवश्य जा" असे सांगितले.

मग खाँसाहेब आबासाहेबांकडे आले.

आबासाहेबानी काय जादू केली ते एक परमेश्वर जाणे. त्यांच्या अुपचारानी खाँसाहेबाना खरोखरच थोडंथोडं बरं वाटू लागले.आराम पडू लागला. हळूहळू चालता-बोलतानाची धाप थोडीथोडी कमी झाली.

पण गाणं गायचा धीर मात्र त्याना होईना.

आबासाहेबानी सांगितलं तरी धीर होईना. गायचा प्रयत्न केला आणि पुन्हा काही झालं तर? ही भीती त्यांच्या मनात होती. तेव्हा स्वत: आबासाहेबानी प्रेमळपणे समजावलं, म्हणाले ''अहो तुम्ही मोठे गवई. तुमचं गाणं जगलं तर तुम्ही जगलात. एरवी निर्माल्य होऊन जगण्यात आणि मरण्यात काय अर्थ आहे?''

अितकं सांगूनही खाँसाहेबांची भीती कमी झाली नाहीच.

आबासाहेब संगीतप्रेमी होते. अस्सल जाणकार होते. ते स्वत: हार्मोनियम, पखवाज वाजवत. एकदा तेरदाळ मुक्कामी असताना त्यांचे स्नेही तात्यासाहेब कोटणीस यांच्याकडे राहिले. त्यांचे कीर्तन ऐकताना तात्यासाहेब थोडेसे तालाला कच्चे आहेत असे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा आबासाहेबानी स्वतः मेहनत घेऊन त्यांचे तालाचे अंग पूर्णपणे अव्यंग केले. म्हणजे अशी 'संगीत दुखणी' पण ते बरी करत! त्यामुळं कलाकाराच्या जीवनात, त्याच्या कलेचे स्थान किती विलक्षण महत्त्वाचं असतं, ह्याची त्याना जाण होती. खाँसाहेबांसारखा श्रेष्ठ कलावंत वाया जाऊ नये म्हणून ते त्यांची, त्यानी गावं म्हणून, अेकसारखी मनधरणी करत होते. पण खाँसाहेब काही ऐकेनात. अखेरीस आबासाहेबानी आपला स्वर 'जरा वरच्या' पट्टीत लावला. त्यानी खडसावून सांगितलं ''माझ्या औषधासाठी गाणे हेच पथ्य आहे. मी सांगतो तसं तुम्ही करणार नसाल, तर अुद्यापासून माझं औषध बंद.''

ही मात्रा मात्र एकदम लागू पडली!

कारण आबासाहेब औषध बंद करणार म्हणजे ग्रंथच आटोपला!! ''कयामत आली'' असं म्हणत खाँसाहेबानी, गाण्याचा रियाझ करायला सुरवात केली. आबासाहेब स्वत: समोर बसत. एक-दोन मिनिटे गायचं नंतर पाच-सहा मिनिटे गायचं असा प्रयोग सुरू झाला. त्याना धाप लागण्याच्या आत आबासाहेब स्वत:च त्यांचं गाणं बंद करीत. मग हळूहळू आबासाहेबानी त्यांच्या गाण्याचा अवधी वाढवायला सुरवात केली. ''आता आपल्याला धाप लागत नाही'' हा दृढ विश्वास त्यांनी खाँसाहेबांच्या मनात निर्माण केला. (अर्थात त्याना स्वत:ला तशी खात्री होतीच!) त्यातून अेखादे वेळेस ढास लागलीच तर ती औषधाच्या एक दोन डोसांमध्येच थांबते हेहि खाँसाहेबाना

कळून चुकलं होतं.

हा 'चमत्कार' घडलाच कसा, याचं खाँसाहेबाना, राहून राहून नवल वाटत होतं. आबासाहेबांनी अक्षरश: त्यांचा पुनर्जन्मच घडवला होता. सागराच्या तळाशी गेलेले हे सुवर्ण-माणिक, अनमोल सुवर्णरत्न, संगीत रसिकजनांच्या हाती सुखरूप आणून पोचवलं होतं.

थोड्याच कालावधीनंतर खाँसाहेब अगदी पूर्वीसारखे गाऊ लागले. एक नाही, दोन नाही, तर तब्बल २८ वर्षे ते त्या आजारानंतर जगले. नुसतेच जगले नाहीत तर संगीत-सम्राट म्हणून जगले. आबासाहेब सुरूवातीला त्याना म्हणाले होतेच. ''तुमचं गाणं 'जगलं' तरच तुम्ही जगलात.''

किती सार्थ होतं ते बोलणं!

या प्रसंगानंतर खाँसाहेब आबासाहेबांच्या गणेशोत्सवात नित्यनेमाने येऊन गायला लागले. त्यांच्यामुळे अनेक गवई मंडळी आबासाहेबांच्या सान्निध्यात आली. त्यांच्या गणपतीपुढे भक्तिभावाने गाऊ लागली. त्यांच्या गणेशोत्सवाची कीर्ती सर्वदूर पसरली.

आबासाहेबांची ओसरी म्हणजे एक गुणीजनांचा दरबारच होता. साधुदासांसारखा प्रतिभाशाली कवी, कोटणीसमहाराजांसारख्या सत्पुरूषापासून, तो शेताच्या बांधावरच्या दुर्मिळ वनस्पती घेऊन येणाऱ्या खेडुतांपर्यंत, सर्व जनांची त्यात अुपस्थिती असे. गणपती मंदिरात पूजा सांगणारे सांबारे घराणे, पण खुद्द आबासाहेबांच्या वागण्यात स्पृश्य-अस्पृश्य, अुच्च-नीच, श्रीमंत-गरीब असा भेद 'औषधा' पुरतासुद्धा नव्हता. प्राण जाण्याच्या भीतीने घाबरून गेलेले सर्व जाती-जमातीचे रोगी डोळ्यात 'प्राण' आणून आपल्या व्याधीवर आबासाहेब केव्हा अुपचार करतील याची वाट पहात असत. आबासाहेब कधी कुणाची निराशा करीत नसत.

खुद्द लोकमान्य टिळकांची आबासाहेबांवर श्रद्धा होती. आबासाहेबांचा पुण्यातही दवाखाना होता. आपल्या मधुमेहाच्या व्याधीसाठी लोकमान्य त्यांच्याकडून औषध आणवीत असत. १९२० च्या फेब्रुवारीमध्ये, ज्योतिष-संमेलनाच्या निमित्ताने, लोकमान्य सांगलीस आले असताना आवर्जून सांबारेवाड्यात जाऊन आबासाहेबाना भेटून गेले. त्यांचा प्रचंड मोठा गणपती पाहून आश्चर्यचकित झाले. नंतर लोकमान्य अिंग्लंडमध्ये जायचे होते. म्हणून तिकडे जाताना आबासाहेबांकडून तीन महिन्याचे औषध घेऊन गेले होते पण दुर्दैवाने अिंग्लंडहून आल्यानंतर, त्याच वर्षीच्या १ ऑगस्टला त्यांचे निधन झाले. असं सांगतात की आबासाहेबानी लोकमान्यांची तब्येत तपासून त्याना

विनंती केली होती की कमीतकमी तीन महिने, त्यानी आबासाहेबांच्या नजरेसमोर, सांगलीत रहावे. लोकमान्यांना त्यांच्या धकाधकीच्या जीवनातून, असे निवांत तीन महिने देणे शक्यच नव्हते. पण तसे ते राहते तर कदाचित् खाँसाहेबांसारखा एखादा चमत्कार घडलाही असता! आबासाहेबांजवळ राहून अुपचार करून घेण्यासाठी, नाथमाधवांसारखे सुप्रसिद्ध लेखक त्यांच्या पायाच्या व्याधीसाठी येऊन राहिले होते. सुप्रसिद्ध गायिका मोगुबाई कुर्डीकर, त्यांचा घसा खराब झाला, तेव्हा आबासाहेबांचे औषधोपचार लाभावेत म्हणून त्या सांगलीत येऊन राहिल्या होत्या.

पण दैवदुर्विलास असा की, हा लोकविलक्षण धन्वंतरी, स्वत: मात्र १९३३ च्या प्लेगच्या साथीचा बळी ठरला.

त्यानी लोकमान्यांचा संदेश सामान्य जनांमध्ये पोचवणारा दिमाखदार गणपती-अुत्सव १८९९ मध्ये सुरू केला त्या गोष्टीला १९९९ साली १०० वर्षे पूर्ण झाली आहेत.

त्या शताब्दीवर्षाच्या निमित्ताने, त्यांचे पुनर्स्मरण होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

●●●

## योगभ्रष्ट प्रतिभावान कवी

# साधुदास

ऐतिहासिक कादंबऱ्यांचं विलक्षण प्रेम असणारा, विशेषत: हरीभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्यानी भारावलेला एक रसिक एकदा माझ्या एका सांगलीकर मित्रास भेटला. म्हणाला 'अरे, आत्तांच मी तुमच्या सांगलीच्या साधुदासांची ''पौर्णिमा'' कादंबरी वाचली. काय विलक्षण सुंदर कादंबरी आहे रे? अगदी आमच्या हरीभाऊंच्या तोडीस तोड म्हणेनास. कोण होते हे साधुदास? आणखी कुठल्या कादंबऱ्या आहेत त्यांच्या?''

माझा मित्र बुचकळ्यात पडला. कोण हे साधुदास?

सामान्य सांगलीकर बुचकळ्यात पडेल तर नवल नाही. पण वाङमयीन अभ्यासकालासुद्धा 'साधुदास' हे नाव तसं माहीत असणं कठीणच.

खरंच कोण होते हे साधुदास?

साधुदास हे एक अुपजत आणि अद्भुत काव्यप्रतिभा लाभलेले विलक्षण कवी होते. भूतपूर्व सांगली संस्थानचे राजकवी होते. ते प्रथम कवी होते. कादंबरीकार, चरित्रकार वगैरे वगैरे तदनंतर.

अशा या साधुदासांचे मूळ नाव गोपाळ धोंडो पाटणकर. त्यांचा जन्म १७ फेब्रूवारी १८८४ चा. त्यांचे पूर्वज कोकणातून देशावर आले. सांगलीकर पटवर्धन घराण्याची पाटणकर मंडळी हे आप्तजन. त्यामुळे सांगली संस्थानात त्याना इनाम जमिनी मिळाल्या होत्या. खुद्द साधुदासांचे आणखी नशीब म्हणजे ते सांगलीतील घरंदाज, सुखवस्तू गृहस्थ कै. गणेश महादेव मोडक यांचे घरजावई बनले. त्यामुळे त्याना आर्थिक ददात अशी कधी पडली नाही. त्यांचे वडील, धोंडो गोपाळ पाटणकर, ब्रिटिश राज्यात सर्व्हेअर होते. त्यांच्या या मोजणी कामाच्या व्यवसायामुळे त्याना ''मोजणीदार-मुजुमदार'' असं नाव पडले. तेव्हा साधुदासानी मुजुमदार हेच नाव कायम ठेवलं. असं करायला त्यावेळी आणखी एक तात्कालिक कारण घडलं. त्यांच्या शाळेत 'गोपाळ धोंडो पाटणकर' या नावाचा आणखी एक विद्यार्थी होता.

दोन विद्यार्थी सारख्याच नावांचे. या नामसादृश्यामुळे अनेक वेळा घोटाळे अुडत. परीक्षेच्या वेळी दोन्ही नावांची गल्लत व्हायला नको म्हणून साधुदासानी मुजुमदार हे आडनावच कायम ठेवले. चुलत चुलत्याना दत्तक गेल्यानंतर, आणखी एक बदल घडून 'गोपाळ धोंडो मुजुमदार' या ऐवजी ते 'गोपाळ गोविंद मुजुमदार' झाले.

साधुदासांचे प्राथमिक, दुय्यम शिक्षण सांगलीतच झाले. सांगली हायस्कूलचे ते विद्यार्थी. तिथं श्रीपादशास्त्री देवधर हे प्रख्यात शिक्षक संस्कृत शिकवत. मॅट्रिकच्या परीक्षेत आपल्या विद्यार्थ्याना, जगन्नाथ शंकरशेट ही संस्कृत विषयाची शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी, त्यांची सतत धडपड असे. विद्यार्थ्यांकडून कसून तयारी करुन घेऊन असे अनेक विद्यार्थी ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती मिळवून गेले होते. साधुदास हे देवधरशास्त्रींच्या आवडत्या अशा विद्यार्थ्यांपैकी होते. शास्त्रीजीनी विशेष परिश्रम घेऊन, त्यावेळच्या इंग्रजी ५ वीच्या वर्गात असतानाच, साधुदासांकडून कालिदास, माघ इत्यादी प्रमुख कवींचे काव्यग्रंथ अभ्यासून घेतले होते. साधुदासांचा इतर विषयांचा अभ्यासहि चांगला असे. गणित हा तसा नावडता विषय असूनहि त्यांचा वर्गात नेहमी पहिला नंबर असे. घरी रोज संध्याकाळी, त्यांच्या मातोश्री, भक्तिविजय, पांडव-प्रताप आदी ग्रंथ वाचून घेत. त्यामुळे संतवाङमयाची पारायणे अनायासे बालपणातच घडली.

आपल्यामध्ये काव्यगुण आहेत, याचा त्याना स्वतःला शोध, बालपणातच लागला होता. मिस्किल, थट्टेखोर स्वभाव, आणि सहजपणे शब्द कवितेत पेरता येतात याची त्याना स्वतःला झालेली जाणीव, यामुळे ते येता जाता कवने करु लागले. त्यांच्या घरी जहांगीळमामा अशा विचित्र नावाचे एक भटजी येत असत. पुख्खा झोडण्यासाठी सदैव अुत्सुक असलेल्या त्यांच्या बुभुक्षित वृत्तीची चेष्टा करताना वयाच्या ११व्या वर्षी त्यानी "गरूड जसा गगनातुनि झेपावे अमृताचिया कुंभा, तैसा मामा धावे ऐकुनि झोडावयासि अुदकुंभा" अशी आर्या रचली. एका तिरळ्या डोळ्याच्या नारबा नावाच्या माणसावर "नाऱ्या ---तू तिरवा, परंतु बरवा" अशा प्रकारच्या कविता रचत असत. यात थोडा चहाटळपणाचा भाग असला, तरी पुढे प्रसिद्ध पावलेल्या त्यांच्या शीघ्रकवित्वाची पेरणी, अशा कवितांमधूनच झाली असावी.

मात्र साधुदासांना त्यांचे हे काव्यप्रेम, मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी, चांगलेच भोवले. देवधरशास्त्रीनी शंकरशेठ शिष्यवृत्तीसाठी त्यांची चांगली तयारी करुन घेतली होती. ऐन परीक्षेच्या वेळी, इंग्रजीचे संस्कृत भाषांतर करण्याच्या प्रश्नाच्या वेळी, सरळ भाषांतर करायचे सोडून, साधुदास प्रहर्षिणी वृत्तामध्ये करत बसले. त्यामुळे त्यातच वेळ खर्ची पडून शिष्यवृत्ती हुकणार होती हे सांगायला कुणा ज्योतिषाची

गरज नव्हती.

मॅट्रिकनंतर पुढील शिक्षणासाठी साधुदासानी पुण्याला प्रसिद्ध फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश घेतला. पण काय बिनसले कुणास ठाऊक? पहिल्या टर्मनंतर ते सांगलीला परतले ते कॉलेजला रामराम ठोकूनच!

ही घटना १९०३ सालची. म्हणजे त्यावेळी ते जेमतेम १९-२० वर्षाचे होते. पुढच्याच वर्षी ते त्यांच्या दुधगावच्या चुलत-चुलत्यास दत्तक गेले. पण दुधगावला त्यानी कधी फारसे वास्तव्य केले नाही.

काही काळ नोकरी करावी, अशा हेतूने त्यानी सांगली संस्थानात, बेलिफाची नोकरी पत्करली. बेलिफाचे काम म्हणजे जप्त्या आणि वसुली. त्यात त्यांचे मन रमेना. एका प्रसंगात त्याना कुणीतरी लाच द्यायचा प्रयत्न केला. त्यामुळे वैतागून त्यानी नोकरीच सोडली.

यानंतरची दहा-बारा वर्षे त्यांनी संपूर्णपणे स्वस्थतेत घालवली. कोणतीहि नोकरी धंदा न करता! घरची स्थिती चांगली असल्यानेच त्याना असा स्वस्थतेत काळ घालवणे शक्य झाले. या काळात त्यानी बराच वेळ बुद्धिबळे खेळण्यात घालवला. या खेळाचं त्याना अतोनात वेड लागलं. त्यापायीच त्यानी कॉलेजशिक्षणाकडं दुर्लक्ष केलं असं म्हणतात!

या स्वस्थतेच्या काळात, सांगलीतील दोन मातब्बर व्यक्तींबरोबर त्यांचा संबंध आला. पहिले म्हणजे राजवैद्य आबासाहेब सांबारे. आबासाहेबांचं घर म्हणजे त्या काळातील सांगलीतील एक संस्थाच होती. वैद्य म्हणून त्यांची कीर्ती दिगंत होतीच पण त्याबरोबर संगीतात त्याना मोठी रुची होती, जाणकारी होती. बाळकृष्णबुवा, रहिमतखाँ, अल्लादियाखाँ अशा मोठमोठ्या गवयांचे त्यांच्याकडं गाणं होई. साधुदासांच्या शब्दात म्हणजे असं गाणं त्यानी 'अुमाप' ऐकलं. त्यामुळे त्यांचा स्वत:चा संगीताचा व्यासंग वाढला. संगीताच्या परिश्रमपूर्वक केलेल्या अभ्यासामुळेच, त्याना बाळकृष्णबुवा आणि रहिमतखाँ यांचेवरील मृत्युलेख लिहिताना, त्यांच्या गायनशैलीसंबंधी अधिकारवाणीने लिहिता आले.

दुसरी महनीय विभूती म्हणजे सांगलीतील परोपकारी संत कै. हणमंतराव तथा तात्यासाहेब कोटणीस. ते स्वत: वकिलीचा व्यवसाय करता करता बाकीचा वेळ हरी-कीर्तनात घालवीत. ते स्वत: संतवाङ्मयाचे अभ्यासू होते. साधुदास त्यांच्या सान्निध्यात आल्यावर एवढे भारून गेले की त्यानी त्यांच्या संप्रदायाचा अनुग्रह घेतला. कोटणीस महाराजांबरोबर अनेकदा कीर्तनप्रसंगी साथ करण्यासाठी ते अुभे राहात आणि संतांची पदे म्हणता म्हणता स्वरचित पदेही म्हणत. या साधुपुरुषामुळे

ते एवढे प्रभावित झाले होते की त्यांच्या मृत्युनंतर, त्याना त्यांचे चरित्र लिहिल्याशिवाय राहवेना. त्यामुळेच एक अप्रतिम, रसाळ चरित्र लिहिले गेले.

१९०३-४ पर्यंत साधुदासांचा अभ्यास प्रामुख्याने संस्कृत वाङमयाचा होता. कोटणीस महाराजांमुळे त्यांच्या हातात ज्ञानेश्वरी आली. या दहा-बारा वर्षांच्या स्वस्थतेच्या काळात त्यानी भरपूर वाचन केले. चिंतन केले. संतकाव्याचा फार बारकाईने अभ्यास केला. नित्य-नेम म्हणून ४०वर्षे त्यानी ज्ञानेश्वरीचे वाचन केले. या काळातील अभ्यासामुळे त्यांचे भाषाप्रभुत्व स्वयंसिद्ध झालेले होते.

१९१५ साली सांगली हायस्कूलमध्ये एका मराठी भाषा-शिक्षकाची जागा रिकामी झाली. सांगलीच्या राजेसाहेबांच्या अिच्छेमुळे साधुदासानी ही जागा पत्करली. ही नोकरी त्यानी १६ वर्षे केली. १९३१ ते १९४० या काळात त्यानी संस्थानातील स्टेट प्रेसचे सुपरिटेंडंट म्हणून काम केले.

६ एप्रिल १९४८ रोजी सांगलीतच कॅन्सरच्या दुखण्यात त्यांचे निधन झाले.

शिक्षक म्हणून साधुदासांचा स्वत:चा काळ फार आनंदात गेला. मात्र विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने त्यांचे अध्यापन जरा कठिणच होते. कारण त्यांची एकूण वृत्ती शिक्षणशास्त्राच्या तंत्रात बसणारी नव्हती. नेमक्या वेळेला अभ्यासाचा तास सुरु करुन, नेमक्या वेळेत संपवणे, हा खाक्या त्याना जमण्यासारखा नव्हता. आजच्या जमान्यात तर परवडलेच नसते. पण संस्थानी काळ होता. राजेसाहेबांची मर्जी होती म्हणून निभावले. मात्र एरवी त्यांचा तास म्हणजे काव्यशास्त्रविनोदाची मोठी पखरण होती. मूळ विषयाच्या अनुषंगाने, अनेक चपखल अुदाहरणे, आख्यायिका, यांची धमाल असे. त्यांच्या स्वत:च्या विनोदी वृत्तीमुळे त्यांचे तास रंजक होत. विद्यार्थ्यांना ते बहुश्रुत करुन सोडत. स्नेहसंमेलन वा अन्य समारंभ प्रसंगी सुंदर पदे रचून विद्यार्थ्यांकडून ते परिश्रमपूर्वक स्वत: बसवून घेत. नाटकाच्या तालमी घेत; जागेची अडचण असे तेव्हा स्वत:च्या घरी तालमी घेत. त्यामुळे विद्यार्थीवर्गात ते अत्यंत लोकप्रिय होते. कधी कधी त्यांच्या तासाची वेळ झालेली असे आणि साधुदास गाढ निद्रेच्या आधीन झालेले असत. अशा वेळी त्याना अुठवून आणावे लागे. पण एकदा का शिकवायला सुरुवात केली की मग ते पूर्णपणे त्यामध्ये रंगून जात. इंग्रजी कविता शिकवताना, कधी संस्कृत श्लोकांत त्यांचे भाषांतर करुन दाखवत तर कधी तुकारामाचा अभंग शिकवताना, त्या अभंगासारखेच पाच सहा अभंग, तत्क्षणी करुन दाखवत. विध्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे त्यांची अुपजत काव्यप्रतिभा बहरून येई; दुथडी भरून वाहू लागे.

साधुदासांच्या कादंबऱ्या १९३१ नंतर प्रकाशित झाल्या. (गद्यलेखन ते गो.गो. मुजुमदार या नावाने करत.) त्यानी गद्य-लेखन पुष्कळ केले, चांगले केले. पण त्यांची खरी प्रतिभा जन्मजात कवीची होती. संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासामुळे, त्याना कालिदासाच्या रघुवंशाचे मोठे आकर्षण होते. त्या प्रेमापोटीच त्यानी रघुवंशावर आधारित अशी महाकाव्य रचना केली. वनविहार, रणविहार व गृहविहार अशा तीन विभागात ही रचना आहे. या महाकाव्यात त्यानी ४० हून अधिक अशा निरनिराळ्या वृत्तांचा अुपयोग केला आहे. छंदशास्त्रावरील त्यांच्या विलक्षण प्रभुत्वाने इतिहासाचार्य राजवाडेसुध्दा प्रभावित झाले होते.

पूजेला बसल्यावर एक तरी कविता वा श्लोक देवाला अर्पण करण्याचा. कित्येक वर्षे त्यांचा परिपाठ होता. पूजा झाली की इतर फुलांसारखे त्या कवितांचेपण निर्माल्य होई. त्यातून बचावलेल्या कवितांचा पुढे संग्रह निघाला. तोच पुढे 'निर्माल्य संग्रह' (भाग-१,२) म्हणून प्रसिध्द झाला. त्यानी पंडिती थाटाची रचना केली; तरीसुध्दा त्याना लोकगीते, पोवाडे, भोंडल्याची गाणी, झिम्म्याची गाणी, भारुडे, फुगडीचे अुखाणे, आरत्या, अशा प्रकारांविषयी आस्था होती. त्यानी अशा प्रकारांचे संकलन करुन ती 'मराठी गाणी' म्हणून प्रकाशित केली.

'शीघ्रकवित्व' हा साधुदासांच्या प्रतिभेचा विलोभनीय विशेष होता. वर्गात शिकवताना बघता बघता ते तुकारामासारखे अभंग रचत किंवा मोरोपंतासारख्या आर्या तोंडी सांगत. सांगली संस्थानासाठी एक 'संस्थानगीत', राजेसाहेबाना हवे होते: तेव्हा बँडच्या अवघड सुरावटीवर म्हणता येतील, अशी दहा गीते अवघ्या तासाभरात त्यानी लिहिली. त्यातलेच एक गीत राजेसाहेबानी पसंत केले. "हेरंबा अतिसदया, रक्षी पार्वति-तनया, 'पटवर्धन' वरद सुता, नृपतिस सांगलीच्या या" हे गीत जुन्या सांगलीकर मंडळीना सुपरिचित आहे. एकदा साधुदासांचे एक कविमित्र सुमंत, त्यांच्या घरी आले होते. मुक्काम संपल्यावर ते निघाले. स्टेशनवर त्याना पोचवण्यासाठी साधुदास गेले. गाडीला पंधरा-वीस मिनिटे बाकी होती. दोघा कवीनी ठरविले की परस्परांचा निरोप आपण काव्यात घेऊ. सुमंत कवीनी पंधरा मिनिटे घेतली तर साधुदासानी अवघी पाच! दोघांच्याहि कविता अुद्धृत करण्यासारख्या आहेत; पण विस्तारभयास्तव देता येत नाहीत. सुरुवातीच्या ओळी अशा होत्या.

सुमंत: "निरोप मजला दे रे मित्रा! दे निज गावा जाया ।<br>
समान हृदये मिळून गेली, भिन्न जरी काया ॥"

..............................................

साधुदास: "आला आधी अपरिचितापरी त्यासि ठाव दिधला ।<br>
अपरिचिताचा परिचित होऊनि बद्धमूल झाला ॥

.........................................

मनामनाचा मेळ जाहला नभाहुनी थोर ।
निरोप घेऊनि आता मित्रा कोठे जाणार?''

त्यांच्या एका सत्कार समारंभात, त्यांच्या विद्यार्थ्यांनी आग्रह केला म्हणून त्यानी निरनिराळ्या वृत्तांमध्ये आभार मानले.

एकदा तर त्यांच्या शीघ्रकवित्वाची कसोटीच लागली; आणि ती सुद्धा एका मातब्बर अशा कवीपुढे! त्याचं असं झालं :

एकदा सुप्रसिद्ध कवि रेंदाळकर सांगलीला आले होते. त्याना साधुदासांचे शीघ्रकवित्व हे काहीतरी गौडबंगाल असावे असे वाटे. पहाटे अुठल्यावर त्यानी पेन आणि कागद साधुदासांसमोर धरले; आणि आत्ताच्या आत्ता कविता लिहा म्हणून, सांगितले. अशी परीक्षा होईल याची साधुदासाना तिळमात्र कल्पना नव्हती. तरीपण न गडबडता, त्यानी कोणत्या विषयावर कविता लिहू असे विचारले, तेव्हा रेंदाळकर म्हणाले, ''वाटेल त्या विषयावर लिहा.'' साधुदास म्हणाले, ''आता ते चालणार नाही, विषय तुम्हीच द्या. नाहीतर म्हणाल की कविता पूर्वीच करुन ठेवली होती'' रेंदाळकर म्हणाले, ''मग मी कविता मागत आहे याच विषयावर लिहा.''

लागलीच चोवीस ओळींची कविता सरसर लिहून साधुदासानी रेंदाळकरांच्या पुढ्यात ठेवली. तेव्हा ते चाट पडले. पुढे ही हकीकत त्यानी सुप्रसिद्ध कादंबरीकार, हरीभाऊ आपटे, याना सांगितल्यावर त्याना पण आश्चर्य वाटले. ताबडतोब त्यानी ती कविता आपल्या 'करमणूक' मध्ये प्रसिध्द केली.

त्या गाजलेल्या कवितेचे काही चरण असे होते.

''कविने कविता मज मागितली, करण्या बसल्या समयी कथिली ।
कविता मज पाहुनिया रुसली, तरि आज करु कविता कसली ॥
कविता स्वर का विण्यामधले, म्हणूनी तुज छेडुनि दावू भले ।
कविता गुज बोल मनापुरता, प्रिय तू बन, मी करितो कविता ॥''

इतके शीघ्रकवित्व अंगी असूनहि, खुद्द साधुदासाना त्याचे काही विशेष वाटत नसे. ते म्हणत की हे सारे सरावाचे काम आहे. काव्याचा मुख्य गाभा म्हणजे रसपरिपोष. वृत्ताच्या साच्यात घालण्याचे काम फारसे महत्त्वाचे नाही.

साधुदासानी सहज म्हणून अनेक काव्ये रचली. एखादा विशेष समारंभ, दरबारातील प्रसंग, दसऱ्याचे सोने, तिळगूळ समारंभापासून अगदी नामकरण समारंभापर्यंत, अनेक निमित्ताने त्यानी कविता लिहिल्या. श्वास घ्यावा अितक्या सहजतेने ते कविता

लिहित. स्वागतपर पद्यांकडं कुणी फारसं गांभीर्यानं पाहात नाही. पण सांगलीत जो नाट्यमहोत्सव झाला, त्यावेळचं श्रुतिमनोहर व अर्थवाहक स्वागतपर पद्य ऐकून, प्रा. श्री. म. माटे यानी आवर्जून कवीची चौकशी केली.

ते कवि साधुदास होते हे सांगायला नकोच.

दुर्दैवाने त्यांच्या अशा कविता, किंवा निरनिराळ्या मासिकांमधून प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची, गणतीच कोणी ठेवली नाही. साधुदासांसारख्या प्रसिद्धी-पराङ्मुख कवीला तर अशा अगणित कवितांची मोजदादच नव्हती. सुप्रसिद्ध कवि रे. ना वा. टिळकानी एका कवितेत बहरलेल्या वेलीचे वर्णन करताना म्हटलयं की ''किती आपुली, फुले अुमलली, कुठे लटकली। पर्वा न तयाची वेलीला, सुंदरतेची ही लीला ॥''

साधुदासांच्या काव्यरचनेला हे वर्णन तंतोतंत लागू पडते. त्यांची प्रतिभा बंद कुलुपात ठेवलेल्या कृपणाच्या संपत्तीसारखी नव्हती तर खुष होताच हातातील कडं भिरकवणाऱ्या खानदानी श्रीमंताच्या संपत्तीसारखी होती. कुणा संशोधकाने त्यांची अशी विखुरलेली काव्यरत्ने एकत्र करुन पुस्तक काढलं, तर काव्यरसिक नक्कीच त्याला मनापासून दुवा देतील.

कवी यशवंत तर त्याना गुरुस्थानीच मानत असत. काव्यशास्त्राचे पहिले-वहिले धडे त्यानी साधुदासांच्या हाताखालीच गिरवले.

ऐतिहासिक कादंबरीलेखनाला, त्यानी आयुष्याच्या अुत्तरार्धात सुरुवात केली. त्याचे थोडे-फार श्रेय सांगलीच्या राजेसाहेबांकडे जाते. तो गुणग्राहक राजा, साधुदासांच्या वाङ्मयनिर्मितीकडे, कौतुकाने पहाणारा रसिक होता. साधुदासांची इतिहासाची आवड आणि त्यांची चटकदार कथनशैली, राजेसाहेबाना परिचित होती. ''आपण पूर्वजांच्या ऐतिहासिक गोष्टी लोकांपुढे अुत्तम तऱ्हेने ठेवू शकाल'' असे श्रीमंत म्हणाले. त्यामुळेच ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याची स्फूर्ती झाली असे साधुदास कृतज्ञतापूर्वक म्हणत असत.

ऐतिहासिक कादंबऱ्या जरी साधुदासानी अुशीरा लिहिल्या असल्या तरी इतिहास हा त्यांच्या जिव्हाळ्याचा आणि अभ्यासाचा विषय होता. कै. वासुदेवशास्त्री खरे, राजवाडे, पारसनीस प्रभृतींनी जी ऐतिहासिक साधने प्रसिद्ध केली होती त्याचा त्यानी कसून अभ्यास केला होता. सांगली संस्थानातील नोकरीमुळे, संपूर्ण पटवर्धन दप्तर, त्याना अभ्यासता आले. पण हा झाला अभ्यासाचा भाग. त्याना स्वत:ला पेशवाई हा अत्यंत प्रेमाचा भाग वाटत असे. ते स्वत: प्रखर स्वदेशाभिमानी असल्याने

''एकेकाळी सर्व हिंदुस्थानभर पसरलेले आमचे साम्राज्य आम्ही कोणत्या चुका करुन घालवले आणि स्वराज्यप्राप्तीकरता चाललेल्या सांप्रतच्या झगड्यात, आणि पुढे मिळणाऱ्या स्वराज्यात, पूर्वी झालेल्या चुकांची पुनरावृत्ती न व्हावी '' अशा मुख्य हेतूने त्यानी ऐतिहासिक कादंबरीलेखन केले. तसे त्यानी पहिल्या कादंबरीच्या प्रस्तावनेतच नमूद केले आहे. महाराष्ट्राच्या साम्राज्याचा आणि पर्यायाने हिंदुस्थानचा १७६७ पासून १८१८ पर्यंतचा म्हणजे श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या कालापासून ते पेशवाईचा अस्त होईपर्यंतच्या काळाचा इतिहास त्याना कादंबरीच्या माध्यमातून एकूण १६ भागात सांगायचा होता. दुर्दैवाने त्यापैकी तीनच कादंबऱ्या पूर्ण होऊ शकल्या. पहिल्या 'पौर्णिमा' या कादंबरीत, श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या काळातील, मराठ्यांच्या ऐन अुत्कर्षाचे कथानक आहे. 'मराठेशाहीचा वद्यपक्ष-प्रतिपदा' या कादंबरीत, हैदरअलीला पेशव्यानी नेस्तनाबूत केले त्याची हकीकत आहे; तर 'द्वितीया' या तिसऱ्या कादंबरीत श्रीमंत नारायणराव पेशवे यांच्या दहा महिन्यांच्या दुर्दैवी कारकीर्दीचे चित्रण आहे. ऐतिहासिक सत्याचे अचूक भान, चित्तवेधक लेखनशैली, अुत्तम स्वभावचित्रणे, प्रत्ययकारी वर्णने, यामुळे या कादंबऱ्या अत्यंत वाचनीय झाल्या आहेत. जुन्या चालीरीती, वस्त्रभूषणे, तत्कालीन खेळ-करमणुकी, जुने वाक्प्रचार या सर्वांची साधुदासाना अुत्तम माहिती असल्याने, कादंबरीतील प्रसंगात वाचक गुंगून जातो. नुसत्या दागिन्यांच्या आणि जेवणावळींच्या वर्णनाने दिङ्मूढ होतो. सोन्याचे दागिने इतक्या विविध प्रकारचे असतात हेच आधी कुणाला माहीत नसते! साधुदास दागिन्यांची माहिती करुन घेण्यासाठी एका म्हाताऱ्या सोनाराकडे हेलपाटे घालत. हत्तीच्या अंगावरील साजाची माहिती करून घेण्यासाठी, माहुताशी मैत्री जोडत. तास् न तास निरीक्षण करीत. अशा प्रयत्नांमुळे कादंबरीतील वर्णने हुबेहुब वठत. साधुदासानी कादंबऱ्यातून रेखाटलेले, शनिवारवाड्याचे वर्णन अस्सल आहे, असे शिफारसपत्र अनेक तज्ज्ञांनी दिलेले आहे.

अेवढ्या ताकदीची कादंबरीमाला पूर्ण न व्हावी हे रसिकांचेच दुर्दैव होय. एरवी हरिभाऊ, नाथमाधव यांच्या बरोबरीने साधुदासांचे नाव ऐतिहासिक कादंबरीच्या बाबतीत घेतले गेले असते.

काव्य आणि कादंबरी याखेरीज साधुदासानी आणखीही गद्य लेखन केलं आहे. 'राजसेवा' या नावाचं एक नाटक त्यानी लिहिलं होतं. पण पहिल्याच प्रयोगात, एका तत्कालीन बदफैली राजाशी साम्य आढळल्यामुळं, प्रेक्षकांमध्ये हुल्लड माजली आणि पहिलाच प्रयोग अखेरचा ठरला!

आपल्या गुरुस्थानी असणाऱ्या तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे अत्यंत रसाळ

चरित्र साधुदासानी लिहिले आहे. 'मराठी भाषेची सजावट' हा त्यांचा मराठी व्याकरण आणि साहित्य याविषयी चपखल अुदाहरणे देऊन सिद्ध केलेला अभ्यासपूर्ण ग्रंथ अितका आदर्श ठरला की मुंबई आणि नागपूर या दोन्ही विद्यापीठानी टेक्स्ट बुक म्हणून या पुस्तकाचे दोन्ही भाग लावले होते.

साहित्यसेवेखेरीज साधुदासांच्या व्यक्तिमत्वात अनेक विलोभनीय पैलू होते. ते नुसतेच शिक्षक, कवि, कादंबरीकार नव्हते तर बैठ्या खेळांचे जाणकार खेळाडू होते. तबलापटू होते. रसिक संभाषणकार होते. त्यांच्या हास्य-विनोदानी गाजवलेल्या बैठकांची वर्णने आजहि जुने सांगलीकर चवीने करताना आढळतात. गंजिफा, फासे, पत्ते ते खेळतच; पण बुद्धिबळाचे ते नामवंत खेळाडू होते. एकाच वेळी आठ आठ खेळाडूंबरोबर ते खेळत आणि हमखास जिंकत. अनेक मोठ्या स्पर्धा त्यानी जिंकल्या होत्या. स्टेट प्रिंटिंग प्रेसमध्ये नोकरीत असताना, ते बुद्धिबळाची इंग्रजी पुस्तके मागवून, त्यातील गाजलेल्या डावांचा बारकाईने अभ्यास करत. म्हणूनच त्यानी अधिकारवाणीने 'बुद्धिबळाचा मार्गदर्शक' असे एक छोटेखानी पुस्तक लिहिले. संगीततज्ञ प्रा. ग. ह. रानडे यांच्या 'संगीताचे आत्मचरित्र' या पुस्तकाला, त्यानी लिहिलेल्या मार्मिक प्रस्तावनेवरून, त्यांची संगीताची जाणकारी दिसून येते. स्वत: तबलापटू असल्याने, ताल आणि शीघ्रकवित्व यावरील त्यांचे विलक्षण प्रभुत्व दर्शविणारी एक सत्यकथा फार बोलकी आहे. साधुदास, कोटणीसमहाराजांच्या कीर्तनात, गाण्याची साथ करण्यास अुभे रहात याचा अुल्लेख वर आला आहेच. शिवरामबुवा गुरव नावाचे तबलजी साथीला बसत. ते वाजवणारे चांगले होते, पण साथीचे तारतम्य ओळखत नसत. मुख्य गाण्याला बाधा न आणणे ही गोष्ट महत्त्वाची. पण साथीच्या वेळी बोल-परणानी आणि तऱ्हतऱ्हेच्या करामतीनी, कोटणीसमहाराजांना अनेकदा त्रास होई, "बुवा, साधा ठेका लावा" असे वारंवार सल्ले दिलेले असतानाहि ऐन वेळी त्यांची गाडी घसरत असे. साधुदास स्वत: तबल्याचे अुस्ताद. तेव्हा या शिवरामबुवाना थोडीशी 'चुणुक' दाखववावी, म्हणून एकदा कीर्तन चालू असतानाच, त्यानी 'सवारी' तालामध्ये, पंधरा मात्रांचे एक भजन तिथल्या तिथं रचून कोटणीसमहाराजांच्या परवानगीने स्वत:च म्हणायला सुरुवात केली. भजनाचा ताल काही केल्या शिवरामबुवांच्या ध्यानी येईना. ते बुचकळ्यात पडले. शेवटी ठेका लावता येईना म्हणून तबल्यावर हात ठेवून स्वस्थ बसले! मनोमन वरमले. गाणाऱ्यांची नेहमी करत तशी त्यांचीच कोंडी झाली. अर्थात् साधुदासानी नंतर ताल समजावून सांगितल्यावर, बुवानी ठेका लावला. गाण्याला मजा आली तो भाग वेगळा.

ते उत्स्फूर्त रचलेले पद असे होते;

"श्रीराम, जयराम, जयजयराम, सीताराम, राजाराम, मुनि-जनमानस-हंस परात्पर ।।धृ।। ही भवगंगा, कीर्तनगंगा, नवरस-गंगा, निववी अंगा ।।१।। ही रसधारा, परमोदारा, सौख्यागारा, कलिसि अुतारा ।।२।। ही जप-माला, हरिल भवाला, 'साधुदास' कवि देई हवाला ।।३।।"

सांगलीकर राजेसाहेबानी सोन्याचे कडे आणि 'राजकवि' हा किताब देऊन साधुदासाना गौरवलं होतंच, शिवाय तहहयात पेन्शनही दिली होती. कराड येथे भरलेल्या 'दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे' ते अध्यक्ष होते तर सांगली येथे भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. असे थोडे मानमराबत त्याना मिळाले, तरी त्यांच्या अंगभूत प्रसिद्धीपराङमुखतेमुळे, आणि त्याकाळात पुण्या-मुंबईपासून दूर आडगावी असलेल्या सांगलीत राहण्याने, त्यांचा अुदोअुदो कमी म्हणजे फारच कमी झाला ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कन्नड साहित्यिक प्रिन्सिपल गोकाक यांचे काही काळ विलिंग्डन कॉलेजचे प्राचार्य म्हणून सांगलीत वास्तव्य होते. त्याना साधुदासांच्या गुणांची जाणीव होती. त्यानी एके ठिकाणी म्हटलय् की No citizen oF Sangli can afford, not to know Sadhudas. If he can, he has missed one of the pleasures of life.

प्रत्येक वाङमयप्रेमी सांगलीकराने हे आवर्जून लक्षात ठेवायला हवं! नाहीतर प्रारंभी अुद्धृत केलेल्या प्रसंगातील, सांगलीकरासारखी त्याची अवस्था व्हायची!

●●●

# अुद्योगरत्न कै. दादासाहेब वेलणकर

## 'सचोटी, चिकाटी व हातोटी यांचा त्रिवेणी संगम'

रविवार, १ फेब्रुवारी १९४८ ची सकाळ. गांधीहत्येनंतर सांगली गावात सर्वत्र दंगल अुसळली होती. मालमत्तेची होळी पेटली होती. कैफ चढलेली टोळकीच्या टोळकी रस्त्याने विध्वंसक कृत्ये करत, अर्वाच्य शिविगाळ करत हिंडत होती. श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला सर्व पुजाऱ्यांची घरे पेटवण्यात आली होती; सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते भालजी पेंढारकर याना धरुन त्यांचे हातपाय तोडल्याची अफवा सर्वत्र पसरली होती. भयानक बातम्यांवर बातम्या कानांवर पडून सगळीकडे घबराट पसरली होती. कायदा आणि राजसत्ता लुळी पडल्याचे जाणवत होते; पोलिसफाटा असहाय्य दिसत होता. अशावेळी स्वत:च्या अिच्छेविरूद्ध, नातलगांच्या आग्रहापोटी, केवळ एका सदऱ्यावर घराबाहेर पडावे लागलेली, साठी अुलटूनहि ताठ दिसणारी अेक व्यक्ती, सांगली-मिरज रस्त्यावरील राजेसाहेबांच्या गेस्ट हाऊसच्या गच्चीवर अुभे राहून हताशपणे सांगलीच्या दिशेने पहात होती. अंगाची आग आग होत होती. नाडीचे ठोके जोरात पडत होते. नाका तोंडातून कढत श्वास बाहेर पडत होते. सतत चाळीस वर्षे खपून, प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन अुभी केलेली अुद्योगवास्तू आगीच्या, मुद्दाम लावलेल्या, आगीच्या भक्ष्यस्थानी पडत होती. सुताच्या गाठी, रंगीत सुताचे गुदाम, रंगशाळा, कापड-गाठी, मोटारी, गॅरेज सर्व काही जळत होते. क्रूड ऑईलचे हौद पेटले. बेछूट जमाव दिसेल ते पेटवीत होता. श्रीकृपा बंगला, कापसाचे गोदाम, अभ्यागतगृह जळत होते. पेटवायला कंपौअुंडमध्ये पडलेली जळाऊ लाकडे आयतीच दंगलखोरांच्या कामी आली होती.

कधी न खचणारी पण त्या जीवघेण्या क्षणी विमनस्क झालेली व्यक्ति म्हणजे सांगलीचे अुद्योगपती कै. अुद्योगरत्न वि. रा. तथा दादासाहेब वेलणकर आणि आगीच्या ज्वाळात, निष्पाप सतीसारखी जळत असलेली ती वास्तू म्हणजे श्रीगजाननमिलची इमारत.

नियती साप-शिडीचा पट कसा मांडून ठेवते पहा.

अवघ्या १३ महिन्यापूर्वी म्हणजे १९ जानेवारी १९४७ ला दादासाहेब वैभवशिखरावर होते; दैवदुर्लभ अशी सुवर्णतुला थाटामाटात पार पडली होती; दृष्ट लागण्यासारखा सोहळा होता तो. आणि दुर्दैवाने केवळ वर्षभरात खरोखर दृष्ट लागली!

श्रीगजाननमिल जळून खाक झाली. शरमेची बाब म्हणजे हे सगळं मानव-निर्मित होतं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाच्या विषारी प्रचारापोटी प्रक्षोभक गुंडांनी घातलेला तो नंगा नाच होता.

सर्व स्थिरस्थावर झालं. लष्कराची मदत आली. दादासाहेबानी आपल्या सहकाऱ्यांसोबत दुसरे दिवशी जळलेली वास्तू बघितली. कारखान्याच्या आवारात सगळीकडे काळाच काळा रंग दिसत होता. बागेतील लहान लहान फुलझाडेच काय पण शंभर फुटांवरील झाडेही करपून गेली होती. घरावरील उंच पत्रे, कारखान्यावरील पत्रे भाजलेल्या पापडासारखे वाकडे-तिकडे झाले होते. मोठमोठे लोखंडी बीम पार वाकून मराठी 'ळ,' इंग्रजी 'S' आकड्यासारखे वळलेले होते.

खरं म्हणजे दातखीळ बसावी, पाहताक्षणीच वेडाचा झटका यावा, नैराश्यापोटी जीव द्यावा असं वाटायला लावणारी ती परिस्थिती होती. पण खऱ्या सोन्याची कसोटी अग्निसमोरच लागते! एका अदृश्य शक्तीने दादासाहेबांच्या देहात प्रवेश केला. समोर सुंदर ८०० ग्रंथ, वेदांताची टिपणे, गीतारहस्याचे टिपलेले सार जळून पडले होते; पण भगवत्‌गीतेचे चिंतन मनात सजग होते....."अश्नुते स हि कल्याणं व्यसने यो न मुह्यति ।"

फिनिक्स पक्ष्याने राखेतून भरारी मारावी तशी किमया दादासाहेबानी केली. सगळी मरगळ झटकून टाकली. त्यांनी आणि सहकाऱ्यांनी कंबर कसली. अविरत श्रम सुरू झाले. जिद्दीने नित्य कामे सुरू झाली. श्रीगजाननमिल्सची कीर्तिध्वजा त्यांच्या आवडत्या टॉवरसारखी उंचावू लागली. सुवर्णतुला झालेले दादासाहेब, या अग्निपरीक्षेतून आणखीनच झळाळून निघाले.

दादासाहेबांचे सगळे आयुष्य मुळी कसोट्या देण्यातच गेले. त्या दृष्टीने त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण जीवनपटच अुलगडून पहायला हवा. चार आणे मजुरीवर काम करणाऱ्या सामान्य माणसाने, शेकडो कामगारांना भाकरी देणारा कारखानदार व्हावं, हा काही दैवी चमत्कार नव्हता तर यत्नदेवतेची ती अहर्निश पूजा होती. त्या पूजेचे फळ होते.

दादासाहेबांचा जन्म ६जानेवारी १८८७ रोजी वेलणकर कुटुंबातील रामचंद्रपंत वेलणकर यांच्या कुटुंबात झाला. एकूण नऊ मुलांपैकी ते आठवे अपत्य. मूळ नाव विष्णू. साताऱ्याच्या उत्तरेस कृष्णा नदीच्या तीरावर असलेल्या 'कसबे लिंब' या गावात त्यांचे बालपण गेले. मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण तेथेच झाले. लहानपणी विष्णुपंत अगदी कृश होते. शाळेतील बिगरब्राह्मण मुलं जाता-येता, "जयदेव जयदेव, जय बामण भट्टा"..... अशी हात ओवाळून आरती केल्यासारखी त्यांची कुचेष्टा करीत तेव्हा त्याना आपल्या शारीरिक दौर्बल्याची जाणीव झाली. एकसारख्या भांडाभांडी,

मारामाऱ्या होत. मग चिडवणाऱ्या मुलांपैकी मोठा मुलगा म्हणायचा ''नुसती तक्रार, मारामारी नको. कुस्ती मारून न्याव (म्हणजे न्याय) करा.'' कुस्त्या लागल्या की ब्राह्मणांची मुले धडाधड पडायची! हुर्यो व्हायची. ही गोष्ट इतरांच्या नाही पण विष्णुपंतांच्या मनाला फार लागली. तेव्हा दृढनिश्चयाने तालमीत जाऊन त्यानी व्यायामाला सुरुवात केली. दिवसें दिवस मेहनत केली. छोट्या मोठ्या कुस्त्या मारल्या तेव्हापासून ती बिगरब्राह्मण मुलं पण त्याना मान देऊ लागली. एकंदरीत तो जातीपातीचा झगडा नव्हता ही गोष्ट विष्णुपंतांच्या लक्षात आली. व्यायामाचे माहात्म्य मात्र त्यानी तेव्हापासून जाणले. बलवान माणसाकडे कुणी डोळा वाकडा करुन बघू शकत नाही हे सत्य त्यांच्या लहानपणापासूनच मनावर ठसले. त्यामुळे शरीराची जोपासना त्यांनी आयुष्यभर एखादे खडतर व्रत अंगिकारावे तशी केली. शरीर सदैव स्वत:च्या 'स्वाधीन' ठेवले. ही शरीरसाधना अखेरपर्यंत त्याना अुपयोगी पडली. कारखान्यात सदैव तासन् न तास खडतर काम करताना वृध्दापकाळातही त्याना कधी थकवा असा जाणवला नाही.

इंग्रजी ५ वीपर्यंतचे त्यांचे शिक्षण साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. पण शिक्षणाकडे त्यांचे फारसे लक्ष नसायचे. तालमीत घुमणे आवडायचे. वॉचमेकर, कारागीर यांच्याकडच्या यंत्रांबरोबर मात्र खेळत राहायला त्याना मनापासून आवडे. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, घरच्या मंडळीनी त्यांना धंदेशिक्षणासाठी पाठवायचे ठरविले. विष्णुपंतानी शाळेला रामराम ठोकला. त्यांच्या मित्राना वाटले म्हणजे याला आता आयुष्यात नोकरी मिळणे कठीण! ''अरेरे, आता तो बिचारा घिसाडी, सुतार किंवा कोष्टी होणार. वाईट झालं'' त्या सुमारास 'केसरी' मध्ये बडोद्याच्या कलाभुवनाची जाहिरात आली होती. त्या संस्थेत रंगशाळा, रसायनशाळा, शिल्पशाळा, चित्रशाळा असे धंदेशिक्षण देणारे विविध विभाग होते. विष्णुपंतानी बडोद्याला विणकामशाखेत प्रवेश घेतला. लहान वय, बडोद्यास घरच्या मंडळींपासून दूर एकटं राहायचं, शिक्षण कसं जमेल, अशा अनेक प्रकारच्या शंका मनात डोकावत होत्या; नववधूच्या मनात सासरी जाताना असतात तशा. पण विष्णुपंत हिय्या करुन गेले. ज्या ज्ञानावर भविष्यकाळात त्यानी मोठ्या कारखान्याचा इमला रचला त्या विणकामाचे प्राथमिक शिक्षण त्याना बडोद्यात मिळाले. विणकामासंबंधी शास्त्रीय माहिती मिळाली. प्रात्यक्षिके करायला मिळाली. गाठ कशी मारावी, तार कशी घ्यावी हे शिकून त्यांनी कोष्ट्याच्या घरी असतो तशा दोन धावत्या धोट्यांच्या मागांवर लंगोटीएवढे रुंद कापड काढत काढत टुवाल, किनारीतील रुईफुले, गोमी, करवती किनारी वगैरे नमुने मागावर काढण्याइतकी प्रगती केली. त्याचबरोबर दुर्बिणीतून नमुना कसा पहावा, त्यावरुन गणना करुन तत्सम नमुना कसा काढावा, हिशोब कसा करावा याचे पण ज्ञान घेतले.

वास्तविक बडोद्याचा शिक्षणक्रम तीन वर्षाचा होता. पण तेथे फार मोठी यंत्रसामुग्री नव्हती; शिकायचे ते वर्षभरातच शिकून झाले. अुगाच घरच्यांच्या पैशाचा का अपव्यय करा अशा विचाराने ते आपल्या लिंब गावी परतले: थोड्या खिन्न मनानेच कारण घरच्या घरी हातमाग घालणे, सुताचा ताणा करणे, खळ देणे व अशा तऱ्हेने स्वतंत्रपणे कारखाना चालविणे, याबाबतीत फारसे शिकायला मिळाले नव्हते. अशा बेचैनीत असतानाच त्याना कोलकत्त्याच्या विणकाम शाळेचा पत्ता लागला. तेथे सुतापासून कापड तयार होईपर्यंतच्या सगळ्या प्रक्रिया शिकवल्या जातात असे कळल्यावर, घरच्यांच्या संमतीने आणि वडील बंधूंच्या आर्थिक पाठबळावर त्यानी कोलकत्ता गाठले. पण तेथेही कारखाना अुभा करायला अुपयोगी पडेल असे शिक्षण मिळणे कठीण दिसले तेव्हा वर्षभरातच ते गावी परतले. मग काही दिवस बेळगाव, रायबाग येथे चालणाऱ्या दोन-तीन कारखान्यांतून त्यानी प्रत्यक्ष जाऊन शिक्षण घेतले.

त्या सुमारास लो. टिळकानी 'केसरी' मधून स्वदेशीचा पुरस्कार करताना महाराष्ट्रीय तरुणांनी स्वतंत्र अुद्योगधंदे निर्माण करावेत असे आवाहन केले होते. त्यावेळी त्यानी परदेशी मालाची हकालपट्टी करण्यासाठी, तसल्या वस्तू निर्माण करणारे कारखाने येथे स्थापन झाले पाहिजेत असे आग्रहाने सांगितले होते. विष्णुपंत मोठे टिळकभक्त आणि स्वदेशाभिमानी होते. तेव्हा आपण एखादा स्वतंत्र अुद्योग सुरु करावा अशी त्यांची जिद्द होती. १९०८ साली आपल्या लिंब गावीच दोन माग घालून विष्णुपंतानी कारखाना चालू केला. तो दिवस होता श्री गणेश चतुर्थीचा, म्हणून कारखान्याला नाव दिले श्रीगजाननमिल. दोन्ही माग बेळगाव-रायबागचे होते. एक जपानी पध्दतीचा तर दुसरा धावत्या धोट्याचा. विष्णुपंत स्वत: मागावर बसत. अुकलाव करावा, ताणा करावा, वई-फणी करावी, कांडी भरावी अशी सगळी कामे ते स्वत:च करत. रोज १० तास मेहेनतीचे काम होई. गावातील लोक कौतुकाने बघायला येत. अुत्साहाच्या भरात जो जे म्हणे तसले कापड-वस्त्र विष्णुपंत काढत. पंचे, कोटाचे कापड, कुणबाऊ धोतरजोडे, अंग पुसण्याचे टॉवेल वगैरे वगैरे. यात त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन होई; पण या प्रकारात नाना प्रकारचे सूत शिल्लक राही आणि त्यात भांडवल अडकून पडे. या प्रकारामुळे अुद्योग गुंडाळण्याचीच नामुष्की पदरी आली. पण तेवढ्यात प्लेगची साथ आली. घर बंद करून दूर माळावर राहायला गेल्यावर आपोआपच माग बंद पडले. एकाच जातीचे कापड (पंचे तर पंचे, धोती तर धोतीच) काढले असते तर सुताचा वापर सुयोग्य तऱ्हेने झाला असता एवढे महत्त्वाचे व्यवहारज्ञान या खटाटोपातून झाले हेही नसे थोडके!

मध्यंतरीच्या काळात घरच्या मंडळीनी विष्णुपंतांच्या अिच्छेविरुध्द त्यांचे लग्न लावून दिले. त्याकाळच्या रिवाजाप्रमाणे. म्हणजे आता एकाच्या ऐवजी दोन परावलंबी जीव! पोटाला काही तरी मिळवायला हवं म्हणून ते सोलापूरच्या कापड गिरणीत 'बॉबिन बॉय' म्हणून नोकरीला राहिले. नोकरी करता करता फावल्या वेळात ते यंत्रमागाचे शिक्षण घेत. कारण एकूण अनुभवावरुन, आता हातमागावर काम न करता यंत्रमागावरच करायचे असे त्यानी निश्चित केले होते.

एका बाजूला सोलापूरच्या शेकडो मागांच्या गिरण्या आणि दुसऱ्या बाजूला कोष्ट्याचा पारंपारिक हातमाग, यांच्यामधला सुवर्णमध्य नाही का साधता येणार? याचा विष्णुपंत गांभीर्याने विचार करु लागले. शोध घेता घेता रु.७०००-७५०० भांडवल गुंतवून तीन यांत्रिक माग घातले तर होणारा अुत्पादनखर्च, घसारा, प्रत्यक्ष विक्री, असा आराखडाच कागदावर मांडून खोलवर विचार केल्यावर त्याना अचानक जाणवले की बरोबर साडेतीन वर्षांत भांडवलाइतका नफा मिळू शकतो! मग ते सर्वांना आपला प्लॅन दाखवत सुटले. तज्ज्ञांचे म्हणणे की ताणा पाजणीचे काम कसे करणार? शंभर मागांना पुरणारे ताणा पाजणीचे यंत्र, केवळ तीन मागांसाठी कसे काय फायदेशीर ठरणार? विचार करता करता विष्णुपंतांच्या डोक्यात लाकडी बीम तयार करण्याची कल्पना आली. छोट्या छोट्या कारखान्याला ताणा पुरविणारी जी विलायती यंत्रे होती त्यांची ताण्याची वळकटी (ड्रम) ४८ ते ६० इंच व्यासाची होती. त्यावर ताणा करुन तो ताणा मागाच्या लोखंडी बीमावर घेण्याची पध्दत होती. मग विष्णुपंतानी त्यावर कल्पना लढवून ताण्याचे बीमच इतके लहान केले की ताण्याची व मागाची वळकटी एकच; त्यावर ताणा भरला की वईफणी करुन ती सरळ मागावर ठेवून कापड काढता यावे. त्यामुळे एक प्रोसेस वाचते. याच कल्पनेने दोन हातमागाचे पुढे तीन यांत्रिक माग झाले; (नंतर १६६ झाले तरी त्यानी याच लाकडी (बीमने) वळकटीने गजानन मिलमध्ये काम केले) याच सुमारास भांडवलाचा प्रश्न सुटला. म्हणजे विष्णुपंताचे श्वशूर श्री.भाऊराव अभ्यंकर यानी सोडवला. त्यानी आपल्या क्रेडिटवर त्यांचे सावकार श्री. भट यांचेमार्फत विष्णुपंताना भांडवलासाठी कर्ज मिळवून दिले. बंद पडलेला कारखाना, आता पुण्याला शेतकी कॉलेजनजीकच्या भट सावकारांच्या बंगल्याच्या कोपऱ्यात सुरू झाला. वास्तविक विष्णुपंतांना ही जागा पसंत नव्हती; कारण रेल्वे स्टेशन, मजुरांची वस्ती, मालविक्रीचे ठिकाण या सर्व महत्त्वाच्या बाबींपासून दूर अंतरावरची ही जागा गैरसोयीची होती. कारखान्याच्या अर्थकारणाला मारक होती. पण भांडवल मिळतेय आणि त्यामुळे कारखाना सुरु करता येतोय या एकमेव आनंदापोटी विष्णुपंतानी हा अुपद्व्याप केला. परिणाम अर्थातच कारखाना नुकसानीत जाण्यात झाला. पुढे, 'भट सावकारांचे पैसे परत करा. माझी भागीदारी काढून घ्या' असा त्यांच्या श्वशुरांचा-अभ्यंकरांचा, तगादा मागे लागला.

अंतर्गत कलहाने विष्णुपंतही वैतागले होते. स्वातंत्र्य नसल्याने त्याना मनासारखे प्रॉडक्शन काढता येईना की विक्री करता येईना. सांगलीकर राजेसाहेबांचे आणि अभ्यंकराचे काही तरी नाते होते; त्याआधारे विष्णुपंत राजेसाहेबाना भेटले. त्याच वेळी आणखी एक दुर्घटना घडली होती. त्यांचे सावकार भट ज्या बँकेत ठेवी ठेवत असत ती बँक बुडाली. त्यामुळे त्यांचेकडून मिळणारे भांडवल बंद झाल्यामुळे नोकरांचा पगार देणे पण जमेना. सांगलीकर राजेसाहेब प्रागतिक विचारांचे, अुद्योगधंद्याला प्रोत्साहन देणारे राजे होते. त्यानी विष्णुपंताना आवश्यक तितके पैसे दिलेच आणि वर "कारखाना सांगलीस घेऊन या, माझ्या नगरीला शोभा आणा" असे आग्रहाने सांगितले आणि विष्णुपंतानी खरोखरीच सांगलीस स्थलांतर केले.

सांगलीतील पदार्पणाचा दिवस होता, ७ मार्च १९१४. सर्वत्र गुढीपाडवा असल्याने गुढ्या-तोरणे अुभारलेली होती. विष्णुपंतानी आणि सहकाऱ्यानी ते आपले स्वागतच समजून आनंद मानला. पण खरोखरच भविष्यकाळात त्यांच्या यशाची गुढी या सांगलीतच अुभी राहायची होती!

इजा, बिजा, तिजा या न्यायाने लिंब, पुणे आणि आता सांगली. दरबारी लोकांच्या संमतीने गणपती मळ्यातील जागा कारखान्यासाठी पसंत केली होती. ही जागा सांगली-हरिपूर रस्त्यावर होती. निसर्गरम्य परिसर होता. रामभाऊ द्रविडांच्या रुपाने कारखान्याला एक हितकर्ता मित्रच लाभला. त्यांचे व्यवहारातील कौशल्य आणि विष्णुपंतांचे यंत्रकामातील सूक्ष्म ज्ञान, यामुळे कारखान्याची भरभराट होऊ लागली. गणपती मळ्यात दोन-तीन सोपे बांधून रंगखाते सुरु झाले होते. रुद्राप्पा ज्ञानाप्पा हातपाकी यांजसारखे सहकारी लाभल्यामुळे मनासारखी रंगणी करुन घेता येऊ लागली. मागील अनुभवांवरुन शहाणे होऊन आता एकाच तऱ्हेच्या मालाची (पातळांची) निर्मिती होत होती; सर्व कारखानदार राडीचा (चिखलासारखा पातळ व दिसावयास पिवळसर असा जर्मन रंग) रंग लुगड्याना तांबडा रंग देण्यासाठी वापरत. त्या काळात धाडस करुन नॅपथॉलचे महागडे रंग वापरण्यास श्रीगजाननमिलने सुरवात केली. त्यामुळे लुगड्याचा काठ चमकदार दिसे. म्हणून मार्केटमध्ये मालाला सतत मागणी राहिली. तीन मागाचे दहा माग झाले. कारखान्याचा पसारा वाढू लागला. तशी कारखान्याला स्वत:ची जागा असावी हा विचार पुढे आला. सांगली दरबारचे कर्ज अिमाने अितबारे फेडल्याने, राजेसाहेबाना विष्णुपंतांच्या स्वच्छ व सचोटीच्या व्यवहाराची पूर्ण कल्पना आली होती; त्यामुळेच विष्णुपंताना हवी असणारी (सध्याची) दहा एकराची जागा राजेसाहेबांच्या मंजुरीने कारखान्याच्या ताब्यात आली. ही जागा अत्यंत यशदायी ठरली. या परिसरातील विहीरीला जिवंत पाणी

आहे; त्यामुळे रंगखात्याच्या कामात पाणी नाही म्हणून कधीही व्यत्यय आला नाही. या वास्तूच्या शेजारून जुन्या काळातील सांगली-मिरज रेल्वेचा फाटा जात होता. त्यामुळे आपोआपच कारखान्याची जाहिरात होण्यास मदत झाली. १९२२साली ताब्यात आलेल्या या जागेवर कारखान्यास योग्य अशी बांधकामे झाल्यावर, १९२५च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर, श्रीगजाननमिल्सची यंत्रे स्वत:च्या वास्तूत कार्यरत झाली तेव्हा विष्णुपंत वेलणकरांचा, (आता ते दादासाहेब म्हणून सर्वमान्य झाले होते) आनंद गगनात मावेना. लिंब-पुणे या ठिकाणचे अपयश आणि ते सर्वस्वी झाकून टाकणारे सध्याचे सुयश याची वारंवार मनात तुलना होऊन त्याना गहिवरुन येई.

यानंतर जुन्या लुगड्यांच्या जागी नव्या पातळांची निर्मिती सुरु झाली. पारंपारिक गोमेकिनारीऐवजी रुईफुल, वेल वगैरे अनेक तऱ्हेचे काठ घातले. १४ वर्षानंतर 'मनमोहक पातळे' या नावाने मार्केटमध्ये आलेले हे अुत्पादन अल्पावधीतच लोकप्रिय झाले. किनारींच्या नक्ष्यांसाठी चमक वापरल्यावर तर पातळाना आणखीनच देखणेपणा आला. पातळांचा खप वाढतच राहिला.

१९३५ मध्ये दादासाहेब जपानला गेले. तेथील वस्त्रोद्योगाचे त्यांनी सूक्ष्मपणे निरीक्षण केले; तेथील यंत्रे आणवून स्वत: कशी जोडायची ते शिकून, जपानी तज्ञांकडून सर्वांना कारखान्यात शिकवून दादासाहेबांनी वल्कली कापडांची निर्मिती सुरु केली. ती खूपच किफायतशीर ठरली. एकप्रकारच्या गवतासारख्या वनस्पतीपासून हे कापड बनवतात म्हणून दादासाहेबानी आपल्या परंपरेला साजेसे 'वल्कली' हे नाव त्याला दिले होते.

१९१२ साली तीन मागांवर सुरु केलेला हा कारखाना १९४७ पर्यंत म्हणजे गांधीहत्येनंतर जळितात आहुती पडण्यापूर्वी ३०० माग, ८००० चात्या, स्वत:ची दहा एकर जमीन, विहीर, विविध खाती, नोकर लोकांसाठी चाळी असे मिळून अडीच लाख चौरस फूट बांधीव इमारत अशी कारखान्याची भक्कम स्थिती झाली आणि हे सगळं वैयक्तिक प्रयत्नांवर. (भागीदारी, शेअर होल्डर्स, न घेता) ही भरभराट दादासाहेबानी योजनापूर्वक, अगदी कागदावर गणित मांडून घडवून आणली हे विशेष. तीन माग चालू राहिले तर जेवढा नफा होतो त्यातून सावकारी कर्ज, देणी दिल्यावर एक नवीन माग घेता येतो का हे ते सातत्याने अजमावत राहिले; तशी शक्यता दिसल्यावर त्यांनी अेखादा आवडीचा छंद जोपासावा तसा हा माग खरेदीचा छंदच, म्हणा हवं तर, जोपासला. आणि असे करत करत मागांचे त्रिशतक गाठले! मात्र असे भरभक्कम यश मिळवायचे तर मूळ माणूस विलक्षण संयमी, मेहनती हवा. चार पैसे हातात आल्यावर त्याची हवा डोक्यात शिरायला नको की वेगळे रंगढंग सुचायला नकोत. तीनशे माग झाल्यावर त्यातील २२० माग सुती कापडासाठी तर ८०

माग जपानी 'वल्कली' कापडासाठी अशी विभागणी झाली.

लो. टिळक १९२० साली ज्योतिषसंमेलनाच्या निमित्ताने सांगलीत आले तेव्हा त्यानी आपल्या स्वदेशीच्या आवाहनाला प्रतिसाद देणाऱ्या दादासाहेब वेलणकरांच्या श्रीगजानन मिलला आवर्जून भेट दिली. दीड तास सर्वत्र हिंडून कारखाना बघितला. त्यानंतर बोलताना ते म्हणाले, ''आता मला यापुढे एखाद्या तरुणाने मी काय करु असे विचारले तर मी वेलणकर यांजकडे बोट दाखवेन. बोट दाखवायला अशी जागा केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.''

केवढे गौरवास्पद प्रशस्तिपत्र!

१९३९ च्या सुमारास स्पिनिंगची इमारत बांधून झाली. स्पिनिंगची यंत्रे इंग्लंडहून आली होती. विणकामखात्याची इमारत १९२५ सालीच बांधून झाली होती. १९४० साली या इमारतीत सूतकताईचे काम सुरु झाले. त्यामुळे सर्व विणकामखात्यास सुताचा पुरवठा होऊ लागला. सुतापासून तो तहत पातळ निर्माण होण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करणारी श्रीगजाननमिल्स ही एक स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण मिल झाली. ज्यादिवशी गिरणीतील सुतापासून थेट पातळाची निर्मिती कारखान्यात झाली त्यादिवशी त्या पातळाची घडी घालताना दादासाहेबांना एव्हरेस्ट जिंकल्याचा आनंद मिळाला! त्या अनुपमेय आनंदाची कल्पना अविरत कष्ट करणाऱ्या महाभागासच येऊ शकेल.

असे होता होता वयाची साठी केव्हा जवळ येऊन ठेपली ते दादासाहेबांना अुमगलेच नाही. आप्तेष्ट, स्नेहीमंडळी जेव्हा एकसष्ठी करायची, थाटात करायची अशा गोष्टी बोलू लागले, तेव्हा दादासाहेबाना काहीतरी खटकले. वाढदिवसाच्या दिवशी अितरांकडून काही घ्यायचे त्यांना पटेना; अुलट ज्या समाजात आपण वावरतो, त्यांच्यासाठी आपल्याला काही करता आले तर? धंदा सुरु करुन स्वत:च्या पायावर अुभे राहायचे तर धंदेशिक्षण,भांडवल अशा अनेक गोष्टी द्रव्याअभावी अडतात. मग त्यासाठी एखादा निधी अुभा करुन आपणच गरजूना मदत केली तर? या विचारमंथनातून सुवर्णतुलेची कल्पना पुढे आली. आपल्या वजनाइतके सुवर्ण समाजाला दान करायचे! म्हणजे तेवढ्या किंमतीचा एक विश्वस्त निधी निर्माण करायचा आणि त्यातून गरजू लोकाना मदतीचा हात द्यायचा. एकसष्टाव्या वर्षात पदार्पण केल्यानंतर, १९ जानेवारी १९४७ या दिवशी सुवर्ण-तुलेचा समारंभ थाटामाटात पार पडला. ज्या सांगलीच्या राजेसाहेबांनी, दादासाहेबाना गरजेच्या वेळी मदतीचा भक्कम हात पुढे केला, त्यांच्या व औंधच्या प्रगतिशील संस्थानचे संस्थानिक श्री पंतप्रतिनिधी यांचे हस्ते हा सुवर्णतुलेचा विधी संपन्न झाला. श्री. छत्रे गुरुजींच्या

पौराहित्याखाली अनेक विद्वान ब्राम्हणांनी सर्व धार्मिक कृत्ये पार पाडली. असा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी, त्याकाळात दहाबारा हजार लोकांचा जनसमुदाय अुपस्थित होता. महाराष्ट्रातील संस्थानिक, कारखानदार, अुद्योगपती, म.म.दत्तो वामन पोतदार, काणे, पंडित सातवळेकर यांजसारखे अनेक विद्वज्जन आवर्जून आले होते. दादासाहेबांचे वजन १२९ पौंड भरले. दुसऱ्या पारड्यात घातलेल्या सोन्यांच्या विटांची किंमत रु. ५,३७,६००/- एवढी भरली. या रकमेतून वेगवेगळे ट्रस्ट निर्माण करुन शैक्षणिक, औद्योगिक, वैद्यकीय कार्यासाठी त्यांचा विनियोग करण्यात येतो. आजवर या ट्रस्ट माध्यमातून सुमारे वीस लाखाहून अधिक रक्कम देणगी स्वरूपात वाटली गेली आहे.

रोजी ४ आणे मजुरीवर काम करणारा एक सामान्य माणूस, आपल्या अंगमेहेनतीने आणि बुद्धिवैभवाने, एवढी संपत्ती समाजासाठी आपल्या प्रयत्नातून अुभी करतो हे केवढे बोलके अुदाहरण समाजापुढे आहे! दुर्दैवाची बाब अशी की यापासून बोध घेणे दूरच, पण या ट्रस्टस्मधून मिळालेल्या देणगीचा आपल्या अुत्कर्षासाठी पुरेपूर अुपयोग करुन, त्या देणगीकर्त्यांच्या अुद्देशाला पुरेपूर न्याय दिला अशी अुदाहरणे दादासाहेबाना दुर्दैवाने कमीच आढळली. श्रम करुन धन जोडणारे आणि अनायासे मिळालेले दानरूपी धन अुधळणारे यातील तफावत किती कमालीची असावी? पैसे मागताना जी वचने दिली जातात त्याच्या दशांशानेही पाळली जात नाहीत ही दादासाहेबांची व्यथा होती.

याठिकाणी एक गोष्ट आवर्जून लक्षात ठेवण्यासारखी आहे. दादासाहेबानी शालेय शिक्षण अर्धवट सोडले. बडोद्याच्या कलाभुवनमध्ये धंदेशिक्षणासाठी जाण्याचे ठरविले, तेव्हा परिस्थिती खूप वेगळी होती. ब्राह्मणाच्या मुलाने लौकिक शिक्षण घ्यावे. नंतर कोणी मामलेदार, वकील व्हावे. समाजात रावबहाद्दूर रावसाहेब म्हणून मिरवावे अशीच सर्वसाधारण अपेक्षा असे. दादासाहेबानी शिक्षण अर्धवट सोडले तेव्हा हा बिचारा आता घिसाडी, सुतार किंवा एखादा कोष्टी होणार म्हणून सर्वांनी नाके मुरडली. पण गंमत बघा. याच माणसाने स्वप्रयत्नांवर ३मागांपासून तो ३०० माग आणि ८००० चात्यांनी सुसज्ज असा कारखाना नावारुपास आणला. ३००-४०० कामगारांना रोजची रोजी-रोटी मिळवून दिली. अनेक सुशिक्षित, पदवीधर मंडळी त्यांच्या हाताखाली कामाला राहिली. त्यांच्या सुवर्णतुलेच्या प्रसंगी अनेक वकील, मामलेदार, डॉक्टर्स अुपस्थित तर होतेच पण विद्वान पंडित, अुच्च अधिकारी आणि राजे-महाराजे अशा प्रतिष्ठितांची लक्षणीय अुपस्थिती होती.

म्हणजे वेलणकर 'घिसाडी' होणार म्हणून टिंगलटवाळी करणाऱ्यांच्या कुत्सित

नजरेला केवढे भव्य दृश्य, सुवर्णतुलेच्या प्रसंगी दिसले असेल?

सुवर्णतुलेच्या निमित्ताने नाही म्हटले तरी संपत्तीचे थोडे प्रदर्शन समाजाला झालेच. नुसते दर्शन नेहमीच होत होते. पण थाटामाटाच्या समारंभाने काही मंडळींची डोकी असुयेने, मत्सराने पेटून निघाली हे निश्चित! ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद जाणुनबुजून पसरवला जात होता. वेलणकर पडले ब्राह्मण कारखानदार; त्यातच महात्मा गांधींचा खून करणारा मारेकरी जातीने ब्राह्मण निघाला. गांधीहत्येनंतर जी दंगल माजली त्याची फार मोठी झळ श्रीगजाननमिलला पोचली. सुरुवातीला त्याचे वर्णन आले आहेच. त्या काळातील सरकारी आकड्यानुसार अंदाजे रु.२० लाखाचे वर नुकसान म्हणजे आजच्या काळातील ८-१० कोटीचे वर होईल. केवढा जबरदस्त फटका!

खरं म्हणजे वेड लावणारीच परिस्थिती होती. पण सच्च्या लढवय्याला शत्रूने चारी बाजूने घेरुन टाकल्यावरच खरे स्फुरण चढते. दादासाहेबांचे तसेच झाले. त्यांची पाठ जमिनीला लागावी म्हणून मत्सराने पेटलेल्या समाजकंटकांची पाशवी अिच्छा, त्यांच्यासारखा जातिवंत पैलवान थोडीच पुरी होऊ देणार? सगळी मरगळ एका झटक्यात बाजूला टाकून दादासाहेब कामाला लागले. वेडेवाकडे, अर्धवर्तुळाकार झालेले पत्रे, सरळ करायच्या प्रयत्नात त्यांनी चक्क तशा प्रकारचे यंत्रच तयार केले. अग्निप्रलयातून वाचलेल्या साधनसामुग्रीचा अंदाज घेतला.ते स्वत: आपत्काली अुपयोगी पडावे म्हणून नियमितपणे शिल्लक बँकेत टाकत, ती रक्कम, संरक्षक निधी म्हणून मदतीस आली. मुंबईत घेऊन ठेवलेल्या चाळी विकल्या. एवढे मोठे गंडांतर येऊनसुद्धा त्यानी नेहमीप्रमाणे वेळेवर कामगारांचे पगार केले. मालकाची जिद्द पाहून सर्वानाच स्फुरण चढले. हळूहळू कारखाना कामाला लागला. पूर्वस्थितीला येऊ लागला............

दादासाहेबांचे वय आता ६६-६७ वर्षाचे झाले. चिरंजीव रामराव बी.कॉम.होऊन कर्तेसवरते झाले होते. स्वातंत्र्यानंतरच्या अनेक जाचक अटींमुळे दादासाहेब वैतागून जात; तेव्हा आता कारखान्याची संपूर्ण जबाबदारी रामरावांच्या खांद्यावर टाकून त्यांच्या कर्तृत्वाला धुमारे फुटू द्यावेत अशा भावनेतून दादासाहेबांनी समारंभपूर्वक दि. २० सप्टेंबर १९५३ रोजी, ४५ वर्षे अपत्यवत जपणूक केलेली श्रीगजाननामिल रामरावांच्या स्वाधीन केली.

इथे दादासाहेबांच्या आयुष्याचा एक मोठा अध्याय संपला.

यापुढे कारखान्याच्या कारभारात प्रत्यक्षपणे हस्तक्षेप त्यांनी कधी केला नाही; मात्र दैनंदिन व्यवहाराशी ते संबंधित राहिले. त्यामुळे योग्य सल्लामसलत देण्यात त्यांना कधी अडचण आली नाही.

आपल्या या आगळ्यावेगळ्या वानप्रस्थानाश्रमातसुध्दा त्यांनी आयुष्याचे मिनिट अन् मिनिट कारणी लावले. कानानी ऐकायला कमी येऊ लागले ही त्याना एकप्रकारे अिष्टापत्तीच वाटली. त्यानी म्हटलय की ''कान सोडून गेल्यामुळे माझं लिखाण चांगलं व्हायला लागलं, एकाग्रता साधू लागली.'' या अुतारवयात त्यांनी थोडीथोडकी नाहीत तर चांगली १४ पुस्तके लिहून काढली. आपल्या अुद्योगविषयक अनुभवांवरुन 'यांत्रिक मागवाला,' 'कारखानदार कसा झालो' अशी पुस्तके लिहिलीच. पण वृध्दापकाळात भेडसावणाऱ्या समस्यांचा शोध घेत 'वृध्दांची स्वास्थ्यसाधना' 'माझे वृध्दपण' सारखी पुस्तके लिहली. जपानच्या प्रवासाच्या अनुषंगाने 'जपानच्या प्रवासाची शिदोरी', तेथील लोकांची शालीनता पाहून प्रभावित होऊन, 'जगात वागावे कसे?' यांसारखी व काही धार्मिक पुस्तके त्यांच्या हातून लिहून झाली. 'जगात वागावे कसे' या पुस्तकाच्या तर अनेक आवृत्या निघाल्या. एका कारखानदारी करणाऱ्या माणसाची ही वाङ्मयसेवा पाहून जातिवंत साहित्यिकसुद्धा आश्चर्याने तोंडात बोटे घालतील. त्यांची ज्ञानलालसा विलक्षण होती. काहीही चांगले वाचले की ते त्याच्या नोट्स काढत. अमूल्य माहिती, सुभाषिते टिपून ठेवत. अशा अनेक वह्या त्यांच्या संग्रही होत्या.

व्यायाम हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. अखेरपर्यंत त्यांची योगासने, नियमित व्यायाम टिकून होता. आयुष्यातील अनेक आघात पचवायला त्यांच्या शरीरबलाने त्यांना फार मदत केली. सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करते. १९४८ सालच्या जळितासारखे प्रचंड गंडांतर, या मनोबलावरच त्यांनी पचवले. अनेक कुस्तिगीरांना, व्यायामपटूंना त्यानी आर्थिक मदत केली.

त्यांचा पिंड हा मानवतावादी होता. ते हाडाचे देशभक्त होते. मूर्तीपूजेकडे आवश्यकतेपेक्षा अधिक लक्ष देत बसल्याने, चालता बोलता जो माणूस आहे, त्याच्याकडे आपले दुर्लक्ष होत आहे, याची त्यांना स्वतःला जशी ठाम जाणीव होती तशीच ती अितराना करुन देण्याचा त्यांचा प्रयत्न असे. या जाणिवेपोटीच त्यांनी समाजपयोगी संस्थांना, व्यक्तींना देणग्या दिल्या.

वयाची ९१ वर्षे पूर्ण केल्यावर वृध्दापकाळामुळे २१ एप्रिल १९७८ रोजी त्यांचे निधन झाले.

त्यांच्या सुवर्णतुलेच्या समारंभप्रसंगी सांगलीच्या राजेसाहेबांनी म्हटले होते की ''श्रीगजाननमिलचे भव्य दृश्य व त्याचे धनी वेलणकर आपणास आज दिसतात पण हे दृश्य निर्माण करण्यासाठी पूर्वी येथे जी पडकी जागा होती,त्या जागेमध्ये कार्याचे वेड लागल्यामुळे, या कार्याची रात्री बेरात्री योजना करीत हिंडणारे व दुःखे सोसणारे वेलणकर आपणास माहीत नाहीत पण ते 'वेलणकर' मला माहित

आहेत....सुवर्णतुलेच्या दानाने त्यांनी समाजाचे ऋण अुत्कृष्ट तऱ्हेने फेडले आहे.''

दादासाहेब वेलणकर यानी चार आणे मजुरीपासून सुरुवात केली. व्यापारातील सचोटी, चिकाटी आणि हातोटी या त्रिगुणांवर ते कुठच्या कुठे जाऊन पोहोचले. रोम काही एक दिवसात बांधले गेले नाही! त्यांचा विलक्षण काटकसरीपणा, मिळालेला फायदा पुन्हा धंद्यातच घालून तो वाढविण्याची त्यांची सततची धडपड, बाजारपेठेचे ज्ञान, तदनुरुप मालाची अुत्पत्ती यामुळेच वर्षानुवर्षांच्या तपःश्चर्येनंतर ते आपले 'रोम' बांधू शकले. या कालावधीत त्यांनी तीन हजारावर मजुरांना शिकवून तयार केले. त्यामुळे सांगली हे एक विणकाम व सूत केंद्र बनले. पाठोपाठ चार सुताच्या गिरण्या अुभ्या राहिल्या. जवळच्या इचलकरंजीला सहस्त्रावधी यांत्रिक माग व त्याचे चौपटीने हातमाग कारखाने सुरु झाले. त्यांच्या लाकडी वळकटीच्या (बीम) युक्तीने लहान लहान कारखान्यांचे जाळे पसरले. ह्या धंद्यात ठामपणे अुभे राहून यश संपादन करता येते, हा विश्वास श्रीगजाननमिलच्या यशाने, अनेकांच्या मनात जागृत झाला. हँडलूमवर चालणारी पातळे ही पॉवरलूमवर आणायची पहिली कल्पना त्यांचीच आणि सर्व प्रथम राबवली त्यानीच. तोवर भारतात पॉवरलूमवर पातळे निघाली नव्हती. त्याच्यावर रुईफुलासारख्या बॉर्डर्स त्यानी बसविल्या. टेक्स्टाईल इंडस्ट्रीत अशा अनेक छोट्या मोठ्या गोष्टी त्यानी यशस्वी केल्या.

सांगली नगरीला औद्योगिक क्षेत्रात नाव मिळवून देण्याचे, दिगंत कीर्ती मिळवून देण्याचे त्यांचे श्रेय फार मोठे आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यासाठी सांगलीच्या राजेसाहेबानी १९४७ मध्ये त्याना 'अुद्योगरत्न' ही पदवी दिली पण त्यांची ओळख महाराष्ट्राला 'धनी वेलणकर' म्हणूनच झाली होती. हा गौरवशाली शब्द त्यांच्याविषयी आदराने बोलताना, १९३८ साली, स्वातंत्र्यवीर सावरकरानी प्रथम अुच्चारला. त्या थोर पुरुषाची वाणी १९४८ च्या सुवर्णतुलेनंतर अधिकच सार्थ झाली. सात्विकतेने मिळवलेल्या संपत्तीचे 'धनी' म्हणून त्या संबोधनाला एक प्रतिष्ठा आहे.

आजहि 'धनी' शब्द अुच्चारला की सांगलीकरांच्या तोंडी अुत्स्फूर्तपणे 'वेलणकर' हेच नाव येते.

ही ओळख केवढी हृद्य आणि प्रत्ययकारी आहे!

●●●

## शास्त्रीय संगीताचे गाढे व्यासंगी

# प्रो. ग. ह. रानडे

ही कथा आहे संगीताच्या एका निःसीम अुपासकाची. संगीतकलेचा आविष्कार करुन दाखवण्याची किमया, आवाजाची अनुकूलता नसल्याने नव्हती पण त्याची कसर या साधकाने आयुष्यभर, त्या महान कलेची शास्त्रीय अुपपत्ती समजून घेण्यात व समजावून देण्यात भरुन काढली.

हा संगीततज्ञ म्हणजे प्रो. ग.ह रानडे.

१ ऑक्टोबर १९९७ रोजी त्यांची जन्मशताब्दी झाली म्हणून त्यांचे थोडे तरी स्मरण केले गेले, अन्यथा विस्मृतीच्या गर्तेत गेलेल्या या गुणीजनाचे सर्वसामान्य रसिकालाहि नाव माहीत असणे तसे कठीणच !

आजचे एक आघाडीचे संगीत समीक्षक, संगीतशास्त्राविषयी अुत्तम बोलतात, गाण्याच्या शास्त्रीय अंगाविषयी भरभरुन बोलतात, त्यात त्यांचा पराकोटीचा अभ्यास दिसून येतो; मात्र तोच माणूस तंबोरा घेऊन मैफलीत गायला बसतो तेंव्हा कुठे गेली याची प्रतिभा असा सामान्य श्रोत्याला प्रश्न पडतो.

असंच काहीसं प्रो. गणपतरावजी रानडे यांचे बाबतीत झालं. आवाजाची अनुकूलता नसल्यामुळे असेल, किंवा वयाच्या सत्ताविसाव्या वर्षानंतर गायनास सुरुवात केल्यामुळे असेल. मात्र गायक म्हणून जरी त्यांची छाप पडली नसली तरी संगीतातील शास्त्रीय अंगाचा गाढा व्यासंगी म्हणून कै. भातखंडेबुवांच्या बरोबरीने त्यांचं नाव मोठ्या आदराने घेतले जातं.

प्रो. ग.ह. रानडे हे व्यवसायाने प्राध्यापक, फिजिक्सचे प्राध्यापक. त्यामुळे त्यानी संगीताचा, शास्त्रीय दृष्टीकोनातून, विचार केला आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे 'फिजिक्स' च त्यानी पुस्तकाद्वारे, संगीताच्या अभ्यासकांसमोर मांडून, त्यांच्यावर मोठे अुपकारच केले आहेत.

अशा या गणपतराव रानडे यांचा जन्म सांगलीत १ ऑक्टोबर १८९७ रोजी झाला. रानडे यांचे पूर्वज मूळ कोकणातले, मौजे जामसांडे, तालुका देवगड

मधले. कोकणातील अितर अनेक नामवंत चित्पावन घराण्यांप्रमाणे, त्यांचे पूर्वज नशीब काढण्यासाठी देशावर आले. रानडे यांचे वडील मिरज संस्थानात नोकरीस होते. त्यांचे आजोळ सांगली येथील प्रसिद्ध ओक-फडणीस घराण्यातील. रानडे यांचे आई-वडील लहानपणीच निवर्तले. त्यामुळे त्यांचे पालनपोषण आजोळीच झाले. त्यांचे आजोबा भाऊसाहेब फडणीस हे प्रख्यात बुद्धिबळपटू तर होतेच पण संस्थानिक, सांगलीकर राजेसाहेब यांचेबरोबर घरोबा असलेले प्रतिष्ठित गृहस्थ होते. सांगलीतील सुप्रसिद्ध राजवैद्य आबासाहेब सांबारे आणि प्रख्यात संत तात्यासाहेब कोटणीसमहाराज, यांच्या निकटवर्तियांत त्यांची गणना होत असे. त्यामुळे रानडे आपल्या या फडणीस आजोबांबरोबर अुभयतांच्या घरी गायन-कीर्तन-भजन इत्यादि कार्यक्रमांस जात. आबासाहेबांकडे तर अल्लादियाखाँ, अब्दुल करीम खाँ यांजसारखे मोठमोठे गवई येत. त्यामुळे शास्त्रीय संगीताबद्दलचे आकर्षण रानड्याना बालपणापासून आपसूकच निर्माण झाले. कान आपोआप तयार होत गेला.

रानडे यांचे प्राथमिक शिक्षण सांगलीतील मराठी शाळा क्र.१ मध्ये झाले तर हायस्कूल शिक्षण सांगलीतील सरकारी हायस्कूलमध्ये झाले. त्यांचे घराजवळच संस्कृतशास्त्री पंडित ग्रामोपाध्ये राहात. त्यांच्यामुळे रानडे यांचे संस्कृत शिक्षण अुत्तम तऱ्हेने झाले.

सांगलीत त्यावेळी कॉलेज शिक्षणाची सोय नसल्याने ते पुण्याला फर्ग्युसनमध्ये दाखल झाले. १९१५-१९१९ या काळात तेथे शिक्षण घेऊन ते बी.एस.सी. झाले. त्याच काळात प्रख्यात तत्त्वज्ञानी संत गुरुदेव रानडे तेथेच इंग्रजीचे प्रोफेसर होते. ते या गणपतराव रानडे यांचे नात्याने चुलते. त्यांच्या मार्गदर्शनाने गणपतरावाना इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवता आले. त्यांच्या पुढील आयुष्यात त्याना या संस्कृत-इंग्रजी भाषेचा फार अुपयोग झाला.

कॉलेजशिक्षणानंतर रानडे सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये नोकरीला लागले. थोड्याच काळात, त्यावेळी सांगलीत नव्यानेच सुरु झालेल्या विलिंग्डन कॉलेजात, फिजिक्स विषयाचे प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९२० ते १९४० या काळात त्यानी सांगलीतच अध्यापनाचे काम केले.

एकीकडे संगीताची श्रवणभक्ती चालू होती. लहानपणी, कोटणीसमहाराजांच्या घरातून निघणाऱ्या पालखीपुढे गाणे म्हणणे, एवढाच गाण्याचा असा त्यांच्यावर संस्कार होता पण प्रत्यक्ष गुरुजवळ बसून पारंपारिक पद्धतीने संगीताचे शिक्षण

घेण्याचा योग, फारच अुशीरा, म्हणजे त्यांच्या वयाच्या २७ व्या वर्षी आला, हे सुद्धा थोडेसे नवलाचेच म्हणावे लागेल. १९२४ साली सांगलीत येऊन राहिलेल्या, गणपतीबुवा भिलवडीकर यांच्याकडे, त्यांचे संगीताचे शिक्षण सुरु झाले. कॉलेजात प्राध्यापक असलेले रानडे गणपतीबुवांकडे त्यांच्या विद्यार्थीवर्गात बसून शिकू लागले. त्यांची कुशाग्र बुद्धि, जिज्ञासा, आणि शिक्षण घेण्याची तीव्र अिच्छा बघून, गणपतीबुवा त्याना स्वतंत्रपणे शिकवायला लागले. खुद्द रानडे यानी खूप गुरुसेवा केली व गाणे शिकण्यासाठी परिश्रम घेतले. हे गणपतीबुवा ग्वाल्हेरगायकी महाराष्ट्रात रुजवणाऱ्या पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे ज्येष्ठ शिष्य. गणपतीबुवांचे १९२७ मध्ये निधन झाल्यावर प्रो.रानडे, बाळकृष्णबुवांचे दुसरे शिष्य प्रसिद्ध गवई गुंडुबुवा इंगळे, यांच्याकडे पुढील शिक्षण घेऊ लागले. पण रानडे यांचा आवाज गायनास अनुकूल नव्हता. कदाचित संगीत-शिक्षणास प्रारंभच अुशीरा केला या कारणाने पण असेल. त्यामुळे अुत्तर आयुष्यात जरी त्यानी गाण्याचा छोट्या-मोठ्या बैठका केल्या, मुंबई आकाशवाणीवरुन गाण्याचे कार्यक्रम केले, तरी गाण्याचा आविष्कार हा आपला प्रांत नाही असे त्यानी कदाचित् मनोमनी ठरविले असावे. याअुलट त्याना लेखनाची हौस होती. मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व होते. त्यामुळे त्यानी संगीत-विषयक वाचन, संशोधन आणि लेखन यावरच आपली सर्व शक्ती केंद्रित केली.

त्याकाळी सुप्रसिद्ध लेखक आणि संगीताचे षौकीन, प्रो.ना.सी.फडके कोल्हापुरात 'झंकार' मासिक चालवत असत. त्यामध्ये 'संगीतातील नवमतवाद' ही लेखमाला चालू होती. प्रा.रानडे यांच्या घरी गाण्याच्या छोट्या-मोठ्या बैठका होत. त्यानिमित्ताने जमणाऱ्या मंडळींबरोबर या लेखमालेविषयी चर्चा होत. सांगलीतील कवि साधुदास, नाटककार कमतनूरकर, दत्तुबुवा भोसले, म्हैसकरबुवा अशी संगीताची जाणकार मंडळी येत; कधीकधी त्याकाळात सांगलीत वास्तव्य असणारे मा. दीनानाथ पण येत असत. प्रो.रानडे यांचे घर याबाबतीत, नंतर पुण्यात गाजलेल्या रविकिरण मंडळासारखेच झाले होते. त्यांच्या पत्नी सुमतीबाई, अगत्याने सर्वांचे चहा-पाणी, जेवणखाण करीत. प्रो.रानडे यांचे लेख पुण्याच्या 'भारतीय संगीत' या द्वैमासिकात येऊ लागल्यावर त्यांचे वर्तुळ आपोआपच वाढले. मा. कृष्णा (फुलंब्रीकर), वझेबुवा अशी मातब्बर मंडळीपण येऊ लागली. रानड्यांच्या घरातील सुग्रास पदार्थांची त्याना एवढी सवय झाली, की संकोच गेला, तेव्हा आपणहून आल्याबरोबर ही मंडळी 'पहले खाना, फिर गाना' असे म्हणत. मिरजेची तंतुवाद्ये बनवणारे मुसलमान कारागीर पण येत असत.

असाच एक दिवस, ८-१० वर्षांचा एक मुलगा एका कानडी गृहस्थांसमवेत आला होता. ''मुलगा पेटी छान वाजवतो, त्याला गाणे शिकायचे आहे'' असे तो कानडी गृहस्थ सांगू लागला म्हणून त्या मुलाचा रानड्यानी घरी कार्यक्रम केला. त्याचे कौतुक म्हणून त्याला जरीची टोपी दिली. प्रो.रानडे यानी त्या मुलाला गाणे शिकण्यासाठी प्रो.बी.आर. देवधर यांचे नाव सुचवले. हा मुलगा म्हणजे पुढे सर्वाना वेड लावणारा जगद्‌विख्यात गायक कुमार गंधर्व!

कॉलेज-व्यतिरिक्त मोकळया काळात प्रो.रानडे यांचे संगीतविषयक वाचन व चिंतन जोरात सुरु झाले. संगीत कलेचे त्यानी विधिवत् शिक्षण घेतलेले असल्यामुळे शब्द-माध्यमातून, या श्रेष्ठ कलेची अुकल करुन दाखवावी असा त्यांचा प्रयत्न होता. त्याचबरोबर विशेष अभ्यासकांसाठी व कलावंतांसाठीसुद्धा एखाद्या विवेचनात्मक ग्रंथाची गरज भासत होती; तसे अनेकांच्या बोलण्यातून जाणवत होते. या विचारमंथनातूनच प्रो. रानडे यानी १९३३ साली 'संगीताचे आत्मचरित्र अथवा सुशिक्षितांचे संगीत' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकात संगीताचे तात्त्विक स्थित्यंतर, स्वर-विचार व रागरचनातत्व, वर्णोच्चार, भावना-विलास, सौंदर्योत्कर्ष अशा तात्विक गोष्टींचा सविस्तर अुहापोह केलेला आहे. स्वतः फिजिक्सचे प्राध्यापक असल्याने, अत्यंत चिकित्सक दृष्टया त्यांचे लेखन झाले आहे, जे आजच्या काळातसुद्धा, अभ्यासकाना अुपयुक्त आहे. विशेषतः संगीत कसे ऐकावे याबाबतचे त्यांचे विचार आजच्या सामान्य रसिकानी मुळातून वाचावेत एवढे बोधप्रद आहेत.

१९३८ साली प्रो.रानडे यानी Hindusthani Music-Its Physics and Aesthetics हे पुस्तक इंग्रजीत लिहिले. हे पुस्तक जाणकार रसिकाना एवढे भावले की त्या पुस्तकाच्या आजवर चार आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. ह्या पुस्तकाचा आणखी एक विशेष म्हणजे, भारतापेक्षा परदेशात या पुस्तकाची विक्री आणि बोलबाला अधिक झाला. पुढे त्यानी Music of Maharashtra हे पण पुस्तक लिहिले. तथापि त्यांचे काही अभ्यासपूर्ण लेख अप्रकाशित स्वरुपातच राहिले.

कोणतेहि लेखन करताना प्रो.रानडे, त्या लिखाणाच्या सत्यतेविषयी अत्यंत जागरुक असत. गोविंदराव टेंबे, ना.सी.फडके, प्रो. बी. आर. देवधर, प्रि. जठार आदी मान्यवरांना दाखवून स्वतःचे लेखन सुधारुन घेत. एकदा तर 'तंबोऱ्याची मिलावट' (इंग्रजी पुस्तकातील 'ड्रोन') हा लेख त्याना लिहायचा होता. दोन दोन

तंबोऱ्यांचा एकत्रित आवाज त्याना त्यासाठी ऐकायचा होता. मग त्यानी काय करावे? आपल्या दोन्ही लहान मुलांना (एक दहा वर्षाचा आणि दुसरा आठ वर्षाचा) त्यानी दोन तंबोरे २०-२५ मिनिटे वाजवत बसायला लावले. दोन्ही तंबोरे वाजायला लागले की दूर जाऊन ते स्वतः नीटपणे त्यांचे आवाज, एकत्रित आवाज, ऐकत. एक-दोन मिनिटे लक्षपूर्वक ऐकून पुन्हा जवळ येऊन, दोन्ही तंबोऱ्यांची त्याना पाहिजे तशी जवारी (गुढी । घोडीवरील सूत) किंवा गुढीखालील मणी, थोडा फार मागेपुढे करीत. एखादी खुंटी सैल करत. घट्ट करत. हा कार्यक्रम निदान अर्धा पाऊणतास चाले. मुलं रडकुंडीस येत, मग आई बिचारी खायला काजू नाहीतर जर्दाळू देऊन त्यांचे सांत्वन करी !

फिजिक्सचे प्रोफेसर असेही 'प्रयोग' करीत.

त्यांच्या अशा अनुभवसिद्ध लिखाणाने त्याना संगीतक्षेत्रात मोठाच नावलौकिक मिळाला. इचलकरंजी, बुधगांव, सांगली संस्थानांचे अधिपती त्यांचा योग्य तो मुलाहिजा राखत असत. त्यांच्या पहिल्या पुस्तकाच्या वेळी इचलकरंजीकर बाबासाहेब घोरपडे यानी रु.१०१/- चा पुरस्कार दिला होता. (१००० प्रतींच्या या पुस्तकाचा एकूण छपाईखर्च रु.३२५/- झाला होता हे इथं लक्षात घ्यायला हवं!) एकदा हिराबाई बडोदेकरांचा सांगलीच्या सदासुख थिएटरमध्ये तिकिट लावून जलसा होता. सांगलीचे राजेसाहेब तेथे कार्यक्रमाला पोचले. गेल्याबरोबर आधी त्यानी प्रो.रानडे कार्यक्रमाला आले आहेत का नाहीत याची चौकशी केली. ते आलेले नाहीत, असं कळल्यावर लागलीच एक खास सांडणीस्वार पाठवून त्याना बोलावून घेतले!.

१९४० मध्ये त्यांची डे.ए.सोसायटीच्याच पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये बदली झाली. पुण्याचे वास्तव्य त्यांच्या संगीतगुणाना फारच पोषक ठरले. पुण्याला आल्यावर त्यांचा विनायकबुवा पटवर्धन, गजाननबुवा जोशी, केशवराव भोळे, मिराशीबुवा, आबासाहेब मुजुमदार अशा संगीतक्षेत्रातील मातब्बर व्यक्तींबरोबर संबंध आला. प्रो.रानडे यांचे कार्यक्षेत्र त्यामुळे बरेच विस्तारले. पं. मिराशीबुवांबरोबर त्यांचा पूर्वीचा स्नेह अधिकच वृद्धिंगत झाला. दोघांच्या गाठीभेटीतून अनेक योजना निघाल्या. मिराशीबुवांच्या चीजांचे तीन भाग प्रो. रानडे यानी १९४४ ते १९५१ च्या दरम्यान संपादित केले. पुढे १९५२ ते १९६१ पर्यंत, मिराशीबुवांच्या बैठकीच्या स्वरुपात संपूर्ण विस्ताराचे गाणे लिहिलेल्या पाच भागांची प्रसिद्धी केली. त्याचबरोबर पंडित विनायकबुवा पटवर्धन यांची खाजगी संगीत संस्था,

त्यांच्याच आग्रहावरुन रजिस्टर्ड करण्यासाठी रानडे यानी बरेच परिश्रम केले. १९४२ मध्ये ती संस्था 'भारतीय संगीत प्रसारक मंडळ' या नावाने रजिस्टर्ड झाली. संस्थेचे पहिले अध्यक्षपद दत्तो वामन पोतदार याना तर अुपाध्यक्षपद प्रो.रानडे याना देण्यात आले.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर शाळा-कॉलेजातून अुत्तम प्रकारचे संगीत शिक्षण दिले जावे या कल्पनेतून तत्कालीन मुंबई राज्याचे प्रमुख, नामदार बाळासाहेब खेर, यानी एक म्युझिक एज्युकेशन कमिटी नेमली. या कमिटीचे मेंबर-सेक्रेटरी म्हणून प्रो.रानडे यांची नेमणूक झाली. प्रि. जठार अध्यक्ष होते. मा.कृष्णा, विनायकबुवा, बी.आर. देवधर इत्यादि संगीत क्षेत्रातील दिग्गज सभासद होते. मुंबई प्रांताच्या विविध भागातील शाळा-कॉलेजातून या सर्वानी दौरे केले व या अनुभवातून प्रो. रानडे यानी जो परिश्रमपूर्वक रिपोर्ट तयार केला तो सरकारने जसाच्या तसा स्वीकारला यातच त्यांचे यश होते.

१९५० साली दिल्लीला संगीत-नाटक अॅकेडमी स्थापन झाली. त्या अॅकेडमीच्या निरनिराळ्या चार-पाच कमिट्यांवर प्रो. रानडे यांची सल्लागार सदस्य म्हणून नेमणूक झाली. १९५५ साली मनिला (फिलिपाईन्स) येथे झालेल्या South East Asiatic Conference मध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून अुपस्थित राहण्याचा बहुमान त्याना मिळाला.

१९५८ साली कॉलेजच्या नोकरीतून ते निवृत्त झाले.

त्यानंतर तर एक मोठेच काम त्यांची वाट पहात होते! संगीत नाटक अॅकॅडमीने संगीताचा शब्दकोष तयार करण्याचे ठरवले होते. तेंव्हा १९५९ झाली त्यानी प्रो.रानडे याना Encyclopedia of Indian Music लिहिण्यासाठी पाचारण केले. त्यानी आनंदाने हे आवडीचे काम करण्यास संमती दिली. त्यानी मोठ्या जिद्दीने या कामाला सुरवात केली. त्यामध्ये भारतीय संगीताचा अितिहास, या संगीतशास्त्राची वैशिष्टये, भारतीय संगीत पाश्चात्य संगीतापेक्षा कसे वेगळे आहे, ते कंटाळवाणे (Monotonous) का होत नाही याचा अुहापोह केलेला आहे. १९६१ च्या जून मध्ये हे काम जवळजवळ पूर्ण झाले व त्याची मुद्रणप्रत तयार झाली.

आणि एक वेगळेच संकट अुभे राहिले!

१२ जुलै १९६१ ला पुण्यात पानशेतचा जलप्रलय झाला. प्रो.रानडे यांचे पुण्यातील घर अगदी मुठा नदीच्या काठीच होते. घरात पाणी शिरले. या प्रसंगी त्यांची संगीतावरची भक्ती, तुकारामाच्या अभंगासारखी पाण्यावर निश्चलपणे तरंगत

राहिली !

त्यानी सोने, नाणे, पैसा-अडका याचा यत्किंचितहि विचार न करता शब्दकोशाची मुद्रणप्रत आधी पागोट्यात बांधली आणि पुराच्या पाण्यातून पोहून जात 'केसरीचा' गायकवाडवाडा गाठला आणि मुद्रणप्रत प्रलयातून वाचवली.

केवढी ही विलक्षण संगीतनिष्ठा!

आजहि ही मुद्रणप्रत मायक्रोफिल्मच्या रुपात दिल्लीच्या संगीतनाट्य-ॲकाडमीमध्ये जतन करुन ठेवलेली आहे.

या पराक्रमानंतर मात्र त्यांचे प्रकृतीस्वास्थ्य गेले. तोंडावर, पायावर, रक्त गोठून फोड येऊ लागले. त्यानंतरहि त्यांचे लेखन-वाचन चालूच होते पण त्यात पूर्वीचा जोष अुरला नव्हता. १९६५ मध्ये त्याना संगीत, नाट्य, ॲकेडमीची फेलोशिप भारत सरकारने दिली. त्यांच्या आजवरच्या संगीतसेवेचा हा मोठाच गौरव होता. २३ डिसेंबर १९६५ रोजी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते, दिल्लीमध्ये, 'रत्नसदस्य' हा किताब रानड्याना देण्यात आला.

पण दिल्लीची कडाक्याची थंडी त्याना बाधली. तेथे थंडीने लघवी गोठण्याचा त्रास झाला. घाईघाईने विमानाने त्याना मुंबईत आणण्यात आले. प्रोस्टेट ग्लँडच्या ऑपरेशननंतर ते काही काळ ठीक होते. पुन्हा रक्त गोठण्याचा त्रास सुरु झाला. डॉ. ग्रँट हास्पिटलमध्ये ब्रेन थ्रॉयबॉसिससंबंधीचे ऑपरेशन झाले. पण अुपयोग झाला नाही.

१० मार्च १९६६ ला ग्रँट हॉस्पिटलमध्येच ६९ व्या वर्षी प्रो. रानडे यांचे निधन झाले.

एका अर्थी एका संगीत साधनेचाच हा अंत झाला. संगीत क्षेत्रातील ज्ञानाचा, परिभाषेचा, शास्त्रशुद्ध तंत्राचा एवढा गाढा व्यासंग करणे याला मोठे बुद्धिवैभव आणि पराकोटीचे परिश्रम लागतात. प्रो. रानडे यानी तशी चिकाटी दाखवून, संगीतशास्त्राच्या अभ्यासकांवर मोठे अुपकारच केले आहेत. त्यांची शास्त्रोक्त संगीतावर एवढी विलक्षण निष्ठा होती की गायक व आकाशवाणी यांच्यामध्ये जो झगडा, नभोवाणी मंत्री बाळकृष्ण केसकर यांच्या कारकिर्दीत झाला तो त्याना फार व्यथित करुन गेला. श्रवण कसोटी (Audition test) पास झाल्याशिवाय कलाकाराना आकाशवाणीवर कार्यक्रम मिळेनात आणि अशी आपली 'परीक्षा' घेतली जाणे ज्येष्ठ कलाकारांना अपमानास्पद वाटू लागले म्हणून त्यानी

आकाशवाणीवर बहिष्कार घातला. मधल्यामध्ये शास्त्रीय संगीताची आणि श्रोत्यांची गळचेपी होऊ लागली. ही स्थिती संगीतप्रेमी प्रो.रानडे याना सहन होईना. तेव्हा काही मान्यवर व्यक्तिंसमवेत, त्यानी मध्यस्थी करुन, दोघांमधील भांडण मिटवले. त्यामुळे कलाकारांचा योग्य मान राखला गेला. आणि श्रोत्यांची सोय झाली.

या संगीतप्रेमी माणसाच्या मनाचा तंबोरा अितका 'सुरेल' लागलेला असे की संगीताच्या दुनियेतील कोणताहि 'बदसूर' त्याना क्लेशकारक होई. म्हणून तर त्यानी हे भांडण मिटवण्यात सिंहाचा वाटा अुचलला.

प्रो. ग.ह. रानडे ही अनवट रागातील अपरिचित 'चीज' आहे असे इतरजनांना भले वाटो.

अस्सल संगीतषौकीन सांगलीकराना तसं कधीच वाटणार नाही!

●●●

## केशवसुतसंप्रदायाचे अध्वर्यू
# कवि काव्यविहारी

बालगंर्धव आणि त्यांची गंधर्व संगीत मंडळी अवघा महाराष्ट्र दुमदुमून सोडत होती तेव्हाचा, म्हणजे १९१५-१६चा काळ. नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल हे नाटकाच्या तालमी घेत असत.पुण्यात नाटकाचे प्रयोग असल्याने त्यांचा मुक्काम पुण्यात कंपनीच्या बिऱ्हाडी होता. एक अुत्साही कॉलेजयुवक आपली कवितांची चोपडी घेऊन देवलाना भेटायला गेला. तिथे त्यावेळी राम गणेश गडकरीपण बसले होते. आपल्या एक दोन कविता त्या युवकाने देवलाना दाखविल्या. देवलांशी पूर्वपरिचय असल्याने तो युवक जरा जोशातच होता. 'इंद्रधनुष्य' आणि 'चंद्रोदय' या कवितांमधील काही पंक्ती अशा होत्या:

'नीलवर्णनभसर:सलिलगत शतकमळे फुलली' आणि
'अमररमणीपादतलहतहंस म्हणुनि विहरे गगनी हा'

बाणभट्टाच्या समासांची आठवण करुन देणारी भाषा बघून थोड्या रोषानेच देवल त्या युवकाला म्हणाले 'अरे बंडू, तू मराठी कविता लिहितोस की संस्कृत? मराठी कविता लिहायची तर सोप्या, सुबोध भाषेत लिहीत जा.'' नंतर जवळ बसलेल्या गडकऱ्याना ते म्हणाले, ''कवितेच्या नादी लागून तुम्ही कॉलेज सोडलंत, तसंच हा मुलगाही कॉलेज सोडेल अशी मला भीती वाटते.'' आणि मग त्या युवकाला समजावत ते म्हणाले ''हे बघ, कविता लिहायची तर सर्वाना समजेल अशी लिही आणि हो, ही कवितेची वही माझ्याकडेच राहू दे. बी.ए. होईपर्यंत कविता करायच्या नाहीत.''

हा युवक म्हणजेच कै. धोंडो वासुदेव गद्रे तथा 'कवि काव्यविहारी.' नाट्याचार्य देवलांची शिकवणूक आयुष्यभर त्यानी लक्षात ठेवली. त्यामुळे सुबोधता हा त्यांच्या कवितेचा ठळक विशेष बनला.

'काव्यविहारी' ना केशवसुत संप्रदायाचे प्रमुख कवि म्हणून ओळखले जाते. त्याना स्वत:ला तसा त्याचा रास्त अभिमान होता. त्यांची केशवसुतांसारखी समाजसुधारणेची कळकळ, 'काव्यविहार' या कवितासंग्रहातील 'सवाल' सारख्या कवितांमध्ये प्रकर्षाने

प्रकट झाली आहे. आचार्य अत्रे, कवि मायदेव हे त्यांचे फर्ग्युसनमधील समकालीन कविमित्र. तिघेही बरोबरीने काव्यरचना करीत. कॉलेजच्या मासिकात पाठवत. आचार्य अत्र्यानी आयुष्यात अनेक माणसे जोडली आणि तोडली पण. मात्र काव्यविहारींशी तरूणपणी जडलेला स्नेह अत्र्यानी आयुष्यभर जपला. काव्यविहारींच्या सत्तरीच्या समारंभाच्या निमित्ताने आपल्या 'मराठा' मध्ये लिहिलेल्या लेखात त्यानी म्हटलय ''कविवर्य गोविंदग्रजांच्या मृत्यूनंतर (जानेवारी १९१९) आणि रविकिरण मंडळाच्या अुदयापूर्वीचा (१९२३) संधिकाळ, ज्या काही कवींनी आपल्या प्रतिभाबलाने गाजवला, त्यात काव्यविहारींचा प्रामुख्याने अुल्लेख केला पाहिजे. सामाजिक बंडखोरी आणि राष्ट्रीय अुत्थापन या केशवसुतांच्या दोन वैशिष्ट्यांचे, काव्यविहारीनी यथाशक्ति निष्ठेने अनुकरण केले. सुबोध धावती रचना, राष्ट्रीय भावनेची चेतावणी, जोरकस विचारांचा प्रवाह हे काव्यविहारींच्या काव्याचे अुल्लेखनीय विशेष होत.'' आचार्य अत्रेंची गुणग्राहकता आणि रसिकता सर्वश्रुतच आहे. त्यानी स्वतः पुढाकार घेऊन काव्यविहारींचा ''स्फूर्तिलहरी'' हा काव्यसंग्रह, स्वत:च्या अध्यक्षतेखाली, त्यांच्या एकूण खाक्याप्रमाणे, टोलेजंग समारंभ आयोजून प्रकाशित केला होता.

आचार्य अत्र्यांसारख्या प्रचंड व्यक्तिमत्वाच्या महापुरूषाने, ज्याना गौरविले ते 'काव्यविहारी', आता काळाच्या पडद्याआड गेले असले तरी काव्यप्रेमी सांगलीकरांच्या मनात त्याना अढळ स्थान आहे.

अशा रसिकमान्य काव्यविहारींचा जन्म सांगलीजवळील हरिपूर गावचा. १५ नोव्हेंबर १८९४ सालचा. नाटककार देवलांचा जन्म पण हरिपूरचाच. कृष्णा-वारणेच्या संगमावरील श्रीसंगमेश्वराचे प्राचीन मंदिर, त्याभोवतीचा निसर्गरम्य परिसर अशा वातावरणात काव्यविहारींचे बालपण गेले. आज कल्पना येणार नाही इतके त्या काळात हरीपूर रम्य ठिकाण होते. नदीच्या प्रवाहात तास न् तास पोहावे. नदीकाठच्या मळ्यातील कोवळी कोवळी मक्याची कणसं, बाजीरावाच्या थाटात खावीत. शेजारच्या सुप्रसिद्ध गणपती बागेतील चिंचेच्या घनदाट बनात शिरून चिंचा, बोरे, कवठे असा खुराक खात, मजेत हुंदडावे असे रम्य बालपण त्याना लाभले. सुदैवाने नाटककार देवलांचा मुक्काम काव्यविहारींच्या बालपणी बरेचदा हरिपुरात असे. त्यांचा सहवास मिळायचा. त्यांचे जेवणखाण काव्यविहारींच्या घरातच होत असल्याने त्यांच्या गप्पा ऐकायला मिळत. या वातावरणामुळे त्यांच्या ठिकाणी नंतर वाढीस लागलेल्या निसर्गप्रेमाची आणि काव्यप्रेमाची हातात हात घालून जडणघडण झाली. पुढे न्यायखात्याची रूक्ष नोकरी इमानेइतबारे करताना, कामाच्या निमित्ताने पंढरपूरजवळील निसर्गरम्य 'खंडाळी' येथे त्याना राहण्याचा योग येई, तेव्हा त्यांचे काव्यप्रेम आणि निसर्गप्रेम अुफाळून येई. त्याचे बीज या हरिपूरच्या बालपणातच रुजलेले होते.

असे सकृतदर्शनी सुखदायक वातावरण होते तरी व्यावहारिक दृष्ट्या त्यांचे बालपण कष्टात गेले. ते अवघे पाच वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे प्लेगने निधन झाले. घरात आई आणि सदा व नाना ही दोन धाकटी भावंडे होती. सुदैवाने स्वत:चे घर होते आणि मुख्य म्हणजे आईच्या मनगटात जोर होता. जिवापाड कष्ट करण्याची हिंमत होती. त्यांच्या चुलत चुलत्यानी या निराधार कुटुंबाला आधार दिला.

काव्यविहारींचे प्राथमिक शिक्षण हरिपुरात झाले. दुय्यम शिक्षणाची सोय नसल्याने त्याना जवळच्या सांगलीत पायपीट करत हायस्कूलसाठी जावे लागे.त्यावेळचे सांगली हायस्कूल आताच्या आमराईच्या बाजूला नव्हते तर सध्याची कोर्टे भरतात त्या ठिकाणी होते. शाळेत ते हुषार विद्यार्थी म्हणून गणले जात. १९११साली ते 'स्कूल फायनल' पास झाले. त्या काळात तेवढ्या 'क्वालिफिकेशन' वर नोकरी मिळणे शक्य होते. घरच्या परिस्थितीमुळे काव्यविहारी नोकरीच्या खटपटीलाही लागले होते. मात्र एवढ्या हुशार विद्यार्थ्याने, एवढ्या लहान वयात नोकरीला लागावे ही गोष्ट, त्यावेळचे सांगली हायस्कूलचे मुख्याध्यापक वासुनाना खाडिलकर आणि देवधरशास्त्री याना पटेना. पुढील शिक्षणाचे मार्ग मोकळे व्हावेत, म्हणून त्या अुभयतानी काव्यविहारीना एक वर्ष अभ्यास करून मॅट्रिकला बसण्याचा आग्रह केला, त्यानुसार १९१२ साली ते चांगल्या मार्कांनी मॅट्रिक झाले. घरच्या गरिबीमुळे कॉलेजशिक्षणाचे स्वप्नही ते पाहू शकले नसते. पण अशा वेळी बुधगाव संस्थानचे अधिपती कै. बाबासाहेब पटवर्धन देवासारखे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. एक हुशार व होतकरु मुलगा म्हणून त्यानी काव्यविहारीना कॉलेजच्या पहिल्या वर्षापासून ते थेट एल.एल.बी.पूर्ण होईपर्यंत स्कॉलरशिप दिली. या बहुमोल ऋणाचा काव्यविहारीना कधीच विसर पडला नाही. एरवी वकिलीच्या धंद्यात त्याना अमाप पैसा मिळविता आला असता. स्वतंत्र वृत्तीने राहता आले असते. पण तो काळ आणि त्या काळातील लोकांच्या निष्ठा खणखणीत होत्या. ज्यानी आपले शिक्षण पूर्ण केले त्या राजेसाहेबांशी काव्यविहारी कधीहि बेईमान झाले नाहीत .बुधगावसारख्या आडगावात स्वत:ला कोंडून, नोकरीची सर्व बंधने स्वीकारून त्यानी शेवटपर्यंत निष्ठेने नोकरी केली.

१९१३ व १९१४ ही दोन वर्षे ते कोल्हापूरला राजाराम कॉलेजात होते. इंटर झाल्यावर बी.ए.च्या अभ्यासासाठी जानेवारी १९१५ मध्ये ते पुण्याला फर्ग्युसनमध्ये गेले. १९१७ साली बी. ए. झाल्यावर मुंबईस दोन वर्षे राहून, त्यानी एल.एल.बी. पूर्ण केले आणि तडक बुधगावकरांच्या संस्थानी सेवेत ते रूजू झाले. मामलेदार म्हणून नोकरीची सुरवात करून विविध पदांवर कामे करून १९४८ साली बुधगाव संस्थान खालसा व्हायच्या वेळी ते संस्थानचे प्रमुख न्यायाधीश बनले होते. दोन-चार वर्षे आधीच निवृत्ती घेऊन, त्यानी सांगलीत कायमस्वरूपी वास्तव्य केले, ते १९७५ साली

अखेरच्या सोडलेल्या श्वासापर्यंत.

१९११ साली त्यांच्या वाङ्मयीन जीवनाला सुरुवात झाली. बालपणीच म्हणजे वयाच्या सहाव्या वर्षापासून तो दहाव्या वर्षापर्यंत, त्याना नाट्याचार्य देवलांचा सहवास घडला. संगमेश्वराच्या देवळात सांज-सकाळ होणारा घंटानाद, वेदशास्त्रसंपन्न ब्राम्हणांच्या घराघरातून ऐकू येणारा मंत्रघोष, या वातावरणाचे संस्कार देवलाना जिथे मोहवून गेले, त्या हरिपुरात काव्यविहारी नक्कीच प्रभावित झालेले असणार. त्याच काळात सुप्रसिद्ध लेखक ना. ह. आपटे हरिपुरात येत असत. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांची विलक्षण मोहिनी काव्यविहारींच्या बालमनावर पडली होती. इतकी की त्यानी तोरो नावाच्या (पुढे अध्यात्माच्या मार्गाने कालक्रमणा करणारे सांगली शिक्षण संस्थेचे एक संस्थापक सदस्य, गुरुनाथ तोरो) मित्राच्या मदतीने 'कलियुग' नावाच्या कादंबरीचा आराखडासुद्धा तयार केला होता. त्या संदर्भात पत्ते खेळणाऱ्या चुलत-चुलत्यांची व त्यांच्या मित्रांची नावे जशीच्या तशी या कादंबरीच्या हस्तलिखितात आली होती. (निदान नावे बदलून लिहावे हा पोच बालवयात कसा असणार?) आणि वस्तुस्थिती अशी होती की ही मंडळी मौजेखातर खरोखरच दोन-चार पैसे लावून खेळत असत. झाले. वडिलधाऱ्यांच्या हाती ते कागद पडल्यावर काय झाले असेल ते सांगायला नकोच. काव्यविहारींची तीच पहिली आणि अखेरची कादंबरी !

लहानपणी नाटकं बघितल्यावर, आणि देवलांशी गप्पागोष्टी झाल्यावर, नाटकातील चालींवर पदे किंवा मुखडे रचण्याचा त्याना नाद लागला.त्यानी खरी कविता अशी लिहिली, ती घरातील अंगणातच टवटवीत फुललेल्या जाईच्या वेलीवरील फुलाला उद्देशून. घरातच राहणाऱ्या देवलाना त्यानी ती दाखविली. देवलांना आवडली. त्यानी 'आनंद' मासिकाच्या वासुदेवराव आपटे यांजकडे पाठवली. (पुढे कॉलेजात गेल्यावर मात्र बी.ए. होईपर्यंत कविता न करण्याचा खरमरीत सल्ला देवलानी दिला. पण काव्यविहारीना तो मानवला नाही ही गोष्ट वेगळी.) 'आनंद' मासिकात 'फुलाची विनंती' म्हणून आलेली काव्यविहारींची हीच पहिली कविता. राजाराम कॉलेजात असताना त्यानी काही कविता केल्या. कॉलेजच्या मासिकात छापून आल्या. पण त्यांच्या खऱ्याखुऱ्या वाङ्मयीन जीवनाला सुरुवात झाली ती पुण्याला फर्ग्युसन कॉलेजात दाखल झाल्यानंतरच. त्या काळात पुण्यात नुसता रहिवासी म्हणून राहण्यासारखे आणि त्यातून फर्ग्युसनचा विद्यार्थी असण्यासारखे दुसरे भाग्य नव्हते. लोकमान्य टिळकानी आणि त्यांच्या केसरीने राजकीय वातावरण भारून टाकले होते. देवल-खाडिलकरांची नाटके, गंधर्व मंडळी रात्र रात्र रंगवीत होती. फर्ग्युसनमध्ये रँग्लर परांजपे, भाटे, रा.द.रानडे (पुढील काळातील गुरुदेव रानडे) यासारखी विद्वान मंडळी होती. प्रा. पटवर्धनांसारख्या रसिक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली, काव्यविहारीना

इंग्रजीमधील अुत्तमोत्तम काव्याचा, तसेच केशवसुतांच्या काव्याचाही, सखोल अभ्यास करता आला. तो त्याना भावी आयुष्यात फार फलदायी झाला. आचार्य अत्रे, कवी मायदेव यासारखे सहाध्यायी कॉलेजात होते. अशा परिस्थितीत काव्यविहारींच्या प्रतिभेला धुमारे फुटले नसते तरच नवल! अत्रे, मायदेवांच्या बरोबर ईर्ष्येने काव्यरचना करण्यात त्याना धन्यता वाटत होती.

त्या काळी 'मनोरंजन' नावाचे मासिक होते. १९०० ते १९२० या काळात महाराष्ट्रात ललित वाङ्मयाबद्दल आवड व अभिरूची निर्माण करण्याचे मोठेच काम या मासिकाने केले. या मासिकाच्या पहिल्या पानावर कविता प्रसिद्ध होणे हे फार प्रतिष्ठेचे समजले जाई. गोविंदाग्रज, बालकवी, रेव्ह. टिळक अशा दिग्गजांच्या कवितानांच तेथे स्थान मिळे. अशा परिस्थितीत 'हसणारी कलिका' ही आपली कविता 'मनोरंजनच्या' पहिल्याच पानावर आलेली बघून, काव्यविहारीना केवढा परमावधीचा आनंद झाला असेल! त्याच अुर्मीत त्यानी 'कृष्णाकाठी'(या कवितेचा गौरवपूर्वक अुल्लेख सांगलीमधील जुन्या स्टेशन चौकातील जाहीर सभेत यशवंतराव चव्हाण यानी केला होता.)'आशानिराशा' व 'तरंग' या कविता पाठविल्या आणि त्यांचेहि स्वागत झाले. सुरुवातीच्या काळात काव्यविहारींच्या कविता, प्रेम आणि प्रेमभंग, यासंबंधीच्या असत. याच संदर्भात आपल्या, 'माझे वाङ्मयीन जीवन' या आत्मनिवेदनपर पुस्तकात त्यानी म्हटलं आहे की 'एका दूरस्थ तारकेचा ध्यास' त्याना काव्यप्रवण बनवत होता. गंमतीची गोष्ट म्हणजे प्रेमाच्या कविता लिहिताना त्या कविता डी.व्ही.गद्रे या रूक्ष नावाने प्रसिद्ध होत होत्या! ('काव्यविहारी' हे नाव साहित्याशी तसा संबंध नसणाऱ्या त्यांच्या एका मित्राने नंतर सुचविले) पुढे केशवसुतांच्या काव्याच्या अभ्यासामुळे, तसेच प्रा. वासुदेवराव पटवर्धन यांच्या प्रभावाने, काव्यविहारी, आगरकरी संप्रदायाकडे व समाजसुधारणेकडे वळले. प्रेमकविता आपोआपच लोप पावली आणि तिची जागा सामाजिक कवितेने घेतली.

एल.एल.बी.साठी मुंबईत केलेल्या अभ्यासाच्या वास्तव्यात, त्यांचा 'अुद्यान' आणि 'नवयुग' या मासिकांशी संबंध आला. त्या मासिकातून त्यांच्या कविता येऊ लागल्या. बुधगावात, एल.एल.बी. पूर्ण करुन आल्यानंतर मात्र, त्यांची वैचारिक कुचंबणा होऊ लागली. एक तर पुण्या-मुंबईत जे मोकळे वातावरण अनुभवायला मिळायचे त्याचा लोप झाला. बुधगावसारख्या आडगावात काही वाचायला मिळायचं नाही. त्या काळात आजच्यासारखी सुलभ वाहतूक व्यवस्था नव्हती म्हणून ४-५ मैलांवरच असलेल्या सांगलीस येणे पण जमायचं नाही. आणि या सर्वात जिकिरीचे काम म्हणजे संस्थानची नोकरी! म्हणजे तोंड असून बोलायचे नाही. कान असून ऐकायचे नाही, असा प्रकार! त्यातून काव्यविहारींसारखी त्या काळातील माणसं

म्हणजे नोकरीसुध्दा कठोर व्रतासारखी करणारी. अत्यंत कर्तव्यतत्पर आणि कर्तव्यकठोर. आपलं काव्य, आपल्या आवडीनिवडी, त्यानी संस्थानी नियमांच्या आड कधीच येऊ दिल्या नाहीत. ते म्हणायचे ''मी प्रथम संस्थानचा नोकर, मग कवी. तो सुद्धा बुधगावच्या हद्दीबाहेर.''

पण सुदैवाने नोकरीच्या सुरुवातीच्या काळातच त्याना अचानक एका 'ओॲसिसचा' लाभ झाला. त्याचं असं झालं:-

त्यांची नोकरी १९१९ साली सुरु झाली. त्याच सुमारास सांगलीतील विलिंग्डन कॉलेज सुरु झालं. १९२१ साली ऐच्छिक भाषा म्हणून मुंबई विद्यापीठाने मराठीला स्थान दिले. कॉलेजात मराठी शिकवायला कोणी योग्य माणूस मिळेना म्हणून विलिंग्डनचे प्रिन्सिपॉल भाटे स्वत: बुधगावला काव्यविहारींकडे गेले. म्हणाले की, ''मी गद्य विभागाकडे बघतो. तुम्ही पद्यविभाग शिकवा.'' एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर बुधगावच्या राजेसाहेबाना भेटून त्यांची रीतसर परवानगी काढून आले. अशा रीतीने संस्थानी नोकरी सांभाळून १९२२ ते १९२५ या काळात, मराठीचे प्राध्यापक म्हणून काव्यविहारीनी अध्यापन केले. आपल्याला जमेल का नाही अशा संभ्रमात असलेले काव्यविहारी, नंतर मात्र या कामात रमून गेले. त्या निमित्ताने जुन्या-नव्या काव्याचा अभ्यास करायला मिळाला याचाच आनंद त्याना फार झाला.

संस्थानी राजवटीच्या आणि पारतंत्र्याच्या काळामुळे त्यांची कविता काही प्रमाणात कठोर, रुपकात्मक व थोडी साम्यवादी बनली. 'स्फूर्तिलहरी' मधील 'हरिणीप्रत,' 'अुंबरातले किडे,' पाळीव पोपटास', 'मैना' तर 'स्फूर्तिनिनाद' मधील बांडगुळे, दिवाभीते, काजवे या कविता तशा धाटणीच्या बनल्या आहेत.''अुंबरातले किडे'' ही त्यांची गाजलेली कविता, ब्रिटीशानी पारतंत्र्याच्या काळात ऐदी बनवलेल्या, संस्थानिकांस चांगलाच चिमटा काढून गेली. वानगीदाखल या काव्यपंक्ती पहा;

''अुंबरात बांधुनि वाडे
अुंबरी नांदती किडे
राजा झाला कुणी एकला
दुजा गाजवी प्रधानकीला
तिसरा जागे रखवालीला
प्रजा बनोनी अवती भवती
असंख्य जमती किडे''

परतंत्र हिंदुस्थान आणि ब्रिटिश सरकार यांच्या संदर्भातील 'पाळीव पोपटास' ही रूपकात्मक कविता त्या काळी फारच प्रक्षोभक ठरली. 'केसरी' सारख्या प्रमुख

वृत्तपत्रात या कवितेला ठळकपणे प्रसिद्धी मिळाल्याने ती कविता फार गाजली. आणि "हे डाळिंबाचे दाणे वेड्या, घात तुझा करिती" या काव्यपंक्ती सर्वतोमुखी झाल्या. अर्थात् अपेक्षेप्रमाणे ही प्रसिध्दी राजेसाहेबांच्या कानी जाऊन, काव्यविहारीना खुलासा विचारला गेला. तेव्हा "ब्रिटिशानी विचारलं तर अुत्तर देण्यास मी समर्थ आहे. फार तर त्यावेळी तुम्ही मला संरक्षण देऊ नका म्हणजे झालं" असं तडाखेबंद अुत्तर काव्यविहारीनी दिलं! ब्रिटिशांची अवकृपेची तशी वेळ आली नाही. याचं एक कारण म्हणजे शब्दात न सापडण्याचं कायद्याचं ज्ञान त्याना अुपयोगी पडलं असावं.

स्वातंत्र्याच्या चळवळीचा तो काळ होता. अनेक लढे, आंदोलने, सत्याग्रह यांची सर्वत्र धामधूम माजली होती. काव्यविहारींच्या अनेक कवितांमधून त्यांचे स्वदेशप्रेम व्यक्त होत होते.१९४२च्या आंदोलनात, काँग्रेसच्या बुलेटिन्समध्ये, त्यांच्या अनेक कविता अुद्धृत केल्या जात. अशा कवितांची अुदाहरणे विस्तारभयास्तव देता येत नाहीत. तरीपण त्यांच्या 'पायरीवर'या कवितेचा अुल्लेख केलाच पाहिजे. क्रांतिप्रवण स्वातंत्र्यसैनिकाच्या भूमिकेशी जुळणारी, त्यांच्या मनाची सहसंवेदना, त्यामध्ये व्यक्त झाली आहे.

"किती वेळ तिष्ठतो येथे
अजुनि का बंद ते द्वार"

अशी सुरुवात असणाऱ्या त्या कवितेच्या शेवटच्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत.

"बंद जे द्वार हे पुढचे
आंतुनि न अुघडायाचे
करुनिया यत्न निकराचे"
आम्हीच पुढुनि 'फोडावे', तेधवा खुले होणार!"

यातील 'फोडावे' या शब्दाऐवजी 'खोलावे' असा सौम्य शब्द ठेवावा, असा एक विचार होता. पण 'फोडावे' हा शब्दच जोरकस आणि अर्थवाही असल्याने तोच ठेवावा, असा काव्यविहारी व ती कविता प्रसिद्ध करणारे 'किर्लोस्कर' चे धाडशी आणि धडाडीचे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर यांचा निश्चय झाला. संभाव्य परिणामांची पूर्ण जाणीव ठेवून शं.वा.कि. एवढ्यावर थांबले नाहीत तर कवितेसोबत त्यानी एक चित्र काढले. एका मोठ्या कुलुप लावलेल्या दरवाज्यासमोर एक खेडूत हातात भला थोरला हातोडा घेऊन, हात अुगारून म्हणत आहे, "व्हाईसराया, दार अुघडणार की नाही?" अशा आशयाचे ते व्यंगचित्र त्यानी स्वत:च काढले! सांगलीच्या दुसऱ्या सुपुत्राने म्हणजे वसंतदादांनी, या कवितेच्या प्रसिद्धीनंतर काही महिन्यातच तुरुंग फोडून पळण्याचा प्रयत्न केला होता! ही घटना बोलकी आहे. कवितेचा प्रभाव

खरोखरीच त्यांच्यावर पडला असावा, असं दर्शवणारी आहे.

"वेडी मुले" या कवितेत भारतमातेला अुद्देशून काव्यविहारी म्हणतात.

"परदास्याची बेडी होती पायी तव जेधवां
पुत्र शहाणे तुझे दंगले संसारी तेधवां
काही वेडी मुले तयांची भडकुनि गेली मने
क्रांतीपूजा केली त्यानी रुधिराच्या तर्पणे"

काव्यविहारी आचार-विचाराने आधुनिक होते. समाजविघातक रुढी, परंपरा आणि अंधश्रध्दा यांच्याविरूद्ध त्यानी पहिल्यापासून बंडच पुकारले. परमेश्वराविषयी श्रध्दा असली, तरी वाचनाने, अुच्च शिक्षणाने, त्यांचे मन दिसेल त्या शेंदूर फासलेल्या दगडाला, देव मानण्यास राजी झाले नाही. पण विश्वाचे नियंत्रण करणारी काही एक शक्ती निश्चित आहे आणि तिलाच परमेश्वर मानावे, अशी त्यांची धारणा खालील कवितेत व्यक्त होते.

"व्यापोनिया विश्व स्वयंप्रकाशी
प्रकाशवी जो शशि-भास्करांसी
आणि निरोधी ग्रहमंडलासी
चैतन्य जगी स्फुरवी तो देव माझा"

बुधगावात जरी काव्यविहारी मिठाची गुळणी धरुन बसत तरी बाहेरगावी गेल्यावर, आपल्या काव्यगायनाच्या कार्यक्रमाने श्रोत्यांना जिंकून घेत. अलीकडे लोकप्रिय झालेली काव्यगायन-वाचनाची प्रथा एका परीने त्यानी सुरु केली असं म्हणायला हरकत नाही. काही कविता ते गात असत पण त्यांचा भर काव्यवाचनावर असे. ओजस्वी कविता, खडा आवाज, स्पष्ट पण लयबद्ध शब्दोच्चार, यामुळे त्यांचे काव्यवाचन फार परिणामकारक होई.

त्यांची एकूण सात पुस्तके, चार काव्यसंग्रह आणि तीन गद्य पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पहिला काव्यसंग्रह 'काव्यविहार' (१९२३) तर दुसरा आचार्य अत्रे यानी पुढाकार घेऊन प्रकाशित केलेला, आणि वि. स. खांडेकरानी प्रस्तावना लिहिलेला 'स्फूर्तिलहरी' १९३६ साली प्रसिध्द झाला. "दक्षिणा प्राईज कमिटी" ने या काव्यसंग्रहास पारितोषिक देऊन आणि मुंबई विद्यापीठाने एम. ए. परीक्षेसाठी नेमून त्याचा गौरव केला. त्यामुळे काव्यविहारीना तत्कालीन मराठी कवींमध्ये मानाचे स्थान मिळाले.

१९४८ साली संस्थान विलीन झाल्यावर, त्यानी मुदतीपूर्वीच सेवानिवृत्ती घेतली व ते सांगलीत स्थायिक झाले. साहित्य, नाट्य, काव्य, व संगीत इत्यादी सांस्कृतिक अुपक्रमांचे माहेरघर असलेल्या, सांगलीत त्यांच्या साहित्यनिर्मितीला

पुन्हा चालना मिळाली. 'स्फूर्तिनिनाद' (१९५०) आणि 'स्फूर्तिविलास (१९५४) हे आणखी दोन काव्यसंग्रह याच काळात प्रसिद्ध झाले. त्यांच्या एका नाट्यविषयक व्याख्यानाने प्रा.श्री.के क्षीरसागरांसारखा, रसिक समीक्षक, एवढा प्रभावित झाला की काव्यविहारींनी आपली नाट्यविषयक मौलिक माहिती रसिकांपर्यंत पोचवावी म्हणून गद्यलेखनाचा आग्रह त्यानी काव्यविहारींकडे धरला. त्यातूनच "नाट्यसुगंध" (१९६०) व 'नाटककार देवल-व्यक्ति आणि वाङमय' (१९६३) अशी त्यांची दोन पुस्तके सिद्ध झाली. श्री.के.क्षींच्याच आग्रहावरून त्यानी 'माझे वाङ्मयीन जीवन' हे आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले.

काव्यविहारीना आपले आत्मचरित्र काव्यात गुंफायची फार अिच्छा होती. ६ सप्टेंबर १९६१ ते २७ सप्टेंबर १९६१, या २१ दिवसात "जीवनदर्शन-आत्मचरित्रपर खंडकाव्य," दररोज सलग चार तास 'सविकल्प समाधी'त बैठक ठोकून, मोठ्या तन्मयतेने त्यानी लिहून पूर्ण केले. अर्थात् त्यामध्ये १९६१-६२ पर्यंतचाच काळ आला आहे. या खंडकाव्याची चरणसंख्या ४६१८ आहे. दुर्दैवाने हे खंडकाव्य अद्यापपावेतो अप्रकाशित राहिले आहे. प्रसिद्ध झाले असते, तर पद्यात्मक आत्मचरित्र म्हणून, मराठी साहित्यात गौरवाचे स्थान त्याला निश्चित प्राप्त झाले असते. कारण मराठीत गद्य आत्मचरित्रांचे अुदंड पीक आलेले असले, तरी पद्यात्मक आत्मचरित्र, हा अत्यंत दुर्लभ प्रकार आहे. हे आत्मचरित्र एका अर्थी अपुरे असले, तरी बऱ्याच अर्थी पूर्ण झालेले आहे. याचे कारण असे की काव्यशास्त्रविनोदात रममाण होऊन सुखाने वानप्रस्थाश्रमाची वाटचाल करत असेपर्यंतचा सगळा भाग या चरित्रात आला आहे.पुढे एका सायकलची धडक बसून त्यांच्या डोक्याला जबरदस्त मार बसला. त्यातच त्याना अर्धांगाचा झटका आला. नंतर त्यांची प्रकृती थोडी सुधारली पण लेखन मात्र बरंचसं थंडावलं. १९७१-७२ मध्ये घरीच कॉटवरुन पडून त्यांच्या मांडीचे हाड मोडले आणि ते पूर्णपणाने आंथरुणाला खिळले. अखेर २२ जानेवारी १९७५ रोजी ते शांतपणे मृत्यूच्या स्वाधीन झाले! शेवटच्या विकलांग अवस्थेतसुध्दा त्यांनी मनाची शांति व चेहेऱ्यावरची प्रसन्नता आश्चर्यकारकपणे जपली होती.

असं म्हणण्याचं कारण अितकचं की तसे ते मनमोकळ्या स्वभावाचे व मित्रांच्या मोठ्या कळपात वावरणारे नव्हते. न्यायखात्याच्या नोकरीमुळे असेल कदाचित्, पण तर्ककर्कश आणि कतर्व्यकठोर होते. त्यांची कवयित्री कन्या, सौ.विमल काळे यानी एके ठिकाणी म्हटलय "तसे आप्पा (काव्यविहारी) थोडे रागीट, एककल्ली, स्पष्टवक्ते आणि तऱ्हेवाईक म्हणून प्रसिध्द होते.......त्याना बुधगावात एकही जिव्हाळ्याचा मित्र नव्हता......त्यांची कामातली शिस्त, वेळेच्या बाबतीतला काटेकोरपणा आणि निःस्पृहता यामुळे राजेसाहेबांसकट, सर्वजण त्याना वचकून असत." हे मुद्दाम

अुद्धृत करण्याचे कारण अितकेच की त्यांचे वरील दोष समजले जाणारे स्वभावविशेष, वास्तवात सद्गुणच मानावे लागतील. न्यायखात्यात निःस्पृहपणे वागायचे तर समाजात फार सवंगपणे वागून चालत नाही. आज गरजेपेक्षा अधिक सैलपणाने वागणारे आणि समाजात स्वतःला 'सवंग' करुन घेणारे अुच्चपदस्थ अधिकारी बघितले आणि त्यामुळे भ्रष्ट होत असलेले समाजजीवन बघितले, तर काव्यविहारींसारख्यांचा मोठेपणा स्पष्ट होईल.

प्रा. श्री.के.क्षीं नी तर काव्यविहारींच्या वाङमयीन आत्मचरित्रात्मक पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना, मार्मिकपणे म्हटलय की ''त्यांच्या व्यक्तिमत्वात रोमँटिक कवी आणि संस्थानी मामलेदार यांचे विचित्र मिश्रण आहे. टेबलावरील फायली झपाझप अुरकून टाकणे, हा ज्यांचा दैनंदिन कार्यक्रम, अशा 'हपीसरांसारखी' त्यांच्या मनाची अंशतः घडण आहे तर अंशतः रविकिरण मंडळाच्या पूर्वीच्या रसिक, आदरशील, आशावादी आणि प्रगतिशील कवीसारखी आहे.' त्यांचे जामात, प्रिं. क. श्री. काळे यानी काव्यविहारींविषयक अनेक प्रकाशित लेखांचे, निवडक प्रातिनिधिक कवितांचे साक्षेपी संपादन करुन, एक अुत्तम संग्रह तयार केला आहे. पुस्तकरूपाने जरी ते प्रसिद्ध केले नसले तरी त्या संग्रहाच्या प्रती त्यानी पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र साहित्यपरिषद्, सांगली नगरवाचनालय, अशा महत्वाच्या संस्थांकडे दिल्या आहेत. काव्यविहारींच्याविषयी लेखन करु अिच्छिणाऱ्या अभ्यासकांना हे काम उपयुक्त ठरेल.

सांगलीतील साहित्यप्रेमी रसिक काव्यविहारींचे अत्यंत सहृदयतेने स्मरण ठेवतील यात शंका नाही.

●●●

# बुद्धिबळपटू भालचंद्र म्हैसकर

सांगली नगरीला क्रिकेट, बॅडमिंटन अशा खेळांची खास परंपरा नव्हती. मात्र विजय हजारे आणि नंदू नाटेकर या सांगलीच्या सुपुत्रानी, वैयक्तिक कौशल्याच्या जोरावर, मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट आणि बॅडमिंटन या खेळांमध्ये यश मिळवलं. पण बुद्धिबळाच्या बाबतीत मात्र तसं म्हणता येत नाही. या खेळाची सांगलीत किमान दोनशे वर्षांची परंपरा आहे. अेकोणिसाव्या शतकाच्या अुत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, सांगलीत मोरभटजी मेहेंदळे, विनायकराव खाडिलकर, बाबा बोडस, गोपाळराव मुजुमदार (म्हणजे सुप्रसिद्ध कवि साधुदास) नारायणराव जोशी, अण्णा गद्रे या मंडळीनी बुद्धिबळाची परंपरा निर्माण केली. आपल्या खेळातील कौशल्याने सांगलीचे नाव सर्वतोमुखी केले. हीच परंपरा नंतरच्या पिढीतील शंकरराव म्हैसकर, बाळशास्त्री फाटक, अप्पासाहेब (पु.ल.) खाडिलकर, नारायणराव खाडिलकर तम्माणाचार्य पडसलगीकर (नूतन बुद्धिबळ मंडळ, सांगली या संस्थेचे अध्यक्ष, भाऊसाहेब पडलगीकर यांचे वडील) आदी सांगलीकरानी अधिकच गौरवशाली बनवली. याच पिढीमधील एका सांगलीकराने, सांगलीचं नाव बुद्धिबळाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर नेले. त्या सांगलीकराचं नाव भालचंद्रपंत म्हैसकर.

म्हैसकरांचा जन्म १९०८ सालचा. बुद्धिबळाचं तसं त्याना बाळकडूच मिळालेलं होतं. त्यांचे वडील परशरामपंत, सावत्र बंधू शंकरराव म्हैसकर हे नामांकित बुद्धिबळपटू होते. चुलते खेळत असत. अितकेच काय पण त्यांचे आजोबा रंगात आले की गोल लाकडी ढोकळयांची तांबडी-पिवळी बुद्धिबळे घेऊन खेळत बसत! याहून गमतीची गोष्ट म्हणजे खुद्द म्हैसकरांच्या लग्नात त्यांच्या वडिलाना बुद्धीबळात गुंग झालेले असताना, आग्रहाने बोलावून आणायला लागलं! म्हैसकरांची आई लहानपणीच गेलेली असल्याने लग्नाच्या वेळी देवक चुलत्याना बसवायचे होते. त्यामुळे वडील खेळायला मोकळे होते!. अितक बुद्धिबळाचं बाळकडू!

म्हैसकरांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरात झाले. शालेय आणि महाविद्यालयीन

शिक्षण सांगली-कोल्हापूर येथे झाले. १९२९ मध्ये विलिंग्डन कॉलेजातून ते बी.ए.झाले. वडील मराठी सनद असलेले संस्थानी मुलुखातील वकील होते. मुलाने नुसतेच एच.पी. (हायकोर्ट प्लीडर) होऊन वकिली करण्यापेक्षा एल.एल.बी. करुन मोठा वकील बनावे असे वडिलाना वाटे. म्हणून म्हैसकरानी पुण्यात राहून एल.एल.बी. केलं. त्या काळातील बी.ए.एल.एल.बी म्हणजे म्हैसकराना वकिलीत मोठीच करीअर करता आली असती. तसे त्यानी पोटापाण्यासाठी सांगली संस्थानात आणि बुधगाव संस्थानात अनेक अुद्योग केले. काही दिवस वकिली, काही दिवस मुन्सफगिरी, काही दिवस चक्क एका कारखान्यात मॅनेजरगिरी केली पण काही कारणाने असेल, त्या अुद्योगांमध्ये ते रमले नाहीत. शेवटी रमले ते शिक्षकपेशात! याचं मुख्य पटणारं अुघड कारण असं असावं की या पेशामध्ये त्याना आपल्या आवडत्या खेळासाठी, म्हणजेच बुद्धिबळासाठी अधिक वेळ आपसूक मिळत होता. बुद्धिबळाचं त्याना अतोनात वेड होतं. जातिवंत क्रिकेटर, फलंदाजी करताना काय किंवा क्षेत्ररक्षण करताना काय, चेंडूवरची आपली 'नजर' कधीच काढत नाही. तसंच म्हैसकरांच होतं. बाप-लेक दोघंहि बुद्धिबळात वेडी झालेली माणसं. सकाळीच अुठून बुद्धिबळाचा पट मांडून बसत. पक्षकार येऊन आज आपली कोर्टात तारीख आहे, अशी तारस्वरात बोंब ठोकेपर्यंत त्याना पत्ताच नसे! मग कसली वकिली? 'खंडाळी' सारख्या आडगावच्या खेड्यात नोकरीला असताना सुद्धा, बरोबर कोणी खेळायला मिळायला नाही तर म्हैसकर जुनी इंग्रजी वर्तमानपत्रे काढून बसत. नामवंत खेळाडूंचे डाव आणि त्यानी केलेल्या खेळातील सुरेख चाली (Moves) त्यामध्ये दिलेल्या असत. म्हैसकर त्याचा अभ्यास करत बसत. किंवा 'लास्कर'चे 'चेस स्ट्रॅटेजी बाय एडवर्ड लास्कर' हे पुस्तक काढून त्यात डोके खुपसून बसत! पुढे एकदा मोठ्या बुद्धिबळ स्पर्धा म्हैसकरानी जिंकल्या तेव्हा त्यांचा सत्कार झाला. सांगलीचे नामवंत लेखक 'साधुदास' अुर्फ गोपाळराव मुजुमदार, वर अुल्लेखलेल्या 'लास्कर' ला गमतीने 'रास्कल' म्हणत असत. वरील सत्कारप्रसंगी म्हैसकर साधुदासाना गंमतीने म्हणाले. ''तुमच्या 'रास्कलनेच' मला यश मिळवून दिले.''

म्हैसकरांचा बुद्धिबळाचा खेळ आपले वडील, सावत्र बंधू, परिचित मंडळी, शेजारी-पाजारी यांजबरोबर नेहेमीच चालत असे. सांगलीतील जुन्या पिढीतील प्रख्यात धन्वंतरी आणि सांगली जिमखान्याचे सर्वेसर्वा डॉ.व्ही.एन.देसाई (बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर यांचे आजोबा) यानी १९२३ ते १९२६ च्या दरम्यान सांगलीत 'सदर्न मराठा कंट्री चेस टूर्नामेंटस्' भरविल्या, तेव्हा म्हैसकरानी या स्पर्धेत भाग घेऊन ज्युनिअर खेळाडूमध्ये चांगले नाव कमावले होते.

पण मातब्बर-सीनिअर खेळाडुंमध्ये खेळण्याचा योग मात्र अचानक आला.

१९२९ च्या मे-महिन्यात सांगलीच्या देवल क्लबने बुद्धिबळ सामने आयोजित केले होते. अर्थातच सीनिअर खेळांडूसाठी. त्यात तरुण म्हैसकरांना अचानक प्रवेश मिळाला. स्पर्धेसाठी बाबा बोडस, पुण्याचे प्रो. अलूरकर, साधुदास असे सीनिअर खेळाडू होते. एकूण ११ खेळाडू झाले. फेरी पूर्ण होण्यासाठी आणखी एकाची आवश्यकता होती. म्हैसकरांचे वडील खेळणार होतेच. त्याना आपल्या मुलाचा खेळ माहीत होता. त्यानी आयोजकाना आग्रह करुन तरुण म्हैसकराना स्पर्धेत प्रवेश मिळवून दिला.

या सुवर्णसंधीचा म्हैसकराना भविष्यकाळात फारच अुपयोग झाला.

त्यांची पहिलीच फेरी साधुदासांबरोबर झाली. तरुण म्हैसकर जिद्दीने खेळत होते. सामना बरोबरीत सुटणार असा चुरशीत चालला असतानाच, म्हैसकरानी एक चूक केली. नेहेमीच्या त्याच त्याच पारंपारिक खेळ्या करण्याऐवजी, एकदम जिंकायच्या दृष्टीने त्यांनी चाली रचल्या. त्या त्यांच्याच अंगाशी आल्या आणि घोड्यांच्या अखेरीत ते हरले. पण साधुदासांना तरुण म्हैसकरांच्या खेळाचा दर्जा आणि आवाका कळून चुकला. ते अितरांना म्हणाले ''विंचवाचं पिल्लू आहे. सांभाळा रे.'' मग बाबा बोडस म्हणाले, ''अजून अनुभवशास्त्र माहीत नाही.''

त्या स्पर्धेतील दुसरे, तिसरे राअुंडस बाळशास्त्री फाटक आणि के.आर.हौसिंग यांच्याबरोबर होते. ते म्हैसकरानी जिंकले. पुढचा राअुंड चक्क खुद्द त्यांच्या वडिलांबरोबर झाला. त्यात म्हैसकर हरले. पाचवा राअुंड नामांकित खेळाडू प्रो. अलुरकर यांच्या बरोबर झाला. मोठा चुरशीचा खेळ झाला. म्हैसकरानी कमाल केली. प्रो. अलूरकरांवर मात करुन जाणकार मंडळींमध्ये खळबळ अुडवून दिली. त्याचे वर्णन खुद्द म्हैसकरानी स्वतःच्या आत्मचरित्रात केले आहे. ते असे.

''माझा पाचवा राअुंड प्रो.अलुरकर याजबरोबर झाला. मी कॅसल केले नाही. ॲटॅक लावला. पण एक चूक राहिली आणि लहान मोठे गेले. पुन्हा मी एक घोडे प्याद्याखाली टाकले व अुजव्या कडेच्या पट्टीत वजीर हत्ती जुळवून त्यांच्या (अलूरकरांच्या) राजाला हैराण करुन सबंध हत्ती परत मिळवला. लोक कौतुकाने बघत होते. भाल्या म्हैसकरने प्याद्याखाली घोडे कसे टाकले आहे, ते पहायला म्हणून बाबा बोडसानी, जुने पट्टीचे खेळाडू अण्णा गद्रे याना शेजारच्या खोलीतून बोलावून आणले. डावात वजिरा वजिरी होऊन हत्ती, पाच पाच प्यादी अशी अखेरी अुरली. माझा राजा पुढारलेला मुक्त प्यादे घेऊन सरु लागला व माझ्या हत्तीने

पिछाडीस जाऊन त्यांचे प्यादे मुक्त होऊ दिले नाही व प्रोफेसराना (अळूरकराना) माझ्या प्याद्यास हत्ती द्यावा लागला व मी डाव जिंकला......प्रोफेसरानी रिझाईन केल्याबरोबर मी अुठलो आणि वडिलांच्याा अंगावर अक्षरशः अुडी मारुन त्यांच्या गळ्याला मिठी मारली. सावत्र बंधू शंकरदादा सर्व पहायला होतेच. बाबानी 'फार नाचू नको. शांत रहा'' असे सांगितले...माझ्या खेळाने बुद्धिबळक्षेत्रात एकच धमाल अुडाली. दुसरे दिवशी साधुदासानी रस्त्यात चुन्याने लिह्वून घेतले, '' गज गोष्पदी बुडाला.''

या स्पर्धेत म्हैसकराना बक्षिस मिळाले नाही. पण त्यांच्या खेळाचा दर्जा वाढला. दबदबा वाढला, मुख्य म्हणजे त्या दिवसापासून त्याना सीनिअर खेळाडूंमध्ये प्रवेश मिळाला. कोणत्याहि स्पर्धेतील त्यांचा प्रवेश सुकर झाला.

त्यापेक्षाहि महत्वाची गोष्ट म्हणजे त्याना स्वतःची 'ओळख' मिळाली!

त्यानंतर जमेल त्या स्पर्धांतून भाग घेण्याचा त्यानी सपाटा लावला. सांगलीचे 'साधुदास' काही काळ तत्कालीन सांगली संस्थानच्या सरकारी छापखान्याचे मुख्य होते. त्या अधिकारात ते ब्रिटीश चेस मॅगेझिन्स मागवत. त्यामध्ये नामांकित खेळाडूंचे गाजलेले डाव दिले जात. म्हैसकर त्या डावांचा अभ्यास करत, त्याचे चिंतन करत. काही डाव वहीमध्ये अुतरुन घेत. कारण एक तर अशी पुस्तके, मॅगेझिन्स दुर्मिळ असत आणि दुसरे म्हणजे विकत घेण्याची ऐपत नसे. मात्र म्हैसकराना सांगलीत निष्णात खेळाडूंचे डाव नेहेमी पहावयास मिळत. लोकमान्य बुक डेपोचे दीक्षित किंवा विष्णुपंत राजवाडे यांच्या चिंतामणी प्रेसमध्ये, सीनिअर खेळाडूंच्या बैठका होत. त्यांच्या खेळांचा अभ्यास करता येई.

सांगलीत २४ डिसेंबर १९३३ ते २ जानेवारी १९३४ च्या दरम्यान विष्णुपंत राजवाडे यानी बुद्धिबळ स्पर्धा भरविल्या. म्हैसकराना अर्थात् आमंत्रण होतेच. पण त्याना ११ पैकी फक्त अडीच गुण मिळाले. फक्त विनायकराव खाडिलकर यांच्यासारख्या प्रथितयश खेळाडूवर 'डबल रुक एंडिग' ने डाव करता आला एवढीच कमाई !

१९४१ मध्ये म्हैसकराना पुण्याला ''कॅप्टन रानडे चेस टूर्नामेंट्स'' जाहीर झाल्या होत्या, त्यात भाग घ्यायची संधी मिळाली. या संधीचे मात्र म्हैसकरानी सोने केले. आपला आजवरचा अभ्यास त्यानी पणाला लावला. कर्जत, मुंबई, पुणे, सांगली अशा ठिकाणांहून आलेल्या मोठमोठ्या खेळाडूंचा पराभव करत, स्पर्धेत त्यानी दुसरा क्रमांक पटकावला. रु.१२५/- चे त्याकाळचे घसघशीत बक्षिस मिळवले. खरं तर पहिल्या नंबरचाच मान मिळायचा. पण 'साधुदास' अुर्फ गोपाळराव मुजुमदारांवर,

आयत्या वेळी त्यांच्या गुरुची (म्हणजे हणमंतराव कोटणीस) कृपा झाली म्हणून ते जिंकले. अर्थात् अशी त्या साधुदासांची श्रद्धा होती. स्पर्धा संपल्यावर तेच म्हैसकराना म्हणाले, दोघांच्या सामन्यात एक वेळ अशी आली होती की गोपाळराव (साधुदास) संभ्रमित अवस्थेत होते. त्या 'नेमक्या' क्षणी तात्यांनी (कोटणीसानी) कानात सांगितले, ''गोपाळ, मात होत आहे. नीट पहा.'' आणि मी सावध झालो.

हा अर्थातच श्रद्धेचा भाग होता. गंमत म्हणजे पुढे काही वर्षानंतर म्हैसकरानी याच कोटणीसमहाराजांच्या चिरंजिवांकडून म्हणजे रघुनाथराव तथा बाबुराव कोटणीस याजकडून अनुग्रह घेतला!

यानंतर म्हैसकरानी प्रांत पातळीवरील बुद्धिबळस्पर्धेत खेळायला सुरुवात केली. १९४८ मध्ये चेस क्लब ऑफ इंडिया यानी मुंबईत भरवलेल्या स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवून चांदीची फिरती ढाल मिळवली. या स्पर्धेत आर.बी.सप्रे, वाड, रत्नाकर, डॉ.कुन्हा, बिलीमोरिआ अशा राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडूंबरोबर आपला खेळ अजमावण्याची त्याना संधी मिळाली. चांगला अनुभव मिळाला. तत्कालीन मुंबई स्टेटचे गव्हर्नर राजा महाराजसिंग यांच्या हस्ते बक्षिससमारंभ झाला. म्हैसकरानी इंग्रजीत भाषण केले. मुंबईत खेळण्याची मजा काही औरच असते. लगोलगच म्हणजे १९५० मध्ये मुंबईच्या चेतना रेस्टॉरंटमध्ये झालेल्या मॅचेसमध्ये त्याना खेळायला मिळाले. या मॅचेसना मुंबईच्या वृत्तपत्रांतून, विशेषतः इंग्रजी वृत्तपत्रांतून कशी प्रसिद्धी असते त्याची पण चव त्याना चाखायला मिळाली. एम्.के. गवांडे या खेळाडूसमोर खेळताना म्हैसकराना हार खावी लागली. अनेक सामने जिंकणाऱ्या म्हैसकरांच्या या पराभवाचे इंग्रजी वृत्तपत्राचे हेडिंग होते ''गवांडे-म्हैसकर्स वाटर्लू''

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५५ साली आंध्र-प्रदेशातील एलूरु येथे पहिली ऑल इंडिया चेस टूनामेंट झाली. त्यामध्ये महाराष्ट्रातर्फे खेळण्यासाठी आणखी अितर दोघांबरोबर म्हैसकरांची निवड झाली होती. राष्ट्रीय पातळीवर खेळण्याचा त्यांचा हा पहिलाच अनुभव. मुंबईचे सप्रे, कानपूरचे रामदास गुप्ता, केरळचे सी.एल.सुब्रम्हण्यम्, ओरिसाचे प्रा.राजगुरु, मद्रासचे एस.के. नरसिंहम् अशा खेळाडूंबरोबर गाठ होती. या स्पर्धेत म्हैसकर तिसरे आले खरे, पण स्वतःवरच थोडे नाराज झाले. राष्ट्रीय स्तरावर खेळताना आपल्या मर्यादांची त्याना जाणीव झाली. अनेक डाव हकनाक हातातून निसटले याचे त्याना दुःख झाले. त्याना स्वतःला ओपनिंगची थोडी भीती वाटे. मात्र मिडलगेम त्याना चांगला अवगत होता. शक्यतो एंडगेमपर्यत डाव जाऊ द्यायचाच नाही. मध्येच जिंकायच्या प्रयत्नात सतत रहायचे. डाव हातातून जातोय अशी स्थिती

आली की साधुदासानी सांगितल्याप्रमाणे, अगाच चुकीच्या खेळया खेळत रहायचे. या भ्रामक खेळ्यांमुळे खरोखरच प्रतिपक्ष कधी कधी बुचकळ्यात पडे आणि डाव बरोबरीत सुटे. पण पहिल्या राष्ट्रीय स्पर्धांतून खेळताना म्हैसकराना आपल्या नेहमीच्या खेळांमधील अुणिवांची प्रकर्षाने जाणीव झाली हा या राष्ट्रीय स्पर्धांचा मोठाच फायदा झाला. म्हैसकरानी पुस्तके काढून चिंतन केले.

या चिंतनाची आवश्यकता होतीच होती.

कारण म्हैसकरांच्या हातावर रेषा अुमटत होती ती परदेशगमनाची. १९५६ च्या ऑगस्टमध्ये रशियात चेस ऑलिंपिक भरायचं होतं. मग त्यासाठी भारतातर्फे खेळणाऱ्या खेळाडूंची निवड कशी करायची, यासाठी डॉ.जोसेफ स्टाईन या नामवंत बुद्धिबळपटूने अहमदाबाद येथे 'इन्व्हिटेशन टूर्नामेंटस्' भरविल्या. या स्पर्धेत जे स्पर्धक पहिल्या चार क्रमांकात येतील त्याना मॉस्को ऑलिंपिकला पाठवण्याचे ऑल इंडिया चेस फेडरेशनने मान्य केले होते. म्हणजे एका अर्थी अहमदाबाद येथे होणाऱ्या मॅचेस या 'सिलेक्शन' मॅचेसच होत्या. रामदास गुप्ता, अलूरकर, सप्रे, वैंकय्या, जी.एस.दीक्षित असे अनेक चँपिअन्स अहमदाबादेस जमले होते. म्हैसकरानी पहिल्याच सामन्यात आंध्र प्रदेशच्या दीक्षितवर तुफानी हल्ला चढविला आणि एलुरुला त्याच्याकडून झालेल्या पराभवाचे अुट्टे काढले. नंतर चुरशीचा राअुंड अलुरकर यांजबरोबर झाला. तो त्यानी टॉप क्वीन एंडिंग खेळून जिंकला. केरळच्या राजारामकडून त्याना हार पत्करावी लागली तरी एकूण स्पर्धेत म्हैसकराना चौथा क्रमांक मिळाला.

म्हणजे रशिया ऑलिंपिक निश्चित झालं !

भारताची टीम म्हणून दर्भवैकय्या, आर.बी.सप्रे, रामदास गुप्ता आणि म्हैसकर अशी चारजणांची टीम अहमदाबादच्या सिलेक्शनप्रमाणे जायची होती. रशियन हद्दीत पोचल्यापासूनचा या भारतीय टीमचा सर्व खर्च रशियन सरकार करणार होते. तिथंपर्यंत जाण्यायेण्याचा खर्च मात्र प्रत्येक खेळाडूला स्वतःच्या पैशातूनच करावा लागणार होता.

म्हैसकराना हे समजल्यावर थोडा धक्काच बसला. बुद्धिबळाचं ठीक आहे पण 'अर्थबळाचं' काय? असा प्रश्न त्यांच्यासमोर अुभा ठाकला!

सांगलीचे 'गुणी जनांचे आधारु' श्रीमंत चिंतामणराव अप्पासाहेब आणि अन्य सांगलीकरांनी मदतीचा हात पुढे केला. म्हैसकरांचे वर्गमित्र सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ श्री. जे. पी. नाईक आणि चित्रा नाईक यानी परदेशात वागावं कसं, अिथंपासून सर्व

गोष्टीचे मार्गदर्शन केले. सिटी हायस्कूलमधील त्यांच्या शिक्षक सहकाऱ्यानी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी साह्य केले. सिटी हायस्कूलच्या राजवाडा शाखेमध्ये, म्हैसकराना, श्री.के.जी. दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली रशियाला जाण्यासाठी थाटामाटात निरोप देण्यात आला. त्यांचा सत्कार करण्यात आला.

आज परदेशगमनाचं कौतुक राहिलं नाही पण ४५-५० वर्षापूर्वी त्याची अपूर्वाई होती!

काबूल-ताश्कंदमागे सप्रे, म्हैसकर वगैरेंची बुद्धिबळ टीम ३१ ऑगस्ट १९५६ रोजी मॉस्कोला पोचली. १ सप्टेंबरपासून सामने सुरु झाले. यजमान रशियासह एकूण ३४ राष्ट्रें ऑलिंपिकसाठी मॉस्कोत जमली होती. जगातील नामवंत खेळाडू आले होते.

पण दुर्दैवाने भारतीय टीमचा पूर्ण फज्जा अुडाला.

सांघिक खेळाच्या तंत्रात आणि आंतरराष्ट्रीय खेळातील स्पर्धांच्या अनुभवात भारतीय खेळाडू फारच कमी पडले. भारतीय खेळात नियोजन नव्हते. खेळ आणि खेळाडू यात अत्यावश्यक असा संवाद नव्हता. परिणामी पराभव अपरिहार्य होता.

तरीपण वैयक्तिकपणे खुद्द म्हैसकरांचे चिली, आयर्लंड आणि फिनलंडच्या खेळाडूंबरोबरचे डाव चांगले झाले. फिनलंडविरुद्ध जिंकलेला त्यांचा डाव '१२ वी चेस ऑलिंपियाड' या पुस्तकात छापून आला. म्हैसकरांच्या मते जिंकण्याची तीव्र अिच्छा भारतीय खेळाडूंमध्ये नव्हती. पराभूत मनोवृत्तीने त्यांचा खेळ झाला. आंतरराष्ट्रीय वातावरणाचा मानसिक दबाव होता. हा दबाव अितका होता की म्हैसकरांची रशियामधली पहिलीच लढत आईसलंड्च्या 'मोलर' नावाच्या खेळाडूबरोबर झाली. नाव समजले तेव्हाच म्हैसकर मनोमन खचले. त्याना वाटले की बुद्धिबळात 'मोलर अॅटॅक' म्हणून हल्ला करण्याची पद्धती आहे, त्या मोलरचाच कुणी वंशज त्यांचा प्रतिस्पर्धी आहे. एवढा मानसिक दबाव!

यानंतरही म्हैसकर भारतातील मॅचेस्‌मध्ये खेळत राहिले. दिल्ली, हैद्राबाद, मुंबई, मद्रास येथील ऑल इंडिया चेस टूर्नामेंटस्, त्याचप्रमाणे इतर कमी अधिक महत्वाच्या स्पर्धांमधून ते खेळले. पुण्याची रानडे चेस टूर्नामेंट जी फक्त हिंदूंकरिताच होती, ती पुढे सर्वांसाठी खुली झाली, तेव्हा म्हैसकर त्यात पहिले आले.

खुद्द म्हैसकरानीच लिहून ठेवलंय की हा विजय हा तसा स्पर्धांमधील असा शेवटचाच. त्यानंतर त्यांच्या खेळास अुतरती कळा लागली. ''नवीन कल्पना, पुस्तकी

अभ्यास, तरुण रक्त यानी मला पाठीमागे ढकलण्यास सुरुवात केली.'' त्यानंतर मोठ्या स्पर्धांमधील म्हैसकरांचा सहभाग अर्थात्‌च कमी झाला. होतकरु खेळाडूंना मार्गदर्शन करण्यात त्यानी अुर्वरित आयुष्य घालवले. अलीकडेच त्यांचे निधन झाले.

आजच्या घडीला सांगलीचं नाव बुद्धिबळक्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुप्रतिष्ठित आहे ते भाऊसाहेब पडसलगीकर आणि त्यांचे सहकारी यांच्या अथक प्रयत्नांमुळे. म्हैसकरानी बुद्धिबळासाठी अशा तऱ्हेचे भरीव काम मात्र केले नाही. यात त्यांच्या काही अंगभूत स्वभावदोषाचा भाग होता.

तरीपण या सांगलीकराने आपल्या गावाचं नाव बुद्धिबळाच्या क्षेत्रात थोडेसे परदेशात आणि बरेचसे अखिल भारतात दुमदुमत ठेवलं यात शंकाच नाही.

●●●

### मल्लविद्येचे द्रोणाचार्य

# कै. हरि नाना पवार

पृथ्वीराजकपूर म्हणजे जुन्या जमान्यातील चित्रपटसृष्टीतील मोठं, बडं प्रस्थ. राजकपूरचे हे पिताजी (आजच्या पिढीसाठी सांगायचं तर करिष्मा कपूरचे पणजोबा) अभिनयकुशल असे अभिनेते तर होतेच, पण आश्चर्य म्हणजे मोठे पहिलवान गडी होते. सदैव तालमीत घुमण्यात या बड्या नटाला आनंद वाटे. एकदा असेच आखाड्यात गेले होते, तेव्हा त्यांच्या एका दोस्ताने, त्यांची एका मल्लाशी ओळख करुन दिली. नव्या नव्या मल्लांशी दोन हात करण्यासाठी पृथ्वीराजांचे बाहू नेहमीच फुरफुरत असत. पण समोरचा मल्ल त्याना अगदीच किरकोळ वाटला. निदान अंगावरच्या कपड्यांवरुन तरी. पण कुस्तीला सुरुवात झाल्याबरोबर, काही क्षणांतच, त्या किरकोळ दिसणाऱ्या मल्लाने, पृथ्वीराजजीना, दाणकन खाली खेचले आणि चितपट केले. पृथ्वीराजजी अचंबित झाले. त्या मल्लाचा हात त्यानी कौतुकाने हातात घेतला. हातातील पकडीवरुनच आणि लोखंडी कांबीसारखा लवलवणाऱ्या शरीरावरुनच, त्याना त्या मल्लाच्या शरीर-सामर्थ्याची कल्पना आली. पण तेवढ्याने त्याला 'अजमावता' येणार नाही, म्हणून त्यानी आणखी आपल्या ओळखीच्या दोन तीन इराणी पैलवानांबरोबर, त्या मल्लाला झुंजायला लावलं. पाहता पाहता त्या तिन्ही इराणी पैलवानाना, त्या किरकोळ भासणाऱ्या मल्लाने अस्मान दाखवलं!

आता आखाड्यात हरलोच आहोत, तेव्हा मुद्दाम इंग्रजीमध्ये बोलून त्याची जरा 'गंमत' करावी म्हणून पृथ्वीराजजीनी, इंग्रजीत त्याच्या कुस्ती-नैपुण्याची तारीफ केली आणि विचारलं. "What is your name? Where do you come from?"

तेव्हा तो मल्ल पटकन् अुत्तरला. " I am Hari Nana Pawar from Sangli."

तेव्हा आणखीनच 'अुडालेल्या' पृथ्वीराजजीनी मनापासून कौतुकानं म्हटलं, "You are not Pawar. You are Power! "

होय, त्या 'पॉवरफुल' मल्लाचं नाव होतं हरि नाना पवार! हजार हजार जोर आणि दीड दीड हजार बैठका मारुन, वज्रदेही बनणारे, प्रतिस्पर्ध्याच्या अुरात धडकी भरवणारे, अनेक नामवंत पैलवानांना चितपट करणारे, हरि नाना पवार हे कुस्तीक्षेत्रातील

अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व होतं.

वर अुल्लेखलेला किस्सा, हरि नाना मुंबईला गेले होते, तेव्हा घडलेला होता. आपल्या केळकर या जिवलग मित्राबरोबर ते मुंबईला गेले होते . पृथ्वीराजकपूरजीनी शेवटपर्यंत हरि नानांशी ओळख ठेवली होती. सांगलीत 'दीवार' 'पठाण' वगैरे पृथ्वी थिअेटर्सची नाटके करण्यासाठी, पृथ्वीराज आले होते, तेव्हा आवर्जून त्यानी हरि नानांची भेट घेतली होती.

पैलवान गडी म्हटलं की दोन्ही अस्तन्या वर करुन, जाता येता दिसेल त्याच्यावर गुरगुरणारा, मस्तवाल दांडगट माणूस, असं चित्र अनेकदा, नाटक-सिनेमातून आपल्यापुढे अुभं केलं जातं. या समजुतीला पूर्ण छेद देणारं असं हरि नानांचं व्यक्तिमत्व होतं. सालस वृत्ती, नम्रपणा हे त्यांचे अंगभूत गुण. पुढे पुढे अध्यात्माच्या अभ्यासाने, त्यांचं व्यक्तिमत्व अधिकच शांत, आणि चिंतनशील झालं. कुस्तिगीर आणि अध्यात्मात रमणारा, असं ऐकायलासुध्दा अविश्वसनीय वाटतं! म्हणून तर हरि नानांचं सांगलीला कौतुक वाटतं.

अशा या हरि नानांचा जन्म ५ मे १९०५ रोजी सांगली जिल्ह्यातील कडेगाव येथे झाला. सामान्य शेतकरी कुटुंबामध्ये जन्मलेल्या हरि नानांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यांच्या वडिलानी आपल्या या मुलाला मोठी 'अिस्टेट' दिली. ती म्हणजे मजबूत शरीरयष्टी आणि कुस्तीची आवड! छोट्या हरिच्या वडिलांना कुस्तीचा जबरदस्त नाद होता. त्या वेडापायी कडेपूरची छोटीशी जमीन होती ती पण संकटात सापडली. कुटुंबाची ओढाताण झाली. पण कुस्तीची अनिवार ओढ काही सुटत नव्हती.

छोट्या हरिला कुस्तीवरील प्रेमाचं असं बाळकडूच मिळालं होतं!

त्यांचं बालपण कृष्णेच्या काठी गेलं. सवंगडी जमवून हुतूतू खेळावं. कृष्णेच्या पात्रात मनसोक्त डुंबावं. दमछाक झाली की मक्याची कोवळी कणसं खावीत. असा कृष्णेच्या पाण्यावर त्यांचा पिंड पोसला गेला. नाट्याचार्य देवल म्हणत की कृष्णेच्या पाण्यात वीज आहे. त्यामुळे असेल कदाचित् की ती विजेची चपळाई त्यांच्या अंगात अवतरली आणि भविष्यकाळात त्याच चपळाईनं हरि नानानी अनेकाना चकित करुन सोडलं!

हरि नानांचं प्राथमिक शिक्षण तसं अुशीराच सुरु झालं. वयाच्या ९ व्या वर्षी ते शाळेत जाऊ लागले. प्राथमिक शिक्षणानंतर वयाच्या १४ व्या वर्षी ते सांगली गावभागातील सिटी हायस्कूलमध्ये, म्हणजे इंग्रजी शाळेत जाऊ लागले. (त्या काळी ५ वी पासूनच इंग्रजी शिक्षणास सुरुवात होई, म्हणून माध्यमिक शाळांना इंग्रजी शाळा म्हणत) त्यांची बुद्धी तल्लख असली तरी मुख्य विषयांपेक्षा शाळेच्या तालमीतील

कुस्ती, मल्लखांब, क्रीडांगणावरील हुतुतु, सुरपाट्या इत्यादि खेळांकडे त्यांचे लक्ष अधिक होतं. त्यांच्या सुदैवाने सिटी हायस्कूलचे त्यावेळचे तालीममास्तर, रास्ते गुरुजींचे, छोट्या हरिकडे लक्ष गेले. हरिच्या खेळाचे आणि चपलतेचे त्याना कौतुक वाटले. हुतुतु, सुरपाट खेळताना, हरिने सहज मारलेला रपाटा, दुसऱ्या खेळाडूला पाठ चोळायला लावी! रास्ते गुरुजीना हरिचं कुस्तीप्रेम प्रकर्षाने जाणवलं. म्हणून त्या गुणग्राहक गुरुजीनी, हरिला कुस्तीचे शास्त्रशुध्द धडे द्यायला सुरुवात केली. हरिची घरची परिस्थिती प्रतिकूल आहे, हे माहीत असल्याने, या कुस्तिवीराला चांगल्या पौष्टिक खुराकाची आवश्यकता आहे, याची जाणीव ठेवून, तशा खुराकाची जोडणी त्यानी स्वतः केली. थोड्याच काळानंतर, आपला हा शिष्य कुस्तीत चांगला तरबेज झाला आहे, हे त्यांच्या लक्षात आले. पण पैलवानाचा खरा कस आखाड्यातच लागणार? तेव्हा रास्ते गुरुजीनी हरिला कुस्तीच्या फडात अुतरवण्याचे ठरविले. सुदैवाने त्याच सुमारास साताऱ्यास कुस्त्यांचा फड लागला होता. त्या फडासाठी रास्ते गुरुजीनी हरिला स्वत:च्या खर्चाने पाठवले. सातारच्या फडात, हरिने हजारो प्रेक्षकांना आश्चर्यचकित करुन सोडलं. त्यांच्या डोळ्यादेखत आपल्याहून भारी पैलवानाला हुकुमी डाव करुन अस्मान दाखवलं. रास्ते गुरुजींना याहून मोठी गुरुदक्षिणा ती कोणती? जाणकारांना त्याच वेळी हरि नानांच्या कुस्तीतील कौशल्याबरोबरच, त्यांच्या बुध्दिचातुर्याचीही जाणीव झाली. या यशाने हरि नानांचे सर्वत्र कौतुक झाले.

आणि त्याचवेळी कुस्ती हेच आपल्या जीवनाचे ध्येय ही गोष्ट हरि नानानी मनात निश्चित केली.

आजवर एक बऱ्यापैकी ताकदीचा, होतकरू पैलवान म्हणून हरि नानांकडे बघितले जाई. पण सातारच्या यशाने कुस्तीगीर म्हणून नाव कमवायची महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनात निर्माण झाली. वाटेल तितकी मेहनत, कष्ट करायची त्यांची तयारी होती. वडिलांना कुस्तीची आवड होती पण पैशाची सवड नव्हती. तीच परिस्थिती हरि नानांची होती. घरची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चाललेली. त्यात भर म्हणून त्यांचे लग्न त्याकाळच्या रीतीप्रमाणे अवघ्या तेराव्या वर्षीच लावून देण्यात आले होते. पैलवान व्हायचं म्हणजे हत्ती पोसायचे काम? तेव्हा हे जमावं कसे? हरि नानांची तीव्र अिच्छाशक्ती एवढीच जमेची बाजू!

अिच्छा असली की मार्ग सापडतो.

हरि नानाना मार्ग सापडला. त्यावेळी सांगलीत शिवरामपंत पटवर्धन नावाचे नामांकित अुस्तादजी होते. त्यांच्याकडे मल्लविद्या शिकण्याची अिच्छा हरि नानानी व्यक्त केली. जुन्या काळचे गुरु आजच्यासारखे सहजप्राप्य नव्हते. विद्यार्थ्याचा कस आणि विद्येवरची

त्याची निष्ठा अजमावल्याखेरीज, आणि साऱ्या कसोट्यांना पुरेपूर अुतरल्याखेरीज, गुरुमहाराज प्रसन्न होत नसत. शिवरामपंतानी आपल्या विद्यार्थ्याची कडवी परीक्षा घेतली. पण हजार हजार जोर आणि दीड दीड हजार बैठका मारुनहि हुं की चूं न करता, घामाने शरीर निथळत असतानासुध्दा, हरि नाना जिद्दीने पुन्हा करेला फिरवायला अुभे राहू लागले, तेव्हा शिवरामपंताना जाणवलं की हे बावनकशी सोनं आहे!

मग काय? आपल्याजवळ जे जे आहे ते सारं, भरभरुन द्यायला त्यानी सुरुवात केली. पण नुसत्या मेहनतीने काय होणार? बलसंवर्धनेसाठी साजेशा खुराकाची जोड हवीच. हरि नानांच्या घरच्या परिस्थितीची यथार्थ जाणीव शिवरामपंताना झाली, तेव्हा त्यांनी आपल्या खर्चाने, रोज डबाभर तुपाळ शिरा, चरवीभर धारोष्ण दूध असा घसघशीत खुराक हरि नानाना सुरु केला.

धन्य ते गुरु, धन्य ते शिष्य!

शिवरामपंतानी कुस्तीमधील सगळे बारकावे आणि खास डावपेच शिकवले. पण सुदैवाने हरि नानाना, आणखी एका मातब्बर गुरुच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. त्यांचं नाव चाँदसाहेब शिकलगार. त्यांची शिकवण्यातील आपुलकी पाहून हरि नाना भारावून म्हणाले होते की "या विद्येचे (मल्लविद्येचे) मर्मच त्यानी मला अुकलून दिले. वयातील आणि ज्ञानातील अंतर विसरून त्यानी मला स्वत: जातीने अंगावर घेऊन खेळविले आणि त्यात संपूर्णपणे तन्मय होऊन, मल्लविद्येचा साक्षात्कार घडविला........-त्यांचे अुपकार जन्मोजन्मी फिटणार नाहीत."

गुरूजनांच्या मशागतीला फळ येऊ लागले.

कसून मेहनत करायची आणि कुठलाहि फड चुकवायचा नाही असा हरि नानानी निश्चयच केला. गावोगावचे फड ते गाजवू लागले. त्यावेळच्या मोठमोठ्या मल्लांना त्यानी चितपट केले. मल्लाप्पा कल्हईवाला, मल्लाप्पा तडाखे, बाळू पानारी, गुलाम कादर, कर्नाटकसिंह शिवरुद्र, बाळाप्पा चौकवाला, सिद्दाप्पा बेडकीहाळ अशा अनेक मल्लांवर त्यानी मात केली आणि जवळजवळ दीड तपाहून अधिक काळपर्यंत, सांगलीची कीर्तिध्वजा त्यानी त्यावेळच्या मुंबई इलाख्यात फडकत ठेवली होती. वज्रदेही आणि पोलादी दंडाचा मल्ल म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या सडपातळ देहावरून त्यांच्या ताकदीचा अंदाज सहसा येत नसे. प्रतिस्पर्ध्याने खडाखडीच्या वेळी हात हातात धरला, की त्याला कळून चुके की हे 'पाणी' काही न्यारंच आहे. बुद्धिचातुर्य आणि डावपेंचातील कौशल्य यावरच ते कुस्ती करत आणि प्रतिस्पर्ध्याला आपली पाठ जमिनीला कधी लागली तेच मुळी कळत नसे! हत्तीचा आकार भला दांडगा असेल, त्याची ताकद दहा सिंहांना भिरकावून देण्याची असेल पण प्रत्यक्ष

लढतीमध्ये, महाकाय हत्तीच्या तुलनेत किरकोळ भासणारा सिंह हत्तीला नामोहरम करतो तशी हरि नानांची चपळाई होती. त्यांच्या बुद्धिचातुर्याने हरि नाना, कोणत्या वेळी कोणता 'डाव' करतील याचा भल्याभल्याना अंदाजच येत नसे. असं सांगतात की ज्याच्याबरोबर कुस्ती ठरलेली असेल, त्या पैलवानाला चार दिवस आधीपासूनच हरि नानांची धास्ती लागलेली असे! कुस्ती लागल्यापासून पहिल्या ५-१० मिनिटात काही करता आले तर ठीक, अन्यथा हरि नाना आपल्याला चीतपट केल्याशिवाय राहात नाहीत अशी त्याला भीती असे. पुढेपुढे पंधराशे जोर आणि दोन हजार बैठका मारल्याच पाहिजेत अशी त्यांची रोजची शिस्त होती. बरं, कुस्ती 'मारली' असं ते स्वतः म्हणतच नसत. कुस्ती 'झाली' एवढचं ते म्हणायचे.

अनेक कुस्त्या मारल्यावर, हरि नानांच्या कीर्तीचा डंका गावोगावी वाजू लागला, तशी दक्षिण महाराष्ट्रातील छोट्या मोठ्या संस्थानिकांकडून, ''दरबार-मल्ल म्हणून आमच्याकडे या'' अशी त्याना आमंत्रणे येऊ लागली. दरबार-मल्ल ही मोठी मानाची जागा होती. खुराकाची रेलचेल आणि मेहनतीसाठी ठेवायच्या जोडीदाराचा खर्च, परस्पर सरकारी खजिन्यातून! वर अनेक संस्थानी सुखसोयी. पण वरवर सुखाचे वाटणारे हे वैभव आतून लाचारीने, आणि मिंधेपणाने लिडबिडलेले असते, हे हरि नाना जाणून होते. शेकडो एकर जमीन अनेक संस्थानिकांनी त्यांना आपल्या पदरी येण्यासाठी देऊ केली होती. पण हरि नानानी तो मोह टाळला. स्वाभिमानी हरि नानाना राजाश्रयापेक्षा, सर्वसामान्यांचा लोकाश्रय मोलाचा वाटला. शिवाय संस्थानिकांच्या लहरी आणि अनियंत्रित मर्जीपुढे, सर्वानाच ''जी हुजूर'' म्हणून कसे मुजरे करावे लागतात याची हरि नानाना स्वतःच्याच एका अनुभवावरुन कल्पना आली होती. तो अनुभव मोठा 'बोलका' होता. तो असा.

एकदा एका संस्थानिकाच्या राजवाड्यातील चौकात कुस्त्यांचा फड लागला होता. हरि नानांची कुस्ती दरबारच्या पहिलवानाबरोबर ठरली होती. त्यामुळे श्रीमंतांच्या आणि अितर खाशा स्वाऱ्या सुशोभित शामियान्यात बसल्या होत्या. दूर दूर अंतरावरुन कुस्ती शौकीन मंडळी, मुद्दाम कुस्ती पाहण्यासाठी आली होती. सर्वांची अुत्सुकता एकच. दरबारचा पैलवान म्हणजे राजेसाहेबांचा पठ्ठा जिंकणार की हरणार? पंचांनी हात वर करुन अिषारा केला. एकदम गोंगाट थांबला. हरि नाना फडात अुतरले. डाव्या भुजावर अुजव्या हाताचा पंजा थोपटून, सलामीचा पहिला शड्डू त्यानी असा काही घुमवला की त्यासरशी जाणते लोक हादरले. पोलादावर पोलाद आदळल्यासारखा त्याचा तो खणखणीत शड्डू ऐकून, श्रीमंताचा पठ्ठाहि मनात जरा चरकलाच. मातीच्या मुठी एकमेकाना मिळाल्या. दोन्ही मल्ल आवेशाने परस्पराना भिडले. आणि काय? दोन मिनिटातच कुस्ती खतम् .दरबारचा पैलवान चारी मुंड्या चीत झालेला पाहून सर्वजण

हादरलेच. पंचमंडळी निकाल अधिकृतपणे सांगण्यासाठी ध्वनिक्षेपकापाशी आली.

तेवढ्यात महाराजांकडून 'निरोप' घेऊन हुजऱ्या धावत आला आणि पंचमंडळीना सांगू लागला,''निर्णय जाहीर करु नका. कुस्ती पुन्हा एकदा झाली पाहिजे''

आपला पैलवान पडला हे साहजिकच महाराजांच्या जिव्हारी लागलं होतं. निरोप ऐकून प्रमुख पंच गोंधळला. पण एकूण महाराजांचा निरोप ही काय 'चीज' असते हे तो पुरतेपणी जाणून होता. अंगावरची माती झटकत असलेल्या हरि नानांपाशी येऊन तो म्हणाला ''माफ करा हं पाव्हणं, पण कुस्ती पुन्हा एकदा झाली पाहिजे. झाल्या कुस्तीवर मला निर्णय जाहीर करता येत नाही.''

''का?''

''का??''

पंचाने तोंडावर असने हास्य आणले. ओशाळेवाणे होत तो म्हणाला, ''कुस्ती आपणच मारली आहे. नाही म्हणायला काय आमचे डोळे फुटलेत? पण---''--?

''पण काय?''

''पण आपलं महाराजांच्या अिच्छेसाठी फिरुन एकदा----ह्यॅ, ह्यॅ ह्यॅ---''

''झक मारते तुमच्या महाराजांची मर्जी. कुणाच्या मर्जी-मेहेरबानीसाठी मी कुस्ती करत नसतो. कुस्तीसाठी कुस्ती करतो. समजलात!'' हरि नाना ताडकन् म्हणाले.

आणि ज्या तडफदारपणे त्यानी कुस्ती मारली, तितक्याच तडफेने, सोन्याच्या कड्याची अभिलाषा न धरता, स्वाभिमानी हरि नाना बाहेर पडले.

ही आठवण मनात 'घर' करुन असल्यामुळेच कदाचित् संस्थानिकांच्या पदरी न जाण्याचा निर्णय हरि नानानी घेतला असावा. वास्तविक त्या दरबारी पैलवानाला पुन्हा कुस्तीत हरवणं त्याना अजिबात अशक्य नव्हतं. पण तसं करण्यात महाराजांची मर्जी संभाळण्याचा लोचटपणा केल्यासारखं झालं असतं आणि हरि नानांच्या मानी स्वभावात ते बसणारं नव्हतंच नव्हतं!

हे एक आणि एकदा का संस्थानच्या मेहेरबानीच्या मोहात पडलं की मनात संपत्तीविषयी अभिलाषा निर्माण होईल. दिवसेंदिवस ती वाढतच राहील या वास्तवाचे हरि नानाना सजग भान होते. नुसत्या कुस्त्या मारण्यात आणि फेटे मिरविण्यात त्याना स्वारस्य नव्हते तर मल्लविद्येचे त्याना प्रेम होते.

त्यामुळे योग्य वय होताच त्यानी आखाड्यातील कुस्ती सोडून दिली. गुरूची भूमिका घेतली. आपल्या गुरूंनी जसं आपल्याला विद्यादान केलं तसं मुक्तहस्ते विद्यादान करण्याचे त्यानी ठरविले. होतकरू पैलवानांना हाताशी धरुन त्याना शास्त्रशुद्ध

असं मल्लविद्येचे शिक्षण देण्यास त्यानी सुरुवात केली. सांगलीच्या कुस्ती षौकिनांनी हरि नानांवरील प्रेमाखातर, त्याना नदीकाठी केशवन.थ मंदिराच्या परिसरात एक तालीम बांधून दिली. कुस्तीसाठी तांबड्या मातीचा आखाडा, मल्लखांब, करेले अशा विविध सोयीनी ती तालीम सुसज्ज झाली. करड्या शिस्तीने हरि नाना तिथं तालीम करुन घेत. हरि नाना मल्लविद्येचे व्रतस्थ अुपासक होते. त्यामुळे चारित्र्यपालनावर त्यांचा कटाक्ष असे. याबाबतीत कोणी थोडा जरी हलगर्जीपणा केला, तरी ते कोणाची गय करीत नसत. तत्क्षणी श्रीमुखात ठेवून देत किंवा तालमीतून कायमची हकालपट्टी करत. त्यामुळे आपल्या या गुरुविषयी शिष्यांच्या मनात आदरयुक्त भीती असे. जरब असे. त्यामुळेच ज्योतिरामदादा सावर्डेकर यासारखे 'भारत भीम' म्हणून नावलौकिक मिळवलेले पैलवान त्यांच्या शिष्यगणात होते. महाराष्ट्रातील राजकीय जीवनात विशेष स्थान असलेले, आमदार संभाजी पवार हे तर त्यांचे पुत्र. ते स्वत: आणि आता त्यांचा पुत्र, म्हणजे हरि नानांचा नातू, पृथ्वीराज पवार ह्यानी घरातील कुस्तीपरंपरा चौथ्या पिढीपर्यंत अबाधित राखलेली आहे.

मल्लविद्येचे निस्सीम अुपासक म्हणून हरि नानांच्याभोवती, जे एक वलय आहे, त्याभोवती आणखी एक तेजोवलय आहे. ते म्हणजे अध्यात्माचे. पैलवानी पेशाचा गडी आणि अध्यात्म यांचं काही नातं असेल, अशी आपण कधी तरी कल्पना करु का? पण हरि नानांच्या बाबतीत ही विलक्षण अपवादात्मक वस्तुस्थिती होती. वानप्रस्थानाश्रमाची कर्तव्ये त्यानी अुत्तम पार पाडली. शिवाजी, तानाजी आणि संभाजी या तिन्ही पुत्रांनी पित्याचा वारसा व्यवस्थित सांभाळला. आपापल्या व्यवसायात स्वतंत्रपणे ते सुस्थिर झाले. हरि नानानी प्रपंच नेटका पूर्ण करुन आधुनिक युगाला साजेलसा संन्यासाश्रम पार पाडला. श्रीमद् भगवद्गीता, ज्ञानेश्वरी यांचा हरि नानांचा गाढा अभ्यास होता. संपूर्ण गीता त्याना मुखोद्गत होती. अुपनिषदामधील तत्त्वज्ञान, आचार्यांची भाष्ये, विद्यारण्य, विवेकानंद या सर्वांचा अभ्यास त्यानी कुस्तीच्या अभ्यासासारखाच तन्मयतेने केला. मॅट्रिकला त्यांचे संस्कृत होते. मुळात कुशाग्र बुद्धी आणि त्याला सखोल चिंतनाची, मननाची जोड यामुळे दुर्मिळ मनःशांतीचा लाभ त्याना झाला. हजारो जरीचे पटके आणि शेकडो सोन्यारुप्याची कडी मिळवूनहि त्यांच्या वृत्तीत, पैलवान मंडळीत सहसा आढळणाऱ्या गुर्मीचा लवलेशहि नव्हता तो या आध्यात्मिक वृत्तीमुळेच. त्यात त्याना अिश्वरशास्त्री दीक्षित, रामचंद्र तथा पुटुनाना ठाणेदार, केळकर अशा मित्रपरिवाराची चांगली जोड मिळाली.

सांगली नगरपालिकेने हरि नानांच्या ९२ व्या वाढदिवशी म्हणजे २ फेब्रुवारी १९९६रोजी मानपत्र देऊन सांगलीच्या या सुपुत्राचा थाटामाटात सत्कार केला. त्या भव्य सन्मानाच्या आठवणीत, सर्व सांगलीकर मग्न असतानाच, १६ मार्च १९९६ रोजी या मल्लविद्येतील द्रोणाचार्यांचा अंत झाला. ●●●

## ज्ञानपीठ पारितोषिक विजेते

# वि.स. खांडेकर आणि सांगली

'ज्ञानपीठ' पारितोषिक म्हणजे एक प्रकारचे नोबेल पारितोषिकच. भारतीय पातळीवरील साहित्य क्षेत्रातील केवढा मोठा पुरस्कार! कुठल्याही प्रांतातील लेखकाला मिळाला, तरी त्या त्या प्रांतातील, साहित्यप्रेमींची छाती दोन इंच तरी अभिमानाने फुगत असेल! त्यातून महाराष्ट्रात तर काय, एक सोडून दोन दोन लेखकांना हा पुरस्कार मिळाला. आणि साहित्यातील या सर्वोच्च मानदंडाचा एक मानकरी चक्क सांगलीकर असावा? होय, सांगलीत जन्मलेल्या त्या सुपुत्राचे नाव विष्णू सखाराम खांडेकर. सांगलीकरांसाठी हा केवढा मानाचा शिरपेंच आहे! आद्य नाटककार विष्णुदास भावे, साधुदास, गोविंद बल्लाळ देवल, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर या सांगलीकर नरशार्दुलांनी साहित्यशारदेच्या दरबारात पंचहजारी, सप्तहजारी काबीज करता करता राजसिंहासनच पादाक्रांत करावं, असाच हा खांडेकरांचा पराक्रम आहे हे निःसंशय.

अशा या विष्णू सखाराम खांडेकरांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगलीत झाला. त्या दिवशी अंगारकी संकष्टी होती. गणपती सांगलीकरांचे दैवत. खांडेकरांचं घर सांगलीच्या सुप्रसिद्ध गणपतीमंदिराजवळच. साहजिकच त्यांचं नाव 'गणेश' ठेवण्यात आलं. लहानपणी खांडेकरानी लेखक व्हायची स्वप्नं रंगवली, तेव्हा लेखावरती 'गणेश आत्माराम खांडेकर' हे नाव झळकलेलं पाहायची त्यांची अतीव अिच्छा होती. पण योगायोग पहा कसा असतो. 'लेखक' म्हणून मानमान्यता मिळाली ती 'विष्णु सखाराम खांडेकर' या नावाला! एकूण 'गणेश आत्माराम खांडेकरांचा' लेखक होण्याचा योग नव्हता; दत्तक जाण्याचा होता !

खांडेकर मंडळी मूळची कोकणातील. सावंतवाडीकडची. खांडेकरांच्या वडिलांचे, घरात चुलत्यांशी पटलं नाही म्हणून त्यानी रागारागाने घर सोडलं आणि सांगलीत येऊन स्थिरावले. वकिलीचा अभ्यास करुन सनद मिळविली. काही काळ वकिली केली. मग ते सांगली संस्थानच्या राजवटीत मुन्सफ झाले. ते मुन्सफ असतानाच खांडेकरांचा जन्म झाला. त्या आधीचा खांडेकराना एक थोरला भाऊ होता. खांडेकर नंबर दोनचे. नंतर त्याना आणखी एक भाऊ झाला. खांडेकर दोन वर्षाचे असताना त्यांचे वडील सर्व कुटुंबियाना घेऊन, एकदा कुलस्वामिनीचे दर्शन घ्यावं, या हेतूने

सावंतवाडीला निघाले. त्या काळचा प्रवास म्हणजे बैलानी ओढलेल्या सारवटगाड्यांतून होत असे. रात्रीच्या वेळी आंबोली घाट चढत असताना, बैलगाडीत अगदी कडेला बसलेले, खांडेकरांचे वडील आत्मारामपंत कलंडले. सरळ रस्त्यात पडून त्यांच्या डोक्याला मार बसला. त्यातून अर्धांगवायूचं दुखणं अुद्भवलं. या दुखण्याच्या पायी मुन्सफाची नोकरी त्याना झेपेना. मुन्सफ असण्याच्या काळात त्यांचं घर म्हणजे सुखवस्तू मध्यमवर्गियाचं घर होतं. घरी स्वयंपाकीण, मोलकरीण असलेल्या या आनंदी घरात, प्रतिष्ठित मंडळींची अूठबस असे. खांडेकरांचे वडील रसिक होते. त्यामुळे नाटककार गोविंद बल्लाळ देवल, सांगली संस्थानचे मुख्य डॉक्टर आणि स्वतः खांडेकरानी ज्यांची 'मला भेटलेला पहिला देवमाणूस'' अशी गौरवास्पद नोंद केली आहे, असे डॉ.हरी श्रीकृष्ण देव (धुळ्याचे समर्थभक्त शंकरराव देवांचे थोरले बंधू) अशी मंडळी येत असत. अशा 'देव देवलांच्या' सहवासात काव्यशास्त्रविनोदात मजेत वेळ जाई. चार मित्र-मंडळी जमवून नाटकं बसवणाऱ्या, बाल खांडेकरानी खुद्द देवलांसमोरच, त्यांच्या 'शारदा' नाटकाचा एकपात्री प्रयोग केला होता !

वडिलांच्या आजारपणापासून मात्र या सुखाच्या दिवसांना ओहोटी लागली. खांडेकरांच्या वडिलांचा मूळ स्वभाव तापट. ऑफिसात काहीतरी कुरबूर झाली. त्या भांडणात त्यांच्या अर्धांगाच्या दुखण्याने पुन्हा डोकं वर काढले. अपंग अवस्थेत त्याना अंथरुणाला खिळून पडावे लागले. आमदनी कमी झाली. भलं मोठं प्रशस्त घर सोडून थोड्याशा अंधाऱ्या आणि लहान जागेत राहावं लागलं. खांडेकरांचा मूळ स्वभाव हूड होता. चार सवंगडी जमवून नाटकं करावीत. कृष्णानदीकाठच्या मळीतून हुंदडावं. माळ्याची नजर चुकवून, मक्याची कोवळी लुसलुशीत कणसं खावीत. क्रिकेटचा खेळ तास न् तास खेळावा. अशा मौजमजेत चाललेल्या सुखाच्या बालपणाला दृष्ट लागली! अंथरुणाला खिळलेल्या, वडिलांच्या दुखण्याने, खांडेकराना आयुष्यातील दुःखाचे, वेदनेचे पहिले दर्शन झाले. आणि ते फार जवळून झाले. अितके जवळून की त्यामुळे खांडेकरांचा हूडपणा एकदम मावळला! वडिलांवर त्यांची आत्यंतिक श्रद्धा होती. त्यामुळे त्यांची सर्वतोपरी शुश्रुषा करण्याचं काम त्यानी आपल्या अंगावर घेतलं. त्यांच्या बिछान्याजवळ बसून, त्याना काहीतरी वाचून दाखवणं, त्याना दोन्ही वेळा भरवणं, शौचाला बसवणं वगैरे सर्व कामे ते निष्ठेने करु लागले. असं अकाली प्रौढत्व यायला परिस्थिती जशी कारणीभूत झाली, तशी काही अंशी त्यांच्या आईचा स्वभावहि कारणीभूत झाला. खांडेकरांची आई म्हणजे साने गुरूजींची 'शामची आई' नव्हती. प्रेमळ नव्हती पण तशी कजागहि नव्हती. खांडेकरानी स्वतःच म्हटल्याप्रमाणे तिच्या ठिकाणी संवेदनक्षमता अजिबात नव्हती. नवऱ्याला अर्धांगाचा आजार होईपर्यंत, या अर्धांगिनीने साधारणपणे सुखासीन जीवन व्यतीत केले होते. पण आर्थिक

विपन्नावस्था आल्यावर, कोंड्याचा मांडा करावा, टुकीने संसार करावा, रुग्णाईत नवऱ्याला धीर द्यावा, मुलाना माया द्यावी, त्यांच्या खाण्यापिण्याकडं बघावं, त्यांची फाटकी धोतरं, सदरे वेळच्या वेळी शिवावेत असलं तिला काही सुचतच नसे. कुणाचीच तिला माया नसे वा कुणाविषयी आस्था नसे. या तिच्या पराकोटीच्या अनास्थेपोटीच, कदाचित् खांडेकराना, आपल्या वडिलांची शुश्रुषा आपणच केली पाहिजे, हे कटू सत्य दहा-बारा वर्षाच्या कोवळ्या वयातसुद्धा, मनावर घट्टपणे ठसलं असावं. ती त्यानी मनापासून केली. त्यासाठी दिसतील त्या देवळांचे अुंबरे झिजवले. शनिमाहात्म्य वाचले. मनोमन नवस केले.डॉ. देवांची मदत होतीच.

इंग्रजी तिसरीपर्यंत खांडेकरांचे शालेय जीवन सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणेच चालले होते. हूडपणा भरला होताच. सांगलीचा परिसर म्हणजे नाट्यपरिसर. विष्णुदास भाव्यानी लावलेले नाटकाचे रोपटे चांगलेच फोफावले होते. सांगलीचेच देवल-खाडिलकर, आता नाट्यसृष्टीत कीर्तीशिखरावर तळपत होते. त्यामुळे प्रत्येक सांगलीकर, नाट्यप्रेमी असायचाच, असा जणू विधिसंकेतच होता. मग खांडेकर तर काय? प्रत्यक्ष नाट्याचार्य देवलांच्या समोरच त्यानी आपली 'नाट्यसेवा' शारदेच्या एकपात्री प्रयोगाने सादर केलेली! त्यातच त्यांच्या या नाट्यप्रेमाला त्यांचे मामेभाऊ बापूराव माईणकर, आणि एक दूरचे आप्त पंडित मास्तर, यांच्यामुळे आणखी खतपाणी मिळाले. कृष्णाकाठच्या घाटावर, खांडेकर आपल्या मित्रमंडळीसह नाटकांचे अखंड प्रयोग करीत.

पण वडिलांच्या आजाराने या नाट्यप्रेमाला 'पडद्याआड' व्हावं लागलं.!

तरीसुद्धा वडिलांसाठी 'शनिमाहात्म्य' वाचता वाचता एका अुर्मीसरशी, खांडेकरानी त्यातील कथानकावर एक नाटक खरडले होतेच.

पण शाळेतील एरवी कडक असणाऱ्या 'मुद्गल' मास्तरांमुळे आणखी एका वेगळ्याच अुर्मीने जन्म घेतला.

*ती अूर्मी होती स्कॉलर बनण्याची !*

शाळा चुकवण्यावरुन रागावताना मुदगल मास्तर म्हणाले होते "हे पाहा खांडेकर, तुझे वडील फार आजारी आहेत. अंथरुणाला खिळले आहेत. चांगला अभ्यास केलास, तुझा पहिला नंबर आला, तर त्याना किती बरं आनंद होईल! स्वतःसाठी नाही तरी वडिलांसाठी, त्याना आनंद देण्यासाठी तरी तुला अभ्यास केलाच पाहिजे."

हे मात्र खांडेकराना फार फार पटले. त्यानी मनापासून अभ्यासाला सुरुवात केली.

खांडेकर सांगली हायस्कूलचे विद्यार्थी. त्यावेळी ही इंग्रजी शाळा राजवाड्यासमोरच्या आता कोर्ट भरते त्या जागी भरे, आणि नंतर आमराईजवळील, सुंदर अिमारतीत सांगली हायस्कूल आले. श्रीपादशास्त्री देवधर संस्कृत शिकवत. त्यानी नुसती भाषाच नाही शिकवली तर संस्कृत भाषेचे मर्म शिकवले. त्यानी शिकवलेले संस्कृत खांडेकराना आयुष्यभर पुरले पण त्याहिपेक्षा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला, तो शंकरशास्त्री केळकरांच्या मराठी शिकवण्याचा. त्यांच्या रसाळ वाणीमुळे खांडेकराना मराठी भाषेची गोडी लागली, अनिवार वाचनाची आवड लागली. त्यांच्या नकळत त्यांच्यात एक लेखक फुलत गेला.

खांडेकरानी मनापासून अभ्यासाला सुरवात केली पण वडिलांच्या आजारपणामुळे बसणाऱ्या आर्थिक चटक्यांमुळे, त्यांचं कोवळं मन वेळोवेळी करपून जाई. पुस्तकं घ्यायला पैसे नसत. वेळच्या वेळी जेवण मिळणे फार कठीण गोष्ट बने. मग दूध प्यायला मिळणे दुरापास्तच. त्यामुळे त्यांनी अंग असे कधी धरलेच नाही. भरपेट जेवण मिळणे हा मोठा 'भाग्ययोग' असे.

असा भाग्याचा दिवस कधी कधी खांडेकरांच्या आयुष्यात अुगवे, तो त्यांच्या आजोबांमुळे-बाबाकाकांमुळे.

बाबाकाका हे खांडेकरांचे आजोबा. त्यांच्या आईचे वडील. ते खांडेकरांच्या बालपणातच सत्तरीच्या घरात होते. तरीसुद्धा ते तेजःपुंज दिसत. गौरवर्णी हसतमुख आणि अतिशय प्रेमळ असे बाबाकाका, गणपती संस्थानचे पुराणिक होते. गणपतीमंदिरात पुराणिक म्हणून त्याना नित्यनैमित्तिक असे काम होते. गणपतीसंस्थानच्या सर्व सेवकांची मोफत जेवणाची व्यवस्था, त्या वेळी देवळाच्या आवारातच होत असे. बाबाकाकानी रात्रीचे जेवण सोडलं होतं. दुपारी काही कामगिरी निमित्तानं बाहेर गेलं, तर त्यांच्या बदली, गणपतीमंदिरात दुसरं कोणी जेवायला गेलं तरी चालत असे. अशी संधी कधी कधी खांडेकराना मिळे. मग बाबाकाकांऐवजी ते जेवून येत. मिळकत नसलेल्या घराचा तेवढाच भार कमी होई! आज या घटनेच्या आठवणीने सुद्धा ओशाळवाणे वाटते. पण खांडेकराना त्या काळात या जेवणाचं केवढं अप्रूप असेल? एक मात्र नुकसान व्हायचं. शाळेला जायला अुशीर होई. पहिला तास हमखास बुडे. कारण गणपतीमंदिरातील जेवणाला घड्याळाचे बंधन नसे.

अशा अडचणीतूनसुद्धा खांडेकर अभ्यासाकडे अजिबात दुर्लक्ष करत नसत. यामुळे इंग्रजी चौथीच्या परीक्षेत त्याना स्कॉलरशिप मिळाली. चक्क तीन रुपयांची ! जग जिंकल्याच्या आवेशात ते तीन बंदे रुपये घेऊन खांडेकर घरी आले. त्यावेळी व्याधिजर्जर असलेल्या वडिलांच्या मुद्रेवर जो आनंद पसरला आणि डोळ्यात जे

आनंदाश्रू तरळले, त्यामुळे खांडेकराना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. असाच निर्मळ आनंद त्याना सदोदित द्यावा, म्हणून दुप्पट अुत्साहाने खांडेकर अभ्यासाला लागले.

पण सगळं काही मनासारखं घडलं तर ते जीवन कसलं? विधिलिखित ही एक अगम्य गोष्ट आहे.

डॉ. देवानी आपल्या मित्रासाठी वेचलेले अपार परिश्रम दैवाने मातीमोल ठरवले. ज्याना सुख व्हावे, आनंद वाटावा म्हणून खांडेकर सतत अभ्यासाच्या दावणीला, स्वतःला बांधून घेत होते, ते त्यांचे वडीलच देवाघरी गेले. खांडेकर पूर्णपणे खचून गेले.

पण सुदैवाने वडिलांच्या माघारी आपण आपल्या कुटुंबाचा भार अुचलला पाहिजे याची खांडेकरांना प्रकर्षाने जाणीव होऊ लागली. याला कारण म्हणजे सत्तरी ओलांडलेले बाबाकाका.वडिलांच्या दुःखद निधनानंतर खांडेकरांचं सगळं कुटुंबच, आजोळी बाबाकाकांच्या आश्रयाला आलं होतं. बाबाकाका समाजात जरी बाबाशास्त्री माईणकर म्हणून मान्यवर असले तरी आर्थिक प्राप्ती तुटपुंजीच. त्यामुळे खांडेकरांचं कुटुंब त्यांच्या घरी आश्रयाला जाणं म्हणजे शिवरात्रीच्या घरी एकादशी असाच प्रकार होता! पण प्रेमळ मनाच्या, सर्वप्रकारच्या अडचणीतही सदैव हसतमुख राहणाऱ्या बाबाकाकानी सर्व जबाबदारी स्वीकारली. खांडेकरानी मात्र मनाशी खूणगाठ बांधली. लौकरात लौकर आपल्या पायावर अुभं राहायचं आणि बाबाकाकांची व सर्वच आजोळच्या मंडळींची जबाबदारी कमी करायची. त्यानी अभ्यासाला नेटाने सुरुवात केली. तरीसुद्धा वडिलाना काही तरी करून दाखवायचंच, ही जी एक अुर्मी होती, ती त्यांच्या निधनानंतर बरीचशी ओसरली ! त्यातच अभ्यासापोटी थोडा मागे पडलेला वाचनाचा नाद अुफाळून वर आला. मिळेल ते पुस्तक वाचायचा सपाटा त्यानी सुरु केला. त्यांचे वकील असलेले मामा, विनायकराव माईणकर यांचं सांगली नगरवाचनालयात नाव होतं. त्यांच्या नावावर खांडेकर पुस्तकं आणू लागले. कथा, कादंबरी, नाटक जे काही हाताशी लागेल ते वाचायचे. शेळीला जसा कुठल्याही झाडाचा पाला चालतो तसं खांडेकरांचं झालं होतं ! सकाळचं पुस्तक संध्याकाळी परत करायचं, आणि संध्याकाळी घेतलेलं पुस्तक रात्री जागत वाचून दुसऱ्या सकाळी परत करायचं! अशा वाचनाच्या झपाट्यानं वाचनालयाचा कारकूनहि गडबडून गेला! पुस्तक वगैरे काही एक वाचत नाही. निव्वळ पुस्तकं शोधायला लावून आपल्याला छळणं एवढाच या मुलाचा हेतू आहे असं वाटण्यापर्यंत त्याची मजल गेली.!

हे अतिवाचनाचं व्यसन आणि मॅट्रिक झाल्यावर पोस्टात वगैरे कुठंतरी याला 'चिटकवून' द्यावं, अशी आजोळच्या घरात चालणारी वडीलधारी मंडळींची भाषा,

यामुळे खांडेकरांच्या अभ्यासात थोडी ढिलाई आलीच.

आणि अशा परिस्थितीतहि २२ डिसेंबर १९१३ रोजी जेव्हा मॅट्रिकचा निकाल लागला, तेव्हा मुंबई विश्वविद्यालयात त्यांचा आठवा नंबर आला; अगदी थोड्या मार्कानी त्यांचं इतिहासाचं पारितोषिक हुकले. एवढ्या घवघवीत यशामुळे, सर्वांची खांडेकरांकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. नोकरीला चिकटवावं म्हणणारी मंडळी, या हुशार मुलाला कॉलेजात पाठवावं, अशी भाषा करु लागली! खुद्द खांडेकराना पण आपण अवांतर वाचनात, फार काळ घालवला याची टोचणी लागली. कदाचित आजारी, अपंग अवस्थेतील वडील हयात असते, तर याहून अधिक यश आपण मिळवंल असतं असंहि त्याना वाटून गेलं असेल! त्यांच्या तीन सख्खे व सहा चुलत अशा नऊ मामांनी मिळून अुत्साहाच्या भरात खांडेकराना पुण्याला फर्ग्युसनला पुढील कॉलेजशिक्षणासाठी पाठवण्याचे ठरवले.

त्याप्रमाणे १९१४ सालच्या प्रारंभी पुण्यास जाण्याकरता खांडेकरानी सांगली सोडली.

आणि अिथपासून खांडेकरांचे सांगली वास्तव्य खऱ्या अर्थाने संपुष्टात आले. सांगलीला आजोळ होतं. सांगली सांस्कृतिक केंद्र होतं. सांगलीत त्यांचे मित्रमंडळ होतं. चहाते होते. या सर्व कारणांनी त्यांचे सांगलीत येणं-जाणं राहिलं. पण १९१४ पासून त्यांचं सांगलीकर म्हणून वास्तव्य होते ते संपले.

पुण्यात ते कॉलेजशिक्षणासाठी दीड दोन वर्षे राहिले. पण त्यांची आर्थिक परवड फार झाली. त्यामुळे त्याना शिक्षण पूर्ण करता आलं नाही. अुत्साहाच्या भरात ज्या नातेवाईकानी त्याना पुण्यास पाठवण्याचा घाट घातला, त्याना शेवटपर्यत आर्थिक मदतीचा नियमित ओघ चालू ठेवणं परवडलं नाही. मग सावंतवाडीच्या दूरच्या चुलत्याना दत्तक हवा होता म्हणून खांडेकराना दत्तक द्यायचे परस्पर ठरविले गेले. खांडेकरानाही भाबडेपणाने वाटले की दत्तक जाण्याने आपल्याला आर्थिक सुबत्ता लाभेल. शिक्षण पूर्ण करता येईल. घरच्याना चार पैसे पाठवता येतील. पण हे सर्व मनसुबे त्यांच्या दत्तक वडिलांच्या खास, 'सावकारी' पद्धतीच्या स्वभावधर्मामुळे, पार अुधळले गेले. ध्येयवादी मनाच्या खांडेकरानी मग सावंतवाडीजवळच्या शिरोडा या खेडेगावात अठरा वर्षे शिक्षक म्हणून काम केले. १९३८ नंतर ते कोल्हापूरला राहावयास आले, ते अखेरपर्यंत म्हणजे २ सप्टेंबर १९७६ रोजी मिरजेला त्यांचे देहावसान होईपर्यंत. या म्हणजे सांगली सोडल्यानंतरच्या काळात त्यानी विपुल लेखन केले. कथा, कादंबरी, लघुनिबंध, समीक्षात्मक, अनुवाद, संपादित अशी त्यांची प्रचंड ग्रंथसंपदा आहे. त्यांच्या लेखनाने मराठी साहित्यात 'खांडेकर युग' सुरु

झाले. त्याना अुदंड लोकप्रियता मिळाली. १९४१ साली त्याना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लाभले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, साहित्य अकादमीचे फेलो, असे अनेक मानसन्मान त्याना लाभले. सर्वात कळस म्हणजे १९७४ मध्ये त्यांच्या 'ययाति' कादंबरीला एक लाख रुपयाच्या 'ज्ञानपीठ' पारितोषिकाचा, सर्वमान्य गौरवाचा पुरस्कार मिळाला.

खांडेकराना मिळालेले विविध मानमरातब, त्यांची एकूण ग्रंथसंपदा याची मराठी वाचकाला आता साद्यन्त माहिती झाली आहे, विशेषतः नुकत्याच पार पडलेल्या त्यांच्या जन्मशताब्दीमुळे. पण लेखक म्हणून त्यांची मानसिक जडणघडण या सांगलीनेच केली, अशी नोंद खुद्द खांडेकरानीच आपल्या लेखनात अनेकवार केलेली आहे. सांगलीत बालपणात अनुभवलेल्या, ऐकलेल्या आणि प्रत्यक्ष बघितलेल्या अनेक प्रसंगानी, धार्मिक रुढी आणि परंपरा यांच्या चौकटीत ठाकून-ठोकून बसविलेल्या सांगलीच्या वातावरणानं, विचारानं त्याना बंडखोर बनवलं, तसंच त्यांच्या मनात काही जीवनमूल्यांविषयी श्रद्धा निर्माण करण्याचं कामहि सांगलीनेच केले. खांडेकरांनी स्वतःच म्हटलय की "सांगलीनंच मला रामायण-महाभारतातल्या भारतीय संस्कृतीचा अभिमानी बनवलं आणि सांगलीनंच मला त्या काळी अल्पमतात असणाऱ्या सुधारक मतांकडे खेचून नेलं." सांगलीच्या संस्कारक्षम वयात गोपाळशास्त्री देवधर, शंकरशास्त्री केळकर, मुद्गलमास्तर यासारख्यांच्यामुळे मराठी भाषेची मनोमन जोपासना झाली; आयुष्यात काहीतरी चांगलं करावं, चांगलं बनावं अशी अुर्मी मनात निर्माण झाली. रामभाऊ जोशी, बुवासाहेब गोसावी, जंबुअण्णा आरवाडे यासारखे काळजी वाहाणारे सन्मित्र, डॉ.देवांसारखा निरपेक्ष समाजसेवा करणारा देवमाणूस, प्रतिकूल परिस्थितीतहि हसतमुख राहू शकणारे बाबाकाका ही माणसं त्याना सांगलीतच मिळाली. त्यांच्या सहवासाचा खांडेकरांच्या मानसिक जडण-घडणीवर दूरगामी परिणाम झाला.

यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे खांडेकरांच्या ललित लेखनाला पोषक अशी सौंदर्यदृष्टी, चिंतनशीलता, निसर्गाचं प्रेम, त्याना सांगलीतच मिळालं. सांगलीच्या या आयुष्यभर पुरणाऱ्या संस्कारधनाबद्दल आपल्या आत्मवृत्तात त्यानी जे लिहलंय ते मुळातूनच वाचण्यासारखं आहे. 'एका पानाची कहाणी' मध्ये त्यानी म्हटलय.

"सांगलीत माझ्या आयुष्याची पहिली सोळा वर्ष गेली. 'मनि नव्हती कशाची चिंता । आनंद अखंडित होता' असे शारदा बालपणाविषयी म्हणते. माझं बालपण तसं निश्चिंत किंवा आनंदपूर्ण नव्हतं. असं असूनही सांगलीच्या ज्या स्मृती माझ्या मनात राहिल्या आहेत, त्या साऱ्या आनंददायक आहेत. मानवी जगाचा मी एक सामान्यांतला सामान्य असा घटक, पण हे मानवी जग विशाल विश्वाच्या भव्य मंदिरातलं एक लहानसं दालन आहे. त्या विश्वाचं कुतूहलजनक अति-आनंदप्रद

दर्शन मला घडलं, ते प्रथमतः सांगलीत. गणपतीच्या घाटावर बसून, पश्चिमेकडला मावळता सूर्य, मी डोळे भरुन प्रथम सांगलीतच पाहिला. हरद्वारच्या गंगेच्या विशाल पात्राप्रमाणे, चराचर सृष्टीभर पसरलेल्या चांदण्याच्या सुंदर प्रवाहानं मला मंत्रमुग्ध करुन सोडलं,ते याच परिसरात. कोजागरी पौर्णिमा दर वर्षी येते. पण कोजागरी म्हटलं की मला आठवण होते, ती लहानपणी अश्विन पौर्णिमेदिवशी पाण्यातून माशानं पोहावं, त्याप्रमाणे चांदण्यातून आमराईकडे गेल्याची. गाण्यातल्या सप्तसुरांप्रमाणे वाटणारे इंद्रधनुष्याचे सात रंग मी पुनःपुन्हा पाहिले, ते माझ्या या जन्मभूमीत. गणपतीच्या देवळाच्या अुंच तटाला वळसा घालून पांजरपोळाकडे जाताना जी गर्द झाडं लागत, त्यातल्या एका झाडातून कानांवर पडलेला मधुबोल-आणि तो ऐकताच सारं भान विसरुन आपल्याला शाळेला जायचंय्, याचाही विसर पडून वेड्यासारखा अुभा राहिलेला मी-या गोष्टी अजून माझ्या मनातून पुसल्या गेलेल्या नाहीत. कवीला प्रिय असणाऱ्या या सुंदर गोष्टींच्या जोडीनं व्यावहारिक वाटणाऱ्या माणसांची क्षुधा शांत करणाऱ्या वस्तूंचं सौदर्य प्रथमतः भेटलं, ते इथंच. इवल्या इवल्या लहान वांग्यांचा काळा कुळकुळीत किंवा जांभळा रंग, शेतातून नुकत्याच आलेल्या काकड्यांचा लुसलुशीतपणा, मक्याच्या कणसांतले मोत्यांचे दाणे, जमिनीत लपून बसलेल्या भुईमुगाच्या शेंगांची गोडी, संध्यारंगाला लाजविणाऱ्या पाडाला आलेल्या आंब्याचा रंग-अशा किती गोष्टी सांगाव्यात?.......माणसाचं सृष्टीशी असलेलं निकटंच नातं नकळत माझ्या मनात ठसवलं, ते सांगली-जिच्या काठावर वसली आहे, त्या कृष्णामाईनं. मी दहा-बारा वर्षांचा झाल्यापासून पुढे अनेकदा एकटाच कृष्णेच्या काठावर जाऊन बसलो आहे. तिथल्या शीतल वायुलहरींनी मनाचा दाह शांत केला आहे.....मी सांगली सोडून गेलो तरी कृष्णेशी असलेलं माझं हे घरगुती नातं माझं अंतर्मन कधी विसरलं नाही.''

सांगलीच्या भूमीशी एवढी मानसिक एकतानता साधणाऱ्या ह्या महान लेखकाचा, सांगलीच्या सुपुत्राचा, सांगलीकराना सदैव अभिमानच वाटेल!.

●●●

# नटवर्य मामा पेंडसे

१९५४ सालच्या जूनमधली गोष्ट. रंगभूमीवरील एक नटश्रेष्ठ आपल्या नेहमीच्या पोटदुखीच्या व्यथेने जर्जर झाले होते. १९जूनला तर दुखणे विकोपाला जाऊन रात्रीत १०-११ रक्ताच्या उलट्या झाल्या. आधी ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे २० जूनला त्यांच्या नाटकाचा प्रयोग होता. त्यांची स्वत:ची अिच्छा, अर्थातच त्या प्रयोगात काम करण्याची होती. रंगभूमीवर चेहऱ्यावर भूमिकेचा मेक-अप् चढवून एकदा अुभं राहिलं की आजार पळून जाईल असं त्याना वाटे. पण घरच्या मंडळींचा आग्रह मानून ते कुर्ल्यातील आपल्या घरातून टॅक्सीने हॉस्पिटलमध्ये निघाले. प्रयोग होता दुपारी परळच्या दामोदर हॉलमध्ये. टॅक्सी वाटेत थांबली ती डॉ. अजित फडके यांच्या माटुंग्याच्या हॉस्पिटलसमोर. डॉ.नी एकंदर रागरंग बघितला आणि नटवर्यांना एकदम ॲडमिटच करुन टाकले ! आजार गंभीर होता. तब्बलं पाच महिने बेडवर पडून राहायला लागलं.

गंमत म्हणजे हॉस्पिटलच्या बेडवर असतानाच, त्यांच्या एका हातखंडा नाटकाचा प्रयोग लागला. त्यामुळे निर्मात्याने त्याना सहज विचारलं. त्या नटश्रेष्ठाला राहवेना. त्याने डॉक्टराना गयांवया करुन परवानगी मागितली. त्यांची तडफड पाहून डॉक्टरानी अखेरीस विनंती मान्य केली. जवळच माटुंग्याच्या किंग जॉर्ज हायस्कूलमध्ये नाटकाचा प्रयोग होता.

नटवर्यानी प्रयोगात काम केले आणि नंतर तडक हॉस्पिटलमध्ये जाऊन ते समाधानाने आपल्या बेडवर पडले!

रंगभूमीवर नितांत निष्ठा असणाऱ्या त्या नटश्रेष्ठाचं नाव होतं, ''मामा पेंडसे.''

आपल्या भेदक डोळ्यांनी आणि पल्लेदार आवाजाने मराठी नाट्यरसिकांवर मोहिनी घालणाऱ्या मामाना आयुष्यभर पोटदुखीच्या या व्याधीनं छळलं. पाच-सहा वेळा त्यांची ऑपरेशन्स झाली. त्यांची नाटकं आणि हॉस्पिटल्सच्या वाऱ्या यांचा मेळ घालताना, सुप्रसिद्ध विनोदी नट शंकर घाणेकर गमतीने म्हणायचे ''मामा एक तर हॉस्पिटलच्या थिअेटरमध्ये असतात नाहीतर नाटकाच्या थिअेटरमध्ये असतात.''

मामा पेंडसे हे मूळचे सांगलीकर. त्यांचा जन्म सांगलीला २८ ऑगस्ट १९०६

रोजी झाला. त्यांचे मूळ नाव चिंतामण गोविंद पेंडसे. त्या नावाचं ''मामा पेंडसे'' हे बारसं अगदी अकल्पितपणे झालं.

त्याचं असं झालं. श्री समर्थ नाटक मंडळींचे ''मराठ्यांचे सिंहासन'' या नाटकाचे गावोगावी प्रयोग चालू होते. 'येवले' या गावी प्रयोग होता. चिंतामण गोविंद पेंडसे त्या नाटकात होते. त्यांचा सांगलीचा एक मित्र, गुरुनाथ पांडुरंग कुलकर्णी तिथे रेल्वेत नोकरीला होता. आपल्या सांगलीच्या मित्राचे नाटक म्हणून तो कौतुकाने पहावयास आला होता. त्याच्याबरोबर त्यांचे एक वकील मित्र होते. त्या नाटकातील पेंडशांचं काम वकीलसाहेबाना फार आवडले. म्हणून त्यानी तसे नंतर पत्राने कळविले. पत्रात मायना लिहिताना त्याना पेंडशांचे नाव आठवेना; म्हणून त्यानी नाटक कंपनीतील एक दोन पोरांना नावाबद्दल विचारले.नाटकात महत्त्वाची भूमिका करणाऱ्या नटांना कंपनीची मुलं, आदराने तात्या, दादा अशा नावाने संबोधित असत. कंपनीतील सीतारामपंताना 'बापू' म्हणत, दत्तोपंत वैशंपायन याना 'नाना' म्हणत. तसेच कोणी दादा होते, तात्या होते. मामा कुणीच नव्हते. म्हणून वकील मित्रानी विचारल्यावर त्यानी पेंडशांचं नाव 'मामा' आहे असे ठोकून दिले! वकिलानी कौतुकाने लिहिलेल्या पत्रात 'चिंतामण गोविंद पेंडसे' यांचा मामा पेंडसे असा उल्लेख केला आणि त्यांच्या कामाची खूप स्तुती केली. पत्र कंपनीच्या बिऱ्हाडी आल्यावर ''मामा पेंडसे, मामा पेंडसे'' असा सर्वत्र पुकारा चालू झाला. पेंडसे, 'मामा' म्हटल्यावर चिडतात हे बघून मुद्दामच सर्वजण चिडवू लागले.

तेव्हापासून पेंडशाना अजिबात न आवडणारी ''मामा'' ही अुपाधी त्याना कायमचीच चिकटली.

मामांचं बालपण फार गरीबीत गेलं. त्यांचे वडील गोविंदराव तत्कालीन सांगली संस्थानात नोकरीला होते. त्यांची पहिली बायको निवर्तली. त्यानंतर बरीच वर्षे त्यानी लग्न केलं नाही आणि दुसरं लग्न केलं ते वयाच्या ४५ व्या वर्षी. ते सुद्धा लहान वयाच्या मुलीशी. मामांच्या आईचे वय लग्नाच्यावेळी फक्त ११ वर्षाचे होते. अर्थात् त्या काळी अशी लग्ने सर्रास होत. लहान वयात मामांच्या आईची दहा बाळंतपणे झाली. त्यांची आई मुळातच थोडी तापट स्वभावाची. परिस्थिती हलाखीची. नवरा-बायकोच्या वयातील विषम अंतर. त्यामुळे मामांची आई सदैव गांजलेली असे. कातावलेली असे. परिणामी मामांना आईचे प्रेम म्हणून कधी मिळालचं नाही असं खुद्द मामानीच नमूद करुन ठेवलय. लहानपणी तर नाहीच नाही पण पुढे परिस्थिती पालटली. मामाना नाट्यक्षेत्रात नाव मिळालं. सत्कार झाले. तेव्हापण आईच्या तोंडून त्याना कधी कौतुकाची पावती मिळाली नाही. ह्या वस्तुस्थितीची

मामाना नेहमी खंत वाटे. गरीबीमुळे रुपया दीडरुपया फी परवडत नाही म्हणून मामाना इंग्रजी शाळा सोडून मराठी शाळेत नाव घालायला लागले. त्यावेळी मराठी ७ वी म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल. ती पास झाल्यावर सांगली संस्थानच्या अखत्यारीत नोकरी मिळण्याची शक्यता असे. पण तसा काही प्रकार घडला नाही. अुलट सहज म्हणून मामानी ड्रॉइंगच्या दोन परीक्षा दिल्या. त्याचा त्याना अुत्तर आयुष्यात खूप अुपयोग झाला.

घरातील बिकट आर्थिक परिस्थिती, पैशावरुन आई-वडिलांची एकसारखी होणारी भांडणं, या गोष्टीना वैतागून मामानी शाळा सोडली. घरात मदत व्हावी म्हणून मामानी साईन बोर्ड्स रंगवणे, घरांना रंग देणे अशी कामे करणाऱ्यांकडे सहाय्यकाची नोकरी पत्करली. त्यामुळेच त्यांची सांगलीतील सुप्रसिद्ध पेंटर शंकरराव गायकवाड यांच्याशी ओळख झाली. सांगलीच्या 'सदासुख' थिअेटरमध्ये प्रयोग असणाऱ्या नाटकांचे पडदे गायकवाड रंगवीत तेव्हा मदतनीस म्हणून मामा त्यांचेबरोबर काम करीत. या अनुभवाचा मामाना पुढे फार अुपयोग झाला.

१९२४ च्या सुमारास सुप्रसिद्ध किर्लोस्कर संगीत मंडळी शेवटची घटका मोजत होती. 'ललित कलादर्श' संगीत मंडळींचे मालक बापूसाहेब पेंढारकर आणि नानासाहेब चाफेकर यांच्यात बखेडा माजल्यावर, चाफेकरानी ही किर्लोस्कर मंडळी चालवायला घेतली. कंपनीचा मुक्काम सांगलीत असताना चाफेकरानी शंकरराव गायकवाडांचं कामं बघितलं होतं. त्यानी गायकवाडाना आपल्या कंपनीबरोबर नेले; कंपनीची कामं हुबळीत चालली होती तेव्हा पडदे रंगविण्याची कामे शंकररावाना भारी पडू लागली. एखाद्या मदतनीसाची त्याना आवश्यकता वाटू लागली. तेव्हा त्याना मामांची आठवण झाली. चाफेकरांच्या संमतीने त्यानी मामांना पत्र टाकून बोलावून घेतलं. घरची मंडळी राजी नसतानासुध्दा नाटक कंपनीत जाण्याचा मामांनी निश्चय केला. वडिलानी सांगितलं की, ''जातोस तर जा. पण व्यसन लावून घेऊ नकोस.'' नाटक मंडळींविषयी एकूण मत, समाजात त्याकाळी काय असे, त्यांची ही झलक.

पडत्या फळाची आज्ञा घेऊन मामा सांगलीजवळच्या बुधगाव स्टेशनवर (जुनं माधवनगर स्टेशन) मध्यरात्रीच्या वेळी ३-४ मैल चालत गेले. दुसऱ्या दिवशी हुबळीला पोचले. शोधत शोधत कंपनीच्या मुक्कामी गेले. शंकररावांना पडदे रंगवण्याच्या कामात मदत करणे, स्टेज झाडणे, नाटकाच्या-सामानाची, प्रयोगाच्या वेळी मांडामांड करणे अशा कामांबद्दल त्यांचा पगार ठरला होता, दरमहा घसघशीत आठ रुपये!

नाटक-मंडळीतील मामांची पहिली 'एन्ट्री' अशी होती! रंगभूमीची ओढ

वगैरे काही प्रकार नव्हता. म्हणजे नाटक–मंडळीत मामानी प्रवेश केला तो केवळ चरितार्थाचे एक साधन म्हणून.

आणि मामांनीच सांगितलय की तोपर्यंतच्या गरीबीमधील ओढाताणीच्या आयुष्यात 'भरपेट' जेवण ही काय चीज असते हे त्याना कंपनीत जेवल्यावर प्रथमच समजले! त्याचप्रमाणे जेवण जरी पोटभर असलं, तरी नाटक कंपन्यांतून पगार पूर्ण आणि वेळच्या वेळी कधीच मिळत नाही, हे कटू सत्य पण त्याना पचवून घ्यावं लागलं!

प्रत्यक्ष नाटकात काम नसलं तरी नाटकाचे, बॅक स्टेज वर्कर म्हणून मामांचं काम चालत असल्याने मामाना जागरणाची आपोआप सवय लागली. सहजगत्या नाटकांतील भाषणे पाठ होऊ लागली! कुतूहल निर्माण झालं. अर्थातच् मामाना सांगलीकर असल्यामुळे नाटकाचं अुपजत वेड होतंच. काही काळ सांगलीच्या सिटी हायस्कूलमध्ये असताना, शाळेच्या गॅदरिंगमध्ये नाटकात काम करुन त्यानी वाहवा मिळविली होती. त्यावेळचे त्यांचे सहाध्यायी राम केशव रानडे हे होते. ते पुढे न्यायाधीश म्हणून गाजले तर मामा नट म्हणून!

कंपनीच्या नोकरीतून मामाना अचानक ब्रेक मिळाला!

एकदा आगाशे नावाच्या नटाबरोबर कशावरुन तरी बाचाबाची झाली. शब्दावरुन शब्द वाढता वाढता गुद्दागुद्दी झाली. किरकोळ यष्टीच्या मामांनी आगाशेला चितपट करण्याचा प्रयत्न केला. परिणामी मामांच्या अुजव्या मांडीचे हाड मोडले. मामा कंपनीत नवखे असल्याने सर्वानी तेच दंगेखोर आहेत असं ठरविलं.

आणि मामांची सांगलीला हकालपट्टी करण्यात आली. वडिलांच्या ओढाताणीच्या संसारात पुन्हा एकाची भर पडली! कुठं काही नोकरीचं जमत नव्हतं. त्या काळात संस्थानच्या लग्नकार्यात अब्दागिरीच्या दांड्या रंगवण्याचं काम पण मामाना करावं लागलं.

सुदैवाने किर्लोस्कर कंपनीच गावोगावी नाटके करत, फिरत फिरत सांगलीत आली. शंकरराव गायकवाडांनी चाफेकरांकडे रदबदली करुन मामांना पुन्हा कंपनीत घेतले. मामा पडदे रंगवायला लागले. पण मामा जन्मभर काय पडदेच रंगवणार होते का? नाही.

एक दिवस मामांचा 'दिवस' म्हणून अुजाडला. १९२७ च्या सप्टेंबर महिन्यात कंपनीचा 'राजरंजन' नाटकाचा प्रयोग लागला होता. त्या नाटकातील ''सैय्यदअलीचं'' काम करणारा नट अचानक आजारी पडला. मामांच्या सर्व नकला पाठ असतात

आणि छंद म्हणून ते पडदे रंगवत असताना सगळे संवाद बडबडत असतात हे चाफेकरानी अनेकदा बघितले होते. म्हणून चाफेकरानी 'सैय्यदअलीचं काम करशील का?'' म्हटल्यावर मामानी ताबडतोब आनंदाने होकार दिला. मात्र नाटकाच्या प्रयोगाच्या सुरुवातीला, मामा पायापासून डोक्याच्या केसांपर्यंत घाबरून घामाने थबथबलेले होते. पण हळूहळू सावरले आणि त्यांच्या नाटकातल्या पर्दापणाचे कौतुक झाले.

त्या दिवसापासून मामांची 'ट्रॅन्स्फर' नटखात्यात झाली. तरीपण बॅकस्टेजचे, मदतनिसाचे नेहमीचे काम चालूच होतं. फक्त मधून मधून बदली नटांच्या भूमिका मिळू लागल्या. पगार ३० रुपयांवर गेला. अर्थात पूर्ण पगार आणि वेळेवर, हे गणित नेहमीप्रमाणेच न जमणारं. तरीपण निदान १५-२० रूपये घरी पाठवता येऊ लागले. तसं कंपनीमधलं मामांचं स्थान 'आयत्या वेळी' अुपयोगी पडणारा नट असंच होतं.

पण मामांच्या सुदैवाने आणखी एक चांगला 'दिवस' अुजाडला. कंपनीचा मुक्काम मडगावला होता. 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे नाटक लावलेलं होतं. संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे थोरले बंधू दत्तोपंत भोसले याना, त्यांच्या त्या नाटकातील गाजलेल्या 'विक्रांत' च्या भूमिकेबद्दल चाफेकरानी मुद्दाम बोलावून घेतलं होतं. त्यांच्यामुळे निश्चितच तडाखेबंद तिकीट-विक्री होणार होती. चाफेकरानी त्या नाटकातील 'कुंदन' ची भूमिका मामाना दिली होती. कसून मेहनत घेऊन त्यांच्याकडून बसवून घेतली होती. चांगली घोटून घेतली होती. मामांची ही 'प्रगती' कंपनीतील काही जणांना मानवत नव्हती. त्यांच्यापैकी काहीनी मत्सरापोटी, दत्तोबा भोसले यांचे कान फुंकायला सुरुवात केली....."बघा बुवा, तुम्ही एवढे गाजलेले नट आहात आणि तुमच्यासमोर हा पेंडसे म्हणजे अगदीच नवशिक्या आहे. नाटकाचा तोल त्यामुळे बिघडेल. तुमचा अपमान आहे.....वगैरे वगैरे.'' साहजिकच दत्तोपंतानी या 'प्रकारा' बद्दल चाफेकरांना जरा रागातच विचारलं. त्यानी त्यांची समजूत काढून मामांच्या अभिनयाची ग्वाही दिली. तरीपण रात्री मेक-अपच्या वेळी समोर मामाना बघून दत्तोपंतांनी जरा दरडावूनच विचारले "तूच ना तो पेंडसे, आज माझ्यासमोर अुभा राहणारा?'' मामा मनातून घाबरून गेले. कंपनीतील यःकश्चित गडी-माणूस आपल्यासमोर अुभा राहणार याचं वैषम्य दत्तोपंताना वाटत होतं.

प्रत्यक्ष नाटक सुरु झालं. चाफेकरानी धीर देऊन मामांचा आत्मविश्वास वाढविला. पहिले काही प्रवेश संपले. मामांचे काम रंगू लागले. प्रेक्षकांच्या टाळ्या मिळू लागल्या. मामांची भीती चेपली. मग दत्तोपंतांबरोबरचा प्रवेश सुरु झाला. मामांकडून चांगली साथ अगदी बरोबरीची जोड मिळाल्याने, दत्तोपंतांचेहि काम

जबरदस्त रंगू लागले. प्रेक्षकांच्या टाळ्या घेण्यासाठी अूस्फुर्त दाद मिळवण्यासाठी दोघानांहि स्फुरण चढले. आणि त्या आनंदात दत्तोपंत भोसल्यानी खूश होऊन मामांना खांद्यावर अुचलून घेतले आणि ते चाफेकराना म्हणाले "अरे, याला गड्याची कसली कामे देता? याला नाटकांत घ्या."

तेव्हापासून मामांचा खऱ्या अर्थाने नाट्यप्रवास सुरु झाला. त्याना नियमितपणे कामे दिली जाऊ लागली. शारदेत 'श्रीमंत,' पुण्यप्रभावामध्ये 'कंकण,' शहा-शिवाजी नाटकात 'रणदुल्लाखान,' चंद्रग्रहणमध्ये 'जगदेवराव' अशा त्यांच्या भूमिका गाजू लागल्या.

पण दुर्दैवाने कंपनी आर्थिक दृष्ट्या फारशी तग धरू शकत नव्हती. कोर्टाच्या परवानगीने (तात्पुरत्या) चाफेकर किर्लोस्कर कंपनी चालवत होते. त्या केसचा अंतिम निकाल त्यांच्याविरूध्द लागला. मग देणेकऱ्यानीही दावे लावले. जप्तीचे वॉरंट निघाले. १९२९ मध्ये अखेर कंपनीला टाळे लागले.

आणि मामा सांगलीला परत आले.

पुन्हा अन्नासाठी दाही दिशा सुरु झाल्या. वर्तमानपत्रं टाकण्यापासून जमेल ती कामं मामा करायचे. आईच्या कडवट बोलण्यानं अर्धी-मुर्धी मिळणारी भाकरीसुद्धा गोड लागेना.

त्यातून नियतीनं तर त्याना रंगभूमीवरचा नट बनवण्याचाच चंग बांधला असावा. कारण तीन तीन नाटक-कंपन्यातून कामे मिळण्याचा अचानक योग आला होता. महाराष्ट्र नाटक मंडळीतील गाजलेले नट, मामा भट सांगलीचे. मामा पेंडशांच्या काही चांगल्या भूमिका त्याना आवडल्या होत्या. 'बेबंदशाही' वाले विष्णुपंत औधकरांबरोबर त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या 'श्री' समर्थ नाटक मंडळीनी मामा पेंडसेना कंपनीत घ्यावे म्हणून त्यानी औंधकरांना पत्र लिहिले. पण मामा पेंडशांच्या कुंडलीतील ग्रह असे विचित्र, की त्याच सुमारास हिराबाई बडोदेकर यानी सुरु केलेल्या, नव्या नाटक कंपनीत काम करण्याविषयी मामांकडे विचारणा झाली. हे कमी पडलं की काय, म्हणून-त्याना त्याचवेळेस मिरजेत आलेल्या मा. दीनानाथांच्या 'बलवंत संगीत मंडळी' मध्येहि काम मिळेल असे दिसू लागले. या 'तिहेरी' योगामुळे मामा मनोमन हरकून गेले आणि त्याचवेळी नाटक कंपन्यांमधून असणाऱ्या अनिश्चिततेचा त्याना कटू अनुभव आला. महिनोंमहिने दोन्ही कंपन्यांची बोलावणी, अनिश्चिततेच्या फेऱ्यांमध्ये गटंगळया खाऊ लागली तेव्हा मामा मुकाट्याने श्रीसमर्थ मंडळीत जाऊन दाखल झाले. ३०रु. पगारावर. त्याच पगारावर काम करायचं म्हणून मामा तिथे जायला मनापासून राजी नव्हते, पण नाईलाज होता.

या ‘समर्थ’ मध्ये मामा पूर्ण पाच वर्षे होते. ‘करीन ती पूर्व’ ‘रक्तरंगण,’ ‘मराठ्यांचे सिंहासन,’ अशा काही नाटकांतून त्यानी भूमिका केल्या. पण या कंपनीत आल्याचा सर्वात मोठा फायदा मामाना कोणता झाला असेल तर तो म्हणजे नाट्यक्षेत्रातील गुरु लाभण्याचा. हा ‘गुरु-प्रसाद’ त्याना केशवराव दाते यांच्या रुपाने लाभला. कंपनीत आल्यावर मामांची काही कामे त्यानी बघितली. मामा काही बाबतीत नानासाहेब फाटकांचं अनुकरण करत; तेव्हा केशवरावानी, स्वत:च्या अभिनयाचा, आवाजाचा आवाका ओळखून, त्यानुसार स्वत:ला शोभेल अशा पध्दतीने, कुणाचेहि अनुकरण न करता, स्वतंत्र बुद्धीने आपली भूमिका कशी करावी, त्या भूमिकेवर विचार कसा करावा, स्वत:च्या देहयष्टीला अनुसरुन हातवारे कसे करावेत, मुद्राभिनय किती महत्त्वाचा आहे अशा अनेक गोष्टी मामाना शिकवल्या. मामा त्यावेळी ‘रक्तरंगण’ मध्ये अनाजी दत्तोची भूमिका करीत. खलनायकी स्वरूपाची ही भूमिका होती. मामा मात्र अुगाचच ती भूमिका विनोदी वळणानं करत. राजाराम आणि संभाजी ही दोन पात्रे जेव्हा जेव्हा या अनाजीला रागाने बोलत, तेव्हा हा अनाजी (म्हणजे मामा) प्रतिक्रिया म्हणून डोळे मोठे करुन प्रेक्षकांकडे बघत असे. त्यामुळे हशा पिकायचा.पण त्याचा दुष्परिणाम असा व्हायचा की संभाजी या गंभीर पात्रावरील लक्ष अुडून, सगळ्या प्रेक्षकांचे लक्ष निष्कारण अनाजीकडे जात असे. नाट्यशास्त्राच्या दृष्टीने ही गोष्ट विपरीत आहे हे प्रथम केशवरावानी मामांच्या ध्यानात आणून दिलं. ‘‘नाटक ही एक सांघिक कला आहे. घडत असणारा प्रसंग, रंगभूमीवरील सर्व पात्रांनी मिळून साकार करायचा असतो. त्यात विक्षेप येईल असं कुणी वागला तर नाट्यरंगतीची हानी होते’’ असे त्यानी मामांच्या मनावर कायमचे कोरून ठेवले. मामानी केशवरावांच्या तालमीचा आयुष्यात कधीच विसर पडू दिला नाही. नट म्हणून तसेच दिग्दर्शक म्हणून.

नंतर याच ‘समर्थ’ ने खुद्द औंधकरानी लिहिलेले ‘आग्र्याहून सुटका’ हे नवे नाटक रंगभूमीवर आणले. या नाटकातील औरंगजेबाची भूमिका मामाना द्यावी असं केशवराव दातेनी औंधकराना सुचविले. त्या भूमिकेसाठी योग्य अुंची, कृश शरीरयष्टी, पाणीदार डोळे, अुभट चेहरा अशा जमेच्या बाजू असल्याने मामा पेंडसे, त्या भूमिकेला अधिक न्याय देऊ शकतील असं दाते म्हणाले. पण पेंडसे रंगभूमीला तसे नवखे असल्याने, ती भूमिका केशवरावानी करावी असा औंधकरांनी हट्टच धरल्याने त्यांचा नाईलाज झाला आणि मामांच्या हातातून एक चांगली संधी निसटली. तरीपण संपूर्ण नाटकभर वावरणारी अुमरखानाची भूमिका मामाना मिळाली. ती भूमिका त्यांच्या गाजलेल्या भूमिकांपैकी एक ठरली, अितकी छाप त्या भूमिकेत मामानी प्रेक्षकांवर पाडली. अकोल्याच्या प्रयोगाच्या वेळी गणपतराव बोडस यानी मामांची ही

भूमिका बघून पाठ थोपटली.

दुर्दैवाने या नाटकातील हिंदू-मुसलमान जातीसंबंधातील काही संवादांमुळे आणि झेबुन्निसा छोट्या संभाजीचा मुका घेते, या दृष्यामुळे काही धर्मांध मुसलमानांनी हे नाटक बंद पाडले. पुढे केशवराव दाते कंपनी सोडून गेले. त्यांच्या अनुपस्थितीत नाटके रंगेनात. अशा अनेक कारणानी 'समर्थ' नाटक मंडळी बंद पडली.

आणि पुन्हा मामा बेकार अवस्थेत सांगलीला घरी परतले!

काही काळ 'रमेश नाटक' मंडळीमधून मामानी कामे केली. वास्तविक त्यावेळी सांगलीत आलेल्या 'बलवंत संगीत मंडळी' मध्ये त्यांचे सोने झाले असते. पण मामाना त्यांचा जन्मजात फटकळपणा नडला. खुद्द चिंतामणराव कोल्हटकर या दिग्गजाबरोबर भूमिकेच्या सादरीकरणावरुन मामानी वाद घातला. मालक दीनानाथ आजारी पडले तर त्यांच्याशिवाय कंपनी चालवू या, असा विचित्र आग्रह मामानी धरला! त्यामुळे 'बलवंत' मध्येपण त्यांचं जमलं नाही.

आता नाटकं-बिटकं बंद करुन पोटापाण्यासाठी काही तरी अुद्योग सुरु करावा असा कुटुंबियांचा आग्रह सुरू झाला. आता मामाना नाही पण म्हणता येईना. कोणत्या तोंडाने नाही म्हणणार? काही काळ त्यानी, मामा भटांच्या पुण्याच्या दुकानात अत्तरे, गुलकंद, केशवर्धक तेले, अुदबत्त्या इत्यादी वस्तूंची विक्री केली. पण वस्तुंमधील भेसळीवरुन त्यानी खुद्द मालकांशी म्हणजे मामा भटांशीच भांडण काढले! शेवटी बायकोच्या पाटल्या वगैरे विकून मामानी लोण्याचा धंदा सुरू केला. सांगलीजवळच्या अंकली, इंगळी, म्हैसाळ अशा गावांतून एजंटामार्फत लोणी गोळा करायचे आणि ते मुंबईला व्यायाम-शिक्षक असलेल्या भावामार्फत विकायचे. त्याबरोबरीने सांगलीकडची मिरची-पूड पण विकायला त्यानी सुरुवात केली. मुंबईत राहिल्याशिवाय पैशाची वसुली नीट होणार नाही असं भावानं कळवल्यावर मामांनी सांगली सोडून मुंबईत बिऱ्हाड थाटलं. कधी गिरगाव, कधी गोरेगाव तर कधी कुर्ल्याला अशी अनेक ठिकाणी त्यांची बिऱ्हाडे झाली. रात्री गोरेगावला जाऊन दूध आणायचं आणि सकाळी गिरगावात विकायचं. पायात चपला नाहीत आणि डोक्यावर दुधाचा हंडा, अशी मामांची भटकंती सुरु झाली. चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, वामनराव सडोलीकर अशा मंडळींकडे त्यांचा दूधाचा रतीब होता.

एका अर्थाने रंगभूमीचीच ही देणगी!

काही असो. मामांच्या गाठी चार पैसे नियमितपणानं साठू लागले हे खरे! त्यांच्या अमृतमहोत्सवप्रसंगी मामांच्या या दूध व्यवसायाचा अुल्लेख करुन पु. ल. देशपांडे म्हणाले ''मामा दुधाचा हंडा अशा थाटात नेत असत की वाटे, हा हंडा नव्हे

तर स्वाभिमानाचा राजमुकुटच आहे.''

थोडंसं आर्थिक स्थैर्य आलं. नाट्यव्यवसाय मामानी सोडला खरा पण अंत:करणातील नाट्याभिनयाची अूर्मी त्याना गप्प बसू देत ना! नूतन पेंढारकरांच्या आग्रहामुळे, बापूराव पेंढारकरांच्या पुण्यतिथीनिमित्त झालेल्या 'हाच मुलाचा बाप' या नाटकात त्यानी रावबहादुराची भूमिका, काही बिदागी न घेता हौसेखातर केली. परळच्या दामोदर हॉलला नाटक झाल्यानं आणि कामगार मंडळीत बापूरावांविषयी आदर असल्यानं, मामांना कामगार रंगभूमीवरील नाटकांतून कामे करण्याची तशीच दिग्दर्शनाची आमंत्रणे येऊ लागली.

आता नाट्य-व्यवसायावर पोट अवलंबून नव्हतं! गरज नव्हती तरी मामांना नाटकातील कामे मिळू लागली. दिग्दर्शनासाठी विचारणा होऊ लागली. मामा मनातल्या मनात म्हणाले असतील ''कालाय तस्मै नम:!''

त्या काळात मामांची तारांबळ अुडत असे. नाटकाच्या तालमी संध्याकाळी गिरगावात घ्यायच्या. रात्री-अपरात्री गोरेगावला तबेल्यात जायचे. दूध काढायचे. ते काम रात्रीं १-१॥ पर्यंत चाले. सकाळचे अुकाडे झाले की जेवायला घरी. म्हशींची अुस्तवार. नाटकांच्या तालमी. अशा धावपळीत मामा दमून जायचे. तरीपण हौस वाटायची. चरितार्थ चाले आणि छंद पण जोपासता येई.

हा सर्व व्याप चालू असतानाच भालचंद्र पेंढारकर मामाना भेटले. ते 'ललितकलादर्श' पुन्हा सुरु करत होते. त्यानी मामाना आग्रहाने आमंत्रण दिले. पूर्वीच्या 'अनुभवांवरुन' मामानी सावधपणे सांगितले की ''मी चरितार्थासाठी दुधाचा धंदा सुरु केला आहे. तो संभाळून शक्य ती मदत करेन.'' या सुमारास (१९४१ नंतर अत्रे, वरेरकर रांगणेकर यांच्या प्रयत्नाने) नाट्य-व्यवसायाला पुन्हा चांगले दिवस येऊ लागले होते. ललितकलादर्शच्या'सत्तेचे गुलाम'मध्ये मामा, हेरंबरावाची भूमिका करीत; खेरीज नानासाहेब फाटक नसतील तेव्हा नाटकाच्या तालमी घेत. हळूहळू 'ललितकलादर्श' च्या संचालनाची जबाबदारी मामांकडे आली. भालचंद्र पेंढारकर लहान, अननुभवी असल्याने त्यांचे मेहुणे बाबूराव देसाई (हे रिझर्व बॅंकेत मॅनेजर होते.) यानी मोठ्या विश्वासाने ही जबाबदारी मामांवर टाकली. याच काळात 'नाट्यनिकेतन' च्या (मो.ग. रांगणेकरांच्या) 'आशिर्वाद' आणि 'नंदनवन' या नाटकातही मामा कामे करीत.

१९४४ च्या नोव्हेंबरमध्ये मुंबईत, मोठ्या प्रमाणावर रंगभूमीचा शतसांवत्सारिक अुत्सव, मुंबई मराठी साहित्यसंघाचे अध्वर्यू डॉ.भालेराव यानी साजरा करावयाचे ठरविले. त्यासाठी 'भाऊबंदकीचा' मोठ्या दिमाखात प्रयोग करण्यात आला आणि

ज्या भूमिकेमुळे "नाना फडणीस म्हणजे मामा पेंडसे" असे समीकरणच जनमानसात रुढ झाले, ती नाना फडणिसाची अजरामर भूमिका मामाना मिळाली. ज्या अनुकुलतेमुळे त्यांना औरंगजेबाची भूमिका मिळायला हवी असे केशवराव दाते याना वाटायचे त्याचा आता अुपयोग झाला. पल्लेदार आवाज आणि भेदक पाणीदार डोळे, विलक्षण मुद्राभिनय यामुळे मामांचा नाना फडणीस फारच गाजला. या नाटकात नानासाहेब फाटक (राघोबा), गोदुताई वर्तक आणि नंतर दुर्गाताई खोटे (आनंदीबाई) केशवराव दाते (तुळोजी पवार) पार्श्वनाथ आळतेकर (रामशास्त्री) अशा नाट्यक्षेत्रांमधील दिग्गजांच्या भूमिका होत्या. या सर्वांना टक्कर देऊन आपल्या अभिनयाची छाप प्रेक्षकांवर पाडायची हे काम सोपं नव्हतं. पण मामानी ते काम लीलया केलं. ही त्यांच्या अभिनय-सामर्थ्याची पावतीच होती. या अुत्सवामुळे 'मामा पेंडसे' हे नाव मुंबईकरांपुढे मोठ्या प्रमाणात प्रसिध्दीला आलं.

आणि मुंबईत प्रसिद्धी म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्धी.

खरं म्हणजे मामाना अस़ं मोठं यश केव्हाच मिळायला हवं होतं, एवढी त्यांची गुणवत्ता होती. अशी वेळ येईपर्यंत मामा चाळिशीला पोचले होते. आता त्यांची घोडदौड सुरू होणार असं वाटत होतं.

आणि त्याचवेळी मामांचं पोटदुखीचं जुनं दुखणं फणा काढून अुभं राहिलं!

१९४५मध्ये ऑपरेशन करावं लागलं. खूप यातना सहन कराव्या लागल्या. ऑपरेशननंतर मामा विश्रांतीसाठी सांगलीस आले. वास्तविक सांगलीच्या एका वैद्याने १९३७ मध्ये मामाना असं काही जालीम औषध दिलं होतं की त्यानंतर सात-आठ वर्षांत पोटदुखी अुद्भवली नव्हती. पण एव्हाना त्या वैद्याचं निधन झालं होतं. पुन्हा चार वर्षांनी हा त्रास अुद्भवला. डॉ.अजित फडकेंची ट्रीटमेंट घेऊन सुद्धा पोटदुखीचा समूळ नाश झाला नाही. लागोपाठ तीन ऑपरेशन्स झाली आणि ती सुद्धा अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीतच.

या प्रकारानंतर मामाना सांगलीत येऊन तब्बल एक वर्षाची विश्रांती घ्यावी लागली. जून १९५४ मध्ये पुन्हा येरे माझ्या मागल्या! पण या खेपेला पोटदुखीचं गंभीर स्वरूप पाहून डॉ. फडकेनी त्याना के. ई. एम् हॉस्पिटलमध्ये ॲडमिट् केले. तब्बल पाच महिने मामा बेडवर पडून होते.

हा आजाराचा एकंदर प्रकार बघून, शंकर घाणेकरांचं वर्णन, "मामा नेहमी थिअेटरमध्ये, नाटकाच्या किंवा हॉस्पिटलच्या," किती यथार्थ वाटतं!

सांगलीच्या विश्रांतीच्या काळात, मामानी मो. ग. रांगणेकरांच्या 'कुबेर'

सिनेमात काम केले. पण रंगभूमीसारखे त्यांचे मन चित्रपटात रमले नाही. आजारपणाच्या काळात नाटकं चालूच होती. १९४६ च्या नाट्य-महोत्सवात 'सवाई माधवरावाचा मृत्यु'हे नाटक झाले. मामाना 'माधवराव' करुन पहायचा होता. पण 'नाना फडणीसा' च्या भूमिकेसाठी, त्यांच्याखेरीज दुसऱ्या कुणाचा विचारच होऊ शकत नव्हता! नंतर १९५२ मध्ये त्यानी नाट्य-निकेतनच्या 'रंभा', 'कुलवधू,' 'एक होता म्हातारा,' अशा बऱ्याच नाटकांतून भूमिका केल्या. दिल्ली, नागपूर, खामगाव, अकोला, जळगाव, नाशिक असा मोठा दौरा त्यानी कंपनीबरोबर केला.

सांगलीकरांना आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे 'नाट्य-निकेतन' मध्ये, त्यावेळी एक सोडून दोन सांगलीकर, एकाच वेळेस काम करत होते. एक मामा पेंडसे आणि दुसरे मा. अविनाश!

१९५७ मध्ये मामांच्या नाट्य-कारकिर्दीमधील अत्यंत यशस्वी गाजलेली भूमिका असलेलं नाटक रंगभूमीवर आलं. ते म्हणजे 'दुरितांचे तिमिर जावो.' त्या नाटकातील खलनायकाची-पंतांची भूमिका, मामा अितकी कावेबाजपणे करत की त्या पात्राचा नायकाला (दिगू) छळण्याचा दुष्टपणा बघून एक प्रेक्षक, पायातली चप्पल घेऊन मामांना मारायला स्टेजवर धावला होता! अितका मामांचा खलनायकी अभिनय प्रेक्षकांच्या मनात चीड अुत्पन्न करणारा असे. ललित-कलादर्शचे भालचंद्र पेंढारकर, हे नाटक चांगले अुत्पन्न देत नाही म्हणून बंद करायला निघाले होते! पण मामानी थांबवले. या नाटकाच्या यशस्वितेचा मामांचा होरा पुढे खरा ठरला. मामांचे असेच त्यावेळी दुसरे नाटक पण गाजले. ते म्हणजे ललित-कलादर्शचेच 'पंडितराज जगन्नाथं.' त्यात ते शहाजहानची भूमिका करत. पुढे पुढे भालचंद्र पेंढारकरांबरोबर मतभेद वाढत चालले तेव्हा मामानी १९६९ च्या अखेरीस 'ललित-कलादर्श' बरोबरचा संबंध संपवला!

यानंतर वृद्धापकाळामुळे मामा दिग्दर्शनाकडे जास्ती वळले. 'रंगायन' च्या 'यशोदा,' 'महापूर' अशा नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले. १९८१ मध्ये मामांच्या ७५ व्या वाढदिवशी, मुंबईमध्ये सर्व नाट्यसंस्थांच्या वतीने त्यांच्या नाट्यसेवेचा गौरव म्हणून त्यांचा थाटाचा सत्कार करण्यात आला. पु. ल. देशपांडे यांच्या हस्ते त्याना थैली देण्यात आली. मामानी त्यातून आपल्याला गुरुस्थानी असणाऱ्या कै. केशवराव दाते यांच्या नावे पारितोषिक ठेवले. त्यानंतर मामानी रंगभूमीचा निरोप घेतला.

१२ जानेवारी १९९१ मध्ये मामांचे ठाणे येथे निधन झाले.

अंगात गुणवत्ता असूनही, त्याचवेळेचे त्यांचे समकालीन नट श्री. गणपतराव मोहिते (मा. अविनाश) याना जशा नायकाच्या भूमिका मिळाल्या तशा भूमिका

मामांना कधी मिळाल्या नाहीत. तशी देखणी शरीरयष्टी नव्हती म्हणून असेल किंवा जिभेचा फटकळपणा नडला असेल. पण सुदैवाने आयुष्याच्या अुत्तरार्धात त्यांच्या अभिनय-गुणांचं बरंच चीज झालं.आयुष्यात त्याना सन्मानही बरेच लाभले. १९६५ मध्ये त्याना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे, कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींच्या नावे दिले जाणारे सुवर्णपदक मिळाले. १९६६ मध्ये तर त्यांच्या माहेरीच, म्हणजे सांगलीत, त्यांचा मोठा सत्कार झाला. विष्णुदास भावे सुवर्णपदक त्याना देण्यात आलं. त्यावेळी, ज्या गावात आपण गवंडीकामं केली, पडदे रंगवले, वर्तमानपत्रं टाकली, त्याच गावातील भव्य सत्कार पाहून मामा भारावून गेले. १९८१ च्या रंगभूमी-दिनी (५नोव्हेंबर) मुख्यमंत्री अंतुले याजकडून महाराष्ट्र सरकारतर्फे रु.२५।- हजाराची थैली त्याना देण्यात आली तसेच १९८२मध्ये दिल्लीच्या संगीत नाटक अॅकेडमीकडून त्यांचा पाच हजार रुपये आणि ताम्रपट देऊन सन्मान करण्यात आला. ७५ व्या वर्षी मामांचा श्री.पु.ल. देशपांडे यांच्या हस्ते अमृतमहोत्सवी सत्कार मोठ्या थाटामाटात करण्यात आला. मिळालेल्या सत्कारनिधीमधून मामानी आपल्याला गुरुस्थानी असणाऱ्या केशवराव दाते यांच्या नावे पारितोषिक ठेवावे असे सांगून ५५ हजाराचा निधी नाट्य-परिषदेकडे सुपूर्द केला.

८५ वर्षांचं दीर्घायुष्य लाभलेल्या मामानी ''केशराचं शेत'' या नावाचं आत्मचरित्र लिहिलं आहे. अशी ही सांगलीकर मामा पेंडशांची नाट्यकारकीर्द.

●●●

## रंगभूमीच्या सुवर्णकाळातील निष्ठावंत मानकरी

# श्री. गणपतराव मोहिते (मा. अविनाश)

सांगलीच्या एस.टी. स्टँडकडे जाणाऱ्या रस्त्याला डॉ.बापट बालशिक्षण मंदिरासमोर एक छोटीशी गल्ली काटकोनात फुटते. त्या गल्लीचं नाव फौजदार गल्ली. वाढत चाललेल्या शहराच्या अवाढव्य पसाऱ्यात, कोणाच्या खिजगणतीतही नसलेली ती गल्ली. त्या गल्लीत राहणाऱ्या माणसांना आपल्यापलीकडे काही मोठे 'विश्व' आहे याची कल्पना नाही आणि त्या विश्वाचा धागादोरा आपल्यापर्यंत पोचलेला आहे ह्याची तर तिळमात्र कल्पना नाही!

आणि अचानक एक दिवस या गोष्टीचा साक्षात्कार झाला!

१३६७, फौजदार गल्लीच्या छोट्याशा, जुन्या वळणाच्या दगडी घरात एके दिवशी प्रत्यक्ष गानसम्राज्ञी लता मंगेशकरच अवतरली! किती गुपचूप आली तरी चाफ्याचा सुगंध लपणार कसा? रस्त्याने येतानाच कुणा रसिकाने पुकारा केला "लता बाई आल्यात." बघता बघता गर्दी जमली. आपल्या गणूमामाना, त्यांच्या कुटुंबियांना, भेटायला म्हणून लताबाई आल्या खऱ्या, पण त्या छोट्या घराला गर्दीने वेढले. काही अुत्साही लोक लताबाईंना पहायला म्हणून घरातच शिरले. काही अतिअुत्साही मंडळी घराच्या तुळयांवर चढली. स्वरसम्राज्ञीला बघण्यासाठी एकच झुंबड अुडाली. आता परिस्थिती हाताबाहेर जाणार असे दिसल्यावर लताबाईंनी आपली भेट आवरती घेतली.

तेव्हा अनेकाना प्रथमच समजलं. आपल्याच गल्लीत राहणारे मोहिते म्हणजेच गणूमामा, जुन्या काळातील प्रख्यात नटश्रेष्ठ गणपतराव मोहिते अुर्फ "कुलवधू" वाले मा. अविनाश!

आजच्या पिढीला, प्रत्यक्ष लतादीदी अितकं मानतात ते गणपतराव मोहिते आहेत तरी कोण असा प्रश्न स्वाभाविकच पडेल तेव्हा त्यांचा जीवनपटच अुलगडून बघायला हवा.

आज नव्वदीच्या घरात असलेले मा. अविनाश म्हणजे जुन्या किर्लोस्करी पद्धतीच्या संगीत नाटकांतून आणि नंतरच्या काळात, 'कुलवधू' धर्तीच्या सुगम

संगीताच्या अंगाने जाणाऱ्या, नव्या संगीत नाटकांतून सारख्याच ताकदीने गाणारे एकमेव हयात नटश्रेष्ठ आहेत. या दोन्ही नाट्यपरंपरेत पारंगत असणे हे सकृतदर्शनी दिसतं तेवढं सोपं नाही. शास्त्रशुद्ध पद्धतीने फलंदाजी करणाऱ्या तंत्रशुद्ध कसोटी फलंदाजाला, एकदम आडवे-तिडवे फटके मारण्याची गरज असणाऱ्या अेक दिवसीय क्रिकेट सामन्यात खेळवण्यासारखे आहे.

पण मा. अविनाशानी दोन्ही प्रकारांमध्ये सुयश मिळवले हे महत्त्वाचे. दोन्ही प्रकारच्या संगीत परंपरांचे यशस्वी प्रतिनिधित्व करणारे, मा.अविनाश म्हणजे गेल्या ८०-९० वर्षाचा, नाट्यकलेचा चालता-बोलता अितिहासच आहे.

अशा या अविनाशांचा, गणपतराव मोहिते, यांचा जन्म १ जानेवारी १९०९चा. त्यांचं बालपण सांगली-मिरजेत गेलं. खरं म्हणजे बालवयातच, म्हणजे अगदी वयाच्या ६ व्या- ७ व्या वर्षापासूनच, त्यांची रंगभूमी-कारकीर्द सुरू झाली. घरातच गाण्याचं बाळकडू मिळालं. त्यांचे वडील लक्ष्मणराव मोहिते हे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर या प्रख्यात संगीतशार्दुलाचे शिष्य.त्यामुळे घरातल्या घरातच, येता-जाता गाणं कानांवर पडायचं. वडिलांमुळेच अविनाशना, विष्णु दिगंबर पलुस्कर, चाफेकरबुवा, नीलकंठबुवा जंगम यांचं गायन अैकायला मिळालं. गाण्याची ओळख वडिलांमुळे, तर अभिनयाची ओळख बंधु शंकरराव मोहिते यांच्यामुळे झाली. घरची थोडीशी शेती होती. गणपतरावांसह घरात आठ भावंडं. चुलत भावंडांसह मोठा बारदाना. नुसत्या शेतीवर कुटुंबाची गुजराण होणे कठीण. त्यामुळे गणपतरावांचे थोरले बंधू नाटक कंपनीत शिरले. 'स्वदेशी हितचिंतक,' 'नाट्यविनोद' अशा नाटकमंडळीत ते काम करत. ते काही काळ 'ललितकले' मध्ये होते. नंतर ते 'बलवंत संगीत' मंडळीत स्थिरावले. गणपतरावाना पण नाट्यव्यवसायाची थोडीशी ओळख व्हावी म्हणून ललितकलेत काही काळ ठेवण्यात आलं होतं. तेथे संगीतसूर्य केशवराव भोसले याना जवळून पहायला मिळालं. अितकंच काय, पण छोट्या गणूचा गोड गळा अैकून केशवरावानी 'शापसंभ्रम' नाटकात त्याला छोटीशी भूमिकाही दिली. त्या भूमिकेतील एका गाण्याच्या दोन-दोन ओळी, मा. अविनाशना आज ९२ व्या वर्षीसुध्दा आठवतात. "द्राक्ष, जांब, डाळिंब फळे मी खायाला जाते......कादंबरीची कुसुम कंचुकी गुंफाया जाते."

ज्या रंगभूमीवर आयुष्याची ६०-७० वर्षे, मा. अविनाश घालवणार होते, त्याचे पदार्पण असे केशवरावांच्या आशीर्वादाने झाले ही मोठी भाग्याचीच गोष्ट. थोरल्या बंधूंमुळे अभिनयाची जाण त्याना खूप लहान वयातच आली.

अिकडे सांगलीच्या दोन नंबर शाळेत शिक्षण चालू होते. वर्गशिक्षक पटवर्धन

गाण्याचे मोठे शौकीन. ते छोट्या गणूकडून रोज एक तरी गाणं म्हणवून घेत. ''नापास झालास तर मी पास करेन पण गाणं सोडू नकोस'' असा त्यांचा आग्रह असायचा. तसं गणपतरावांचं गंडाबद्ध असं संगीत-शिक्षण, कोणाकडं झालं नाही. मात्र गणपतीबुवा भिलवडीकर यांजकडे थोडं शिक्षण झालं. गळा आणि अभिनय अुपजतच अंगी असावा.

घरच्या परिस्थितीच्या रेट्यामुळे शाळा अर्धवटच सोडून थोरल्या बंधुंमुळे अवघ्या ७ व्या वर्षीच, गणपतराव 'बलवंत' चे पगारी नोकर बनले. त्यांचा पगार रु.५/-तर बंधुंचा पगार रु.२५/- दोघांचेहि पगार त्यांच्या हातात मिळत नसत. कंपनीच्या मुक्कामाहून ते पैसे सांगलीला परस्पर वडिलांकडे पाठवले जात. (मा. अविनाश आता गंमतीने सांगतात की स्वत:च्या हातात पैसा असा त्यानी वयाच्या तिशीनंतरच बघितला!) नाटक-कंपनीत बालनटांना थोडे शिक्षण दिले जाई. ही 'बलवंत' संगीत मंडळी, प्रख्यात 'किर्लोस्कर' नाटक मंडळी फुटल्यानंतर स्थापन झाली. बालगंधर्वानी 'गंधर्व' नाटक-मंडळी काढली, तर मा. दीनानाथ, चिंतामणराव कोल्हटकर आदी मंडळीनी 'बलवंत संगीत मंडळी' स्थापन केली. नटश्रेष्ठ चिंतामणराव स्वत: छोट्या गणूचा चौथीचा अभ्यास घेत. खासगी रीत्या गणपतरावांचे एक दोन वर्षे शिक्षण झालं. थोडी झटापट इंग्रजी भाषेबरोबरही झाली. रंगभूमीवरचं शिक्षण मात्र जोरात सुरू झालं.

सुरुवातीच्या काळात, गणपतरावाना त्यांच्या बालवयाला शोभतील अशाच भूमिका दिल्या जात. त्या बालवयातील या छोट्या गणूच्या अतिशय गाजलेल्या भूमिका म्हणजे 'भक्त प्रल्हाद' नाटकातील प्रल्हादाची आणि 'भक्त ध्रुव' नाटकातील ध्रुवाची. गोड गळा आणि धिटाईनं केलेला अभिनय, यामुळे त्यांच्या दोन्ही भूमिका गाजल्या.अितक्या गाजल्या की जवळजवळ तीन वर्षे 'बलवंत' ही नाट्यसंस्था या 'बाल' कलाकाराच्या छोट्याशा खांद्यावर अुभी होती! याची साक्ष खुद्द चिंतामणराव कोल्हटकर यांच्या 'बहुरुपी' या आत्मचरित्रात मिळते. त्यानी मुळी दोन्ही नाटकांच्या अुत्पन्नाचा आलेखच काढून दाखवला आहे. भक्त प्रल्हाद हे नाटक, बिगर मराठी प्रेक्षकांसाठी, हिंदी भाषेत 'धरम का चाँद' या नावाने सादर केले जाई. या दोन्ही नाटकांमुळे गणपतरावाना चांगलीच प्रसिद्धी मिळाली. पैसा मिळायचा प्रश्नच नव्हता. कारण तो त्यांच्या हाती येतच नसे! कंपनीचा मुक्काम ज्या गावी असे, त्या गावची भाविक मंडळी या ध्रुवाला, या प्रल्हादाला, घरी घेऊन जात. त्याची पूजा करत. गोड-धोड खाऊ घालत. नवे नवे कपडे देत आणि घोड्याच्या गाडीतून (त्या काळातील मोठी चैन!) कंपनीच्या बिऱ्हाडी आणून पोचवत. निरागस बाल्य, सहजसुंदर अभिनय आणि भावानुकूल गाणे यामुळे या छोट्या गणूला प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले होते.

बाल कलाकार म्हणून गणपतरावांची कारकीर्द सुरू झाली तेव्हा दोन महान विभूतींचे त्याना आशीर्वाद मिळाले. त्यातील पहिले म्हणजे बॅ.मुकुंदराव जयकर. १९१८ च्या सुमारास, किर्लोस्कर मंडळीमधील फाटाफुटीनंतर, स्थापन झालेल्या बलवंत संगीत मंडळींच्या 'पहिल्या' नाटकाचा पडदा वर गेला तो बॅ.जयकरांच्या हस्ते. 'शाकुंतल' नाटकाचा प्रयोग लावलेला होता. त्या नाटकातील कण्वशिष्य ऋषिकुमाराचे काम गणपतरावाना होते. त्यावेळच्या लहान वयातील गोड आवाजात म्हटलेलं गाणं अितकं रंगलं की प्रयोग झाल्यावर छोट्या गणूला ''तुझं साभिनय गाणं मोठं छान झालं हं'' असे प्रशंसोद्गार काढत बॅ. जयकरानी आपल्या हातातील सोन्याचं घड्याळ त्याला बक्षीस दिलं. जयकर भारावून गेले, ते पद खरोखरच रंगत असे. तिसऱ्या अंकातील, पहिल्या प्रवेशातील त्या पदाला गणपतराव टाळी घेत. किती तरी दिवस ती 'बलवंतची पहिली टाळी' म्हणून ओळखली जाई!

अर्थात् त्या वयात छोट्या गणूला जयकर कोण, त्यांची योग्यता काय याविषयी काहीच माहीत नव्हते.

त्यानंतरची दुसरी महान व्यक्ति होती म्हणजे खुद्द लो. टिळक. ते मात्र छोट्या गणूला निदान ऐकून तरी नक्कीच माहीत होते!

'बलवंत' ने एकदा होमरूल चळवळीच्या मदतीसाठी गडकऱ्यांचं 'पुण्यप्रभाव' नाटक लावलं होतं. त्यातील युवराजाची भूमिका व त्याच्या तोंडची गाणी गणपतरावानी एवढ्या समरसतेने म्हटली की प्रयोग पहावयास आलेले लोकमान्य टिळक प्रभावित झाले. गणपतरावाना बघून शाबासकी देत, ते अिकडे तिकडे बघू लागले. त्यांच्या मनात काहीतरी द्यायचे असावे. तेव्हा त्यांच्याजवळच्या एका माणसाने हातातील अंगठी पुढे केली. ती लोकमान्यानी गणपतरावांच्या बोटात घातली. तो प्रसंग आठवला की आज ८० वर्षानंतरसुध्दा त्यांच्या अंगावर रोमांच अुभे राहतात. त्या थोर पुरुषाच्या सुवर्णमयी आशीर्वादामुळेच आपली नाट्यकारकीर्द सुवर्णमय झाली आणि म्हणूनच अनेक सुवर्णपदकांचा सन्मान प्राप्त झाला अशीच त्यांची श्रध्दा आहे.

लोकमान्यांमुळेच त्याना मोठ्या समारंभात 'वंदे मातरम्' म्हणण्याची संधी मिळाली. होमरूल चळवळीच्या मार्गदर्शनासाठी, त्यावेळी पुण्यातील 'किर्लोस्कर' थिअेटरमध्ये (नंतरचे वसंत टॉकीज) मोठी सभा भरली होती. खुद्द लोकमान्य, अॅनी बेझंट, बॅ.जीना, गांधी, दोन्ही शौकत अली, शि. म. परांजपे, न.चि.केळकर, खापर्डे, असे दिग्गज जमले होते. त्यांच्या अुपस्थितीमध्ये 'वंदे मातरम्' चे संपूर्ण गीत गणपतरावानी असे काही भावपूर्ण स्वरात म्हटले की सर्वजण मंत्रमुग्ध झाले.

'बलवंत' मध्ये असताना कंपनीच्या बहुतेक सर्व नाटकांतून गणपतरावानी

स्त्री-पुरूष भूमिका केल्या. वर अुल्लेखलेल्या ध्रुव, प्रल्हाद, शाकुंतलशिवाय, पुण्यप्रभाव, मूकनायक, चौदावे रत्न, अुग्रमंडल, देशकंटक, भावबंधन, रामराज्यवियोग, वेड्यांचा बाजार, राजसंन्यास, मानापमान, 'संन्यस्त खड्ग, ब्रह्मकुमारी अशा अनेक नाटकांतून त्यानी वेगवेगळया भूमिका केल्या. यशस्वी केल्या. गाजविल्या.

अिथं एक गोष्ट आवर्जून लक्षात घ्यायला हवी. ती अशी की त्याकाळचा नटवर्ग हा काही फारसा सुशिक्षित नसे किंबहुना बरेचजण शिक्षण अर्धवट टाकून, घरातून पळून आलेले असत. तेव्हा श्री.कृ.कोल्हटकर, गडकरी, खाडिलकर, वीर वामनराव जोशी, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा एकाहून एक सरस अशा भाषाप्रभूंची भाषा ही मंडळी कशी पेलत असावीत, याचे कधी कधी आश्चर्य वाटते. पण वस्तुस्थिती अशी की ही मंडळी अशा दिग्गजांची भाषा नुसतीच पेलत नसत तर नाटककाराची शब्दकळां, प्रेक्षकांच्या अंत:करणात समर्थपणे पोचवून, हलकल्लोळ माजवून देत असत. गणपतराव तर जेमतेम दुसरी-तिसरीतच शाळेला रामराम ठोकून नाटकात आलेले. अशा माणसाने राजसंन्यास, संन्यस्त खड्ग अशा नाटकांच्या भाषा समजून मुखोद्गत करणे हे म्हणून कौतुकास्पदच होते.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'संन्यस्त खड्ग' हे एक विलक्षण नाटक आहे. हिंसा आणि अहिंसा यांची तात्त्विक चर्चा करणारे हे एक ओजस्वी नाटक. मार्मिक तर्कमीमांसा असली तरी नाटकाची भाषा पांडित्यपूर्ण आणि त्यामुळेच क्वचित् प्रसंगी बोजड आहे. एक प्रसंग असा आहे. आत्यंतिक अहिंसेच्या आहारी गेलेल्या शाक्य मंडळींवर, कौसल्येश्वर विद्युत्गर्भाने अचानक हल्ला केलेला आहे. रणधुमाळीत, शाक्यांचा शूर सेनापती वल्लभसिंह हा शत्रूच्या हाती सापडला आहे. त्याची पत्नी सुलोचना (मा.दीनानाथ) आपली सखी नलिनी (गणपतराव मोहिते) हिला म्हणते की अशा प्रसंगी कर्तव्य काय म्हणते ते सांग. तेव्हा नलिनी म्हणते.

''सारी शाक्य जमात विद्युतगर्भाच्या तलवारीने भोसकली जात असता, आम्ही क्षत्रिय कन्यांनी, अंत:पुरात मुळूमुळू रडत न बसता, तू म्हणतेस तसे सैनिक वेष घेऊन, शत्रूचा सूड अुगवीत, खड्गा-खड्गीतून अुठलेल्या ज्वालांवर चढून, प्रिय स्मृतींसह सती जावे. कारण,

''मृत काष्ट तृणातीत ना, सती
जातात वीरांगना ।
शस्त्र संघर्षि घे चेतना, तथा
रणाग्नीत दारुणा,
सूडाच्या जातात वीरांगना ।'' ..........

नलिनीच्या भूमिकेत काम करणारे गणपतराव असे संवाद आणि हे गाणे अशा काही ताकदीने व त्वेषाने म्हणत की प्रेक्षक थरारून जात. 'स्वातंत्र्यासाठी संगर'या सावरकरांच्या तेजस्वी विचारधारेचा, प्रत्येकाच्या अंत:करणात संचार होत असे.त्यानंतर ''शरण नाही, रण मारीत मारीत मरण'' या घोषवाक्याच्या संदर्भातील, 'स्वकुलनाशा.... हे देसकार रागातील पद सुरू होई. गणपतराव, अर्थातच दीनानाथी तडफदारीने ते पद गात असत.

दोन्ही पदाना गणपतराव दोन दोनदा, तीन तीनदा टाळ्या घेत. विंगेत असलेले वझेबुवा कौतुकाने म्हणत ''वा, तुझा देसकार छानच जमलाय.'' सर्वजण कौतुक करतच पण खुद्द सावरकरही नलिनीचे काम बघून स्तिमित झाले होते. वास्तविक 'नलिनी' ही नायिकेची-सुलोचनेची सखी. त्यामुळे तशी ती छोटीशी व्यक्तिरेखा. पण गणपतराव अशा काही विलक्षण अदाकारीने त्यात रंग भरत की ही 'नलिनी' प्रेक्षकांच्या सदैव स्मरणात राही. खुद्द सावरकर 'बलवंत' च्या बिऱ्हाडी, चालकमंडळीना पत्र लिहिताना 'माझ्या नलिनीस आशीर्वाद' असा गणपतरावांचा अुल्लेख करीत.

सावरकरांची पल्लेदार भाषा समर्थपणे पेलवायची आणि खुद्द त्यांचीच शाबासकी मिळवायची. गणपतरावांच्या अभिनयाला आणि गानकौशल्याला, वेगळी पावती ती कोणती?

मा. दीनानाथांचं स्त्री-भूमिका करण्याचं वय मागं पडत चाललं तेव्हा त्यांच्या सर्व स्त्री-भूमिका आपसूकच गणपतरावांकडे आल्या.दीनानाथांच्या प्रमुख भूमिका त्याना झेपतील का? प्रेक्षक स्वीकारतील का? असा प्रश्नच मुळी कुणाच्या मनात आला नाही. एवढी गुणवत्ता गणपतरावानी तोवर सिद्ध केली होती.

आणि मग दीनानाथ नायक आणि गणपतराव नायिका असा सुंदर योग रंगभूमीवर जुळून आला.

दीनानाथांचे पाणीदार डोळ्यांचे भव्य रसरशीत व्यक्तिमत्व आणि त्याची साथ करणारं, गणपतरावांचं कोरीव, सुहास्य रूप! आज ९२ व्या वर्षीसुद्धा त्यांचं वृद्धत्व अितकं 'देखणं' वाटतं तर ऐन तरुण वयात त्यांचं 'रुपडं' काय असेल याची रसिकाला सहज कल्पना करता येते आणि स्त्री-भूमिकेतील त्यांचे फोटो बघितल्यावर खात्रीच पटते. 'बलवंत' चे 'मानापमान,' रूढ प्रयोगांपेक्षा खूपच वेगळे होते. दीनानाथांच्या तडफदार गाण्याने, जोरकस अभिनयाने, त्यांचा धैर्यधर, खराखुरा क्षात्रतेजसंपन्न धैर्यधर वाटे. त्यांच्या चौफेर फिरणाऱ्या, भरदार आवाजाचे गाणे, सबंध नाटकभर छाप पाडून जायचे तर त्याच अंगाने फिरणारे, गणपतरावांचे गाणे, त्याच्याशी सुंदर संवाद साधायचे, भरभरून प्रतिसाद द्यायचे!

तीच गोष्ट 'ब्रह्मकुमारी' नाटकाची. तपोधन गौतम, मा. दीनानाथ, तरतरीत लाडीक अहिल्या गणपतराव प्रेक्षकांचे डोळे, कान तृप्त करीत. गणपतराव अशाच ताकदीने दीनानाथांच्या अन्य स्त्री-भूमिका लतिका (भावबंधन) शिवांगी (राजसंन्यास) करीत असत.

पण बोलपटांचा जमाना सुरू झाला आणि रंगभूमीच्या वैभवाला दृष्ट लागली.

अर्थात् जाणकारांच्या मते रंगभूमीचे वैभव लयाला जाण्यास तेवढे एकच कारण नव्हते. प्रेक्षकांची अभिरूची बदलत चालली होती.संगीताचा थोडासा अतिरेक झाला असावा. ऐतिहासिक-पौराणिक नाटकांचा 'ओव्हरडोस' झाला असावा. बोलपटांचे नाविन्य वाटले असावे. परिणामी, अनेक नामवंत कंपन्या बुडत चालल्या. अनेक ज्येष्ठ रथी-महारथी रंगभूमीचे वैभव सावरता सावरता त्रस्त झाले होते. बलवंतची चालक मंडळी पण या धामधुमीत मेटाकुटीला आली होती.

अखेरची धडपड म्हणून कंपनीने विश्राम बेडेकरांचे 'ब्रह्मकुमारी' नाटक रंगभूमीवर आणले.

या नाटकाचा पहिला प्रयोग १९३१ साली, सांगलीतच झाला. सांगलीचे राजेसाहेब श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन यांच्या शुभहस्ते. या नाटकात चिंतामणराव कोल्हटकर इंद्राची, दीनानाथ गौतमाची भूमिका करीत तर गणपतराव अहिल्येची. कृ.प्र. खाडिलकरांनतर इतकं सुंदर पौराणिक नाटकं दुसरं नाही, यावर सर्वांचं एकमत होतं. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरानी तर 'केसरी' त म्हटलं होतं की "हे नाटक बघताना तोंडात खडीसाखरेचा खडा घेऊन, गुलाबांच्या ताटव्यानी फुललेल्या अुद्यानात फेरफटका केल्याचा आनंद प्रेक्षकाना मिळतो." बेडेकरांच्या लेखणीचं सामर्थ्य आणि सर्वांचं अभिनय कौशल्य, यामुळे रंगभूमीच्या पडत्या काळातही या नाटकानं चांगलंच यश मिळवलं. "विलोपले मधु मीलनात या" हे गाणं तर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं.

पण दुर्दैवाने हे नाटकही बलवंत नाटक मंडळीला फार सावरूं शकलं नाही. प्रेक्षकांसाठी बदल म्हणून काही सामाजिक नाटकं कंपनीनं करुन बघितली. पण प्रतिसाद शून्य. कंपनीची अवस्था दिवसेंदिवस खालावू लागली.

शेवटी विषानेच विष अुतरवण्याचा प्रयत्न झाला! म्हणजे असं की बोलपटांचं नाटकांवर आक्रमण होतय तर मग बोलपटच का नाही काढायचा? पैसा मिळवायचा आणि तो नाटकासाठी खर्च करायचा, असा विचार पुढं आला. या विचारातूनच १९३३साली 'बलवंत' पिक्चर्स अुभी राहिली. स्थापना मुंबईत झाली पण कंपनीचा अद्यावत स्टुडिओ सांगलीत अुभा राहिला. गणपती मंदिराच्या पिछाडीस, अत्याधुनिक

सामुग्रीने सज्ज असे पस्तीस ते चाळीस विभाग या स्टुडिओत होते. कंपनीतर्फे पहिला चित्रपट तयार झाला तो 'कृष्णार्जुन युद्ध.' त्या चित्रपटात गणपतरावांची नारदाची मध्यवर्ती भूमिका होती. 'अयोध्येचा राजा' या पहिल्या चित्रपटानंतर मराठीत निर्माण झालेला हा पाचवा चित्रपट मात्र अपेक्षित यश मिळवू शकला नाही. त्यानंतर निर्माण झालेल्या 'सत्याचे प्रयोग' या चित्रपटात गणपतरावानी नायकाचे (मनोहर) काम केले. योगायोगाने नायिकेच्या भूमिकेत सांगलीच्याच बाळाबाई पोतदार होत्या. नंतरच्या 'भक्त पुंडलिक' मध्ये त्यानी पुंडलिकाची मुख्य भूमिका केली. त्यानंतर 'ठकीचे लग्न' 'अंधेरी दुनिया' (हिंदी), 'लक्ष्मीचे खेळ' असे चित्रपट बनवण्यात आले. पण तांत्रिक बाबतीतील अनुभव, एकूण सिने-धंद्याविषयीचे अज्ञान, यामुळे हा चित्रपट अुद्योग चांगलाच महागात पडला. शेवटच्या अपुऱ्या राहिलेल्या 'कंगाल' चित्रपटाने तर कंपनीला पुरे कंगाल बनवून टाकले आणि कंपनी शेवटच्या घटका मोजू लागली.

या सर्व चित्रपटांतून गणपतरावानी कामे तर केलीच पण कौतुकाची गोष्ट म्हणजे या ६-७ चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यानी स्वत:च केले होते. चित्रपट अयशस्वी झाल्यामुळे त्यांच्या या वेगळ्या पैलूचे, व्हावे तसे कौतुक झाले नाही. एरवी त्यांच्या चित्रपट कारकीर्दीतील हा खरोखरी मानाचा शिरपेच होता.

एकंदरीत दीनानाथ आणि चिंतामणराव कोल्हटकर या 'बलवंत' च्या मालकाना चित्रपटाचा धंदा मानवला नाही. नाटकाचा धंदा यशस्वी करायचा म्हणून चित्रपट बनवले तो अुलटे शूटींगला पैसे कमी पडले की नाटके लावायला लागायची! परिणामी, दोन्ही आघाड्यावर सपाटून मार बसला. वाईट वेळ आली की एकमेकांवर दोषारोप सुरू होतात. दीनानाथांचे, चिंतामणरावांचे लहान-सहान कारणांवरून बिनसू लागले. विश्राम बेडेकर आधीच शिष्यवृत्ती मिळाल्याने अिंग्लंडला निघून गेले होते. कंपनीची देणी वाढू लागली. दीनानाथांचे व्यसन वाढले. एक शेवटचा अुपाय म्हणून बलवंत नाटक कंपनीचे चालकत्व गणपतरावांकडे देण्यात आले. वयाच्या सातव्या वर्षी ५ रु. पगारावर काम करणारा साधा मुलगा, कंपनीचा मालक बनला. ही घटना निश्चितच भूषणास्पद होती. पण हातात आलेले राज्य 'ओसाडवाडी' चे होते! नाटक आणि चित्रपटसंस्था मिळून दीड लाखाचा आर्थिक बोजा होता. गणपतरावानी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने 'बलवंत' ला आणि दीनानाथांना सावरण्याची अहोरात्र धडपड केली. स्वत:साठी, बालगंधर्व आणि शांतारामबापू यासारखी अुत्तुंग व्यक्तिमत्वे पुकारीत होती, तरी वैयक्तिक लाभाच्या संधी विनयपूर्वक नाकारल्या. पण अितके करुनहि गणपतराव आपल्या 'बलवंत' ला वाचवू शकले नाहीत. अखेरीस १९४१ च्या सुमारास सहा हजार रुपयांचे कर्ज डोक्यावर घेऊन, गणपतरावानी 'बलवंत' संगीत मंडळींवर मोठ्या दु:खद अंत:करणाने अखेरचा पडदा टाकला!

त्याच सुमारास आचार्य अत्रे यानी आपल्या 'अत्रे पिक्चर्स'साठी, गणपतरावांबरोबर दहा पिक्चर्सचा 'तोंडी' करार केला. त्यानी गणपतरावांची नाट्य-अभिनय-संगीत क्षेत्रातील गुणवत्ता जाणली होती. त्यांचे ५-६ पिक्चर्स अयशस्वी झाले होते ते अितर अनेक कारणांमुळे. सिनेमाच्या पडद्यावरसुद्धा गणपतराव किती मोहक आणि आकर्षक दिसतात याची गुणग्राही अत्र्यांना यथार्थ कल्पना होती. म्हणूनच त्यानी आपल्या चित्रपटांसाठी, 'गणपतराव मोहिते' या लांबलचक नावाला सुट्टी देऊन 'मा. अविनाश' हे सुटसुटीत नांव दिले. अत्रे पिक्चर्सचा 'पायाची दासी' हा चित्रपट खूप गाजला. अविनाशबरोबर त्यावेळी नायिका होत्या वनमालाबाई. हाच चित्रपट 'चरनोंकी दासी' या नावाने हिंदीत पण निघाला. 'घरजावई' चित्रपटात 'अविनाश' बरोबर शोभना समर्थ होती. शिवाय वनमालाबाई होत्याच.

अविनाशांची वाढती लोकप्रियता पाहून 'प्रकाश' पिक्चर्सच्या विजय भट्ट या नामवंत निर्माता-दिग्दर्शकाने त्या काळी भरघोस वाटणाऱ्या रु१४००/- पगारावर आपल्या 'भरतभेट' साठी अविनाशना पाचारण केले होते. पण अत्र्याना 'तोंडी का होईना पण 'शब्द' दिला असल्यामुळे मा. अविनाशना ती संधी नाकारावी लागली!

अुलट अिकडे अत्र्यानी आपल्या 'वसंतसेना' या महत्वाकांक्षी चित्रपटात सपाटून मार खाल्ला. त्याना अनेक कर्जे झाली. त्यामुळे अविनाशांचा शोभना समर्थबरोबरचा 'राजा-रानी' हा चित्रपट अर्धवटच राहिला!

अशा तऱ्हेने हा सिनेमा-पर्वाचा दुसरा कालखंड अचानक संपुष्टात आला. अत्रे पिक्चर्सचे सर्व चित्रपट पूर्ण झाले असते तर सर्व हिंदुस्थानभर अविनाशांचे नाव झाले असते! अनेक सिनेमांची कॉन्ट्रॅक्ट्स् त्यांच्या दारी आली असती. तथापि असे म्हणणे म्हणजे अविनाशांच्या अुदात्त प्रतिमेला अुणेपणा आणण्यासारखे आहे. कारण पैशाचा हव्यास त्यानी आयुष्यात कधीच धरला नव्हता. त्याना ओळखणाऱ्या सर्वानाच ही गोष्ट पुरतेपणी माहीत आहे.

अत्रे पिक्चर्समुळे आणि विशेषत: खास गाजलेल्या 'पायाची दासी' या चित्रपटामुळे अविनाशना चांगलीच प्रतिष्ठा मिळाली.

त्यामुळेच अविनाशना कामासाठी कधी कुणाच्या दाराशी जावे लागले नाही. अत्रे पिक्चर्समधून मोकळे होता होताच, त्याना प्रख्यात नाटककार, निर्माते-दिग्दर्शक मो.ग. रांगणेकर यानी आपल्या 'नाट्यनिकेतन'संस्थेत 'कुलवधू' साठी आमंत्रण दिले.

आता त्यांच्या आयुष्यातील तिसरे मोठे पर्व सुरू झाले.

१९४२ ते १९७५ अशी तब्बल ३३ वर्षे त्यानी 'नाट्यनिकेतन' मध्ये घालवली.

१९१८ ते १९४१ या 'बलवंत' मधील, जवळजवळ २२-२३ वर्षाच्या कालखंडापेक्षाहि हा कालखंड मोठा होता.

अशाप्रकारे पुन्हा ते आपल्या आवडत्या रंगभूमीकडे वळले. मात्र आता रंगभूमीवर बराच बदल घडून आला होता. 'बलवंत' मधील किर्लोस्करी नाट्यपरंपरा मागे पडून, २।।-३ तासांची, माफक संगीत असलेली नवी चटपटीत नाटके रंगभूमीवर येऊ लागली होती.

मा.अविनाशांचं कौतुकास्पद वैशिष्ट्य असं की या नव्या रंगभूमीवरसुध्दा ते चपखलपणे वावरले. शास्त्रोक्त संगीताऐवजी सुगम संगीताच्या अंगाने जाणाऱ्या नव्या नाट्यसंगीतातहि ते अगदी सहजपणे चांगले रुळले आणि गाजले.

'कुलवधू' हे त्यांच्या आयुष्यातील वैशिष्ट्यपूर्ण मानाचे शिखर ठरले. मो.ग. रांगणेकरांचे, अगदी घरगुती वातावरणातील हे नाटक, त्यातील चुरचुरीत आणि चटपटीत संवादामुळे, कथानकाच्या ओघातच आलेल्या गाण्यांमुळे आणि भावगीतांच्या अंगाने सजलेल्या स्वरसाजामुळे अत्यंत लोकप्रिय ठरले. तशी या नाटकात अवघी ६ गाणीच आहेत. पण कथानक आणि नाटकातील प्रसंग यामध्ये समन्वय साधणारी आहेत. मा.कृष्णानी दिलेल्या सुमधुर चालींचा त्या गाण्यांच्या लोकप्रियतेत जेवढा वाटा आहे तेवढाच ज्योत्स्ना भोळे आणि अविनाश यांच्या सहजसुंदर गायनाचा आहे. "मनरमणा मधुसूदना" "मुखी राहो" किंवा "अमृत बोला" ही भैरवी (ज्योत्स्नाबाईंच्या तोंडची) जेवढी गाजली तेवढेच अविनाशांच्या तोंडचे, पहिल्याच अंकातील "किती तरी आतुर प्रेम आपुले" हे वातावरण भारून टाकणारे गीत गाजले आणि त्याहून अितिहास निर्माण केला तो अविनाश-ज्योत्स्ना भोळे यांच्या तोंडी असलेल्या द्वंद्वगीताने. वास्तविक मूळ नाटकात हे द्वंद्वगीत नव्हते पण अविनाशना सारखे असे वाटे की नाटकात नायक-नायिकेचा (देवदत्त आणि भानुमती) जो संघर्ष आहे, त्याला अशा द्वंद्वगीताने रंगत येईल. मात्र मो. ग. रांगणेकराना तसं वाटत नव्हतं. "तुम्ही म्हणता तशा पदासाठी नाटकात जागाच नाही. मग कसं टाकणार पद?" असे ते म्हणत. पण अविनाश अस्वस्थ होते. त्यानी नाटकाच्या संहितेचे पुन:पुन्हा मनन केले आणि पहिल्या अंकात 'योग्य' जागा त्याना सापडली. मग रांगणेकरानी एक पद लिहिले. इतके होईपर्यंत नाटकाच्या प्रयोगाची तारीख जवळ येऊन ठेपली. दुसरे दिवशी प्रयोग सकाळी ८।। वाजताच होता. मा. कृष्णानी आदले दिवशी रात्री नऊपर्यंत पदाला चाल लावली. अविनाशनी आणि ज्योत्स्नाबाईंनी, नोटेशन पध्दतीने ते पद पाठ केले. आणि दुसऱ्याच दिवशी दोघानी, ते द्वंद्वगीत विलक्षण सुंदर रंगवले. त्याची सुरुवात अशी होती:

भानुमती (ज्योत्स्नाबाई)-"भाग्यवती मी त्रिभुवनी झाले ।
कुबेर माझा धनी

देवदत्त (अविनाश) " तुझेच सारे वैभव येथे ।
मी, नांवाचा धनी "

पहिल्याच प्रयोगात, पहिल्याच अंकातील या गाण्याला प्रेक्षकांनी अशी काही कडाडून टाळी दिली, की बस्! आपण नाटक जिंकले, असा आत्मविश्वास रांगणेकर, मा. कृष्णा अशा सर्वानाच आला. त्यानंतर त्या नाटकाची प्रचंड यशस्वी घोडदौडच सुरू झाली. १९४२ ते १९७५ या ३३ वर्षांच्या काळात या नाटकाचे अडीच ते तीन हजार प्रयोग झाले. या सर्व प्रयोगांतून अविनाश-ज्योत्स्ना भोळे ही जोडी अजरामर झाली. या नाटकाच्या लोकप्रियतेचे अनेक किस्से चवीने सांगितले जात असत. ज्योत्स्ना भोळेंच्या भानुमतीमुळे हे नाटक जितकं गाजलं तितकंच ते अविनाशांच्या देवदत्तमुळे गाजलं. 'कुलवधू' म्हणजे मा. अविनाश असं समीकरणच त्यामुळे रूढ झाले.

अलीकडे नव्या पिढीच्या रसिकाना पण या समीकरणाचा प्रत्यय आला. १९४२ साली या नाटकाचा रंगभूमीवर प्रथम प्रयोग झाला या घटनेला ५० वर्षे झाली म्हणून १९९२ साली या नाटकाचा पुण्यात, जुन्या संचात पुन्हा प्रयोग झाला. ज्योत्स्ना भोळे आणि मा. अविनाश या जुन्या जोडीने पुन्हा एकदा तोंडाला रंग फासला. त्यावेळी ८३ व्या वर्षाच्या अविनाशनी स्टेजवर एन्ट्री घेताच प्रेक्षकानी कडाडून टाळ्या दिल्या.

त्या लोकप्रियतेची ही लोकविलक्षण पावती!

कुलवधूच्या यशानंतर, अविनाशनी, 'माझे घर' (सरस्वतीबाई राणे) 'राणीचा बाग' (नायिका-स्नेहप्रभा प्रधान) 'तुझं माझं जमेना' (नायिका-ज्योत्स्ना भोळे) अशा अनेक नाटकांतून भूमिका केल्या. रांगणेकरांच्या 'आशिर्वाद' नाटकाच्या २०० प्रयोगात त्यानी कामे केली. नाट्यनिकेतनच्या 'अपूर्व बंगाल,' 'कन्यादान,' अशा बहुतेक सर्वच नाटकांतून त्यानी नायकाची भूमिका केली. त्यापैकी 'तुझं नि माझं जमेना' हे नाटक अविनाश-ज्योत्स्ना भोळे यांच्या द्वंद्वगीतामुळे खूप गाजले होते. त्या दोघांच्या भूमिका असलेला, मो.ग.रांगणेकरांचा, 'कुबेर' हा चित्रपटसुध्दा वैशिष्ट्यपूर्ण होता. त्या चित्रपटाचा नायक हा १९४२ च्या लढ्यातील सुप्रसिध्द क्रांतिकारक अच्युतराव पटवर्धन यांजवरून बेतलेला होता.

'नाट्यनिकेतन' मध्ये ३३ वर्षे राहून रंगभूमीची भरपूर सेवा करून १९७५ साली मा. अविनाशनी, रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही क्षेत्रातून निवृत्ती पत्करली.

एक प्रकारची स्वेच्छानिवृत्तीच. कारण निवृत्त होतानासुध्दा त्यांची लोकप्रियता अखंड होती. कामे मिळण्याचा प्रश्नच नव्हता.

कदाचित् हाडाचे क्रिकेटर असल्यामुळेच, विजय मर्चंटप्रमाणे त्यानी रिटायर होण्यात अचूक 'टायमिंग' साधलं, असंच म्हणायला हवं!

पण थोडा विचार केला तर मा. अविनाशांसारख्या रंगभूमीशी अव्यभिचारी निष्ठा असणाऱ्या, श्रध्दावान नटानं निवृत्त होणं,अपरिहार्यच होतं. ते निवृत्त झाले त्यावेळी घरंदाज गायकीचा लोप होत चालला होता. 'हिट अँड हॉट' नाटकांचा जमाना आला. डिस्को आला. ठेकेदारी पध्दत आली. नाईट्स कितीहि 'अर्थ' पूर्ण असल्या, तरी ज्या माणसाला नाटककंपनीत, एखाद्या घरंदाज कुटुंबियासारखी राहण्याची सवय होती त्याला असल्या'नाईट्स' क्षोभकारक वाटत होत्या. अविनाशना'बलवंत'मध्ये राहून फार मोठे जग बघायला मिळाले होते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा मुलगा दिवाकर, अविनाशांचा समवयस्क होता. त्यामुळे त्यांचा अविनाशांवर लोभ होता. गडकरी आजारी असताना ५-६महिने 'बलवंत' च्या बिऱ्हाडी होते. अविनाशना त्यांचा भरपूर सहवास मिळाला. त्यांच्या विलक्षण भाषाप्रभुत्वाची जवळून ओळख झाली. त्यांच्यावरील लोभामुळे, गडकऱ्यानी 'पुण्यप्रभाव' मधील अविनाशांची भूमिका थोडी वाढवून दिली होती. सावरकरांचे प्रेम त्याना मिळाले होते. वीर वामनराव जोशींबरोबर गप्पागोष्टी करायला मिळाल्या होत्या. खुद्द चिंतामणराव कोल्हटकरानी त्याना गद्य भूमिकांची तालीम दिली होती. अभिनयातील बारकावे समजावून सांगितले होते, वझेबुवांची संगीताची तालीम मिळाली होती. आणि दीनानाथ? तो तर त्यांच्या आयुष्यातील फार मोठा अध्याय होता. त्यांच्याशिवाय अविनाशांचं जीवन तृणवत् होतं.

असं फार मोठं वैभव बघितलेल्या अविनाशना, रंगभूमीचं पावित्र्यच नष्ट व्हायला लागलं, असं त्यांच्या मतानं वाटायला लागलं, तेव्हा मोठ्या कष्टी मनानं दूर होणंच अपरिहार्य ठरलं असेल. त्यानीच आपल्या रंगभूमीवरील निवृत्तीच्या संदर्भात एके ठिकाणी मोठ्या मार्मिकपणे म्हटलयं की, "हिमालयाची एकेक अुत्तुंग शिखरं मी आयुष्यात बघितली,आता लहान-सहान टेकड्या नाही मला खुणावू शकत."

त्यांच्या नाट्यसेवेबद्दल काही पुरस्कार त्याना मिळाले. मराठी संगीत नाटक शताब्दि महोत्सव समिती (मुंबई)आणि मुख्यमंत्री श्री.अंतुले याजकडून १९८४ मध्ये त्यांचा सत्कार झाला. अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे, माधवराव शिंदे, ग्वाल्हेर, 'गंधर्व' सुवर्णपदक त्याना मिळालं. १९९२ सालचा, सांगलीचा प्रतिष्ठेचा विष्णुदास भावे सुवर्णपदक पुरस्कार, त्याना गौरवपूर्वक प्रदान करण्यात आला. माहेरचा पुरस्कार म्हणून मा. अविनाशना त्याचं अधिक कौतुक वाटलं. संगीत रंगभूमीच्या

प्रदीर्घ सेवेबद्दल १९९५ साली दीनानाथ स्मृती प्रतिष्ठानतर्फे 'मा.दीनानाथ मंगेशकर पारितोषिक रु. ५०,०००/-चे मिळाले. त्यावर तर त्यांचा सर्वार्थाने हक्कच होता. युनेस्कोप्रणीत प्रथम पुरस्कार मिळाला.

तथापि, आज जो पुरस्कारांचा महापूर लोटला आहे आणि फारसं 'कॉंट्रिब्यूशन' (किंबहुना नगण्य) नसणारी मंडळी,छातीवर पुरस्कारांची अनेक मानचिन्हे लावून मिरवतात, तेव्हा अविनाशाना मिळालेले पुरस्कार, त्यांच्या ६० वर्षाच्या प्रचंड नाट्य-चित्रसेवेच्या तुलनेत किती तोकडे आहेत याची प्रकर्षाने जाणीव होते!

नाट्यसृष्टीचा इतिहास लिहिणाऱ्याला, मोठमोठ्या दिग्गजांच्या रांगेत, अविनाशांसाठी, एक गौरवाचे पान निश्चितच राखून ठेवावे लागेल. आणि त्यांचा सहजसुंदर अभिनय, स्पष्ट शब्दोच्चार, गोड, मोहक रुपडं,स्वच्छ, निकोप गाणं, याविषयी त्यात भरभरून लिहावं लागेल. सव्यसाची अभिनेता म्हणून त्यांची योग्यता फार मोठी आहे. त्यानी बालभूमिका सुरेख केल्या. स्त्रीभूमिका तर हातखंडा होता. नाट्यनिकेतनच्या कालखंडात, नव्या मनूच्या सामाजिक पुरूषभूमिका केल्या. 'राणीचा बाग' मध्ये मनोहरच्या भूमिकेत एक खलनायक, अनेकांच्या कौतुकाच्या शब्दात, म्हणजे'स्वीट व्हिलन'अुभा केला. कहर म्हणजे गरजेच्या प्रसंगी 'भावबंधन' मध्ये 'कामण्णा' ची विनोदी भूमिका केली. पडद्यावरच्या वा रंगभूमीवरच्या भूमिकांबरोबरच, प्रत्यक्ष जीवनाच्या रंगभूमीवर कधी शिकाऱ्याची भूमिका केली, कधी क्रिकेटरची. सांगलीच्या विजय हजारेंबरोबर, बालपणी ते क्रिकेट खेळलेच पण तरूणपणी मोठमोठ्या मॅचेसमध्ये पण ते खेळले. त्यामुळेच कर्नल सी.के. नायडूंबरोबर त्यांची घनिष्ट मैत्री जुळली. त्यांच्या प्रेमाखातर ते नेहमी अविनाशच्या नाटकाना आवर्जून येऊन बसत. गंमत म्हणजे शेतीची आवड असणाऱ्या अविनाशनी, पुण्याजवळील तळेगाव-दाभाडे येथे पांचशे एकर जमिनीवर, स्वत:च्या अध्यक्षतेखाली 'अशोक सहकारी सामुदायिक शेतकी संघ' स्थापन करुन शेतीची हौस पण भागवून घेतली!

अशा अनेक भूमिकांच्या गदारोळात, त्यांच्या 'अिमानदारी' च्या भूमिकेकडे सहसा कुणाचं लक्ष जात नाही. कुलवान स्त्री जसं आपलं शील जपते त्याच प्रखरतेने आणि निष्ठेने, मा. अविनाशनी आपलं अिमान जपलं. या संदर्भात दीनानाथ आणि एकूण मंगेशकर कुटुंबीय याजंबरोबर त्यांचा आलेला संबंध थोडा स्पष्ट करायला हवा.

मा. अविनाश 'बलवंत' मध्ये आले ते नोकर म्हणून. दीनानाथांचा त्यांचा पहिला संबंध नोकर-मालक असा आला. त्यांच्या भूमिका गाजू लागल्या, दीनानाथांबरोबर अुभे राहून त्यांच्या नायिकांच्या भूमिका समरसून करायला लागल्यावर, दोघांचे नाते समानधर्मियांचे बनले. दीनानाथांच्या विलक्षण गायकीमुळे अविनाश भारून गेले

होते. सुरूवातीला जरी त्याना, भास्करबुवा बखले, वझेबुवा यांची तालीम मिळाली, तरी त्यानी अनन्यभावाने दीनानाथांचे शिष्यत्व पत्करले होते. दीनानाथांची गायकी अप्रतिम होती. तालासुराला पक्की होती. त्यांच्या गाण्यात शोधकदृष्टी, नाविन्य आणि वैचित्र्य होते. गाताना ते नेहमी नवेनवे प्रयोग करीत. 'मानापमान' नाटकातील एका पदाची चाल, त्यानी आठ मात्रांऐवजी सात मात्रांवर घेऊन, त्या पदाचा स्वरविलास वाढविला होता आणि त्यापायी मा. कृष्णाची बोलणी खाल्ली होती. अशा या दीनानाथांचा फार मोठा प्रभाव, अविनाशवर होता. दीनानाथांच्या पुढ्यात बसून अनेक चिजा, नाट्यपदे अविनाशनी आत्मसात केली. लता, आशा ही लहान पोरं त्यावेळी जिवाचा कान करुन ऐकत बसत. दीनानाथांच्या सततच्या सहवासाने गुरू-शिष्याचे नाते, भावाचे बनले. दीनानाथ त्याना धाकटा भाऊ मानत. माई मंगेशकर पण भाऊ मानत. लता, आशा, अुषा, मीना, आणि बाळ (हृदयनाथ) ही भावंडे, त्याना गणूमामा म्हणत. (अजून म्हणतात.) १९१७ ते १९४२ या प्रदीर्घ काळात त्याना दीनानाथांचा सहवास लाभला. नोकर, सहकारी, शिष्य, कुटुंबीय अशा चढत्या श्रेणीने त्यांचे भावसंबंध गहिरे होत गेले. त्यामुळे 'बलवंत' ची स्थिती डबघाईला आली. दीनानाथांचं व्यसन बेसुमार वाढलं, तेव्हा मंगेशकर कुटुंबाला 'गणूमामा' हा मोठाच 'आधारवड' लाभला. नाटकं करायची, 'बलवंत' चा 'ताल' सांभाळायचा, दीनानाथांशी गोड बोलून त्याना व्यसनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत, त्यांचा 'तोल' सांभाळायचा अशी अविनाशांची कसरत चालली होती आणि 'बलवंत' चे चालकत्व, त्यांच्याकडं आल्यापासून तर अविनाशांची जबाबदारी फारच वाढली. पंखातील बळ गेलेल्या गरूडाप्रमाणे, दीनानाथ हताश झाले. एकेकजण सोडून चालला, तेव्हा तर अविनाश, मंगेशकर कुटुंबियाना घट्ट चिकटून राहिले. जमेल ती मदत करीत राहिले.

आणि त्याचवेळी त्यांची 'सत्त्वपरीक्षा' चालू होती.

'बलवंत' मधील भूमिकांमुळे अविनाश कीर्तिशिखरावर होते. त्यामुळे 'प्रभात' या हिंदुस्थानात अग्रगण्य ठरलेल्या फिल्म कंपनीच्या खुद्द शांतारामबापूनी अविनाशना 'अमर ज्योती' चित्रपटासाठी शांता आपटे, या त्याकाळच्या टॉप हिराईनबरोबर, काम करण्यासाठी पाचारण केले. चंद्रमोहनसारखा नट, अविनाश, 'प्रभात' मधील ऑफर घ्यायला राजी होत नाहीत, म्हणून त्यांची समजूत काढण्यासाठी स्वत: सांगलीला आले.सांगलीच्या माई घाटावर बसून दोघांच्या गप्पा झाल्या. अविनाशांचे मन वळवण्याचा त्यानी खूप प्रयत्न केला, पण अविनाश अचल राहिले.

दीनानाथना सोडून जाणं शक्यच नव्हतं.

त्यानंतर 'हंस' पिक्चर्सच्या मा. विनायकानी बोलावणे पाठवले. खुद्द बालगंधर्वानी आपल्याकडे बोलावले, ''स्त्री भूमिका आणि पुरूषभूमिका तुमच्यासारख्या, सारख्याच ताकदीनं मलासुध्दा करता येणार नाहीत''अशी खुद्द बालगंधर्वानीच पूर्वी अविनाशांची भलावण केली होती.

तरीसुध्दा अविनाश गेले नाहीत.

नैतिक जबाबदारीचं ओझे हे मनाने मानले तरच असते.एरवी कुठेहि जायला अविनाश मुक्त होते.पण ते गेले नाहीत.'बलवंत'ची हरणारी लढाई ते एकहाती लढत राहिले.

म्हणून तर दीनानाथानी शेवटचा श्वास घेताना हाक मारली ती आपल्या जिवाभावाच्या 'गणू'लाच!

पुढे 'अत्रे पिक्चर्स' साठी आचार्य अत्रेनी अविनाशबरोबर दहा पिक्चर्स करण्याचा 'तोंडी' करार केला. त्यांचा 'पायाची दासी' त्यावेळी तुफान चाललेला होता. 'प्रकाश' पिक्चर्सचे सुप्रसिध्द निर्माते-दिग्दर्शक श्री. विजय भट्ट, अविनाशकडे, 'भरतभेट' चित्रपटासाठी ऑफर घेऊन आले. १४००।-रु.द.म. अशा त्या काळात घसघशीत वाटणारा पगार त्यानी देऊ केला होता. अत्रे सोडायला राजी नव्हतेच; पण त्याना 'तोंडी' का होईना, आपण 'वचन' दिलय, तेव्हा त्यांचे दहा पिक्चर्स झाल्याशिवाय जायचं कसं? अशा धर्मसंकटात अविनाश पडले होते!

आजच्या काळात 'अिमानदारी' ही सप्तपाताळात गाडली गेलेली चीज आहे. तेव्हा अविनाशांच्या'अिमान-धर्माची'आपण कल्पनाच करू शकत नाही.

यासंदर्भात 'फुलवंती' ही अलिकडे दूरदर्शनवर गाजलेली मालिका जाणकारांच्या लक्षात येईल. त्यातील एका प्रसंगात, फुलवंती, वचनभंग करण्याच्या मन:स्थितीत असते, तेव्हा तिचा सारंगिया कळवळून म्हणतो ''बेटी, कलाकारकी जुबान ही असकी जान होती है।''

छोट्याशा भूमिकेतील हा सारंगिया रसिकांच्या स्मरणात राहिला. कारण तो साकार केला होता मा. अविनाशनी! तो सुध्दा वयाच्या ८४ व्या वर्षी.निवृत्ती पत्करलेली असतानाहि त्याना हे काम करावचं लागलं. कारण ते'घरचं'काम होतं ना? मंगेशकर मंडळींची ती मालिका होती. आलोकनाथ,ए. के. हनगल अशा मंडळींची 'टेस्ट' झाली होती; पण अुषा मंगेशकरांना जो 'सारंगिया' अभिप्रेत होता, तो त्यांच्यामध्ये मिळेना, म्हणून मग 'घरच्या' गणूमामाना आपल्या भाचीचा हट्ट पुरवावा लागला!

नव्वदीतून शंभरीकडे ताठ कण्याने वाटचाल करत असलेल्या मा. अविनाशना आणखी एका सांगलीकर अविनाशची ही वाङ्मयीन वंदना ! ●●●

# दान चिंतामणी राजमतीबाई पाटील

सुमारे ७०-८० वर्षांपूर्वीच्या काळात एकूण शिक्षणाचाच प्रसार कमी होता. आज शिक्षणसंस्था अुदंड झाल्या आहेत. सर्व थरातील मुलींना विनासायास, अगदी पदवीपर्यंतचे शिक्षण विनामूल्य मिळत आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळातील समाजमनाची नीटशी कल्पना आपल्याला येत नाही. मुलींनी शाळेत जाऊन मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेणे ही कल्पनाच त्याकाळी क्रांतिकारक वाटंत होती! अशा काळात जैन समाजातील एखाद्या स्त्रीने शाळेत जावे; शिकून आपल्या समाजातील स्त्रियांना शिकवण्यासाठी स्वत:ला वाहून घ्यावे, इतकेच काय, आपली सारी संपत्ती धार्मिक आणि शैक्षणिक कार्यासाठी दान करावी ही विलक्षणच गोष्ट म्हणावी लागेल.

अशी लोकविलक्षण स्त्री म्हणजे १९९८साली ज्या महिलेचा 'सांगली-भूषण' म्हणून जाहीरपणे गौरव करण्यात आला त्या 'दान-चिंतामणी' श्रीमती राजमतीबाई पाटील.

आज सांगलीच्या नेमिनाथनगरमध्ये कुणी सहज फेरफटका मारला आणि तेथील नेमिनाथमंदिर, राजमतीभवन आणि राजमती कॉम्प्लेक्स या अुत्तुंग, वास्तुशास्त्रदृष्ट्या अत्यंत देखण्या इमारती बघितल्या, तिथे चालणारे कार्य बघितले की या राजमतीबाईंच्या कार्यकर्तृत्वाची कल्पना येईल. पाच-पन्नास लाखांच्या या भव्य वास्तू जैन समाजातील एका महिलेने बांधवून घेतल्या आहेत या वस्तुस्थितीवर कोणाचा सहजासहजी विश्वासच बसणार नाही. सांगली मोठी करण्यासाठी अनेकानी अनेक कामे अुभी केली आहेत; अनेक प्रसंगी त्यासाठी शासन वा समाजाकडून पैसा अुभा केला गेला असेल पण राजमतीबाईंनी मात्र जे काही वैभव अुभे केले ते मात्र स्वत:च्या पैशातून. म्हणून त्याचे आगळे कौतुक आहे.

अशा या राजमतीबाईंचा जन्म, १७ मे १९१४ रोजी सांगलीजवळील समडोळी या गावी झाला. त्यांचे बालपण त्यांच्या जनकगृही म्हणजे जैनापूर येथेच गेले. पंचवीस-तीस जणांच्या एकत्र कुटुंबात त्या वाढल्या. केरवारा, धुणी, जनावरांना चारा-वैरण, पूजेची तयारी अशा नैमित्तिक कामात त्या तरबेज झाल्या. त्यांच्या मावशीचे यजमान जैन समाजातील सुधारक आणि स्त्री-शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या मुली शाळेला जात. ते पाहून आपणही शाळेत जावं असे छोट्या राजमतीच्या

मनाने घेतलं. त्यांचा हट्ट म्हणून त्याना जैनापूरच्या मुलांच्या शाळेत घालण्यात आले. त्यांची शिक्षणातील एकूण प्रगती बघून शाळेतील शिक्षक-मंडळीनी त्याना आणखी शिकवा अशी शिफारस केली.

पण घरच्या लोकांसमोर यक्षप्रश्न होता. तो असा की मुलांच्या शाळेत मुलीला जास्ती दिवस कसे ठेवायचे?

छोट्या राजमतीच्या सुदैवाने म्हणा वा शिक्षण घेण्याची तिची तीव्र अिच्छाशक्ती म्हणून म्हणा पण तिची अिच्छा फलद्रूप झाली.

त्यांचे मामा श्री. बाबगौंडा पाटील यानी त्यावेळी सांगलीत नुकतीच वकिली चालू केली होती. त्यानी राजमतीची शिक्षणाची अिच्छा बघून तिला सांगलीला आपल्या घरी आणलं. त्यावेळच्या सांगलीच्या वखारभागात श्रीमती कळंत्रेबाई यांनी नुकताच जैन महिलाश्रम सुरू केला होता. त्या आश्रमात राजमतीबाईंचे शिक्षण पुढे चालू झाले.

या मामांच्या घरी शिक्षणाचाच योग नव्हता तर विवाहयोगही होता!

पाटील वकिलांचे धाकटे बंधू श्री. नेमगोंडदादा यांच्याबरोबर राजमतीबाईंचा विवाह झाला. राज-नेमीचा संसार सुरू झाला.

१९३१च्या एप्रिलमध्ये राजमतीबाई सातारा केंद्रातून व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेत पहिल्या क्रमांकाने अुत्तीर्ण झाल्या. त्यावेळी सांगली-मिरजेच्या मुलींना या परिक्षेसाठी सातारा येथे जावे लागे.

जैन समाजात शिकणाऱ्या मुलींची संख्या कमी आणि त्यात एक मुलगी चक्क पहिली येते ही गोष्ट मोठी नवलाईची होती. त्यामुळे पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये जाऊन राजमतीने पुढील शिक्षण घ्यावे असे जैन समाजातील धुरिणाना वाटत होते. पण लग्न होऊन पुरा एक महिनापण झाला नव्हता, अशावेळी राजमतीबाईंच्या यजमानानी म्हणजे नेमगोंडदादांनी मनाचा मोठेपणा दाखवला. त्यामुळेच राजमतीबाई पुण्याच्या गव्हर्मेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर लेडीजमध्ये रीतसर प्रवेश घेऊ शकल्या. मिस् वाडिया या कडक शिस्तीच्या पार्शी महिला त्या कॉलेजच्या प्रिन्सिपॉल होत्या. प्रशासन कसं हाताळावं याचा जणू वस्तुपाठच राजमतीबाईंना तेथे मिळाला. त्या कॉलेजच्या वातावरणात त्यांची अुपजत पण सुप्त असलेली हस्तकलापण बहरून आली. बौद्धिक विषयांचा त्यानी झटून अभ्यास केला. परिणामी तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेत त्यांचा पहिला नंबर आला.

सांगलीला परत आल्यावर काही काळ त्यानी जैन महिलाश्रमात अध्यापनास

सुरुवात केली. अगदी अल्पावधीतच एक विद्यार्थिनीप्रिय शिक्षिका म्हणून त्या लोकप्रिय झाल्या. खरं म्हणजे त्या महिलाश्रमातच त्यांची कारकीर्द घडावयाची.

पण तसा योग नव्हता. सांगलीच्या राणीसाहेब, सरस्वतीदेवी स्त्री-शिक्षणाच्या मोठ्या पुरस्कर्त्या होत्या. सांगलीत स्थापन झालेल्या मुलींच्या दोन शाळा आणि महिला विद्यालय याकडे त्या जातीने लक्ष देत. राजमतीबाईंच्या अध्यापन-कौशल्याची कीर्ती त्यांच्या कानावर जाताच, त्यानी राजमतीबाईना आमच्या शाळेत काम करा अशी गळ घातली. घरातील सर्वांनी चर्चा केली. संस्थानी शाळेचा आणि मुलींची शाळा नं १ ही नावाजलेली शाळा, हुशार विद्यार्थिनींची शाळा, तिथे काम करण्यातील आव्हान या सर्व गोष्टींचा अनुभव घ्यावा आणि फावल्या वेळात त्या अनुभवाचा फायदा जैन महिलाश्रमास करुन द्यावा असा सर्वांचा निर्णय झाला. त्यानुसार राजमतीबाई १९३८ साली या मुलींच्या सरकारी शाळेत रुजू झाल्या आणि तिथं अितक्या रुळल्या की अखेरीस त्या शाळेतूनच मुख्याध्यापिका म्हणून राजमतीबाई निवृत्त झाल्या. या दीर्घ काळात त्यानी अक्षरश: तन मन आणि प्रसंगी धन वेचून त्या शाळेचे एखाद्या खाजगी आदर्श शाळेप्रमाणे संचालन केले. योगायोगाने त्यांची बालमैत्रिण सौ. इंदुमती टिळक या त्याना त्याच शाळेत सहाध्यायी म्हणून मिळाल्या. दोघीनी अपार कष्ट घेऊन, एकतानतेने काम करुन ही शाळा चांगलीच नावारुपाला आणली. शाळेचे परीक्षांचे निकाल अुत्तम लागतच; पण वक्तृत्व, चित्रकला, संगीत, नाट्य अशा सर्व सांस्कृतिक बाबतीत ही शाळा सांगलीत अग्रेसर राहिली. राजमतीबाईंची या शाळेच्या एकूण कामकाजावर एवढी जबरदस्त छाप पडली होती की मुलींची शाळा नं १ म्हणण्याऐवजी 'राजमतीबाईंची शाळा' असाच अुल्लेख सर्वांच्या तोंडी येऊ लागला!

सेवानिवृत्तीनंतर त्यानी पुन्हा जैन महिलाश्रमाच्या कामाला सुरुवात केली. आठ वर्षे त्यानी सेक्रेटरी म्हणून काम केले. हिंदमाता कन्झ्युमर्स सोसायटी या सरकारमान्य महिला धान्य (सहकारी) दुकानाच्या सतरा वर्षे त्या ऑनररी सेक्रेटरी होत्या. आश्रमात त्यानी महिलांचे भजनी मंडळ, धार्मिक परिक्षांचे वर्ग, महिलांसाठी पोथी वाचन असे अनेक अुपक्रम राबवले. बाल मंदिरापासून महाविद्यालयापर्यंत महिलांसाठी शाळा-कॉलेज विशिष्ट परंपरेने चालवणाऱ्या वुईमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीवर त्यानी आठ वर्षे काम केले. दक्षिण भारत जैन सभेच्या महिला विभागाशी त्यांचा निकटचा संबंध होता. दक्षिण भारत जैन महिला समाजाच्या बेळगाव अधिवेशनाच्या वेळी त्या स्वागताध्यक्षा होत्या तर रुकडीच्या अधिवेशनाच्या वेळी त्यानी अध्यक्षपदाची सूत्रे समर्थपणे सांभाळली होती.

दरम्यानच्या काळात त्यांचे पती श्री. नेमगौंडदादानी शैक्षणिक क्षेत्रात बरीच कामगिरी बजावली होती.त्यांचे थोरले बंधू बाबगोंडा पाटील जैन समाजाचे धुरीणत्व करत होतेच; खेरीज तत्कालीन सांगली संस्थानात ते अेक लोकनियुक्त मंत्री होते. जैन समाजाला बँकिंगचा आणि शिक्षणप्रसाराचा जणू मूलमंत्रच बाबगोंडा पाटील यानी दिला होता. म्हणून तर त्यानी रत्नाकर बँक आणि 'लठ्ठे एज्युकेशन सोसायटी' स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता.त्यांच्या निधनानंतर नेमगौंडदादानी लठ्ठे एज्युकेशनच्या कामाला पूर्णपणे वाहून घेतले. १९५६साली ते ऑनररी सेक्रेटरी झाले. कै. वसंतदादा पाटील आणि बॅ.जी. डी. पाटील यांच्या सहकार्याने त्यानी संस्थेची सर्वांगीण प्रगती केली. आर्ट्स, कॉमर्स आणि लॉ कॉलेज काढण्याचा धाडसी निर्णय घेतला. धडाक्याने बांधकाम सुरु करुन, टी.के. पाटील या कर्तृत्ववान अिंजिनीयर मित्राच्या सहाय्याने थोडक्या खर्चात पूर्ण केले. या सर्व कामांमध्ये नेमगौंडदादाना राजमतीबाईंची पूर्ण मदत असे. कामाच्या ताणामुळे म्हणा वा अन्य सदस्यांच्या विरोधामुळे नेमगौंडांना मनस्ताप होई, त्यांचा क्षोभ होई तेव्हा राजमतीबाई त्याना सांभाळून घेत; प्रसंगी पदरमोड करुन संस्थेला आर्थिक मदत करीत. ती अुभयता संस्थेच्या कार्याशी एवढी एकरूप झाली होती की त्या अुभयतानी एक महत्त्वाचा निर्णय घेतला.

त्यानी लठ्ठे एज्युकेशन सोसायटीलाच आपले दत्तक अपत्य मानायचे ठरविले. नाहीतरी त्या अुभयताना स्वत:चे अपत्य नव्हते.

जैन समाजातील परमपूज्य देशभूषण महाराज यांच्या अुपस्थितीतच नेमगोंडादादा आणि राजमतीबाईंनी आपली सर्व मालमत्ता लठ्ठे एज्युकेशन सोसायटी आणि बस्ती वगैरे धार्मिक गोष्टींसाठी देण्याचे व्रत घेतले.

केवढे हे विलक्षण औदार्य! महाराजानी नेमगोंडदादाना 'भाभाषा' ही सन्माननीय पदवी दिली.

पण दुर्दैवाने सततच्या कष्टांमुळे, शारीरिक, मानसिक त्रासामुळे नेमगौंडदादांचे प्रकृतीकडे दुर्लक्ष झाले. कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाने त्याना पूर्णपणे ग्रासले. मुंबईला टाटा हॉस्पिटलमध्ये फेऱ्या सुरू झाल्या. राजमतीबाईनी अपार कष्ट अुपसले. अनेक अुपास-तपास केले; पण काही अुपयोग झाला नाही. २८ फेब्रुवारी १९७३ रोजी कॅन्सरने नेमगौंडदादांचा अंत झाला.

विशिष्ट ध्येयवादाने सामाजिक कार्य करण्यात परस्पराना पूरक असलेली जोडपी समाजात असणे दुरापास्तच. त्यामुळेच नेमदौंडा-राजमती यासारख्या

जोडप्याचे अप्रूप.

माणसाला स्वत:साठी किती जमिनीची जरुरी आहे? टॉलस्टॉयच्या 'त्या' सुप्रसिध्द कथेवरुन राजमतीबाईनी स्वत:लाच हा प्रश्न विचारला असावा म्हणून तर त्यानी आपल्या पतीच्या अिच्छेनुरूप, थोडी थोडकी नव्हे तर पावणे दोन लाख चौरस फूट क्षेत्रफळाची जिराईत-बागाईत जमीन, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीस दिली. यातून जे तीन प्लॉटस् बाजूला ठेवलेले होते त्यावर नेमिनाथमंदिर, राजमतिभवन आणि राजमती कॉम्प्लेक्स अशा सांगली शहराच्या देखणेपणात भर टाकणाऱ्या भव्य वास्तू बांधल्या गेल्या. या नेमिनाथमंदिरामुळे विश्रामबागच्या बाजूला जी जैन वस्ती वाढली होती त्यांची सोय झाली एरवी बस्तीसाठी त्याना गावात यावे लागे. राजमती भवन हे तर आता मोठे सांस्कृतिक केंद्र झाले आहे.

राजमतीबाईंचे सर्वात मोठे काम म्हणजे त्यानी स्थापन केलेला 'श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील ट्रस्ट.' या ट्रस्टच्या माध्यमातून, बौद्धिक, तांत्रिक, कलात्मक शिक्षण देण्याची सोय अुपलब्ध करुन देणे किंवा अशा संस्थांना अर्थ सहाय्य करणे, विधवा, परित्यक्ता अशा गरजू महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी व्यवसाय केंद्र सुरू करणे, धार्मिक परीक्षांचे अभ्यासवर्ग, वाचनालय, योगासनवर्ग, संस्कार केंद्र, साहित्यिक, गुणवंत, कलावंत याना प्रोत्साहन देणे, गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी परदेश प्रवासासाठी सहाय्य करणे असे या ट्रस्टचे बहुविध अुद्देश आहेत. सामाजिक कार्यासाठी समर्पण वृत्तीने काम करणाऱ्या पुरुषांसाठी 'श्री.नेमगोंडा पाटील गौरव पुरस्कार' आणि महिलांसाठी (प्रत्येकी पाच हजारांचा) 'श्रीमती राजमती पाटील' पुरस्कार या ट्रस्टकडून दिले जातात.

ही सर्वंकष अुदिष्टे पाहून समाजाच्या सर्व स्तरांच्या विकासाचा हेतू यातून दिसून येतो. जैन समाजाच्या दृष्टीने शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक अुन्नतीसाठी या ट्रस्टमुळे एक व्यासपीठच अुपलब्ध झाले आहे. या ट्रस्टच्या पुढाकाराने पहिला 'कल्पद्रुम विधान समारंभ' संपन्न झाला. त्यावेळी सुमारे सातशे श्रावक-श्राविकांनी पूजाविधीमध्ये भाग घेतला होता. या ट्रस्टच्या पुढाकारानेच जैन मराठी साहित्य संमेलनाचे पाचवे अधिवेशन १९९०च्या डिसेंबरमध्ये सांगलीत प्रथमच आयोजित करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी श्रीमती राजमतीबाईंची निवड करण्यात आली होती. त्याप्रसंगी समयोचित भाषण करताना त्यानी सांगलीच्या आर्थिक राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक विकासात 'जैन समाजाचे केवढे मोठे योगदान आहे' हे विविध अुदाहरणांद्वारे दाखवून दिले; त्याचबरोबर मराठी भाषेत जैन साहित्याचा प्रसार कमी आहे या वस्तुस्थितीवर नेमके

बोट ठेवून, जैन समाजाचे, जैन संस्कृतीचे दर्शन घडविणारे साहित्य निर्माण करण्याचे आवाहन त्यावेळी राजमतीबाईंनी आपल्या भाषणातून केले होते.

वयाची ७५ वी अुलटल्यावर मात्र राजमतीबाईंची प्रकृती साथ देईनाशी झाली. रक्तदाब, गुडघेदुखी या व्याधी त्याना त्रास देऊ लागल्या. त्यातच राजमतीबाईंचे धार्मिक आचरण अत्यंत कडक.अंगात ताप असताना सुध्दा त्यांचे अुपास-तापास चालूच असत. या बाबतीत आपल्या जवळच्या नातेवाईकांचेच काय पण डॉक्टर मंडळींचेहि त्या ऐकत नाहीत. या अति कष्टांमुळेच कदाचित त्याना ऑक्टोबर ८९ मध्ये हृदयविकाराचा तीव्र झटका आला. मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये बरेच दिवस अुपचार घ्यावे लागले. अखेरीस पेस-मेकर बसविल्यावर त्यांच्या प्रकृतीस थोडा आराम पडला. पण त्यानंतर त्यांच्या नैमित्तिक कार्यात मात्र खंड पडला. आपल्या कामाचे बहुतेक सर्व व्याप त्यानी आता कमी केले आहेत.

राजमतीबाईंचा एकच् एक गुणविशेष सांगा असा कोणी प्रश्न केला तर त्याचे एकमेव अुत्तर म्हणजे त्यांच्या मनाचा कनवाळूपणा. मिरज मिशनमध्ये स्वत: दुखण्याने जर्जर झालेल्या असतानासुध्दा एका गरीब रुग्णाची पीडा पाहून त्यांचा जीव कळवळला. त्याला पेस-मेकर बसवण्यासाठी १६,००० रुपयांची आवश्यकता आहे तरच त्याचा प्राण वाचेल हे कळल्यावर, स्वत:च्या शुश्रुषेला असलेल्या माणसाला, ताबडतोबीने सांगलीला पाठवून त्यानी त्या अनोळखी तरुणासाठी पैशाची व्यवस्था केली.

बघा म्हणजे तो तरुण अनोळखी पण त्याची पीडा मात्र बाईंच्या कनवाळू मनाला 'ओळखीची' वाटली!

याच करुणेपोटी जैन समाजामधील तीस-पस्तीस गरीब बंधू-भगिनींना त्यानी स्वत:च्या खर्चाने श्री सम्मेतशिखरजीची यात्रा घडवून आणली. या दानशूरतेमुळेच श्रीक्षेत्र श्रवणबेळगोळ येथील पूज्य श्रीचारूकीर्ती महाराजानी, त्याना 'दान चिंतामणी' ही श्रेष्ठ पदवी आणि मानपत्र दिले.

त्यांच्या या दातृत्वाचा आणि एकूणच सामाजिक कार्याचा गौरव म्हणून सुप्रसिध्द वक्ते आणि लेखक श्री. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते १९९८ मध्ये जाहीर सभेत त्याना मानपत्र अर्पण करण्यात आले आणि त्याना 'सांगली-भूषण' हा किताब देण्यात आला.

(नुकतेच ३१ डिसेंबर २००१ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.)

●●●

# कथाकार श्री. दा. पानवलकर

'हंस' व 'मोहिनी' मासिकांचे संपादक श्री.आनंद अंतरकर यानी केलेले एका व्यक्तीचे वर्णन पहा.

''सावळा ग्रॅनाईट वर्ण. सहा फुटांच्या आसपास अुंची.भव्य भालप्रदेश. कृष्णाकाठची कमावलेली कणखर शरीरयष्टी. तांबूस-पिवळी झाक असलेले डोळे. पिंगट पारदर्शी बाहुल्या, खोलवर ठाव घेणारी भेदक नजर. गरूडतीक्ष्ण धार त्या नजरेत अुतरलेली.'आठा'च्या आकड्यासारखं नाक. त्याखाली गालांत टोकं रुतणारी तलवार कट् मिशी. इंग्रजी 'डब्ल्यू'सारखी खड्डा पडलेली हनुवटी. ही दुबेळकी हनुवटीही पहाणाऱ्याकडे टवकारून बघायची. जरबेच्या भाषेत बोलायची. चेहेऱ्यांच्या स्नायूंवर, जीवनानंद दिलेल्या कष्टदानाच्या जागोजागी दृढ गाठी बांधलेल्या. हसणंही मेटॅलिक. नजर बांधून टाकणारं बेछूट, मर्दानी व्यक्तिमत्व.''

या वर्णनावरून हे एखाद्या लेखकाचं, त्यातही, सांगलीकडील लेखकाचं वर्णन असेल, असं वाटतं तरी का?पण तो खरोखरीच एक लेखक होता; तो सुध्दा सांगलीचा.

त्याचं नाव श्री. दा. पानवलकर.

१९६० ते १९८५ या पाव शतकातले एक जबरदस्त सामर्थ्याचे कथाकार म्हणून, ज्यांचं आवर्जून नाव घेतलं जातं ते पानवलकर.

सांगलीसारख्या गावात, आणि मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात जन्मलेला हा माणूस, वृत्तीने एवढा कलंदर, बेछूट आणि बेदरकार होता की अर्नेस्ट हेमिंग्वेसारख्या एखाद्या पाश्चात्य लेखकाचीच आठवण व्हावी!

पण ही वृत्ती कदाचित् त्यांच्या नोकरीच्या स्वरुपावरून आलेली असावी. पानवलकर कस्टम ऑफिसर होते. काळे धंदे करणाऱ्या स्मगलर्सना, वेळप्रसंगी कंबरड्यात लाथ घालून, ड्युटी चुकवून लपवलेला माल ओकावयाला लावणारे, ते एक करडे कस्टम ऑफिसर होते. एक लेखक म्हणून त्यांचे कथावाङ्मयसुद्धा एखाद्या अस्सल कस्टम ऑफिसरसारखेच होते. मानवी जीवनात, मानवी वर्तनात जे

जे 'लपते' आहे त्याचा कसून 'शोध' घेणारे!

अशा या पानवलकरांचा जन्म,१३ फेब्रूवारी १९२६ रोजी सांगलीत झाला. फार श्रीमंत नाही पण खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या, पानवलकर कुटुंबात या श्रीकृष्ण दामोदर पानवलकर यांचं बालपण व्यतीत झालं.पाच-सहा भावंडांच्या कुटुंबामधील श्री.दा. हे नंबर दोनचे. त्यांचे वडील सांगली संस्थानामध्ये मुलकी अधिकारी होते. त्यांचं प्राथमिक शिक्षण सांगलीच्या शाळा क्र.२ मध्ये झालं तर माध्यमिक शिक्षण सिटी हायस्कूलमध्ये झालं. जवळच असणाऱ्या कृष्णा नदीचं, त्याकाळी वारंवार येणाऱ्या महापुराचं आकर्षण श्री.दा.ना.होतं. तसंच तिथं असणाऱ्या तालमीचं पण होतं. सिटी हायस्कूलमधील हुशार विद्यार्थ्यांमध्ये त्यांची गणना होत असे. मात्र त्यांच्यावर खरा प्रभाव होता तो केशवराव दीक्षित या नामवंत संस्कृत शिक्षकाचा.त्यानी'जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती' मिळवणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांची परंपराच सांगलीत निर्माण केली होती.पानवलकर हे दीक्षितांच्या आवडत्या विद्यार्थ्यांपैकी एक होते. अितके की पानवलकर मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी आजारी असताना, ते स्वत: घरी येऊन त्यांचा संस्कृतचा अभ्यास घेत.त्यानी श्री.दां.ची या शिष्यवृत्तीसाठी खूप तयारी करुन घेतली होती. थोड्या फरकाने ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती श्री.दा. मिळवू शकले नाहीत पण दुसऱ्या क्रमांकाची अकबरनवीस ही शिष्यवृत्ती त्याना मिळाली. या निमित्ताने केलेला संस्कृतचा अभ्यास मात्र त्याना लेखक म्हणून अत्यंत अुपयुक्त ठरला. संस्कृत वाङ्मयातील अनेक विलक्षण कल्पनांचा परिपोष पानवलकरानी आपल्या अनेक कथांमधून केलेला आहे.

पण शालेय जीवनातील पानवलकरांची सुखकारी मार्गक्रमणा अचानकपणे संपुष्टात आली. ते शिकत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. हा एकूण कुटुंबावर आणि व्यक्तिश: पानवलकरांवर मोठाच घाला होता. कारण पाठोपाठच त्यांचा थोरला भाऊ, ऐन तारुण्यात वयाच्या. २१ व्या वर्षीच गेला.त्यामुळे मॅट्रिक झाल्यावर, कुटुंबाची मोठी जबाबदारी त्यांच्या शिरावर पडली. धाकटी चार भावंडे आणि विधवा आई यांची अुपजीविका करण्यासाठी कुठं तरी नोकरी करणं त्याना क्रमप्राप्त होतं. एरवी कॉलेजात जाऊन ते संस्कृतचे प्राध्यापक झाले असते.

त्या दरम्यानच, सांगली संस्थानात तंबाखूसाठी अबकारी खाते अुघडण्यात आले होते. पुण्यात गाजलेल्या 'रविकिरण मंडळा' चे एक सदस्य श्री.द.ल. गोखले हे या खात्यात अधिकारी होते. त्यांना पानवलकरांची हुशारी आणि कौटुंबिक जबाबदारी याची जाणीव होती.त्यानी या अबकारी खात्यात पानवलकरांची नेमणूक केली. त्यामुळे घरची जबाबदारी ते यथासांग पेलू शकले. जयसिंगपूर, कोल्हापूर,

सातारा अशा ठिकाणी त्याना नोकरीनिमित्त जावे लागले. पुढे या अबकारी खात्याची काही नोकरमंडळी कस्टमखात्याकडे पाठवण्यात आली. त्यामुळे पानवलकर १९४९ मध्ये मुंबईला गेले.

कस्टममध्ये गेल्यापासून पानवलकरांचा जीवनक्रमच बदलून गेला. घरच्या जबाबदाऱ्यांच्या जाणीवेमुळे त्यानी लग्न केले नाही. जेमतेम १५वर्षाचे असताना पितृछत्र हरपले आणि ऐन पंचवीशीतच ते मातृछत्राला पारखे झाले. त्यामुळे अधिकारवाणीने त्यांच्यामागे लग्नाचा तगादा लावणारे कोणी नव्हते. कस्टममधील नोकरीचे स्वरूप असे होते की वेळच्या वेळी घरी परतणे, जेवणे वगैरे गोष्टी अशक्य होत्या. सुरुवातीला माधवाश्रम, नंतर नॅशनल हॉस्टेल, अशा ठिकाणी पानवलकर खोली घेऊन रहात. खानावळीचं जेवण किंवा डबा असा प्रकार असायचा. त्यामुळे मुक्त, स्वच्छंदी जीवनाची त्याना सवय लागली. सवयीने तेच जीवन आवडू लागले! आयुष्यभर कमी-अधिक फरकानं असाच जीवनक्रम राहिला. तरुण वयात शरीर साथ देत होतं. पन्नाशी अुलटल्यावर मात्र अनेक तक्रारी सुरु झाल्या. एकटेच रहात असल्याने प्रकृतीत होणारे बारीक-सारीक चढउतार कुणाच्या लक्षात येणे शक्य नव्हते. आजारी पडल्यावर एकटेच हॉस्पिटलमध्ये जाऊन ॲडमिट होत. सांगलीच्या भावंडांना कधी कधी या प्रकारांची कल्पनाही नसे. प्रकृतीच्या कारणामुळेच पानवलकरानी मुदतीपूर्वी नोकरीतून निवृत्ती घेतली. कावीळ झाली होती. मुंबईत सरकारी हॉस्पिटलमध्ये अुपचार घेतले. पानवलकरांचा,मित्रमंडळींचा फार मोठा गोतावळा नव्हताच. त्यांच्यावर निस्सीम प्रेम असणाऱ्या काही मित्रांनी, त्याना सरकारी हॉस्पिटल मधून दादरच्या 'शुश्रुषा' या प्रख्यात खाजगी रुग्णालयात ठेवलं. तेथील अुपचारांमुळे प्रकृती पुष्कळशी सुधारली. पायावरची सूज अुतरली.जखम भरत आली. धूसर झालेली स्मरणशक्ती पूर्ववत् झाली. आपल्या पायांनी ते हॉस्पिटलमधून फिरू लागले. विश्रांतीसाठी त्यांचे बंधू-भावजय त्याना सांगलीत घेऊन आले. पण त्यानंतर पुन्हा प्रकृती खालावतच गेली. दादरच्या 'शुश्रुषा' मध्ये झालेली सुधारणा म्हणजे दिवा विझण्यापूर्वी मोठा व्हावा, अशातला प्रकार होता.

अखेर १९ ऑगस्ट १९८५ रोजी सांगलीत, आपल्या घरीं, आपल्या जन्मगावीच, वयाच्या ५९ व्या वर्षी त्यांचं निधन झालं.

ही झाली त्यांची छोटीशी लौकिक जीवनकथा. त्यांची वाङ्मयीन जीवनकथा मात्र फार मोठी आहे, विलक्षण आहे. त्यांच्या लेखनात इतका वेगळेपणा, इतकी अुंची कशी आली होती हा एक अभ्यासाचाच विषय व्हावा इतकं त्यांचं लेखन आशयघन आहे. वाङ्मयाच्या अभ्यासकालाच असा शोध घेणे शक्य आहे. मात्र

वाङ्मयात साधारण रुचि असणाऱ्या वाचकाने ज्येष्ठ समीक्षक प्रा.म.द. हातकणंगलेकर यानी संपादित केलेलं ''श्री.दा.पानवलकर यांची कथा'' हे पुस्तक आणि त्यानीच श्री.जया दडकर यांजबरोबर संपादित केलेलं ''श्रीदा पानवलकर'' अशी दोन पुस्तके वाचली तरी 'श्रीदा' ही काय विलक्षण 'चीज'होती याची कल्पना येईल.

एरवी सर्वसामान्य माणसाला, पानवलकर म्हणजे ज्यांच्या कथेवर'अर्धसत्य'हा गाजलेला चित्रपट निघाला ते पानवलकर एवढीच त्यांची ओळख असते.

पानवलकरांची वाङमयीन जीवनकथा साधारणपणे १९५०च्या आसपास सुरु झाली; म्हणजे नोकरीनिमित्ताने सांगली सोडून मुंबईत आल्यानंतर. वास्तविक लेखनाकडे वळावं अशी पार्श्वभूमी घरात नव्हती. कदाचित संस्कृत भाषेच्या अध्ययनाने लिहिण्याची अूर्मी त्यांच्यात निर्माण झाली असावी. जातिवंत कथाकार त्यांच्यात अुपजतच असावा. साधीसुधी घटना सांगतानासुद्धा, पानवलकर अशी काही रंगवून सांगत की ऐकणाऱ्याला आपण एखादी कथा ऐकतोय असाच भास व्हावा. मुंबईहून सांगलीला ते नोकरीच्या कालखंडात, भावंडाना भेटावयास आणि घरगुती कामासंबंधात येत. वाटेत कधी अुशीर झाला तर एस. टी, घाटाच्या ट्रॅफिकमध्ये कशी अडकली किंवा ड्रायव्हर कसा रड्या होता, यासारख्या क्षुल्लक गोष्टीसुद्धा, एखादी चटकदार कथा सांगावी अशा थाटात पानवलकर रंगवून सांगत. विलक्षण अनुभवाना सामोरं जाताना, त्या त्या घटनेतील थरार, नाट्य त्याना लोभवून जाई. सांगली सोडून मुंबईत नोकरीनिमित्तानं वास्तव्य करावं लागलं, तरी त्यांची सांगलीशी असलेली नाळ कधीच तुटली नाही. सांगलीत आल्यावर, नातेवाईक, मित्रमंडळी यांच्या गाठीभेटीबरोबरच, ते हौसेने आमराईत जात, तात्यासाहेबांच्या मळ्यात जात आणि तिथल्या नीरव शांततेचा अनुभव घेत. त्यांच्या लहानपणी सांगलीत फूटबाल, क्रिकेटचे वेड मोठ्या प्रमाणावर होते. पानवलकर स्वत: या दोन्ही खेळांचे भोक्ते होते. फूटबॉलचे सामने राजवाड्यातील पटांगणात होत. त्या दंगली पाहूनच आणि त्या खेळातील एक विलक्षण खेळाडू पाहूनच पुढे पानवलकरानी 'बक् अप रावण' ही कथा लिहिली. त्यांच्या लहानपणी, त्यानी सांगलीत अनेक कलंदर व्यक्तिमत्त्वे बघितली. त्या काळच्या सनातनी वातावरणात परजातीतील स्त्री बरोबर लग्न करणारा, हॉटेल काढून, त्यामध्ये मांसाहारी पदार्थ बेधडकपणे ठेवणारा, धाडसी, बेदरकार वृत्ती असणारा, एक बेछूट वृत्तीचा ब्राह्मण, पानवलकरानी बघितला होता. त्या व्यक्तिमत्त्वाला त्यांनी त्यांच्या कथेत चपलखपणे आणलं आहे. सांगलीच्या संस्थानी वातावरणाच्या संदर्भातील, त्यांची 'श्रीमंतांचा वस्तरा'ही कथा गाजली होती. ज्या त्यांच्या 'सूर्य' कथेवरून 'अर्धसत्य' हा हिंदी चित्रपट गाजला, त्यातील करडा पोलिस इन्स्पेक्टर, सांगलीच्या संस्थानी काळात, त्याना जवळून बघायला मिळाला होता. सांगली-हरिपूरच्या देवळातील पूजा-अर्चा,

धीरगंभीर वातावरण, नदीकाठ, घाटाच्या पायऱ्या, असं बालपणात बघितलेलं जीवन, त्यांच्या 'हुंकार' सारख्या कथांमधून प्रत्ययकारीपणानं प्रकटलेलं आहे.

एवंच काय, पानवलकरांच्या वाङमयीन जीवनकथेचा प्रारंभ, जरी ते मुंबईला गेल्यावर झाला असला, तरी त्यांची मानसिक जडण-घडण सांगलीतच झाली होती. सांगलीच्या शालेय जीवनात, केशवराव दीक्षित यांजसारख्या मातब्बर संस्कृत पंडितांकडे केलेलं संस्कृतचं अध्ययन त्याना आयुष्यभर पुरलं. नोकरीत सुस्थिर होण्यापूर्वी काही काळ ते संस्कृतच्या शिकवण्या करुन अुदरनिर्वाह करीत.

पानवलकरांना जसा सांगलीचा वारसा, वाङमयीन जीवनात अुपयोगी पडला तसं मोठं 'घबाड' त्याना कस्टमच्या नोकरीत मिळालं! त्यांच्या कथांची अनेक पात्रे आपसूक त्यांच्याकडे चालत आली. या नोकरीत आडमाप आयुष्य जगणारी, अनेक राकट, रासवट, दणकट तशीच खबरदार चलाख माणसं, त्याना जवळून अनुभवायला मिळाली. नोकरीत त्याना मिळालेलं हे घबाड कथालेखनासाठी फार अुपकारक ठरलं. अर्थात कस्टममध्ये अनेक लोक असतात; पण अशा अनुभवांना शब्दबद्ध करुन वाङ्मयात चिरंतन करण्याचं सामर्थ्य असणारा एखादाच म्हणून तर पानवलकरांचं कौतुक.

याबरोबरच पानवलकरांना त्यांची स्वत:ची कलासक्त वृत्ती, लेखक म्हणून सुप्रतिष्ठित करायला अत्यंत अुपकारक झाली. त्याना अभिजात संगीताची आवड होती. अनेक मैफली ऐकून, त्यानी नुसतीच आपली श्रवणभक्ती जोपासली नाही तर शास्त्रीय संगीतातील बारकावे जाणून ते शब्दबध्द करण्याचे सामर्थ्य अंगी बाणवलं; त्यामुळेच त्यांच्या आवडत्या कुमार गंधर्वावर ते 'शंकरा' सारखा लेख, अधिकारवाणीनं लिहू शकले. इंद्राणी रहमानच्या नृत्याचा कार्यक्रम बघून, त्या बेहोशीतच,'एका नृत्याचा जन्म'यासारख्या विलक्षण कल्पना-विलास असणाऱ्या त्यांच्या कथेचा जन्म झाला. पानवलकराना क्रिकेटचं-फुटबॉलचं पण वेड होतं. ब्रॅडमनसारखा विश्वविख्यात खेळाडू त्याच्या ऑस्ट्रेलिया-इंग्लंड अशा प्रवासकाळात काही तासच मुंबईच्या विमानतळावर थांबणार होता. तेव्हा त्याला नुसतं काचेतून बघण्यासाठी, पानवलकरानी जिवाचा केवढा आटापिटा केला होता! अशा विविध प्रकारच्या आवडींमुळे, पानवलकरांमधील ललित लेखक चांगला जोपासला जात होता.

पानवलकरांची पहिली कथा 'कवी आणि बादशहा,' १९५० च्या सप्टेंबरमध्ये 'महाराष्ट्र' मध्ये प्रसिध्द झाली होती. कदाचित् त्याच्या पूर्वी लिहिलेल्या, पण अप्रकाशित राहिलेल्या अशा काही कथा असतीलही.

पानवलकरांचे कथासंग्रह १९६३नंतर प्रकाशित झाले.'गजगा,' औदुंबर,' 'सूर्य,'

'एका नृत्याचा जन्म', 'चिनाब' आणि 'जांभूळ' असे त्यांचे सहा कथासंग्रह १९६३ ते १९८१ च्या दरम्यान प्रसिद्ध झाले. त्यांमध्ये त्यांच्या एकूण ७७ कथा आल्या आहेत. औदुंबर, सूर्य आणि चिनाब या तीन कथासंग्रहांना महाराष्ट्र राज्य पारितोषिके मिळाली होती. 'अभिरूचि'ने १९६६ मध्ये आयोजित केलेल्या कथास्पर्धेत, त्यांच्या 'सूर्य' या कथेला दुसरे बक्षिस मिळाले होते. त्याच कथेवर 'अर्धसत्य' हा हिंदीमध्ये गाजलेला चित्रपट निघाला. कथेचा चित्रपट होईपर्यंत जे जे म्हणून पानवलकरांच्या अनुभवास आले त्यावर आधारित ललित लेखन त्यानी 'शूटिंग' या पुस्तकात केले आहे. हे त्यांच्या जीवनातील प्रकाशित झालेले शेवटचे पुस्तक. याखेरीज लेख, चर्चा, एकांकिका अशा स्वरूपाचे स्फुट लेखन पानवलकरानी महाराष्ट्र टाइम्स, किर्लोस्कर, ललित, सत्यकथा, लोकसत्ता आदि नियतकालिकांमधून केलं होतं. नाटक, एकांकिका, कादंबरी, काव्य या अितर साहित्य प्रकारांमध्ये त्यानी फारशी मुशाफिरी केली नाही. त्यांची एक एकांकिका (खबर) सत्यकथेत प्रसिद्ध झाली होती. नाना फडणीस यांच्या जीवनावर नाटक लिहण्याचे त्यांच्या मनात होते. पण तो मनसुबा कागदावरच राहिला. मात्र त्यांच्या एकूण लेखनशैलीला, कादंबरीचा फॉर्म चांगला हाताळता येईल असे अनेकाना वाटे. सुप्रसिध्द नाटककार विजय तेंडूलकर, ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर, प्रा. श्री. पु.भागवत यासारख्या त्यांच्या चाहत्या मित्रांनी, पानवलकराना वेळोवेळी कादंबरी लेखनाचा आग्रह केला होता. खुद्द पानवलकरानी एका कादंबरीचा आराखडा मनाशी निश्चित केला होताच. सांगली संस्थानच्या राजघराण्यातील अंतर्गत घडामोडींची त्याना चांगली माहिती होती. त्या विषयावर ते लिहिणार होते. ही कादंबरी पुरी झाली असती तर त्यांच्या सर्व लेखनगुणांचे सम्यक दर्शन त्यामध्ये झाले असते.

शिक्षकी वा प्राध्यापकी पेशामध्ये नसतानाही, पानवलकरानी आपलं साहित्यप्रेम जागृत ठेवलं. स्वत:मधील लेखक सजग ठेवला हा त्यांच्या गौरवाचा भाग आहे. वाङ्मयाशी अर्थाअर्थी काही संबंध नसलेल्या कस्टम खात्यात नोकरी करुन त्यानी दर्जेदार कथा लिहिल्या ही गोष्ट विलक्षण आहे. संस्कृत भाषेवरील प्रभुत्वामुळे, त्या भाषेतील खजिना त्यानी धुंडाळला असेलच, पण साध्या एस. टी. च्या प्रवासातसुद्धा त्यांच्यामधील लेखक जागा असे. अशा एका प्रवासात दोन खेडुतांचा चाललेला संवाद ते लक्षपूर्वक ऐकत होते. एकजण दुसऱ्याला आपल्या कर्मकटकटी सांगताना म्हणाला, ''गेल्या महिन्यात कुणाचं पैसं येळेवर आलं न्हाई. आपली देणी तर चुकत न्हाईत. इचार करुन करुन पार कल्हई झाली डोस्क्याची.'' पानवलकरानी मनाशी लागलीच नोंद केली की चिंतातूर परिस्थितीला नाव 'डोक्याची कल्हई'!. मुंबईतील माथाडी कामगार एकमेकांत शिवीगाळ करत भांडत असत, तेव्हा पानवलकर लक्षपूर्वक

त्या 'शिव्या' ऐकून ठेवत. भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासंदर्भात ते एकदा म्हणाले होते की ''शरीरासारखी भाषा कमवावी लागते, गोटीबंद करावी लागते. कथा लिहायची म्हणजे शब्दांची ताकद फार हवी. नेमक्या शब्दात तुम्हाला वजन पकडायला लागतं. डोक्याचं भुस्कट पडतं.''

त्यांच्या कथावैशिष्ट्यांचा अुहापोह करण्याची ही जागा नव्हे मात्र अधिक जिज्ञासा असणाऱ्यानी वर अुल्लेख आलेली दोन पुस्तके अवश्य वाचून पहावीत. पानवलकरांविषयी प्रा. म. वा. धोंड यानी असं म्हटलयं की ''त्यांचा डोळा म्हणजे सिनेकॅमेराची लेन्सच. एखाद्या घटनेचे ते कथन करत नाहीत तर चित्रण करतात.'' त्यांच्या कथेवरून 'अर्धसत्य' हा चित्रपट निर्माण झाला. पानवलकराना तेव्हा १९८४ चे अुत्कृष्ट कथेचे फिल्मफेअर पारितोषिक मिळाले. प्रसिद्धिच्या झोतात असतानाच, दुर्दैवाने प्रकृती खालावत जाऊन त्यांचे १९८५मध्येच दुःखद निधन झाले. त्यांच्या काही अप्रकाशित कथा, ललित लेख, अलिकडेच 'मौज'प्रकाशनाने 'कांचन' आणि 'संजारी' या पुस्तकांद्वारे प्रकाशित केले आहेत. त्यांची स्मृती कायमस्वरूपी जतन करण्याच्या हेतूने, त्यांच्या चाहत्यांनी 'श्री.दा.पानवलकर स्मृति-कथा पुरस्कार' ठेवलेला आहे. गेली १३-१४ वर्षे मराठी कथाकारास हा पुरस्कार दिला जातो. या स्पर्धेचे नियोजन सुरुवातीला साहित्य परिषद्, सांगली करत असे; नंतर हे काम सांगली (जिल्हा) नगरवाचनालयातर्फे केले जात आहे.

एका महान कथाकाराची ही छोटीशी कथा!

●●●

# सय्यद अमीन - एक सालस व्यक्तिमत्व

बाबरी मशीद, मुंबईतील बॉंब-स्फोट मालिका, त्यावेळी अुसळलेल्या भयानक दंगली, हिंदु-मुसलमान समाजातील कधीच नष्ट होणार नाही असं वाटावयाला लावणारी तेढ, हे सारं बघितलं की सांगलीत होऊन गेलेल्या एका संत प्रवृत्तीच्या विभूतीची आठवण येते. हिंदू-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार, त्या व्यक्तीने आपल्या वाणीने आणि लेखणीने, आयुष्यभर केला. त्या सत्पुरुषाचे नाव सय्यद अमीन. पैगंबरवासी सय्यद अहंमद अमीन यांचा जन्म १९०५ सालचा. त्यांचे शालेय शिक्षण सांगली हायस्कूलमध्ये झाले. अमीनसाहेबांच्या भाषणात, लेखनात, अनेक संस्कृत अवतरणे येत. ठायीठायी त्यांचे संस्कृत भाषेतील प्रभुत्व दिसून येई त्याचे मूळ या शालेय शिक्षणात आढळते. त्या हायस्कूलमधील नामांकित संस्कृत शिक्षक कै. श्रीपादशास्त्री देवधर यांचे ते आवडते विद्यार्थी होते. अमीनसाहेबानी त्यांचे हे ऋण जागोजागी सांगितले आहे. आपले पुस्तक त्यांच्या स्मृतीस कृतज्ञतापूर्वक अर्पण केले आहे. पुढे कॉलेजशिक्षणासाठी अमीनसाहेब सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात दाखल झाले. तो काळ पारतंत्र्याचा होता. अितर अनेक तरुणांप्रमाणे त्यानाही स्वातंत्र्याची आस लागली होंती. त्यापोटी अमीनसाहेबानी, शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्यसंग्रामात अुडी घेतली. शिक्षण अर्धवट राहिले तरी आयुष्यभर त्यांचा व्यासंग चालूच होता.

अमीनसाहेबांची सामाजिक कार्याची तळमळ बघून, संस्थानी काळात, त्याना सांगली म्युनिसिपालिटीचे लोकनियुक्त सदस्यत्व, १९३६ ते १९३९ या काळात दिले गेले होते. १९४९ ते १९५२ या काळात ते मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सदस्य होते. १९५४ ते १९६२ या दरम्यान ते पुणे विद्यापीठ कोर्टाचे सदस्य होते. मराठी साहित्य परिषदेचे ते कार्यकारी सदस्य होते तसे पी.ई.एन. (पेन) या आंतरराष्ट्रीय लेखक संघाचेही ते सभासद होते. अखिल भारतीय कॉंग्रेसचे ते २५ वर्षे क्रियाशील सदस्य होते. वसंतदादा पाटील यांच्याबरोबर त्यांचा चांगला स्नेह होता. तथापि त्यानी राजकारण फार कमी केले. त्यांचा अधिक ओढा समाजकारणाकडे होता. अनेक मानाची पदे भूषवूनही ते स्वतः कमलपत्राप्रमाणे राहिले. कोणत्याही गोष्टीचा वैयक्तिक लाभ अुठवावा ही त्यांची वृत्तीच नव्हती, अन्यथा अनेक संधी त्याना अुपलब्ध होत्या. लक्ष्मीची अुपासना करण्यापेक्षा, सरस्वतीची आराधना करण्यातच

त्यानी आनंद मानला. नेहरू सदरा, पायजमा आणि गांधी टोपी हा त्यांचा कायमस्वरूपी पोशाख असे. आपल्या साध्या, वाकून जावे लागणाऱ्या साध्या घरातच, त्यानी संपूर्ण आयुष्य हसतखेळत व्यतीत केले.

तथापि त्यांनी फार मोठे वैभव प्राप्त केले ते साहित्यलक्ष्मीचे. साहित्यसेवेतून समाजकारण हे ब्रीदवाक्यच त्यानी बहुधा स्वतःच्या मनावर कोरले असावे. त्यांची एकूण १६ पुस्तके प्रकाशित झाली. संशोधनात्मक चरित्रे आणि चिंतनीय धार्मिक साहित्य अशी मराठी साहित्याला त्यांची मोलाची देणगी आहे. मुस्लिम म्हणवणाऱ्या अनेकांना अुर्दूचे ज्ञान नसते, तेव्हा इस्लाम धर्माची ओळख यथार्थपणे त्याना व्हावी, त्याचबरोबर रोजच्या रोज ज्यांच्यांशी संबंध येतो, त्या बिगर-मुस्लिमानाही व्हावी, या हेतूने त्यानी जाणीपूर्वक मराठी भाषेत आपले लेखन केले. 'इस्लाम', 'इस्लाम आणि नीतिशास्त्र' 'इस्लाम आणि संस्कृती' अशा त्यांच्या पुस्तकांमुळे, इस्लामधर्माची चांगली ओळख, त्यांच्या ज्ञातिबांधवांना, तशीच इतरजनांनाही झाली. त्यांच्या अवतीभोवती वावरणाऱ्या दोन्ही जमातीमधील समज-गैरसमज, अमीनसाहेबाना चांगले माहित असल्यामुळे, त्यानी, ''हिंदु मुस्लिमांचा सांस्कृतिक मिलाफ'' हा समतोल विचारांचा ग्रंथ लिहिला. अमीनसाहेब खऱ्या अर्थाने, एक सच्चे धार्मिक मुसलमान होते. आपल्या धर्माचा त्याना रास्त अभिमान होता. त्याचबरोबर हिंदू धर्मातील अुच्च सांस्कृतिक मूल्यांचे त्याना प्रेम होते. असेच शुद्ध प्रेम आपल्या बांधवानाही वाटावे म्हणून 'प्राचीन भारतीय संस्कृति' हा ग्रंथ त्यानी लिहिला. या पुस्तकाचे विचारवंतांकडून खूप स्वागत झाले. शिवाजी विद्यापीठाने तर आपल्या अभ्यासक्रमात त्याचा अंतर्भाव केला. हिंदु-मुस्लिमाना, परस्परांमधील चांगल्या गोष्टी कळाव्यात म्हणून अमीनसाहेबानी, 'ऐतिहासिक हिंदी मुसलमान', 'प्रसिद्ध हिंदी मुसलमान,' 'भारतीय शूर स्त्रिया' अशी पुस्तके लिहिली. याव्यतिरिक्त त्यानी लिहिलेली 'अतातुर्क कमाल पाशा', 'हजरत महंमद पैगंबर', 'सम्राट अकबर' ही चरित्रे खूप लोकप्रिय झाली. याहून अमीनसाहेबांचे कौतुक म्हणजे त्यानी लिहिलेले 'महापुरुष छत्रपती शिवाजी' हे चरित्र! त्यांच्या थोरवीचा वेधक परिचय करुन देत, ज्या धर्मनिरपेक्षतेने त्यानी राज्य केले, दोन्ही, हिंदू-मुस्लिम जमातीना समान वागणूक दिली, मंदिराबरोबरच मशिदीला संरक्षण दिले, या गोष्टी अधिक परिणामकारकतेने अमीनसाहेबानी सांगितल्या आहेत. साधी पण वेधक, रसाळ भाषा, समतोल विचारसरणी, अभ्यासू वृत्ती ही अमीनसाहेबांची लेखन-वैशिष्ट्ये होती. त्यांच्या अनेक पुस्तकांना पारितोषिके मिळाली. त्यांचे आणखी कौतुक म्हणजे ही सगळी पुस्तके त्यानी कुणा प्रकाशकाच्या मागे न लागता, स्वतः कष्टपूर्वक प्रकाशित केली. वरील सर्व पुस्तकांची निर्मिती विशिष्ट ध्येयाने केली. याव्यतिरिक्त त्यानी 'अबला' नावाची एक कादंबरी लिहिली. त्या पुस्तकाला भारत

सरकारकडून ॲवॉर्ड मिळाले.

त्यांच्या लेखनाप्रमाणे त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आयुष्यभर हिंदू-मुस्लिम सलोख्याचा ध्यास घेणाऱ्या या सत्पुरुषाचा मृत्यू, अपघाती मृत्यू, सर्वांना चटका लावून गेला. एस.टी. महामंडळात काम केलेल्या अमीनसाहेबानी, काळाची गरज ओळखून, अनेकांचा विरोध असतानाही सांगली-मिरज, सिटी बस सर्व्हिसचा आग्रह धरला होता. त्या कल्पनेची गोड फळे आपण चाखत आहोतच. (ही योजना सर्वांना सोयीची तर झालीच झाली, पण सरकारलाही अतिशय फायद्याची ठरली.) पण खुद्द अमीनसाहेबाना मात्र ती कल्पना चांगलीच भोवली. कारण ज्या सांगली-मिरज सिटी बस-सर्व्हिस कल्पनेचा त्यानी पाठपुरावा केला, त्याच सिटी बसचा धक्का लागून १७ डिसेंबर १९७३ रोजी त्यांचे ६८ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. किती विचित्र हा देवाघरचा न्याय?

आजच्या स्फोटक परिस्थितीत अमीनसाहेबांसारख्या राष्ट्रीय बाण्याच्या व्यक्तिमत्वाची नितांत आवश्यकता आहे.

■■■

# क्रिकेटपटू विजय हजारे

जुन्या जमान्यात षटकारांचे बादशहा म्हणून प्रख्यात असलेले कर्नल सी.के. नायडू कर्णधार असतानाची गोष्ट.

एक सामना चालू असताना, संध्याकाळी एक समारंभ होता. सी.के.नी आपल्या सर्व खेळाडूंची ओळख करुन दिली. पण एका खेळाडूची ओळख करुन द्यायची राहिली. सर्वांनी गिल्ला केला. तेव्हा त्यानी एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले की " माझा एक मित्र इंग्लंडमध्ये आहे. त्याचे मोठे दुकान आहे. पण दुकानावर नावाची पाटी नाही. लोकांनी अनेकवेळा विचारलं की, दुकानावर नावाची पाटी का नाही? तो प्रत्येक वेळा अुत्तर देई, 'पाटी लावायची गरजच नाही. न लावताच माझं दुकान सर्वांना माहीत आहे.' तसं मी 'ओळख' करुन न दिलेल्या खेळाडूचं आहे."

त्या खेळाडूचं नाव होतं, 'विजय हजारे'!

हजारेनी हातातून बॅट ठेवून दिली, त्या गोष्टीला आता जवळजवळ चाळीस वर्ष अुलटून गेली. पण आजच्या घडीला सुद्धा त्या विक्रमवीराचं नाव निघालं की आजचे बुजुर्ग खेळाडू कानाला हात लावून कुर्निसात करतात! त्यांच्या खेळातील विलक्षण एकाग्रतेबद्दल आणि फलंदाजीतील नैपुण्याबद्दल आदरानं बोलतात. एके काळी विजय हजारे ही एक दंतकथा बनली होती. विजय हजारे हे एक विशेषणच बनलं होतं. गजाननराव वाटवे म्हणजे भावगीत क्षेत्रातील 'विजय हजारे' आहेत असं म्हटलं जाई. प्रा. ना.सी. फडके तर बालगंधर्वांशिवाय स्वयंवर नाटक म्हणजे विजय हजारेंशिवाय क्रिकेट मॅच असं म्हणत असत.

असे हे विजय हजारे सांगलीचे सुपुत्र आहेत. ज्यांच्यामुळं सांगलीचं नाव जगभर गाजलं, त्या विजय हजारेंचा जन्म ११ मार्च १९१५ रोजी सांगली गावात झाला. त्यांचे वडील सॅम्युअल हजारे हे सांगलीच्या मिशन स्कूलमध्ये शिक्षक होते. एकूण आठ भावंडांमध्ये विजय आणि त्यांचे धाकटे बंधू विवेक या दोघानाच क्रिकेटची आवड लागली. (त्या दोघांची मूळ नावे विजयानंद आणि विवेकानंद अशी लांबलचक होती.) सिटी पोस्टाच्या समोरील सिव्हील हॉस्पिटलच्या आवारात त्यांचं बालपण गेलं. 'गल्ली' क्रिकेटचे पहिले-वहिले धडे त्यांनी तिथंच गिरवले.

आज कुणाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल पण विजय हजारे अुत्तम फुटबॉल खेळत असत. फुटबॉलपटू म्हणून पुढील आयुष्यात चांगलं नाव कमावलं असतं. पण करीअर करायचा प्रश्न आला तेव्हा त्यानी क्रिकेटची निवड केली. कारण ज्या सांगली हायस्कूलमध्ये ते शिकत होते तिथं हणमंतराव भोसले (सुप्रसिद्ध क्रिकेटपटू विजय भोसले यांचे वडील) नावाचे क्रीडा-शिक्षक होते. त्यानी हजारेंचे सुप्त गुण अचूक हेरले. त्यानी सुरुवातीपासूनच हजारेंच्या खेळाकडे लक्ष पुरवले. क्रिकेटमधील अनेक बारकावे शिकवले. "तुझ्याकडून माझ्या फार अपेक्षा आहेत" असं ते म्हणत. खुद्द हजारेंचे वडील क्रिकेटप्रेमी होते. त्यामुळे हजारे फुटबॉलऐवजी क्रिकेटकडेच वळले. एका स्थानिक सामन्यात एक खेळाडू कमी पडत होता. हजारे प्रेक्षक म्हणून आपल्या सवंगड्यांबरोबर तेथे होते. आयत्या वेळेला त्याना संघात घेण्यात आले. त्या सामन्यात त्यानी शतकच ठोकले. त्या पराक्रमाचं कौतुक म्हणून वडिलानी एक बॅट हजारेना घेऊन दिली. पुढे आयुष्यात पदकांची, सन्मानांची रासच्या रास लागली, पण वडिलानी केलेल्या पहिल्या-वहिल्या सन्मानाचं आणि प्रोत्साहनाचं अप्रूप काही विलक्षणच होतं.

सुदैवाने हजारेंचं क्रिकेट -नैपुण्य देवास संस्थानचे युवराज विक्रमसिंह यांच्या लक्षात आलं. ते स्वतः त्यावेळी कोल्हापुरात राजाराम हायस्कूलमध्ये शिकत होते. त्यानी आग्रहाने हजारेंना आपल्या समवेत नेलं आणि पुढं देवासचे अधिपती बनल्यावर त्यानी हजारेना आपलं ए.डी.सी. बनवून टाकलं. आर्थिक विवंचनेतून मुक्त झाल्यामुळे हजारेना क्रिकेटवर संपूर्ण लक्ष केंद्रित करता आलं.

लौकरच प्रथम श्रेणीच्या क्रिकेट सामन्यात खेळण्याची संधी हजारेना प्राप्त झाली. एम्.सी.सी. चा अधिकृत संघ जॉर्डिनच्या (होय, तोच बॉडीलाईनवाला प्रकरणातील कुप्रसिद्ध जॉर्डिन) नेतृत्वाखाली १९३३-३४ साली आला. पुणे येथे होणाऱ्या दोन दिवसाच्या सामन्याकरता तरुण हजारेंची निवड झाली. त्यावेळी सांगली-कोल्हापूर भागात ही घटना एवढी अपूर्व मानली गेली की हजारे पुण्याला जायला निघाले तेव्हा त्याना शुभेच्छा देण्यासाठी अलोट गर्दी जमली! आश्चर्य म्हणजे पुढे जगविख्यात फलंदाज म्हणून गाजलेले हजारे, पहिल्या सामन्यात गोलंदाज म्हणून गाजले. प्रत्येक षटकात एक बळी असा खाक्या ठेवीत त्यानी चार षटकांत चार विकेट्स घेतल्या.

१९३३ मध्ये विश्वविख्यात क्रिकेटपटू रणजी यांचे निधन झाले. त्यांचे चिरंतन स्मारक म्हणून रणजी करंडक मॅचेस सुरु झाल्या. विजय हजारेना महाराष्ट्रातर्फे खेळण्याची संधी मिळाली. त्यावेळी त्यानी ६५ धावा काढल्या आणि ६ विकेट्स

घेऊन अष्टपैलू कामगिरी केली. भारतीय क्रिकेटचे महर्षी प्रो.दि.ब.देवधर यांजबरोबर त्याना शतकी भागी करायला मिळाले. पुढच्याच वर्षी आणखी एका महान खेळाडूसमवेत खेळण्याचा हजारेना योग आला! ते म्हणजे सी. के. नायडू. देवासच्या महाराजांबरोबर देवासला गेल्यावर, पुढील पाच वर्षे ते त्यावेळच्या मध्य-भारत संघाकडून खेळले. कर्णधार होते कर्नल सी.के. नायडू. सी.के.ना हजारेंचा खेळ अतिशय आवडला. राजपुताना संघाविरुद्धच्या रणजी सामन्यात, बाकी लोकांचा विरोध असतानासुध्दा त्यानी हजारेना चौथ्या क्रमांकावर बढती देऊन पाठवलं. हजारेनी सी.कें.चा विश्वास सार्थ ठरवत रणजीमधील आपले पहिले शतक झळकावले. रणजीमधील पुढील २२ शतकांची ही पायाभरणी होती!

या शतकाने हजारे खऱ्या अर्थाने फलंदाज म्हणून प्रकाशझोतात आले. अितके की क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे सचिव ड़िमेलो यानी इंग्लडला जाणाऱ्या भारतीय संघासाठी त्यांच्या नावाची शिफारस केली. मात्र एका सभासदाने विरोध करताना म्हटले की हजारे अद्याप चौरंगी सामन्यात खेळलेले नाहीत! वस्तुस्थिती अशी होती की चौरंगी सामने जातीय तत्वावर खेळले जात. हिंदु, मुसलमान, पार्शी आणि युरोपिअन अशी धर्माप्रमाणे वर्गवारी होती. 'न हिंदु, न यवन' अशी हजारेंची अवस्था. भारतीय ख्रिश्चन असल्याने युरोपिअन टीममध्येहि त्यांचा अंतर्भाव होत नव्हता !

या 'त्रिशंकू' अवस्थेमुळे इंग्लडला जाणाऱ्या भारतीय संघात हजारेंचा समावेश होऊ शकला नाही, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होती.इंग्लंडमध्ये खेळल्याशिवाय कोणताहि खेळाडू परिपक्व होत नाही. तेथील ओलसर हिरव्या खेळपट्टीवर खेळण्याचा हजारेना अनुभव मिळाला असता त़र संघाला त्याचा फायदा झाला असता. १९३६ साली त्यांचे वय २१ वर्षाचे होते म्हणजे क्रिकेटच्या दृष्टीने ऐन तारुण्यात असताना त्याना कसोटी सामने खेळायला मिळाले असते, पण.........................

पहिली कसोटी खेळण्यासाठी, आणखी तब्बल १० वर्षे त्याना वाट पहावी लागली. म्हणजे तिशी अुलटेपर्यंत!

कारण मधली वर्षे दुसऱ्या महायुद्धाच्या धामधुमीत गेली. विजय हजारे यांची २१ ते ३१ अशी ऐन अुमेदीची वर्षे जरी कसोटी क्रिकेटच्या दृष्टीने वाया गेली तरी रणजी सामने आणि नंतर सुरु झालेले पंचरंगी सामने यामध्ये त्यांची क्रिकेट प्रतिभा पूर्णपणे बहरुन आली. सुरुवातीला म्हणजे १९३९-४० च्या मोसमात ते महाराष्ट्राकडून खेळले आणि १५४ च्या विलक्षण सरासरीने ६१९ धावा काढून, महाराष्ट्राला त्यानी पहिल्यांदाच प्रतिष्ठेचा रणजी करंडक मिळवून दिला. पुढील वर्षी त्याचीच पुनरावृत्ती

झाली. प्रो.दि.ब. देवधरांच्या आग्रहाने हजारे महाराष्ट्राकडून खेळले. पण नंतर अचानक नोकरीनिमित्ताने त्याना बडोदा येथे जायला लागले. नोकरीची सोय महाराष्ट्रात मनासारखी न झाल्याने त्याना बडोद्याला जाणे भाग पडले. प्रो.देवधराना जितकं वाईट वाटलं तितकंच हजारेना महाराष्ट्र सोडताना वाईट वाटले. एका मुलाखतीमध्ये त्यावेळी त्यानी हताशपणाने म्हटलं होतं की, ''मी कोठे रहावयाचे व कुणाकडून खेळायचे हे माझ्या परावलंबी परिस्थितीवर अवलंबून राहिल.''

त्यानंतर बडोद्यात त्यानी अनेक रणजी सामने आपल्या फलंदाजीने गाजविले. त्याकाळात विजय मर्चंट आणि विजय हजारे फलंदाजीत एकमेकांवर कुरघोडी करण्याचे जिद्दीने प्रयत्न करीत. दोघांची स्पर्धा निकोप होती. वर्तमानपत्रवाले मात्र निष्कारण मर्चंट श्रेष्ठ? की हजारे श्रेष्ठ? असे वादंग मुद्दाम माजवून देत. १९३९ च्या बडोद्याविरुध्दच्या रणजी सामन्यात विजय हजारे यानी नाबाद ३१६ धावा काढल्या. यावर विजय मर्चंट यानी ३५९ नाबाद असा डोंगर रचून हजारेंचा विक्रम मोडला. १९४३ च्या पंचरंगी सामन्यात हजारेनी २४८ धावा काढल्या. पुढच्याच सामन्यात २५० धावा काढून मर्चंटनी सरस जवाब दिला. अशा चकमकी सतत दोघात झडत; त्यामुळे दोघांचाहि खेळ अुंचावला ही भारताच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट.

रणजी करंडक सामन्यात हजारेनी एकूण ६३१२ धावा काढल्या. त्यात तब्बल २२ शतके आहेत. हजारे वयाच्या १८व्या वर्षापासूनच क्रिकेटमधील प्रथमश्रेणीचे सामने खेळले. एकूण ३२९ डावांमध्ये ५६.२२ च्या अभिमानास्पद सरासरीने त्यानी १६१९४ धावा फटकावल्या.

'युद्धस्य कथा रम्य' तशा क्रिकेटमधील पराक्रमांच्या कथा विलक्षण रोमांचकारी आहेत. हजारेंच्या क्रिकेट जीवनात अशा खूप कथा आहेत. त्यातील १९४३-४४ च्या मोसमातील पराक्रम विलक्षणच.

पंचरंगी सामन्यातील लढतीमधला हिंदू विरुद्ध रेस्ट असा सामना मुंबईला चालला होता. हिंदू संघ बलाढ्य ताकदीचा होता. जवळ जवळ टेस्ट टीम ठरावी असा तो संघ. अपेक्षेप्रमाणे त्यानी ५ बाद ५८१ धावा केल्या. हजारेंचा या आधीचा २४८ धावांचा विक्रम मोडायचा, या निर्धाराने विजय मर्चंटनी तो मोडून स्वतःच्या २५० धावा झाल्यावर आपल्या संघाचा डाव घोषित केला. आता रेस्ट संघ कसा टिकाव धरतो याकडे सर्वांचे लक्ष होते. पण रेस्ट संघाच्या अवघ्या १३३ धावा झाल्या. त्यात हजारेंच्या होत्या ५९.फॉलोऑननंतर रेस्ट संघाचा दुसरा डाव असाच गडगडला. ५ बाद ६०. म्हणजे आता डावाचा पराभव अटळ होता. एका बाजूने विजय हजारे 'चिकटून' खेळत होते आणि हताशपणे दुसऱ्या बाजूला पडणाऱ्या

विकेट्स बघत होते. पाचवी विकेट पडल्यावर दुसऱ्या बाजूला त्यांचे धाकटे बंधू विवेक हजारे खेळण्यास आले. वास्तविक ते काही मान्यवर फलंदाज नव्हते.

पण त्यानी 'टिकून' रहाण्याचा निश्चयच केला असावा. आपल्या भावाची हिंमत पाहून विजय हजारेना चेव आला. त्यानी दुसरी बाजू 'सुरक्षित' आहे याची खात्री पटल्यावर चौफेर टोलेबाजी सुरु केली.

विकेट पडता पडत नव्हती.

दोघेहि बंधू नेटाने खेळत होते. एकाने गोलंदाजीवर हल्ला चढवायचा आणि दुसऱ्याने फक्त चेंडू थटवायचा.

एक नाही, दोन नाही, तब्बल साडे पाच तास दोन्ही बंधू सयामी जुळ्यांसारखे चिकटून बसले होते! आणि या अवधीत त्यानी ३०० धावांची भागीदारी केली. टेकू देणाऱ्या विवेकचा 'वाटा' केवढा असेल? फक्त २१ धावांचा! पण किती बहुमोल! त्या केवळ २१ धावा, विजय हजारेंच्या २६६ धावाना भक्कम 'संरक्षण' देऊन गेल्या.रेस्ट संघाची एकूण धावसंख्या झाली ३८७. आणि त्यातील ३०९ धावा एकट्या हजारेंच्या. म्हणजे एकूण धावसंख्येच्या ८० टक्के धावा एकट्याच्या; आणि अुरलेल्या ७८ धावा अितर दहाजणांच्या मिळून!

आणखी एक गंमत म्हणजे शेवटचा गडी खेळायला आला तेव्हा हजारेंच्या धावा होत्या २९५. त्रिशतकाला ५ कमी. शेवटचा गडी (रोच) कोणत्याही क्षणी 'गारद' होण्याची शक्यता. एरवी संथ मानल्या जाणाऱ्या हजारेनी त्रिशतक गाठलं ते चक्क षटकार मारुन! २९५ वरुन ३०१!

रणजी सामन्यातील आणि अितर प्रथम श्रेणीच्या सामन्यांमधील त्यांचे अनेक डाव असे चित्तथरारक आहेत. कसोटी सामन्यांमधील ७ शतके धरुन प्रथमश्रेणीच्या सामन्यातून त्यांची ५७ शतके आहेत तर ६६ अर्धशतके आहेत. दोन वेळा त्रिशतके आणि ८ वेळा द्विशतके ठोकणारे ते एकमेव भारतीय खेळाडू. गुलमहमद या खेळाडूच्या भागीदारीत त्यानी तब्बल ५७७ धावा कुटून  जागतिक विक्रमच केला. नुसत्या ३०० च्या वर भागीदाऱ्या त्यानी ९ वेळा केल्या.

एवढं कमी पडलं म्हणून की काय या 'ऑल टाईम ग्रेट' क्रिकेटवीरानं, रणजीमधील २९१ विकेट्स धरुन, एकूण ५०६ विकेट्स प्रथमश्रेणीच्या सामन्यात घेतल्या.

एवढा जबदस्त आवाका असलेल्या या वीराला कसोटी क्रिकेटला मात्र अशी प्रचंड आकडेवारी देता आली नाही याची कोणत्याहि क्रिकेटप्रेमीला हळहळ वाटेल.

त्यांच्या क्रिकेट जीवनात त्याना अवघे ३०च कसोटी सामने खेळायला मिळाले. तेवढ्यातहि त्यानी सात शतके आणि नऊ अर्धशतके फडकावली; आणि ४७.६५ च्या सरासरीने २१९२ धावा काढल्या.

आणि हे सर्व केव्हा? तर वयाची एकतिशी अुलटल्यानंतर! तेव्हा मनात सहजच विचार डोकावतो की कसोटी सामने जर हजारेना ऐन बहरात असताना आणि २१ ते ३१ या क्रिकेटमधील 'तारुण्यात' मिळाले असते तर चित्र किती वेगळे दिसले असते?

पण गंमत म्हणजे कसोटी क्रिकेटची आकडेवारी तुलनात्मक दृष्ट्या कमी असूनहि सगळं क्रिकेटजगत् त्याना एक अव्वल दर्जाचे फलंदाज मानते. ते कशामुळे?

त्यांचं खेळण्याचं तंत्र विलक्षण शास्त्रशुद्ध होतं. काही तरी वेडेवाकडे फटके मारुन विकेट फेकलीय असं दृष्य त्यांच्या २२ वर्षांच्या क्रिकेट-कारकीर्दीत एकही सांपडणार नाही. सर्व प्रकारचे फटके त्यांच्या भात्यात होते. कट, पुल, क्वचित प्रसंगी हुक, असले शॉटस् मारणाऱ्या विजय हजारेंचे खरं वैशिष्टय होतं ते त्यांच्या नजाकतदार कव्हर ड्राईव्हज् आणि ऑन ड्राइव्हज्मध्ये!

पण क्रिकेट कसोटीमध्ये ते ओळखले जातात ते त्यांच्या विलक्षण एकाग्रतेबद्दल! त्याना Mr. Concentration म्हणूनच ओळखले जायचे.

त्यांच्या Concentration, Dedicaton आणि Determination या तीन वैशिष्ट्यांची ओळख करुन घेण्यासाठी त्यांची कसोटी कारकीर्दच पहावयास हवी.

वर अुल्लेख केल्याप्रमाणे हजारेना वयाच्या ३१ व्या वर्षी म्हणजे १९४६ मध्ये पहिली कसोटी खेळायला मिळाली आणि ती सुद्धा अिंग्लंडमध्ये. क्रिकेटच्या मक्केतच. खुद्द लॉर्डस्च्या मैदानावर. पण इतर सामन्यात, म्हणजे भारतातील, धावांचा धो धो पाऊस पाडणारा हा वीर, तिन्ही कसोटी सामन्यात नेत्रदीपक कामगिरी करु शकला नाही. इंग्लडमधील ओलसर हवामानात आणि बेभरवंशाच्या खेळपट्टयांवर खेळण्याचे तंत्र त्याना जमले नाही हे खरे! त्याना गोलंदाजीचा मोठाच भार वहायला लागला आणि स्वाभाविकच त्याचा परिणाम त्यांच्या फलंदाजीवर झाला.

पण अिंग्लंडमध्ये कसोटी सामन्यात शतक झळकवता आले नाही हे शल्य कायमचे त्यांच्या मनात राहिले ते राहिलेच. (दुर्दैव म्हणजे १९५२ मध्ये झालेल्या दौऱ्यात पण त्याना ते जमलं नाही!)

पण त्याचे सव्याज अुट्टे, त्याना १९४७ च्या ऑस्ट्रेलियन दौऱ्यात काढायला मिळाले.

क्रिकेटच्या दुनियेचा अनभिषिक्त सम्राट असं ज्याचं वर्णन करता येईल अशा ब्रॅडमनच्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणं म्हणजे वाघाबरोबर शेळीची झुंज असाच प्रकार होता. ब्रॅडमन, पान्सफोर्ड, हॅसेट असे जगद्‌विख्यात फलंदाज. ताशी ९० मैलाच्या भन्नाट वेगाने अंगावर धावून येणारी लिंडवाल-मिलर ही तुफानी गोलंदाजांची जोडगोळी. जॉन्स्टन, टोशॅक यासारखे मंदगती गोलंदाज. अशा ताफ्यासमोर अुभं राहण्याचीच मारामार. अपेक्षेप्रमाणे भारतीय संघाने सपाटून मार खाल्ला. पण या पराभवातील रुपेरी किनार म्हणजे हजारेंची अ‍ॅडेलड कसोटीमधील एकाच मॅचमधील दोन डावातील दोन शतके. आजच्यासारखी हेलमेट्स, थाय-पॅड्स, रिस्ट बँड्स असे 'संरक्षक' अुपाय नसताना, लिंडवाल-मिलरच्या बंपर्सपुढे, विजय हजारेनी वयाच्या ३२ व्या वर्षी ११६ धावा काढून पहिलंवहिलं कसोटी शतक ठोकलं! अमरनाथ, मनकड यासारखे प्रथितयश खेळाडू नामोहरम होत असताना आणि डोळ्यासमोर ऑस्ट्रेलियाने दोन दिवस दमवून ६७४ धावांचा डोंगर अुभा केला असताना, कुणीहि गर्भगळीत झाला असता तर ते स्वाभाविकच होते. त्यातून हजारेंच्या मनाचे दडपण वाढवणारी आणखी एक गोष्ट म्हणजे प्रेक्षकांमध्ये त्यांचे क्रिकेटमधील दुसरे गुरू ग्रिमेट सामना बघत प्रेक्षकांत अुपस्थित असल्याची जाणीव! अशा परिस्थितीत त्याना धीर मिळाला, स्फूर्ती मिळाली ती त्यावेळी क्रिकेट कसोटीत नव्यानेच पदार्पण करत असणाऱ्या दत्ता फडकर या तरुण आणि दमदार खेळाडूकडून. फडकरांचा हा पहिलाच परदेश-दौरा आणि तिसराच कसोटी सामना. लिंडवाल- मिलरसमोरच्या त्यांच्या बेडर खेळाने हजारेना नव्याने अुमेद आली. सहाव्या विकेटसाठी फडकरबरोबर १८८ धावांची भागीदारी करुन हजारेनी आपलं पहिलं शतक (११६) झळकावलं. पाठोपाठ फडकरानी पण आपलं शतक (१२३) साजरं केलं. अर्थात् तरीसुद्धा फॉलोऑनची नामुष्की टळली नव्हतीच. दुसऱ्या डावात सात भारतीय खेळाडूना तर भोपळाहि फोडता आला नव्हता! खेळपट्टी झिजत जाऊन गोलंदाजाना अनुकूल बनत चालली होती.

पण यशासारखं यश नाही हेच खरं!

पहिल्या डावातील शतकामुळे हजारेंचे हात शिवशिवत होते. आणि भारतीय क्रिकेट कसोटीच्या अितिहासामधील एक सोनेरी पान अुघडलं!

हजारेनी त्याच सामन्यातील, फॉलोऑननंतरच्या, दुसऱ्या डावात पुन्हा शतक (१४५) झळकावलं!

कसोटी सामन्यातील प्रत्येक डावात शतक! आणि ते सुद्धा सर्वथैव प्रतिकूल परिस्थितीत. अशी घटना कसोटी क्रिकेटमध्ये एरवीसुद्धा दुर्मिळ. भारतीय क्रिकेटमध्ये

तर पहिल्यांदाच. हजारेना लेगब्रेक, गुगली, पवित्रा (stance) याबाबत बहुमोल धडे देणारे त्यांचे गुरु ग्रिमेट म्हणाले, ''विजय, आज तू मला धन्य केलंस.'' हजारेना त्याच वेळी सांगलीत क्रिकेटचे पहिलेवहिले धडे देणारे गुरु हणमंतराव भोसले यांची प्रकर्षाने आठवण झाली.

हा त्यांचा विक्रम भारतीय क्रिकेटमध्ये,पुढे २५वर्षानंतर, विश्वनाथने मोडेपर्यंत अबाधित होता!

यानंतर भारताच्या दौऱ्यावर आलेल्या बलाढ्य वेस्ट इंडिज विरूध्द आणि त्यानंतर १९५१-५२ मध्ये इंग्लड-पाकिस्तानविरुद्ध मिळून आणखी पाच शतके हजारेनी झळकावली. पण तरीसुद्धा क्रिकेटच्या माहेरघरी म्हणजे खुद्द अिंग्लंडमध्ये शतक झळकवण्याची त्यांची महत्वाकांक्षा अपुरीच राहिली! पण वस्तुस्थिती अशी होती की आयुष्यातील आठवावेत, नव्हे सतत आठवावेत असे काही संस्मरणीय डाव, हजारे याच अिंग्लंडच्या १९५२ च्या दौऱ्यावर खेळले. खऱ्या अर्थाने 'कॅप्टन्स इनिंग्ज''! आता ते खाजगी जीवनातही बडोदे संस्थानात कॅप्टनच्या हुद्यावर होते आणि भारतीय टीमचेहि ते कॅप्टन होते! आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे अिंग्लंडमधील त्यांचे शतक हुकले ते फक्त ११ धावानी! पहिल्याच लॉर्ड्सवरील कसोटीत भारताची पहिल्या डावात घसरगुंडी अुडाली. तीन विकेट्स् चाळीशीतच गेल्यावर हजारेना, नवीन तरुण खेळाडू विजय मांजरेकरची जोड मिळाली. बेडसर, ट्रूमन आणि लेकर बहरात असताना अत्यंत सावधगिरीने खेळून दोघानी २२२ धावांची भर घातली. मांजरेकरचे शतक(१३३) लागले; दुर्दैवाने हजारे ८९ धावावरच बाद झाले. पण केविलवाण्या दिसणाऱ्या धावसंख्येला त्यानी आपल्या झुंझार खेळीने बऱ्यापैकी आकार दिला होता.

पण खरी नामुष्की त्याच कसोटीच्या दुसऱ्या डावात झाली होती. धावफलकावर शून्य धावा असं दृष्य असताना पहिला गडी बाद झाला. दुसरा गेला. तिसरा गेला. आणि चौथी विकेटहि गेली. पहिल्या डावातील प्रदीर्घ इनिंग हजारेंची खेळून झाली होती. त्यामुळे पायाला जखम झाली होती. ड्रेसिंगरुममध्ये पायाला मसाज चालू होता. नेहमीच्या चौथ्या क्रमांकाऐवजी, हजारे पायाच्या जखमेमुळे सहाव्या क्रमांकावर खेळणार होते. ४ बाद शून्य अशा अत्यंत लाजिरवाण्या स्कोअरवर खेळायला जाणे कोणत्या कर्णधाराला आवडेल? अलेक बेडसर आणि फ्रेडी ट्रूमन, ही इंग्लिश शीघ्रगती गोलंदाजांची जोडी, मैदानावर धुमाकुळ घालत होती. हजारेनी आपला मसाज आवरला. दुसऱ्या पायावर पॅड्स बांधले. ट्रूमन हातात चेंडू घेऊन 'स्वागताला' अुभा होता तो स्वतःची हॅटट्रिक पुरी करण्यासाठी. हो हॅटट्रिक! पहिल्या डावात

शतक झळकवणारा विजय मांजरेकर आणि माधव मंत्री लागोपाठच्या चेंडूवर बाद झाले होते. हजारेनी गार्ड घेतला तेंव्हा ट्रूमन आपल्या 'भक्ष्याकडं' बघावं तसं त्यांच्याकडं पहात होता. त्याच्यामागं लॉर्ड्सवरील भला मोठा स्कोअरबोर्ड भारताचा धावफलक दाखवत होता ४ बाद शून्य! भारताला 'कसोटी' सामने खेळण्याचा दर्जा दिलाच का म्हणून आग ओकणारी वृत्तपत्रे 'उद्या' काय लिहितील याची हजारेना कठोर जाणीव झाली. अबोल वृत्तीचे हजारे तोंडाने काय बोलणार? म्हणून ते 'बॅट'नेच बोलले!

पहिला 'हॅटट्रिक' च्या उद्देशाने टाकलेला ट्रूमनचा चेंडू भोवतालच्या क्षेत्ररक्षकांच्या कोंडाळ्यातून, हजारेनी आपल्या सणसणीत ऑन ड्राईव्हने असा काही भिरकावला की सारे क्षेत्ररक्षक बघतच राहिले! त्यांची हिंमत बघून त्यांचा जुना सहकारी दत्तू फडकर यालाही स्फुरण चढले. आपल्या झुंझार खेळीने त्यानी 'अॅडलेड' कसोटीच्या पराक्रमाची सर्वांना आठवण करुन दिली. ४ बाद ० चा धावफलक दोघानी १६५ वर पोचवला. त्यात हजारेंचा स्कोअर होता ५६!

पण हजारेना स्वतःला याहून संस्मरणीय इनिंग आठवते ती त्यांच्या अडतीस धावांची! ओव्हलवरील शेवटच्या सामन्यात भारताच्या ५ बाद ६ अशा 'स्कोअर'वर ते खेळत होते. इंग्लंडमधील विचित्र हवामान, बेताचा अुजेड, खराब खेळपट्टी, चेंडूचा अंदाज येणं मुष्किल, वेगवान ट्रूमन, बेडसर यांच्याबरोबर लेकर-लॉक या फिरकी जोडीला साथ देणारी हिरवळ! अशा प्रतिकूल परिस्थितीत एक एक धाव काढणे अवघड जात होतं तिथं या हजारेनी ३८ धावा काढल्या. समीक्षकांच्या मताने सुद्धा हजारेंची ही सर्वोत्कृष्ट खेळी होती. खुद्द हजारेनी लिहून ठेवलंय की या ३८ धावा मला एखाद्या शतकापेक्षाहि अधिक मोलाच्या वाटतात!

असे त्यांचे अनेक डाव सांगता येतील. पण हजारेंच्या कसोटी-क्रिकेट-कारकीर्दीची मौज अशी की बव्हंशी सर्व डाव ते आपल्या संघाला वाचविण्यासाठी खेळले. एका बाजूला धडाधड विकेट्स पडत असताना दुसऱ्या बाजूला ते नांगर टाकून बसलेले असत! (म्हणून कौतुकाने त्याना 'रॉक ऑफ जिब्राल्टर' असे म्हणत) पण गंमत म्हणजे ज्यावेळी दोन्ही डावात ते 'फेल्युअर' झाले त्यावेळी नेमका भारतीय संघाने आपल्या कसोटी जीवनातला पहिला वहिला सामना जिंकला! कसोटी क्रिकेट खेळण्याला भारताला मान्यता मिळाल्यापासून तब्बल २५ सामने मार खाण्यात किंवा कशीबशी अनिर्णित राखण्यात गेल्यानंतर, विजय हजारे यांच्या नेतृत्वाखाली, मद्रासला अिंग्लंडविरुद्ध भारताने प्रथमच विजयश्री प्राप्त केली. हजारेंची स्वतःची 'कॉन्ट्रिब्युशन' काही नसताना. आजवर प्रत्येक पडझडीच्या वेळी भारताची बाजू

सावरण्यासाठी हजारेनी जे असीम कष्ट केले, त्या कष्टांना जणू 'मानवंदना' द्यावी म्हणूनच त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या विजयभाईला हा विजयाचा नजराणा दिला! राष्ट्रपती, पंतप्रधान यापासून तो सर्वसामान्य रसिकांपर्यंत सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. खरोखरच तो ऐतिहासिक प्रसंग होता.

विजय हजारेंच्या आयुष्यात हा मोठा गौरवाचाच क्षण होता. असे असले तरी १४ सामन्यात भारताचे नेतृत्व करताना त्यानी खास कल्पकता अशी कधीच दाखवली नाही. त्याना नेहमीच 'हरणाऱ्या' संघासाठी खेळावे लागलं. द्रुतगती गोलंदाजांचा ताफा, आक्रमक फलंदाज त्यांच्या हाताशी नव्हते या गोष्टी खऱ्या असल्या तरी कर्णधार म्हणून त्यांच्याकडे कोणतेच डावपेच नव्हते. ते जात्या अत्यंत अबोल असल्याने मैदानात काय किंवा मैदानाबाहेर काय, आपल्या सहकाऱ्यांबरोबर त्यांचा 'संवाद' असा नव्हताच. त्यामुळे ते नम्र, निगर्वी असले तरी नेता म्हणून त्यांची छाप पडत नसे. त्यांची कारकीर्द जवळून पहाणाऱ्या विजय मर्चंट यानी फार मार्मिकपणे त्यांच्या कर्णधारपदाची मीमांसा करताना म्हटलय, ते असं:

'I wish Hajare had never captained India. He was never a leader of men. He was always a disciplined soldier, never a commander."

विजय हजारे याना 'पद्मश्री' देऊन भारत सरकारने त्यांच्या क्रिकेटसेवेचा गौरव केला होता. एम्. सी. सी. ने त्याना सन्माननीय सदस्यत्व देऊन त्यांचा सन्मान केला. भारतीय क्रिकेट निवड समितीचे ते काही काळ चेअरमन होते.

असा हा सांगलीकर क्रिकेटपटू आता बडोदा येथे शांतपणे, आयुष्याचे 'शतक' गाठण्याच्या प्रतीक्षेत आहे.

नाबाद '८५' या धावसंख्येवर!

●●●

# बॅडमिंटन युग निर्मिणारे नंदू नाटेकर

१९५१-५२मधली गोष्ट. मुंबईच्या प्रख्यात क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या टेनिस कोर्टावर मॅच चालली होती. ऑल इंडिया हार्ड कोर्ट टेनिसच्या मॅचेसमधील ती फायनल मॅच होती. दोन्ही तरुण मोठ्या जिद्दीने खेळत होते. अर्थात् कोणीतरी एक जिंकणार आणि एक हरणार. शेवटी एकजण जिंकला. त्याने पुढे टेनिसमध्ये भारताचे नाव गाजवले. त्याचं नाव रामनाथन् कृष्णन. पण गंमत म्हणजे जो तरुण हरला त्याचं नाव तर साऱ्या जगात अधिकच दुमदुमलं. पण टेनिसमध्ये नाही तर बॅडमिंटनमध्ये. त्याचं नाव नंदू नाटेकर!

हे नंदू नाटेकर सांगलीचे सुपुत्र. १२मे १९३३रोजी त्यांचा जन्म सांगलीत झाला. नंदकुमार महादेव नाटेकर असं कागदोपत्री नाव असलेले नाटेकर लहानपणापासून ते विश्वविख्यात खेळाडू होईपर्यंत गाजले ते 'नंदू नाटेकर' म्हणून; अगदी कृष्णाकाठच्या सांगलीपासून ते टेम्सतीरी असलेल्या लंडनपर्यंत.

सांगली, बॅडमिंटन आणि नंदू नाटेकर यांचं अतूट नातं दर्शविणारी एक बोलकी घटना आहे.

सांगलीचे प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ.शेखर परांजपे शिक्षणासाठी १९८७-८८ च्या सुमारास अिंग्लंडमध्ये होते. केंब्रिजला शिकत असताना आपली बॅडमिंटन रॅकेट दुरुस्त करायला ते बाहेर पडले. आवडीचा खेळ म्हणून फावल्या वेळात ते बॅडमिंटन खेळत. ज्या स्पोर्टस्च्या दुकानात ते गेले त्याचा मालक एक ब्रिटीश माणूस होता. परांजपे आशियायी देशातील अशा कल्पनेने त्याने सहज 'कुठले?' म्हणून विचारले तेव्हा परांजपे यानी सांगितले की, 'मी सांगलीचा आहे.' सांगलीचे नाव ऐकताच तो ब्रिटीश मालक एकदम आनंदाने म्हणाला "ओह, यू आर फ्रॉम नंदू नाटेकर्स प्लेस!" बॅडमिंटन रॅकेटचे गटिंग करता करता त्याने इंग्लंडमधील, बॅडमिंटन टूर्नामेंट्स मध्ये नाटेकरांचा जो सुरेख खेळ बघितला होता, त्याचं रसभरीत वर्णन ऐकवलेच पण बॅडमिंटन दुरुस्तीची एक पैसुध्दा घेतली नाही! नाटेकरांचा गाववाला. मग पैसे कसले घ्यायचे? अशी त्याची कौतुकाची भावना.

नाटेकरांच्या बॅडमिंटनमुळे ही अनोखी 'शट्ल सर्व्हिस' थेट अिंग्लंडमधील केंब्रिजपासून सांगलीपर्यंत सुरु झाली.

नाटेकरांचं शालेय जीवन सांगलीत गेलं. सांगली हायस्कूलमध्ये त्यांचं शिक्षण झालं. विजय हजारे यांचे गुरु, हणमंतराव भोसले हे तेथे क्रीडाशिक्षक होते. अर्थात त्यामुळे क्रिकेटची मोठी चलती होती. पण नाटेकरांना खेळाचं खरं बाळकडू घरातच मिळालं. त्यांचे आजोबा डॉ.व्ही. एन. देसाई म्हणजे सांगलीतील एक महनीय व्यक्तिमत्व होतं. बॅडमिंटन, टेबल-टेनिस, टेनिस अशा खेळांना त्यानी फार अुत्तेजन दिलं. सांगली जिमखाना म्हणजे डॉ. देसाई असं एक समीकरणच होतं, अितकं त्यानी जिमखान्याला वाहून घेतलं होतं. अितकंच काय पण बुद्धिबळासारखा घराघरातून बंदिस्त असणाऱ्या बैठ्या खेळाला सुध्दा त्यानीच व्यासपीठ मिळवून दिलं. त्यांच्यामुळे नंदू आणि त्यांचा मामेभाऊ मधू देसाई याना फार लहानपणापासून सांगली जिमखान्यात सर्व प्रकारचे खेळ खेळायला मिळायचे. त्याकाळी सांगली हायस्कूलची क्रिकेट टीम मोठी नावाजलेली होती. सांगली हायस्कूल आणि सांगली इलेव्हनतर्फे वयाच्या १४-१५ वर्षीच नाटेकर क्रिकेट मॅचेस खेळले आणि त्यात त्यानी आपले नैपुण्य दाखवले. टेनिस, टेबल-टेनिस, बॅडमिंटन, क्रिकेट असे सर्वच खेळ नाटेकर सारख्याच कुशलतेने खेळत. त्यांचं विलक्षण क्रीडानैपुण्य पाहून वयाची अट त्यांच्या बाबतीत शिथिल करुन त्याना सांगली जिमखान्याचं सदस्यत्व देण्यात आलं. त्यांच्या कौशल्यपूर्ण खेळामुळे डॉ.देसाईनी आपल्या नातवाच्या बाबतीत जिमखाना सदस्यत्व देण्यात पक्षपातीपणा दाखवला असं कुणीच म्हणू शकत नव्हता आणि ही गोष्ट किती सुयोग्य होती हे नाटेकरानी ताबडतोब, सांगली जिमखान्याची ज्युनिअर चँपियनशिप जिंकून सिद्धही केलं. ही घटना अवघ्या १४ व्या वर्षीची (१९४७). त्यांच्या खेळातील पारंगतता बघून घरच्या मंडळींनी ठरविलं की या 'जोनाथन' ला अुडण्यासाठी सांगलीचं आकाश फारच 'लहान' पडतय! याला मुंबईच्या विशाल अवकाशातच पाठवायला हवं.

त्यामुळे मॅट्रिक झाल्यावर नंदू नाटेकराना सांगलीतून मुंबईत पाठवण्यात आलं. त्यांचे मामा राजाभाऊ देसाईं यांची बोरीबंदरजवळ जागा होतीच. त्यांचा क्रीडापटू मुलगा आणि नाटेकरांचा मामेभाऊ मधू देसाई शिक्षणासाठी आधीच तिथं गेला होता. दोघांच्या खेळाचा दर्जा बघून हिंदू जिमखान्याचं सदस्यत्व मिळण्यात त्या दोघांना कोणतीच आडकाठी आली नाही.

आता नाटेकरांपुढे प्रश्न होता, करीअर करायची तर कोणत्या खेळात करायची? कारण क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटन, असे सर्वच खेळ ते अुत्तम खेळत. एखादा रंगभूमीवरील नट नाटकातील प्रत्येक भूमिका तितक्याच ताकदीने करणारा असला

तरी प्रत्यक्ष नाटक रंगभूमीवर अवतरताना एकच भूमिका त्याला करायला मिळते. तसं नाटेकरांचं झालं होतं. त्यात १९५१ सालच्या टेनिस मॅचमध्ये (नॅशनल हार्ड कोर्ट टूर्नामेंट) रामनाथन कृष्णनबरोबर एकेरी, दुहेरी सामन्यात नाटेकर अुपविजेते होऊन मुंबईच्या क्रीडा-जीवनात एकदम प्रकाशात आले होते. त्यांचा स्वत:चा कल टेनिस खेळण्याकडे होता. त्यांचे वडील टेनिस खेळत. आई सुमतीबाई यांच्यासह नाटेकर रत्नागिरीला १२-१३ व्या वर्षीच बॅडमिंटन-मिश्र दुहेरी सामना खेळले होते. नाटेकरांसमोर टेनिस का बॅडमिंटन असा प्रश्न अुभा होता. एका म्यानात दोन तलवारी राहात नाहीत असं जाणकारांचं म्हणणं होतं.

मग सर्वानुमते नंदू नाटेकरांनी बॅडमिंटनवरच सर्व लक्ष केंद्रित करावं, टेनिसला सोडचिठ्ठी द्यावी असं ठरलं. एक कारण असं होतं की त्यावेळच्या बॉम्बे स्टेट बॅडमिंटन असोसिएशनचे पदाधिकारी श्री. आगासकर आणि सुशिलकुमार रुईया याना हा खेळाडू बॅडमिंटनपासून दूर रहावा हे अजिबात पटत नव्हतं. म्हणून त्यानी नंदूच्या वडिलाना घरी जाऊन तसा आग्रह केला होता.

अर्थात ही बाब सर्वस्वी खरी नव्हती. एक योगायोग असा घडला की त्याच सुमारास नंदू नाटेकरानी जागतिक कीर्तीचा बॅडमिंटनपटू वाँग पेंग सून याचा खेळ मुंबईत पाहिला आणि 'चमत्कार' पाहिल्यासारखी नाटेकरांची अवस्था झाली. बॅडमिंटनच्या खेळातील सारी सौदर्यस्थळे त्याना एकदम नव्यानेच दिसावीत अशी प्रतीत झाली आणि तेव्हापासून बॅडमिंनवर त्यांचं जसं काही नव्यानंच प्रेम जडलं!

एकदा निर्णय झाल्यावर बॅडमिंटनवर त्यानी कसून मेहनत घेण्यास सुरुवात केली. पुढील वर्षीच्या म्हणजे १९५२ सालच्या वेगवेगळ्या कॉलेजातील टूर्नामेंट्स त्यानी जिंकल्या. पण बॅडमिंटन रसिकांचं लक्ष त्यानी वेधून घेतलं ते देविंदर मोहनबरोबर झालेल्या चुरशीच्या सामन्यामुळं. कारण देविंदर मोहन हा त्यावेळचा सर्वोत्कृष्ट बॅडमिंटनपटू होता. १९४९-५० चा नॅशनल चँपियन होता. बॉम्बे प्रेसिडन्सी ओपन चँपियनशिप्स (नंतरच्या महाराष्ट्र स्टेट) मध्ये त्यानी देविंदरचा पराभव करुन सर्वत्र खळबळ माजवून दिली. हिंदू जिमखान्यावर झालेल्या या सामन्यात सुरवातीला दोघानी एक एक गेम जिंकला. त्यामुळे तिसऱ्या गेमविषयी अुत्सुकता निर्माण झाली. तिसऱ्या गेममध्ये देविंदरचे ८ तर नाटेकरांचे ४ पॉईंटस् झाले. नाटेकरानी जोर करुन १४ पॉईंटसपर्यंत मजल मारली तेव्हा आता शेवटचा मॅच पॉईंट जिंकून नाटेकर मॅच खिशात टाकतील असं वाटत असतानाच, देविंदरने अुचल खाल्ली. आणखी चार पॉईंटस् मिळवून आता स्कोअर १४-१२ झाला. आता नाटेकरांच्या हातातून देविंदर मॅच खेचून घेतो की काय असं वाटत असतानाच, एक पॉईंट मिळवून नाटेकरानी

रोमांचकारी मॅच जिंकली. पुढची मॅच रमेश देसाईंबरोबर (१५-६,१५-२)अशा मोठ्या फरकाने जिंकून नाटेकरानी त्या वर्षीची चॅंपियनशिप आरामात जिंकली.

यापुढील आयुष्यात अनेक चित्तथरारक सामने नाटेकरानी जिंकले असले तरी देविंदरवर मिळवलेल्या विजयामुळे नाटेकराना प्रथमच स्वत:ची 'ओळख' मिळाली! साऱ्या रसिकांना, समीक्षकांना कळून चुकले की काहीतरी 'अद्भुत' असं काळाच्या अुदरात लपलेलं आहे. वृत्तपत्रांनी आवर्जून या घटनेची नोंद घेतली.

यानंतर मात्र नाटेकरांनी मागे वळून बघितलंच नाही. त्रिलोकनाथ सेठचा पराभव करुन, १९५३ साली म्हणजे अवघ्या विशीतच त्यानी राष्ट्रीय विजेतेपद मिळविलं. यानंतर जवळजवळ ८-१० वर्षे त्यानी अनेक मानसन्मान मिळवले. या काळातील त्यांचा खेळ सतत अुंचावत गेला. अितका की कौतुकाने सर्व क्रीडाशौकीन, समीक्षक या काळाला 'नाटेकर युग' असेच संबोधायचे. या कालावधीतील त्यांची आकडेवारी या कौतुकाची साक्षी आहे. त्यानी महत्त्वाच्या अशा १३४ स्पर्धा जिंकल्या. त्यात त्यानी ५३ एकेरी सामने, ४३ दुहेरी तर ३८ मिश्र सामने जिंकले. काही सामने अगदी थोड्या फरकानेच त्यांच्या हातून निसटले आणि अुपविजेते पदावर त्यांना समाधान मानावं लागलं. असं अुपविजेतेपद (Runner-up) एकेरी सामन्यात १३ वेळा, दुहेरी सामन्यात १४ वेळा तर मिश्र दुहेरी सामन्यात ७ वेळा त्याना मिळालं. १९५३ ते १९६५ या दरम्यान त्यानी राष्ट्रीय स्पर्धेतील ६ एकेरी अजिंक्यपदे मिळविली. सहावेळा दुहेरी स्पर्धांमध्ये तर ३ वेळा मिश्र स्पर्धांमध्ये अजिंक्यपदे मिळविली. त्यातही कौतुक म्हणजे या सर्व सामन्यात ८वेळा त्याना अुपविजेतेपद मिळालं. याचा दुसरा अर्थ असा की ८ अजिंक्यपदे त्यांची थोडक्यात हुकली! परदेशात मोठी चॅंपियनशिप मिळवणारे ते पहिलेच भारतीय बॅडमिंटनपटू होते. १९५६ मध्ये मलायातील सेनेगर येथे झालेल्या सिंगल्स त्यानी मोठ्या दिमाखात जिंकल्या आणि मॅर्डेका कप जिंकला. १९६३मध्ये तर त्यानी कॅरॉन वॉट्टनसिनला धूळ चारून प्रतिष्ठेची किंग्ज कप चॅंपियनशिप जिंकली. १९५४ ते १९६३च्या दरम्यान अिंग्लंडमधील थॉमस कप टूर्नामेंट्स खेळताना १६पैकी १२ सिंगल्स आणि १६पैकी ८ डबल्स जिंकल्या. ज्यांच्या नावे हा थॉमस कप ठेवलेला आहे ते जॉर्ज थॉमस, नाटेकरांचा खेळ पाहून अतिशय प्रभावित झाले. ते म्हणाले की, "Natekar of India is real artist of the game.........One of the very best I have seen."जगातील सर्वोत्तम अशा पाच बॅडमिंटनपटूंमध्ये नाटेकरांचं तेव्हा चौथं स्थान होतं. (१९५४-५५ च्या मलेशियातील थॉमस कपच्या वेळी) अितर चार दिग्गजांची नावे वाचली तरच त्यांच्या या महानतेची किंमत कळेल. अितर चौघांपैकी एडी चुंग, वांग पेंग सून, ऑग पॉ हिम हे तिघे

मलेशियाचे होते तर कॉबरो डेन्मार्कचे होते. १९६१मध्ये नाटेकरानी राष्ट्रीय तिहेरी मुकुट जिंकला तेव्हा ती एक मोठी कामगिरी गणली गेली. कारण १९३८-३९ नंतर २०-२२ वर्षामध्ये असा पराक्रम कोणी केला नव्हता!

अशी देदिप्यमान कामगिरी नोंदवत असताना आणि जिकडे-तिकडे 'नाटेकर, नाटेकर' असं नाव दुमदुमत असतानाच २९ जानेवारी १९६६ ला मोठ्या स्पर्धामधील एकेरी सामन्यांमधील निवृत्ती त्यानी जाहीर केली.

अर्थात मिश्र सामने,दुहेरी सामने आणि व्हेटरन्स मॅचेस ते खेळत राहिले. १९६५ मध्ये जमैकामधील (वेस्ट इंडिज) कॉमनवेल्थ मॅचेसमध्ये ते खेळले. १९८०, ८१, आणि १९८४ मध्ये त्यानी ऑल इंग्लंड व्हेटरन्स डबल्स ची अजिंक्यपदे मिळवली. कॅनडामध्ये वर्ल्ड मास्टर्स बॅडमिंटन चँपियनशिप १९८५ मध्ये प्रथमच सुरु झाली, तेव्हा नाटेकराना सिल्व्हर मेडल मिळाले. तसंच डेन्मार्कमध्ये १९८९ साली व्हेटरन्स डबल्समध्ये सिल्व्हर मेडल मिळालं. बॅडमिंटन खेळण्यासाठी वरील देशांखेरीज अमेरिका, कॅनडा, न्यूझीलंड अशा विविध देशांमध्ये त्याना खेळायला मिळाले.

१९६१मध्ये राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत, नाटेकरानी अनेक वर्षांचा विक्रम मोडून तिहेरी मुकुट मिळवला, तेव्हा भारत सरकारने 'अर्जुन ॲवार्ड' द्यायला सुरुवात केली होती. सुरुवातीचं पहिलंच 'अर्जुन'नाटेकराना देण्यात आलं.देशात आणि परदेशात त्याना अनेक सन्मान लाभले.

नाटेकरानी गाजवलेल्या मॅचेसच्या, आजहि प्रसंगा-प्रसंगाने बॅडमिंटन रसिकांमध्ये आठवणी निघतात. अटळ पराभव समोर दिसत असतानासुद्धा त्यानी अनेक मॅचेस आश्चर्यकारकरीत्या फिरवून विजयश्री संपादन केली आहे. पाकिस्तानचा शमशाद अली, थायलंडचा वाट्टाना सिन यांच्याबरोबर त्यांचे काही संस्मरणीय सामने झाले आहेत. १९५८ साली सी. सी. आय.ला, डेन्मार्कच्या एरलंड कॉपसबरोबर झालेल्या मॅचच्या आठवणी अजून जाणकार रसिक काढत असतात. अगदी प्रतिस्पर्ध्याच्या घशात गेलेली मॅच परत खेचून आणण्याचा चमत्कार त्यानी अनेक वेळा केलेला आहे. अशावेळी त्यांची त्रिलोकनाथ सेठबरोबरची रंगलेली एक झुंज कोण विसरू शकेल?पहिला गेम नाटेकरानी १५-८ असा जिंकला होता. पण दुसरा गेम सुरु झाला तेव्हा सेठने स्वत:ला खूप सावरले. भराभर नऊ पॉईंट्स त्याने मिळवले तेव्हा नाटेकरांच्या खात्यात अवघा एक पॉईंट होता! दमदारपणे खेळत नाटेकरानी सेठला दहा पॉईंटवर गाठले. दोघेही दहावर होते. अशीच अटीतटीची झुंज चालू राहिली. आणि दोघांचे प्रत्येकी १५ गुण (फिफ्टीन ऑल) झाले. आता मात्र खेळणारे खेळाडूच काय पण सगळे प्रेक्षकच घामाघूम झाले. संपूर्ण कोर्टभर स्मशान शांतता

पसरली. आणि अशा आणिबाणीच्या वेळीच नाटेकरांचं खरं कसब बघायला मिळतं. त्यानी आपलं सर्वस्व पणाला लावलं आणि नंतर मात्र सेठला एकही पॉईंट न मिळवू देता त्यानी १८-१५ अशी मॅच जिंकली.

नाटेकरांच्या खेळाची वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या भात्यात सर्व प्रकारचे फटके होते. अत्युत्तम पवित्रा, अचूक ड्रॉप्स, ठणठणीत स्मॅश अशी अनेक वैशिष्ट्ये त्यांच्या खेळात असली तरी त्यांचं अमोघ अस्त्र म्हणजे त्यांचा लाजवाब बॅकहँड! ज्याच्या खेळामुळे, टेनिस का बॅडमिंटन? असा नाटेकरांचा 'हॅम्लेट' झालेला यक्षप्रश्न सुटला, तो मलायाचा वांग पेंग सेन सा हा नाटेकरांचा आदर्श होता. तसा बॅकहँड आत्मसात करण्यासाठी नाटेकरानी प्रचंड मेहनत घेतली. मुंबईत शिकत असताना आपल्या खोलीतल्या भिंतीवर ते जोराने बॅडमिंटन शटल् मारून आपटत आणि ते वळून परत यायच्या क्षणी भर्रकन वळून त्याला बॅकहँडचा टोला लगावत! यामुळे अचूक टायमिंग साधण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी आले. त्याचबरोबर त्यांचा स्वत:चा डिफेन्स भक्कम होता. इंग्रजीत 'वॉटर-टाईट डिफेन्स' म्हणतात तसा. कुणाचंहि कोचिंग न मिळालेले नाटेकर खऱ्या अर्थाने स्वयंभू होते! हॅमरगार्ड हॅनसेन या डॅनिश खेळाडूचे स्मॅशेस् अितके जोरदार असत की बॅडमिंटन फुलाचे पंख फटक्यात गळून पडत! असे जोरदार स्मॅशेस नाटेकर अगदी सहजपणे परतवून टाकत. त्यांच्या स्वत:च्या खेळात आक्रस्ताळेपणा किंवा अुगाच शक्तिप्रदर्शन कधीच नसे. त्यांचा खेळ हा चातुर्याचा, बुद्धिचा खेळ असे. स्मॅश अुगाच जोरात मारायचा नाही, जेव्हा केव्हा स्मॅशचा अुपयोग करायचा तेव्हा तो अगदी नेमकेपणाने आणि अचूक टायमिंग साधून करत. त्यामुळे त्यांचा स्मॅश, बरोबर प्रतिस्पर्ध्याच्या खेळणाऱ्या हाताच्या, छाती आणि कंबर याच्यामधल्या शरीराच्या भागात जाई आणि प्रतिस्पर्धी गोंधळून जाई. स्मॅश परतवून लावणं त्याला अशक्य होई. हमखास पॉईंट नाटेकराना मिळून जाई. त्यांच्या अशा भेदक नेमकेपणामुळे मोठमोठे खेळाडू त्यांच्यासमोर केविलवाणे भासत! अुगाच जीव काढून खेळलेला खेळ हा 'निर्गुणी' असतो! अशा अर्थाने की त्या खेळाला गुण (पॉईंट) मिळत नाही! त्या दृष्टीने नाटेकरांचा खेळ 'गुणवान' होता. ऐन अुमेदीतील त्यांचा खेळ पहाणारे रसिक त्यांच्या खेळातील 'डेलिकसी' बघून त्यांच्या खेळाला 'पोएट्री' म्हणत असत. फूल,मग ते बागेतील असो किंवा बॅडमिंटनचे असो, ते कसं नाजूकपणानेच हाताळायला हवं!ती नाजुकता, कलात्मकता त्यांच्या खेळात होती. त्यांचं बॅडमिंटन कोर्टावरचं फूटवर्क म्हणजे एखाद्या स्वर्गीय नर्तिकेचा पदन्यास भासावा, असं होतं.विलक्षण चापल्य त्यात होतं. त्यांचं सुंदर पदलालित्य आणि खेळातील नजाकत बघूनच रसिकजऩ त्यांच्या खेळाला मूर्तिमंत 'काव्य' म्हणत असत.

प्रस्तुत लेखकाला नाटेकरांच्या अुतारवयातील का होईना, पण त्यांचे चांगले खेळ बघायला मिळाले हे भाग्यच. अर्थात शब्दांनी कितीही वर्णन केलं तरी कुणाच्याही खेळाला 'न्याय' देता येत नाही! दोन्ही डोळ्यानी 'प्रत्यक्ष'बघणं हेच खरं!

ज्या १९५० च्या दशकात नाटेकर क्रीडाक्षेत्रात आले तेव्हा आजच्यासारखी पैशाची प्रलोभने नव्हती. (आजसुद्धा क्रिकेट, टेनिसच्या तुलनेत बॅडमिंटनमध्ये कमीच) निव्वळ खेळण्याची अनिवार हौस हीच गोष्ट नाटेकराना खेळात घेऊन आली.पण बॅडमिंटन काही आयुष्यभर पुरणारी गोष्ट नाही. तशी व्यावसायिकता त्या काळी तर नजरेच्या टप्प्यातसुद्धा नव्हती. म्हणून तर नाटेकरांच्या वडिलानी सूज्ञपणे, त्याना कॉलेजात असताना, वर्षाच्या वर्षाला पास होण्याची सक्ती केली होती. त्या सूज्ञपणामुळे नाटेकर, बॅडमिंटनच्या रणधुमाळीतून बी.ए. झाले. स्टॅनव्हॅक कंपनीत नोकरीला लागले. आता ते हिंदुस्थान पेट्रोलियममधून निवृत्त होऊन निवांतपणे पुण्यात स्थायिक झाले आहेत. हा एक चांगला योगायोगच म्हणायचा. कारण बॅडमिंटन खेळाचा जन्मच मुळी पुण्यात झाला! आज ६६-६७व्या वर्षीसुध्दा गोल्फ खेळताना तास न् तास ते स्वत:ला हरवून बसतात. त्यांची अलीकडेच प्रत्यक्ष भेट घेतल्यावर, प्रस्तुत लेखकाच्या लक्षात आलं, ते हे की बॅडमिंटन 'वजा' करुनहि त्यांच्या लोभस व्यक्तिमत्वामध्ये अनेक सुंदर गोष्टींचा मिलाफ आहे. ते अभिजात रसिक आहेत. मराठी वाङ्मयाचे ते जाणकार वाचक आहेत. त्यामुळे साहित्यिक वर्तुळात त्यांची अुठ-बस आहे. जागतिक मराठी परिषद मॉरिशसला भरली, तेव्हा नाटेकरांचा हृद्य सत्कार करण्यात आला होता. त्यापेक्षाही अधिक म्हणजे अभिजात शास्त्रोक्त संगीताचे ते मोठे दर्दी आहेत. श्रवणभक्त आहेत. कुमार गंधर्वांशी त्यांची घनिष्ट मैत्री होती. एखाद्या मैफलीला नाटेकर चुकून जरा अुशिरा पोचले तर कुमार त्याना हाक मारुन समोर बसवून घेत असत आणि वर अितराना समजावून सांगत की या रसिकाची जागा माझ्याजवळ बसण्याची आहे म्हणून. भीमसेन जोशी, पं.रविशंकर यांच्याशी त्यांची अशीच खास जानपहचान आहे आणि या साऱ्या बुजुर्गांच्या मैत्रीचा नाटेकराना खास अभिमान आहे. एका संगीतकाराने सांगितले की जसं निर्जीव तबल्यातून झकीर जिवंत 'बोल' काढतो, रविशंकरची सतार आपल्याशी 'बोलत' आहे, संवाद साधत आहे असं रसिकाला वाटतं तसंच आम्हा संगीतकारांना नाटेकरांचा खेळ पहाताना, एखादी मैफल ऐकल्याचा भास होतो! बॅडमिंटनचं निर्जीव फूल जिवंत होऊन मजेत झोके घेतय असं वाटतं!हा संगीताचा 'कान' नाटेकरांना सांगलीतच मिळाला. त्यांच्या बहिणीला, नलूताई देसाईना, सांगलीचे प्रख्यात हार्मोनियम वादक बाळकृष्णबुवा मोहिते शिकवायला येत तेव्हाच अनेक सुरावटी ऐकून त्यांचा कान तयार झाला आणि संगीताची आवड वाढीस लागली ती आजोळच्या डॉ.देसाईंच्या घरामुळे.

सांगलीत त्याकाळी संगीताचे जलसे, मैफली फक्त सांगली जिमखान्यातच होत असत आणि गाणारी मंडळी डॉ. देसाई यांच्या घरीच अुतरत. त्यामुळे हिराबाई बडोदेकर, गंगूबाई हनगल, मोगूबाई कुर्डीकर, मा. कृष्णा अशा अनेकांचे प्रत्यक्ष गाणं नाटेकरानी ऐकलचं पण अितर कुणाला मिळणार नाही अशी त्यांचा रियाझ ऐकण्याची संधी पण त्याना मिळाली. भविष्यकाळात ज्या लता मंगेशकरांच्या हस्ते त्यानी बक्षिसे घेतली त्या लताचं गाणं त्यानी लहानपणी सांगली जिमखान्यात ऐकलं. त्यावेळी सांगलीत राहाणाऱ्या लताबाई अवघ्या १२।१३ वर्षाच्या होत्या. या संगीताच्या प्रेमापोटीच नाटेकरानी आपल्या मुलीचं नाव 'संगीता' ठेवलं असावं!

त्यांच्या मनात आजच्या क्षणीही सांगलीच्या आठवणी सजग असतात. सांगलीचं बालपण आठवतं. न्यूयॉर्कच्या रस्त्यातून हिंडताना, गगनचुंबी-स्कायस्क्रेपर्स बघून त्यांना सांगलीच्या श्रीगजानन मिलचा अुंच टॉवर आठवे आणि असे किती टॉवर्स म्हणजे ही न्यूयॉर्कची स्कायस्क्रेपर होईल? या अुंचीचे गणित ते मनातल्या मनात मांडून बघत. (कारण लहानपणी जास्तीत जास्त अुंचीची कल्पना म्हणजे गजानन मिलचा टॉवर!)

आपल्या खेळाने बॅडमिंटनमध्ये एक 'युग' निर्माण करणाऱ्या आणि सांगलीचं नाव साऱ्या जगतात अुज्ज्वल करणाऱ्या नंदू नाटेकर यांच्याविषयी सांगलीकरांच्या मनात सदैव अभिमानाचीच भावना राहील यात काय शंका?

●●●

**फिटणार कधी ना ऋण या सांगलीकरांचे...**
**ज्यांनी घडविली चांगली आपली सांगली !**




आधुनिक सांगलीचे जन्मदाते
श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (थोरले)



रयतेचा राजा
श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (धाकटे)




सांगली नगरीचे भाग्यविधाते
मा.पद्मभूषण वसंतदादा पाटील


विष्णूदास भावे



नाट्याचार्य देवल


नाट्याचार्य खाडिलकर


तात्यासाहेब कोटणीस


आबासाहेब सांबारे



राजकवी साधुदास



धनी वेलणकर




प्रा. ग. ह. रानडे




कवी काव्यविहारी




वि. स. खांडेकर




हरि नाना पवार



बुद्धिबळपटू म्हैसकर



नटवर्य मामा पेंडसे


मास्टर अविनाश


क्रिकेटपटू विजय हजारे


बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर


कथाकार पानवलकर


सय्यद अमीन

# सांगली

" चिंतामणराये वसविली
वसंतराये विकसविली।"

## २०० वर्षांच्या सांगलीचा जन्मदाता

# थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन

प्रत्येक गावाला स्वतःचा असा काही चेहरा-मोहरा असतो. स्वतःची अशी ओळख असते. सांगली गावाचं अस्तित्व इ.स. १८०० पूर्वी अगदी नगण्य होतं. आज कुणाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल. १७६८ च्या सुमारास हरिपूर हे गाव सांगलीच्या दुप्पट होतं. सांगलीची लोकवस्ती एक हजार तर त्यावेळी हरिपूरची वस्ती दोन हजार होती! आज तेच हरिपूर सांगलीचं अुपनगर शोभेल! संगीत, साहित्य, नाट्य, क्रीडा, वैद्यक, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रात, सांगलीचं नाव सर्वत्र दुमदुमत आहे.

सांगली नगरीला असा 'नवा चेहरा' मिळवून देण्याचं ऐतिहासिक कार्य केले ते चिंतामणराव (थोरले) आप्पासाहेब पटवर्धन या सांगली संस्थानच्या पहिल्या अधिपतीनी. पेशवाई कालखंडात मिरज येथे पटवर्धन सरदारांची मूळ जहागीर होती. घरगुती कलह सुरू झाल्यावर, मिरज जहागिरीची वाटणी होऊन, अुपरोक्त चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन बाहेर पडले. कृष्णाकाठी असलेलं सांगली गाव त्यानी आपल्या संस्थानची राजधानी म्हणून निवडलं. योग्य ती बांधकामे वगैरे झाल्यावर, १८०१ मध्ये जरी सांगली अधिकृतपणे संस्थानची राजधानी झाली, तरी जानेवारी १८०० मध्येच सांगलीत येऊन आप्पासाहेबानी नवीन पेठा वसवून सांगली गावाचा चेहरा-मोहरा बदलण्यास सुरूवात केली. एका अर्थी आज दिसणाऱ्या आधुनिक सांगलीचा तो जन्मच म्हणायचा !

तेव्हा सांगलीच्या २०० व्या वाढदिवसाच्या निमित्तानं, सांगलीच्या त्या भाग्यविधात्याचं, चिंतामणरावांचं चिंतन करणं समयोचित ठरेल.

या आप्पासाहेबांचा जन्म ५ जानेवारी १७७५ रोजी मिरज किल्ल्यात झाला. सवाई माधवराव आणि दुसरे बाजीराव पेशवे या दोन्ही पेशव्यांचा जन्म त्याच वर्षातील होता. सरदारकीची वस्त्रे आप्पासाहेबाना ६ फेब्रुवारी १७८३ रोजी मिळाली; मात्र त्यावेळी ते केवळ ८ वर्षांचे असल्याने, जहागिरीची सर्व व्यवस्था त्यांचे चुलते गंगाधरपंत पहात असत. गंगाधरपंतांच्या मनातून सरदारकीची वस्त्रे त्यानाच मिळावयास

हवी होती. त्यामुळेच गृहकलह वाढत राहिला. अगदी पेशवाईतील राघोबादादा आणि माधवराव यांच्यामधील गृहकलहासारखाच. परिणामी, पेशवे दरबारच्या संमतीने मिरज जहागिरीचे विभाजन झाले. १८०० च्या जानेवारीत वाटणीची यादी झाली. (या यादीला 'वाटणीची यादी' असे न म्हणता 'घरसमजूत' असे म्हणत.) आप्पासाहेब हे पटवर्धन घराण्यातील वडील शाखेचे आणि पटवर्धन जहागिरीचे मुख्य सरदार. त्यामुळे मिरज ठाणे आणि मिरज किल्ला त्याना मिळावयास हवा होता. तसा त्यांचा आग्रहही होता. पण अखेरीस मध्यस्थांच्या विनंतीवरून त्यानी तो आग्रह सोडला. सहा लाखाचा मुलूख घेऊन ते बाहेर पडले. आपल्या मुलुखातील कृष्णानदीकाठचा सांगली गाव त्याना आवडला. म्हणून आपली संस्थानची राजधानी सांगली हीच त्यानी ठरवली. त्यावेळी सांगली गाव नदीकाठच्या भागापुरतेच सीमित होतं. म्हणून आप्पासाहेबानी पद्धतशीरपणे पेठा आखून गाव वसवण्यास सुरुवात केली. राहावयास सुरक्षित जागा हवी, म्हणून कृष्णा नदीपासून ४-५ फर्लांगावर अुत्तराभिमुख किल्ला आणि राजघराण्यातील मंडळीना राहण्यासाठी वाडा बांधण्याचे आप्पासाहेबानी ठरविले. तो किल्ला म्हणजेच आजचा गणेशदुर्ग. आप्पासाहेब सांगलीत नेमके कोणत्या वर्षी आले याचा अुल्लेख मिळत नाही. कारण वाटण्या झाल्याझाल्याच त्याना पेशव्यांचे सरदार म्हणून युद्धात अडकून पडावे लागले. त्यामुळे गणेशदुर्ग बांधकामास विलंब लागला.

करवीरकर छत्रपतींबरोबर पेशवे दरबारचे काही वैमनस्य आले होते. तेव्हा त्यांच्यावर चालून जाण्याची आज्ञा परशुरामभाऊ पटवर्धन याना झाली. त्यांच्याबरोबर आप्पासाहेब गेले. हरिपूर-समडोळीत, कृष्णा नदीच्या काठी, आप्पासाहेब आणि करवीरकर मंडळी यांच्यामध्ये चकमकी झाल्या; तेव्हा करवीरकर मंडळी माघारी गेली. दरम्यान निपाणीजवळ परशुरामभाऊ पटवर्धन आपला गोट घेऊन होते. ते बेसावध असताना करवीरकर मंडळीनी त्यांच्यावर हल्ला चढवून त्याना निर्दयपणे मारले; तेव्हा सर्व पटवर्धन मंडळी कोल्हापूरवर चाल करून गेली. करवीर शहरावर आप्पासाहेबानी मोर्चे लावले. मात्र याच सुमारास बाजीरावसाहेब पेशवे आणि दौलतराव शिंदे या दोघांमध्ये मोहिमेविरुद्ध काही मसलत ठरत होती. त्यामुळे पटवर्धन मंडळीना वेढा अुठवावा लागला आणि आप्पासाहेब सांगलीस परतले. ह्या सर्व घडामोडी फेब्रुवारी १८०० च्या दरम्यान घडल्या.

यानंतरची आप्पासाहेबांच्या जीवनातील मोठी घटना म्हणजे धोंडजी वाघाबरोबरची लढाई. त्याच वर्षाच्या अुत्तरार्धात, कर्नाटक भागात धोंडजी वाघ नावाच्या लुटारूने स्वतःजवळ फौजफाटा बाळगून इंग्रज, पेशवे, पटवर्धन, रास्ते वगैरेच्या कर्नाटक भागातील मुलुखात बरीच लुटालूट चालवली होती. त्याच्यावर इंग्रजातर्फे जनरल वेलस्ली, पेशव्यांतर्फे सरदार धोंडोपंत गोखले, (सेनापती बापू गोखले यांचे चुलते)

आणि पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे सांगलीकर आप्पासाहेब पटवर्धन चालून गेले. बऱ्याच चकमकी घडल्या. १० सप्टेंबर १८०० रोजी झालेल्या चकमकीत धोंडजी वाघाने, आप्पासाहेब, धोंडोपंत गोखले याना घेरले. कर्नाटकातील हल्याळ येथे मोठी लढाई झाली. धोंडोपंत गोखले आणि त्यांचा पुतण्या आप्पाजी गणेश, धोंडजी वाघाच्या तावडीत सापडले आणि त्या अुभयतांना निर्घृणपणे मारण्यात आले. खुद्द आप्पासाहेब पटवर्धन यांच्या नाकावर तलवारीचा वार बसून नाक लोंबू लागले! अुजव्या बरगडीस आणि कुशीस तीन जखमा झाल्या. पण त्या स्थितीतही त्यानी युद्ध चालूच ठेवले. पुढे जनरल वेलस्लीने धोंडजी वाघाचा नाश केला. आप्पासाहेबांच्या शौर्याबद्दल पेशवे दरबाराने कौतुक केलेच पण वेलस्लीने त्यांच्या धैर्याची प्रशंसा केली. या युद्धामुळे आप्पासाहेबांची प्रतिष्ठा वाढली. बापू गोखले यांच्यासारखा पुढे इतिहासात गाजलेला सेनापतीही त्यांना मानू लागला.

या दोन्ही युद्धांमधून सवड मिळताच १८०५ मध्ये आप्पासाहेबानी सांगलीत परतल्यावर गणेशदुर्गाचे काम सुरू केले आणि १८०७ पर्यंत सर्व बांधकाम पूर्ण केले. चारी बाजूनी खंदक आणि एकूण सात बुरुज असलेला हा भुईकोट किल्ला म्हणजे सांगलीच्या वैभवात भर टाकणारी वास्तू आहे. मिरज जहागिरीतून, आप्पासाहेब बाहेर पडले तेव्हा असं म्हणतात की त्यांच्याजवळ फक्त सिंहासनारूढ ताम्र धातूची श्रीगणेशाची मूर्ती होती. त्यावेळी मनोमन त्यानी त्या मूर्तीची आराधना करून म्हटलं की सर्व गोष्टी माझ्या मनासारख्या होऊ देत, मग मी तुझी प्रतिष्ठापना एका मंदिरात करेन. सुदैवाने तसंच झालं. आज सांगलीचे भूषण असणारे गणपतीमंदिर त्यामुळेच बांधले गेले. १८११ मध्ये सुरू झालेलं मंदिराचं काम तब्बल ३० वर्षे चालू होतं. बांधकाम पूर्ण झाल्यावर १८४४ मध्ये 'अर्चा' समारंभ एखाद्या लग्न कार्यासारखा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. एका बाजूला हे चालू असताना दुसऱ्या बाजूला राजकीय क्षितिजावर मोठ्या घटना घडत होत्या. १८१८ मध्ये इंग्रजानी पेशवाई पूर्णपणे संपुष्टात आणली. सातारकर छत्रपती, जे मराठी राज्याचे मूळ मालक ते नामशेष झाले. तेव्हा त्यांच्या सर्व सरदारांनी आपल्या चाकरीत यावे म्हणून इंग्रजानी जवळजवळ सक्तीच चालवली हाती. तसे फर्मानच त्यानी काढले होते. प्रत्येकजण तह करून आपले स्थान कायम करण्याच्या प्रयत्नात होता. मात्र त्यामध्ये आप्पासाहेब अपवादात्मक संस्थानिक होते. इंग्रजांची चाकरी करण्यास त्यांचे मानी मन बिलकूल तयार नव्हते. त्यानी इंग्रजांबरोबर बरीच वर्षे हुज्जत घातली. १८१२ साली जो पंढरपूरचा करार झाला होता, त्याप्रमाणे पटवर्धन सरदारानी पेशवे सरकारची नोकरी अिमाने अितबारे करावी असा करार होता. त्याचबरोबर पेशव्यानी, पटवर्धन मंडळींचा मान राखावा, दर्जा राखावा आणि त्याबद्दलची जबाबदारी, कंपनी सरकारने

घ्यावयाची होती. ही गोष्ट आप्पासाहेब वारंवार कंपनी सरकारच्या नजरेस आणून देत होते. त्याच्या पुढे जाऊन त्यानी इंग्रजांना ठणकावले की याच कराराचा दुसरा अर्थ असा होतो की आम्ही फक्त पेशव्यांची चाकरी करण्यास बांधील आहोत; अितर कोणास नाही. हा सर्व पत्रव्यवहार मुळातून पाहाण्यासारखा आहे. त्यातून आप्पासाहेबांची स्वाभिमानी वृत्ती, सडेतोड बाणा प्रकट होतो. पोरस राजा, सिकंदर बादशहासमोर ज्या ठामपणे अुभा राहिला, तसेच आप्पासाहेब इंग्रजांसमोर राहिलेले दिसतात. अर्थात् हा सामना, असमानांचा होता. पत्रापत्री करून आप्पासाहेब काही नमत नाहीत हे बघून इंग्रजानी, जनरल प्रिट्झलर याला फौज देऊन सांगलीकडे रवाना केले! मग मात्र सर्व आप्तेष्ट, हितचिंतक, कारभारी मंडळी यानी आप्पासाहेबांची समजूत घातली. तेव्हा कुठं ते इंग्रजांबरोबर तह करण्यास राजी झाले. नोकरी (इंग्रजांची) न करण्याचा त्यांचा हेका मात्र त्याना चांगलाच महागात पडला. त्याबद्दलची नुकसान-भरपाई म्हणून त्याना, आपल्या जहागिरीपैकी नवी हुबळी, तुरूम आणि बरडोल हे रु. १,३५,०००/- चे तालुके कायमचे इंग्रजांच्या घशात घालायला लागले!

इतके होऊनही आप्पासाहेबांचा इंग्रजांबरोबर वागण्यातील ताठा मात्र कमी झाला नाही. त्यांचा पहिला मुलगा गेल्यावर त्यानी एक मुलगा दत्तक घेतला होता, तो इंग्रजानी मान्य केला नाही. इंग्रजांच्या काही गुन्हेगारांस, (बाबाजी चिमणाजी गोखले प्रकरण) आप्पासाहेबानी आपल्या मुलुखात राजरोस आश्रय दिला; अशा कारणांवरून त्यांचे इंग्रजांबरोबर खटके अुडतच होते. कालांतराने, दोन्ही बाजूंचा विरोध मावळत गेला. गव्हर्नर माल्कम आल्यावर तर संबंधात बरीच सुधारणा झाली. विशेषतः कोल्हापूर संस्थानात १८४४ मध्ये जे बंड झाले होते, त्याप्रसंगी आप्पासाहेबानी इंग्रज सरकारला लष्करी मदत केली. त्याबद्दल इंग्रज सरकारने १५ नोव्हेंबर १८४६ रोजी बेळगाव येथे खास दरबार भरवून सर्व सन्माननीय अुपस्थितांच्या समक्ष आप्पासाहेबांचा खास सत्कार केला. 'गार्ड ऑफ ऑनर'ने त्याना सलामी देण्यात आली. सोन्याच्या मुठीची इंग्लंडमधून आणवलेली मौल्यवान तलवार त्याना थाटामाटात देण्यात आली.

इंग्रजांबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाल्यावर आणि गणपतीमंदिरात 'अर्चा' समारंभ झाल्यावर, सांगली संस्थानात नवीन नवीन सुधारणा करण्यास आप्पासाहेबाना मोठी अुमेद आली.

सांगली गावाच्या आधुनिकीकरणाकडे त्यानी स्वतः लक्ष पुरवले. मुंबईस बरेचदा आप्पासाहेबांचे जाणे होई. तेथील रस्त्यांप्रमाणे सांगलीत त्यानी चांगले, रुंद, सरळ रेषेत असलेले रस्ते आखून, रस्त्याकडेस झाडे लावण्यास सुरूवात केली. त्याना स्वतःला बागा, मळे, तलाव बांधण्याचा छंद होता. सांगलीत आणि सांगलीबाहेर

मिळून त्यानी पंचवीस तरी मळे तयार केले. त्यात आंबराई व हिराबाग प्रथम तयार करण्यात आली. कुटुंबातील सर्व माणसांच्या नावे, आप्पासाहेबानी मळे तयार केले होते. अुदा. तात्यासाहेब मळा, रावसाहेब मळा, बापूसाहेब मळा, बाईसाहेब मळा वगैरे. अनेक बागांमधून ते स्वतः जात आणि जातीने थोडे काम करीत. चांगल्या तऱ्हेचे अंजीर, द्राक्षे, आंबे वगैरे फळे पंढरपूर वगैरे देवालयात पाठवून देत. गुलाबांची फुले तर दहा हजारांहून अधिक निघत असत असं तत्कालीन पत्रव्यवहारांमध्ये नमूद केलेले आहे. आप्पासाहेबांच्या या बागांच्या आवडीवरून एका तत्कालीन कवीने म्हटले आहे.

"सांगलीला जा मनुजा श्रीगणपती पाह्याला ।
जे गजवक्त्रसुनेत्रचतुर्भुज तद्रुपाध्यायाला ।।
यत्पृष्ठभागी शोभे कृष्णा तत्सलिली नाह्याला ।
जागा जागा बागा त्यातील फळ पुष्पे वाह्याला ।।"

बागबगींच्याबरोबरच अुत्तम जातीच्या गाईबैलांची पैदास वाढविण्याची त्यांची खटपट असे. बाहेरून चांगल्या जातीचे वळू मिळवून, त्यांची चांगली निपज करण्यात आप्पासाहेबानी चांगले यश मिळविले. त्या काळी लष्करातील तोफा ओढण्यास चांगले बैल म्हणजे बळकट बैल लागत. बेळगावच्या इंग्रज फलटणीना असे बैल पुरवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. म्हणून या कामामध्ये त्यानी रस घेतला असावा.

इंग्रजांच्या सुधारणांनी जसे काही सुशिक्षितांना दिपवून टाकले होते तसे त्यांच्या छापखान्याच्या शोधामुळे आप्पासाहेब भारावून गेले होते. बाळशास्त्री जांभेकरांचे 'पंचोपाख्यान' इंग्रजानी छापले तेव्हा ते बघून आप्पासाहेब अितके हरकून गेले की ताबडतोब पुणे-मुंबईकडे माणसे पाठवून, आवश्यक ती अुपकरणे आणवून, तंत्रज्ञान शिकून घेऊन १८२१ मध्येच त्यानी सांगलीत छापखाना (शिळाप्रेस) सुरू केला. आणि त्या छापखान्यात, 'भागवत' पुराणाच्या प्रती छापवून, चातुर्मासात ब्राम्हणांना दक्षिणेसह दिल्या.

आप्पासाहेब विलक्षण कल्पक होते. जुनी माहिती मिळेल तेथून जमविण्याची त्यांची नेहमी धडपड असे. पेशवाईचा अस्त झाल्यावर घरी बसलेल्या लोकांकडून त्यानी दुर्मिळ माहिती मिळवून आपल्या संग्रही ठेवली होती. नाना फडणीस यांची पत्नी मेणवलीस राहात होती. त्यांच्याकडून त्यानी बरेच कागद मिळवले होते किंवा काही नकला करवून आणल्या होत्या. त्याचबरोबर पटवर्धन घराण्याचा एक मोठा वंशवृक्ष १८३५ च्या सुमारास त्यानी तयार करवून घेतला होता.

वास्तविक पटवर्धन जहागिरीचे मिरज हे मुख्य ठाणे. सांगली त्या तुलनेत

अत्यंत नगण्य गाव. पण आप्पासाहेबानी सांगली राजधानी केल्यावर, प्रयत्नपूर्वक आणि योजनाबद्ध रीतीने तिची वाढ केली. शास्त्री, पंडित, हरहुन्नरी कारागीर, वैद्य, व्यापारी अशा सर्वांना सवलती देऊन त्यानी सांगलीत आणले. त्यामुळे सांगलीची मोठ्या प्रमाणावर भरभराट होत गेली. त्यांची गुणग्राहकता फार मोठी होती. त्यासाठी विष्णुदास भावे हे एकच अुदाहरण पुरेसे आहे. मराठी नाटकाचे जन्मदाते म्हणून त्याना आपण जे श्रेय देतो, त्यापैकी निम्मे श्रेय आप्पासाहेबाना दिले पाहिजे. मराठी नाटक लिहिण्याची आणि रंगभूमीवर आणण्याची संपूर्ण प्रेरणा, त्यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ, नाटकात नटवर्ग मिळविण्यासाठी त्यानी सर्वसामान्यांना देऊ केलेली बक्षिसे हे सर्व पहाता, विष्णुदासांच्या बरोबरीने मराठी रंगभूमीच्या जनकत्वाचे रास्त श्रेय आप्पासाहेबानाच द्यायला हवे. या गुणग्राहकतेमुळेच त्यांच्या पदरी गोपिनाथदादा आगाशे यांचेसारखे मोठे शास्त्री, सखारामबुवा गोडसे यासारखे गवई, अशी मंडळी होतीच, पण त्याचबरोबर 'कुमारी', 'मोतापा' घाटाची भांडी बनवणारे कुशल तांबट, गणपतीची सुबक मूर्ती बनवणारे मुकुंदा पाथरवट अशी गुणी माणसं पण त्यांच्याकडे होती. १८३४ साली सांगलीत नाणी पाडण्यासाठी आप्पासाहेबानी टांकसाळ सुरु केली. त्याआधी १८२१ मध्ये पहिला छापखाना सुरू केला तो पदरी बाळगलेल्या अशा गुणी माणसांच्या बळावरच !

१५ जुलै १८५१ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी या स्वाभिमानी, गुणग्राही, कल्पक, दीर्घोद्योगी आणि पराक्रमी राजाचे निधन झाले. आज सांगली दोनशे वर्षाची होत आहे. अनेक क्षेत्रात सांगलीचं नाव दुमदुमत आहे. महाराष्ट्राच्या नकाशावर सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा विविध स्तरांवर सांगलीचं स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहेच पण हळदीमुळे अुभ्या देशात सांगलीचे नाव सर्वतोमुखी आहे.

या साऱ्या भरभराटीच्या मुळाशी श्रीमंत चिंतामणराव (थोरले) आप्पासाहेब पटवर्धन हा थोर राजा आहे. त्यामुळे आज सांगलीच्या २०० व्या वाढदिवस-वर्षात त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेवणे समयोचित ठरेल; नव्हे, सांगलीकरांचे ते पवित्र कर्तव्यच आहे.

■■■

## स्वातंत्र्योत्तर काळातील सांगलीचे भाग्यविधाते

# वसंतदादा पाटील

''कैदी पळाले. कैदी पळाले. तुरुंग फोडला'' सगळीकडे एकच कोलाहल माजला. पाठोपाठ संस्थानी शिपायांच्या शिट्टयांचे कर्णकर्कश आवाज आले. गोळीबारांच्या फैऱ्यांचे आवाज येऊ लागले. शनिवारचा दिवस म्हणजे सांगलीच्या बाजारचा दिवस. भाजीवाले, फळवाले, चार पैसे कमवायला आलेले खेडूत, गिऱ्हाइके सर्वांची पळापळ झाली. घाबरगुंडी अुडाली. भर बाजारातून काही कैदी आयर्विन पुलाकडे पळताना दिसले. पाठोपाठ पाठलागावर असलेले घोडेस्वार दौडत आले. कुणा कैद्यांनी ऐन जुलैमध्ये तुडुंब भरुन वाहणाऱ्या कृष्णा नदीच्या विशाल पात्रात अुड्या मारल्या. काहीजण पुलावरुन भरधाव पळाले. पलीकडे असलेल्या सांगलीवाडी गावातून कृष्णा नदीच्या पैलतीरावरुन धावू लागले. मागून सटासट गोळ्यांचा वर्षाव होत होता. नदीच्या पात्रातून पोहणाऱ्या एका कैद्याला वर्मी गोळी बसली. लालसर रंगाचे कारंजे अुडाले. पाच-सहा कैदी नदीकाठाने धावत होते. त्यांच्या पिछाडीशी शिपाई येऊन भिडले. प्रसंग बाका होता. तेव्हा त्यांच्या नायकाने इतराना ओरडून सांगितले ''तुम्ही पळा. नदी पोहून हरीपूरच्या बाजूने सटका. तोवर मी या शिपायाना अडवतो.'' इतके बोलून नदीकाठच्या दाट झाडीच्या आश्रयाने, त्याने पाठीवरच्या पोलिसांवर बंदुकीतून बार काढायला सुरुवात केली. या अनपेक्षितपणे झालेल्या प्रतिहल्ल्याने पाठलागावरचे पोलिस भांबावले. त्या गडबडीचा फायदा घेऊन बाकीचे सहकारी पुढे पळाले; अिकडे त्या नायकाचा गोळीबार चालूच होता. फैरीवर फैरी काढता काढता ८५ बार काढून झाले. पण दुर्दैव आडवे आले. बंदुकीचा घोडा अडला. त्या शूराने झाडाचा आडोसा घेत बंदुकीचा घोडा ओढायला सुरुवात केली. त्या धावपळीत झाडाच्या बुंध्याबाहेर आलेला त्या वीराचा खांदा पोलिसांना दिसला. क्षणाचीहि अुसंत न देता गोळ्यांचा वर्षाव झाला. गोळी खांद्यातून आरपार गेली. डोळ्यासमोर अंधेरी आली. तो शूर नायक धाडकन् जामिनीवर कोसळला. बेशुद्ध पडला. लागलीच त्याला जेरबंद करण्यात आले.

हा निधड्या छातीचा शूरवीर म्हणजे वसंत बंडूजी पाटील. आपल्या कर्तृत्वाने

नुसत्या ‘दादा’ या प्रेमळ संबोधनाने, अुभ्या महाराष्ट्राला परिचित असलेले आणि अभिमानाचा विषय झालेले वसंतदादा पाटील. ऐन स्वातंत्र्यसंग्रामात सांगलीच्या गणेशदुर्गात असलेल्या तुरुंगातून, त्यांनी धाडशी बेत आखून, आपल्या १४ सहकाऱ्यांना बरोबर घेऊन पलायन केले. तटाभोवतालच्या खंदकात असलेल्या पाण्यात अुड्या टाकून पळताना काहींची हाडे मोडली. पाय तुटले. नदीतून पळताना काही जखमी झाले. मृत्युमुखी पडले. केवळ वसंतदादांच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणून जबर जखमी होऊनसुद्धा, शरीरातील गोळ्या काढल्यावर ऑपरेशन यशस्वी होऊन ते वाचले.

अशा या वसंतदादांचा जन्म १३ नोव्हेंबर १९१७ सालचा. पुढे आयुष्यात सांगली ही त्यांची कर्मभूमी झाली असली तरी त्यांची जन्मभूमी कोल्हापूरची. मूळ गाव सांगलीपासून ३ मैलावर असलेले, श्रीगुरुदत्त माऊलीच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले पद्माळे हे होते. आज कुणाला माहीतहि नसेल पण वसंतदादांचे पाळण्यातील नाव ‘यशवंत’ होते. काय योग पहा. आयुष्यात दुसऱ्या एका ‘यशवंताच्या’ सहवासातच त्यांचे कर्तृत्व फुलले; सर्वाथाने ते यशवंत झाले. अवघे दहा महिन्याचे असतानाच, छोट्या वसंताच्या मातोश्री रुक्मिणीबाई आणि वडील बंडुजी पाटील यांचे तापसरीने (एन्फ्लूएंझा) निधन झाले. अवघ्या दोन तासांच्या अंतराने नियतीने एकाच दिवशी दोघांचा बळी घेतला. वसंता आणि त्यांचे थोरले बंधू शामराव यांचा सांभाळ त्यांच्या आजीने केला. वसंतदादांचे मामा दत्तोबा तातोबा पाटील हे आपल्या बहिणीच्या कुटुंबावर आलेल्या दुर्दैवी प्रसंगात धावून आले. त्यांनी सर्वांना आपल्या कागल गावी नेले. थोरला शामराव १३-१४ वर्षाचा आणि धाकटा वसंता १० वर्षांचा झाल्यावर, आजी त्याना पुन्हा पद्माळे गावी घेऊन आली. गावकऱ्यांच्या मदतीने तिने घरची शेती कसायला सुरुवात केली. योगायोगाने त्याच वेळी गावात नुकतीच प्राथमिक शाळा सुरु झाली होती आणि ती सुद्धा आजीनेच मोकळ्या करुन दिलेल्या घराच्या जागेत. त्यामुळे वसंतदादांचे चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण तिथेच झाले. पाचवीसाठी शेजारच्या कर्नाळ गावच्या शाळेत त्यांचे नाव घालण्यात आले. त्याच वर्षी सोलापूरच्या मल्लाप्पा धनशेट्टी वगैरे चार क्रांतिकारकांना तत्कालीन ब्रिटीश सरकारने फाशी दिले. त्या घटनेचे गंभीर पडसाद सर्वत्र अुमटले. आपल्या देशाच्या पारतंत्र्याची पहिली वास्तव आणि कठोर जाणीव या प्रसंगाने छोट्या वसंताच्या मनावर झाली. फाशी झाली तो दिवस मकर-संक्रांतीचा होता. वसंतदादानी स्वतः तो सण पाळला नाहीच पण इतरानाहि पाळू दिला नाही. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर फासावर लटकलेल्या हुतात्म्यांची स्मृती म्हणून त्यानी प्रतिज्ञापूर्वक चहा सोडला. त्यांनतर देश स्वतंत्र झाल्यावरच त्यानी पुन्हा चहाला तोंड लावले! ह्या घटनेने कळत न कळत त्यांच्या आयुष्याला वेगळेच वळण लागत गेले.

वसंतदादांचे ६वी, ७ वी चे शिक्षण नंतर सांगलीच्या १ नंबर शाळेत झाले. १९३४ साली त्या काळी अस्तित्वात असलेली व्ह.फा. (व्हर्नाक्युलर फायनल) परीक्षा ते पास झाले. त्याच सुमारास त्यांची कोर्ट ऑफ वॉर्ड्सकडे असलेली वडिलोपार्जित जमीन मोकळी झाली. त्यामुळे वसंतदादानी घरच्या शेतीत लक्ष देण्यास सुरुवात केली. मन लावून ते शेतात राबू लागले. दहा दहा बैलांच्या नांगरांवर त्यानी नांगरट केली. कुळवणी केली. गवत कापून सांगलीच्या शनिवारच्या बाजारात विक्री केली. या अनुभवामुळे त्यांचे शेतीचे आणि शेतीमाला- विषयाचे ज्ञान डोळस बनले. शेतकऱ्यांच्या कष्टाळू जीवनाची आणि त्यांच्या अडीअडचणींची त्याना यथार्थ कल्पना आली. या प्रत्यक्ष ज्ञानाचा त्यांना भावी आयुष्यात फार उपयोग झाला. पारतंत्र्य असल्याने आजूबाजूला बऱ्याच घटना घडत असत. त्यामुळे एकीकडे त्यांची शेती चालू असली तरी दुसरीकडे त्यांचे मन राजकीय घडामोडींचा वेध घेण्यात गुंतलेले असे. सांगली शहरातून येणारी माणसे, वर्तमानपत्रे, यांच्या सतत संपर्कात ते रहात असत. त्यांच्या नेतृत्वगुणाची चुणुकही याच दिवसात दिसून आली. कृष्णा नदीस दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे काठावर अतोनात चिखल होई. पाणी आणताना गावकऱ्यांना त्रास होई, कपडे धुताना स्त्रियांचे हाल होत. वसंतदादानी त्यावेळी पुढाकार घेऊन, समस्त गावकऱ्यांना श्रमदानासाठी एकत्र केले. नदीकाठी घाट बांधला. हे त्यांचे पहिले सामाजिक कार्य म्हणायला हरकत नाही.

१९३५ मध्ये काँग्रेस पक्षाच्या स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात, पं.जवाहरलाल नेहरुंचा सातारा-कराड भागात दौरा झाला. त्यामुळे जनजागृती मोठ्या प्रमाणावर झाली. चैतन्याचे वारे वाहू लागले. वसंतदादांनी पद्माळे येथे काँग्रेस कमिटी स्थापन केली. त्यांचे तडफदार कार्य पाहून लौकरच त्याना तासगाव तालुका काँग्रेसचे सेक्रेटरी करण्यात आले. वसंतदादा आता तालुक्याच्या राजकारणात भाग घेऊ लागले. पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोचविण्याच्या कामामुळे त्यांचा जनसंपर्क वाढला. त्या पारतंत्र्याच्या काळात काँग्रेसची कामे करणे जोखमीचे होते. सतत पोलिसांची नजर असे. घरच्या आघाडीवर मात्र दादाना, थोरल्या भावाचा, शामरावांचा भक्कम पाठिंबा होता. ते संतप्रवृत्तीचे होते. वेळोवेळी हाल सोसून त्यांनी आपल्या धाकट्या भावाला, वसंताला, स्वातंत्र्यलढ्याच्या कामात नेहमी प्रोत्साहनच दिले.

१९४० नंतर स्वातंत्र्यलढा निर्णायक स्वरुपात सुरु झाला. याच काळात म.गांधीनी वैयक्तिक सत्याग्रहाची हाक दिली. पहिले सत्याग्रही म्हणून विनोबाजी भावे यांची निवड झाली. तासगाव तालुक्यातून वसंतदादांची निवड झाली होती. त्यावेळी त्याना पहिल्यांदा तुरुंगवास घडला. सहा महिन्याची सक्त मजुरी झाली होती.

हा तुरुंगवास म्हणजे दादाना एक प्रकारचे वरदानच वाटले. काकासाहेब गाडगीळ, बाळासाहेब खेर, सरदार पटेल अशा ज्येष्ठ नेत्यांच्या ते संपर्कात आले.

या तुरुगवासानंतर वसंतदादांचा आत्मविश्वास दुणावला. त्यात १९४२ चे 'चलेजाव' आंदोलन सुरु झाले. सुभाषबाबूंचा सशस्त्र क्रांतीचा लढा सुरु झाला. त्याचा त्यांच्या मनावर काहीसा प्रभाव असावा. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलाढ्य ब्रिटीश सत्तेविरुद्ध लढा द्यायचा म्हणजे निव्वळ सत्याग्रह-मोर्चे-आंदोलनानी काही साधत नाही. त्यापेक्षा थोड्या वेगळ्या मार्गाने जाऊन, गनिमी काव्याने सरकारशी लढा द्यावा असा विचार वसंतदादा आणि त्यांचे सहकारी यांच्या मनात येऊ लागला. तारुण्यातील रग अंगात होतीच. ब्रिटीश सरकारची सत्ता खिळखिळी करायची, तर त्याना काही तरी त्रास पोचेल असे धक्कादायक करायला हवे असे सर्वाचे मत झाल्यामुळे पोस्टाच्या थैल्या पळवणे, रेल्वे लुटणे, असे प्रकार सुरु झाले. नांद्रे आणि कर्नाळ स्टेशनाच्या मध्ये रेल्वे पाडण्यात आली. सुरुवातीच्या काळात अशा सशस्त्र हल्लयांमध्ये भाले, कुऱ्हाडी, गोफणी, काठ्या अशी हत्यारे वापरली जात. पण अशा हत्यारांनी भागणारे नव्हते. बंदुकी, रिव्हॉल्वर्स सारख्या आधुनिक शस्त्रास्त्रांची आवश्यकता होती. त्यासाठी पैशांची आवश्यकता पडली म्हणून गोरगरिबांना नाडणाऱ्या व्यापाऱ्यांच्या घरांवर धाडी टाकण्यास सुरुवात झाली. त्यातून मिळालेल्या पैशाच्या जोरावर वसंतदादा गोव्याला जाऊन हत्यारे घेऊन आले. (त्यावेळी तेथे पोर्तुगीजांची सत्ता होती) या अशा अुलाढालींमुळे वसंतदादांच्या खात्यावर अनेक गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्याकाळी रु.१०००/- चे बक्षिस त्याना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने लावले होते. त्यामुळे वसंतदादाना भूमिगत अवस्थेत अर्धपोटी राहावे लागे. पोलिस सतत मागावर असल्याने त्याना चुकवण्यासाठी रानातून छपावे लागे. मग काय आज गंवताच्या गंजीवर, तर अुद्या रानातल्या मळीवर, रात्र रात्र काढावी लागे. घरची माणसे दिसणे मुष्किल, मग त्यांच्या गाठी-भेटी कुठल्या? इकडे पोलिस पद्माळे गावातील लोकांना वसंतदादांचा ठावठिकाणा मिळावा म्हणून छळत असत. शामरावांचा तर अनन्वित छळ झाला. मारहाण झाली. पण माहीत असूनहि त्यांच्यापैकी कुणीही पोलिसांच्या ताकास तूर लावून दिली नाही. एका बाजूला असे निष्ठावंत होते तसे दुसऱ्या बाजूला स्वार्थी वृत्तीचे घरभेदेपण होते. त्यामुळेच वसंतदादा २२ जून १९४३ ला पकडले गेले. सांगलीच्या गणेशदुर्गात अितर कैद्यांबरोबर त्याना डांबण्यात आले. खटला सुरु झाला. शिक्षा नक्की होती. फांशी का जन्मठेप? एवढाच प्रश्न होता.

पण वसंतदादा असे थोडेच फुकाफुकी खितपत पडणार होते? अितर राजबंद्यांबरोबर त्यानी संधान बांधायला सुरुवात केली. प्रातर्विधीच्या निमित्ताने एकमेकाना

भेटून 'ग्रेट एस्केप'च्या या योजना आखल्या जाऊ लागल्या. त्यांच्यावर चालू असलेल्या खटल्याचा निकाल सोमवारी २४ जुलैला लागणार होता. २२ला शनिवार म्हणजे बाजारचा, गर्दीचा दिवस. त्याचा फायदा अुठवावा, नदीकाठच्या साचलेल्या गाळातून पलायन केले तर पोलिसाना पाठलाग करणे अवघड असा सर्व राजबंद्यांचा हिशोब होता. दुपारी दोनच्या सुमारास प्रातर्विधीसाठी काही कैद्यांना बाहेर काढले, तेव्हा चपळाईने दादांनी एका शिपायाची बंदूक हिसकावून घेतली. इतर कैद्यानी अुगाचच आमच्या दादाना का पकडले? दादाना का पकडले? असा खोटाच गलका सुरु केला. एक-दोन दिवसात खटल्याचा निकाल लागणार होताच; खेरीज शिपायांच्या डोक्यात शनिवारच्या बाजार-खरेदीचा विचार होता. त्यामुळे निर्माण झालेली थोडी ढिलाई आणि आताचा गलका यामुळे भांबावलेल्या शिपायांवर, बराकीतील बंदुका काबीज करुन रोखल्या गेल्या. हालचाल कराल तर गोळ्या घालू अशा धमक्या देत १६ कैदी तुरुंगालगतच्या तटावर चढले. सांगलीचा तुरुंग हा गणेशदुर्गात असून, पूर्वी त्याच्या चारी बाजूनी खोल खंदक होता. पावसाळ्याचे दिवस असल्याने खंदकात पाणी होते. दादानी आणि इतरानी त्यामध्ये अुड्या मारल्या व पोहून पलीकडे गेले. अुडी नीट न पडल्याने एकाचा पाय मोडला. सांगलीच्या मारुती मंदिराच्या बाजूने मंडळी बाहेर पडली आणि कृष्णा नदीच्या पुलापलीकडील बाजूने पळत सुटली. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे वसंतदादानी बाजीप्रभूप्रमाणे खिंड अडविली. मरण हाताच्या अंतरावर अुभे होते पण ते दादांचे प्राण हिरावू शकले नाही. नियतीचीच अिच्छा त्यांचेकडून काही भरीव कामगिरी करुन घेण्याची होती.

बेशुद्धावस्थेत पडलेल्या दादाना जबर जखमी अवस्थेत, सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट् केले गेले. त्यांचेवर मोठे ऑपरेशन होऊन बरगड्यांतून गोळ्या काढल्या गेल्या. त्यातून पूर्ण बरे झाल्यावर पुन्हा दादा बंदिस्त झाले. खटल्याचा निकाल लागून दादाना एकूण १३ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. येरवडा जेलमध्ये त्यांची रवानगी झाली. खतरनाक कैदी म्हणून दादाना दंडाबेडीत ठेवले गेले. खडतर कष्ट, झोप नष्ट करणारे असंख्य ढेकूण, अंगाला जागोजागी टोचणारे जाडेभरडे कपडे असा असह्य जीवनप्रवास सुरू झाला.

अशा धामधुमीत १९४६ साल अुजाडलं. दुसरे महायुद्ध संपले.त्यामुळे आपल्या साम्राज्यावर कधीहि सूर्य मावळत नाही अशी घमेंड मारणाऱ्या ब्रिटीश सत्तेची हाडे खिळखिळी झाली होती. स्वातंत्र्य त्यामुळेच आता दृष्टिपथात आलं होतं. वसंतदादांची सक्तमजुरी सांगलीच्या जनतेला साहवेना. त्यांची सुटका व्हावी म्हणून मोर्चे, आंदोलने यांची एकच धमाल अुडाली. वसंतदादा सांगली संस्थानचे कैदी होते. सांगलीच्या

राजेसाहेबानी लोकमताची कदर करुन वसंतदादांची, २५ एप्रिल १९४६ रोजी, पूर्ण शिक्षा संपण्यापूर्वीच सुटका केली. वनवासाहून परतणाऱ्या प्रभू रामचंद्रासारखे अुत्स्फूर्त आणि अभूतपूर्व असे दादांचे स्वागत, सांगलीच्या जनतेने केले. हजारोंच्या जनसमुदायाने रथातून त्यांची मिरवणूक काढली. जागोजागी त्यांचे सत्कार होऊ लागले.

स्वातंत्र्यप्राप्ती झाली. वसंतदादांच्या बाबतीत कौतुकाची बाब ही की स्वातंत्र्यपूर्व काळातील वर्तणूक आणि स्वातंत्र्योत्तर काळातील वर्तणूक, यामध्ये त्यानी जाणिवपूर्वक, स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणले. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा दहशतवाद, बंदुकीचा वापर ही एक अपरिहार्य बाब होती. पण आता आपली सारी ताकद, शक्ती, विधायक कामांसाठी वापरणे ही काळाची गरज होती. वसंतदादांचे मोठेपण याच वस्तुस्थितीत की ती परिवर्तनाची गरज त्यानी वेळीच ओळखली! तत्कालीन सातारा जिल्ह्यातील गुंडगिरी कमी करण्यासाठी त्यानी प्रयत्न केले; क्रांतिकारक मार्गाने जाणाऱ्यानी पूर्वीचा मार्ग विसरावा, यासाठी त्यानी त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. मनापासून प्रयत्न केला. पण पूर्णपणाने तो यशस्वी झाला नाही.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा विकास घडवून आणण्याचा वसंतदादानी आता निश्चय केला.

त्यांच्या विधायक कामांचा थोडक्यात आढावा असा घेता येईल,

१९४९ मध्ये सातारा जिल्ह्याचे विभाजन, अुत्तर सातारा आणि दक्षिण सातारा अशा दोन जिल्ह्यात झाले. द. साताऱ्याचे मुख्य ठिकाण सांगली झाले. हा जिल्हा दादांचे कार्यक्षेत्र बनला.राजकारण आणि समाजकारण या दोन्ही अंगांनी दादांचे जीवन यापुढे बहरुनच गेले!

समाजकारण करताना लहानपणापासून अनुभवलेला शेतकरी वर्ग त्यांच्या डोळ्यांसमोर होता.

भारतात ७० टक्के लोकांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने, त्यांच्या प्रगतीवरच देशाची आर्थिक सुस्थिती, व औद्योगिक विकास अवलंबून आहे, याची दादाना जाणीव होती. पण त्याचबरोबर पिढ्यान्‌पिढ्या शेती करुनही, सर्वसामान्य शेतकरी कर्जबाजारी राहिला, ही वस्तुस्थिती पण त्यांच्या मनाला क्लेश देत होती. शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य बाजारभाव मिळून, चार पैसे त्यांच्या गाठीला राहतील, हा दिलासा त्याना मिळणे अत्यावश्यक होते. त्यासाठी एकच मार्ग होता. तो म्हणजे नियंत्रित बाजारपेठेचा. अर्थात् ही गोष्ट अमलात आणणे सोपे नव्हते. सांगलीच्या राजेसाहेबानी पूर्वी यासंबंधात केलेला प्रयत्न व्यापारांच्या असहकारामुळे फसला

होता. या खेपेला पण व्यापाऱ्यांचा विरोध होताच. एक तर सांगलीत शेतव्यापारासाठी स्वतंत्र वखारभाग असल्याने, व्यापाऱ्यांना वेगळे अधिकृत मार्केटयार्ड नको होते. त्याहिपेक्षा या मार्केटयार्डामुळे काहीजणांच्या गैरवाजवी नफ्यास बाधा येणार होती; त्यांचा अनियंत्रित, अनिर्बंध, हक्क संपुष्टात येणार होता हे त्यांचे खरे दुखणे होते. अपेक्षेप्रमाणे त्यानी जोरदार विरोध केला. कोर्ट-कचेऱ्या केल्या. पण हायकोर्टाचा निर्णय त्यांचेविरुद्ध गेला. सांगलीच्या पूर्वेस १०० एकर जमिनीवर, व्यवस्थित प्लॉटस् पाडून, वसंतदादानी मार्केट यार्ड वसवले होते. त्यांच्या मनाचा मोठेपणा हा की जरी ते कायदेशीर लढाई जिंकले होते, तरी आपुलकीच्या आणि माणुसकीच्या भावनेतून, ते आपणहून व्यापाऱ्यांकडे गेले. त्यांच्याशी मोकळेपणाने बोलून त्यानी त्यांचे गैरसमज दूर केले. त्यांची मने जिंकली. १९५१ मध्ये मार्केट कमिटी स्थापन झाल्यापासून दादा चेअरमन म्हणून काम करत होते. तीन-चार वर्षांच्या अथक परिश्रमानंतर १९५५ च्या गुढी पाडव्याच्या सुमुहूर्तावर प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. सांगलीला सुनियंत्रित बाजारपेठ व्हावी म्हणून सरकारदरबारी खटपट करण्यापासून, तो जागा मिळवून तेथे व्यापाऱ्याना गोडीने आणवून, प्रत्यक्ष व्यवहार सुरु करण्यापर्यंतच्या अनेक खटाटोपी दादानी स्वतः केल्या. शेतकऱ्याना, त्यांच्या मनासारखा बाजारभाव त्यांच्या शेतमालास मिळू लागला. व्यापारी, दलाल व शेतकरी यांच्यामधील सर्व व्यवहारांवर, मार्केट कमिटीचे नियंत्रण असल्याने, शेतकऱ्यांची फसवणूक थांबली. त्यांचा फायदा होऊ लागला. सर्व शेतकरी मंडळी दादाना दुवा देऊ लागली. सुरुवातीला ३००० रु. कर्ज काढून सुरु केलेली ही मार्केट कमिटी, आज घडीला कोट्यावधी रुपयांचा व्यवहार करत आहे.

महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना, डॉ.धनंजयराव गाडगीळ आणि पद्मश्री विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे १९४८-४९ मध्ये प्रवरानगर येथे सुरु झाला. १९५२ मध्ये साखरेवरील नियंत्रणे अुठल्यावर साखरेची मागणी भरमसाट वाढली. साखर आयात करण्यात मौल्यवान परकी चलन खर्ची पडू लागले. त्यामुळे देशांतर्गत साखरेचे अुत्पादन वाढवणे गरजेचे होते. महाराष्ट्रात अुसलागवडीच्या क्षेत्रात सहकारी साखर कारखाने अुभे राहू लागले. आजूबाजूला सातारा-कोल्हापूर जिल्ह्यात साखर कारखाने निघाले. तेव्हा वसंतदादाना चैन पडेना. पण या भागात साखर कारखान्याची कल्पनाच अव्यवहार्य समजली जात असे. एकतर सांगली जिल्हा तसा कोरडवाहू शेतीचा जिल्हा होता. म्हैसाळ भागात थोडी फार अुसशेती होती, ती अुगार कारखान्याला अुपयोगी पडे. भिलवडी भागात पिकणारा अूस गूळ अुत्पादनात खर्ची पडे. पण दादाना फार वाटे की साखर कारखान्यामुळे या भागातील शेतकऱ्याला चांगली

बरकत येईल. त्यानी खटपट करुन साखर कारखाना अुभारणीसाठी, आवश्यक परवानगी सरकारकडून मिळविली. पुरेसा अूस नसला तरी कारखाना कार्यान्वित होईपर्यंत, भरपूर अूस अुपलब्ध करु, अशी खात्री त्यानी सरकारला दिली. मात्र भाग भांडवल गोळा करताना, आणि अूस लागवडीसाठी शेतकऱ्यांची मने वळवताना, वसंतदादांची अक्षरशः दमछाक झाली. ते आत्मविश्वासाने साखर कारखान्याची योजना त्याना समजावून सांगत. अुसाची लागवड केल्याने शेतकऱ्याला भरभराटीचे दिवस येतील याची खात्री देत. मार्केट कमिटीच्या यशामुळे दादांविषयी सर्वांच्या मनात एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला होता. त्यामुळे बिचकत बिचकत का होईना, पण शेतकऱ्यांनी साखर कारखान्याचे शेअर्स घ्यायला सुरुवात केली. ज्यांची शेअर्स घ्यायची अिच्छा आहे पण पैसा नाही अशा शेतकऱ्याना, वसंतदादानी जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज मिळवून दिले. १३ लाख रुपयांचे भाग भांडवल गोळा झाले. सरकारने आपला दहा लाखाचा वाटा अुचलला. इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनने ५५ लाखाचे कर्ज मंजूर केले. बराच विचार-विनिमय होऊन, संचालक मंडळाने सांगली-माधवनगर रस्त्यावरील ९० एकर जागा खरेदी केली. जर्मनीहून मशिनरी आणण्यात आली. तीन-चार वर्षांच्या घोर तपश्चर्येनंतर, १९५८ साली पहिला गळीत हंगाम सुरु झाला. कारखान्यासाठी घेतलेल्या जमिनीपैकी, ५० एकर जमिनीवर अूस लागवड करण्यात आली होती. वस्तुतः कारखान्याचे रजिस्ट्रेशन मिळाल्यापासून ३९ महिन्याचा कालावधी, पहिला गळीत हंगाम सुरु करण्यासाठी मंजूर असतो. पण प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन दादांनी, आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने, अवघ्या २४ महिन्यातच गळीत हंगाम सुरु करुन दाखवला! हे मोठेच सुयश होते. सहकारी साखर कारखाना क्षेत्रातील हा एक चमत्कार होता. आज मोठा प्रगत कारखाना म्हणून या कारखान्याची गणना होते. या कारखान्याने या भागाचा कायापालटच केला. त्यामुळे बरेच अुपधंदे सुरु झाले. अनेक लोक कामाला लागले. सायकल परवडत नसणारा शेतकरी बुलेट घेऊन धावू लागला!

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर नामदार यशवंतरावानी पुणे-मुंबई सोडून, अितर भागात अुद्योगधंद्याची वाढ व्हावी, प्रादेशिक असमतोल दूर व्हावा या हेतूने सर्वांना प्रोत्साहित केले. त्यांचा अुजवा हात असणारे आणि प्रगतिशील विचारांचे वसंतदादा मागे कसे पडणार? साखर कारखान्याच्या पाठोपाठ पूरक अुद्योग व लहान अुद्योग सुरु केल्यास स्थानिक कामगारांना रोजगार अुपलब्ध होणार होता. दादानी चीफ प्रमोटर म्हणून पुढाकार घेऊन औद्योगिक सहकारी सोसायटी स्थापन केली. दादा सांगलीतील काही कारखानदारांना घेऊन पंजाबातील अुद्योगधंद्याची

पाहणी करुन आले. साखर कारखान्याजवळच्या माळरानावरची जागा निश्चित करण्यात आली. १३५ एकर जागा मिळवून जमिनीची मोजणी करुन प्लॉट्स पाडण्यात आले. सर्वानीच सहकाराचे, अुत्साहाचे वातावरण ठेवल्याने ऑक्टोबर १९६० मध्ये औद्योगिक सोसायटी कार्यान्वित झाली. भराभर शेड्स बांधण्यात आल्या. फॉन्ड्री, फोर्जिंग, सिमेंट वस्तू, लेदर गुड्स, काटेरी तार, रीरोलिंग मिल, ऑप्टिकल बंकेट पेपरमिल, फॅब्रिकेशन अशा विविध प्रकारांचे कारखाने, औद्योगिक वसाहतीमध्ये सुरु झाले.

यामुळे शेतीप्रधान कारखानदारीची वाढ होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. जिल्ह्यातील अुपलब्ध साधनसंपत्तीचा अुपयोग विकासासाठी तर झालाच; शिवाय अनेक कारागिराना काम मिळाले. वसाहतीमधील कारखानदारांना कच्चा माल योग्य दरात मिळवून देण्यात, औद्योगिक सोसायटीने पुढाकार घेतला. स्थानिक तरुणांना तांत्रिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून वसंतदादांनी इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिटयूट सुरु करण्यात पुढाकार घेतला; त्यामुळे कुशल कामगार तयार झाले.

महाराष्ट्रात पाऊस कमी पण नद्याना पाणी भरपूर असूनही त्याचा अुपयोग शेतीसाठी म्हणावा तसा करुन घेतला जात नव्हता. सरकारी माध्यमांच्या सहकार्याने वसंतदादानी, सांगली जिल्ह्यात पद्माळे, कसबे डिग्रज, आदी भागात नदीच्या पाण्यावर पंप बसवून, शेतीस पाणी पुरवठा करण्याच्या योजना, सहकारी तत्त्वावर सुरु करण्यात पुढाकार घेतला. साखर कारखान्यामार्फत या योजना राबवण्याच्या दृष्टिकोनातून गावोगाव सभा घेऊन, अशा योजनेचे फायदे त्यानी शेतकऱ्यांना समजावून सांगितले. यामुळे शेतकऱ्यांच्या हजारो एकर जिराइती जमिनी पाण्याखाली आल्या. पाण्याचा पुरवठा सातत्याने राहिल्याने, वर्षातून दुबार पिके घेणे शक्य झाले. साखर कारखान्यासाठी हमखास अूस मिळण्याची सोय झाली.

१९५९-६० च्या सुमारास सांगली जिल्ह्यात सुमारे २५ लाख एकर जमिनीवर शेंगेचे अुत्पादन होत असे. शेंग पिकवणारा जिराईत शेतकरी नेहमी निसर्गावर अवलंबून असे. त्यामुळे अुत्पन्नाची अनिश्चितता असे. पुन्हा शेंग खरेदी-विक्री करणाऱ्या दलालांकडूनहि त्याची फसवणूक होत असे. हे टाळून शेतकऱ्यांना फायदा करुन द्यावा, या हेतूने शेंगपिकाचा प्रक्रियात्मक कृषिअुद्योग सुरु केल्यास शेतकऱ्याचा फायदा होईल. असा दादानी विचार केला. शेंगेपासून तेल, पेंड, तेलावर प्रक्रिया करुन रिफाइन्ड तेल, वनस्पती तूप, पेंडीतील तेलाचा अंश काढून नैट्रोजनयुक्त खत, कॅटल व पोल्ट्रीसाठी पेंड मिळण्यासारखी होती. त्यासाठी तेल गिरण्या, साबण कारखाना, रिफायनरी, वनस्पती प्लँट, कॅटल फीड कारखाना, वगैरे शेंगेवरील प्रक्रियात्मक अुद्योग अुभे करण्याचे ठरले. दादानी चीफ प्रमोटर म्हणून पुढाकार

घेऊन, दि ग्राअुंडनट प्रोसेसर्स को.ऑ. सोसायटी १९६० मध्ये काढली. जिल्ह्यात अनेक ठिकाणी तेलगिरण्या काढल्या.

अशा प्रकारे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दादानी विधायक, समाजोपयोगी कामात स्वतःला अक्षरशः गाडून घेतले होते. साखर कारखान्याची संपूर्ण यंत्रणा आजूबाजूच्या भागाच्या विकासासाठी कशी राबविता येईल याचा ते अहर्निश विचार करत. निदान आपल्या सांगली जिल्ह्यात तरी नावापुरता सुद्धा बेकार माणूस राहू नये ही त्यांची मनापासूनची अिच्छा होती.

विधायक कामे करता करता दादांनी शैक्षणिक कामाकडेही लक्ष पुरवले. लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे ते चेअरमन होते. त्या संस्थेमार्फत कॉलेज काढण्यात, तसेच मिरज येथे मेडिकल कॉलेज काढण्यात, त्यानी महत्त्वाचा वाटा अुचलला. सांगलीच्या परिसरातील सांस्कृतिक शक्ती लक्षात घेऊन, १९६३ साली सांगलीला आकाशवाणी केंद्र मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. सांगलीच्या वाढत्या आरोग्यविषयक समस्या आणि जिल्ह्यातील गरीब जनतेच्या वैद्यकीय गरजा भागवण्याच्या दृष्टीकोनातून १९६३ साली, प्रशस्त सिव्हिल हॉस्पिटल अुभारण्यात त्यानी पुढाकार घेतला.

वसंतदादांचे राजकीय कर्तृत्व मात्र यशदायी झालं नाही.

दादांची विधायक कार्यकुशलता जशी सर्वसान्य झाली तशी त्यांची राजकीय कामगिरी झाली नाही. अुलट अनेक प्रसंगात ती वादग्रस्तच ठरली.

काँग्रेस पक्षावर त्यांची अनन्यसाधारण निष्ठा होती ''आमच्यातून काँग्रेस वजा केली तर सार्वजनिक जीवनात आम्ही शून्य आहोत'' अशी त्यांची धारणा होती.

१९३७ सालापासून दादानी गावकाँग्रेस पासून आपल्या राजकीय अुमेदवारीची सुरुवात केली. नंतर तालुका काँग्रेस, जिल्हा कॉग्रेस, अशा चढत्या श्रेणीने एकेक जबाबदाऱ्या पार पाडत, ते राज्यस्तरावर आले. स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या असीम कर्तृत्वामुळे ते सर्वांच्या आदरास पात्र झाले होतेच. त्यांच्या संघटना-कौशल्यामुळे, गोड वागणुकीमुळे आणि सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या वृत्तीमुळे, प्रथम महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे सेक्रेटरीपद, नंतर अुपाध्यक्षपद अशी वाटचाल करत करत, १९६६ मध्ये दादा प्रदेशाध्यक्ष झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर होमगार्ड कमांडंट म्हणून त्यानी लक्षवेधक कार्य केले. पूर्वीचे भूमिगत कार्यकर्ते स्वातंत्र्यानंतर तशीच पुंडाई करत होते. परकीय सरकार विरुद्ध दाखवलेली मर्दुमकी आपल्याच सरकारपुढे दाखवण्यात शहाणपणा नव्हता आणि ती दादागिरी आपल्याच जनतेवर करण्यात शुद्ध वेडेपणा

होता; अशा मंडळींना आणि पिढिजात गुंडांना आवरण्याचे काम करण्यात दादांचे संघटना-कौशल्य प्रगट झाले. संयुक्त महाराष्ट्राचा लढा पुऱ्या जोमात होता. द्वैभाषिक राबवणे दादानाहि मनापासून मान्य नव्हते. पण एक निष्ठावंत पक्षकार्यकर्ता म्हणून तो अन्याय त्यानी निमूटपणे सहन केला. लोकक्षोभ असतानासुद्धा पुष्कळ अंशी स्वतःच्या कार्यकर्तृत्वावर काँग्रेसचे अुमेदवार १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यानी यशस्वी केले. सांगली मतदार संघातून ते स्वतः १९५२ च्या निवडणुकीपासूनच प्रचंड मताधिक्याने निवडून येत होते. दादा ही एक मोठी शक्ती आहे याची दिल्लीकराना यथार्थ जाणीव झाली होती. म्हणूनच १९७२ मध्ये स्वतः इंदिरा गांधीनी, वसंतदादा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात पाहिजेत असा आग्रह धरल्याने, पाटबंधारे व वीज मंत्री म्हणून प्रथमच दादानी मंत्रीपद भूषवले. १९७६ पर्यंत त्यानी मंत्रीपद भूषवले. १९७६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यानी मंत्रिमंडळाची पुनर्रचना करताना वसंतदादाना अचानक वगळले. सर्व महाराष्ट्रभर या घटनेचे पडसाद अुमटले. त्यांच्यासारख्या लोकप्रिय नेत्याला अशी अपमानास्पद वर्तणूक देण्यात चूक झाली असे सर्वसामान्यपणे मानले जात होते. वसंतदादानी स्वतः ही गोष्ट फार मनाला लावून घेतली आणि एक प्रकारच्या अुद्वेगापोटी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेतली.

इथून त्यांचे अखेरीपर्यंतचे जीवन हे राजकारणाच्या लहरीनुसार वाहावत गेले. 'बेरजेचे राजकारण' करता करता सर्वत्र 'बेरक्यांचे' राजकारण सुरु झाले. राजकारण वारांगनेपेक्षाहि चंचल बनले. खुद्द त्यांच्या लाडक्या काँग्रेस पक्षात फाटाफुटी, गटबाज्यांना ऊत आला. आमदारांची शक्ती ज्याच्यामागे तो नेता. मग त्याला जनमानसात आदराचे स्थान असो वा नसो. आमदारांची पुरेशी संख्या पाठीशी असली की मुख्यमंत्री, ती संख्या कुणी पाठीत खंजीर घालून घटवली की खुर्ची खाली, असा असभ्य प्रकार, इतर प्रांतांप्रमाणेच महाराष्ट्रातही चालू झाला. या प्रकारात वसंतदादा १९७६ ते १९८५ या कालावधीत एकूण चार वेळा मुख्यमंत्री झाले पण दुर्दैवाने एकाहि वेळेला त्याना सलग पाच वर्षे मुख्यमंत्रीपद भोगणे राहू द्याच पण चारी वेळेला एकत्र मिळूनसुद्धा चार वर्षे काही मुख्यमंत्रीपद लाभले नाही. प्रत्येक खेपेला कधी वर्ष-दीड वर्ष तर कधी फक्त चार-पाच महिने. या प्रकारात त्यांचे अनेक सहकारी कधी दुरावले तर कधी जवळ आले. पण सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ज्या 'यशवंत-वसंत' जोडीने अुभ्या महाराष्ट्राचा कायापालट केला, तीच जमलेली जोडी एकमेकाना दुरावली!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ते कितीसे यशस्वी झाले हा एक चर्चेचा विषय होऊ शकतो. चार वेळा मुख्यमंत्रीपद भूषवण्याच्या काळात त्याना सरकारी नोकरांचा

संप, शिक्षकांचा संप, गिरणी कामगारांचा संप अशा अनेक अप्रिय गोष्टींना सामोरे जावे लागलेच, पण त्याहिपेक्षा पक्षांतर्गत कारवायांनी त्यांचा फार वेळ घेतला; शक्ती क्षीण केली. पण तरीसुद्धा त्यानी आपल्या व्यवहारी दृष्टीच्या आधारे सर्वंकष विकासाच्या योजनांवर भर दिला. याच व्यावहारिक दृष्टीकोनातून अुच्च तांत्रिक शिक्षण ही केवळ सधन व अुच्चभ्रू समाजाची मक्तेदारी होऊ नये, गरीब पण लायक अशा ग्रामीण भागातील मुलानाहि त्याचा लाभ व्हावा अशा हेतूने दादानी विना-अनुदान तत्त्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयाना महाराष्ट्रात परवानगी दिली. हा एक ऐतिहासिक निर्णय होता. त्यापूर्वी बऱ्याच विद्यार्थ्यांना शेजारच्या राज्यात जाऊन भारी फी भरुन, मेडिकल, इंजिनिअरींग, शिक्षण घ्यावे लागत असे. आज ग्रामीण भागातून सुद्धा अिंजिनिअर्स, डॉक्टर्स निर्माण होऊ लागले आहेत हे एका अर्थी दादांच्या द्रष्टेपणामुळेच. मात्र अशा गुणवान विद्यार्थ्यांनी शहराकडे पळू नये, आपल्याच भागात समाजाला अुपयोगी पडावे ही त्यांची धारणा मात्र पूर्णांशाने फलद्रूप होताना दिसत नाही. दादांच्या निर्णयामुळे महाराष्ट्रात दोन वैद्यकीय महाविद्यालये, ५५ अभियांत्रिकी विद्यालये, १०८ तंत्रनिकेतने, तर जवळजवळ ३०० औद्योगिक प्रशिक्षण-संस्था सुरु झाल्या. त्यांच्या परीने त्यानी जमीन सुधारणा, बेघरांना घरे, रोजगार हमी योजनेचा पाठपुरावा, मागासवर्गीयाना सर्वत्र कर्जवसुलीस माफी अशा अनेक थरांवर, कामाचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला पण मुख्यमंत्री म्हणून एक सरसकट छाप अुमटवण्यात मात्र त्याना यश आले नाही. दिल्लीच्या नेहमीच्या पक्षीय प्रथेनुसार दादाना मनासारखे काम करण्याचे स्वातंत्र्य मिळाले नाही. अुलट वेळीअवेळी त्यांचे पंख छाटण्याचेच प्रयत्न झाले. महाराष्ट्रात ते फार डोईजड होतात असे वाटले तेव्हा त्याना दिल्लीत, काँग्रेसचे अखिल भारतीय पातळीवरील सरचिटणीसपद देऊन अडकवून ठेवण्यात आले. हिमाचल प्रदेश, अुत्तर प्रदेश वगैरे भागातील काँग्रेस पक्षाच्या संघटनेची कामे त्यानी चांगली केली. महाराष्ट्रात तर त्यानी काँग्रेस पक्ष एकसंध बांधला होता. त्यामुळे बहुतेक सर्व निवडणुकांतून, इतर प्रांतातून काँग्रेसची पडझड झाली, तरी महाराष्ट्रात काँग्रेसला यशच मिळत राहिले होते. यामध्ये दादांच्या संघटनाकौशल्याचा मोठाच भाग होता. माणसे जोडणे, गोळा करणे, त्याना पक्षाशी आणि वैयक्तिकपणे स्वतःशी वर्षानुवर्षे बांधून घेणे, दादाना त्यांच्या गोड, आर्जवी, लाघवी स्वभावामुळेच शक्य झाले. म्हणून तर वसंतदादा म्हणजे 'माणसांची बँक' असे म्हणत. पण तेच दादा सचिवालयाच्या तंत्रात पुरे गोंधळले! तेथील नियम, कायदा, ऑडिट अशा जंजाळात त्यांचे मन गुदमरुन जाई. त्यांच्या कार्यक्षेत्रात अनेक वेळा चटकन निर्णय घ्यायला लागत. धाडशी निर्णय घ्यावे लागत. पण असे धाडस नियमांच्या आणि कायदेशीर तरतुदींच्या जंजाळात कुचकामी ठरे! मुख्यमंत्री म्हणून काम करताना इतर

अनेक बाबींबरोबर, दादाना ह्या नियमावलींचा पण त्रास झाला, भरीला मतलबी राजकारणाचे खेळ. त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस त्याना राजस्थानचे राज्यपालपद देऊन, महाराष्ट्रापासून दूर ठेवल्याने, दादाना नाही म्हटले तरी मनस्ताप झाला असणारच. कौटुंबिक कलहांनी तर त्यांचा पिच्छाच पुरवला होता. मधुमेहाचा त्रास वर्षानुवर्षे होता. या सर्वांचा परिणाम त्यांची प्रकृती ढासळण्यात झाला आणि अखेरीस १ मार्च १९८९ रोजी त्यांची जीवनज्योत मालवली. श्री. राजीव गांधी दादांच्या अंत्यदर्शनासाठी मुद्दाम सांगलीत आले. त्यांच्या अुपस्थितीत लाखभर चहात्यांच्या अलोट गर्दीत कृष्णातीरी त्याना अखेरचा निरोप दिला गेला.

दादांच्या जीवनाचे मूल्यमापन अनेकानी केलंय; अनेकजण पुढे करतील. पण त्यांचा सगळा जीवनपट बघितल्यावर अनेकाना वाटतं की हा नेक दिलाचा माणूस राजकारणाच्या दलदलीत निष्कारण अडकला.

आपल्या आवडत्या विधायक कार्यातच गुंतून राहिला असता तर?

ते काही असो. सांगलीकर जेव्हा कृष्णाकाठी फिरायला जातो तेव्हा सरकारी घाटावर अुभे राहिल्यावर,डाव्या बाजूला राजेसाहेबांची समाधि आणि अुजव्या बाजूला वसंतदादांची समाधी पाहून आणि सहा गल्लीवाल्या सांगलीचे आजचे स्वरुप लक्षात येऊन त्याच्या तोंडून सहजच अुद्गार निघतील,

*"चिंतामणराये रचिला पाया*
*वसंतराये कळस चढविला"*

●●●

# भैरवी..., मंगेशकरी सुरांना अभिवादन करुन...

अथवर सांगलीच्या बावीस सुपुत्रांचं गुणगान मी केलं. एक प्रकारे वेगवेगळ्या थाटांच्या बावीस रागरागिण्यांचेच हे गायन होते. मैफलीची अखेर भैरवीने व्हावी असा संकेत आहे. भैरवीचे सूर छेडायला गवयाने सुरुवात केली की मैफलीत आपोआप एक प्रकारची अुदासिनता पसरते. मनामनातून हुरहूर दाटून येते. हा काही नुसता भैरवीच्या आर्त सुरावटीचा परिणाम नसतो तर आता मैफल संपणार या दुःखाचीही जाणीव त्यामध्ये अंतर्भूत असते. तशीच काहीशी माझी अवस्था झाली आहे. या पुस्तकाचे स्वागत कसे होईल याची कल्पना नाही पण कर्तबगार सांगलीकरांचे स्तवन करण्याचा खटाटोप माझ्यापुरता तरी अत्यंत आनंददायी होता. गेली दोनतीन वर्षे मी त्यांच्याच सहवासात होतो म्हणानात.

आता भैरवीसाठी कोणती चिज आळवायची हा माझ्यापुढं प्रश्न नव्हताच. सांगलीतील वास्तव्यानं सांगलीला धन्यता प्राप्त करुन देणारी, कीर्तीवान करणारी ती चिज 'मंगेशकरी' सप्तसुरांचीच असणार होती. भारतीय संगीतात मंगेशकरी सूरमंडल हा एक विलक्षण चमत्कार आहे. असं आश्चर्य शतकातून एकदाच घडू शकतं. मा. दीनानाथ मंगेशकरांचा जन्म १९०० सालचा. २००० साल आता अुलटून गेलं तरी त्यांची मुलं, नातवंडं, त्यांच्याच तडफेने गात आहेत. संपूर्ण शंभर वर्षे एकाच घरातील सुरांची मोहिनी आसेतू-हिमाचल असावी हा चमत्कार नव्हे तर काय? म्हणून या गाणाऱ्या घराण्याला 'गंधर्व घराणे' म्हटलं जाते. कोणी 'मंगेशकर' आडनावाला एक मंत्रच संबोधतात. मा. दीनानाथ हा या गंधर्व घराण्याचा आद्यस्वर. मा. दीनानाथ, माई मंगेशकर आणि त्यांची पाच गुणवान मुलं या सर्वांचं मिळून एक सप्तसुरांचं अिंद्रधनुष्य निर्माण झालं. या मंगेशकरी सप्तसुरांमध्ये, माई मंगेशकरांचा समावेश मी मुद्दाम करतो. मा. दीनानाथांचं अकाली निधन झाल्यावर त्यांचे पंचप्राण असणाऱ्या, लता, मीना, आशा, अुषा आणि हृदयनाथ या पांचही सुरांना, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत एकत्र बांधून ठेवण्याचं, बदसूर होऊ न देण्याचं मोठं काम माईनी केलंय. आणि सांगली नगरीचं परमभाग्य म्हणजे हे सप्तसूर एकाच वेळी सांगलीत निनादत होते. काही सूर बहरलेले होते. काही उमलत होते. काही उमलायचे होते. मा. दीनानाथाचं ऐन अुमेदीच्या काळात तब्बल १४ वर्षे सांगलीत वास्तव्य

होतं. सांगलीत आल्यावर जी वास्तू त्यानी खरेदी केली आणि जिथं या सप्तसुरांचं वास्तव्य होतं ती वास्तू 'दीनानाथ चाळ' म्हणूनच ओळखली जाते. (आजही ती वास्तू सांगलीच्या एस.टी. स्टँडजवळ अुभी आहे). सांगलीच्या वास्तव्यात आपल्या तडफदार गायनशैलीने आणि अुंच खणखणीत आणि भिंगरीसारखी फिरत असलेल्या असामान्य आवाजाने, मा. दीनानाथानी मराठी रंगभूमी दणाणून सोडली. सांगलीचं आजचं 'सदासुख' थिअेटर हे सुरवातीला नाटकाचे थिअेटर होतं. या सदासुखमध्ये आठवड्याला एक नाटक याप्रमाणे सतत आठ वर्षे दीनानाथानी आपल्या 'बलवंत नाटक मंडळी तर्फे' नाटके सादर केली. त्यांचं एक मोठं वैशिष्टय म्हणजे त्यांची राष्ट्रीय वृत्ती. त्यामुळे मानापमान, भावबंधन, सौभद्र यासारख्या पारंपारिक नाटकांबरोबरच त्यानी स्वातंत्र्यवीर सावरकर, वीर वामनराव जोशी यांची राष्ट्रीय वृत्ती जोपासणारी नाटके केली. 'परवशता पाश दैवे' यासारखे गाणे पारतंत्राच्या काळात म्हणणे धाडसाचे होते. ते धाडस दीनानाथानी दाखवले. एकीकडे साक्षात बालगंधर्व आणि दुसरीकडे केशवराव भोसले यांच्यासारखे चंद्रसूर्य मराठी नाट्यसृष्टीत तळपत असताना सुद्धा दीनानाथानी रसिकमनांवर आपल्या स्वतंत्र गायनशैलीचा ठसा अुमटवला हे मुद्दाम लक्षात आणून दिले पाहिजे. नाट्यसृष्टीवर चित्रपटसृष्टीचे आक्रमण होअू लागले तेव्हा त्याचा विपरीत परिणाम सर्वच नाट्यसंस्थांवर झाला. आपली नाटकसंस्था बंद ठेवून दीनानाथानी, विश्राम वेडेकर, चिंतामणराव कोल्हटकर, वा. ना. भट वगैरेच्या साहाय्याने 'बलवंत पिक्चर्स' नावाची संस्था, कृष्णाकाठी, गणपती मंदिराच्या पिछाडीला स्थापन केली. सांगली-हरिपूर भागात शूटींग करुन 'कृष्णार्जुनयुद्ध' नावाचा सिनेमा तयार केला. मोठी जाहिरात केली. पण दुदैवाने सिनेमा साफ कोसळला. कंपनी कर्जबाजारी झाली. सावकारांचे तगादे लागले. कोर्टकचेऱ्या सुरु झाल्या. प्रतिकूल परिस्थितीशी दीनानाथाना झगडा करावा लागला आणि त्यातच अवघ्या ४२ व्या वर्षीच त्याना मृत्यूच्या आधीन व्हावे लागले हे त्यांचे आणि नाट्यरसिकांचे दुर्दैव.


दीनानाथ अकाली गेले पण मराठी रसिकांसाठी एक मोठा कल्पवृक्ष लावून गेले. लता, मीना, आशा, अुषा आणि हृदयनाथ या मुलांच्या रुपाने फार मोठी संपत्ती त्या 'शापित यक्षाने' आपल्यामागे ठेवली. या पाच भावंडापैकी, आशा भोसले, अुषा मंगेशकर आणि हृदयनाथ मंगेशकर यांचा जन्मच मुळी सांगलीत झाला. लता मंगेशकर सर्वात मोठ्या. साहजिकच अितर भावंडांच्या तुलनेत त्याना दीनानाथांचा सहवास अधिक लाभला. लताबाईंची सांगितिक जडणघडण त्यामुळे सांगलीतच झाली. पुढे आयुष्यात लंडनमधील आल्बर्ट हॉल गाजवणाऱ्या लताबाईनी आपल्या बालपणात, सांगली जिमखाना हॉल गाजवून आपल्या भावी कर्तृत्वाची झलक दाखवली होती. कर्तबगार वडिलांचा वारसा पुढील पिढीला सांभाळता येतोच असं नाही. पण

दीनानाथ फार भाग्यवान. पाचही मुलांच्या कर्तृत्वामुळे त्यानी लावलेला कल्पवृक्ष किती बहरला हे त्याना प्रत्यक्षात पाहायला मिळालं नाही तरी माईंच्या डोळ्यांनी त्यानी नक्कीच बघितले असेल. लतादीदी तर काय गळ्यात गंधार घेऊनच जन्माला आल्या. भारतीय गानकलेच्या नंदनवनातील ही स्वरलता म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीची अनभिषिक्त गानसम्राज्ञी आहे असे आचार्य अत्रे म्हणत. तिला 'मराठा' मधून अभिवादन करताना त्यानी म्हटलंय की ''वृत्तपत्राच्या जाड्याभरड्या कागदावर हे अभिवादन करणे, म्हणजे एखाद्या अप्सरेच्या स्वागतासाठी तिच्या मृदू चरणकमलांखाली जाड्या भरड्या गोणपाटाच्या पायघड्या अंथरण्याइतके, अथवा कोजागिरी पौर्णिमेच्या चांदण्यांचे चित्र काळ्या पाटीवर कोळशाच्या कांडीने रेखाटण्याचा प्रयत्न करण्याइतकेच विशोभित आहे, या जाणिवेने आमचे मन आम्हाला खात आहे.'' ३६ वर्षापूर्वी लताला 'भारतरत्न' ही सर्वोच्च पदवी द्यावी अशी मागणी करणाऱ्या आचार्य अत्र्यांची अिच्छा नुकतीच फलद्रुप झाली. लतादीदींनी सर्व प्रमुख भारतीय भाषांमधून तीस हजारांवर गाणी म्हटली असतील. तरीसुद्धा 'अतिपरिचयात् अवज्ञा' ही परिस्थिती त्यांच्याबाबतीत कधीच निर्माण होणार नाही. गंमत म्हणजे आशाबाई तशाच श्रेष्ठ गायिका आहेत. काही क्षेत्रातून तर त्या लताबाईंच्याही पुढे गेलेल्या आहेत. त्यानी स्वतःचे कर्तृत्व इतके सिद्ध केलेले आहे की, प्रसिद्धीमाध्यमे मुद्दाम लता श्रेष्ठ की आशा श्रेष्ठ असा वादंग निर्माण करतात. त्याबाबतीत एकदा आशाबाईनीच फार मार्मिकपणे सांगितलंय की ''कात्रीची दोन्ही पाती वेगवेगळी जरुर होतात पण जेव्हा एकत्र येतात तेव्हा जो त्यांच्यामध्ये सापडेल त्याचाच तुकडा पडतो.'' लता, आशाप्रमाणेच अुषा मंगेशकरही अुत्तम गातात. पाच हजारांहून अधिक अशी त्यांची गाणी आहेत. गायिका असूनही त्याना चित्रकलेचा मोठा छंद आहे. एम. आर. आचरेकर यांच्या सारखा चित्रतपस्वी त्याना गुरु म्हणून लाभला होता. अनेक कला-दालनांमधून त्यानी स्वतःच्या चित्रांची प्रदर्शने भरवली आहेत. मीना मंगेशकरही अुत्तम गातात. त्यानी पार्श्वगायन केले पण कमी प्रमाणात केले. लहान मुलांच्यासाठी त्यानी वैशिष्ट्यपूर्ण अशी संगीतरचना केली. त्यांचा 'चॉकलेटचा बंगला' हा बालगीतांचा अल्बम प्रचंड गाजला. हृदयनाथ मंगेशकर हाही एक चमत्कार मानावा लागेल. स्वतः अुत्तम गायक ते आहेतच. पण त्यांचा खरा परिचय म्हणजे ते एक असामान्य, प्रयोगशील, अलौकिक प्रतिभा लाभलेले संगीतकार आहेत.

हाताची पाच बोटे एकसारखी नसतात. तशी ही पाच मंगेशकर भावंडं गुणात्मक दृष्ट्या कमी-जास्ती असतील पण पाची बोटांची मिळून जी मंगेशकरी मूठ बनते ती विलक्षण सामर्थ्याची आहे. या मंगेशकर मंडळींच्या गाण्यांची संख्या अेवढी प्रचंड आहे की, केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे या भावंडांनी या चंदेरी दुनियेतून 'आम्हाला



सुखावले सांगलीकरांना मंगेशकरी सप्तसुरांनी ...



विलिंग्डन कॉलेज ( ७५ वर्षापूर्वीचा फोटो )



छ. शाहुमहाराजांची सांगली भेट



लॉर्ड विलिंग्डन यांची सांगली भेट



रँग्लर परांजपे, प्रि. भाटे, पी. एम. लिमये, धनंजयराव गाडगीळ वगैरेंचा दुर्मिळ फोटो

वगळा' म्हटले तर ही तारांगणे क्षणात हतप्रभ होतील. आकाशवाणी, दूरदर्शन, केबल वाहिन्या ठप्प होतील. थोडक्यात अंधारच अंधार. इतकं सामर्थ्य या मंगेशकरी मुठीत आहे.

सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेचे महापौर श्री. सुरेश पाटील यानी या पाचही गुणवंत मंगेशकर भावंडांना एकत्रितपणे सांगलीत आणण्याचा दुर्मिळ योग साधला आणि त्या सर्वांचा मा. दीनानाथ यांच्या शताब्दि महोत्सवानिमित्ताने २६ फेब्रुवारी २००० रोजी महापालिकेतर्फे मानपत्र देऊन त्यांचा भव्य नागरी सत्कार केला. तीन दिवस भरगच्च कार्यक्रम केले. सांगली आणि मंगेशकर हे संबंध त्यामुळे आता अधिकच दृढ झाले आहेत.

सांगलीकरांचे गौरवगान करावे तेवढे थोडेच. पण प्रत्येक मैफलीची अखेर भैरवीनी करावीच लागते त्याप्रमाणे कर्तृत्वान सांगलीकरांची ही गौरवगान मैफल मंगेशकर कुटुंबियांच्या गुणगौरवाने करुन ही मैफल मी येथेच थांबवितो.

●●●

# परिशिष्ट

- आणखी काही सांगलीकर
- सांगलीतील काही नामवंत संस्था
- सांगलीतील प्रेक्षणीय स्थळे
- सांगली २०० वर्षांचा धावता इतिहास (१८०० ते २०००) 'कालपट'
- " सांगली भूषण"

परिशिष्ट

# आणखी काही सांगलीकर

एखाद्या प्रिय व्यक्तिविषयी लिहिताना किती लिहू आणि किती नको असं होऊन जातं. तीच अवस्था प्रस्तुत लेखकाची सांगली या विषयासंदर्भात होते. सांगली आणि निवडक सांगलीकर यांच्या विषयी बरंच लिहून झाल्यावरही अजून सांगलीविषयी कितीतरी लिहायचं राहिलंय असं वाटायला लागतं ! असे अनेक सांगलीकर आहेत, सांगलीतील संस्था आहेत, प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यांच्या विषयी नाही लिहायचं म्हणजे मनात एक अपराधी भावना निर्माण होते पण त्याचवेळी आर्थिक बाबीचाहि विचार नजरेआड करता येत नाही. तेव्हा त्या साऱ्या गोष्टींचा थोडक्यात परामर्श घ्यावा हे अुत्तम.

एक प्रकारे सांगलीचे हे कॅलिडिओस्कोपी दर्शनच !

सांगली हे काही पर्यटन-स्थळ नव्हे. पण एखादा पाहुणा घरी आला की त्याला चार गोष्टी कशा आपण कौतुकाने दाखवतो त्याप्रमाणे सांगलीतील काही प्रेक्षणीय स्थळांची माहिती या परिशिष्टात दिलेली आहे.

सांगलीत अनेक नामवंत संस्था आहेत. काही शंभर वर्षाहून जुन्या म्हणून ऐतिहासिक महत्त्वाच्या आहेत तर काही गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. त्यामध्ये शैक्षणिक संस्था आहेत, व्यापारी पेढ्या आहेत, व्यापारी, औद्योगिक संस्था आहेत तर काही कृषिविषयक संस्था आहेत. या विषयाला हात घातल्यावर लक्षात आलं की हा एका मोठ्या ग्रंथाचा विषय आहे ! एकट्या-दुकट्या माणसाला जमणारं हे काम नाही. मात्र पुरेसं आर्थिक पाठबळ आणि अवधी मिळाल्यास अवश्य पाठपुरावा करावा असा हा महत्वाचा विषय आहे. सांगलीच्या सर्वांगीण जडणघडणीची यथार्थ कल्पना त्यामुळे येऊ शकेल. प्रस्तुत लेखकाने काहीच संस्थांचा प्रातिनिधिकपणे विचार करुन, केवळ आर्थिक कारणांसाठी हा विषय नाईलाजाने अर्धवट सोडून दिला आहे.

आता राहिले कर्तृत्ववान सांगलीकर.

असे सांगलीकर अनेक आहेत. त्यासाठी पद्धतशीर अभ्यास आणि संशोधनच करण्याची आवश्यकता आहे. इथं नमूद होणारे सांगलीकर केवळ स्मृतीवर भरोसा ठेवून नोंदलेले असल्यामुळे, अनेकांचा नामोल्लेख न होण्याची शक्यता आहे. त्याचा संपूर्ण दोष

प्रस्तुत लेखकाकडे जातो. त्यांचा अुल्लेखहि कालानुक्रमे न होता विस्कळीतपणे झाला आहे.

**सांगली आणि साहित्य** : साहित्यक्षेत्रातील सहज आठवणारं नाव म्हणजे नाटककार न.ग. कमतनूरकर यांचं. त्याना राम गणेश गडकऱ्यांचा पट्टशिष्य असल्याचा सार्थ अभिमान होता. त्यांच्या 'श्री' 'सज्जन' आणि 'स्त्री-पुरूष' या नाटकांनी मराठी रंगभूमी गाजवली होती. नाट्य-संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची सन्मानाने निवड झाली होती. त्यांच्याबरोबरीने त्यांच्या सुविद्य पत्नी सरोजिनीबाईंचे नाव घ्यायला हवं. अनेक बंगाली कादंबऱ्यांची त्यानी मराठी भाषांतरे केली होती. त्या सध्या मुंबईस असतात. ८५-९० च्या आसपास त्यांचं आता वय आहे. मुंबईतील गोरेगाव भागात त्या राहतात. प्रस्तुत लेखकाने आवर्जून त्यांची भेट घेतली होती पण न.ग. कमतनूकरांविषयी संपूर्ण लेख लिहिण्याइतकी माहिती न मिळाल्याने तसा प्रयत्न अर्धवट सोडून द्यावा लागला.

मूळ रहिमतपूरचे असलेले कवी गिरीश (प्रा.शं.के.कानेटकर) सांगलीकरच म्हणायला हवेत, अितकं त्यांचं सांगलीत दीर्घकालीन वास्तव्य होतं. त्यांच्या वाङमयीन कर्तृत्वाविषयी वेगळे काही लिहिण्याची आवश्यकता नाहीच. अलीकडेच झालेल्या त्यांच्या जन्मशताद्बिनिमित्ताने त्याला नव्याने अुजाळा मिळालाय. जुन्या विश्रामबाग स्टेशनसमोर असलेला त्यांचा 'कांचन' बंगला अनेक होतकरु साहित्यिकांचे आश्रयस्थान होता. खुद्द पु.ल. देशपांडे त्यांच्या छायेखाली एम.ए.च्या अभ्यासासाठी येऊन राहिले होते. कवी गिरीशांप्रमाणेच कवी यशवंत यांनासुद्धा सांगलीकरच मानायला हवं. साधुदासाना ते गुरु मानत. गिरीशांचे सुपुत्र आणि नुकतेच निधन पावलेले सुप्रसिद्ध नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांची जडणघडण सांगलीतच झाली. सुप्रसिद्ध समीक्षक 'श्रीकेक्षी' (श्री.के. क्षीरसागर) सांगलीचेच. अनेक समीक्षा - ग्रंथांबरोबरच 'तसवीर आणि तकदीर' हे त्यांचं आत्मचरित्र वैशिष्टयपूर्ण आहे. प्रसिद्ध लेखिका कमल देसाई आता सांगलीतच स्थायिक झाल्या आहेत. कवी-संगीतकार, अशोक जी. परांजपे सांगलीजवळील हरिपुरचेच. डॉ. वि. रा. करंदीकर, प्रा. गोविंद जोशी सांगलीचेच. प्रा. मालतीबाई किर्लोस्कर आता सांगलीतच स्थायिक झालेल्या आहेत. समतोल विचाराचे आणि ज्यांच्या साहित्य-समीक्षेचा दबदबा, अुभ्या महाराष्ट्रात आहे ते प्रा. म.द. हातकणंगलेकर म्हणजे आजमितीला सांगलीमधील एक चालती-बोलती साहित्य-संस्थाच आहे. तेच लोककलेच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. डॉ. सुभाष भेंडे या नामवंत लेखकाची जडणघडण सांगलीतच झाली. सिटी हायस्कूल आणि विलिंग्डन कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण

झाले. पुण्याच्या 'सकाळ' या वृत्तपत्रासाठी त्यांनी विलिंग्डन महाविद्यालयाचा विद्यार्थी-वार्ताहर म्हणून आपल्या पत्रकारितेची सुरवात केली होती. सुदैवाने अनेक छोट्या-मोठ्या लेखकांनी सांगलीच्या साहित्य परंपरेचा वारसा समर्थपणे आज चालवलेला आहे. यथाकाल त्यांचा परामर्श घेतला जाईलच.

**सांगली आणि नाट्य :** नाट्याच्या बाबतीत तर काय सांगली ही बोलून चालून नाट्यपंढरीच आहे. या पुस्तकात उल्लेखलेल्या दिग्गजांबरोबरच सांगलीत नाट्यपरंपरेची पताका दिमाखात पुढे नेणाऱ्या मान्यवरांमध्ये मामा भट, बंडोपंत सोहनी, रघुनाथ इनामदार, बाबूराव नाईक, प्रा. जगन्नाथराव आठवले, विनायकराव पाटणकर, जगन्नाथराव पाटणकरांपासून आजकालच्या अर्चना जोगळेकर, माधव खाडिलकर, डॉ. गिरीश ओक अशा अनेक नामवंतांनी नाट्यक्षेत्रात चौफेर मुलुखगिरी केली आहे. रंगभूमीवर काम करता करता, ॲड. मधुसूदन करमरकर, यशवंत केळकर, अरुण नाईक, प्रा. दिलीप परदेशी, डॉ. मधु आपटे यांच्यासारखे नवे नवे नाटककार अुदयास आले. चित्तरंजन कोल्हटकर, अुदयराज गोडबोले ही मंडळीपण सांगलीचीच. मा. दीनानाथ, गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, विश्राम बेडेकर यासारख्या दिग्गजांचे सांगलीत काही काळ वास्तव्य होते. पहिली व्यावसायिक नाटक-मंडळीपण सांगलीतच अुभी राहिली. विष्णुदास भावे यानीच 'सांगलीकर नाटक मंडळी' ही संस्था स्थापन करुन राजाश्रयाखाली असलेली मराठी रंगभूमी, प्रथमच लोकाश्रयाकडे वळवली. पुढे बळवंतराव मराठे यानी 'नूतन सांगलीकर नाटक मंडळी' स्थापन केली.

म्हणजे आजमितीला फोफावलेल्या नाटक-कंपन्यांची मुहुर्तमेढ सांगलीतच झाली होती. देवल स्मारक मंदिर, भावे नाट्यमंदिर, ॲमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक असो. सस्नेह, ॲक्टिव्ह ग्रुप अशा अनेक संस्था आज सांगलीत कार्यरत आहेत. संगीत नाट्य-परंपरा पुढे नेणारे नवीन नवीन गुणवंत तरुण अुदयास येत आहेत. विस्तारभयास्तव सर्वांचा नामोल्लेख करता येत नाही.

**सांगली आणि संगीत :** मात्र नाटकाइतकी थोर अशी संगीतपरंपरा सांगलीपेक्षा मिरजेला अधिक आहे. सांगली-मिरज हा परिसर भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळा दिसत असला तरी सांस्कृतिकदृष्ट्या एकमेकांत इतका मिसळून गेला आहे, की कधी कधी वेगवेगळे ओळखू येत नाही. त्यामुळेच पं. विष्णु दिगंबर पलुस्कर, अब्दुल करीम खॉ सारखे संगीत-महर्षि सांगलीचेच वाटतात. काळेबुवा, गोडबोलेबुवा (रंगभूमीवरील अुदयराज गोडबोले यांचे वडील), गणपतराव डवरी, गुरव मंडळी यांच्यापासून चिंतुबुवा म्हैसकर, रत्नाकर दिवाकरांपर्यंत अनेकांनी सांगलीतील संगीतपरंपरा जपलेली आहे. हार्मोनिअम वादक नाना ताडेना जसं विसरता येत नाही तसं बाळकृष्णबुवा

मोहितेना विसरता येत नाही. बाळकृष्णबुवांची तर पेटीवादनाची तयारी एवढी विलक्षण होती की अनेक जाणकार त्यांची तुलना गोविंदराव टेंबे यांच्या पेटीवादनाशी करत असत. अनेक नामवंत गायक-गायिकांना त्यानी साथ केली होती; किंबहुना त्यामधील अनेकजण बाळकृष्णबुवाना मुद्दाम पाचारण करत. त्यांचा स्वतःचा कमालीचा संकोची स्वभाव, प्रसिद्धीविन्मुख वृत्ती, आणि सांगलीसारख्या, पुण्या-मुंबईच्या तुलनेत छोट्या गावातील वास्तव्य, यामुळे त्यांच्या पेटीवादनातील नैपुण्याचा किंवा त्यानी स्वतः तयार केलेल्या २२ श्रुतींच्या हार्मोनिअमचा व्हावा तसा बोलबाला झाला नाही. हिराबाई बडोदेकरांची गायकी तंतोतंत आत्मसात करणाऱ्या आणि नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकरांच्या स्नुषा असणाऱ्या इंदिराबाई खाडिलकरानी, संगीत, नाट्य-संगीत क्षेत्रात सांगलीचं नाव चांगलंच गाजवलं. तीच संगीत-परंपरा आता सांगलीच्या आशा खाडिलकर, वर्षा भावे पुढे नेत आहेत. आशा खाडिलकरांचं कौतुक म्हणजे त्यांच्या गुरु, माणिक वर्मा यांच्याप्रमाणेच त्या शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत अशा तिन्ही क्षेत्रांमध्ये पारंगत आहेत.

भावगीत गायनातील ज्येष्ठ गायक जे. एल. रानडे हे सांगलीचेच. खुद्द गजाननराव वाटवे सांगली गावाशी अनेक वर्षे संबंधित आहेत. जुन्या जमान्यातील बाळ कारंजकर यानी सुद्धा भावगीत-गायनात नाव कमावलं.

आजमितीला मंगला जोशी, मंजिरी असनारे आणि मंजुषा कुलकर्णी या तीन 'मं' कारित-संगीत गायिका शास्त्रीय संगीतात सांगलीचं नाव सर्वत्र दुमदुमवत आहेत ही सांगलीकरांच्या अभिमानाची गोष्ट आहे.

**सांगली आणि पत्रकारिता :** १९३७ मध्ये सांगलीत 'दक्षिण महाराष्ट्र' आणि 'विजय' ही साप्ताहिके निघू लागली. तेव्हापासून सांगलीला पत्रकारितेची परंपरा आहे. या पत्रकारितेच्या क्षेत्रात, सदाशिवराव फडके. ह. गो. टिळक, भ.अं. तथा बापूसाहेब दप्तरदार, त्यांचे बंधू गणपतराव दप्तरदार, रामभाऊ जामदार, बी.जी. (काका) कुलकर्णी, गजाननराव भोसले, राष्ट्रशक्तीचे दीनानाथ भोसले अशी अनेकांची नावे घ्यावी लागतील. पुण्याच्या 'केसरी' चे संपादक अरविंद व्यं. गोखले हे मूळचे सांगलीचेच. आजमितीला सांगलीहून लोकमत, पुढारी, सकाळ, दक्षिण महाराष्ट्र केसरी, अशा अनेक वृत्तपत्रांचे प्रकाशन होते. त्याशिवाय राष्ट्रशक्ती, अग्रदूत, नवसंदेश, प्रभातदर्शन, जनप्रवास, ललकार यांसारखी दैनिके आज सांगलीत आहेत. 'विजयंत', 'बिझनेस एक्स्प्रेस' यांसारखी साप्ताहिकेही सांगलीतून निघतात.

**संस्कृत परंपरा :** श्रीपादशास्त्री देवधर, पाटीलशास्त्री, केशवराव दीक्षित अशा संस्कृत पंडितांनी, मुंबई विश्वविद्यालयाच्या जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती विजेत्यांची

गौरवशाली परंपराच सांगलीमध्ये निर्माण केली. सांगली हायस्कूल आणि सिटी हायस्कूल मधील नामफलक बघितले म्हणजे किती तरी गुणवंत शंकरशेट स्कॉलर्स आढळतील. त्यातूनच अनेकजण आय.सी.एस. अधिकारी झाले. पं. महादेवशास्त्री जोशी यांचे सांगलीच्या वेदशास्त्रशाळेत शिक्षण झाले होते. प्राच्याविद्या संशोधक ग.वा. तगारे सांगलीचेच.

**सहकार :** वसंतदादांमुळे सांगली जिल्ह्यात सहकारक्षेत्राचे जाळेच विणले गेले. या क्षेत्रात राजारामबापू पाटील, गुलाबराव पाटील, धुळाप्पाण्णा नवले, आबासाहेब खेबूडकर, माधवराव गोडबोले, चारूभाई शहा वगैरे मंडळीनी मोठेच योगदान दिले. आज सांगलीत अनेक क्षेत्रांमध्ये 'सहकार' हा परवलीचा शब्द बनला आहे.

**वैद्यक :** वि.स. खांडेकरांनी ज्यांचं वर्णन, 'मला भेटलेला देवमाणूस' अशा शब्दांमध्ये केलं होतं ते परोपकारी डॉक्टर, हरी श्रीकृष्ण देव, डॉ. व्ही. एन. देसाई, डॉ. बापट अशा अनेक डॉक्टरांचा अुल्लेख नामवंत सांगलीकरांमध्ये करायला तर हवाच, पण त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा स्वतंत्रपणे मागोवा घ्यायला हवा. आजमितीला नेत्रतज्ञ, डॉ. भय्यासाहेब परांजपे यांची कीर्ती सर्वदूर पसरली आहे. नुकतेच दिवंगत झालेले ख्यातनाम साहित्यिक आणि महाराष्ट्राचं लाडकं दैवत म्हणून सार्थपणे ज्यांचा अुल्लेख केला जातो, ते पु. ल. देशपांडे, डोळ्यांवर अुपचार करून घेण्यासाठी मुद्दाम या भय्यासाहेबांकडे येऊन रहात असत. आयुर्वेदाची सांगलीत जुनी परंपरा आहे. खुद्द आबासाहेब सांबारे यांचे दोन्ही बंधू निष्णात वैद्य होते. वेलणकर, वझे, दातार, जोशी, अशा अनेक मंडळीनी जुनी वैद्यकी चालू ठेवली. आज तर अॅलोपॅथीला पर्याय म्हणून आयुर्वेदाकडे बघितले जाते. त्यामुळे डॉक्टरांबरोबरच आयुर्वेद वैद्यांचीहि सांगलीत मोठी संख्या आहे.

**क्रीडापरंपरा :** सांगलीची क्रीडापरंपरा ही पण अभिमानास्पद आहे. विजय हजारे, नंदू नाटेकर, हरिनाना पवार, यांचा या पुस्तकात अुल्लेख आलेला आहेच. त्याखेरीज नामवंत क्रीडापटुंमध्ये, व्यंकाप्पा बुरुड, ज्योतिरामदादा सावर्डेकर, मारुती माने, गणपतराव आंदळकर अशा सांगलीशी संबंधित मल्लांचा अुल्लेख करावा लागेल. या पैलवानमंडळीनी सांगलीचा नावलौकिक कुस्तीक्षेत्रात वाढवला. सांगलीच्या तरुण-तरुणीना, बालवयापासून क्रीडाक्षेत्रातील अत्याधुनिक सुविधा लाभल्या पाहिजेत, अुत्कृष्ट मैदान मिळालं पाहिजे, यासाठी क्रीडासंघटक अण्णासाहेब गोटखिंडे यानी फार परिश्रम घेतले. तरुणभारत, आझाद व्यायाममंडळ, विजयंता व्यायाममंडळ, समर्थ व्यायाम मंडळ, अशा अनेक संस्थांच्या प्रयत्नांमुळे क्रीडाक्षेत्रात सांगली अग्रेसर राहिली आहे. बुद्धिबळ प्रशिक्षक भाऊसाहेब पडसलगीकर आणि त्यांच्या नूतन बुद्धिबळ

मंडळाचा अुल्लेख याआधी आलेला आहेच. या सर्वांच्यामुळे महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती' पुरस्कार अनेक सांगलीकरानी मिळविलेला आहे. मारूती माने (कुस्ती) अनिल पाटील (वेटलिफ्टींग), सौ. भाग्यश्री साठे - ठिपसे (बुद्धिबळ) नसरुद्दीन नायकवडी (कुस्ती), बशीर शेख (वेटलिफ्टिंग), श्रीराम भावसार (कबड्डी), सुजाता नवले-कल्याणी (व्हॉलीबॉल), अण्णासाहेब गोटखिंडे (क्रीडासंघटक), भाऊसाहेब पडसलगीकर (क्रीडा-प्रतिनिधी) स्वाती करंदीकर (कबड्डी) असे काही ठळक अुल्लेख. 'पौरुष' पारितोषिक विजेते व अंटार्टिकावरील मोहिमेचे कमांडिंग ऑफीसर कर्नल जगदीश खाडिलकर हे सांगलीचेच.

**कला परंपरा :** सांगली संस्थान, जवळच्या कोल्हापूर संस्थानाइतके मोठे नव्हते. किंबहुना कोल्हापूरला (ज्याचा अुल्लेख कौतुकाने कलापूर असा केला जातो) चित्रकला, शिल्पकला आदी बाबीना जसा राजाश्रय, धनिक सरदारमंडळींचा मोठ्या प्रमाणावर लोकाश्रय लाभला, तसा प्रकार सांगलीत नव्हता. तथापि अलीकडच्या ५०-६० वर्षांच्या काळात सांगलीच्या कलाकारानी कलाक्षेत्रात स्पृहणीय कामगिरी बजावली. त्यामधील पायाभरणीचे काम, थोर चित्रकार, कै. पंत जांभळीकर यानी केले यात शंकाच नाही. १९३० साली मुंबईला जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या डिप्लोमा परीक्षेत फर्स्ट क्लास मिळून, त्याना त्या संस्थेची फेलोशिप मिळाली होती. तैलरंगातील आणि जलरंगातील त्यांची गाजलेली चित्रे, अनेक रसिकांच्या, संस्थांच्या दालनांची शोभा वाढवत आहेत. त्यांचे त्याहून महत्वाचे कार्य म्हणजे गुरूकुल पद्धतीने, चित्रकलेच्या सर्व प्रकारांचे ज्ञान देऊन, त्यानी मोठ्या प्रमाणावर शिष्य-परंपरा निर्माण केली. त्यांच्यानंतर, माधवराज गुजर, अण्णासाहेब चौगुले, नाना पोतदार, ओतारी, वेदपाठक यासारख्या अनेक मंडळीनी, दिमाखात ही कला परंपरा पुढे नेली. ओतारी मंडळीनी शिल्पकलेतही मुसंडी मारली. जागोजागी अुभे असलेले पुतळे त्याचे साक्षी आहेत. वेदपाठक मंडळींचे गणेशोत्सवातील देखावे, वैशिष्ट्यपूर्ण साईनबोर्डस् यानी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तात्यासाहेब वेदपाठकानी १९६४ च्या मडगाव-गोव्याच्या साहित्य संमेलनानिमित्त २०० फूट लांब आणि ३५ फूट अुंच, अशा भव्य प्रवेशद्वाराचे केलेले डेकोरेशन फार नावाजले गेले होते. अलीकडच्या काळातील कल्याणराव शेटे यांच्या कलाकृतीनी सांगलीचे नाव सर्वतोमुखी केले. पंढरपूरच्या देवळातील रुक्मिणी आख्यानावरील त्यांची चित्रमालिका खूप गाजली. ही पेंटिंग्ज, राजा रविवर्माच्या चित्रांची आठवण करून देतात असे धन्योद्‌गार, जागतिक कीर्तीचे चित्रकार, एफ्.एम्. हुसेन, एस्.एम्. पंडित आदी मंडळीनी काढले होते. कल्याणरावांची ५-६ हजारांहून अधिक चित्रे, महाराष्ट्रात सर्वत्र आणि महाराष्ट्राबाहेर पोचली आहेत. आता तर सांगलीमधे 'कलाविश्व महाविद्यालय' उभे आहे. सांगलीच्या

'शांतिनिकेतन' या निसर्गरम्य परिसरात, १ जुलै १९६८ रोजी ही संस्था सुरु झाली. चित्रकलेच्या सर्व अंगांचे शास्त्रशुद्ध शिक्षण, तज्ञ अध्यापकांकडून या संस्थेत दिले जाते. संपूर्ण महाराष्ट्रात, स्वतंत्र 'कलादालन' असणारे हे एकमेव महाविद्यालय असावे. त्यामुळे सांगलीची कलापरंपरा मोठ्या गौरवशाली मार्गाने वाटचाल करेल यात शंकाच नाही. सांगली परिसरात, कलावंत मंडळींची, आता एवढी प्रचंड क्षमता (Potential) आहे की सांगलीत एक मोठी 'आर्ट गॅलरी' लौकरात लौकर निर्माण होणे आवश्यक आहे.

कलापरंपरेत आता फोटोग्राफीचाही अुल्लेख करणे अगत्याचे आहे. जुन्या संस्थानी काळातील कै. सखारामपंत घारपुरे याना या क्षेत्रातील 'पायोनिअर' म्हणायला हरकत नाही. त्यापाठोपाठ व्ही.जी. लिमये, जप्तीवाले, धामणीकर, चिवटे अशी अनेक नावे डोळ्यासमोर येतात. त्यात नाना धामणीकरानी, प्रेस फोटोग्राफीत मोठे नाव कमावले. आता तर या क्षेत्रात प्रचंड क्रांती झाली आहे. सांगलीच्याच गोपाळराव बोधे या छायाचित्रकाराने, जागतिक स्तरावर फोटोग्राफीत सांगलीचे नाव अुच्चस्थानावर नेले आहे. अलीकडेच त्यानी कौतुकाने आपल्या सांगली गावात भरवलेल्या भव्य प्रदर्शनाला रसिकानी तीन दिवस अलोट गर्दी केली होती. 'हॉबी सर्कल, 'प्रतिबिंब' अशा सांगलीतील संस्थांमुळे हौशी, धंदेवाईक छायाचित्रकारांची सध्या रेलचेल आहे. अशा संस्था वेळोवेळी जी प्रदर्शने भरवतात, त्यातून नवीन छायाचित्रकारांना मोठेच प्रोत्साहन मिळते.

**सराफी परंपरा :** सांगलीची सराफी परंपरा ही पण वैशिष्ट्यपूर्ण आहे. सांगली घाटाची चांदीची भांडी पूर्वी फार प्रसिद्ध होती. संपूर्ण महाराष्ट्रात या भांड्यांचा मोठा बोलबाला होता. यंत्रे आल्यावर मात्र आता पूर्वीसारखी भांडी बनवली जात नाहीत. सोन्याच्या अलंकारातील नाजूक आणि कुशल कारागीरीसाठी सांगली पेठेची मोठी प्रसिद्धी आहे. नेकलेस, अंगठ्या, बुगड्या, कर्णफुले, बांगड्या या अलंकारांप्रमाणेच अनेक बारीक कलाकुसरीचे दागिने सांगलीत बनविले जातात. १९६३ च्या सुवर्ण नियंत्रण कायद्याचा फटका, त्यावेळी जसा सराफाना बसला तसाच तो कुशल कारागीरानाही बसला.

**सांगलीची औद्योगिक परंपरा :** हा मोठाच विषय आहे. त्या संदर्भात पुस्तकात इतरत्र बरीच माहिती आलेली आहेच.

**सांगलीतील सामाजिक परंपरा :** सांगलीतील सामाजिक सुधारणांच्या परंपरेची सुरवात नाट्यचार्य देवल यांच्या शारदा नाटकापासूनच सांगलीत सुरु झाली असे म्हणायला हरकत नाही. सांगलीचे राजेसाहेब आणि त्यांच्या सुसंस्कृत पत्नी

सौ. सरस्वतीदेवी राणीसाहेब हे दोघेही प्रागतिक मतांचे असल्यामुळे त्यांनी सांगलीतील अनेक सामाजिक व शिक्षणसंस्थांना मदत करुन सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन दिले. जुन्या काळातील विठ्ठलराव जोशी, गंगुनाना कानिटकर, डॉ. व्ही.एन. देसाई, डॉ. कृ.पां. बापट, अंबूताई मेहेंदळे, तिरमारे गुरुजी, आदी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांचा उल्लेख सांगलीच्या सामाजिक परंपरेच्या संदर्भात करावाच लागेल. असे अनेक सामाजिक कार्यकर्ते होऊन गेले. विस्तारभयास्तव सर्वांचा उल्लेख करता येत नाही. कै. बाबाराव सावरकर, (स्वा. सावरकरांचे ज्येष्ठ बंधू) त्यांच्या अखेरच्या काळात सांगलीतच राहत होते. अंदमानची खडतर शिक्षा भोगून त्यांनी केलेल्या राजकीय कार्याइतकेच त्यांचे सांगलीमधील सामाजिक कार्य महत्वाचे होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते का. भा. तथा काकासाहेब लिमये हे महाराष्ट्राचे पहिले प्रांतसंघचालक होते. काकासाहेब म्हणजे सांगलीमधील एक बुलंद व्यक्तिमत्त्व होते. पहिले सरसंघचालक केशवरावजी हेडगेवार, गोळवलकर गुरुजी यांजपासून तो लालकृष्ण अडवानी, अटलबिहारी वाजपेयी यांजपर्यंत अनेक महनीय व्यक्ती काकासाहेबांच्या घरी येऊन गेल्या आहेत. काकासाहेब सामाजिक, राजकीय, कार्यात अग्रेसर होतेच पण त्याखेरीज त्यांनी पत्रकारिताही केली होती. 'विक्रम' नावाचे साप्ताहिक त्यांनी चालविले होते तसेच 'पौरुष' नावाचे अर्धवार्षिकही ते आयुष्याच्या अखेरच्या दिवसात चालवत होते. याच संदर्भात कै. बापूराव साठे यांचेही वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. त्यांनी गोवा मुक्ती आंदोलन, हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्वतंत्र हिंदुस्थान संघटनेच्या माध्यमातून काम केले होते. मिरजेतील अरब हटाओ मोहिम, शुद्धिकार्य आदी अनेक प्रकारची सामाजिक कामे त्यांनी केली व स्वा. सावरकरांना अभिप्रेत असणाऱ्या सुधारणा बहुजन समाजात पोचविण्याचा प्रयत्न केला. तसेच महत्वाचे सामाजिक काम सध्या संभाजीराव भिडे करीत आहेत. खादीची टोपी, धोतर आणि अनवाणी पायानी वावरणाऱ्या या विभुतीने हजारो लोकांपर्यंत शिवभक्ती व राष्ट्रभक्ती पोचविली आहे. त्यांच्या प्रेरणेने गडकोट मोहिम व रोज रायगडला शिववंदन अशी अभिमानास्पद कामे चालू आहेत. श्रीमती मालूताई जोशी यांचे सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. झोपडपट्टीमधील मुलांसाठी त्या अनेक उपक्रम राबवत आहेत.

सांगलीची कीर्ती जशी कर्तृत्ववान व्यक्तिंमुळे पसरली तशीच ती मळीकाठची वांगी, भुईमुगाच्या शेंगा, मक्याची कणसं, ऊसाचा रस, फिके पेढे यामुळेहि पसरली. मुंबईचा पाहुणा परतताना आवर्जून कृष्णाकाठची वांगी, लुसलुशीत कोवळ्या काकड्या घेऊन जात असे. पण सांगलीचं नाव सर्वतोमुखी झालं ते मात्र कुरकुरीत, चटकदार भडंगामुळे. सांगलीचे भडंग सर्वत्र प्रसिद्ध आहेत. आणि त्याचं श्रेय गोरे बंधुंकडे जातं!

आज तीस-पस्तीस कंपन्या भडंगनिर्मितीत गुंतल्या आहेत.

सांगलीच्या माणसाची ख्याती, अुत्तम पोहणारे आणि अुत्तम खवय्ये म्हणून होती. जिलबीची अख्खी ताटेच्या ताटे बसल्या बैठकीला फस्त करणारे खवय्ये या सांगलीत अनेक होते. या खादाडीवरून सहजच आठवण होते ती सांगलीच्या कमलाताई ओगले यांची. विविध प्रांतातील, विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांबाबत त्यानी आपल्या 'रुचिरा' या पाककला पुस्तकाद्वारे, समर्थपणे मार्गदर्शन केले आहे. पाककला या विषयावरील सर्वमान्य झालेलं 'रूचिरा' हे मराठीमधील पहिलंच पुस्तक असावं. त्यांच्या पाककलांच्या प्रात्यक्षिकांचे वर्ग परदेशातसुद्धा झाले.

तेव्हा कर्तृत्ववान सांगलीकरांची यादी करायची म्हटलं तर ती मारुतीच्या शेपटीप्रमाणे लांबतच जाते. अुपरोक्त वर्णनात स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकांचाच परामर्श प्रामुख्याने घेतला गेला आहे. अलीकडील पन्नास वर्षांच्या काळातील सांगलीकरांच्या कर्तृत्वाचा परामर्श घेण्यास आपण सहजपणे थांबू शकतो; मात्र विस्मृतीच्या गर्तेत जाणाऱ्या कर्तबगार आणि वैशिष्टयपूर्ण सांगलीकरांची स्मृती जतन करण्याच्या प्रयत्नात अनेक नावे ओठांवर येऊनही, बघता बघता अंतर्धान पावतात! महाराष्ट्राला 'स्वाध्याय ज्ञानेश्वरी' शिकविणारे आणि पट्टीचे वक्ते म्हणून सर्वमान्य झालेले केशवराव छापखाने, लोकमान्यांच्या 'गीतारहस्याचे' निर्भीडपणे खंडन करणारे व महाराष्ट्राला 'भागवतादर्श' दाखवणारे यशवंतराव कोल्हटकर सांगलीचेच. सुप्रसिध्द उद्योगपती आबासाहेब गरवारे हे सांगलीचेच. त्यांनी सांगलीत माधुकरी मागून स्वतःची उन्नती करुन घेतली होती. सांगलीत औद्योगिक पाया घालणाऱ्या अनेक सांगलीकरांपैकी, रामभाऊ भिडे हे अतिशय कल्पक गृहस्थ होते. शेंगा फोडण्याची मशिन्स प्रथम त्यांनी बनविली होती. ती किर्लोस्कर मंडळींना इतकी आवडली की त्यांनी त्याचे पेटंट भिडे मंडळींकडून घेतले. गणपतरावजी अभ्यंकर, गणपतीरावजी गोडबोले, केशवराव चौगुले, पाटील वकील वगैरे मान्यवरांनी वकिली क्षेत्रात नैपुण्य दाखविलेच पण त्याबरोबरच सामाजिक बांधिलकेचेही भान राखले. व्यायामपटू रास्तेमास्तर, स्काअुटमास्तर आठवले, क्रीडाशिक्षक हणमंतराव भोसले, नाना देवधर, शिक्षणतज्ञ वा.गो.शिराळकर अशा काही जुन्या सांगलीकरांपासून तो अलीकडच्या काळातील शिक्षणक्षेत्रात विशेष कामगिरी बजावणाऱ्या श्रीमती कळंत्रेअक्का, गुलाबराव पाटील, क्रिकेटपटू विजय भोसले, यांच्याबरोबरच आज सांगलीचे नाव गाजवलेले छायाचित्रकार गोपाळराव बोधे, एन्रॉनमधील अुच्चपदस्थ संजीव खांडेकर, मधुरा सिहांसने. आय.ए. एस. मध्ये नैपुण्य दाखविणारी अश्विनी कुलकर्णी, गुंडांशी सामना करणारी, धाडसी महिला पोलिस अधिकारी मृदुला लाड अशा अनेक सांगलीकरांची आठवण होते आणि एक किस्सा आठवतो.

पुण्याच्या चतुःशृंगी भागात एक टुमदार बंगला आहे. मुख्य बंगल्याच्या चारी बाजूना भरपूर रिकामी जागा आहे. त्यावर सर्व प्रकारची झाडे, अगदी कलमी आंबा, नारळ, पोफळी, पेरू, सीताफळ, चिकू, जांभूळ, कवठ, रामफळ, चिंच, या फळझाडां-पासून ते अगदी गुलाब, जाई-जुई मोगरा, झेंडू, तगर, सोनचाफा, डेलिया यापर्यंत अनेक फुलझाडे आहेत. या फळाफुलांखेरीज वड, पिंपळ, अुन्हाळ्यात फुलणारे लालचुटुक गुलमोहर अशी अनेक झाडे आहेत. या घरात राहणाऱ्या मुलाला 'माझे घर' या विषयावर शाळेत निबंध लिहायचा प्रसंग आला. तेव्हा घराचे वर्णन लिहिता लिहिता त्याने सर्व फळझाडांची, फुलझाडांची नावे लिहिली. निबंध तपासणाऱ्या बाई चकित झाल्या. त्याना अतिशयोक्ती वाटली. अशी घरं आजकाल कुठं असतात का ? एवढी जागा असलेले घर केव्हाच बिल्डरच्या घशात गेलं असतं ! असा विचार करुन केवळ कुतुहलापोटी त्यानी त्या मुलाच्या नकळत, शाळेच्या मधल्या सुट्टीत इतर दोन मुलांना त्याच्या घरी पाठवले. सगळ्या वृक्षवल्लींची यादी करायला. मुलं परत आली. बाईना म्हणाली 'अहो, त्यांच्या अंगणात याहूनही अधिक झाडे आहेत. किती तरी नावे लिहायला हाच विसरलाय ! '

आपल्याच गावातील कर्तृत्ववान सांगलीकरांची मोजदाद करताना, वरील मुलासारखीच प्रस्तुत लेखकाची अवस्था झालीय !

■■■

# सांगलीतील काही नामवंत संस्था

सांगलीतील कर्तबगार व्यक्तिनी, जसं वैयक्तिक पातळीवर सांगलीचं नाव गाजवलं, तसंच काही संस्थांमुळे सांगली नावाजली गेली. सांगली नगरीला अशा संस्था भूषणभूत झाल्या. विविध क्षेत्रात अशा अनेक संस्था आहेत. आधी म्हटल्याप्रमाणे या संस्थांचा यथोचित परिचय करून देणे हाच एक मोठ्या ग्रंथाचा विषय. कोणी तरी तसा प्रयत्न करायला हवा. अिथे फक्त प्रातिनिधिक स्वरुपातच काही संस्थांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे : -

**१ ) सांगली ( जिल्हा ) नगरवाचनालय - एक सांस्कृतिक व्यासपीठ :** सांगलीचे सुप्रसिद्ध साहित्यिक कै. वि. स. खांडेकर यानी लेखक म्हणून झालेल्या आपल्या जडण-घडणीत सांगली नगरवाचनालयाचा मोठा वाटा होता असं प्रांजळपणाने सांगितलं आहे. असे हे वाचनालय आता वयाने १३२ वर्षांचे झाले आहे.

या नामवंत संस्थेची स्थापना १८६९ साली झाली. याचे बरेचसे श्रेय रावसाहेब बाळकृष्ण स. मोने या सद्‌गृहस्थाकडे जाते. सांगली संस्थानचे अधिपती श्रीमंत धुंडीराज तथा तात्यासाहेब पटवर्धन याना इंग्रजी शिकवण्यासाठी श्री. मोने यांची नेमणूक झालेली होती. त्यांना वाचनाची आवड होती. त्यानीच पुढाकार घेऊन हे वाचनालय सुरु केले. पहिली आठ-दहा वर्षे वाचनालयाची व्यवस्था पूर्ण सरकारी होती. पुढे वाचनालयाची व्यवस्था वर्गणीदार सभासदांकडे देण्यात आली तसे त्याचे स्वरूप सार्वजनिक झाले. पहिली काही वर्षे या संस्थेचे प्रचलीत नाव 'बुक क्लब' किंवा 'सांगली लायब्ररी' असे होते. संस्थेची पहिली घटना १८९६ साली तयार करण्यात आली आणि त्या घटनेनुसार 'सांगली जनरल लायब्ररी' असे नाव ठेवण्यात आले. ॲडमिनिस्ट्रेटर बर्क यांच्या काळात तर ब्रिटीश धाटणीनुसार या संस्थेचे नाव 'सांगली नेटीव्ह जनरल लायब्ररी' असे लावण्यात येऊ लागले. मात्र १९२४ साली संस्थेची घटना जेव्हा प्रथमच छापून घेण्यात आली, तेंव्हा 'नगरवाचनालय' असे मराठी नामांतर करताना वरील इंग्रजी नावास फाटा देण्यात आला ! हा नामांतराचा प्रवास १९५० साली शासनाकडून जिल्हा वाचनालयाचा दर्जा मिळाल्यानंतर संपला. आणि १९५० च्या घटनेत नोंद करून, 'सांगली (जिल्हा) नगर वाचनालय' असं नाव रूढ करण्यात आलं.

हे वाचनालय सुरुवातीच्या काळात केंगणेश्वरी चौकात आणि नंतर पांजरपोळाच्या वास्तूत 'वस्तीला' होते ! जसजशी सभासद संख्या वाढू लागली तसतशी स्वतःच्या

वास्तूची गरज संस्थेला भासू लागली. तत्कालीन प्रशासक बर्क याना अनेकवार विनंती केल्यावर त्यांनी मोलाची मदत केली. सध्याची, राजवाडा चौकातील मध्यवर्ती ठिकाणी त्यानी जागा दिली आणि ३६ x '१८' ची इमारत बांधण्यासाठी रु. ४२००/- अनुदानाच्या स्वरुपात दिले. नव्या वास्तूत आल्यानंतर मात्र वाचनालयाची खऱ्या अर्थाने भरभराट सुरू झाली. व्याख्याने, चर्चासत्रे आदी अुपक्रम वाढू लागल्यावर मोठ्या जागेची आवश्यकता भासू लागली. संस्थेला आर्थिक दृष्ट्या मजबूती आणण्याची गरज जाणवू लागली तेव्हा व्यावहारिक विचार करून जुनी इमारत पाडून मोठी वास्तू बांधण्याचे ठरले. १९५८-५९ ते १९७० पर्यंत काम चालत चालत सध्याची टोलेजंग इमारत अुभी राहिली. दरम्यानच्या काळात वाचनालय टिळक स्मारक मंदिरामध्ये हलवण्यात आले होते.

'वाचकांसाठी पुस्तके, वर्तमानपत्रे संग्रहित करणे' या सुरुवातीच्या प्राथमिक हेतूपासून तो 'जनतेत चांगल्या ग्रंथांची वाचन-अभिरूची अुत्पन्न करून तिच्यामध्ये म्हणजे जनतेमध्ये बौद्धिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे' या व्यापक अुद्देशापर्यंत वाचनालयाची व्याप्ति वाढली आहे. सध्याच्या तीन मजली अिमारतीच्या पहिल्या मजल्यावर पुस्तक-संग्रह आहे. आणि तिथेच पुस्तकांची देवघेव चालते, संस्थेचे ऑफिसहि पहिल्या मजल्यावरच आहे. दुसऱ्या मजल्यावर मुक्तद्वार वाचनालय आहे. वाचकांना इंग्रजी, मराठी, गुजराथी, हिंदी आणि कन्नड भाषेतील मासिके, वृत्तपत्रे विनामूल्य वाचावयास मिळतात. कै. बापूसाहेब दप्तरदार संदर्भ विभागात, गेल्या सहा महिन्यातील वृत्तपत्रे संदर्भासाठी मिळू शकतात. कै. सौ. कालिंदीबाई साने बाल-विभागात, छोट्या मुलांची सोय आहे. चार हजारांहून अधिक पुस्तके त्याना तिथे वाचायला मिळू शकतात. शिवाय मासिके, पाक्षिकेहि वाचावयास मिळतात. कै. सौ. अिंदुमती टिळक महिला विभागात, महिलांसाठी वाचनाची विनामूल्य स्वतंत्र व्यवस्था आहे. या विभागातर्फे स्त्रियांना वेगळे व्यासपीठ अुपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून, त्यांच्यासाठी भावगीत स्पर्धांचे आयोजन केले जाते तसेच महिलांसाठी वासंतिक हळदी-कुंक समारंभ प्रतिवर्षी आयोजित केले जातात. 'टिळक अभ्यासिका' या विभागात गरजू विद्यार्थ्यांना आणि संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जागा अुपलब्ध करून दिली जाते. कै. के. वा. जोशी नाट्यविभाग हे एक वैशिष्ट्यपूर्ण दालन आहे. या स्वतंत्र नाट्यविभागात, अगदी दुर्मिळ अशी नाट्यपुस्तके आहेत. २६१४ पुस्तकांचा दुर्मिळ असा हा महाराष्ट्रातील एकमेव संग्रह असावा. नाटकांशी संबंधित व्यक्तिनाच वा संस्थेला विनामूल्य वाचनासाठी पुस्तके यामधून दिली जातात. राजा राममोहन रॉय फाअुंडेशनकडून मिळालेल्या रंगीत टी.व्ही.वरून ठराविक कार्यक्रम रोज दाखवले जातात. तसेच ब्रिटीश कौन्सिल, न्यूजट्रॅकतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या व्ही.डी.ओ.

कॅसेटहि दाखवल्या जातात. तिसऱ्या मजल्यावर अुद्योगरत्न वेलणकर सभागृह आहे. त्याचा अुपयोग सांस्कृतिक आणि सामाजिक कामांसाठी केला जातो. या नगरवाचनालयाचे एक वैशिष्ट्य म्हणजे ग्रंथ देवघेवीसाठी वाचकांना 'मुक्त प्रवेश' आहे.

राज्यस्तरावर 'अ' वर्गातील अुत्कृष्ट ग्रंथालय म्हणून या वाचनालयास राज्य शासनाने १९८६ सालीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार दिला आहे. बँकिंग क्षेत्रात जशी जिल्ह्याजिल्ह्यात 'लीड बँक' असते तेच स्वरूप या वाचनालयाचे सांगली जिल्ह्यात आहे. तालुका आणि ग्रामीण वाचनालयांना 'सांखळी' योजनेतून राज्य सरकारने दिलेली पुस्तके पुरवली जातात. वाचनालयातर्फे ग्रामीण भागात ग्रंथप्रदर्शने भरवली जातात. वेळोवेळी भरवल्या जाणाऱ्या मेळाव्यांतून जिल्ह्यातील ग्रंथ कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडवले जातात. त्यांच्यासाठी भाषणे आयोजित केली जातात.

आजमितीला या वाचनालयातील ग्रंथसंग्रह ८६,००० च्या वर आहे. लौकरच हा संग्रह लाखाच्या घरात जाईल. वाचनालयाच्या वतीने सांगलीत आणखी काही अन्य ठिकाणी, वाचकांच्या सोयीसाठी पुस्तकांची देवघेव चालते. रोटरी क्लब सांगली सिटी आणि रोटरी इंटरनॅशनल यांच्या आर्थिक सहकार्याने वाचनालयाचे संपूर्ण संगणकीकरण नुकतेच जवळपास पूर्ण झाले आहे. सभासद संख्या आता २००० च्या वर आहे. त्याखेरीज मुक्त वाचनालयाचा (वृत्तपत्रे-मासिके वगैरेसाठी) फायदा हजारो लोक घेत असतात. संस्थेचे पदाधिकारी-कार्यकारी मंडळ यांच्या डोळस प्रयत्नाने ही संस्था म्हणजे एक सांस्कृतिक व्यासपीठ बनले आहे. भावगीत, वक्तृत्व, पाठांतर, कथाकथन स्पर्धा, चर्चासत्रे, ज्ञानसत्रे, ग्रंथप्रदर्शने यामुळे नगरवाचनालय म्हणजे सांगली नगरीचे वैभवशाली सांस्कृतिक केंद्रच बनले आहे.

**२ ) सव्वाशे वर्षांची 'सांगली नगरपालिका' :** थोरल्या चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धनानी मिरज जहागीरीतून फुटून, 'सांगली' आपल्या जहागीरीची राजधानी केली; त्यावेळी सांगली गाव फक्त सहा गल्लीत सामावलेलं होतं. १८०० च्या सुमारास चिंतामणरावानी पेठा आखून गाव पद्धतशीपणे वसवण्यास प्रारंभ केला.

१८६४ मध्ये गावात 'शहर सफाई कचेरी' स्थापन झाली. आणि प्रत्यक्ष म्युनिसिपालिटीची (म्हणजे नगरपालिकेची; हा शब्द नंतर रूढ झाला) स्थापना, तत्कालीन ब्रिटीश अॅड्मिनिस्ट्रेटर मेजर वेस्ट यानी २१ फेब्रुवारी १८७६ रोजी केली. म्हणजे सध्याच्या महानगरपालिकेच्या पोटात असलेली सांगली नगरपालिका स्थापन होऊन आता जवळजवळ सव्वाशे वर्षे झाली. सुरवातीचा सांगली नगरपालिकेचा कारभार, मूळ गावभाग, पेठभाग, गणपतीमंदिर परिसर आणि गणेशदुर्ग परिसर एवढ्या भागापुरताच मर्यादित होता. जसजसे कृष्णा नदीच्या महापूराचे पाणी लोकवस्तीला

त्रासदायक होऊ लागले, तसतसा गावाचा विस्तार खणभाग, शिवाजीनगर असा वाढत गेला; आणि पर्यायाने नगरपालिकेचा अधिकारहि ! १९१४ च्या महापुरानंतर आणि १९१९ च्या विलिंग्डन कॉलेजच्या स्थापनेनंतर, सांगली, मिरज-रस्त्याच्या बाजूला वाढू लागली. १९२९ मध्ये आयर्विन ब्रिज झाल्यावर सांगली नगरपालिकेची कक्षा पश्चिमेकडील भागात विस्तारली; मात्र अुत्तर दिशेच्या शेरी नाल्यामुळे सांगलीची त्या बाजूची वाढ मर्यादितच राहिली.

सुरुवातीच्या काळात नगरपालिकेसंबंधात काही मनोरंजक घटना आढळतात. १८७१ च्या सुमारास, कसबीणपट्टी नावाचा कर बसवण्यात आला होता. शहरातील नायकिणी आणि वेश्या यांजकडून त्यांच्या अुत्पन्नाच्या (?) मानाने दरसाल १ रूपया ते ५ रूपयांपर्यत कर घेतला जात असे; अर्थात् लौकरच हा कर रद्द करण्यात आला ही गोष्ट वेगळी. १८९६ च्या सुमारास म्युनिसिपालिटीच्या चेअरमनला म्हणजे 'सरपंचास' आपल्या दप्तरात कामकाजासाठी येण्यासाठी, वाहन म्हणून घोडा ठेवण्याची मुभा होती. आणि या घोड्यासाठी म्युनिसिपालिटी दरमहा १५ रु घोडेभत्ता म्हणून देत होती ! १८८७ मध्ये प्रथमच सांगली गावाला काकडवाडीहून सायफन पद्धतीने स्वच्छ पाणी-पुरवठा सुरु झाला. १८९८ मध्ये सांगली गावात पहिली मोठी प्लेगची साथ आली. पंधरा-सोळा हजाराच्या त्यावेळच्या लोकवस्तीत २१५९ माणसं दगावली! लोकवस्तीच्या मानाने ही मोठीच हानी होती. नंतरहि बरीच वर्षे प्लेगच्या साथीचा त्रास सांगलीला होत होता. नगरपालिका सुरुवातीला नदीच्या बाजूच्या धर्मशाळेत होती. १९१७ मध्ये नगरपालिका स्वतःच्या इमारतीत आली. (म्हणजे सध्याची जुनी बिल्डिंग) ॲड्मिनिस्टेटर बर्क यांच्या पुढाकाराने सांगलीची शोभा वाढवणाऱ्या बऱ्याच इमारती बांधल्या गेल्या.

सांगली नगरपालिकेला निवडणुकीचा हक्क पहिल्यांदा १९०५ साली मिळाला. त्यावर्षीच्या १५ ऑक्टोबरला पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यावेळी लोकांनी निवडून दिलेल्या सदस्यांची संख्या ७ होती तर सरकारनियुक्त सभासद ११ होते. १९०७ साली पहिला बिनसरकारी अध्यक्ष निवडण्यात आला. स्थानिक स्वराज्याचे हक्क विस्तृत होऊन १९३८ मध्ये प्रजेला भरीव प्रमाणात हक्कदानाची घोषणा सांगलीच्या राजेसाहेबानी केली. त्यानुसार १९३९ साली लोकांनी निवडून दिलेला अध्यक्ष नगरपालिकेला असावा, म्हणून नगरपालिकेत क्रांतीकारक घटना दुरुस्ती करण्यात आली. १९४७ मध्ये सांगली शहरासाठी प्रथमच मास्टर प्लॅन तयार करण्यात आला. १९४८ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सांगली संस्थानच्या विलिनीकरणाच्या वेळी सांगलीच्या राजेसाहेबानी रु.३५ लाखाचा ट्रस्ट करून सांगली नगरपालिकेच्या स्वाधीन केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर नगरपालिकेच्या कामाची घोडदौडच चालू झाली.

आज ज्या ऑक्ट्रायवरून रणकंदने माजतात त्या कराची सुरुवात म्युनिसिपालिटीने १९३१ मध्ये केली. त्यावेळी 'टर्मिनल टॅक्स' या नावाने, सांगली शहरात आवक होणाऱ्या मालावर हा टॅक्स घेतला जात असे. सुरुवातीला हा टॅक्स मालाच्या वजनानुसार आकारला जाई. नंतर ऑक्ट्राय, मालाच्या किमतीवर घेतला जाऊ लागला; अर्थात् काही बाबतीत मालाच्या वजनावर सुद्धा आकारला जातो. १९५४ मध्ये या टर्मिनल टॅक्सचे या ऑक्ट्रायमध्ये रुपांतर झाले.

एके काळी सांगली हवेसाठी प्रसिद्ध होते, (प्रदूषणापूर्वी) तसेच पाण्यासाठीहि होते. पाणीपुरवठा जास्तीत जास्त शुद्ध आणि शास्त्रोक्त पद्धतीने व्हावा यासाठी सर विश्वेश्वरय्या यांजसारख्या ख्यातनाम अिंजिनीअरकडून १९०७ साली, सांगली नगरपालिकेने पाहणी करवून घेतली होती. आज शेरीनाल्यामुळे पाण्याचा प्रश्न सर्वार्थानेच दूषित झाला आहे.

खरं म्हणजे सव्वाशे वर्षांचा इतिहास असलेल्या या सांगली नगरपालिकेचा इतिहास यापूर्वीच ग्रंथरुपाने प्रसिद्ध व्हावयास हवा होता. पण १९९८ साली सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका अस्तित्वात आल्यामुळे, सांगली नगरपालिकेचे वेगळे अस्तित्व संपुष्टात आले आहे. त्यामुळे आता त्या इतिहासाचे महत्त्व अुरले नाही.

पण या महापालिकेमुळे सांगलीची स्वतःची अशी जी एकजिनसी ओळख होती तिला मात्र बाधा आल्याची भावना कुणा सांगलीकराच्या मनात आली तर ती गैर मानता येणार नाही.

**३ ) "चेंबर ऑफ कॉमर्स" - शतकपूर्तीकडे वाटचाल करणारी गौरवशाली संस्था :**
आता शतकाच्या अुंबरठ्यावर असलेल्या सांगली चेंबर ऑफ कॉमर्स, सांगली या संस्थेची रीतसर स्थापना १० जुलै १९१० रोजी, तत्कालीन सांगली संस्थानचे अधिपती श्रीमंत दुसरे चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांच्या प्रेरणेने झाली.

आधुनिक सांगलीची जडण-घडण पहिल्या चिंतामणराव पटवर्धन यांच्यामुळे झाली. या राजाने अगदी योजनाबद्ध रीतीने सांगलीत पेठा वसवल्या. जवळपासच्या व्यापारी लोकाना मुद्दाम निमंत्रित करून, त्याना विविध सुखसोयी अुपलब्ध करून देऊन, किराणा, भुसारा, कापड, सराफी वगैरे प्रकारची दुकाने घालण्यास अुत्तेजन दिले.

सांगलीची भौगोलिक रचना, व्यापार-अुदीमास अनुकूल आहे. कृष्णा, वारणा, वेरळा यासारख्या जवळपासच्या नद्यांमुळे समृद्ध झालेल्या या भागातून भुईमूग, हळद, मिरची, तंबाखू, कापूस हा माल सांगलीच्या पेठेत मोठ्या प्रमाणावर येतो. १९०७ साली सांगलीला रेल्वेचा फाटा प्रथमच आला. त्यामुळे त्याचा सांगलीच्या व्यापार वाढीवर अनुकूल परिणाम झाला. शेंग, हळद, गूळ, मिरची, तंबाखू, या

जिन्नसांच्या व्यापारासाठी, सांगलीच्या पूर्व-अुत्तर भागात आखीव अशी बाजार-पेठ वसविली गेली. ती म्हणजेच सांगलीची 'वखार-पेठ.' (कालांतराने या पेठेचे सध्याच्या मार्केटयार्डात स्थलांतर झाले.)

या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांची वर्दळ वाढली. मग ज्या ज्या गोष्टींमध्ये व्यापारी लोकांचे हितसंबंध जुळले आहेत, त्याबाबत एक समान धोरण राबवण्याची आवश्यकता निर्माण झाली. आपापसात काही व्यापारसंबंधाने काही भांडणे निर्माण झाली, मतभेद अुत्पन्न झाले तर काय करावे असा प्रश्न अुत्पन्न झाला. या प्रश्नांवर तोडगा काढता यावा, सलोख्याने आपापले प्रश्न सोडवावेत, या भूमिकेतूनच मूलतः चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना झाली. सांगलीच्या पांजरपोळ संस्थेत व्यापारी मंडळीची सभा होऊन अशी संस्था स्थापण्याचा निर्णय झाला.

या निर्णयाचा सुपरिणाम लागलीच दिसून येऊ लागला. व्यापारी मंडळींमध्ये आपल्या हितासंबंधी जागृती निर्माण झाली. अुदाहरणार्थ, जवळ असलेल्या कोल्हापूरच्या तुलनेत सांगलीचा व्यापार का मागे पडतो ? कोल्हापूरला मिळत असलेल्या रेल्वेच्या सवलती आपल्याला का मिळू नयेत ? सांगली संस्थानच्या अधिपतींमार्फत आपण तशी खटपट का करू नये ? अशा स्वरुपाचे आत्मजागृतीचे प्रश्न व्यापाऱ्यांच्या मनात सजग झाले हा चेंबरच्या स्थापनेचा मोठाच फायदा झाला. कृष्णा नदीवर आजमितीस दिसणारा भव्य आयर्विनब्रिज हा सुद्धा चेंबरच्या सभासदांच्या व्यापारी आणि सामाजिक दृष्टीचेच फलित मानावे लागेल. अशा पुलाच्या अभावी आजूबाजूच्या गावातील लोकांचे अनेक प्रकारे हाल व्हायचेच; पण असा पूल बांधला तर अिस्लामपूरपासूनचा सर्व व्यापारी माल, कऱ्हाड पेठेकडे न जाता सांगलीकडे येईल, सांगली पेठेची आवक वाढेल आणि त्याहूनहि महत्वाचे म्हणजे दस्तुरीचे अुत्पन्न (जकात-दर) वाढेल असा व्यापारी मंडळींचा दावा होता. विशेष म्हणजे २५-३-१९१६ च्या चेंबरच्या वार्षिक सभेतच तशा आशयाचा ठराव करण्यात आला होता. १९२९ साली बांधल्या गेलेल्या या पुलामुळे वरील सर्व अंदाज अपेक्षेपेक्षाहि खरे ठरले !

यानंतरच्या काळात व्यापारात वाढ झाली तशी चेंबरच्या कामात वाढ झाली. कारण स्वातंत्र्यापूर्वी फक्त सांगली संस्थानचे कायदे होते पण स्वातंत्र्योत्तर काळात राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या कायद्यांमुळे व्यापाऱ्यांच्या समस्या वाढल्या आणि परिणामी चेंबरचे कार्यक्षेत्र वाढले. कामाचे स्वरूप बहुमुखी झाले. आज चेंबरला कोणकोणते विषय हाताळावे लागतात याची छोटीशी जंत्री बघितली तरी चेंबरच्या बहुविध कामाची कल्पना येते. मार्केट ॲक्ट, शॉप ॲक्ट, तंबाखू-जर्दा एक्साईज ड्युटी, गुळसाठा मर्यादा, जीवनावश्यक वस्तू-कायदे-परवाने, मुद्रांक शुल्क दरवाढ, विक्रीकरातील बदल, दरवाढ, विक्रीकरातील बदल, खाद्यतेल आवेष्टीत

कायदा, ऑक्ट्रॉय ड्युटी, वीजदर वाढ असे काही ठळक विषय बघितले तरी चेंबरच्या बहुविध कामाची व्याप्ती कळून येते. याखेरीज चेंबरचे स्वतःचे प्रश्न आहेतच. व्यापारी-अुद्योजक मेळावे, निरनिराळे वायदे बाजार, व्यापारी परिषदा अशा अनेक कामांचे व्याप चेंबरच्या पाठीशी असतात. बऱ्याच वेळा चेंबरला न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर येऊन नाईलाजाने आंदोलनाचा मार्ग चोखाळावा लागतो; अुदा. जाचक कर, मार्केट ॲक्ट कायद्याची जाचक अंमलबजावणी, वीजदरवाढ आंदोलन, जकात वसुली वगैरे वगैरे.

सांगली चेंबरच्या एका महत्वपूर्ण वैशिष्ट्याचे सर्वत्र कौतुक होते. ते म्हणजे चेंबरची सामाजिक बांधिलकी. समाज-जीवनापासून, समाजावरील विविध आपत्तींपासून चेंबर कधी अलिप्त राहिली नाहीच पण सदैव सक्रिय सहभागच त्यामध्ये चेंबरने दिला. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून तो आजतागायत; खरं म्हणजे हा एक स्वतंत्र लेखाचाच विषय आहे.

१९१० च्या स्थापनेच्या दिवशी केवळ २१ सभासदांच्या सहभागापासून सुरवात झालेल्या या सांगली चेंबरचे आज ५४६ सभासद आहेत. ५० विविध व्यापारी संघटना संस्थेशी संलग्न आहेत. आज संस्थेची स्वतःची भव्य इमारत आहे. महाराष्ट्र चेंबर (१९२७) मराठा चेंबर (१९३४) या महाराष्ट्रातील प्रमुख संस्थांपेक्षाहि, सांगली चेंबर जुनी नामवंत संस्था असल्याने महाराष्ट्रात या संस्थेचा मोठा दबदबा आहे.

**४) सांगली अर्बन को-ऑप. बँक लि. :** सांगली अर्बन को.ऑ. बँकेची स्थापना ४ नोव्हेंबर १९३५ रोजी सांगली संस्थानच्या सहकारी कायद्याखाली झाली. ६५-६६ वर्षापूर्वी ही बँक स्थापन होण्यापूर्वी, सांगली गावात दोनच बँका अस्तिवात होत्या; आणि त्या दोन्ही बँका सांगली संस्थानच्या, म्हणजे श्रीमंत राजेसाहेबांच्या पुढाकाराने स्थापन झाल्या होत्या. पैकी सांगली बँक ही व्यापार व अुद्योग क्षेत्रामधील लोकांसाठी होती, तर सांगली संस्थान मध्यवर्ती बँक (नंतर सांगली मध्यवर्ती जिल्हा बँक लि;) ही मुख्यत्वे शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठी होती. समाजातील दोन विभागांसाठी दोन बँका निघाल्या, मग समाजात जो मध्यम व गरीब वर्ग आहे, त्याना वाली कोण? अशा स्वरुपाच्या विचारमंथनातून कै. माधवराव गोडबोले यानी पुढाकार घेऊन या बँकेची स्थापना केली. दहा रुपयाचा एक शेअर याप्रमाणे रु.११००/-चे भाग भांडवल त्यानी जमविले. म्हणजे खऱ्या अर्थाने लोकाश्रयातून या बँकेचा जन्म झाला. सांगलीची म्युनिसिपल हद्द, एवढ्याच कार्यक्षेत्रात, व्यवहार करणाऱ्या या छोट्या बँकेला, सांगली संस्थानचा सहकारी कायदा, संस्थानच्या विलीनीकरणानंतर निर्माण झालेला दक्षिण सातारा आणि नंतरचा सांगली जिल्हा, स्वातंत्र्यानंतरचा मुंबई

सरकारचा सहकारी कायदा, त्यांनतरचा महाराष्ट्र राज्य सरकारचा सहकारी कायदा, अशा अनेक स्थित्यंतरातून जावे लागले. हे कमी पडत होते म्हणून की काय, १९६६ पासून रिझर्व्ह बँकेची नियंत्रणे आली! पण या सर्व संक्रमणांमधून बँकेने यशस्वीपणे मार्ग काढला आणि आता सहकारी क्षेत्रात मोठ्या मानाचे स्थान बँकेने संपादन केले आहे. आजमितीला सांगली अर्बन बँकेच्या ३५ हून अधिक शाखा गावोगावी आहेत. इतकेच काय पण सांगलीखेरीज इतर अनेक ठिकाणी बँकेच्या कार्यालयांसाठी स्वतःच्या मालकीच्या जागा आहेत. बँकिंग व्यवहारांशिवाय, सांगली अर्बन बँकेने, सामाजिक जबाबदारीचेही भान ठेवले आहे. मुख्यत्वे, आपापल्या कार्यक्षेत्रातील शिक्षण संस्थांच्या मागे ठामपणे अुभे राहण्याचे धोरण बँकेने ठेवले आहे. म्हैसाळमधील कै. मधुकरराव देवल यांच्या मार्गदर्शनाखाली हरीजनांच्या सहकारी शेती-प्रकल्पामध्ये बँकेने मोठे आर्थिक योगदान दिले आहे.

**५ ) सांगली बँक लि. :** सांगली शहराची आणि पर्यायानी संस्थानची प्रगती व्हावयास हवी असेल तर येथील व्यापार पद्धतशीरपणे वाढला पाहिजे याची सांगलीच्या राजेसाहेबाना जाणीव होती. त्याच अुद्देशाने त्यानी १९०७ साली सांगली गाव रेल्वेच्या फाट्यावर आणले. त्याचा सुपरिणाम दिसून येऊन सांगलीचा व्यापार वाढू लागला. राजेसाहेबांच्या प्रोत्साहनाने सांगलीची गणपती पेठ आणि नंतर वखारभाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागाची पद्धतशीर योजना झाली. (स्वातंत्र्योत्तर काळात हा वखारभाग सध्याच्या मार्केटयार्डात गेला). व्यापार म्हटला की हरघडीच्या व्यवहाराच्या बँकेची नितांत आवश्यकता आहे हे जाणून राजेसाहेबानी स्वतःचे भांडवल मोठ्या प्रमाणात घालून अन्य व्यापारी, सराफ दुकानदारांच्या सहकार्याने ५ ऑक्टोबर १९१६ रोजी सांगली बँकेची स्थापना केली. म्हणजे ८४ वर्षांची ही बँक सांगलीमधील सर्वांत जुनी बँक आहे. ज्या बँकेचे भाडवल सुरवातीला अवघे १ लाख रुपयांचे होते ती बँक आता कोट्यावधी रुपयांचे व्यवहार करत आहे. नेहमीचे बँकिंग व्यवहार बँक करतेच त्याशिवाय विदेश विनिमयाचे व्यवहारसुद्धा बँक करते. भारतातील सहा राज्यांमध्ये मिळून बँकेच्या १८४ शाखा आहेत. व्यापार आणि अुद्योगक्षेत्रात सांगलीला या बँकेमुळे मोठे नाव मिळाले.

**६ ) १७० वर्षांची परंपरा असलेली, मे. पुरूषोत्तम नारायण गाडगीळ - सराफी पेढी :** १९१४ साली कृष्णा नदीला महापूर आला होता. त्यावेळी आजचा भव्य आयर्विन पूल नव्हता. महाबळेश्वरला धुवांधार पाऊस पडत असल्याने आणि आजच्यासारखी पाणी अडवणारी धरणे नसल्याने पाणी सतत वाढत होते. घराघरातून पाणी यायला लागले. गुरंढोरं वाहून जायला लागली. ऐन वेळेला अुपयोगी पडणारं सोनं-नाणं आता ठेवायचं तरी कुठं ? कुणाच्या तरी डोक्यात गाडगीळ सराफांचं

नाव आलं. लोक आपापलं सोनं, किडूक-मिडूक बांधून त्यांच्या घरी आले. त्यांना दिलासा देत, त्या पेढीवरील बाळनाना गाडगीळ म्हणाले-''पुराचं पाणी कुठंपर्यंत चढेल देव जाणे ! तुमचे जे होईल तेच कदाचित् आमचे. आपण सर्वजण विश्वासाने आलात. ठीक आहे. आपापल्या जिन्नसांना नावाची चिठ्ठी लावून ठेवा.''

सुदैवाने, सांगलीच्या गजाननाचे कृपेने पाणी ओसरू लागले. बाळनाना देवाचा धावा करत पायरीवर रात्रभर बसून होते. पूर ओसरला. लोकांनी आपापला माल परत नेला. कुणाचा एक तुकडाही गमावला नाही !

मे. पुरूषोत्तम नारायण गाडगीळ या सराफी पेढीचं एकमात्र भांडवल कोणतं असं विचारलं, तर लोकांचा त्या पेढीच्या सचोटीविषयीचा 'प्रचंड विश्वास' हे एकच एक अुत्तर संभवतं. गाडगीळांच्या पिढ्यांमागून पिढ्या बदलल्या. जिन्नस विकत घेणारी माणसं बदलली. पण एक गोष्ट बदलली नाही. अविचल राहिली. ती म्हणजे 'विश्वास.'

१८३२ साली स्थापन झालेल्या या पेढीला आता नव्या सहस्त्रकात प्रवेश करताना १७० वर्षे होतील. या अवधीत अस्तित्वात आलेल्या अनेक सराफी पेढ्या मागे पडल्या. नामशेष झाल्या. पण गाडगीळांची सुवर्णपेढी मात्र आज एखाद्या वटवृक्षाप्रमाणे विस्तार पावत आहे. या १७० वर्षात गाडगीळांच्या ६-७ पिढ्या अुलटून गेल्या. त्यामध्ये दाजीसाहेब होते, गणेशपंत होते, पुरूषोत्तमराव होते, वासुदेवराव होते; नावे अनेक पण सर्वच्या सर्व, शब्दाच्या खऱ्या अर्थाने 'विश्वासराव' होते हे महत्त्वाचे !

ही गाडगीळ मंडळी मूळ कोकणातली. गुहागरजवळील वेळणेश्वराची. गाडगीळ घराण्यातील कै. गणेश नारायण गाडगीळ सांगलीत स्थायिक झाले आणि १८३२ साली त्यानी सराफी पेढी स्थापन केली. आज ऐकायला गमतीचे वाटेल पण सुरूवातीच्या काळात ही सराफ मंडळी, सोन्याचांदीचे जिन्नस पडशीत भरून सराफ कट्ट्यावर जाऊन मांडायचे आणि संध्याकाळी पुन्हा पडशी भरून घरी न्यायचे अशी पद्धत होती. कारण त्याकाळी लोखंडी तिजोऱ्या नव्हत्या. गाडगीळांच्या पेढीवर पहिली तिजोरी आली ती १९१० साली. सराफी धंद्याबरोबरच गहाणवटाचा व्यवसायही ही पेढी करत असे. स्वातंत्र्यपूर्वकाळात, संस्थाने असताना दक्षिण महाराष्ट्रातील सर्व राजघराण्यांचे गाडगीळ सराफी दुकान हे मोठे विश्वासाचे ठिकाण होते. तत्कालीन ब्रिटीश अधिकारी मुद्दाम काही दागिने बनवून नेत असत. दाखवलेल्या वस्तुबरहुकूम नवीन जिन्नस बनवणे व काही वेळा स्वतःच्या कल्पनेप्रमाणे वस्तू बनवून देणे हे या पेढीचे वैशिष्ट्य होते. सोने, चांदी, मोती यांची पारख करण्यात सर्वच गाडगीळ वाकबगार आणि अनुभवाचा वारसा जुन्या पिढीकडून पुढील पिढीकडे सर्व बारकाव्यांसह चालत आला आहे; म्हणून तर आज सहावी-सातवी पिढी, पूर्वसूरींच्या दिमाखात

काम करीत आहे. मालाच्या चोखपणाकडे आणि नाविन्याकडे जसं गाडगीळ मंडळींचं लक्ष असतं, तसंच नवीन कुशल कारागीर तयार करण्याकडेही त्यांचे बारीक लक्ष असते; त्यामुळेच कौशल्यपूर्ण कारागिरांच्या पिढ्या न पिढ्या गाडगीळांच्या पेढीवर काम करताना आढळतात. काही जणानी तर गाडगीळांपासून स्फूर्ती घेऊन स्वतःचा स्वतंत्र व्यवसायही सुरू केला आहे.

या पेढीने सामाजिक बांधिलकीची जाणीव मनात सजग ठेवली आहे. अनेक चांगल्या सामाजिक, शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य दिलं आहे. सांगली बँकेवर संस्थानी काळात एकदा गंडांतर आले होते. मुंबईच्या दोन व्यापाऱ्यांनी दिवाळे काढून बँकेला गोत्यात आणले. साहजिकच ठेवीदारांनी घाबरून गर्दी केली. सांगलीचे राजेसाहेब, ज्यानी ही बँक स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता, ते महाबळेश्वरास गेले होते. अशा वेळी या गाडगीळ पेढीने भरपूर रोकड बँकेकडे पाठवली. त्यामुळे बँकेवरील आपत्ती टळली !

'एकदा विश्वास ढासळला की सर्वनाश.' हे परम सत्य प्राणापलीकडे जपल्यामुळेच, ही पेढी आता द्विशतकाकडे दिमाखात वाटचाल करीत आहे.

**७ ) मे. गोविंदराम शोभाराम आणि कंपनी :** सांगलीची गणपती पेठ नेहमीच गजबजलेली दिसते. मसाल्याचे पदार्थ, हळद, नारळ, चहा, धान्ये व इतर किराणामाल यांची ही प्रमुख बाजारपेठ आहे. तांदुळवाले लिमये, माने आणि कंपनी, उपलेटावाला, मथुरादास मगनलाल अशा अनेक पेढ्या येथे फार जुन्या काळापासून कार्यरत आहेत. त्यापैकी एक १०० वर्षांपूर्वीची जुनी पेढी म्हणजे 'मे. गोविंदराम शोभाराम आणि कंपनी' ही आहे.

१८९० गुजरातमधील मेहसाणा जिल्ह्यातील वसई डाबला गावातून आलेले श्रीमान शेठ लल्लूभाई गोविंदराम शाह आणि शेजारच्या गावातून आलेले श्रीमानशेठ मथुरादास मगनलाल व श्रीमान शेठ साखळचंद बबालाल या तिघांनी भागिदारीमध्ये 'गोविंदराम शोभाराम आणि कंपनी' ही किराणा मालाचा घाऊक व्यापार करणारी पेढी सुरु केली. १९४४ मध्ये या पेढीतील तीन भागीदारांच्या वाटण्या झाल्या व गोविंदराम शोभाराम आणि कंपनीची सूत्रे लल्लूभाईंचे सुपुत्र पुरुषोत्तमदास शेटजींकडे आली.

मेहसाण्याहून सांगलीला आलेले हे कुटुंब व गोविंदराम शोभाराम ही पेढी खऱ्या अर्थाने आज सांगलीकर झाली असून सांगलीच्या सामाजिक कार्यात, सहभाग देऊन आणि व्यापाराच्या माध्यमातून ते सांगलीच्या वैभवात भर घालीत आहेत. सध्या सांगलीतील गोविंदराम शोभाराम आणि कंपनीचा व्याप स्व. पुरुषोत्तमदास शेटजींचे नातू महेशभाई, किरीटभाई व किरीटभाईंचे सुपुत्र राजेशभाई हे पाहतात.

चहाबरोबरच किराणा माल व तेलाचा घाऊक व्यापार या पेढीद्वारे केला जातो. आसामच्या सीटीसी चहाची चव प्रथम सांगलीकरांपर्यंत पोहोचविण्याचे काम या पेढीने केले असून 'जी. एस. चहा' या नांवाने त्यांचा चहा प्रसिद्ध आहे.

गोविंदराम शोभाराम कंपनीचे अध्वर्यू पुरुषोत्तमभाईंचे ज्येष्ठ पुत्र कै. कांतीभाई हे नुकतेच निवर्तले. कांतीभाई शहा हे १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभागी होते. कै. वसंतदादा आणि कै. यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबरच अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सुरक्षितपणे भूमिगत ठेवण्यात त्यांचा सहभागी होता. कांतीभाई राष्ट्रसेवादलाचेहि सक्रीय कार्यकर्ते होते. साने गुरुजी आणि एस.एम. जोशी यांच्यासारख्या तळमळीच्या समाजवादी नेत्यांचे ते अनुयायी होते. त्यांनी स्वातंत्र्य सैनिकाचे कोणतेही प्रमाणपत्र अथवा मानधन स्वीकारले नाही. स्वातंत्र्योत्तर काळातही कांतीभाईंनी सांगलीच्या सामाजिक कायापालटामध्ये महत्वाची भूमिका बजावली होती. सांगलीमध्ये रोटरी क्लबसारखी सेवाभावी संस्था उभी करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्सची स्थापना, इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या कामाची सांगलीमधील सुरूवात, गुजराथी सेवा समाज, ही कांतीभाईच्या मोलाच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने सुरु झालेली कांही वानगीदाखल उदाहरणे आहेत. श्रीसिद्धिविनायक कॅन्सर हॉस्पिटलच्या उभारणीमध्ये तर कांतीभाईचा सिंहाचा वाटा होता. पण ते पूर्ण झालेले पाहण्याचा योग मात्र त्याना आला नाही.

व्यावसायिक सचोटी व प्रामाणिकपणा यांचा आदर्शच आपल्या कामगिरीने गोविंदराम शोभाराम आणि कंपनीने समाजाला घालून दिला आहे.

**८) वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. :** सांगलीसारख्या ठिकाणी साखर कारखान्याची अुभारणी ही चाळीस वर्षापूर्वी एक प्रकारची क्रांतीच होती. १९४८-४९ मध्ये प्रवरानगरला, महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना सुरु झाला तेव्हा वसंतदादाना चैन पडेना. या भागात साखर कारखान्याची कल्पना व्यवहार्य मानली जात नव्हती कारण सांगली भाग तसा कोरडवाहू शेतीचा. पण साखर कारखान्यामुळे या भागातील शेतकऱ्याना चांगली बरकत येईल याची वसंतदादाना खात्री होती. त्यामुळे सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करून, ५-६ वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर त्यानी साखर कारखान्याची अुभारणी केली (सांगली-माधवनगर रस्त्यावरील ९० एकर जागेवर) आणि १९५८ साली पहिला गळीत हंगाम सुरू करून दाखविला. या कारखान्याच्या क्षेत्रात ८५ अुपसा जलसिंचन योजना यशस्वीपणे चालविल्या जातात. त्यामुळे ७२,१५७ एकर जमीन ओलिताखाली येते. दररोज पाच हजार मे. टन अुस गाळशक्तिचा तसेच क्षारपड / चिबड जमिन सुधारणा प्रकल्प राबवणारा

असा पहिलाच कारखाना आहे. या कारखान्यातून अनेक अुत्पादने तयार होतात. शुभ्र दाणेदार साखर हे तर सर्वात महत्वाचे अुत्पादन. त्याचबरोबर ॲसिटाल्डिहाईड ॲसेटिक ॲसिड, ॲसेटिक अनहैड्राईड ही रसायने, सर्व प्रकारची अल्कोहोल्स, देशी व विदेशी मद्ये या कारखान्यात बनविली जातात. पशुपक्ष्यांसाठी समतोल आहार-खुराकाबरोबरच, वनीकरणासाठी, नर्सरीमधून, दरवर्षी सातत्याने विविध फळझाडे व इतर नगदी अुत्पन्न देणाऱ्या १० लाख रोपांची निर्मिती या कारखान्यात होते. या कारखान्यामार्फत डॉ. वसंतदादा पाटील इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सांगली हे इंजिनिअरींग कॉलेज व पॉलिटेक्नीकही १९८३ पासून चालवले जाते. सहकारी क्षेत्रात साखर आणि उप-पदार्थांचे अुत्पादन करणारा, आशिया खंडातील सर्वात मोठा कारखाना अशी या कारखान्याची प्रसिद्धी आहे.

**९ ) तरुण भारत व्यायाम मंडळ :** सांगलीमधील, जुन्या जमान्यातील वैशिट्यपूर्ण व्यक्तिमत्वाचे क्रीडाशिक्षक, कै. नाना देवधर यानी, मराठी शाळा नं.१ च्या क्रीडांगणावर, १९३० मध्ये, गोकुळाष्टमीच्या मुहुर्तावर, 'तरुण भारत व्यायाम मंडळ' या संस्थेची २० सभासदांसह स्थापना केली. या सर्वांच्या अविश्रांत श्रमामुळेच, संस्थेचा पाया भक्कम झाला. सर्वसामान्य जनतेत, व्यायामाची, खेळाची आवड निर्माण करणे आणि त्यायोगे निरोगी, चारित्र्यवान नागरीक तयार करणे हा मंडळाचा प्रमुख अुद्देश आहे. या मंडळाच्या स्थापनेपूर्वी, सांगलीत व्यायाम संस्था नव्हत्या असे नाही. पण त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. आखाड्याच्या मर्यादित क्षेत्राचे रुपांतर, क्रीडांगणावरील विविध मैदानी आणि मर्दानी खेळांच्या व्यापक क्षेत्रांमध्ये करण्याचे श्रेय, निश्चितपणे या संस्थेकडे जाते. सुरुवातीला लेजीम कवायती आणि सांघिक कसरती इतक्याच मर्यादेत काम करता करता, मंडळाने, हुतुतू, आट्यापाट्या, लंगडी, खो-खो, इत्यादि भारतीय सांघिक खेळांच्या प्रशिक्षणाकडे लक्ष पुरविले. परिणामतः सांगलीत, मल्लांच्या पाठोपाठ, राष्ट्रीय खेळांमध्ये तरबेज असणाऱ्या खेळाडूंची पिढी नव्यानेच निर्माण होऊ लागली. मंडळाच्या स्थापनेच्या दोनच वर्षानंतर मंडळाचे खेळाडू गावोगावच्या क्रीडास्पर्धांमधून भाग घेऊ लागले. मंडळाच्या खेळाडूनी त्या स्पर्धांमधून अनेक वैयक्तिक आणि सांघिक पारितोषिके मिळवली. विशेषतः हुतुतू हा खेळ किती अप्रतिम कौशल्याने खेळला जातो याचा एक वस्तुपाठच मंडळाच्या खेळाडूनी घालून दाखवला. नुसत्या क्रीडास्पर्धेतून भाग घेण्यात मंडळाने धन्यता मानली नाही तर १९४६ पासून, भव्य प्रमाणात राष्ट्रीय खेळांच्या सामन्यांचे आयोजन करण्यास सुरुवात केली. १९८१ च्या जानेवारीत तर २९ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्याचा मान या संस्थेला मिळाला. हा एक प्रकारचा बहुमानच होता. कारण अशा स्वरुपाच्या राष्ट्रीय स्पर्धा त्या त्या राज्यांच्या राजधानीतच भरतात. पण तरुण भारत व्यायाम

मंडळाचे, या क्षेत्रातील अनुभव आणि कर्तृत्व पाहून ही संधी मंडळाने आपल्याकडे खेचून आणली म्हणायला हरकत नाही. याचवेळी भारत-पाकिस्तान कबड्डी-कसोटी सामनाही सांगलीत खेळला गेला. यानंतरच्या कालावधीत मंडळाची खूप भरभराट होत गेली. वसंतदादांच्या हस्ते १९८५ मध्ये पायाभरणी होऊन भव्य स्टेडियम बांधले गेले. १९९२ पर्यंत बांधकाम चालू होते. सरकारी अनुदान आणि लोकांच्या देणग्यांच्या आधारावर प्रचंड काम झाले. आज मंडळाकडे १०८ X ७४ मीटरचे भव्य क्रीडागंण आहे. चारी बाजूनी बंदीस्त असलेल्या या क्रीडांगणावरील खेळ, तिन्ही बाजूंच्या गॅलऱ्यांमधून २५-३० हजार प्रेक्षक पाहू शकतात. आता हे क्रीडांगण सुसज्ज आहे. व्हॉलीबॉल, रिंगटेनिस खेळण्याची सोय आहे. बॅडमिंटनसाठी प्रशस्त हॉल आहे. योगासने स्वतंत्रपणे शिकविण्याची सोय आहे. अुत्तम मार्गदर्शन करणारे कोच आहेत.

१९८७ पासून संस्थेने एका वेगळ्याच क्षेत्रात यशस्वी पदार्पण केले आहे. संस्थेने 'तरुण भारत बझार' या भव्य डिपार्टमेंटल स्टोअरची स्थापना केली आहे. क्रीडाक्षेत्रातील एका संस्थेने हे काम अंगावर घ्यावे हे थोडे मौजेचे वाटते. पण याला कारणीभूत झाली ती १९७२ या दुष्काळातील संस्थेच्या कार्यकर्त्यांची निरलस आणि चोख सेवा. १९७२ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. तेंव्हा संस्थेच्या कार्यकर्त्यांनी धान्यवाटपाचे काम स्वयंसेवी वृत्तीने केले. ते पाहून अशा तऱ्हेचे कायमस्वरुपी काम संस्थेने अंगावर घ्यावे अशी लोकांकडून मागणी होऊ लागली. आणि त्याच विचारमंथनातून 'तरुण भारत को-ऑप.सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स' ही संस्था सुरु झाली. सरकारी अनुदान आणि समाजातील उत्स्फुर्त देणग्या यांच्या माध्यमातून भाग भांडवल जमा झाले. ही योजना अपेक्षेपेक्षा फारच यशस्वी झाली.

**१० ) सांगली हायस्कूल, सांगली :** भूतपूर्व सांगली संस्थानचे अधिपती शिक्षणप्रेमी होते. त्यामुळेच १८८४ साली सांगलीत 'सांगली हायस्कूल, या सांगलीतील सर्वात जुन्या हायस्कूलची स्थापना झाली. जवळजवळ ११६ वर्षापूर्वी म्हणजे १८८४ ते १९१४ पर्यंत सांगलीतील अनेक कर्तबगार व्यक्तिंची जडण-घडण करण्यात ही एकच एक संस्था कारणीभूत होती. १९१४ साली सिटी हायस्कूल या खासगी हायस्कूलची स्थापना होईपर्यंत, सांगली हायस्कूल हे त्याकाळातील एकमेव हायस्कूल होते. नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर, साधुदास, वि.स. खांडेकर यासारख्या मातब्बर व्यक्तिंची जडणघडण याच शाळेत झाली. श्रीपादशास्त्री देवधर, पाटीलशास्त्री यांच्यासारख्या संस्कृत शिक्षकांमुळे जशी शंकरशेट शिष्यवृत्तीची गौरवशाली परंपरा या शाळेला लाभली तशीच हणमंतराव भोसले या क्रीडाशिक्षकामुळे विजय हजारे, नंदू नाटेकर यांच्यासारखे क्रीडाक्षेत्रातील नामवंत या शाळेला देता आले. ड्रॉईंग, गायन, तालिम, क्रिकेट अशा विषयांसाठी वेगवेगळा शिक्षक नेमण्याची प्रथा एकेकाळी

या शाळेत होती. या शाळेतील जुने फलक शोधले तरी विविध क्षेत्रांमध्ये स्पृहणींय यश मिळविणाऱ्या अनेक सांगलीकरांची नावे त्यात आढळतील. त्यांची नावे केवळ विस्तारभयास्तव देता येत नाहीत. १ एप्रिल १९५३ पासून ही शासकीय शाळा तंत्रशिक्षण देण्याच्या अटीवर, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीकडे हस्तांतरीत झाली. तेव्हापासून या शाळेला वेगळेच वैभवशाली स्वरूप प्राप्त झाले आहे. या शाळेच्या सुसज्ज आणि भव्य वर्कशॉपमध्ये कारपेंटरी, फिटींग, टर्निंग, स्मिथी व मोल्डिंग आणि वायरींग असे अनेक विभाग आहेत. वरील ६ तंत्र विषयांबरोबरच 'इंजिनिअरींग' हा विषय शिकविला जातो. अलीकडे मेकॅनिकल टेक्नॉलॉजी, बिल्डिंग मेंटेनन्स, ॲटो. इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी अशा अनेक विषयांचे वेगळे विभाग सुरु झाले आहेत. एकविसाव्या शतकात अुपयुक्त ठरेल अशी गुणवत्ता जपणाऱ्या या शाळेत, आजमितीला जवळजवळ तीन हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या शाळेला शिक्षण क्षेत्रामध्ये स्वतःचे असे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

**११ ) सिटी हायस्कूल :** आज नव्वदीकडे वाटचाल करणाऱ्या सिटी हायस्कूलची स्थापना ४ डिसेंबर १९१४ रोजी झाली. सर्वश्री सखदेव, विनायकराव जोशी, तोरो आणि चिकोडीकर या चार तरुणांनी, अवघ्या एका विद्यार्थ्याला घेऊन ही शाळा सुरू केली. आजमितीला या भव्य शाळेत दोन हजाराहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १९२१ साली या शाळेची पहिली तुकडी मॅट्रिकच्या परीक्षेला बसली. १९२६ मध्ये, या शाळेच्या एका विद्यार्थ्याने मॅट्रिकच्या परीक्षेत शाळेला पहिली शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवून दिली, तेव्हापासून शाळेची गौरवशाली परंपरा अखंडितपणे चालू आहे. तो विद्यार्थी म्हणजे न्यायमूर्ती राम केशव रानडे. १९६३ मध्ये शुभांगी सबनीस या विद्यार्थिनीने एस.एस.सी. परीक्षेत, संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला. १९८७ मध्ये एकाच वेळी शाळेचे सहा विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. वसंतराव वैद्य, जे.एल.रानडे, गजाननराव वाटवे, मामा पेंडसे, चित्तरंजन कोल्हटकर, अशोक जी. परांजपे, आचार्य वि.प्र. लिमये, माधव खाडिलकर, भाग्यश्री ठिपसे, हरी नाना पवार, विष्णू सावर्डे, अक्षरवेडा र.कृ. जोशी, डॉ. सुभाष भेंडे, कल्याण शेटे, डी.टी. ओतारी अशा या शाळेच्या काही नामवंत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आणि शाळेचा लौकिक वाढवला. आणि या गुणी विद्यार्थ्यांची ज्यानी जडण-घडण केली, त्या गुरूजनांची नावे किती आणि कोणाकोणाची म्हणून घ्यायची ?

अुच्च शैक्षणिक परंपरा असलेले सिटी हायस्कूल आपली जन्म शताब्दी या सहस्त्रकामध्ये मोठ्या डौलाने, आणि प्रतिष्ठेने साजरी करील यात काय शंका ?

**१२ ) विलिंग्डन कॉलेज :** २२ जून हा भौगोलिक दृष्ट्या मोठा दिवस असेल पण सांगलीकरांच्या दृष्टीने खराच मोठा दिवस आहे. कारण त्यादिवशी सांगली गावातीतल पहिल्या कॉलेजचा जन्म झाला. ८० वर्षांपूर्वी दक्षिण महाराष्ट्रात अुच्चशिक्षणाची सोय, पुणे सोडल्यास कुठेच नव्हती. कोल्हापूरचे राजाराम कॉलेज काही कारणाने बंद होते. अशा काळात २२ जून १९१९ रोजी विलिंग्डन कॉलेजची स्थापना झाली. नेहमीप्रमाणे सांगलीच्या राजेसाहेबांचा या कार्यात मोठा पुढाकार होता. कॉलेजचे वर्ग सांगली गावातच त्यानी अुपलब्ध करुन दिलेल्या जागेत भरत. १९२४ मध्ये सध्याच्या ठिकाणी १२५ एकराच्या जागेवर कॉलेजची इमारत अुभी राहिली. सुरवातीला पूर्णपणे ओसाड असणाऱ्या या भागात हिरवळ अुगवली ती या कॉलेजमुळे. पहिले प्रिन्सिपॉल कै. गोविंद चिमणाजी भाटे यानी या कामासाठी अपार कष्ट अुपसले. सांगली गावाला शैक्षणिक अुंची प्राप्त करुन देण्यात या कॉलेजचा मोठा वाटा आहे. सुरवातीच्या काही वर्षात कॉलेजला नावारुपाला आणण्यात प.म. लिमये, द.गो. कर्वे, वि.कृ.गोकाक, के.गो.पंडित यांसारख्या प्राचार्यांचा मोठाच सहभाग होता. अुपराष्ट्रपती बी.डी.जत्ती, न्यायमूर्ती व्ही.ए. नाईक, पद्मभूषण डॉ.आर.एन. दांडेकर, डॉ. सरोजिनी महिषी, वि.स.पागे, पु.ल. देशपांडे, वसंतराव कानेटकर, डॉ.वि.रा.करंदीकर असे नामवंत याच कॉलेजात त्यांच्या विद्यार्थीदशेत शिक्षणासाठी होते. आज या कॉलेजात २२००हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सांगलीची शैक्षणिक जडणघडण करण्यात या विलिंग्डन कॉलेजचा सिंहाचा वाटा आहे.

**१३ ) वालचंद कॉलेज :** सांगली-मिरज रस्त्यावर १०० एकरांच्या विस्तृत जागेत १९४७ साली वालचंद कॉलेजची स्थापना झाली. दक्षिण महाराष्ट्रातील हे सर्वात जुने तंत्रविद्यालय आहे. श्री. धोंडुमामा साठे यांच्या अथक प्रयत्नांनी या कॉलेजची उभारणी झाली. सुरुवातीला या कॉलेजचे नांव न्यू इंजिनिअरींग कॉलेज असे होते. १९५५ साली हे कॉलेज आर्थिक अडचणीत सापडले तेंव्हा शेठ वालचंद हिराचंद मेमारिअल ट्रस्टने कॉलेजला मोलाची आर्थिक मदत केली. तेव्हापासून वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग असे नामकरण झाले. राज्य सरकारची आणि केंद्र सरकारची कॉलेजला मदत आहेच. सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर इंजिनिअरींगसाठी सुसज्ज प्रयोगशाळा असलेल्या या कॉलेजात डिप्लोमा, डिग्री आणि पोस्ट ग्रॅज्युएट इंजिनिअरींग कोर्सेसचे शिक्षण दिले जाते. या कॉलेजचे ग्रंथालय वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामध्ये ३६ हजार पुस्तके आहेत आणि १० हजारांवर तंत्रविषयक मासिके आहेत. या कॉलेजची मालमत्ता वास्तु, प्रयोगशाळा आणि इतर इमारतींसह ९ कोटी रुपयांच्या घरात जाईल इतकी मोठी आहे.

या कॉलेजमध्ये संशोधनात्मक अनेक प्रकल्प राबविले जातात. शेठ गुलाबचंद

रिसर्च फौंडेशन या नावाने हे संशोधन चालते. येथील अनेक प्राध्यापकांनी सादर केलेले संशोधनपर शोध-निबंध मान्यता पावले आहेत. 'व्हिजन' या नावाने एक मोठे वैज्ञानिक व औद्योगिक प्रदर्शन या कॉलेजमार्फत भरविले जाते. कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचा स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. या कॉलेज़चे अनेक नामवंत विद्यार्थी इस्रो,नासा सारख्या विश्वविख्यात केंद्रांमध्ये व विविध औद्योगिक संस्थांमध्ये आपल्या बुद्धिची चमक दाखवत आहेत.

**१४ ) स्वा. सावरकर प्रतिष्ठान** : ज्येष्ठ समाजसेवक कै. बापूराव साठे यांनी स्थापन केलेली आणि वा. द. नामजोशीसरांनी अल्पावधीत नावारुपाला आणलेली ही संस्था १९७३ साली स्थापन झाली. समाजातील बुद्धिवान विद्यार्थांना मोलाचे मार्गदर्शन करुन या संस्थेने पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रज्ञा शोध (N.T.S.) ही प्रतिष्ठेची शिष्यवृत्ती मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. संस्थेची ही कामगिरी पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीच्या तोडीची आहे हे निःसंशय. स्वा. सावरकर प्रतिष्ठानमध्ये विद्यार्थी वसतिगृह, विकास वाचनालय, हुतात्मा मदनलाल धिंग्रा व्यायाम शाळा आदी विभाग आहेत. या संस्थेची प्रज्ञा प्रबोधिनी प्रशाला ही सांगलीतील नामवंत शाळा असून दरवर्षी शालांत प्रमाणपत्र परिक्षेत या शाळेचा निकाल ९० टक्क्याहून अधिक असून त्यांचे दरवर्षी अनेक विद्यार्थी शिष्यवृत्ती यादीत असतात. स्वा. सावरकरांचा सैनिकीकरणाचा संदेश या संस्थेने राबवून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (N.D.A.) मध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केंद्र सुरू केले आहे. या उपक्रमाला सिनेअभिनेते चंद्रकांत गोखले व सोलापूर येथील विधिज्ञ श्री. नानासाहेब वळसंगकर यांनी बहुमोल आर्थिक सहाय्य केले आहे.

**१५ ) भारती विद्यापीठ :** आधुनिक काळात सांगलीच्या वैभवात भर टाकणाऱ्या ज्या काही भव्य अिमारती अुभ्या राहिल्या त्यातील भारती विद्यापीठ विभागीय कार्यालय, सांगली या संस्थेची सात मजली इमारत सर्वांचे लक्ष एकदम वेधून घेते. वास्तु-शिल्पकलेचा एक अुत्तम नमुना म्हणून संस्थेची ही इमारत प्रेक्षणीय आहे. पण नुसतंच प्रेक्षणीय असणे एवढेच या वास्तूचे वैशिष्ट्य नाही तर त्या वास्तूत चालणारे अुपक्रमही तितकेच महत्वाचे आहेत. मा. नामदार डॉ. पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली भारतीय विद्यापीठाने भारतात अनेक ठिकाणी सांगली जिल्ह्याचे नाव शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल केले आहे. परंतु सांगली जिल्ह्यात स्थापन झालेल्या भारतीय विद्यापीठाच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरवात १९८३ साली झाली. तेंव्हा सांगलीच्या मध्यवर्ती भागात असलेली ही चावडीची जागा भारती विद्यापीठाने कै. वसंतदादा पाटील यांच्या सहकार्याने मिळवली. वास्तूचे बांधकाम १९८९ मध्ये पूर्ण झाले. त्यामध्ये इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड रुरल डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन,

न्यू लॉ कॉलेज, भारती बँक या संस्थांचे कामकाज चालते. मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये एम्बीए, एम्सीए, एम्सीएम्, डीबीएम्, डीसीएम्, असे पदव्युत्तर कोर्सेसचे शिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे या वास्तूमध्ये भारती विद्यापीठाचे सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्याचे विभागीय कार्यालय आणि डॉ.पतंगराव कदम जनसंपर्क कार्यालयही आहे. पण सर्वसामान्य जनतेला ही वास्तू माहित असते ती तिथे असलेल्या भारती बझारमुळे. सर्व जीवनोपयोगी वस्तूंचे मोठे भांडारच तेथे असल्याने दिवसभर तेथे ग्राहकांची वर्दळ असते. भारती विद्यापीठाचे १५ वर्षापूर्वी स्थापन झालेले डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय आता सांगलीवाडी येथे स्वतःच्या भव्य इमारतीमध्ये सुरु आहे. तेथे कला, विज्ञान, आणि वाणिज्य अशा तिन्ही शाखांचे शिक्षण दिले जाते. डॉ. पतंगराव कदम यानी शैक्षणिक संस्थांचा जो सुनियोजित असा प्रचंड पसारा महाराष्ट्रात अुभा केला आहे त्याची थोडीशी कल्पना हे कॉलेज बघिल्यावर निश्चितच येते. या कॉलेजचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. म.शि. सगरे हे येथे अनेक प्रकारचे शैक्षणिक क्षेत्रातील चांगले प्रकल्प राबवित असतात.

**१६ ) देवल स्मारक मंदिर :** सांगली ही नाट्यपंढरी म्हणून गौरवली गेली असल्याने सांगलीत अनेक नाट्यसंस्था असणे स्वाभाविकच आहे. त्या सर्व संस्थांमधील 'देवल स्मारक मंदिर' ही सर्वात जुनी संस्था असावी. नाट्याचार्य देवलांच्या स्मृतिप्रित्यर्थ सांगलीतील नाट्यप्रेमी मंडळीनी १ जानेवारी १९२७ रोजी 'देवल क्लब' या नावाने एक संस्था स्थापन केली. याच संस्थेचे पुढे 'देवल स्मारक' असे नामकरण झाले. आता अमृत-महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे संगीत नाटके. वैभवशाली संगीत नाट्यपरंपरा हा मराठी रंगभूमीचा आत्मा. पण तीच गौरवशाली परंपरा आजकाल नष्टप्राय होऊ लागली आहे. या संस्थेने, गेल्या ७-८ वर्षांमध्ये ही परंपरा जपण्याच्या दृष्टीने स्पृहणीय कामगिरी बजावली आहे. संस्थेने 'शारदा', 'स्वयंवर', 'मत्स्यगंधा', 'कट्यार काळजात घुसली', 'मंदारमाला' 'स्वरसम्राज्ञी', 'संशयकल्लोळ', ही संगीतप्रधान नाटके रसिकांसमोर सादर केली. १९९४ पासून बृहन महाराष्ट्र मराठी नाट्य स्पर्धा, दिल्ली, महाराष्ट्र राज्य संगीत नाट्य स्पर्धा, आंतरराज्य संगीत नाट्य-प्रवेश स्पर्धा, अशा विविध स्पर्धांमधून अक्षरशः पारितोषिकांचा पाऊस पाडला. १९९७ मध्ये सादर केलेल्या 'मत्स्यगंधा' नाटकाला, दिल्लीच्या बृहन् महाराष्ट्र मराठी नाट्य-स्पर्धेत, प्रथम पारितोषिक तर मिळालेच: खेरीज १६ वैयक्तिक पारितोषिके संस्थेने मिळविली. या संस्थेला आजवर, बलवंत पुरस्कार, नाट्यदर्पण पुरस्कार, दक्षिण महाराष्ट्र केसरी पुरस्कार, सानंद न्यास, इंदूर, कर्नाटक संघ, मुंबई असे विविध सन्मान प्राप्त झाले आहेत.

**१७ ) भावे नाट्यमंदिर :** मराठीमधील आद्य नाटककार कै. विष्णुदास भावे यांच्या नावाने १९४२ साली स्थापन झालेली ही एक मान्यवर नाट्यसंस्था आहे. सांगलीतील मध्यवर्ती ठिकाणी असलेली प्रशस्त जागा, भव्य रंगमंच आणि उत्कृष्ट ध्वनिव्यवस्था ही या नाट्यमंदिराची वैशिष्ट्ये आहेत. नाट्यक्षेत्रातील मान्यवर व्यक्तीला प्रतिवर्षी विष्णुदास भावे यांच्या नावाने संस्थेतर्फे समारंभपूर्वक सुवर्णपदक दिले जाते. आचार्य अत्रे, रांगणेकर, वसंतराव कानेटकर, जयमाला शिलेदार, जोत्स्ना भोळे अशा नाट्यक्षेत्रातील अनेकांना आजवर अशी सुवर्णपदके दिली गेली आहेत. कोणत्याही नाट्यसंस्थेला प्रथम प्रयोग करण्यासाठी संस्थेतर्फे उतेजन म्हणून हे नाट्यमंदिर विनामूल्य दिले जाते.

**१८ ) नूतन बुद्धिबळ मंडळ, सांगली :** सांगली शहराला बुद्धिबळाची गौरवशाली परंपरा आहे याचा अुलेख आधी आला आहेच. पण या अद्भूत खेळाची पद्धतशीर जोपासना करण्याचे आणि खेळाला नवीन नवीन खेळाडू मिळवून देण्याचे फार मोठे काम, गेली ६० वर्षे 'नूतन बुद्धिबळ मंडळ' ही संस्था करत आहे. या कार्यातील सिंहाचा वाटा मंडळाचे आधारस्तंभ आणि प्रेरणास्थान, श्री. न. व्यं. तथा भाऊसाहेब पडसलगीकर हे आहेत. अलीकडेच 'कॉमनवेल्थ चेस चँपियनशिप-२०००' या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करून, मंडळाने आपल्या शिरपेचात, मानाचा तुरा खोचला आहे. २३ डिसेंबर १९४१ रोजी, सांगलीमधील, भाऊसाहेब राजवाडे, दाजीसाहेब दीक्षित आणि सोपानदेव शिंगारे यांनी 'नूतन बुद्धिबळ मंडळ' सांगली या संस्थेची स्थापना केली. बुद्धिबळ खेळाचा प्रसार करणे, प्रचार करणे, स्पर्धा भरविणे, खेळाचे वाङमय जमविणे, स्थायी स्वरुपी इमारत मंडळासाठी बांधणे अशी अुद्दिष्टे ठेवून मंडळाचे कार्य सुरू झाले. सुप्रसिद्ध कवी आणि नामवंत बुद्धिबळपटू, साधुदास तथा गोपाळराव मुजुमदार, विनायकराव खाडिलकर, बाबासाहेब बोडस या जुन्या अनुभवी खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेने 'प्रविण' (Expert) खेळाडूंच्या स्पर्धा भरविण्यास १९४२ पासून सुरूवात केली. १९४९ पासून 'मास्टर्स मेमोरिअल स्पर्धा' भरविण्यास सुरुवात झाली. १९५५ पासून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी 'सदर्न मराठा कंट्री चेस' स्पर्धा प्रतिवर्षी आयोजित करण्यास सुरुवात केली. १९६८ मध्ये सुप्रसिद्ध अुद्योगपती, वसंतराव वैद्य यानी दिलेल्या भरघोस देणगीमुळे, त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ, कै. श्रीधर केशव वैद्य स्पर्धा, प्रथमच राष्ट्रीय पातळीवर भरविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे देशातील आघाडीचे नामवंत खेळाडू या स्पर्धेसाठी सांगलीत येऊ लागले. अशाच देणग्या मिळवत मंडळाने १९६९ पासून १९ वर्षाच्या आतील मुलांसाठी आणि १९७६ नंतर महिला खेळाडूंसाठी खुली महिला स्पर्धा भरविण्यास सुरुवात केली. एकूण स्पर्धांच्या अनुभवातून आणि बुद्धिबळाविषयी, मुलांच्या मनात,

अधिक आवड निर्माण करण्याच्या अुद्देशाने, मंडळाने, निरनिराळ्या वयोगटातील मुलामुलींसाठी विविध स्पर्धा सुरु केल्या आहेत. त्यामुळे सांगली आणि बुद्धिबळ असे समीकरणच देशात रुढ होऊ लागले. नुकत्याच पार पडलेल्या कॉमनवेल्थ स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करून मंडळाने, सांगलीचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर दुमदुमत ठेवले. ही मंडळाची मोठीच कामगिरी म्हणायला हवी. या मंडळामुळे बुद्धिबळ-क्षेत्रात, सांगलीला नामंकित खेळाडू देता आले. परदेशात बुद्धिबळ खेळण्यास जाणारा पहिला भारतीय खेळाडू हा एक सांगलीकरच होता. कै. विनायकराव खाडिलकर १९२४ साली अिंग्लडला गेले होते. नंतर कै. भालचंद्र म्हैसकर हे रशियाला जाणाऱ्या बुद्धिबळ ऑलिंपियाडसाठी, पहिल्या भारतीय संघाचे खेळाडू होते. सौ. भाग्यश्री साठे आणि स्वाती घाटे या मंडळाच्या महिला खेळाडूंविषयी नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. मंडळाचे अध्वर्यू, श्री भाऊराव पडसलगीकर १९८७ मध्ये रशियाला गेलेल्या ज्युनिअर संघाचे प्रशिक्षक आणि व्यवस्थापक होते. मंडळाने भरविलेल्या महिला स्पर्धामधूनच, सांगलीच्या भाग्यश्री साठे, आणि स्वाती घाटे यांखेरीज, शिला व विमल कानेटकर, जयश्री संकपाळ, शुभांगी मनोळकर, सुनंदा देसाई, पल्लवी शहा आदी महिला खेळाडू राष्ट्रीय स्पर्धा गाजवत आहेत.

विविध प्रकारच्या वयोगटापासून तो खुल्या स्पर्धा सातत्याने आयोजित करणारी संपूर्ण भारतातील ही एकमेव संस्था आहे ही वस्तुस्थितीच, मंडळाचे कार्यकर्तृत्व सांगण्यास पुरेशी बोलकी आहे.

■■■

# सांगलीतील प्रेक्षणीय स्थळे

सांगली हे गाव रम्य असले तरी ते काही पर्यटनस्थळ नव्हे. तरीपण पाहुण्याला आवर्जून दाखववावीत अशी काही प्रेक्षणीय स्थळे सांगलीत आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय खालीलप्रमाणे : -

**१. गणेशदुर्ग** : श्रीमंत थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यानी १८०१ मध्ये सांगली हे संस्थानचे प्रमुख ठाणे अधिकृतपणे बनवल्यावर, मिरजेच्या किल्ल्यासारखी सुरक्षित जागा त्याना राजधानीसाठी आवश्यक वाटली असावी. त्यामुळे श्रीमंतानी गणपतीमंदिर बांधण्यापूर्वीच गणेशदुर्ग (राजवाडा) बांधायची योजना आखली. कृष्णा नदीपासून ४-५ फर्लांगावर असलेला हा गणेशदुर्ग, अुत्तराभिमुख असलेला भुईकोट किल्ला आहे. त्याच्या बांधकामास १८०५ साली सुरुवात झाली. तशी त्याची पूर्वतयारी १८०१ पासूनच सुरू झाली होती. १८०७ साली सर्व बांधकाम पूर्ण झाले होते. राजघराण्यातील मंडळीना निवासासाठी जागा आणि दरबार, कोर्ट-कचेऱ्यांसाठी जागा असे या गणेशदुर्गाचे स्वरुप होते. किल्ला आणि आतील वाड्याचा आराखडा जागेवर गारगोट्या मांडून आखण्यात आला होता. खुद्द श्रीमंत चिंतामणराव, पेशवे सरकारच्या वतीने अनेक मोहिमांमध्ये गुंतलेले असल्याने, राजघराण्यातील मंडळीनी प्रत्यक्ष राहायला सुरुवात १८१०-११ साली केली.

सांगलीच्या वैभवात भर टाकणारी ही वास्तू आजच्या काळातसुद्धा एक वैशिष्ट्यपूर्ण वास्तू म्हणून ओळखली जाते. किल्लयाच्या भोवती पूर्वी खंदक होता; त्यात पाणी होते. त्यालगत असलेल्या तटबंदीवर चारी बाजूनी ५ बुरूज होते. त्यांची नावे होती १) श्रीसंगमेश्वर बुरूज २) नाग बुरूज ३) कृष्णा बुरुज ४) चांद बुरूज आणि ५) सीकाचा बुरूज. काळाच्या ओघात खंदक बुजले, बऱ्याच ठिकाणची तटबंदी जमीनदोस्त झाली. तरीसुद्धा प्रवेशदारातच असलेल्या भव्य काटेदरवाज्याच्या समोर असलेला 'श्रीगणेश बुरूज' आणि काटेदरवाजाच्या लगत असलेले 'जय' बुरूज आणि 'विजय' बुरूज आजही विद्यमान आहेत. काटे दरवाज्यासाठी वापरलेले जाड लोखंडी पत्रे आणि मोळे-खिळे राजापूरच्या बाजारातून आणवले होते. मधील पटांगणात असलेल्या दरबार हॉलमधून संस्थानचा कारभार चालत असे. पटागंणात दरबार हॉलच्या समोर दिसणाऱ्या तीन भव्य दगडी कमानी नंतर म्हणजे १८८४ साली बांधण्यात आल्या होत्या. आज जिल्हाधिकारांच्या कचेऱ्या वाड्यातील अिमारतींमध्ये आहेत. गणेशदुर्गाच्या प्रवेशद्वारापाशी जिल्हा न्यायालये आहेत. आतील बाजूस सांगली स्टेट म्युझियम

म्हणजे वस्तुसंग्रहालय आहे.

विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे याच वास्तूत असलेल्या तुरूंगातून, खंदकातील पाण्यात अुड्या मारुन १९४३ मध्ये वसंतदादानी पलायन केले होते.

**२. सांगलीचे आराध्यदैवत - श्री गणपती मंदिर :** मिरज जहागिरीतून फुटून श्रीमंत आप्पासाहेबानी सांगली संस्थानची स्थापना केली हे आपण बघितलं. असं म्हणतात की वैतागून मिरजेतून बाहेर पडले तेव्हा त्यांच्याजवळ फक्त सिंहासनारुढ ताम्र धातूची श्रीगणेशाची मूर्ती होती. त्यावेळी त्यानी मनोमन त्या मूर्तीची आराधना केली. ''सर्व गोष्टी माझ्या मनासारख्या होऊ द्यात. मी तुझी प्रतिष्ठापना एका मंदिरात करेन'' सुदैवाने तसेच झाले. संरक्षणासाठी गणेशदुर्गाचं बांधकाम, धोंडजी वाघाची मोहीम अशा कामाच्या गर्दीतूनही श्रीमंताना आपल्यावर कृपाछत्र धरणाऱ्या या चिंतामणीचा विसर पडला नव्हता. निरनिराळ्या देवळांचे नकाशे अुतरून आणण्याचे काम चालू होतंच. आज कुणाला सांगितलं तर नवल वाटेल. मूळच्या योजनेनुसार, गणपतीमंदिराचे काम स्वानंदभुवनाच्या म्हणजे आजच्या माळबंगल्याच्या माळावर सुरू झाले होते. पुढे या ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवल्याने, कृष्णातीरी म्हणजे सध्याच्या जागी मंदिर बांधण्याचे ठरले. पण इथली अडचण अगदी अुलट्या स्वरुपाची होती ! म्हणजे सगळीकडे पाणीच पाणी आणि जिकडे तिकडे पाण्याचा गाळच गाळ. या जागेत खाली धर नसल्यानं, सारा खोलगट भाग वाळू आणि चुन्यानं भरून काढावा लागला. कृष्णा नदीच्या पुरापासून सुरक्षित रहावं म्हणून या मंदिराची अुभारणी मोठ्या क्ल्पकतेने करण्यात आली आहे. सर्व मंदिराचा आकार, तीस ते चाळीस फूट खोल चुनेगच्चीने भरुन काढण्यात आला आहे. त्यामुळे गावात कृष्णेच्या पुराचे पाणी शिरले तरी त्याला मंदिरात प्रवेश नसतो ! हे थोडं विलक्षणच्च आहे.

आता अशा नदीकाठच्या मंदिरासाठी दगड कसा कठीण हवा, म्हणून सर्वत्र शोध घेण्यात आला. तेव्हा ज्योतिबाच्या डोंगरावरुन काळा दणकट दगड आणण्यात आला. वाहतुकीची आजच्या सारखी सोय नव्हती. मोठ्या कष्टानं वडारी गाड्यांतून दगड आणावा लागला. प्रत्यक्ष बांधकामास सुरूवात १८११ मध्ये झाली. तब्बल ३०-३२ वर्षे काम चालू होते. प्रमुख मंदिर म्हणजे श्री गजाननाचे. भोवतालच्या रम्य परिसरात, श्री चिंतामणेश्वर, चिंतामणेश्वरी देवी, सूर्यनारायण आणि लक्ष्मीनारायण अशी चार मंदिरे बांधण्यात आली. श्री गणपती पंचायतन म्हणजे शिव, सूर्य, चिंतामणेश्वरी, लक्ष्मीनारायण आणि गणपती असं पाच मूर्ती असलेले गणपती मंदिर अभावानंच आढळतं. पंचायतनाच्या पाचही देवांच्या मूर्ती पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या

आहेत. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यानी आणविलेल्या संगमरवरी दगडापैकी जो शिल्लक होता, तो आप्पासाहेबानी मिळवला होता. या मूर्ती अुभ्या असाव्यात की बसलेल्या, त्यांच्या हातात आयुधे कोणती असावीत, यासंबंधीचे सर्व बारीकसारीक तपशील पुण्याचे वे. शा. सं. चिंतामण दीक्षित आपटे यांच्याकडून घेण्यात आले. आणि त्याबरहुकुम मूर्ती घडविण्याचे काम स्थानिक कारागीर, मुकुंदा आणि भिमाण्णा पाथरवट यानी विलक्षण सुबकतेने केले. प्रत्येक मूर्तीच्या सिंहासनाखाली सोने, रुपे व पंचरत्ने घातलेली आहेत.

बांधकाम पूर्ण झाल्यावर म्हणजे १८४४ मध्ये (चैत्र शुद्ध १० शके १७६६) 'अर्चा' समारंभ एखाद्या लग्नकार्यासारखा मोठ्या थाटामाटाने साजरा करण्यात आला. दूरदूरचे वैदिक आणि शास्त्रीपंडित बोलावून मोठा दानधर्म करून, राजेशाही इतमानाने आणि तितक्याच धार्मिकतेने पाचही मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. चिंतामणराव आप्पासाहेबांजवळ असलेल्या ज्या मूर्तीचा वर अुल्लेख आलेला आहे, तिचीही स्थापना करण्यात आली. अशा रीतीने त्यांच्या प्रतिज्ञेची पूर्तता झाली. मात्र बांधकामाची कामे मधूनमधून चालूच होती. संस्थान विलीन झाल्यानंतरसुद्धा दुसऱ्या चिंतामणराव आप्पासाहेबानी देवालयाच्या सभामंडपाचे आणि भव्य महाद्वाराचे काम पूर्ण केले.

'अर्चा' समारंभापासून म्हणजे १८४४ पासून संस्थानच्या गणपती अुत्सवाला प्रारंभ झाला; संस्थान विलीन झाले असले, तरी आजसुद्धा हा अुत्सव भक्तिभावाने होत असतो. सर्व पूजा-अर्चा नित्यनेमाने, पारंपारिक पद्धतीनुसार व्हाव्यात म्हणून, सांगलीकर राजेसाहेबानी 'श्री गणपती पंचायतन संस्थान' हा खाजगी ट्रस्ट निर्माण केला आहे. मंदिरात रोज सकाळी काकडआरती, सूर्योदय व सूर्यास्त यानंतर एक तासाने आरती, शेजारती आणि मंत्रपुष्प असते. सकाळी गायन असते. प्रत्येक महिन्यात विनायकी, संकष्टी, शिवरात्र शुद्ध सप्तमी, शुद्ध अष्टमी आणि शुद्ध चतुर्दशी असे सहा दिवस छबिने असतात. एकेकाळी मंदिराकडे १८ हत्ती होते. आता फक्त आबालवृद्धांचा लाडका 'बबलू' हत्ती, काही बैल, गायी, अुंट, घोडे अशी जनावरं राहिली आहेत.

राजस्थानी लाल-गुलाबी पाषाणाचे प्रवेशद्वार, अष्टखांबी विशाल सभामंडप, मध्यभागी असलेलं असंख्य लोलकांचं झुंबर, काळ्याशार गुळगुळीत आणि ताशीव गाभाऱ्याच्या अग्रभागी, ऋद्धिसिद्धीसह विराजमान झालेली श्री गजाननाची सालंकृत मूर्ती, टवटवीत फुलांच्या हारांनी अधिकच खुलून दिसणारी, आजूबाजूच्या रम्य परिसरातील गणपती पंचायतन, मंदिरातील स्वच्छता, टापटीप, मंगलमय वातावरण यामुळं मंदिर कसं प्रसन्न असावं, मनोवेधक दिसावं याचा एक आदर्श वस्तूपाठच या गणपतीमंदिरानं घालून दिला आहे. सांगलीच्या सर्व जातीजमातीच्या लोकांचं हे एक

श्रद्धास्थान आहे. या 'विघ्नहर्त्या' चे दर्शन घेऊनच अनेक सांगलीकर मंडळी कामाला लागतात आणि आपल्या चिंतांचं ओझं या 'चिंतामणी' च्या पायाशी ठेवूनच झोपी जातात !

**३. बागेतील गणपती :** 'बागेतील गणपती' हे रम्य ठिकाण सांगलीकर जनतेसाठी, धार्मिक माहात्म्याबरोबरच, एक पिकनिक स्पॉट म्हणून अलीकडे लोकप्रिय झाले आहे. मिरज जहागिरीच्या गोविंद हरी पटवर्धन या पराक्रमी सरदारानी या देवालयाची स्थापना केली. श्रीगणपतीमंदिरापेक्षाहि हे मंदिर पुरातन आहे. त्यातील मूर्तीची प्रतिष्ठापना थाटामाटात १७६६-६७ च्या सुमारास झाली.

हे देवालय सांगली-हरीपूर रस्त्यावर, कृष्णा नदीच्या काठी आहे. पूर्वीच्या काळी या भागाला बोरवन व गायरान म्हणून ओळखले जात असे. या ठिकाणी असलेल्या सुपीक कुरणात चिंचेची झाडे मुद्दाम एका रांगेत लावलेली होती. एका आख्यायिकेप्रमाणे, एका बैराग्याने ती चिंचेची बाग तयार केली आणि तिथंच त्याची समाधि आहे असं म्हणतात. मूळ मिरजेत वास्तव्य असणाऱ्या सरदार गोविंदहरीनी, त्या काळात सांगली आणि हरीपूरपासून जरा बाजूला असलेल्या या ठिकाणी आपल्या आराध्यदेवतेचे मंदिर कां बांधले असावे, याला काही ऐतिहासिक आधार नाही. बैराग्यासारख्या एखाद्या सत्पुरूषाच्या सांगण्यावरून असू शकेल. देवालय झाल्यानंतर, मूळ चिंचेच्या झाडांच्यापुढे मोठी बाग करण्यात आली होती. तिला 'हरीपूरबाग' असे म्हणत असत. आता बाग निघून गेली तरी या देवालयाला 'बागेतील गणपती मंदिर' असंच म्हणण्याचा प्रघात आहे. आज घडीलासुद्धा हा परिसर वृक्षराजींमुळे रम्य दिसतो. सांगलीचे माजी नगराध्यक्ष कै. अण्णासाहेब कराळे यानी या परिसरात फुलझाडे लावून 'भक्तिबाग' स्थापन केली. इथे जेवणखाण्याच्या सोयी झाल्यामुळे अनेक हौशी मंडळी घरगुती समारंभांच्या निमित्ताने, खास वनभोजन येथे आयोजित करतात. धार्मिक अुत्सवांच्या वेळी या ठिकाणी मोठी वर्दळ असते. हौशी आणि रसिक लोक सकाळी फिरण्याच्या निमित्ताने या ठिकाणापर्यंत येतात आणि श्रीगजाननाचे दर्शन घेऊन नित्यकामाला लागतात.

**४. हरीपूर :** पटवर्धन घराण्यातील सरदार गोविंद हरी यानी इ.स. १७६८ मध्ये, आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ, त्यांच्या नावाने हा गाव वसवला. त्यासाठी सहाशे बिघे जमीन स्वतंत्र काढून, हे हरीपूर, शंभर ब्राम्हणाना अग्रहार दिले. सांगली गावाला अगदी खेटून असलेलं हे गाव, कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. नद्यांचा संगम फार सुरेख आहे. तेथील विशाल पात्र, निळ्या-हिरव्या पाण्यावरून डौलाने वाहतूक करणाऱ्या होड्या, नीख शांततेचा मधुर भंग करणारे हिरव्यागार पोपटांचे थवे, नदीकाठची सदाहरित झाडी, यामुळे पुण्या-

मुंबईकडील पर्यटक या हरिपुरावर अगदी लुब्ध असतात. संगमाजवळच संगमेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. श्रावणमासातील प्रत्येक सोमवारी हरिपुरला जत्रा भरते. त्यावेळी मिळणारी कलाकुसरीची, रंगीत साखरेची भांडी आणि खेळणी संग्राह्य असतात. हरिपुरातील हळदीची पेवे आणि विटा प्रसिद्ध आहेत. पूर्वी पटवर्धन राजघराण्यातील मंडळी हरीपुरला संगमस्नानासाठी जात, तेव्हा परत जाताना सांगली सीमेवर पाय धुवूनच पुढे जात. कारण हरीपूर गाव ब्राम्हणाना अग्रहार म्हणून पटवर्धनांच्या पूर्वजानी दान दिलेला होता. म्हणून दान केलेल्या भूमीतील मातीचा एक कणहि बरोबर येऊ नये अशी त्यांची भावना होती. हरिपूराच्या रम्य परिसरामुळे, काही निर्माते चित्रपटाच्या शूटींगसाठी येथे येतात. हरीपूर हे नाटककार देवलांचे गाव. 'शारदा' नाटकातील ' तू चिरून टाक ही मान' हे पद ज्या पिंपळाच्या पाराखाली त्याना स्फुरले, तो संगमाजवळचा पिंपळाचा पार स्थानिक मंडळी कौतुकाने दाखवतात.

**५. आयर्विन पूल :** १८ नोव्हेंबर १९२९ रोजी तत्कालीन व्हाईसरॉय, लॉर्ड आयर्विन यांच्या हस्ते अुद्‌घाटन झालेला आणि त्यांचेच नाव दिलेला हा आयर्विन ब्रिज म्हणजे स्थापत्यशास्त्राचा एक देखणा नमुना आहे. सांगली शहराच्या हितासाठी कृष्णा नदीवरील या पुलाची नितांत आवश्यकता होती. सांगलीच्या राजेसाहेबानी या पुलाच्या निर्विघ्न बांधकामासाठी केवढा वैयक्तिक त्याग केला होता, याची हकीगत या पुस्तकात अितरत्र आली आहेच. या पुलामुळे सांगली-सांगलीवाडी लोकांचे दळणवळणाचे होणारे हाल तर वाचलेच पण पुण्या-मुंबईची विशाल कवाडे या पुलामुळे सांगलीसाठी अुघडी झाली. सांगलीचा व्यापार वाढला. कोयना धरणामुळे कृष्णा नदीला येणारे महापूर अलिकडे कमी झाले. एरवी अनेक महापूर या पुलाने अंगावर झेलले आहेत. ७०-७२ वर्षापूर्वी साडे-सहा लाख रूपये खर्चून बांधलेल्या या पुलावर अुभे राहिले की कृष्णा नदीच्या भव्य पात्राची विशालता जाणवते. पावसाळ्यात पात्राचे पाणी वाढायला लागले की प्रत्येक सांगलीकर कौतुकाने पुलावर जाऊन, खालच्या भव्य खांबावर पाण्याची अुंची दाखवणारी दर्शिका आवर्जून बघून जातो. आता जरी दुसरा समांतर पूल नदीवर बांधण्यात येत असला तरी या आयर्विन ब्रिजचे सांगलीकरांच्या मनातील स्थान अढळ राहील, इतकी भावनिक गुंतवणूक त्यांची या पुलाच्या बाबतीत झाली आहे. पावसाळ्यात ऐन पुराच्या वेळी होणाऱ्या पोहण्याच्या आणि होड्यांच्या शर्यती हे एक सांगलीचे खास आकर्षण आहे.

**६. सांगली वस्तुसंग्रहालय :** सांगली वस्तुसंग्रहालयाची स्थापना तशी अलिकडच्या काळातील आहे. ९ जानेवारी १९५४ रोजी तत्कालीन अुपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्या हस्ते या संग्रहालयाचे अुद्‌घाटन झालं. कै. चिंतामणराव पटवर्धन राजेसाहेबानी,

त्याना आलेल्या भेटवस्तू, मुद्दाम जतन केलेल्या दुर्मिळ वस्तू यांच्या आधारे हे संग्रहालय अुभे केले गेले. तसे सालारजंग म्युझिअम वा म्हैसूर, बडोद्याच्या तुलनेत हे म्युझिअम खूपच छोटं असले तरी वैशिष्टयपूर्ण आहे.

या संग्रहालयाचं प्रमुख वैशिष्टय म्हणजे जगप्रसिद्ध चित्रकारांची तैलचित्रे. प्रख्यात युरोपिअन चित्रकार जेम्स वेल्स आणि एम. मुल्लर यांच्याबरोबर आबालाल रेहमान, रावबहादूर धुरंधर यांच्या काही अप्रतिम कलाकृती येथे आहेत. त्यातील नाना फडणीस व सवाई माधवराव यांची तैलचित्रे, त्याना प्रत्यक्ष समोर बसवून जेम्स वेल्स यांनी काढलेली आहेत. रावण-जटायू युद्ध, गंगावतरण, राजकन्येचे ब्राम्हणास दान....अशी काही तैलचित्रे अत्यंत मनमोहक आहेत. दीड-दोनशे वर्षापूर्वीची ही चित्रे आजहि ताजीतवानी वाटतात, ती त्यातील अुत्तम प्रतीच्या रंगयोजनेमुळे. संग्रहालयाच्या प्रवेशद्वारापाशीच १७९१ मधील एक युद्धप्रसंग दाखवणारं भव्य चित्र आहे. लॉर्ड कॉर्नवालिसच्या फौजेत पटवर्धन सरदारांच्या पलटणीनी केलेला पराक्रम अितका सुरेख चित्रबद्ध झालेला आहे की तो शब्दबद्ध करणं कठिण !

ऐतिहासिक वस्तूंमध्ये तंजावर शैलीतील मेणाचं चित्र, प्रतापगडावरील भवानीमातेच्या मंदिरातील लोखंडी साखळ्या, पिसाच्या जगप्रसिद्ध मनोऱ्याची प्रतिकृती, फत्तेपूर सिक्रीतील शेख सलिम खिस्तीच्या कबरीची प्रतिकृती, हत्यारे अशा अनेक अुल्लेखनीय वस्तू आहेत. याशिवाय चंदनाच्या लाकडावरील सुबक कोरीव काम, चीन, जपान, युरोपामधील अुत्तम नक्षीकाम असलेली चिनी मातीची भांडी, संगमरवरी दगडावरील नक्षीदार जाळीच्या खिडक्या, इंग्लडचे जुने घड्याळ अशा अनेक सुरेख वस्तू संग्रहालयात आहेत.

लहान मुलांना विशेष गंमत वाटेल अशा वस्तू म्हणजे ढाण्या वाघ, चित्ता, सुसर, मगर असे प्राणी. सांगलीच्या राजेसाहेबानी महाबळेश्वराच्या जंगलात मारलेला ढाण्या वाघ आणि तळसंगीच्या तलावात मारलेली सुसर आदी प्राणी म्हैसोरहून पेंढा भरुन आणली आहेत. प्रत्यक्ष प्राणीच समोर आहेत असं वाटून, किंचितकाल थरकाप अुडवून देणारे हे प्राणी आहेत हे निश्चित.

या संग्रहालयातील हजार बाराशे दुर्मिळ वस्तू पहायला सर्वसामान्य प्रेक्षकाला अर्धा तास पुरेल पण एखाद्या चोखंदळ, रसिकाला दोन ताससुद्धा कमीच पडतील.

महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभागाकडे याची व्यवस्था आहे. सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेपाचपर्यंत लोकाना पाहाण्यासाठी ते अुघडे असते. सोमवारी सुट्टी असते आणि इतकं चांगलं संग्रहालय बघायला प्रवेश

शुल्क फक्त एक रुपया.

अिथल्या कर्मचाऱ्यानी या संग्रहालयाची देखभाल अुत्तम ठेवली आहे हे आवर्जुन सांगायला हवं.

**७. आमराई :** सांगलीचे पहिले अधिपती थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन याना मळा आणि बागा करण्याचा नाद होता. काळाच्या ओघात सर्व बागा नष्ट झाल्या. मात्र १८४६ मध्ये तयार झालेले संस्थानी काळातील आमराई अुद्यान आजही दिमाखात उभे आहे. हे मोठे देखणे अुद्यान आहे. सांगली हायस्कूलच्या शेजारी असलेल्या विस्तीर्ण परिसरात पसरलेल्या अुद्यानात, अनेक तऱ्हेची वृक्षवल्ली आहेत, नाही फक्त आंब्याचे झाड! १९८५ मध्ये येथील झाडांची मोजदाद करण्यात आली होती. तेंव्हा सव्वाशे जातींचे वृक्ष आमराईत असल्याचे नमूद झाले होते. त्यामध्ये चिंच, गोरखचिंच, चंदन, मोहोगनी, टेंभुर्णी, बेलगामवट, केशिया, रिठा, चेंडूफूल, भद्रलता, राचण, खडशिरणी, अशोक अशा अनेक जातींच्या वृक्षांचा समावेश आढळला. यापैकी बेलगामवट हा मूळचा आग्नेय आशियातील वृक्ष आहे. चेंडूफूल दक्षिण अमेरिकेतील आहे. पूर्वी आमराईत चंदनाची विपुल झाडे होती. पण नंतर या मौल्यवान वृक्षांची चोरी झाली. गेल्या कांही वर्षात आमराईची खूपच हेळसांड झाली होती. मात्र अलीकडे जागरूक निसर्गप्रेमी लोकांमुळे मूळच्या दुर्मिळ वृक्षांची रोपे लावणे, नवीन जातींची लागवड करणे अशा गोष्टींकडे त्यांचे लक्ष गेले आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे. दक्षिण महाराष्ट्रातील एक 'बोटॅनिकल गार्डन' म्हणून आमराई अुद्यान विकसित करावे इतकी गुणवत्ता या अुद्यानात आहे असे अनेक जाणकारांचे मत आहे. घनदाट झाडीमुळे येथे नीख शांतता असते. सकाळच्या प्रहरी बरेच लोक फेरफटका करण्यासाठी येतात. असंख्य पक्ष्यांचा चिवचिवाट ऐकून अुत्साहाने कामाला लागतात. आमराईत एक छोटेसे मारूती मंदिर आहे.

**८. प्रतापसिंह अुद्यान :** सांगलीतील मध्यवर्ती ठिकाणी हे अुद्यान आहे. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी घसरगुंडी, झोपाळे आदी खेळ खेळण्यासाठी मुलांची अुद्यानात खूप गर्दी असते. त्याबरोबरच बाहेर अुभ्या असलेल्या भेळवाल्यांच्या, आईस्क्रिमच्या गाड्या यामुळे गर्दीमध्ये भरच पडत असते. मात्र या अुद्यानाचे मुख्य आकर्षण आहे ते प्राणीसंग्रहालयाचे. त्यामध्ये वाघ, अस्वल, कोल्हे, ससे, हरणे, मगरी, चित्ते, सर्प, माकडे, रंगीबेरंगी पक्षी, मोर आहेत, पण मुलांची गर्दी असते ती सिंहाच्या पिंजऱ्याभोवती. एकेकाळी ३०-३५ सिंह असलेल्या या अुद्यानातील, अपुऱ्या जागेमुळे आणि गैरव्यवस्थेमुळे एकामागोमाग होणारे सिंहांचे मृत्यू पाहून मुक्या प्राण्यांचे प्रेम असणाऱ्या सहृदय प्रेक्षकांना फार मनःस्ताप होतो ! सर्व सिंहाचे नीट पुनर्वसन झालेले पाहण्यास

सर्वजण अुत्सुक आहेत. अुद्यानाला ज्यांचे नाव दिले आहे त्या सांगली संस्थानच्या युवराजांचा - प्रतापसिंहाचा छोटेखानी पुतळा अुद्यानात आहे.

सर्वसाधारणपणे सांगलीतील प्रेक्षणीय स्थळे म्हणावीत अशी एवढीच. ज्याला रूची आहे त्याने विलिंग्डन कॉलेज, वालचंद अिंजिनिअरींग कॉलेज अशी शैक्षणिक मंदिरे पहावीत.

त्याशिवाय आधुनिक काळातील प्रेक्षणीय स्थळ म्हणून सांगलीचा वसंतदादा शेतकरी सहकारी कारखाना अवश्य पहावा. अुसाचा रस काढण्यापासून, तो शुभ्र साखर तयार होण्यापर्यंतची प्रक्रिया ही पाहण्यासारखीच आहे. वसंतदादांच्या अथक प्रयत्नांनी अुभा राहिलेला हा कारखाना, आशिया खंडातील सर्वात मोठा कारखाना आहे.

सांगलीत येणाऱ्या पाहुण्याला वर अुल्लेखलेली प्रेक्षणीय स्थळे तर दाखवावीच; खेरीज हरीपूर-सांगलीवाडी परिसरातील हळदीची पेवे अवश्य दाखवावीत. सांगलीच्या परिसरातील मंदिरे, औदुंबर, नरसोबावाडी ही दत्तस्थाने पहाण्यासारखी आहेत. निसर्गप्रेमींसाठी सागरेश्वर, चांदोलीसारखी अभयारण्ये, दंडोबा, शुकाचार्याचा डोंगर आणि डोंगरावरील मंदिरे, गुढेपांचगणीसारखी निसर्गरम्य ठिकाणे ही मोठीच आकर्षणाची ठिकाणे आहेत. खिद्रापूरची लेणी प्रेक्षणीय आहेत. मिरजेतील मंदिरे, समर्थ-शिष्या वेणाबाईंचा मठ, हजरत मिरासाहेब दर्गा, करगणीचे राम मंदिर, तासगावचे गणेशमंदिर, खरसुंडीचे रेवणसिद्ध मंदिर, बहे गावी रामदास स्वामींनी अुभारलेले हनुमान मंदिर, अशी सांगलीच्या आसपासची ठिकाणे मुद्दाम भेट द्यावीत अशी आहेत. बत्तीस शिराळ्याच्या नागपंचमीच्या अुत्सवासाठी, आणि जिवंत नाग पकडण्यामधील थरार अनुभवण्यासाठी दूरदूरचे पर्यटक आवर्जून सांगलीत येतात.

पुढील काळात कुणा कल्पक प्रवासी संस्थेने 'सांगली दर्शन' अशी नैमित्तिक सहल सुरू केली तर आश्चर्य वाटायला नको अितकी गुणवत्ता सांगली परिसरात निश्चितच आहे.

■■■

# सांगली २०० वर्षांचा धावता इतिहास
# (१८०० ते २०००)
# 'कालपट'

१८०० १८०० च्या जानेवारीमध्ये मिरज जहागिरीतून वाटणी होऊन थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन सांगलीत येऊन गावाची पहाणी करून गेले. १० सप्टेंबरच्या धोंडजी वाघ या बंडखोराविरूद्धच्या लढाईत चिंतामणराव जखमी, पण शौर्य गाजवले.

१८०१ 'सांगली' हे आपल्या जहागिरीचे मुख्य ठाणे म्हणून श्रीमंत चिंतामणरावानी निश्चित केले. संरक्षणासाठी 'गणेशदुर्ग' बांधण्यास सुरुवात.

१८०६ श्रीगणपतीमंदिराच्या आखणीस प्रारंभ.

१८०७ सांगलीत पेठांची आखणी आणि वसाहतीला प्रारंभ झाला.

१८११ गणेशदुर्गाचे काम पूर्ण झाले.

१८१८ इंग्रजानी पेशवाई खालसा केली. पेशवांच्या सर्व सरदारांना, जहागिरदारांना इंग्रजांची चाकरी करण्याचे फर्मान जारी.

१८२० स्वाभिमानी चिंतामणरावांचा इंग्रजांची चाकरी करण्यास ठाम नकार. जनरल प्रिट्झलर म्हैसाळपर्यंत आला ! इंग्रजांची नोकरी टाळण्यासाठी, चिंतामणरावानी, १ लक्ष ३८ हजारी ९९५ रुपयांच्या मुलूखावर कायमचे पाणी सोडले. सांगली संस्थानचा हुबळी, तडस, बरडोल वगैरे भाग इंग्रजांना द्यावा लागला.

१८२१ इंग्रजानी छापलेलं, बाळशास्त्री जांभेकरांचे 'पंचोपाख्यान' बघून, श्रीमंत आप्पासाहेबानी सांगलीत छापखाना (शिळा प्रेस) सुरू केला.

१८३४ सांगलीत टांकसाळ सुरू करून नाणी पाडण्यात येऊ लागली.

१८३५ श्रीमंत आप्पासाहेबानी पटवर्धन घराण्याचा वंशवृक्ष बनवून घेतला.

१८३८ श्रीमंत धुंडिराव चिंतामणराव पटवर्धन यांचा जन्म.

१८४२ दिवाणी व फौजदारी अधिकार असलेल्या न्यायाधिशांची सांगलीत प्रथमच नेमणूक. पण त्यावेळी कायदेकानू अस्तित्वात नव्हते. जुन्या वहिवाटीवरुन न्यायदान होत असे.

१८४३ श्रीमंत आप्पासाहेबांच्या प्रोत्साहनामुळे विष्णुदास भावे यानी मराठी रंगभूमीवर 'सीतास्वयंवर' हे पाहिले नाटक सादर केले.

१८४४ श्रीगणपतीमंदिराचे ३० वर्षे चाललेले बांधकाम पूर्ण होऊन 'अर्चा' समारंभ थाटामाटात साजरा झाला.

१८४६ }
१८५० } थोरल्या चिंतामणरावाना बागांची खूप आवड होती. आंबराई, मिरज मळा, गणपतीमळा, तात्यासाहेब मळा, असे २५ मळे त्यानी तयार करवून घेतले.

१८५१ थोरले चिंतामणराव आप्पासाहेब यांचे निधन झाले- त्याच वर्षात मुन्सफ न्यायालये प्रथम स्थापन झाली-श्रीमंत धुंडीराम तात्यासाहेब सांगली संस्थानचे दुसरे अधिपती झाले.

१८५३ कृष्णा नदीला महापूर आला. त्यामुळे खणभाग वसाहतीला चालना मिळाली.

१८५५ सांगलीत पहिला सरकारी दवाखाना निघाला.

१८६१ सांगलीत सार्वजनिक शिक्षणास सुरवात झाली.

१८६३ मराठी शाळांची सुरवात.

१८६५ सांगलीत पहिली इंग्रजी शाळा स्थापन झाली. त्याच वर्षी वेदशास्त्र शाळेची स्थापना झाली. त्यामध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, न्याय, व्याकरण आणि ज्योतिष शिकवणाऱ्या ५ पाठशाळा सुरू झाल्या.

१८६९ सांगली नगरवाचनालयाची स्थापना.

१८७२ सांगली शहराचा पहिला सिटी सर्व्हे झाला.

१८७६ सांगली म्युनिसिपालिटीची स्थापना झाली.

१८८४ गणेशदुर्गात दगडी कमान बांधण्यात आली.

१८८७ सांगली शहराला काकडवाडीहून सायफन पद्धतीने पाणी-पुरवठा सुरू झाला.

१८८९ सांगली म्युनिसिपालिटीमध्ये पहिला आगीचा बंब आला.

१८९१ सांगलीत पोस्ट ऑफिस सुरु झाले.

१८९३ सांगली स्टेट बँक सुरू झाली.

१८९८ सांगलीत पहिली प्लेगची साथ आली. एकूण लोकवस्तीच्या मानाने मोठ्या प्रमाणावर प्राणहानी झाली. एकूण २ हजार १५९ माणसे मृत्युमुखी पडली.

१९०१ सांगलीचे दुसरे अधिपती श्रीमंत धुंडिराव तात्यासाहेब निधन पावले.

१९०३ दत्तकविधीनंतर पटवर्धन घराण्यातील चि. भाऊसाहेब पटवर्धन हे श्रीमंत दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब म्हणून सांगली संस्थानचे तिसरे अधिपती

झाले. त्यांच्या अज्ञानकाळात सांगलीचे ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून अच्युत भास्कर देसाई यांची नेमणूक झाली.

१९०४ सांगली संस्थानात लोकल बोर्ड स्कूल बोर्डाची स्थापना. याच वर्षी सांगली पांजरपोळ संस्थेची स्थापना. - कै. विष्णु रामचंद्र राजवाडे यांनी सांगलीत पहिला खाजगी छापखाना सुरु केला.

१९०५ सांगलीत हळद वायदेबाजाराची स्थापना. कॅप्टन बर्क ॲड्मिनिस्ट्रेटर झाले.

१९०७ सांगली-मिरज रेल्वे फाटा सुरू झाला.

१९०५ } कॅप्टन बर्क यांच्या कारकीर्दीत सांगली संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत
१९१० } व सक्तीचे. १९०८ मध्ये वखारभागाची स्थापना होऊन व्यापारास अुत्तेजन मिळाले. कृष्णा नदीचे पाणी टाकीत साठवून नळाने घरोघरी पुरवठा सुरु झाला. शाळा, कचेऱ्या, कोर्टे यासाठी सुंदर अिमारती बांधल्या गेल्या.

१९१३ वॉटर वर्क्सची स्थापना.

१९१४ सांगलीत कृष्णा नदीस महापूर आला. ४,५,६ ऑगस्ट असे ३ दिवस शहरात पाणी होते. याच वर्षीच्या ४ डिसेंबरला सांगलीत पहिली खाजगी माध्यमिक शाळा सुरू झाली. (सिटी हायस्कूल)

१९१६ राजेसाहेबांच्या पुढाकाराने ५ आक्टोबर रोजी सांगली बँकेची स्थापना.

१९१९ २२ जून रोजी विलिंग्डन कॉलेजची स्थापना झाली.

१९२० २० फेब्रुवारी रोजी ज्योतिष संमेलनाच्या निमित्ताने लो. टिळकांची सांगलीला भेट. याच वर्षी १२ नोव्हेंबरला सांगलीला म. गाधींची भेट.
याच वर्षी शिवाजीनगर आणि टिंबर एरिया वसाहतीस प्रारंभ

१९२१ जैन महिलाश्रमाची स्थापना.

१९२२ दक्षिण संस्थानी प्रजा परिषद चळवळीचे सांगलीत अधिवेशन.

१९२८ सांगली नगरपालिकेच्या आयुर्वेदिक दवाखान्यास प्रारंभ.

१९२९ आयर्विन ब्रिज बांधला. १८ नोव्हेबर रोजी व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्या हस्ते उद्‌घाटन.

१९३० सांगलीत मेडिकल असोसिएशनची स्थापना.

१९३३ सांगलीत राणीसाहेबांच्या (सरस्वतीदेवी पटवर्धन) पुढाकाराने महिला परिषदेची स्थापना. याच वर्षी महिला शिक्षण मंडळामार्फत मुलींच्या स्वतंत्र हायस्कूलची सुरुवात. - डॉ. आंबेडकर, भाई परमानंद आणि डॉ. मुंजे यांच्या सांगली भेटी.

१९३५ सांगलीस वीजपुरवठा होण्याच्या दृष्टीने ज्युबिली इलेक्ट्रिक वर्क्सची स्थापना. दोनच वर्षात श्रीगणपतीमंदिरास पहिले कनेक्शन देऊन वीजनिर्मितीस प्रारंभ.

१९३७ सांगलीत "दक्षिण महाराष्ट्र" आणि "विजय" ही साप्ताहिके निघू लागली.

१९३८ सांगलीत दक्षिण संस्थान प्रजापरिषद सांगलीत भरली. वल्लभभाई पटेल, कमलादेवी चटोपाध्याय, पट्टाभीसीतारामय्या असे मोठे नेते अुपस्थित होते.

१९३९ सांगली नगरपालिकेत लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्याबाबतची घटना मंजूर.

१९४२ १४ ऑगस्ट रोजी सांगलीच्या जुन्या स्टेशन चौकात क्रांतिकारकांविरुद्ध गोळीबार झाला. श्रीमती अरुणा असफअली, अच्युतराव पटवर्धन सांगलीत आश्रयासाठी आले.

१९४३ २४ जुलै १९४३ रोजी सांगली तुरुंगातून वसंतदादा पाटील यांचे पलायन. खांद्याला गोळी लागून जखमी. त्यांचे सहकारी अण्णा पत्रावळे, बाबुराव जाधव यांचे निधन.

सांगलीत नाट्यशताब्दी-महोत्सवासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे आगमन.

१९४७ सांगलीचा पहिला मास्टर प्लॅन तयार झाला. याच वर्षी वालचंद इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना.

१९४७ १५ ऑगस्टला-स्वातंत्र्यदिन साजरा.

१९४८ १ फेब्रुवारीस गांधीहत्येनंतर सांगलीत प्रचंड जाळपोळ.

१९४८ ८ मार्च रोजी सांगली संस्थान स्वतंत्र भारतात विलीन झाले. त्यापूर्वी राजेसाहेबानी रु. ३५ लाखाचा ट्रस्ट करुन तो सांगली नगरपालिकेच्या स्वाधीन केला.

सांगली ही दक्षिण सातारा जिल्ह्याची राजधानी झाली.

१९५० सांगलीला मार्केट ॲक्ट लागू झाला.

१९५६ सांगलीच्या शेतकरी सहकारी कारखान्याची स्थापना झाली.

१९६० सांगलीच्या राजेसाहेबांचा ७० व्या वाढदिवसानिमित्त भव्य नागरी सत्कार. चिंतामणराव पटवर्धन कॉलेज ऑफ कॉमर्सची स्थापना.

२१ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याचे पूर्वीचे दक्षिण सातारा हे नाव बदलून सांगली जिल्हा असे नामकरण झाले.

१९६१ कृष्णा नदीस महापूर.

१९६२ जिल्हा लोकल बोर्डाच्या जागी जिल्हा परिषदेची स्थापना.

१९६३ सांगली आकाशवाणी केंद्राची स्थापना. याच वर्षी नवीन सिव्हील हॉस्पिटल सुरु.

१९६५ २३ फेब्रुवारीस सांगलीचे लोकप्रिय राजेसाहेब दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब यांचे दुःखद निधन.

१९६७ ११ डिसेंबरला सांगलीत मोठा भूकंपाचा धक्का.

१९६९ सांगली (जिल्हा) नगरवाचनालयाचा शतसांवत्सरिक आणि विलिंग्डन महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव.

१९७१ मिरज-सांगली मीटर गेज रेल्वे बंद झाली आणि सांगली, मिरज-पुणे ब्रॉडगेज मार्गावरील स्टेशन झाले.

१९७४ नवीन कायद्याप्रमाणे नगराध्यक्षांच्या थेट निवडणूक पद्धतीने डॉ. देवीकुमार देसाई यांची पहिले नगराध्यक्ष म्हणून निवड.

१९७७ सांगलीचे पद्मभूषण वसंतदादा पाटील महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले.

१९८१ तरुण भारत व्यायाम मंडळाकडून अखिल भारतीय कबड्डी स्पर्धांचे सांगलीचे आयोजन.

१९८१ वसंतदादा पाटील ट्रस्टतर्फे इंजिनिअरींग कॉलेज सुरु.

१९८५ १९ ऑगस्ट रोजी कथाकार पानवलकर यांचे सांगलीत निधन.

१९८९ १ मार्च रोजी सांगलीकरांचे लाडके लोकनेते वसंतदादांचे दुःखद निधन. अंत्यविधिसाठी राजीव गांधी यांची अुपस्थिती.

१९९१ सांगलीचे नटवर्य मामा पेंडसे यांचे १२ जानेवारी रोजी ठाणे येथे निधन.

१९९२ सांगलीचे मा. अविनाश याना विष्णुदास भावे सुवर्णपदक.

१९९४ सांगली नगरवाचनालयाचा १२५ वा वर्धापन-महोत्सव.

१९९६ पै. हरीनाना पवार यांचा २ फेब्रुवारी रोजी जाहिर सत्कार आणि लगेच १६ मार्चला त्यांचे दुःखद निधन.

१९९८ सांगली नगरपालिका विसर्जित होऊन ९ फेब्रुवारीपासून सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेची स्थापना.

२००० सांगलीत आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धांचे आयोजन

दीनानाथ मंगेशकर शताब्दीनिमित्ताने 'मंगेशकर महोत्सवा'चे सांगलीत महापालिकेतर्फे २५ फेब्रुवारी रोजी मंगेशकर भावंडांचा जाहिर सत्कार आणि त्यांना मानपत्र.

# " सांगली भूषण"
## सन्मानाचे मानकरी

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि
शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारी

**'विश्व जागृती मंडळ'**

ही एक सांगलीमधील नामवंत संस्था आहे.
सांगली शहराचे नाव आपल्या कर्तृत्वाने
अुन्नत करणाऱ्या व्यक्तीस

**'सांगली भूषण'**

अशा पुरस्काराने सन्मानित करण्याचा अुपक्रम
या संस्थेने १९९६ पासून सुरु केला.
दहा हजार रुपये रोख,
गौरव चिन्ह, शाल आणि श्रीफळ
असे या पुरस्काराचे स्वरुप असते.
आजपर्यंत चार व्यक्तिना अशा प्रकारे
सन्मानित करण्यात आले. ते मानकरी खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| **१) डॉ. भय्यासाहेब परांजपे नेत्र विशारद** | **१९९६** |
| **२) खासदार श्री. आण्णासाहेब गोटखिंडे** | **१९९७** |
| **३) स्वर्गीय श्रीमती राजमतीअक्का पाटील** | **१९९८** |
| **४) श्रीमती आशा भोसले** | **१९९९** |


---

**५) श्री. संभाजीराव भिडे याना इ.स. २००० साठी
हा पुरस्कार घोषित झाला आहे.**


# सांगली भूषण



भैयासाहेब परांजपे



आण्णासाहेब गोटखिंडे



संभाजीराव भिडे



आशा भोसले



राजमतीआक्का



सांगली (जिल्हा) नगर वाचनालय - १९१०


माझिया नगरीचे कवतिक
करावे मी किती आणिक
जिच्या कीर्तीचा हा वेलू
गेला गगनावरी..........



सांगली (जिल्हा) नगर वाचनालय - २००१




महानगरपालिका



भारती विद्यापीठाची प्रेक्षणीय इमारत